म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0000741

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
अं. नं. 928

श्रीसयाजीविजय या पत्रांच्या वर्गणीदारांस
सन १९१३ सालची भेट.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे

श्री.

विठ्ठल रामजी शिंदे यांचे

# लेख, व्याख्यानें व उपदेश.

किंमत १ रुपया.

**नवीन व्यवस्था! विशेष सुधारणा! स्वल्प किंमत!!**

# उपनिषत्-प्रकाश.

**संपादक-प्रो० चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.**

श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य व भाषांतर आणि श्रीरामानुज, श्रीमाधवानुज व स्वामीदयानंद यांच्या सिद्धांतासह संपादकीय विवरण, उपसंहार, अन्वय, अर्थ, सूची इत्यादिसह.

**दरमहा १०० पृष्ठें याप्रमाणें वर्षांत १२०० पृष्ठांचा ग्रंथ.**

**वार्षिक वर्गणी ४ रुपये.**

हिंदु धर्माला, आधारभूत असणारें तत्त्वज्ञान हें आर्य-ऋषिप्रणीत उपनिषदांमध्यें चांगलें सांगितलें आहे. **उपनिषदें** म्हणजे तत्त्वज्ञान अथवा '**पराविद्या**' होय. ही विद्या बाकीच्या **अपराविद्यांचें** नियमन करिते. असें उद्धारक ज्ञान जर कोणत्या ग्रंथांत व्यवस्थित सांगितलें असेल, तर तें आमच्या आर्यऋषि-प्रणीत उपनिषदांमध्यें होय. वरील विधान करण्याला आम्हांस सकौतुक अभिमान वाटतो, व तसाच कोणाही इतर आर्यांस वाटेल. 'आम्हांस जिवंतपणीं उपनिषदांचा परिचय झाला, हें आमचें महद्भाग्य होय;' असें जर्मन पंडित शोपेनहार व डॉ० मॅक्समुल्लर म्हणत असत. अशा ह्या उपनिषदांतील तत्त्वज्ञान, सर्व बालगोपालांस सहज समजेल, अशा रीतीनें प्रकट करण्याचें अवजड काम आम्ही गुदस्तसालापासून अंगावर घेतलें आहे. दरमहा १२८ पृष्ठांचा एक अंक या हिशेबानें ऑक्टोबर १९१२ पर्यंत या मासिकाचे १२ अंक प्रसिद्ध झाले आहेत; व त्या १२ अंकांत **ईशावास्योपनिषद्**, **केनोपनिषद्** व **काठकोपनिषद्** अशीं तीन उपनिषदें, श्रीमत शंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य व स्वामी दयानंद सरस्वती यांच्या भाष्य-भाषांतरासह, आणि **प्रश्नोपनिषद्** श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य व भाषांतर आणि इतर आचार्यांच्या सिद्धांताचा उल्लेख यांसह पूर्ण झालें आहे. प्रत्येक उपनिषदाचे शेवटीं संपादकीय विवरण, उपसंहार व सूची देऊन तें सुलभ केलें आहे.

## नवीन सालापासून विशेष सुधारणा.

आरंभीं चारही आचार्यांच्या भाष्य व भाषांतरासह हें काम सुरू केलें होतें, पण तें असेंच चालू ठेवल्यास पुरें करण्यास पुष्कळ काळ लागेल आणि त्याप्रीत्यर्थ मोठी रक्कम अडविणें भाग पडून लोकांचीहि गैर सोय होईल, व प्रसंगीं हें महाभारतीय काम अर्ध्यावरच सोडण्याचा प्रसंग येईल, अशी भीति असल्यामुळें तूर्त श्रीमच्छंकराचार्य यांचेंच भाष्य घेऊन, भाषांतर, अन्वय, अर्थ व विवरण यांसह सर्व उपनिषदें पूर्ण करावीं, नंतर क्रमानें एकेका आचार्यांचें भाष्य व भाषांतर घ्यावें, अशा प्रकारची कित्येक हितचिंतक मंडळीकडून सूचना आली. ही सूचना योग्य वाटल्यावरून चालू सालापासून श्रीमच्छंकराचार्य यांचें भाष्य व भाषांतर आणि इतर आचार्यांचा मतमतांतरांचा सिद्धांत देण्याचें ठरविलें आहे

## वर्गणींत फेरफार.

आरंभीं दरमहा १२८ पृष्ठें या नियमानें वर्षास १५३६ पृष्ठें प्रसिद्ध करण्याचें ठरवून त्याची वर्गणी ६ रुपये ठेविली होती, व त्याप्रमाणें एक वर्षांत १५३६ पृष्ठांत वरील चार उपनिषदें पूर्ण करून दिलीं. परंतु मध्यम स्थितींतील लोकांस वर्षाचे रुपये ६ भरणें बरेंच जड जातें, असें आमच्या अनुभवास आल्यावरून, नवीन वर्षाच्या आरंभापासून दरमहा १२८ पृष्ठांचे ऐवजीं १०० पृष्ठें, या हिशेबानें वर्षाचीं १२०० पृष्ठें प्रसिद्ध करण्याची योजना केली आहे; आणि त्याची वार्षिक वर्गणी ६ रुपयांचे ऐवजीं फक्त ४ रुपये ठेविली आहे. म्हणजे हल्लीं एक रुपयास २५६ पृष्ठें देत आहोंत, त्याऐवजीं नवीन वर्षारंभापासून एक रुपयास ३०० पृष्ठें देणार आहोंत. नवीन सालापासून ज्यांस वर्गणीदारांत आपलें नांव नोंदविणें असेल त्यांनीं अगाऊ वर्गणी रुपये ४ भरून नांवें नोंदवावीं. बाहेर गांवचे ग्राहकांस ट. ख. ६ आणे अधीक पडेल. पहिल्या वर्षाचे बाराहि अंक ६ रुपये पाठविले असतां मिळतील. परंतु कापडी पुठ्यांत बांधलेलीं स्वतंत्र उपनिषदें पाहिजे असल्यास ७॥ रु. किंमत पडेल. ट. ख. वेगळा.

---

**कांहीं अभिप्राय**—रा० ब० **महाजनी** लिहितात,-दशोपनिषदांची योग्यता लहानसान नाहीं. गीतामहात्म्यांत म्हटलें आहे कीं,-'सर्व उपनिषदें या गोमाता होत. त्यांनां दोहणारा गोपालनंदन होय. पार्थ हा वत्स, दूध पिणारे सुबुद्ध व गीता हें दुग्धामृत.' तात्पर्य, दशोपनिषदें हीं भगवद्गीतेचें मूळ व भगवद्गीता हें दशोपनिषदांचें सार होय. तेव्हां त्यांची योग्यता अधिक आहे. प्रो० भानूचा पूर्वप्रस्ताव फार चांगला आहे, तो वाचकांनीं अवश्य वाचावा. **प्रो० भडकमकर** लिहितात—हें सर्व ज्ञान व्यावहारिक भाषेंत सर्व सुलभ करून देऊन, सर्व महाराष्ट्रियांवर आपण फार उपकार केले आहेत. जिज्ञासु वर्गानें आपली ही कृति संग्रहास ठेवून तिचें परिशीलन नियमितपणें केल्यास त्यांस सहजगत्या उपनिषद्ज्ञानाचा लाभ होईल एवढेंचनाहीं, तर मनामध्यें उदात्त विचारांचा प्रादुर्भाव होऊन उत्तरोत्तर आत्मविकास व श्रेय-प्राप्ति होईल. **केसरी**—उपनिषत्प्रकाशांत हल्लीं केलेली दुरुस्ती वाढता लोकाश्रय मिळण्यास कारणीभूत होईल असें आम्हांस वाटतें. प्रो० भानु यांचें भाषांतर बरेंच साधें व सोपें होत आहे. सदरहू धार्मिक मासिक पुस्तकास दिवसेंदिवस उदार लोकाश्रय मिळेल, अशी आम्हास आशा वाटते. **ज्ञानप्रकाश**—मंत्राचा अन्वय व अर्थ देऊन शेवटीं संपादकाचें विवरण देण्याची जी पद्धति प्रो० भानूंनीं स्वीकारिली आहे, ती फार चांगली आहे. उद्योग मोठा, मेहनतीचा व खर्चाचा आहे. इहपर कल्याण साधूं इच्छिणाऱ्या सर्व गृहस्थांनीं या सत्कृत्यास साह्य करावें. **जगद्वृत्त**—ह्या मंडळीनें अलीकडे संस्कृत भाषेच्या अध्यात्मिक पुराण-ग्रंथांचें भाषांतर तयार करून, प्रसिद्ध करण्याचा अजस्र उद्योग चालू केला आहे; तो तर अत्यंत स्तुत्य होय. त्याला योग्य उत्तेजन देऊन त्यांचे प्रसिद्ध होणारे ग्रंथ संग्रहीं ठेवण्याचा निर्धार अवश्य करावा. आमच्या मराठीचा अभिमान बाळगणारे बरेच सुशिक्षित संस्थानिक आहेत,त्यांनीं या कामीं या मंडळीस अवश्य मदत केली पाहिजे.

---

## याच मासिकांतून पूर्ण झालेले ग्रंथ.

१ **ईशावास्योपनिषत्**—श्रीमच्छंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य, व श्रीदयानंदस्वामी यांच्या भाष्य व भाषांतरासह कापडी पुठ्ठा किं. १। रु.
२ **केनोपनिषत्**—वरप्रमाणेंच चारही आचार्यांच्या भाष्यभाषांतरासह कापडीपुठ्ठा किं. १। रु.
३ **काठकोपनिषत्**-वरप्रमाणेंच चारही आचार्यांच्या भाष्यभाषांतरासह कापडीपुठ्ठा किं.४॥ रु.
४ **प्रश्नोपनिषत्**—श्रीमच्छंकराचार्य यांचें भाष्य व भाषांतर आणि इतर आचार्यांचा मतभेदाचा सार यांसह, साधा पुठ्ठा किं. १। रु. कापडी पुठ्ठा किं. १॥ रु.

**सूचना**—वरील वेगवेगळीं कापडी जाड पुठ्यांत बांधलेलीं चारही उपनिषदें एकत्र घेतलीं असतां ७॥ रुपये किंमतींत मिळतील. टपाल व्ही पी. खर्च वेगळा पडेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ..........
ता. ..........
ठाणे.

विठ्ठल रामजी शिंदे

यांचे

# लेख, व्याख्यानें आणि उपदेश.

REFBK-0000741

संपादक

बी. बी. केसकर.

प्रकाशक

**दामोदर सांवळाराम आणि मंडळी**

प्रिंटर्स, पब्लिशर्स व एजंटस्‌—ठाकुरद्वार, मुंबई.

आवृत्ति १ ली.

मुंबई—इंदुप्रकाश स्टीम प्रेस.

सन १९१२ इसवी.

( या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क संपादकानें आपणाकडे ठेविले आहेत. )

किंमत एक रुपया.

हें पुस्तक रा. रा. चीं. ची. केसकर यांनीं तयार केलें, आणि रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं इंदुप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें. नं. ४३४ ठाकुरद्वार, मुंबई.

# प्रस्तावना.

एके रविवारीं सायंकाळीं मुंबई येथील प्रार्थनामंदिरामध्यें रा. रा. शिंदे यांच्या प्रेमळ प्रार्थनेचा जो माझ्या मनावर परिणाम झाला, तो मी कधींही विसरणार नाहीं. प्रार्थना ऐकत असतांना एक दोन क्षणच कां होईना, माझ्या अंतःकरणाचें परिवर्तन झालें; व मी ईश्वराच्या समागमांत आहें, प्रत्यक्ष मला त्या परमात्म्याचा साक्षात्कार प्रथम झाला असें वाटलें. तेव्हांपासून रा. शिंदे यांच्याविषयीं माझ्या मनांत जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आहे, ती उत्तरोत्तर वाढतच आहे. ती प्रेमळ प्रार्थना ऐकल्यापासून रा. शिंदे यांचें होतां होईं तों प्रत्येक व्याख्यान कसें बसें टिपून घेऊन किंवा त्यांचे घरीं जाऊन त्यांच्याकडून मजकूर सांगवून घेऊन, तें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करावयाचें अशी मीं माझ्याशीं गांठ बांधून ठेविली; व त्याप्रमाणें प्रथम जगद्वृत्त पत्रांत व नंतर ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, सुबोधपत्रिका या पत्रांत मी तीं प्रसिद्ध करूं लागलों. त्यांचीं व्याख्यानें ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध होत असतां त्याच वेळीं प्रार्थनामंदिरांतील दुसऱ्या विद्वान् गृहस्थांचेही सुंदर उपदेश प्रसिद्ध होऊं लागले; तेव्हां ते सर्व एकत्र करून पुस्तकरूपानें छापवावे असें मला वाटलें. पण मी अननुभवी म्हणून तें काम माझ्यानें झेंपणार नाहीं म्हणून माझे अनुभवी मित्र, सुबोधपत्रिकेचे संपादक रा. रा. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांच्या पोक्त सल्ल्यानें आम्ही दरवर्षी 'धर्मपर व्याख्यानें' या नांवानें एक पुस्तक प्रसिद्ध करूं लागलों. आतांपर्यंत अशीं तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत; व चवथ्याचें काम सुरू आहे. या चारी पुस्तकांतील रा. शिंद्यांचीं व्याख्यानें व त्यांचे उपदेश प्रस्तुत पुस्तकांत घेतले आहेत; मात्र 'बहाई समाजाचा संदेश' हें व्याख्यान घेतलें नाहीं; तें, 'धर्मपर व्याख्यानें' पुस्तक पहिलें यामध्यें आहे.

एकदां माझ्या एका मित्राशीं बोलत अस... सहज म्हणाले 'रा. शिंदे हे इंग्लंडमधून
सुबोधपत्रिकेंत जीं पत्रें लिहीत तीं उत्तम असून मला फार आवडत.' तेव्हांपासून मी तीं पत्रें
वाचावयास मिळावींत म्हणून खटपट करूं लागलों. रा. रा. वैद्य यांचेकडे गेलों व समाजांतील
पत्रिकेच्या जुन्या फाइली वाचण्याची परवानगी मागितली व ती त्यांनीं ताबडतोब मोठ्या आनं-
दानें दिली. दोन वर्षांचीं तीं पत्रें वाचून माझ्या मनांत आलें कीं, हीं पत्रें कोणीं छापून काढल्यास
त्यांपासून परदेशीं जाऊं इच्छिणाऱ्या नवख्या मनुष्यास समुद्रावरील प्रवासाचा उगम त्यां...
फ्रान्स या देशांतील निदान कांहीं महत्त्वाच्या गोष्टींविषयी ...मजी बावांचें धर्माकडे फार ... स्कॉलरशिप
मी कोल्हापूर येथील ब्राह्मसमाजाच्या वार्षिकोत्सवा... त्यांनीं धर्मग्रंथ वाचलेले, परंतु स्वत... ब्राह्मसमाज-
छापखाना आहे, अशा माझ्या एका मित्राज... त्यांचें मोठ्या भक्तिभावानें पारायण व नि... नंतर त्यांच्या
लेख व व्याख्यानें स्वतःच्या खर्चानें छापून प्र... रकरी संप्रदायापैकीं असत. जमाखिंडीस तुका... ांचें अभीष्ट
बरोबर मी त्या कामास लागलों व रा. वैद्य ... मुख्य भाग रामजी बावांचा असे. ...विळीं अशाच
सांपडले नाहींत ते समाजांतील फायलीवरून उ... ...गाची आठवण
...ंदे ह्यांच्या एका मित्रानें लिहिला आहे. ...ांत येऊन त्या
पुरास पाठविला; पण माझ्या मित्राकडून बोलल्या...

पण त्यामुळें मनांतला निश्चय म्हणून ढळला नाहीं. पुढें शेठ दामोदर सांवळाराम यंदे यांची रा. रा. लक्ष्मणराव नायक बी. ए. यांच्यासह दोन तीन वेळां गांठ घेऊन हा योग जुळून आला आहे.

सोईकरितां या पुस्तकाचे तीन भाग केले आहेत. पहिला भाग लेख. यामध्यें रा. शिंदे यांनीं इंग्लंडमधून पाठविलेल्या पत्रांचा व हिंदुस्थानामध्यें लिहिलेल्या लेखांचा समावेश केलेला आहे. अशा प्रकारचे एकंदर ३० लेख या भागांत घेतले आहेत. पैकीं मुरळी हा लेख मूळ इंग्रजींत आहे त्याचें भाषांतर केलें आहे. कौटुंबिक अथवा सार्वजनिक उपासनेच्या वेळीं जें प्रवचन रा. शिंद्यांनीं केलें, त्या सर्व प्रवचनांचा समावेश तिसऱ्या भागांत केला आहे. त्यांशिवाय त्यांनीं जीं वेळोवेळीं भाषणें केलीं त्यांचा समावेश 'व्याख्यानें' या नांवानें दुसऱ्या भागांत केला आहे. दुसऱ्या भागांत १६ व्याख्यानें व तिसऱ्या भागांत ३७ उपदेश आहेत.

लेख, व्याख्यानें व उपदेश मिळून ह्या पुस्तकांत ८३ विषय आले आहेत. या विषयांपैकीं चार पांच विषयांची भाषा रा. शिंदे यांच्या इतर विषयांची भाषासरणी आणि शैली यांच्याशीं जमत नाहीं, कारण ती भाषा त्यांच्या वाणींतून किंवा लेखणींतून उतरली नाहीं. तर त्यांच्या मराठी भाषणाचे उतारे कोणी तरी स्वतःच्या भाषेंत वर्तमानपत्रांत छापलेले, तसेंच येथें घेतल्यामुळें हा भाषेचा किंचित् विजोड दिसून येण्यासारखा आहे.

सर्व विषय मला रा. शिंदे यांना वाचून दाखवितां आले नाहींत, तेव्हां त्यांमध्यें चुका राहण्याचा संभव आहे, त्याबद्दल मी जबाबदार आहें. तसेंच कांहीं मराठी लेख घाईमुळें व पुस्तक-विस्तारास्तव या पुस्तकामध्यें घालतां आले नाहींत, व इंग्रजीमध्यें त्यांचीं जीं पुस्तकें छापून तयार आहेत त्यांचेंही मराठी भाषांतर करणें झालें नाहीं, त्याबद्दल मला फार दिलगिरी वाटते. सध्यां माझ्या स्मृतीमध्यें जे त्यांचे दुसरे मराठी व इंग्रजी लेख आहेत, त्यांचीं नांवें खालीलप्रमाणें :— (१) धर्मविकासाच्या तीन स्थिति. (२) सामाजिक उपासना–राष्ट्राची एक मोठी गरज. (३) लोकशिक्षण. (४) ब्राह्म समाजाचा संदेश. (५) नीच मानलेल्या जातींच्या कर्तव्याची दिशा. (६) नि. सा. मंडळीच्या महाराष्ट्र परिषदेंतील प्रास्ताविक भाषण. (७) साधनाश्रमाचा पाया. (8) The Brahma Samaj and The Prophets of the world. (9) Elevation of the Depressed classes. (10) Mission for the Depressed classes. (11) The untouchable India. मुदवानें दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास त्यांत यांचा समावेश होईल.

ह्या संग्रहास जोडलेलें चरित्र रा. शिंदे ह्यांच्या व माझ्या एका मित्रानें, मीं त्यांस पुरविलेल्या माहितीवरून लिहिलें आहे. रा. शिंदे ह्यांचें विस्तृत चरित्र देण्याचें हें स्थळ नव्हे व हा काळही नव्हे, म्हणून तें त्रोटकच दिलें आहे.

शेवटीं माझे मित्र रा. रा. द्वारकानाथ गोवि[illegible] वैद्य यांनीं मोठ्या आनंदानें पत्रिकेच्या फायली मला वाचावयास दिल्या, वेळोवेळीं या पुस्तकाबद्दल ज्या महत्त्वाच्या सूचना केल्या व पत्रिकेंतील व्याख्यानें व लेख ह्या संग्रहांत दाखल करण्यास जी परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे, रा. रा. लक्ष्मणराव नायक बी. ए. यांनीं हें पुस्तक छापून देण्यास शेठ दामोदर सांवळाराम यंदे यांना [illegible] केली व दुसरीही पुष्कळ मदत केली त्याबद्दल त्यांचे, शेठ यंदे यांनीं हें पुस्तक [illegible] रा. रा. नारायण [illegible]वराडकर यांनीं प्रूफें तपास-[illegible] आभार [illegible]नितों.

[illegible]दानें व आशीर्वादानें माझ्या अंतःकरणा-[illegible]हून कसेंबसें शेवटास नेवविलें, त्याबद्दल त्या[illegible]नें शरण जाऊन ही प्रस्तावना पुरी करितों.

**बी. बी. केसकर.**

श्री ग्रंथ संग्र…

# विठ्ठल रामजी शिंदे बी. ए., यांचें त्रोटक चरित्र.*

ज्यांचे लेख, व्याख्यानें व उपदेश ह्या संग्रहांत समाविष्ट केले आहेत, ते माझे मित्र, रा० रा० विठ्ठल रामजी शिंदे, आजच्या काळचे एक तरुण कर्ते गृहस्थ आहेत. त्यांच्या हातून आजपर्यंत जी लोकसेवा झाली आहे, व आज जी होत आहे, तिचेपेक्षां अधिक लाभदायक सेवा पुढें होणारच आहे; आणि ती करावयास त्यांस परमेश्वरानें दीर्घायु करावें, त्यांस नेहमीं त्यानें साहाय्य करावें, अशी विनम्र भावें प्रार्थना करून त्यांच्या चरित्रांतील कांहीं विशेष गोष्टींचा येथें उल्लेख करितों.

## पूर्व-वृत्तान्त.

आमच्या ह्या लहानशा चरित्रासाठीं रा० विठ्ठलरावांच्या पूर्वजांची सविस्तर हकीकत येथें देण्याची आवश्यकता नाहीं व ती उपलब्धही नाहीं. शिंदे हें नांव मराठ्यांचें असून विठ्ठल-रावांच्या तीर्थरूपांचें नांव रामजी बसप्पा कसें ? याचा उलगडा पुष्कळांस सहज होण्यासारखा नाहीं. जीं नांवें विशिष्ट धर्मवाचक असतात, त्यांचा स्वीकार तो धर्म मान्य नसणारे सहसा करीत नाहींत. बसप्पांचे वडील एका लढाईंत पडले व हे उघडे पडले. त्यावेळीं जमखिंडीच्या कानडी देसायांनीं बसप्पाला आपल्यापाशीं ठेविलें. त्यांचें मूळचें नांव काय होतें तें कळावयास मार्ग नाहीं. ह्या लहान मुलानें आपल्या लिंगाईत धर्माचा स्वीकार करावा असें देसायास वाटत होतें; परंतु बसप्पांस हा विचार बिलकूल पसंत पडला नाहीं. त्यांस मराठा म्हणवून घेणेंच पसंत पडलें. ह्यांनीं अल्प वयांत हा जो करारीपणा दाखविला, तो विठ्ठलरावांचे तीर्थरूपामध्यें पुष्कळ उतरला होता, व त्याचाच अंश रा० विठ्ठलरावांमध्यें आढळून येतो ! पुढें बसवंतअप्पांनीं बराच जमीनजुमला केला व ते सुखानें कालक्रमणा करूं लागले.

विठ्ठलरावांचे तीर्थरूप रामजी ह्यांच्या शिक्षणासंबंधानें जी माहिती आहे, तिच्यावरून जुन्या काळाच्या मानानें त्यांचें शिक्षण फार उत्तम रीतीनें झालें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांना प्रथमतः संस्थानच्या स्टोअर्सच्या कामावर व नंतर पागेच्या कामावर नेमिलें. आजपर्यंत हा मान मराठा गड्यास मिळालेला नव्हता. तो रामजी बावांना देण्यांत आला, त्यावरून त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची जुन्या पद्धतीनें काम करण्याची रीत, त्यांचा करारीपणा, त्यांची तें काम करण्याची पात्रता, ह्यांविषयीं संस्थानच्या अधिपतींची चांगलीच खात्री झाली असावी असें उघड होतें. जमखिंडी येथें त्यावेळीं कोणाही मराठ्याकडे कारकुनी नसल्यामुळें, ह्यांचें व ह्यांच्या वरिष्ठांचें पटत नसे. त्यामुळें रामजीबावांनीं तीन वेळा राजीनामा दिला व तिन्ही प्रसंगीं त्यांस मागाहून बोलावण्यांत आलें. तिसऱ्या प्रसंगीं, घरीं सोळा वर्षें बसल्यानंतर ते आपल्या कामावर रुजू झाले.

रा० विठ्ठलरावांचे धर्मपर लेख व व्याख्यानें ह्या पुस्तकांत संग्रहित केले आहेत. असे लेख लिहावयास व अशीं व्याख्यानें द्यावयास त्यांच्याठिकाणीं जी पात्रता आली, तिचा उगम त्यांच्या … पितरांच्या धार्मिकतेंत झाला आहे, असें मला वाटतें. रामजी बावांचें धर्माकडे फार … स्कॉलरशिप जुन्या वळणांतले ते, व त्या वळणास अनुसरून त्यांनीं धर्मग्रंथ वाचलेले, परंतु स्वतः … ब्राह्मसमाज- अभंगांचा संग्रह करणें, ते लिहून ठेवणें, त्यांचें मोठ्या भक्तिभावानें पारायण व नि… नंतर त्यांच्या हा त्यांचा क्रम नित्य चालू असे. ते वारकरी संप्रदायापैकीं असत. जमखिंडीस तुका… ांचें अभीष्ट तिथीनिमित्त जो सप्ताह बसत असे, त्यांत मुख्य भाग रामजी बावांचा असे. … विळीं अशाच …गाची आटवण

* हा लहानसा चरित्रात्मक लेख रा० शिंदे ह्यांच्या एका मित्रानें लिहिला आहे. …ांत येऊन त्या

गोसावी, फकीर ह्यांस रामजी बावांच्या घरांत मज्जाव नसे. त्यांना जेवावयास, खावयास, गांवांत कोठेंही मिळालें नाहीं, तरी तें रामजीबावांकडे हटकून मिळावयाचें ! आणि ह्या पाहुणे-मंडळींत नीच मानिलेल्या जातींतीलही लोक असत, पण त्यांचाही आदरसत्कार रामजी बावांच्या घरीं इतर पाहुण्यांप्रमाणेंच होत असे. त्यांच्याशीं पंक्तिप्रपंच होत नसे. एवढेंच नव्हे, तर त्यांची पत्नी सौ० यमुनाबाई ह्याही, पतीस जें कार्य प्रिय, त्यांस पुढाकार घेऊन पाहुण्यांचा आदर-सत्कार करीत. विठ्ठलरावांच्या ठिकाणीं अत्यंजांविषयीं प्रेम उत्पन्न झालें व तें त्यांनीं वाढीस लाविलें, ह्या गोष्टी खऱ्या आहेत; पण त्यांच्या घराण्यांत ही गोष्ट अपूर्व नाहीं; एवढेंच नव्हे तर, निराळ्या दृष्टीनें आईबापांकडूनच त्यांना ह्या बाबतींत पहिला धडा मिळाला, असें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होईल असें मला वाटतें. सौ० यमुनाबाई ह्या अगदीं जुन्या वळणांतल्या. फार श्रद्धाळु, अत्यंत प्रेमळ स्वभावाच्या, आपल्या मधुर भाषणानें आपल्याकडे कोणाचेंही चित्ताकर्षण करून घेणाऱ्या, आनंदी, पतिसेवा-परायण, अत्यंत दुःखाच्या प्रसंगींही धैर्यानें वागणाऱ्या व आपल्या यातनांस, दुःखास विसरून वागणाऱ्या होत्या. रामजी बावांनीं नोकरी सोडल्यानंतर सगळ्या घराण्याची इभ्रत ह्या शांत व प्रेमळ बाईनीं राखली ! रामजी बावांनीं आपले पैसे लोकांना उसने व कर्जाऊ देऊन घालविले, आणि वर, राजीनामा देण्यापूर्वीं सरकारांत आपल्या नांवें असलेले पैसे परत न घेतां उपरणें झाडून ते मोकळे झाले ! अशा वेळीं आपली पूर्वीची इभ्रत, पूर्वीची स्थिति, ह्यांस अनुसरून संसार चालविणें हें यमुनाबाईंस किती कष्टाचें कार्य झालें असलें पाहिजे, याची कल्पना वाचकांनींच करावी. पण, त्यांनीं आपली शिकस्त करून आपल्या पतीचा संसार चालविला. एक वेळच्या अन्नावर राहण्याची पाळी आली, तरी खेद न मानतां त्यांनीं आपल्या प्रेमानें सर्वांस जणूं काय भारून टाकिलें !

## जन्म व शिक्षण.

अशा प्रकारची विपन्नावस्था येण्यापूर्वीं म्हणजे इ० स० १८७३ सालीं ता० २३ एप्रिल रोजीं जमखिंडी येथें रा० विठ्ठलराव यांच्या जन्म झाला. त्यांच्या वयाचीं पहिलीं सहा वर्षें खाऊन पिऊन सुखांत गेलीं. नंतर कालचक्राचा फेरा आला ! तेव्हां लहानपणापासून हालामध्यें दिवस काढण्याची त्यांना संवयच जडली असल्यामुळें, आतां ते अडचणींस न जुमानतां आपला मार्ग पुढें काढीत जात असतात ! विठ्ठलरावांचें प्राथमिक शिक्षण व पुढें इंग्रजी शिक्षण जमखिंडीस झालें. प्राथमिक शिक्षण चालू असतांनाच, नोकरी नसलेल्या रामजी बावांनीं आपल्या स्वतःच्या मुलां-बाळांनीं भरलेल्या घरांत सहा महिन्यांची सून आणिली ! रामजीबावा हे जमखिंडी येथें मराठा जातीचे मुख्य पंच असल्यामुळें, विठ्ठलरावांचें हें लग्न कर्ज काढून त्यांना साजरें करावें लागलें, व त्याच कर्जाचा बोजा पुढें वाढून फार आपत्ति भोगाव्या लागल्या. विठ्ठलरावांचें शिक्षण आपल्या गांवीं बऱ्या रीतीनें झालें. त्यांची कुशाग्र बुद्धि, त्यांची शिकण्याची हौस व त्यांचें अभ्यासावरील लक्ष, ह्यांमुळें ते आपल्या शिक्षकांस फार प्रिय झाले; व अखेरीस आपल्या गांवांतील परशुराम भाऊ हायस्कुलांतून ते सन १८९१ सालीं प्रवेश परीक्षा पसार झाले. वरच्या इयत्तेंत असतांनाच मुलांच्या Debating Society सारख्या संस्था स्थापून तेथें ते पुढाकार घेत व त्याच वेळीं सगळ्या मुलांवर त्यांची छाप असे, असें दृष्टोत्पत्तीस आलें होतें. विठ्ठलरावांच्या शिक्षणाचा ग्रंथ येथेंच आटोपावयाचा; आणि त्यांच्यासारख्या विपन्ना-वस्थेंतील माणसानें आणखी शिक्षण होणें ही कांहीं सहजसाध्य गोष्ट नव्हती. पण, त्यांचें पुढलें शिक्षण होण्यास जमखिंडी संस्थान अप्रत्यक्षरीत्या कारण झालें आहे. म्हणजे शिक्षणासाठीं संस्थानानें मदत केली नाहीं, तरी संस्थानाधिपतींच्या विलक्षण हुकुमामुळेंच विठ्ठलरावांनीं जमखिंडी सोडली.

प्रवेश परीक्षा झाल्यानंतर जेथें त्यांचें शिक्षण झालें, तेथेंच त्यांना शिक्षकाची जागा मिळाली. मातापित्यांना मोठा आनंद वाटला व आपल्या मुलाविषयीं त्यांना मोठा अभिमान वाटला. शिक्षकांसही, आपल्या आवडत्या शिष्यानें आपल्याच शाळेमध्यें शिक्षक व्हावें ही गोष्ट आनंदाची वाटली. स्वतः विठ्ठलरावांना शिक्षकाचें काम मनापासून आवडतही असे, पण,

असा हुशार मनुष्य शाळेंत राहण्यापेक्षां त्यानें स्कॉलरशिप घेऊन मुंबईंत व्हेटरनरी कॉलेजांत जाऊन अभ्यास करावा व नंतर त्यानें जनावरांचे डाक्टर बनावें, असें संस्थानिकांच्या मनानें घेतलें ! पण ही गोष्ट संस्थानिकांच्याच मनानें घेऊन होणारी नव्हती. सरकार स्कॉलरशिप द्यावयास तयार आहे तर, तीच स्कॉलरशिप पुण्यास आर्टस् कॉलेजांत अभ्यास करण्यासाठीं आपल्याला मिळावी, असा सरळ जबाब विठ्ठलरावांनीं दिला. हें कालचें पोर आपल्या इच्छेच्या आड जावयाची हिय्या करीत आहे असें पाहून, आपला असा अनादर झाला, अशी मनाची समजूत करून घेऊन विठ्ठलरावांस संस्थानिकांनीं नोकरीवरून दूर केलें, व त्याच रागांत त्यांच्या वडिलासही कामावरून दूर केलें; व ह्या गोष्टीमुळें विठ्ठलरावांच्या पुढच्या शिक्षणाचा मार्ग त्यांस मोकळा झाला ! विठ्ठलरावांच्या मनाला ही गोष्ट फार लागून राहिली. आपला कांहीं अपराध नसतां ह्या संस्थानिकांनीं आपला अनादर केला, म्हणून तेथें न राहण्याचा निश्चय करून त्यांनीं बेळगांवचा रस्ता धरला ! तेथें कांहीं दिवस हालांत काढून त्यांनीं अखेरीस पुणें गांठलें. पुण्यास आल्यावर प० वा० गंगाराम भाऊ म्हस्के ह्यांच्या सहाय्यानें त्यांस डेक्कन मराठा असोसिएशनमधून थोडी मदत मिळूं लागली. ही मदत अर्थात् अपुरी होती. त्यामुळें आपल्या खर्चाच्या भरपाईसाठीं त्यांना शिकवण्या पत्कराव्या लागत आणि आपल्या घरची विपन्नावस्था त्यांच्या दृष्टीपुढें रात्रंदिवस असे. त्यामुळें कसरींत कसर काढून ते जेव्हां साधेल तेव्हां आपल्या घरच्या मंडळीचाही योगक्षेम चालवीत असत ! अशाप्रकारें हालअपेष्टा सहन करीत करीत इंटरमिजिएटपर्यंत त्यांनीं गाडें ढकळलें. पण पुढें परीक्षेस बसण्यासाठीं भरावयाची फीही मिळण्याची पंचाईत पुढें येऊन उभी राहिली ! आपल्या मराठेपणावर दोन चार दारीं उन्हातानांतून जाऊन त्यांनीं भिक्षा मागितली, व एका घरीं जातां मराठा म्हणवून घेऊन, हें असलें भिकारडें काम करण्याबद्दल त्यांनीं आपली चांगलीच संभावना करून घेतली !

इंटरमिजिएट परीक्षा पसार झाल्यावर विठ्ठलरावांस जरा बरे दिवस आले. श्री० सरकार सयाजीराव महाराज ह्यांनीं कृपावंत होऊन ह्यांच्या पुढल्या शिक्षणाचा भार आपल्यावर घेतला. त्यामुळें विठ्ठलरावांस आपल्या मातापितरांस शिकवणीचे पैसे घरीं पाठवून थोडें बहुत सहाय्य करतां येऊं लागलें व त्यानंतरच धर्मासंबंधानें विचार मनामध्यें जागृत होऊन ते पुण्याच्या समाजांत जाऊं लागले. प्रथम ते समाजामध्यें केवळ मौजेसाठीं, नंतर शिक्षणासाठीं व त्यानंतर समाजाशीं एकजीव होऊन जाऊं लागले. १८९८ त ते बी. ए. च्या परीक्षेंत उतरले. त्याच वर्षी ते पुण्याच्या समाजाचे सभासद झाले. व पुढें ते एल्. एल्. बीचा अभ्यास मुंबईंत राहून करीत होते. रा॰ शिंदे वकील झाले असते, तर बडोदें संस्थानांत आज एखाद्या हुद्यावर असते. परंतु ईश्वरी नेमानेम कांहीं निराळा होता. प्रार्थना समाजांत ते जात असतांना त्यांच्या विचारांस निराळें वळण लागत होतें. त्यांच्या मनामध्यें अनेक विचार, अनेक योजना, अनेक कल्पना, अनेक शंका, प्रतिशंका येत होत्या. समाजसेवेसंबंधानें फार आस्थेनें त्यांचे विचार चालू होते. देशाची सेवा आपण करावयाची, तर ती कोणत्या बाजूनें करावी, ह्याविषयीं निश्चित विचार होतो न होतो, तों प्रार्थना–समाजांतील एक होतकरू गृहस्थ ऑक्सफर्ड येथें तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावयास जात असतां पोर्टसेड येथें मरण पावला; ह्या गोष्टीचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्यांनीं रा. रा. मोती बुलासा ह्यांच्या मागून विलायतेस जाण्याचा निश्चय केला; एल्. एल्. बीची परीक्षा बाजूस ठेविली व युनिटेरिअन् स्कॉलरशिप मिळावी म्हणून त्यांनीं अर्जही केला. पुण्याच्या समाजाच्या शिफारशीवरून कलकत्त्याच्या ब्राह्मसमाज-कमिटीनें युनिटेरिअन् असोसिएशनला शिफारस केली व त्यांची निवडणूकही झाली. नंतर त्यांच्या मित्रांनीं त्यांस सहाय्य केलें; वडिलांनीं त्यांस आशीर्वाद दिला; व त्यांच्या समाजबंधूंनीं त्यांचें अभीष्ट चिंतिलें. जाण्यापूर्वी गुरुवर्य डॉ. भांडारकरांनीं पुण्यास विशेष उपासना चालविली व त्यावेळीं अशाच कार्यासाठीं आपले एक तरुण सभासद जात असतां प्राणास मुकले, हें जाणून त्या प्रसंगाची आठवण ताजी असतांच हे दुसरे तरुण पुढें आले, ही ईश्वरी कृपा होय, हा विचार मनांत येऊन त्या

दिवशीं गुरुवर्य अगदीं सद्गदित झाले आणि त्यांनीं विठ्ठलरावांस आशीर्वाद दिला. ता. २१ सप्टेंबर १९०१ रोजीं विलायतेस जाण्यासाठीं त्यांनीं आपल्या मातृभूमीची दोन वर्षांपुरती रजा घेतली.

**विलायतेंतील कार्य.**—विठ्ठलरावांनीं विलायतेस जाऊन जें कांहीं केलें, व आपल्या पुढील कार्यांची तयारी त्यांनीं कशी केली, याची अल्पशी कल्पना करून देण्यापूर्वी त्यांनीं जो स्वार्थत्याग दाखविला, त्याच्यासंबंधानें दोन शब्द येथें लिहिणें अगत्याचें आहे.

आजकाल विलायतेस अभ्यासासाठीं जाणारांची संख्या कांहीं कमी नाहीं. विठ्ठलराव विलायतेस गेले, ह्यांत खरोखर कांहीं विशेष नव्हतें. परंतु गायकवाड सरकारांतून चांगली सुखाची नोकरी मिळत असतां तिचा त्याग करून, पुढील सबंध आयुष्यभर धर्मकार्यासाठीं अगदीं गरीबीमध्यें राहण्याचा निर्धार करून धर्मप्रचारक होण्यासाठीं परदेशीं जाणें, ही गोष्ट विशेष आहे. दुसरें असें कीं, ब्राह्मधर्माचा प्रसार करणाऱ्या कित्येक प्रचारकांनीं सबंध आयुष्य अगदीं दारिद्र्यामध्यें घालविल्याचीं उदाहरणें डोळ्यांपुढें असतां, त्यांनीं प्रचारक होण्याचा निर्धार केला व युनिटेरिअन् ॲसोसिएशनच्या स्कॉलरशिपचा स्वीकार केला. त्यावेळींही कित्येकांनीं त्यांच्या संबंधानें नापसंतीचे उद्गार काढलेच ! त्यांच्या एका मित्रानें तर त्यांना सांगितलें कीं, "तूं विलायतेस जात आहेस, पण आजच कित्येक लोक तुजसंबंधानें भविष्य वर्तवूं लागले आहेत. तेव्हां तूं फार दक्षतेनें वागलें पाहिजेस."

विलायतेस जाण्यासाठीं बोटीवर पाय ठेवल्यापासून ते परत स्वदेशीं येईतों त्यांनीं **सुबोध-पत्रिके**साठीं जे लेख लिहिले आहेत त्यांत एक गोष्ट विशेष आहे. ती ही कीं, त्यांची असामान्य निरीक्षणशक्ति, (Power of observation.) या त्यांच्या ईश्वरदत्त देणगीमुळें त्यांच्या वर्णनात्मक लेखांमध्यें जी तडफ दिसते, जी संजीविनी दिसते, जें विलक्षण वर्णनसामर्थ्य आढळून येतें, तें इतरांच्या लेखांत निदान माझ्या तरी अनुभवास आलेलें नाहीं. त्यांनीं 'जनांतून वनांत' असा लिहिलेला लेख व वर्डस्वर्थ कवीसंबंधानें केलेलें वर्णन वाचून येथील कित्येक तरुण–अशा प्रकारचे लेख लिहिणारे, नास्तिकांमध्यें आस्तिक्यबुद्धि उदित करणारे, हताश झालेल्यांस जागे करणारे, तरुण गृहस्थ स्वदेशीं केव्हां येतात, याची मार्गप्रतीक्षा करीत होते ! कॉलेजांत अभ्यास करीत असतां विठ्ठलराव स्वस्थ बसले नाहींत. हिंदुस्थानचें दारिद्र्य व त्या दारिद्र्यामुळें दीन झालेले जे लोक त्यांना विलायतेंतील एका बाजूची सुखसोहळ्याची स्थिति पाहून ते भाळून गेले नाहींत. 'वेस्ट एन्ड' चें वैभव सर्वच पहातात व ह्याच्यायोगें पुष्कळांचे डोळे दिपून जातात. परंतु तेथें शिकत असतांना दारिद्र्याचा यथेच्छ अनुभव घेतलेल्या ह्या आमच्या मित्राचें 'ईस्ट एण्ड' च्या बाजूकडील लोकांकडे लक्ष गेलें. लंडनच्या वैभवानें त्यांचे डोळे दिपून न जातां, शहराच्या दुसऱ्या भागांत जें अठरा विस्वे दारिद्र्य मूर्तिमंत वसत आहे, त्यानें नाडलेल्यांच्या साहाय्यासाठीं तेथें कोणकोणते उद्योग होत असतात, याची त्यांनीं माहिती मिळविली; पॅरिस येथें गेले असतांना तेथील लोकांच्या मनोरंजनाच्या कल्पना किती चमत्कारिक झाल्या आहेत, याचा त्यांनीं अनुभव घेतला; नीतीच्या कल्पना किती शिथिल झाल्या आहेत हें त्यांनीं पाहिलें व धर्माचा पाया असल्यावांचून झालेली इमारत कशी भलतीकडेच झुकत चालली आहे, याचा त्यांनीं अनुभव घेतला. ही सर्व त्यांच्या पुढील कामाची अप्रत्यक्ष तयारी होती.

ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांतील शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर परत येण्याच्या सुमारास म्हणजे सन १९०३ च्या जुलै महिन्यांत **ॲमस्टरडॅम** येथें उदार धर्मवादी मंडळींची एक मोठी परिषद् झाली. उदार धर्मांची लाट इंग्लंडांत निरनिराळ्या स्वरूपानें पहावयास सांपडते. युनिटेरिअन् मंडळींत दिसून येणारें विचारौदार्य इतर पंथांच्या लोकांतही आढळून येतें. अशा सर्व उदार मतवादी मंडळींच्या परिषदेंत हिंदुस्थानाच्या वतीनें विठ्ठलरावांची नेमणूक झाली होती. त्या परिषदेंत त्यांनीं Liberal Religion in India ह्या विषयावर निबंध वाचला होता; त्यावरून तेथें जम-

लेल्या लोकांना हिंदुस्थानामध्यें उदार धर्माच्या चळवळीचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे, त्याची चांगली कल्पना झाली. अशा प्रकारें आपल्या स्वतःचा फायदा करून घेऊन; निरनिराळ्या प्रकारचा अनुभव अनुभवून, धर्मप्रचारकाच्या कामासाठीं आपल्यांला वाहून घेण्याच्या निश्चयानें, विठ्ठलराव ६ आक्टोबर १९०३ रोजीं स्वदेशीं परत आले.

## येथील कामगिरी.

धर्मप्रचाराचें कार्य करण्याचा विठ्ठलरावांचा निश्चय आणि येथील प्रार्थनासमाजालाही आपल्या समाजाला एक धर्मप्रचारक असावा असें कित्येक दिवसांपासून वाटत होतें. अर्थात् शिंदे परत आल्यानंतर त्यांची धर्मप्रचारकाच्या जागीं योजना करण्यांत आली. ह्या कामास प्रारंभ केल्याबरोबर त्यांनीं हिंदुस्थानांत बराच प्रवास केला. ठिकाठिकाणची स्थिति कोणत्या प्रकारची आहे, त्याचें अवलोकन केलें, व नंतर ते आपल्या कामास लागले. प्रार्थनासमाजाचे प्रचारक असतांना त्यांनीं जें कार्य केलें त्याचे दोन विभाग करितां येतील. एक धार्मिक व एक सामाजिक–धार्मिक. माझी स्वतःची समजूत अशी आहे कीं, आज रा. शिंदे हे जरी कित्येक कारणांमुळें प्रार्थनासमाजाचे प्रचारक नाहींत, तरी ते जें काम आज करीत आहेत, तें दिसावयास जरी सामाजिक ठरतें, तरी त्याचें वास्तविक स्वरूप सामाजिक–धार्मिक आहे. तें कसें त्याचा उल्लेख आतां पुढें होईलच.

धर्मप्रचारक असतांना मुंबईच्या प्रार्थनामंदिरांत त्यांस वारंवार धर्मपर व्याख्यानें द्यावीं लागत. त्यांपैकीं अलीकडील कांहींकांचा ह्या संग्रहामध्यें समावेश झाला आहे. त्यांत विशेष काय आहे त्याचें वर्णन येथें करण्याची आवश्यकता नाहीं. वाचकांनीं तीं मननपूर्वक वाचावीं म्हणजे त्यांतील विशेष प्रत्यक्ष अनुभवात येईल. प्रार्थनासमाजाचें सर्व कार्य आतां तरुण पिढीवर येऊन पडत आहे, त्यांच्यामध्यें अधिक जागृति व्हावी म्हणून त्यांनीं 'Young Theists Union' नामक संस्था स्थापिली. तरुणांस एकत्र करण्यास, त्यांच्या विचाराविषयीं सढळ चर्चा करावयास, उपासना करण्याची संवय लावावयास व उपदेश करण्याची तयारी करण्यास, त्याचप्रमाणें पवित्र, उदार धर्माचा एक प्रवर्तक ह्या नात्यानें आपल्यावर किती जबाबदारी आहे, त्याची जाणीव उत्पन्न करण्यास ही संस्था एक उत्तम साधन आहे. कित्येक वर्षें रा. शिंदे हेच त्या संस्थेचे प्रमुख होते.

## टपालाच्याद्वारें धर्मप्रसाराचें कार्य.

विलायतेंत असतांना विठ्ठलरावांच्या हें लक्षांत आलें कीं, टपालखातें हें धर्मप्रसाराचें कार्य करण्याचें उत्तम साधन आपल्या देशींही होण्यासारखें आहे. तेथें हें काम स्त्रिया करितात. लहान मोठीं पुस्तकें एकत्र करून तीं जिज्ञासूंना वाचावयास द्यावयाचीं, त्यांच्या ज्या कांहीं अडचणी असतील त्या आपण सोडविण्याचा प्रयत्न करावयाचा, नाहींतर कोणा अधिकारी पुरुषाची गांठ घालून द्यावयाची, वर्तमानपत्रांमध्यें जाहिराती देववून आपलीं पुस्तकें लोकांच्या दृष्टीपुढें आणण्याचा निश्चयानें प्रयत्न करावयाचा. हा अत्यंत लाभदायक उद्योग टपालाच्या साहाय्यानें तेथें स्त्रिया करितात, हें पाहून विलायतेंत असतांना येथील भगिनींना अनावृत पत्र लिहून त्यांनीं हें काम आपल्यांकडे घ्यावें असें सुचविलें; पण, स्त्रियांपैकीं कोणी पुढें न आल्यामुळें रा० वासुदेवराव सुखटणकर यांनीं त्या कामास येथें मोठ्या उत्साहानें आरंभ केला. विलायतेंत पोष्टाच्याद्वारें शेंकडों लोकांना उदारधर्माची ओळख होते त्याप्रमाणें येथेंही होऊं लागली. रा. सुखटणकरांचा किती तरी वेळ शंकितांचें समाधान करण्यांत जाऊं लागला व त्यामुळें शेंकडो लोकांना उदारधर्माच्या चळवळीची व प्रार्थनासमाजासारख्या संस्थेची माहिती झाली. रा. सुखटणकर विलायतेस गेल्यावर विठ्ठलरावांनीं तें काम आपल्याकडे घेतलें. मिशनच्याद्वारें कांहीं लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध केलीं व अल्प किंमतीस चांगलीं चांगलीं पुस्तकें विकून त्यांनीं उत्तम पुस्तकांचा प्रसार केला.

तरुण पिढीकडे त्यांचें साहजिक लक्ष असल्यामुळें, त्यांनीं कांहीं काल तरुणास एकत्र करून कांहीं धर्मपर ग्रंथ वाचले व त्यांचें अवश्य तेथें स्पष्टीकरण केलें. परंतु हें कार्य फार दिवस टिकलें नाहीं.

## धर्मपरिषद्.

१८८८ सालीं राष्ट्रीय सभेच्या वेळीं अलाहाबाद येथें एकेश्वरी मताची बरीचशी मंडळी जमली असल्याचें आढळून आलें व त्याच वेळीं रा. ब. महादेव गोविंद रानडे ह्यांच्या आश्रयाखालीं एक परिषद् भरविण्यांत आली; व पुढें दर वर्षीं अशीच परिषद् भरावी असें ठरलें. व त्याप्रमाणें अशी परिषद् भरत असे. परंतु मधून मधून तिचे संबंधानें थोडी शिथिलताही येत असे. प्रथमतः आर्यसमाजाची मंडळीही परिषदेंत सामील होत असे, परंतु नंतर ही परिषद् ब्राह्म व प्रार्थना-समाज—मतानुयायांची व त्यांचे हितचिंतक यांचीच झाली. १९०४ सालीं राष्ट्रीय सभेच्या वेळीं परिषदेची बैठक मुंबईस झाली व ती बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाली. तिचें बरेंचसें श्रेय रा. विठ्ठलराव यांस दिलें पाहिजे. ह्या प्रसंगीं प्रीतिभोजन झालें व त्या वेळीं गायकवाड सरकार श्री. सयाजीराव महाराज हजर होते. १९०४ सालापासून त्या धर्मपरिषदेस विशेष स्वरूप प्राप्त झालें. पुढें कित्येक वर्षेंपर्यंत विठ्ठलराव ह्या परिषदेचे सेक्रेटरी असत व ज्या प्रांतांत परिषद् भरे, त्या प्रांतांतील एक गृहस्थ त्यांच्या जोडीला काम करावयास असे.

## थीइस्टिक डिरेक्टरी.

हिंदुस्थानांत सर्व प्रांतीं प्रार्थना व ब्राह्म समाजाची स्थापना झालेली आहे, व सर्वत्र ब्राह्मधर्माचे अनुयायी आहेत. परंतु हे जे निरनिराळे समाज सर्वत्र पसरले आहेत, त्यांच्यासंबंधानें माहिती देणारा एक लहानमोठा ग्रंथ नाहीं. ही उणीव लक्षांत घेऊन १९०५ सालीं बनारस येथें भरलेल्या परिषदेंत अशा प्रकारची डिरेक्टरी तयार करण्याचें काम रा० विठ्ठलराव यांचेवर सोंपविण्यांत आलें. ह्या कामास त्यांनीं जरी लागलाच प्रारंभ केला, तरी अनेक अडचणींमुळें हें पुस्तक आजवर बाहेर निघालें नाहीं. परंतु आतां थोड्याच दिवसांत तें प्रसिद्ध होईल. ह्यांतल्या पहिल्या भागांत ब्राह्म व प्रार्थना-समाजांशिवाय जगांतील निरनिराळ्या देशांत चालू असलेल्या उदार धर्मचळवळींसंबंधीं कांहीं लेख असून न्या० मू० सर नारायणराव चंदावरकर ह्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. दुसऱ्या भागांत देशांतील सर्व समाजांसंबंधानें रा० विठ्ठलरावांनीं गोळा केलेली तपशीलवार माहिती संग्रहित करण्यांत आली आहे.

## सामाजिक—धार्मिक कामगिरी.

लंडनहून परत आल्यावर श्री. गायकवाड सरकारांनीं आपल्या प्रांतांत अंत्यजांसाठीं स्थापलेल्या कांहीं शाळा पाहण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावरून विठ्ठलरावांनीं बडोद्यांतील चार शाळा तपासून आपलें मत महाराजांना कळविलें. नंतर अहमदनगर येथें पूर्वीपासून स्वोन्नतीसाठीं सोमवंशीयसमाज नांवाची संस्था जे प्रयत्न करीत होती, तिकडे यांचें लक्ष लागलें. पूर्वीपासून ह्या लोकांच्या अत्यंत हीन स्थितीसंबंधानें यांच्या ठिकाणीं उद्वेग उत्पन्न झालेला होताच. सहानुभूतीचें बाळकडू त्यांस त्यांच्या माता-पितरांनींच पाजिलें होतें. साधुसंत, फकीर यांस त्यांच्या घरांत मुक्तद्वार असे. अशा ह्या दीन लोकांसंबंधानें कांहीं तरी जागृति समाजांत राहण्यासाठीं येथील सोशल रिफार्म ॲसोसिएशनपुढें त्यांनीं १९०५ सालीं एक व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानांत अत्यंजांसंबंधानें सविस्तर माहिती त्यांनीं दिली होती; व तेंच व्याख्यान इंडियन सोशल रिफॉर्मरमध्यें प्रसिद्ध करण्यापूर्वीं कित्येक दिवस खानेसुमारीचे सरकारी रिपोर्ट व इतर रिपोर्ट यांचें परिशीलन करून

अवश्य ती माहिती ते गोळा करीत होते. अखेरीस नीच मानिलेल्या लोकांच्या उन्नतीसाठीं उच्च वर्गांतलि लोकांत विशेष जागृति झाल्यावांचून त्यांचेसंबंधानें होत असलेल्या अन्यायाची व्याप्ति किती मोठी आहे, हें लोकांच्या लक्षांत यावयाचें नाहीं, असें मनांत येऊन त्यांनीं ह्या चळवळीस दृश्य स्वरूप आणण्याचा निश्चय केला व प्रार्थना-समाजाचे उपाध्यक्ष शेठ दामोदरदास गोवर्धनदास ह्यांनीं १ हजार रुपयांची देणगी दिल्यानंतर रा. शिंदे यांनीं परळ येथें ना० सर नारायणराव चंदावरकर यांच्या हस्तें १८ आक्टोबर १९०६ रोजीं लहान प्रमाणावर अस्पृश्य वर्गासाठीं एक शाळा उघडली, व लवकरच न्या. मू. सर नारायणराव चंदावरकर ह्यांनीं अध्यक्षस्थान व शेठ दामोदरदास यांनीं उपाध्यक्षस्थान पत्करल्यावर, Mission to the Depressed Classes in India ही संस्था त्यांनीं स्थापन केली. अस्पृश्य-वर्गाच्या उन्नतीसंबंधाच्या चळवळीस रा० शिंदे ह्यांनीं प्रारंभ केला असें म्हणणें सर्वथैव अन्यथा होणार नाहीं. हा प्रश्न सार्वजनिक रीतीनें पुढें आणण्याचा मान जरी सामाजिक परिषदेस आहे, व प. वा. न्या. मू. रानडे यांचें ह्या विषयाकडे फार लक्ष असे हें जरी सर्वश्रुत आहे, तरी आज सगळ्या मुंबई इलाख्यांत व बाहेरही जी चळवळ सुरू झाली आहे व खुद्द अस्पृश्य वर्गांमध्यें जी जागृति उत्पन्न झाली आहे, तीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें रा. शिंदे कारण झाले आहेत, असें म्हणणें हें वस्तुस्थितीस अगदीं धरून आहे, 'बहिष्कृत भारत' ह्या मराठी पुस्तकानें, Untouchable India ह्या इंग्रजी पुस्तकानें, व त्यांच्या नित्याच्या सफरी, हितचिंतकांशीं होणारीं संभाषणें, निरनिराळ्या ठिकाणचीं व्याख्यानें, वर्तमानपत्रांतील लेख, ह्यांनीं किती काम केलें आहे त्याची साक्ष मंडळीचें वाढतें काम, वाढता व्याप, वाढता खर्च व वाढती जबाबदारी, ह्यावरूनच होण्यासारखी आहे. त्यांच्या कामाचा विस्तार किती व कसकसा वाढला आहे, हें आक्टोबर महिन्यांत पुण्यास जी परिषद् भरली होती त्यावेळीं रा. शिंदे यांनीं जें प्रास्ताविक भाषण केलें, त्यांत त्यांनीं फार उत्तम रीतीनें सांगितलें आहे.

## उपसंहार.

अशा प्रकारचें काम एक स्वत: मागासलेल्या जातींतील गरीब तरुण करूं शकतो, याचें रहस्य कशांत आहे, याचा विचार आमच्या राष्ट्रांतील तरुणांनीं अवश्य करण्यासारखा आहे. आजपर्यंतच्या त्यांच्या कामावरून असें दिसतें कीं, त्यांचा धाडसी स्वभाव, त्यांची कल्पकता व त्यांचें कर्तृत्व हे गुण फार वरच्या दर्जाचे आहेत. अनेक कारणांमुळें प्रार्थनासमाजाचे धर्मप्रचारक असें जरी त्यांस आज म्हणवून घेतां येत नाहीं, तरी हीन मानिलेले लोक हे आपले बंधु आहेत, ही भावना अंत:करणांत दृढ करून घेऊन, ते जें काम करीत आहेत, त्याचा पाया धर्म हाच आहे. त्यांच्या शाळांतून धर्मशिक्षण देण्यांत येतें. भजन होतें, उपासना होतात व सद्धर्माची गोडी लावण्यासाठीं अनेक प्रकारें प्रयत्न होत असतात. त्यांच्या कर्तृत्वशक्तींत असा गुण आहे कीं, त्यांची कल्पकता व त्यांचें योजना-चातुर्य ह्यांमुळें त्यांची छाप कर्त्या माणसांवर सहज पडते ! त्यांचीं मातापितरें जुन्या वळणांतलीं, साधुसंत व फकीर यांच्याकडील त्यांचा ओढा जुन्या रीतीचा होता, तरी तींच आपल्या चिरंजिवाचे पहिले सहाय्यक बनले, त्यांच्या दोघी बहिणींनीं व पत्नीनेंही ह्याच कार्यासाठीं आपल्याला वाहून घेतलें. त्यांचें तीर्थरूप अखेरपर्यंत त्यांस सहाय्य करीत होते व ह्या कामांत गढून गेलेले असतांनाच १९१० सालीं प्रिय पत्नीचा वियोग झाल्यानंतर कांहीं महिन्यांनीं त्यांचें देहावसान झालें. आतां गेल्या आक्टोबर महिन्यांत पुढील कार्यक्षेत्र बरेंच वाढविल्याचें जाहीर करण्यांत आलें. आतां त्यांनीं ह्या आपल्या कार्यास शेठ रतन टाटा, ना. फाजलभाई करिमभाई, शेठ नरोत्तम मुरारजी, ना. सर चिनूभाई माधवलाल, एस. एन. पंडित, एच. ए. वाडीया वगैरे निरनिराळ्या जातींच्या प्रमुख गृहस्थांच्या सहानुभूतीची भर पांडली आहे; व परवां **होळकर सरकारांनीं** कृपावंत होऊन संस्थेस २० हजारांची देणगी परलोकवासी महाराणी पु. श्लो. **अहल्याबाई होळकरांच्या** नांवानें देण्याचें **अभिवचन** दिलें आहे. सालिना २६ हजार रुपयांचा खर्च सोसून १५ शाखा आतां ही मंडळी चालवीत आहे.

शेवटीं आज हे माझे मित्र जें काम करीत आहेत, त्याचें बरेंचसें श्रेय श्रीमंत **सयाजीराव महाराज** गायकवाड यांस देणें रास्त आहे. म्हणून मी त्यांचे कृतज्ञबुद्धीनें अत्यंत नम्रतापूर्वक आभार मानतों. एका अगदीं गरिबींत असलेल्या तरुणास विद्यार्थीवेतन देऊन त्यांनीं शिकविलें, पुढें त्यानें परीक्षा पास झाल्यावर आपल्या संस्थानांत नोकरी करावी असें ठरलेलें असतांना, त्यास प्रार्थनासमाजाचा प्रचारक होतां यावें म्हणून ती अट महाराजांनीं काढून घेतली; विलायतेस जातांना मदत केली व येतांना भाड्याची व्यवस्था केली! पुढें आपल्या संस्थानांतील शाळा पहावयास महाराजांनींच आमंत्रण दिलें! तेव्हां आज आपल्या देशाला हें व अशीं दुसरीं कामें करण्यासाठीं जरी आणखी पुष्कळसे शिंदे हवे आहेत, तरी महाराजसाहेबांच्या कृपेमुळें हे जे तरुण कर्तृत्ववान् व योजक प्रचारक आज लाभले आहेत, त्यांस परमेश्वरानें दीर्घायु करावें, त्यांस पुष्कळ सहाय्यक मिळावेत, व अस्पृश्य लोकांस हीनावस्थेप्रत पोहोंचविल्याचा उच्च लोकांना लागलेला डाग, त्यांच्या हातून साफ धुऊन जावा, व त्यांची कर्तृत्वशक्ति दिवसेंदिवस वाढतच जावी, अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हा चरित्रात्मक त्रोटक लेख येथेंच संपवितों.

मुंबई, ता० २० डिसेंबर १९१२.

# अनुक्रमणिका.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ....... ना. ....... ठाणे.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रस्तावना .... .... ... .... | १–२ |
| शिंदे यांचें त्रोटक चरित्र ... .... | १–८ |

## भाग पहिला–लेख.

### इंग्लंडांत लिहून पाठविलेले लेख.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जलप्रवास .... .... .... .... | १ |
| मार्सेय शहर .... .... .... .... | ९ |
| पॅरिस शहर .... .... .... .... | १२ |
| 'नॉटर डेम ड ला गार्ड' देऊळ.... .... | १३ |
| लंडन शहर. .... .... .... ... | १५ |
| ब्रिटिश म्युझियम .... .... ... .... | १७ |
| लंडन येथील बालहत्यानिवारक गृह ... | २१ |
| सोमयागाचें वर्णन वाचून वाटलेला विस्मय व विषाद .... .... .... | २४ |
| डेव्हनपोर्ट येथील गुडफ्रायडे ... .... | २६ |
| बोअर युद्धाचा शेवट व ऑक्सफर्ड येथील उल्हास .... .... .... | २८ |
| राष्ट्रीय निराशा .... .... .... .... | ३० |
| वर्टन खेड्यांतील शाळा कशी दिसली! .... | ३२ |
| विभूतिपूजा .... .... .... .... | ३४ |
| मँचेस्टर कॉलेज .... .... .... ... | ३६ |
| युनिटेरिअन् समाज .... .... .... | ४० |
| इंग्लंडांतील आधुनिक धर्मविषयक चळवळ आणि लिव्हरपूल येथील त्रैवार्षिक युनिटेरिअन् परिषद् .... | ४७ |
| सुशिक्षित धर्मभगिनींस अनावृत पत्र ... | ५१ |
| आपला व खालील प्राण्यांचा संबंध .... | ५३ |
| पृथ्वीच्या पोटांत ४४० यार्डांखालीं. .... | ५५ |
| जनांतून वनांत आणि परत. .... .... | ५७ |

### हिंदुस्थानांत लिहिलेले लेख.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| बंगळूरच्या रस्त्यांतील एक फेरी.... ... | ६९ |
| मंगळूर येथील कांहीं विशेष गोष्टी .... | ७१ |
| बंगालची सफर. .... .... .... .... | ७३ |
| शांतिनिकेतन, बोलपूर. .... .... ... | ८३ |
| रा. गो. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें .... .... .... ... | ८६ |
| प्रार्थनासमाज अप्रिय असल्यास तो कां? .... .... ... .... | ८७ |
| मुरळी. .... .... .... ... .... | ९० |
| बहिष्कृत भारत ... .... .... .... | ९४ |
| निराश्रित साहाय्यक मंडळी .... .... | १०९ |
| भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीची संस्थापना. .... .... .... | १११ |

## भाग दुसरा—व्याख्यानें.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| डॉ. भांडारकरांस मानपत्र ... .... | ११५ |
| ब्राह्मसमाज व आर्यसमाज ... .... | ११६ |
| धर्मजागृति .... ... .... .... | ११९ |
| निवृत्ति व प्रवृत्ति आणि अवतारवाद व विकासवाद ... .... .... | १२१ |
| राजा राममोहन राय .... .... .... | १२३ |
| देशभक्ति आणि देवभक्ति .... .... | १२६ |
| स्वराज्य आणि स्वाराज्य.... ... .... | १२८ |
| ईश्वर आणि विश्वास ... .... ... | १३१ |
| बौद्धधर्माचा जीर्णोद्धार .... .... .... | १३४ |
| समाजसेवेचीं मूलतत्त्वें ... .... | १४० |
| ब्राह्मधर्म व ब्राह्मसमाज .... ... .... | १४३ |
| एकनाथ व अस्पृश्य जाति ... ... | १४५ |
| निराश्रित साहाय्यकारी मंडळी व आक्षेपनिरसन ... .... .... | १४७ |
| आत्म्याची यात्रा ... .... ... | १४९ |
| आत्म्याची वसति .... .... ... | १५२ |
| हिंदुस्थानांतील उदार धर्म .... .... | १५५ |

## भाग तिसरा–उपदेश.

### कौटुंबिक उपासनेच्या वेळीं केलेले उपदेश.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| आवड आणि प्रीति .... .... .... | १६१ |
| देवाचा व आपला संबंध.... ... .... | १६३ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| स्तुति, निर्भर्त्सना व निंदा .... .... | १६४ |
| विनोदाचें महत्त्व ... .... .... .... | १६६ |
| प्रेमप्रकाश .... .... .... .... | १६८ |
| संग व विषय .... .... .... .... | १६९ |
| **सार्वजनिक नैमित्तिक उपासनेच्या वेळीं केलेले उपदेश.** | |
| मरण म्हणजे काय ? .... .... .... | १७० |
| स्त्रीदैवत .... .... .... .... ... | १७५ |
| दान आणि ऋण .... .... .... .... | १७७ |
| राज्यारोहण .... .... .... ... | १८० |
| नाममंत्राचें सामर्थ्य .... .... | १८२ |
| डिप्रेस्ड क्लासेस मिशनची चवथी जयंति | १८४ |
| **सार्वजनिक नित्यउपासनेच्या वेळीं केलेले उपदेश.** | |
| कर्मयोग .... .... .... .... .... | १८६ |
| संतांचा–धर्म आणि राष्ट्राचा उत्कर्ष .... | १८८ |
| धर्म समाज आणि परिषद् .... .... | १९२ |
| धर्मसंघाची आवश्यकता .... .... ... | १९४ |
| विनययोग .... .... .... .... | १९८ |
| शासनयोग .... .... ... .... | २०१ |
| पितृशासन .... .... .... .... | २०५ |
| गुरुशासन .... .... .... .... | २०७ |
| राजशासन .... .... ... .... | २०९ |
| धर्म आणि व्यवहार .... .... .... | २१२ |
| प्रेरणा आणि प्रयत्न .... ... .... | २१३ |
| परमार्थाचीं प्रापंचिक साधनें.— | |
| मानवी आदर आणि दैवि श्रद्धा .... | २१६ |
| मानवी स्नेह आणि ईश्वरभक्ति .... | २१८ |
| मनुष्यसेवा आणि ईश्वरोपासना .... | २२० |
| मनाची प्रसन्नता आणि मोक्षप्राप्ति .... | २२२ |
| परमार्थाचीं प्रापंचिक साधनें .... .... | २२३ |
| आधुनिक युग आणि ब्राह्मसमाज. .... | २२६ |
| धर्मसाधन .... .... .... .... | २२८ |
| नैराश्यवाद .... .... .... .... | २३० |
| आनंदवाद .... .... .... ... | २३२ |
| संसारसुखाचीं साधनें .... .... .... | २३३ |
| वृत्ति, विश्वास आणि मतें .... .... | २३५ |
| व्यक्तिविकास .... .... .... .... | २३७ |
| **हरिकीर्तनाच्या वेळीं केलेले उपदेश.** | |
| मनुष्यजन्माची सार्थकता.... .... .... | २४० |
| ' आपुलिया बळें घालावी हे कास ' .... | २४३ |
| कालियामर्दन .... .... .... .... | २४६ |

# विठ्ठल रामजी शिंदे यांचे

# लेख, व्याख्यानें व उपदेश.

## भाग पहिला,—लेख.

### जलप्रवास.

#### प्रयाण.

आगबोट पर्शिया.

तरुण भार्या, तान्हें बालक, वृद्धही माता-पितरें ।
अनाथ भगिनी, बंधु धाकुटा, आश्रित बांधव सारे ।।
आलों टाकुनियां । पदरीं घेई दयामया ।। १ ।।

शनिवार ता० २१ सपटेंबर १९०१ रोजीं सकाळचे १०॥ वाजतां रा० कोरगांवकरांचे घरांतून निघालों तेव्हांपासून वियोगाच्या तीव्र वेदनांस सुरुवात झाली. बॅलर्ड पियरवर माझ्या आधीं बरीच मित्रमंडळी जमली होती. गुरुजन आशीर्वाद देऊं लागले. मित्रमंडळ अभिष्टचिंतन करूं लागला. कांहींजण प्रवासांत उपयोगी अशा महत्त्वाच्या सूचना करूं लागले. अशी एकच गर्दी उडाल्यामुळें मी भांबावल्याप्रमाणें झालों होतों. अशा स्थितींत मीं कांहींचा मुळींच निरोप घेतला नसेन, कांहींस मीं उत्तरें दिलीं नसतील. त्या सर्वांची मी आतां प्रांजलपणें क्षमा मागत आहें. १२ वाजतां प्लेग–डॉक्टरची तपासणी सुरू झाली. १२॥ वाजतां मी सर्वांचा शेवटचा निरोप घेऊन निघालों. दारावर आंत सोडतांना रखवालदारानें थोडासा दांडगाईचा प्रसंग आणिला, पण हिंदुस्थानांतील निदान २ वर्षेपर्यंत तरी ही अखेरची असल्यामुळें मीं ती कौतुकानें सहन केली ! तपासणी एका मिनिटांतच आटोपली. एकदां आंत गेल्यावर जाणारांची आणि पोंचविण्यास आलेल्यांची नुसती नजरानजरही होत नाहीं, म्हणून दोघांसही फार वाईट वाटतें. मी मचव्यांत बसल्यावर, मला न भेटलेल्या बाहेरच्या तिघां मित्रांकडून, पुनः भेटून जाण्याबद्दल ३ चिठ्या आल्या. पण इतक्यांत मचवा निघाल्यामुळें, माझा नाइलाज झाला. हळूहळू माझा मायदेश डोळ्यांदेखत अंतरूं लागला. परदेशगमनाचा विचार प्रथम आल्यापासून तों आतांपर्यंत मी सारखा धांदलींत असल्यामुळें, स्वीकृत गोष्टीचें पूर्ण स्वरूप डोळ्यांपुढें आलें नव्हतें; तें मी मचव्यांत स्थिरपणें बसल्यावर प्रत्यक्ष दिसूं लागल्यामुळें, ह्या पांच मिनिटांत मनाच्या ज्या कित्येक कधींच न अनुभविलेल्या भावना झाल्या, त्या लिहून व्यक्त करणें केवळ अशक्य आहे ! वियोग मूर्तिमंत पुढें उभा राहून माझ्या जिवलग माणसांचीं उदास व खेदमय दिसणारीं चित्रें मला एकामागून एक दाखवूं लागला. अशाच कष्टमय स्थितींत मला दोन वर्षें काढावीं लागतात कीं काय अशी धास्ती पडली. पण अखेरची मनाची भावना प्रार्थनामय झाली. विरहवेग कमी होऊं लागला. किंचित् शांत दृष्टीनें किनाऱ्याकडे पाहूं लागलों, तों ह्या प्रवासाची मनांत प्रेरणा होण्यास जी पर्यायानें कारण झाली आहे, ती मुंबई युनिव्हर्सिटी जणूं काय हात वर करून आशीर्वाद देत आहे, असें दिसलें.

याप्रमाणें मी १ वाजतां पर्शिया आगबोटीवर दाखल झालों. नंतर एका तासानें माझें सर्व सामान मला मिळालें. २॥ वाजतां आम्ही सर्व मिळून जेवणास बसलों. जेवण चाललें असतां आगबोट सुटून केव्हां चालू लागली होती हें कांहीं वेळ कळलेंच नाहीं. एंजीनची घडघड लांबून किंचित् ऐकूं येत होती. ग्लासांतील पाणी देखील सहज दिसण्यासारखें हालत नव्हतें. ३ वाजतां

जेवण आटपून घाईनें डेकवर येऊन पाहतों तो कुलाब्याचा दीपस्तंभही मागें राहिला होता. ३॥ वाजतां १० लाख वस्तीच्या मुंबई शहरास मला क्षितिजांत शोधून काढावें लागलें! ४। वाजतां मुंबईजवळच्या डोंगरांचाही कोठें मागमूस लागेना!! सभोंवर क्षितिजाचें विशाळ वलय पसरलेलें, वरतीं ढग खालीं लाटा, ह्यांशिवाय आसमंतात् दृश्य पदार्थ काय तो आगबोटींतून निघणारा धुराचा लोट हाच होता. खरोखर हा देखावा साक्षात् दगडालाही कवित्वाची स्फूर्ति करणारा आहे! बोटीच्या अगदीं पिछाडीच्या टोंकावर—म्हणजे मजकडून होईल तितकें करून माझ्या देशाजवळ—मी सुमारें एक तासभर हा देखावा पाहात चित्राप्रमाणें तटस्थ उभा होतों. बोट वेगानें चालली असतां पाणी दुभंगून तिच्या मागें कोनाकृति धार दिसत होती. बाजूनें पाण्याचे तुषार उडून त्यावर ऊन पडून त्यांतून इंद्रधनुष्य दिसे. संध्याकाळानंतर रात्रीं चांदणें पडलें आणि समुद्रानें आपला पेहेराव बदलला. दुसरे दिवशीं पहाटेस उठून पोशाक करून डेकच्या अगदीं आघाडीस गेलों. हा देखावा कालच्यापेक्षांही अधिक मोहक व प्रेरक होता. आकाश अगदीं निरभ्र असल्या-कारणानें समुद्र त्याच्या रंगानें रंगला होता; आणि बोटींतून धूर निघालेला दिसत नसल्यामुळें, चहूंकडे ऐक्य नांदत होतें. अत्यंत पुरातन सागर महामुनि शांत व गंभीर रूप धारण करून ‘ एकमेवाद्वितीयम् ’ ह्या महामंत्राचा आपल्याशींच पाठ करीत संध्यावंदन करीत बसलेले दिसले. त्यांस पाहून प्रत्यक्ष पापमूर्तिचाही संत बनेल ह्यांत शंका नाहीं!!

पर्शिया आगबोटः—कॅलिडोनिया, अरेबिया यांप्रमाणेंच पर्शिया आगबोटही फार मोठी आहे. ही लांबीनें सुमारें एक फर्लांग म्हणजे $\frac{1}{8}$ मैल व रुंदीनें मध्यें २२ यार्ड आहे. उंचीनें ४।५ मजली इमारतीइतकी भरेल. वजन ७,००० टनपर्यंत नेऊं शकते. हिजमध्यें ५३० प्रवाशांची सोय आहे. पण ह्या खेपेस प्रवासी फार थोडे म्हणजे केवळ ७५ च होते. हिचा वेग दर तासास सरासरीनें १५ मैल पडतो. पहिले दिवशीं ३१८, दुसरे दिवशीं ३५८, तिसरे दिवशीं ३५५ मैल ह्याप्रमाणें ही चालते. हिला दोन धुरांडीं आहेत. समुद्र खवळून केव्हां केव्हां तुषार आंत येतात, म्हणून आग-बोटीच्या बाजूस पुष्कळ आणि मोठ्या अशा खिडक्यांची योजना करितां येत नाहीं. ह्यामुळें चोहींकडे वारा खेळावा, विशेषेंकरून खालच्या मजल्यांत हवा पोंचावी म्हणून अशी योजना केली असते कीं, मोठाले २।३ फूट रुंदीचे बंब खाल-पासून वरपर्यंत नेऊन त्यांचीं तोंडें पुष्कळशीं पसरट करून हवेंत निरनिराळ्या दिशेनें वळवून दिलेलीं असतात. तेणेंकरून वारा कसाही वाहत असला, तरी ह्यांच्या तोंडांत सांपडून खालीं उतरतो. असे बंब सुमारें ४० आहेत. प्रकाशासाठीं खालच्या मजल्यांत २४ तास एकसारखे विजेचे दिवे जळत असतात. बोटीला एकंदर पांच मजले आहेत. तळमजला पाण्याखालीं आहे. त्यामुळें त्यांत अंधार असतो. त्यांत जड सामान आणि माल भरलेला असतो. दुसऱ्या मजल्यास लोअर डेक म्हणतात. दुसऱ्या वर्गाचें ह्या डेकवरील मुंबईपासून लंडन-पर्यंत एका जागेचें भाडें ५२२८८ रु. पडतें. पाण्यावरचा हा पहिलाच मजला असल्याकारणानें, प्रकाश आणि हवा येथें पुरेशीं नसतात. वरचेवर एखादी लाट खिडकीवरून जाते म्हणून ती नेहमीं जाड भिंगानें बंद ठेवावी लागते. तिसऱ्या मजल्यास मेनडेक म्हणतात. मी ह्यांत दुसऱ्या वर्गाचें तिकीट घेतलें आहे; त्यास लंडनपर्यंत ६०० रुपये भाडें पडलें. ह्यांतील खोलींत अधिक सोई असून, खिडकी नेहमीं उघडी ठेवितां आल्यामुळें, हवा व प्रकाश मुबलक असतात. शिवाय अंथरुणावर पडल्या ठिकाणाहूनच खिडकींतून समुद्राचा सर्व देखावा नजरेस पडतो. चवथ्या मजल्यास डेक किंवा अपर डेक म्हणतात. येथें दुसऱ्या वर्गाच्या जागा नाहींत. मंडळीस हिंडण्यास, फिरण्यास, आरामखुर्च्यांवर बसण्यास किंवा कांहीं खेळ खेळ-ण्यास दोन्ही बाजूंस दोन ग्यालरीसारख्या ४० यार्ड लांब व ५।६ यार्ड रुंद अशा खुल्या जागा आहेत. मध्यें सुमारें १० यार्डांची चौरस धूम्रपानाची खोली आहे. पहिल्या वर्गाच्या मात्र ह्या मजल्यां-तही खोल्या आहेत. एका प्रवाशास सबंध एक खोली मिळते. तिचें भाडें लंडनपर्यंत सुमारें ८२२ रुपये पडतें. पांचवा मजला उंच गोपुरासारखा आहे. येथें कोणी जात नाहींत. पण येथून सर्व क्षितिज नजरेस पडतें.

केबिन–एक एक खणाची एक खोली असते. तीस केबिन म्हणतात. लोअर डेकवर एका केबिनमध्यें तिघांची व मेनडेकवर एकींत चौघांची सोय केलेली असते. प्रत्येकाच्या जागेस बर्थ म्हणतात. त्यावर नंबर मांडलेला असतो. असे एकंदर ५३० नंबर आहेत. प्रत्येकाकरितां एक गादीवर चादर आंथरलेली, एक ब्ल्यांकेट, एक पासोडी, दोन मोठ्या व मऊ उशा आणि एक मोठा टॉवेल इतकें सामान भिंतींत अडकविलेल्या दोन गजांवर व्यवस्थेनें ठेवून एक अंथरूण बनवलेलें असतें. हीं दोन खालीं आणि दोन त्यावर असतात. भिंतींत एक शिसवीचें टेबल असतें; त्यांत एकावर एक असे चार खण असतात. समोर दुसरें एक टेबलासारखें असतें त्यावर एक मोठा गोल आरसा लटकलेला असतो. त्याचेखालीं एक फडताळ असतें; तें उघडल्याबरोबर तोंड धुण्याचें एक जाड चिनी भांडें बाहेर येतें. त्याचे मागेंच दोन पेल्यांतून दोन साबण ठेवलेले असतात. दोन्ही बाजूंस दोन स्वच्छ रुमाल टांगलेले असतात. तोंडधुणें आटपल्यावर फडताळ उचलून झांकल्याबरोबर त्यांतील पाणी खालीं जाऊन सर्व पूर्वीप्रमाणें पेटीसारखें दिसतें. आरशाच्या मागें एक कांचेचा तांब्या व दोन ग्लास पिण्याचें पाणी भरून ठेविलेले असतात; अशा पेट्या दोन असतात. बारीक सामान ठेवण्यास चार जाळ्या आणि कपडे ठेवण्यास १२ खुंट्या असतात. एक विजेची बत्ती असते, ती संध्याकाळीं आपोआप लागते. तिच्याखालीं एक बटण असतें. तें फिरविल्यास आपल्या मर्जीप्रमाणें ती विझवितां येते. शिवाय एक मेणबत्तीचें शेड असतें. वरतीं माळ्यावर चार लाइफ बेल्टस् असतात. २ इंच जाड व १ फूट लांब असे कॉर्कचे तुकडे दुहेरी एकत्र बांधून आपल्या पोटाभोंवतीं बांधण्यास एक पट्टा तयार असतो. अपघाताचे वेळीं हा पट्टा बांधून पाण्यांत पडल्यास मनुष्य बुडत नाहीं.

डायनिंग सलून—हा एक सुरेख दिवाणखाना आहे. त्यांत दोन्हीकडे चारचार खुर्च्या ठेविलेल्या अशीं पांच टेबलें एकापुढें एक मांडलीं आहेत अशा पांच टेबलांच्या दोन्ही बाजूंस दोन रांगा असून मध्यें एक मोठें न्याहारीचें टेबल ठेविलेलें आहे. सकाळीं ६॥ वाजतां चहा, रोटी, लोणी, फळें इ० असतात. ८॥ स न्याहारी; १॥ ला मुख्य जेवण; ४॥ वाजतां फराळ; ६॥ला चहा आणि रात्रीं ९॥ वाजतां फराळ, असा नेहमींचा क्रम असतो. ह्या सर्व प्रसंगीं सर्व मंडळी हॉलमध्यें जमते; आणि आपापल्या ओळखीप्रमाणें जागा पसंत करते. सकाळचा चहा व रात्रीचा फराळ सोडून बाकी सर्व प्रसंगीं जेवणास कोणते पदार्थ तयार केले आहेत त्यांची यादी कार्डावर छापून तीं कार्डें टेबलांवर मांडलेलीं असतात. प्रत्येक टेबलाजवळ एक स्टुअर्ड (वांकनीस) उभा असतो. क्रमानें सर्व पदार्थ आपलेकडे हा वांकनीस आणितो. आपल्यास लागेल तो लागेल तितका आपण घ्यावा. प्रत्येक वेळीं सात किंवा अधिक पदार्थ असतात. कलकत्याची कढी, फ्रान्सचे वाटाणे, यारमाउथचे मासे, इटलीची आमटी, सार्डिनियाचें अमुक आणि रंगूनचें तमुक, अशीं यादींतलीं चटकदार नांवें वाचून नवख्यांस मोठी मौज वाटते. तरी प्रत्यक्ष पदार्थ पाहीपर्यंत नुसत्या यादीवरून कांहीं कल्पना होत नाहीं. हा सर्व थाट आणि हे प्रकार पाहून नवीन मनुष्य सहजच वाजवीपेक्षां अधिक खातो आणि दोन दिवसांनीं ओकूं लागल्यावर म्हणतो कीं आपल्यास बोट लागली !

स्नानगृह.—एका खोलींत एक हौद कंबरेइतका खोल असतो. त्यांत एक ऊन पाण्याची व एक थंड पाण्याची अशा दोन तोट्या असतात. या दोन्ही मोकळ्या करून आपल्यास लागेल तसें गरम पाणी करून घेतां येतें. पण हें पाणी खारें असतें म्हणून एका वेगळ्या पिंपांत गोडें पाणी ठेविलेलें असतें. हौदांतल्या पाण्यानें स्नान केल्यावर ह्या गोड्या पाण्यानें आंग धुवावें. खाऱ्या पाण्यांत आपला नेहमींचा साबण चालत नाहीं म्हणून, खाऱ्या पाण्याचा साबण किंवा सीसोप वेगळा मिळतो तो येतांना आणावा. येथें मिळत नाहीं.

करमणूक.—धूम्रपानाचे खोलींत बुद्धिबळाचा आणि दुसरा कसलासा खेळ मांडलेला असतो. शिवाय पत्ते, गंजीफा मिळतात. इतर २।३ प्रकारच्या व्यायामाच्या खेळांचीही योजना आहे. डेक स्टुअर्ड एका बाजूस क्रिकेट खेळण्यास जागा करून देतो, तरट हांतरून पिच तयार करतो. पहिल्या वर्गाकरितां पियानो वगैरेची अधिक व्यवस्था

असते. लायब्ररींतून आपल्या नांवावर पुस्तकें वाचण्यास मिळतात. त्याबद्दल वर्गणी भरावी लागते.

नोकर.—पांच पांच केबिनला एक स्टुअर्ड इंग्लिश मनुष्य असतो. तो रोज सकाळीं संध्याकाळीं आमची खोली झाडून साफ करितो, सामान व्यवस्थेनें ठेवितो, पांघरुणाच्या घड्या घालतो, बूट साफ करितो आणि दुसरें कांहींही सांगितलेलें काम करितो व माहिती देतो. आम्हीं मागित त्यास आमचें जेवण खोलींतच आणून देतो. दाराजवळ एक बटन असतें, तें वाटेल तेव्हां दाबल्यास वरची घंटा वाजते आणि एक स्टुअर्ड खालीं येऊन सांगितलेलें काम करून जातो. सर्व गोरे नोकर कोणतें कांहींही काम मोठ्या तत्परतेनें, आदबीनें व खुशीनें करितात; मग तें काम गोऱ्या प्रवाशानें सांगितलेलें असो, किंवा काळ्यानें असो, महत्त्वाचें असो किंवा हलकें असो, जरुरीचें असो किंवा कसेंही असो, करण्याची तऱ्हा एकच. पण स्नानगृहांत काळे नोकर आहेत ते वरचेवर कुरकुरतात! आणि आमच्यापेक्षां साहेब लोकांचीं कामें मात्र लवकर करितात. गोरे नोकर कामें लवकर करितात, इतकेंच नव्हे, तर अशा ऐटींत करतात कीं त्यांच्याकडे पाहतच बसावेंसें वाटतें.

सोबती—७५ प्रवाशांपैकीं आम्ही हिंदुस्थानचे रहिवासी नेटिव्ह खिश्चन सोडून सातजण; कलकत्याचे एक कायस्थ गृहस्थ, लाहोरचे आणि आग्र्याचे दोन मुसलमान गृहस्थ, निजाम हैदराबादचे एक नायडू, मुंबईचे एक पारशी आणि एक मुसलमान व पुण्याचा मी असे सातजण आहों. सातहीजण तरुणच आहों. वरील पारशी गृहस्थ व्यापारास जात आहेत. बाकी सर्वजण विद्यार्थी आहों. पैकीं पांचहीजण कायद्याचा अभ्यास करावयास जात आहेत. मी एक मात्र आपला विक्षिप्तच. प्रत्येक बोटींतून अलीकडे हिंदुस्थानची जी तरुण मंडळीच विलायतेस जात आहे, त्यावरून हिंदुस्थानचें इंग्लंडशीं विद्यार्थ्यांचें नातें कसें आहे, तें दिसून येतें. पण ह्या सर्व बाबतींत गतानुगतिकत्वच दिसून येतें. असो; आम्हां सर्वांचा चांगला स्नेह झाला होता. पैकीं पांचजण तर नेहमीं एकत्रच होतों. त्यामुळें प्रवासांत एकांतवास मुळींच भासत नाहीं.

प्रकृति—अद्यापपर्यंत उत्तम आहे. दुसरे व तिसरे दिवशीं दोनप्रहरीं एक तासभर बरेंच मळमळलें. औषध घेतल्यावर तेंही राहिलें. बाकी सर्व ठीक आहे. मात्र माझ्या घड्याळाची प्रकृति मोठ्या गमतीनें बिघडली आहे! आगबोटींतल्या घड्याळाशीं ताडून पाहतां माझें घड्याळ दुसरे दिवशीं १० मिनिटें पुढें गेलें आणि तिसरे दिवशीं २५ मिनिटें पुढें गेलें. मग मी त्याचा मागचा कांटा फिरवून हळू चालेल असें केलें. तरी चौथे दिवशीं तें आपलें ४० मिनिटें पुढें! मला वाटलें घड्याळाला आगबोट लागली! पण लवकरच माझ्या लक्षांत खरा प्रकार आला. त्यावेळीं आमची आगबोट मुंबईपासून सुमारें १,००० मैल आली होती आणि रोज ३६० मैल पश्चिमेकडे जात होती त्यामुळें असा फरक पडत आहे, हें लक्ष्यांत येऊन माझा मीच खजील झालों!

आगबोटींत पोस्ट ऑफीस व दवाखाना हीं आहेत. एकंदरींत तिकिटाचे पैसे दिले आणि आपल्याजवळ भरपूर पोषाक असला म्हणजे येथें कसलीही वाण पडत नाहीं. इतकी जर सर्व कडेकोट तयारी आहे तर धर्मसंबंधीही कांहीं व्यवस्था केली आहे कीं कसें? ह्याबद्दल मीं एका रविवारीं शोध केला. पण त्यासंबंधीं कधीं विशेष गरज लागत नाहीं म्हणून व्यवस्था केली नाहीं असें कळलें. मलाही बोटीवरचा रविवार आणि इतर वार ह्यांमध्यें कोणत्याच बाबतींत फरक आढळून आला नाहीं. बोटीवरच्या अधिकाऱ्यास ह्यासंबंधीं काळजी नसली तरी विश्वाच्या अधिकाऱ्यास ती आहे व त्यानें पूर्ण व्यवस्था करून ठेविली आहे. मनुष्यानें मात्र आपल्या स्वतःवरची आणि आपल्या बोटीवरची नजर काढून बोटीभोंवतालच्या प्रदेशावर टाकावी म्हणजे पंचमहाभूतांचें अष्टौप्रहर सतत हरिकीर्तन चाललेलें कानांला ऐकूं येईल, डोळ्यांना दिसेल, रोमरोमांचांस भासेल व शेवटीं अंतरात्माही परमात्म्याच्या समागमांत धन्य होईल.

समुद्रावरच्या एकंदर प्रवासांत मुंबईपासून एडनपर्यंतचाच प्रवास कायतो विशेष कंटाळवाणा होतो. सभोंवतालची परिस्थिति अगदींच नवी असल्यानें पहिला दिवस केव्हांच निघून जातो. पण दुसऱ्या दिवशीं दोनप्रहरपासून हळूहळू कंटाळा येऊं लागतो. पाहिलेलें तेंच तेंच नजरेस पडूं लागल्यामुळें मनाचा

उत्साह नाहींसा होतो. अष्टौप्रहर अंग हालल्यानें तोंडाला प्रकृतीच्या मानाप्रमाणें कमजास्त मळमळ सुटते. नवीन सोबत्यांशीं अद्यापि चांगली घसण न पडल्यामुळें, एकांतवास वाटूं लागतो. सभोंवतीं लोकांची इतकी गर्दी असून, सुखदुःखाचे दोन शब्दही कोणाशीं बोलण्यास मन धजत नाहीं आणि आंत तर विरह धुमसत असतो. अशा स्थितींत, बायरन कवीनें एके ठिकाणीं वर्णिलेला हा गर्दी तला एकांतवास निर्जन एकांतवासापेक्षांही फार दुःसह होतो. पण अशी स्थिति बहुतकरून आम च्याच लोकांची होते. गोरे लोक लगेच एक-मेकांशीं मिसळून अनेक प्रकारचे खेल खेळत दिवस काढतात. लहान मुलें, पोक्त बाया आणि मोठे धटिंगण ह्यांचा दिवसभर धांगडधिंगा चालू असतो. ह्या गुलहौशी पाश्चात्य लोकांनीं सर्व जग-भर–जमिनीवरच नव्हे तर पाण्यावरही–आपलें घर पसरून टाकिलें आहे, तेणेंकरून हे कोठें गेले तरी ह्यांचा उल्हास कमी होत नाहीं. आम्हांला येथें घरून आणल्याप्रमाणें होतें. असो, हा प्रकार रजो-गुणाचा झाला; पण मनाची जर सात्विक वृत्ति होऊन तें धर्माच्या उच्च वातावणांत वावरूं लागलें, तर हीच परिस्थिति त्यास अत्यंत अनुकूळ होते. लाटांचें एकसारखें उत्क्रमण, वायूचें सतत वाहणें, अपार आकाशमंडळांत फांकणारी निःसीम प्रभा वगैरे पाहून विश्वाचें आनंत्य व सृष्टिव्यापाराचें सातत्य आणि अखेरीस परमेशाचें सर्वत्र भरलेलें मंगल वास्तव्य साक्षात् दृग्गोचर होतें आणि वर्डस्वर्थनें सांगितल्याप्रमाणें, 'भेटीच्या अशा उदात्त प्रसंगीं विचाराला अवकाशच नाहीं' व परमा-त्म्याशीं जीवात्म्याचें तादात्म्य होऊं लागतें! पृथ्वी वर अशा ब्रह्मोपासना विरळ!

ता० २६ (सपटेंबर) रोजीं सकाळीं एडन जवळची टेकडी दिसूं लागली. ५ दिवसांत दगड आणि माती आमच्या मुळींच नजरेस न पडल्यामुळें ही टेकडी दुरून पाहून आम्हांस अत्यानंद झाला. एडन बंदर उंच उंच टेकड्यांमध्यें लपून बसल्या सारखें व मधून मधून डोकावतें असें दिसलें. टेकड्यांचे कडे उंचवर निमूळते होत गेले आहेत. चोहोंकडे वाळूकामय प्रदेश दिसतो, झाडझुडूप किंवा एखादें हिरवें पानही कोठें दिसत नाहीं. बंदरांत शिरल्यावर बोटीवर क्वारंटाईनचें निशाण फडकूं लागलें. व्यापारी लहान लहान होड्यांतून आपला माल विकण्यास अगदीं बोटीजवळ येऊं लागले. व्यापारी गोरे आरब असत; व होड्या हांकणारीं पोरें सोमाली शिद्दी असत. क्वारंटाईन-मुळें ह्यांस बोटीवर येण्यास किंवा आम्हांस त्यांचे-कडे जाण्यास परवानगी नव्हती. म्हणून खालूनच ते आपला माल दाखवीत व किंमती ओरडून सांगत. ह्यांस मुसलमानी साफ बोलतां येत होतें. होडी हांकणारीं सोमाली पोरें केव्हां केव्हां आपला जिन्नस दाखवून केव्हां केव्हां आपल्या इंग्रजी भाषेनें आणि केव्हां केव्हां आपल्या विद्रूप आंग-विक्षेपानें गिऱ्हाइकांचें चित्त वेधीत. अरबांचा पोषाक बोहरी लोकांसारखा होता; ह्यांस दाढ्या नव्हत्या; पण कानांवर केंसाची लांब झुलपीं होतीं. सोमाली पोरें अर्धीं नागवींच होतीं आणि तींही स्वतःचा कांहीं माल विकीत. येथें विक्रीचे जिन्नस म्हणजे मडमांच्या गळ्यांतले पिसांचे हार, सुटीं लांबरुंद सुंदर पिसें, सांबरांचीं शिंगें, माशांचे सांगाडे, शहामृगाचीं अंडीं वगैरे प्राणीज कच्चा माल होता. ह्या जिनसांवरून व त्यांच्या विक-ण्याच्या तऱ्हेवरूनही ह्या लोकांची कंगाल स्थिति दिसून येत होती. माल खपेनासा झाला म्हणजे हीं शिद्दी पोरें ८।१० मिळून बँडचे चालीवर इंग्रजी गाणीं गाऊं लागत, तीं ऐकून मोठी गंमत वाटे. कोणी त्यांजकडे पेनी टाकीत. अशा प्रकारें हा संगीत व्यापार बोट निघेपर्यंत २।३ तास चालला होता. पूर्वीं प्रवासी लोक लहान लहान नाणीं समुद्रांत फेकीत असत व हीं पोरें चटकन पाण्यांत बुडी मारून तीं नेमकीं बाहेर काढीत, पण वरचे-वर फार अपघात होऊं लागल्यामुळें, ह्या प्राण-घातकी करमणुकीसंबंधानें वर्तमानपत्रांतून गवगवा होऊन सरकारांनीं ही चाल सक्तीनें बंद केली, वगैरे हकीकत मीं ऐकिली होती. आतां तसला कांहीं प्रकार दिसला नाहीं.

सकाळीं ९॥ वाजतां आगबोट बंदरांतून निघाली. दुपारीं १ वाजण्याच्या सुमारास समु-द्रांत पोर्पस नांवाचे ३।४ फूट लांब मासे पुष्कळसे दिसले. ते पाण्यावर ३।४ फूट उंच उड्या घेत एकमेकांमागून धांवत जात; कांहीं बोटीबरोबर धांवत येत. मध्यसमुद्रांत ह्या प्राण्यांचा हा खेळ पाहून मनास करमणूक झाली; आणि अशा प्राथमिक

कोटींतल्या प्राण्यांसही करमणुकीची आवश्यकता आहे व त्यांनींही आपापले खेळ बनविले आहेत, हें पाहून मोठें कौतुक वाटलें. आमची बोट ४॥ वाजतां बाबेलमांडेबच्या सामुद्रधुनींत शिरली. ह्या आरबी शब्दाची व्युत्पत्ति बाब+इल्+मंदब् अशी आहे. बाब=दार, इल=चें, मंदब्=रडणें, अश्रु. एकंदरींत रडण्याचें दार असा ह्या पदाचा अर्थ होतो. ह्या ठिकाणीं आशियाचा व आफ्रिकेचा असे दोन्ही किनारे जवळ जवळ आल्याकारणानें आगबोटीस जाण्यायेण्यास हें ठिकाण फार धोक्याचें झालें आहे. थोडयाच वर्षांपूर्वी येथें एक आगबोट दगावली आहे; आणि असे अपघात आणखी कितीतरी झाले असतील म्हणून आरबी लोकांनीं पूर्वीपासूनच ह्या स्थलास वरील अन्वर्थक नांव देऊन भयसूचक कायमचें चिन्ह करून ठेविलें आहे. ४।। वाजतां आम्ही तांबडया समुद्रांत शिरलों. इतर ठिकाणापेक्षां येथें तांबड्या रंगाचें विशेष कांहीं चिन्ह नसून ह्यास तांबडा समुद्र असें नांव कां पडलें हें कळत नाहीं. तांबडा समुद्र अगर इंग्रजींतील Red Sea हीं दोन्ही नांवें आरबी भाषेतील कुल्झम् ह्या नांवावरून पडलीं आहेत. कुल्झम् ह्याचे अफाट, खोल, तांबडा इत्यादि अर्थ आहेत. आरबस्थानच्या व इजिप्तच्या किनाऱ्यावरच्या गांवांची व इतर स्थळांचीं नांवें बहुत करून आरबीच आहेत. ह्यावरून आरबी लोकांनीं एकेकाळीं व्यापार, विद्या व राज्यकारभार इ. गोष्टींत आपलें नांव व सत्ता बरीच गाजविली आहे हें दिसून येतें. पण बंदरावर विकावयाला आणलेल्या जिनसांवरून पाहतां हे आतां फार मागासलेले दिसतात. तांबड्या समुद्रांत उष्मा फार होतो. वारा अगदींच बंद असल्यानें खोलींत मुळींच वसवत नाहीं, समुद्र एखाद्या डबक्याप्रमाणें शांत असतो. कपडे सर्व साहेबी थाटाचे असल्यानें अंगांतून घामाची संतत धार चाललेली असते. आशिया मातेचा लवकरच निरोप घ्यावयाचा असतो म्हणून जणूं ती आम्हांस उष्णोदकाचें सचैल स्नानच घालीत असते.

ता. ३० सपटेंबर सकाळीं ६ वाजतां आम्ही सुवेज येथें पोंचलों. व्यापाराच्या आणि जलपर्यटनाच्या बाबतींत ह्या कालव्यामुळें अत्यंत महत्वाच्या सोई व सुधारणा झाल्या आहेत. ह्याची लांबी म्हणजे तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र ह्यांमधील अंतर सुमारें ८२ मैल आहे; आणि रुंदी म्हणजे आशिया आणि आफ्रिका ह्यांमधील अंतर १५० पासून २०० फुटांच्या आंतच आहे. ह्यामुळें एकाच वेळीं एकच बोट जाऊं शकते. आगबोटीला जाण्याला पाणी २५।३० फूट तरी खोल असलें पाहिजे. तितक्या खोल पाण्याचा १०० फूट रुंद भाग कालव्याच्या मधोमध १०० यार्डांवर एकएक बोट तरंगत ठेवून आंखून दिल्याप्रमाणें केला आहे. समोरून जर ट्रॅम आली तर अरुंद गल्लींत बाजूला उभी करण्यास जसा रस्ता करून दिलेला असतो तशी येथेंही समोरून आगबोट आल्यास उभी करण्यास जागजागीं बाजूला तळीं खणलीं आहेत. हा कालवा दोन मोठ्या सरोवरांतून व कित्येक लहान लहान सरोवरांतून जातो. हा सर्व प्रदेश सपाट मैदान आहे; आणि समुद्रसपाटीवर ह्याची उंची ५।१० फुटांच्या आंत बाहेर इतकी आहे. ह्यावरून परमेश्वराच्याच मनांत येथें कालवा व्हावा असें होतेंसें दिसतें. तरी त्याची ही इच्छा ओळखण्यास मास्यूलेसेप—ज्या फ्रेंच गृहस्थानें हा कालवा खणला—सारख्या धोरणी व साहसी मनुष्याला आपली सर्व अक्कल खर्च करावी लागली !

आमची आगबोट सुवेझ बंदराच्या अगदीं जवळ जाऊन उभी राहिली. लगेंच ईजिप्त सरकाराकडून तीन लष्करी कामगार क्वारंटाइन कामासाठीं बोटीवर आले, ते पोर्टसेडपर्यंत बोटीवरच होते. त्यांपैकीं एकास विचारतां त्यानें सांगितलें कीं कालवा अगदीं अरुंद असल्यामुळें, बोटींतून कोणासही सहज मध्येंच उतरून देशावर जातां येतें. त्यांनीं तसें जाऊं नये म्हणून देखरेखीस तिघांस ठेविलें आहे. एडनमध्यें तर बोट बंदरापासून लांबच होती. सुवेझ आणि मार्सेयच्या दरम्यान उतरणाऱ्यांस सुवेझ येथेंच उतरून घेऊन तेथें कांहीं वेळ क्वारंटाईनमध्यें ठेवून मग सोडतात. पोर्टसेडपासून मार्सेयपर्यंतही एक कामगार होताच. ह्याप्रमाणें आम्ही हिंदुस्थान सोडून आलों, तरी युरोपच्या दारापर्यंत प्लेगच्या उपाधीनें आमची पाठ सोडिली नाहीं. असो.

पृथ्वीवर जीं कांहीं अचाट मानवी कृत्यें आहेत त्यांत सुवेझच्या कालव्याची गणना आहे. हा

कालवा तयार करण्यास क्रोडो रुपये लागले आहेत; इतकेंच नव्हे तर तो दुरुस्त ठेवणें अतोनात खर्चाचें काम आहे. दोन्ही कांठची जमीन अगदीं वाळूची असल्यानें कांठ पसरून आंत येतात, आणि कालवा वरचेवर उथळ होतो, म्हणून गाळ काढण्याचें काम नेहमीं चाललेलें असतें. गाळ यंत्रानेंच काढण्याची एक चमत्कारिक योजना केली आहे. एका आगबोटीवर एक रहाट—गाडगें उभें केलें आहे. ज्या वाफेच्या यंत्रानें ही बोट हळू हळू पुढें सरकते, त्याच्याच शक्तीनें हें रहाटगाडगें हालतें, आणि रहाटाचा खालचा भाग जसजसा गाळांतून वर येतो, तसतसा प्रत्येक गाडग्यांतून पाणी नितळून जाऊन गाळ वरतीं जातो. रहाटाच्या टोंकापासून तों किनाऱ्यापर्यंत एक उतरता पूल जोडून दिला आहे. तो बोटीबरोबरच हालतो. त्यांत प्रत्येक गाडग्यांतील गाळ पडून तो घसरत किनाऱ्यावर जाऊन पडतो. कोळशाची आणि लोखंडाची खाण व कांच्यांच्या पेट्या इतकें मिळालें कीं हे पाश्चात्य लोक शुद्ध दगडाकडून अत्यंत प्रचंड कामें करून घेतात. आणि हे लोखंडी राक्षस त्यांच्या आज्ञा कशा तत्परतेनें व दक्षतेनें वेळेवर आणि व्यवस्थेशीर करितात, हें पाहून आम्ही नुसतें तोंडांत बोट घालून पहात राहतों ! !

कालव्यांत पाणी शांत असतें, पण ह्या अरुंद कालव्यांत आमच्या एवढ्या मोठ्या बोटीचा २० २५ फूट उंच भाग पाण्यांत बुडतो. त्यामुळें आगबोट हालूं लागली म्हणजे पाण्यांत खळबळ उडते. ही घोक्याची जागा आहे म्हणून कालव्यांतून बोट दर तासाला फक्त ४।५ मैल चालते. एक भिकारी कांहीं तरी मिळेल, ह्या आशेनें किनाऱ्यावरून धांवत होता, तो बोटीबरोबर बरेंच अंतर धावूं शकला. कालव्यांतून आगबोट नेण्याबद्दल कंपनीला भाडें भरावें लागतें. आणि येथें मोठी रहदारी असल्यानें कंपनीचें रोजचें उत्पन्न लक्षावधि रुपयांचें आहे. रात्र झाल्यावर आमच्या समोरून ' रीम ' नांवाची एक मोठी फ्रेंच आगबोट आली, तिला वाट देण्यास आमची गजगामिनी ' पर्शिया ' एके बाजूस वळून मर्यादेनें उभी राहिली. ' रीम ' आमचे जवळून जातांना मध्यें अंतर फार तर २०।२५ फुटांचें होतें. दोन्ही बोटीवरच्या लोकांनीं जवळून जातांना टाळ्यांचा आणि ' हुर्रे ' चा मोठा गहजब केला. इतक्या आकुंचित व धोक्याच्या जाग्यांतन एवढ्या प्रचंड बोटी अशा संथपणानें गेल्या, हें पाहून फार आश्चर्य वाटलें. त्या जिवंत असून अगदीं समजूतदार असत्या तरी ह्यापेक्षां ज्यास्त जपून गेल्या नसत्या !

ता० १ आक्टोबर ४ वाजतां मी जागा झालों, आणि पाहतों तों आगबोट केव्हांच पोर्टसेद बंदराला लागली आहे. अंगावर ओव्हर कोट चढवून मी लगेच डेकवर चढलों. तेथें अगदीं सामसुम होतें. रात्रीच्या काळोखांत बंदरांवरून बोटींत कोळसा भरण्याची खालीं गडबड चालली होती, चहुंकडे भयाण देखावा पसरला होता, अशा वेळीं अशा परक्या स्थळीं निद्रिस्त झालेल्या बिचाऱ्या मोतीची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिली, आणि औदासीन्यानें मनास घेरल्यामुळें उजाडेपर्यंत झोंप लागली नाहीं.

एडनपर्यंत हवा मुंबईतल्या सारखीच असते. तांबड्या समुद्रांत वारा खेळत नसल्यामुळें व दोन्ही बाजूंस रुक्ष डोंगर आणि वाळूचीं मैदानें असल्यामुळें ह्या ठिकाणीं मुंबईपेक्षांही अधिक उष्मा होतो. पण सुवेझला पोंहोंचल्याबरोबर हवेंत फरक भासूं लागला. सुवेझ येथें सकाळीं ८ वाजतां पारा ७५ अंशांवर होता, व दोनप्रहरीं कालव्यांत ८१ वर होता. भूमध्य-समुद्रांत अधिकच थंडी वाजूं लागली. पुष्कळ गरम कपडे घातले तरी थंडी राहीना. त्यामुळें इंग्लंडांत पोंहोंचल्यावर माझें कसें होईल. ह्याबद्दल धास्ती वाटूं लागली. ता. २ आक्टोबर रोजीं दोनप्रहरीं वारा सोसाट्याचा सुटल्यामुळें समुद्र खवळला होता. लाटा दोन दोन पुरुष उंच येत होत्या. आगबोट इतकी हालूं लागली कीं, एके ठिकाणीं सरळ उभें राहतां येईना. खालच्या मजल्याच्या खोलींतल्या खिडकीवरून प्रत्येक लाट जोरानें आपटून जात असे, त्यामुळें पाणी आंत येतें कीं काय असें वाटे, पण जाड कांचेचें भक्कम झांकण असल्यामुळें एक थेंबही आंत येत नाहीं. अशा वेळीं अंथरुणावर नुसतें बसवतही नाहीं. कारण, बसलें कीं तोंडाला मळमळ सुटून डोकें फिरूं लागतें. कोणी चालूं लागला तर दारू पिऊन झिंगल्याप्रमाणें झुकांड्या खात जातो. म्हणून अंथरुणावर अगदीं पडून राहणेंच बरें.

ता. ३ संध्याकाळीं ४ वाजतां आम्ही इताली आणि सिसिली मधील मेसिनाचे सामुद्रधुनींतून जाऊं लागलों. एडन, सुवेज आणि सिसिली येथील वेळा अनुक्रमें सुमारें २, ३, ४ तास मुंबईच्या वेळेच्या मागें असाव्या, असें माझे घडयाळावरून दिसलें. दोन्ही बाजूंच्या किनाऱ्यावर उंच डोंगर आहेत. त्यांच्या पायथ्यांशीं समुद्र व डोंगर ह्यांच्या-मधील अरुंद प्रदेशांत दोन्हीकडे लहान लहान खेडीं व शहरें ह्यांच्या एकसारख्या रांगा लागून गेल्या आहेत. डोंगराच्या कांहीं अवघड ठिकाणीं देखील कडयांतून गांवें वसलेलीं दिसलीं. अगदीं कांठा-वरच एक देऊळ होतें, त्याचा घांट व शिखर हीं थेट हिंदु देवळाप्रमाणेंच दिसत होतीं. पावसाळ्यांत डोंगरांतील ओढ्यांचें पाणी गांवांतन पसरूं नये म्हणन वरपासून खालपर्यंत दोन्हीकडे भिंती बांधून वळणावळणानें सपाट उतरणी करून दिल्या आहेत. त्या दुरून फार सुंदर दिसतात. नकाशांत इताली देशाचें जें निमुळतें स्पार्टिव्हेंटो भूशिर दिसतें, त्याच्या अगदीं टोंकालाच एक उंच तुकडा सुटला आहे. तो वाटोळा असल्यानें बुरुजाप्रमाणें दिसतो. समुद्रकांठानें जाणारी एक आगगाडी ह्याच बुरुजाच्या बोगद्यांतून बाहेर पडतांना दिसली. इतालीचे किनाऱ्यावर मेलिटो, रेजिओ आणि सिला हीं शहरें आणि सिसिलीचे किनाऱ्यावर मेसिना हें मोठें शहर नजीकच दिसतें. ह्या ठिकाणीं समुद्राची रुंदी २।३ मैल असेल. पण समुद्रसपाटीमुळें त्याहूनही कमीच असेल, असें दिसतें, चांगला पोहणारा दुसऱ्या बाजूस पोहून सहज जाईल.

वेळ संध्याकाळचा असल्यामुळें व समुद्र फार शांत असल्यामुळें ह्या ठिकाणीं दोहोंकडच्या शहरांचा व उंच डोंगरांचा देखावा फार मनोहर होता. कुलाब्याच्या दांडीसारखा शिसलीचा एक लांब, सपाट, चिंचोळा जमिनीचा भाग इताली-जवळ जवळ गेला आहे. त्यास वळसा घालून आगबोट पुनः उघड्या अफाट समुद्रांत शिरल्या-वर डावीकडे लिपेरी बेटें आणि स्ट्रांबोलीचा ज्वालामुखी पर्वत दिसूं लागतो. हाच देखावा पाहून बायरन् कवीस कवितेची स्फूर्ति झाली असावी. वारा मंद व शीतल वाहत होता. स्वर्गा-तून परमेश्वरानें शांतीचा जणं निरोपच धाडिला होता! सूर्य अस्तास जात असतांना पश्चिमेकडच्या ढगांतून तापलेल्या लोखंडाप्रमाणें तांबडा लाल दिसत होता. तो सगळा क्षितिजाखालीं गेल्यावरही त्याचें चपटें प्रतिबिंब कांहीं वेळ दिसत होतेंच. अफाट समुद्रावर स्वच्छ आकाशांत ह्या शांत वेळीं सूर्यास्ताचा देखावा पाहण्याची भारी मौज असते. बुडतांना त्याचीं आरक्त किरणें लाटांवरून लांबपर्यंत पसरल्यामुळें समुद्र जणूं सोन्याच्या रंगानें सचंबळतो कीं काय असें दिसतें! ६ वाजतां स्ट्रांबोली ज्वालामुखी पर्वताच्या शिखरांतून निघणारा धुराचा लोळ दिसूं लागला. ह्या डोंगराच्या नजीक आलों, त्या वेळीं अगदीं काळोख पडल्या-मुळें ह्याचा देखावा स्पष्ट दिसला नाहीं. ता.४ रोजीं संध्याकाळीं ४॥ वाजतां आम्ही कार्सिका व सार्डिनीया बेटांमधील बोनिफोसिया सामुद्रधुनींत आलों. दोन्ही बेटांच्या किनाऱ्यावर मुळींच कोठें वस्ती दिसली नाहीं. ता.५ला सकाळीं मार्सेल्स येथें पोंचलों.

ह्या १४ दिवसांच्या जलप्रवासांत मला विशेष म्हणण्यासारखा कंटाळा वाटला नाहीं किंवा दुसरा कसला त्रास झाला नाहीं. एकाद्या लहानशा खेड्यांतल्याप्रमाणें अगर एकाद्या मोठ्या राज-वाड्यांतल्याप्रमाणें हे आमचे दोन आठवडे गेले. हल्लींचे काळीं आगबोट म्हणजे नुसतें प्रवासाचें उत्तम साधन आहे, इतकेंच नव्हे तर परदेशांत कामधंदा करून थकलेला मनुष्य आणि एका स्थळीं बराच वेळ राहून कंटाळलेला खुशालचेंडू ह्या दोघांसही आरामाचें आणि चैनीचें स्थान आहे. पण जलपर्यटनांत एवढी मोठी सुधारणा नुसत्या गेल्या शतकांत कशी घडून आली, ह्याचें वर्णन एका पुस्तकांत मीं वाचलें; त्याचा दोन शब्दांत सारांश देतों.

पाण्यावरून गलबत हांकारण्याच्या कामीं प्रथम ज्या कांहीं अडचणी आल्या त्यांत लोकांचें अज्ञान, दुराग्रह आणि पोरकट भीति ह्याच फार मोठ्या होत्या. कांहीं धाडसी शोधक लोकांनीं चांगले प्रयोग करून ही गोष्ट फायदेशीर आहे, असें दाखविल्यावरही सरकार, आगबोटी वापरण्यास लवकर परवाने देईना व लोकही धजेनात. इ० सन १८१२ त मि० हेन्री बेल नांवाच्या मनुष्यानें 'कॉमेट' नांवाची पहिली आगबोट क्लाईड नदीवरून हांकारली. तिच्या एंजिनाची शक्ति नुसती ४ घोड्यांइतकी होती. वेग १ तासाला ७॥ मैलांचा होता; आणि वजनही फार कमी

होतें. अमेरिकेंतील ' सव्हना ' शहरापासून ' सव्हाना ' नांवाची पहिली आगबोट ता० २८ मे १८१९ रोजीं निघाली. ती ता० २९ जून १८१९ रोजीं लिव्हरपूल शहरास पोंचली. हल्लीं इंग्लंड आणि अमेरिका ह्यांमध्यें ' क्युनार्ड ' कंपनीच्या टपाल नेणाऱ्या ज्या मोठ्या आगबोटी आहेत, त्यांत ' कॅपानिया ' आणि 'लुकानिया' फार मोठ्या आहेत. कॅपानिया १२,९५० टन माल नेऊं शकते. तिची शक्ति ३०,००० घोड्यांची आहे, आणि ती दर तासाला २३ मैल चालते. लुकानिया ही अमेरिकेहून इंग्लंडला एकदां ५ दिवस १५ तास ३७ मिनिटें इतक्या वेळांत आली. आजपर्यंतच्या प्रवासांत हा सगळ्यांत जलद प्रवास आहे. ' क्युनार्ड ' कंपनी आणि ' व्हाईट स्टार ' नांवाची जर्मन कंपनी ह्यांमध्यें अटलांटिक महासागरांतून टपाल नेण्याच्या कामीं मोठी चुरशीची स्पर्धा लागली आहे. लुकानिया जन्मेपर्यंत मेलचें काम ' व्हाईट स्टार ' कडेच होतें. आगबोटीला अधिक वेग देण्याचे कामीं आतां जर्मन लोकांची सरशी होऊं लागली आहे. ' केसर विल्हेल्मडर ग्रॉसी ' नांवाची आगबोट ही एके दिवशीं ५८० नॉट्स म्हणजे ६५२ मैल चालली. हा सर्वांत जास्त वेग आहे. पण लुकानिया बोटीच्या वर दिलेल्या वेळांत तिला अद्यापि इंग्लंड व अमेरिकेच्या मधला प्रवास करतां आला नाहीं. ' डचलंड ' ह्या जर्मन बोटींची शक्ति सर्वांत ज्यास्त म्हणजे ३५,००० घोड्यांइतकी आहे. ' सेल्टिक ' नांवाची नुकतीच बेलफास्ट येथें केलेली बोट सर्वांत जास्त लांब म्हणजे ७०४ फूट आहे. ' फर्स्ट बिस्मार्क ' ही सर्वांत अधिक श्रीमंती थाटाची बोट आहे. म्हणून ती विलासी स्त्रियांची मोठी आवडती आहे. दक्षिण महासागरांत तितकी स्पर्धा नसल्यामुळें, पी. अँड ओ. च्या आगबोटींची शक्ति ११००० घोड्यांपेक्षां ज्यास्त नाहीं. मी येतांना ' पर्शिया ' आगबोटीचा सर्वांत जास्त वेग म्हणजे एके दिवशीं ती ४३१ मैल चालली, हाच होय.

कॅपानियासारख्या प्रचंड आगबोटीला दररोज ४५० टन कोळसा लागतो म्हणजे प्रत्येक ३$\frac{१}{५}$ मिनिटाला एक टन पडतो! ह्या आगबोटीची किंमत ६,००,००० पौंड म्हणजे जवळ जवळ एक कोट रुपये आहे!! एडिसनचें असें म्हणणें आहे कीं, अमेरिका आणि इंग्लंड ह्यांमधील प्रवास फार तर ३।४ दिवसांत करतां येईल! ह्याच नांव प्रगति!!!

दर रविवारीं बोटीवर धर्मसंबंधीं कांहीं होत नाहीं, असें जें मागें मीं लिहिलें आहे, तें चुकीचें आहे. ता० २९ सपटंबर आदित्यवारीं ' पर्शिया ' आगबोटीवर सार्वजनिक ईश्वरोपासना झाली, ती स्वतः कमांडरानेंच चालविली. पुरुष व स्त्रिया मिळून ४० जण हजर होते. उपासनेनंतर समुद्रावरील धर्मकृत्यांकरितां म्हणून तेथल्या तेथेंच सुमारें २० रुपये जमले. असो. कोणत्या तरी रीतीनें ह्या लोकांची धर्मबुद्धि प्रकट होत आहे.

---

## मार्सेय शहर.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड.

ता०५ऑक्टोबर रोजीं सकाळीं ६ वाजतां मार्सेय जवळची टेंकडी दिसूं लागली. आगबोट बंदरावर पोंचल्यावर कांहीं वेळानें न्याहारी आटपून आम्हीं ' पर्शिया ' चा निरोप घेतला आणि ९॥ वाजतां युरोपच्या किनाऱ्यावर पाय ठेविला. ज्यांच्या मार्फत आम्हीं तिकिट काढिलें होतें, त्या कुक कंपनीचे दुभाषे आमची वाट पाहत बंदरावर उभे होतेच. त्यांपैकीं एकानें आमचें सर्वही सामान आपल्या ताब्यांत घेतलें. हिंदुस्थानचे आम्ही पांच विद्यार्थी आणि एक व्यापारी एकत्र होतों व लंडनपर्यंत मिळूनच गेलों. आम्हां सर्वांना लंडनला लवकरच जावयाचें होतें म्हणून आम्हांस मार्सेय येथें १२ च तास रहावयास सांपडलें. पण तितक्याच वेळांत जेवण वगैरे लवकर आटोपून मार्सेयचा पहावेल तितका भाग पाहिला. आमच्या व्यापारी पारशी सोबत्यास फ्रेंच भाषेत थोडीशी जीभ हालवितां येत होती, त्याचा आम्हांस अतोनात फायदा झाला. त्याच्याशिवाय आम्ही सर्व कान असलेले बहिरे आणि तोंड असलेले मुके झालों होतों. वरील दुभाष्यानें मोठ्या आदबीनें आमची सर्व सोय करून ' हॉटेल डी जि नीव्ही ' नामक खाणावळीच्या एजंटाशीं आमची गांठ घालून दिली. दोनप्रहरच्या फराळास बराच अवकाश होता.

म्हणून आम्ही खाणावळींत विनाकारण खोलीचें भाडें भरीत न बसतां शहर पाहण्यास बाहेर पडलों. मार्सेय हें फ्रान्स देशांतील दुसऱ्या प्रतीचें शहर व पहिल्या प्रतीचें मोठें महत्त्वाचें बंदर आहे. आम्ही ज्या धक्यावर उतरलों, तो म्हणण्यासारखा सुंदर नव्हता व स्वच्छही नव्हता. फ्रेंच लोकांच्या नखऱ्याविषयीं व छानीविषयीं माझी जी कल्पना होती, तिच्यामुळें माझी सकृद्दर्शनीं थोडी निराशा झाली. पण जसजसा मी शहरांत शिरूं लागलों, तसतशी ही निराशा कमी होऊं लागली आणि कांहीं भागांतील रस्त्यांची शोभा व दुकानांचा थाट पाहून तर ती अजीबात नाहींशी झाली. आणि मुंबईचे उत्तम रस्तेही ग्राम्य वाटूं लागले. पण स्वच्छतेच्या मानानें पाहिल्यास मुंबईला तिच्या कांहीं गल्ल्यांची पावसाळ्यांतील मासलेवाईक स्थितीची आठवण झाल्याबरोबर हीदेखील तुलना करूं नये असें वाटलें. रस्ते बहुतेक फरसबंदीचे आहेत. कांहीं ठिकाणीं अगदीं एका नमुन्याच्या घरांची रांग लागते. विजेच्या ट्रॅमस् , घोड्यांच्या ट्रॅमस्, ऑम्नीबसेस आणि घोड्यांच्या व गाढवांच्या लहानमोठ्या गाड्या वगैरेंचा रस्त्यांतून एकच घोळका चाललेला असतो. अशा रस्त्यांतून आम्ही चाललों असतां रस्त्यांतील निदान अर्ध्या तरी लोकांचे डोळे आमच्याकडे लागले. कां ? तर मीं डोक्यावर आपला गुलाबी फेटाच घातला होता म्हणून. एके ठिकाणीं गाडी ठरविण्यास आम्ही एकदोन मिनिटें उभे राहिलों, तर आमचेमागें लहान मोठ्या स्त्री-पुरुषांची मोठी गर्दी जमली ! माझ्या एका डोक्याशिवाय आम्ही सहाहीजण जरी नखशिखान्त साहेब बनलों होतों, तरी हा प्रकार घडूं लागला. जर आम्हीं सर्व आमचे सगळे निरनिराळे देशी पेहराव करून बाहेर पडलों असतों, तर रस्त्यांत काय अनर्थ घडता कोण जाणे. तरी पण माझ्या एका फेट्यामुळें कांहीं कमी चळवळ उडाली नाहीं. बायका आपल्या लहान मुलांस कडेवर किंवा खांद्यावर घेऊन आम्हांकडे बोट दाखवूं लागल्या, तरुण मुली घरांत पळत जाऊन इतरांस बाहेर बोलावून आम्हांस पाहत उभ्या राहत. ह्या त्रासामुळें माझे सोबती थोडेसे कुरकुरूं लागले व मलाही अडचण वाटूं लागली. आगबोटीवरदेखील ह्यासंबंधीं बरीच चर्चा झाली. मार्सेय बंदरावर बोटीवरून उतरतांना, आमच्या बरोबर येणाऱ्या एका सिव्हिलियनानें मजजवळ येऊन मोठ्या आस्थेनें विचारलें कीं, कायहो, हें तुमच्या डोक्यावरचें तुम्ही लंडनपर्यंत कायम ठेवणार कीं काय ?. लंडनचीं मुलें वात्रट आहेत, तीं तुम्हांस त्रास देतील. माझ्या पोषाखाची तो विशेष कळकळ दाखवूं लागला, हें पाहून मीं त्यास विचारलें कीं, विलायतेस पोलीसची व्यवस्था चांगली आहेना ! ह्यानंतर विशेष बोलणें झालें नाहीं !

फ्रेंच लोक सर्वांपेक्षां अधिक उल्हासी व रंगेल आहेत; शहरांतील पुष्कळ लोक घरीं जेवणाची दगदग न करितां खाणावळींतच जेवतात, वगैरे गोष्टी मीं मागें एका प्रवासवर्णनांत वाचल्या होत्या. त्यांपैकीं एक प्रकार असा आढळून आला कीं, मुंबईतल्या इराण्यांच्या दुकानाप्रमाणें येथें खाण्या-पिण्याचीं आरामस्थानें गल्लोगल्लीं पुष्कळ आहेत. दुकानासमोर रस्त्याच्या बाजूनें मोठें उघडें पटांगण असतें. त्यांत शेंकडों खुर्च्या व टेबलें मांडलेलीं असतात. येथें जेवणारांची गर्दी जमलेली असते. हीं ठिकाणें स्वच्छ, सुंदर व भपकेदार असतात. रस्त्यांतील गर्दीकडे पाहत व चकाट्या पिटीत, हे लोक उपहार करीत असतात. दुसरा एक चैनीचा प्रकार असा आढळला कीं, कांहीं ठिकाणीं रस्त्याच्या दोन्ही बाजूंस उंच व दाट झाडें लाविलीं आहेत. हीं झाडें वर एकांत एक इतकीं मिसळून गेलीं आहेत कीं, भर दोनप्रहरीं देखील ह्या रुंद रस्त्यांत गर्द छाया असते. अशा ठिकाणांस येथें बुलवर्ड असें म्हणतात. जागजागीं विश्रांति घेण्यास बाकें ठेविलीं आहेत. ह्या रस्त्यांतून गाड्याघोडीं जात नाहींत. त्यांच्याकरितां दोन्ही बाजूनें वाटा करून दिलेल्या आहेत. मधून रिकामटेकडे हिंडत असतात किंवा बसलेले असतात.

आम्ही 'नॉटर डेम् ड ला गार्ड' नांवाचें देऊळ पाहून परत खाणावळींत जेवणास गेलों व जेवण आटपल्यावर लगेच पॅलेस डिला शांप नांवाचा महाल पाहावयास गेलों. हा महाल एका लहानशा टेंकडीच्या बाजूवर बांधला आहे. त्याचे पहिले दोन मजले टेकडींतच कोरले आहेत व बाकीचे मजले त्यावर उभारले आहेत. ही एकंदर इमारत अर्धवर्तुळाकार आहे. हिच्यापुढें रस्त्यापर्यंत सारखें उतरतें पटांगण विस्तीर्ण पसरलें आहे. त्यावर

रसरशीत गवताचे आणि नानाविध रंगाच्या कोमल वनस्पींचे गालीचे अंथरले आहेत. दोहों बाजूंच्या गालीच्यांची शोभा पाहत पाहत आम्ही चढण चढून वर गेलों. तों एका बाजस पोष्टाच्या पेटीसारखी एक पेटी ठेविलेली दिसली. आमच्यांतील एकानें तिच्या एका फटींतून आंत एक पैसा टाकिल्याबरोबर दुसऱ्या एका फटींतून मार्सेयच्या एका सुंदर इमारतीचा फोटो बाहेर पडला. ह्या इमारतीचा समोरचा तळमजला टेंकडीच्या खडकांत कोरून काढला असून, ह्या ठिकाणीं कोरींव लेणें फार पाहण्यासारखें आहे. येथें अर्धवट उजेड व अर्धवट अंधार आहे. पोखरून काढलेल्या भरभक्कम खांबाभोंवतीं आणि पुतळ्यांच्या आजूबाजूला खडकांतून झिरपणाऱ्या झऱ्यांचें पाणी खेळत आहे. शांत समयीं हें एकांतस्थळ पाहून असें वाटतें कीं, निसर्ग आणि मानवी कला ह्या जोडप्याचें हें जणूं क्रीडास्थानच असावें. महालाच्या ह्या मधल्या भागाच्या दोन्ही बाजूंस अर्ध वर्तुलाकार दोन दालनें आहेत. एका दालनांत अनेक प्रकारच्या जनावरांचीं व पक्षांचीं मृत शरीरें व इतर पदार्थ ह्यांचा मोठा संग्रह व्यवस्थेनें लावून ठेविला आहे. आणि दुसऱ्या दालनांत खालच्या मजल्यांत पुतळे व वरच्या मजल्यांत चित्रें ह्यांचा संग्रह ठेविला आहे. ह्यांपैकीं बहुतेक चित्रें आणि मूर्ति नग्न होत्या, त्यांत विशेषेंकरून कांहीं सुंदर तरुण स्त्रियांचीं चित्रें तर केवळ नग्न आणि नैसर्गिक स्थितींत इतकीं हुबेहूब दाखविलीं होतीं कीं, आम्हां पौरस्त्यांस तिकडे पाहिल्याबरोबर पराकाष्ठेची शरम वाटून, चित्रांतील सुंदरीचा जणूं अपमान केल्याप्रमाणें खेद वाटे. तसेंच ह्यावरून फ्रेंच लोकांच्या सौंदर्याभिरुचीचाही मासला कळतो. हीं चित्रें सुप्रसिद्ध व सुसंस्कृत चितार्‍यांच्या मनांतून व हातांतून उतरलीं असल्यामुळें एकावर चित्त गुंतलें, तें तेथेंच गुरफटून राही. इतक्यांत सहज दुसरीकडे नजर गेल्याबरोबर तिकडेच लय लागे. हा देखावा पाहून आम्हांस असें वाटूं लागलें कीं, दैवी सौंदर्य आणि मानवी चातुर्य ह्या दोन्हींची आम्हांस ह्यापूर्वी नीटशी कल्पनादेखील नव्हती. काव्य, इतिहास, नाटक, पुराण, दंतकथा, प्रवासवर्णन, भूगोल, खगोल आणि दुसऱ्या अनेक शब्दसृष्टींचें प्रतिबिंब ह्या चित्तवेधक चित्रसृष्टींत परावृत्त झालें होतें. हाच मासला पुतळ्यांचाही. असो, अशा प्रकारचा हा संग्रह अफाट असून आम्हांला वेळ तर फारच थोडा होता. आणि शहरांत अशीं ठिकाणें आणखी किती होतीं कोण जाणे. अशा स्थितींत आमच्या मनाची किती ओढाताण झाली हें सांगतांच येत नाहीं.

मार्सेयमध्यें व पारीसमध्येंही एक चमत्कार दिसला. तो हा कीं, ४।५ ठिकाणीं बायकांच्या ओंठांवर मिशा दिसल्या! एका वृद्ध बाईला तर अगदीं खास वस्तऱ्याची गरज लागत होती, असें दिसलें; कारण, तिच्या हनुवटीवर, गालांवर आणि ओंठावर करड्या रंगाचे राठ खुंट वाढले होते. एकदोन युवतींच्या ओंठावर कोवळ्या व निळसर केसांच्या दाट पण आंखूड मिशा पाहिल्या. ह्या नटव्या फ्रेंच बायकांनीं कसलीं तरी तेलें लावून आपले केस कृत्रिम रीतीनें वाढविले असल्यास न कळे!

जेवण वगैरे आटपून रात्रीं ८ वाजतां आम्ही स्टेशनावर गेलों. तेथें कुक कंपनीचा दुभाषा आमचें सर्व जड सामान घेऊन आमची वाट पाहत हजर होताच. आमच्यासाठीं एक रिझर्व्हड २ ऱ्या वर्गाचें कंपार्टमेंट घेऊन त्यांत आमची सर्व सोय त्यानें लावून दिली; आणि आम्ही ८।४० ला पारीसला निघालों. थंडी फार पडली असल्यानें आम्ही दारें पक्कीं बंद करून जवळ असेल तितका गरम कपडा अंगावर घेऊन स्वस्थ गुरफटून निजलों. तों सकाळीं ६ वाजतां डीजॉन स्टेशनावर जागे झालों. गाडीचा वेग दर तासास ५०–६० मैलपर्यंत होता. डब्यांची रुंदी किंचित् जी. आय. पी. पेक्षां ज्यास्त असते. प्रत्येक डब्यांत लांबीच्या बाजूनें सुमारें ३ फट रुंदीचा भाग ग्यालरीसारखा खुला असतो. ह्या ग्यालरींतून गाडीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत गाडी चाल असतांनादेखील जातां येतें. आगबोट बंदरावर पोंहोंचल्याबरोबर जरूरीच्या उतारूंस ताबडतोब नेण्यास पी. अँड. ओ. स्पेशल, तयार असते, ती मार्सेयहून जी लगेच निघते ती कॅलेवरच थांबते. त्या गाडींत एक भोजनाचा स्वतंत्र हॉल आणि निजण्याच्याही खोल्या असतात. डी जॉन स्टेशनापासन तों पारीसपर्यंत,

वाटेंत शेतें, कालवे, दऱ्या, बोगदे, गांवें इ०-चा सुंदर देखावा गाडींतून दिसला. पाऊस एक सारखा सपाटून पडत होता. फ्रेंच लोकांची सौंदर्याभिरुचि त्यांच्या शेतांतूनही दृष्टीस पडते. ह्यांचीं शेतें म्हणजे केवळ बागच ! कालव्याच्या कांठीं झाडें लागलीं होतीं, तीं जणं कवाइतीलाच उभीं आहेत असें वाटे. जागोजाग खेडीं लागत, तीं खेडीं नव्हत, चित्रेंच तीं ! फ्रान्सचीं शेतें सकाळच्या वेळीं गाडींतन धांवत असतांना प्रथमच पाहून एकाद्या नवख्यास, इतर ठिकाणीं राजा होण्यापेक्षां, फ्रान्समध्यें शेतकरा होणें बरें, असें वाटल्यास त्यांत नवल काय ?

## पॅरिश शहर.

समता-स्वतंत्रता-बंधुतेचा झेंडा मिरविणारी, सौंदर्याची जी खाण त्या पॅरीसपुरींत आम्ही सकाळचे १० वाजतां उतरलों. पॅरीस शहर पॅरीस शहराप्रमाणेंच आहे—ह्यापेक्षां ज्यास्त कांहीं वर्णन करवत नाहीं. पुष्कळ लोकांनीं ह्याचें वर्णन केलें असल्यामुळें, येथें त्याचें वर्णन करण्याचें विशेष प्रयोजन नाहीं. शिवाय जेवण वगैरे आटपून आम्ही गाडींत बसून बाहेर पडलों, तोंच आम्हांस पावसानें गांठलें. आम्ही मुख्य रस्त्यानें प्रदर्शनाकरितां मुद्दाम बांधलेले मोठेमोठे सुंदर महाल पाहत प्रथम ' पॅले-सडी न्याशनल इन्व्हालिड् ' म्हणजे जेथें प्रसिद्ध ऐतिहासिक राजपुरुषांचीं थडगीं आहेत, अशा राजवाड्यांत गेलों. वीरमणि नेपोलियनाचें येथें भव्य कबरस्थान आहे. हौदासारखी सुमारें २० फूट व्यासाची वर्तुलाकार जागा जमिनींत सुमारें २० फूट खोल सुरेख बांधून काढिली आहे. ह्या हौदाच्या मध्यभागीं नेपोलियनाचें भव्य थडगें आहे. त्याचा रंग दाट काळसर तपकिरी आहे. हौदाच्या छातीइतक्या उंच कठड्यावरून खालीं डोकावून त्याकडे पाहावें लागतें. हा दिवस आदित्यवारचा असल्यामुळें, येथें हजारों लोकांची गर्दी जमली होती. हें ठिकाण गंभीर असल्यामुळें इतकी गर्दी असूनही चहूंकडे शांत होतें; त्यामुळें देखावा अधिकच गंभीर दिसला! थडग्याभोंवतीं भिंतीच्या कोनाड्यांतून ७।८ पुतळे उभे आहेत. तशींच सभोंवतीं निशाणें, भाले व कांहीं हत्यारें ठेविलीं आहेत आणि त्यानें जिंकलेल्या मुख्य मुख्य लढा-यांचा भोंवतालीं उल्लेख केला आहे. पण शेवटीं ह्या जग जिंकूं पाहणाऱ्या जेत्यास काळानें चीत करून आपल्या सर्वभक्षकतेचें स्मारक येथें त्याच्या थडग्याच्या रूपानें स्थापित केलें आहे.

दि बिग् व्हील—ह्यानंतर आम्ही ' राक्षसी चक्र ' पहावयास गेलों. आपल्याकडे जत्रेच्या ठिकाणीं जसे उंच पाळणे उभारून त्यांत लोकांस बसवून हालवितात, त्याच नमुन्याचें पण अत्यंत प्रचंड हें वरील चक्र आहे. ह्याचा व्यास २००-२५० फूट असावा. सुमारें १०० फूट उंचीच्या दोन्हीकडच्या दोन दोन तिर्कस खांबांवर ह्या राक्षसी चक्राचा राक्षसी कणा ठेविला आहे. ह्या चक्राच्या परिघांत सुमारें २० मोठ्या लांकडी पेट्या अथवा खोल्या बसविल्या आहेत. प्रत्येक खोली १५ हात लांब, ५ हात रुंद आणि ५ हात उंच आहे. एका खोलींत २० माणसें बसतील इतकी जागा असते. आंत एक टेबल व दोन खुर्च्या ठेविलेल्या असतात. हें चक्र पांच पांच मिनिटांनीं एकदां थांबतें. तेव्हां खोलींत बसलेलीं माणसें बाहेर येतात व नवीं आंत जातात. एका फेरीस एका माणसास एक फ्रँक म्हणजे सुमारें १० आणे पडतात. खोलीच्या बाजू तावदानाच्या असल्यामुळें चहूंकडचा पारीस शहराचा देखावा दिसतो आणि जेव्हां चक्राच्या वरच्या टोंकावर जातों तेव्हां आम्ही आकाशांत २००-२५० फूट उंच असतों. ज्या सळ्यांवर ह्या खोल्या अडकविल्या असतात, त्या फार जाड नसल्यामुळें केव्हांच मोडतील कीं काय अशी विनाकारण भीति वाटत असते. हें चक्र जेव्हां प्रथम सुरू केलें तेव्हां ह्यास हालविणाऱ्या यंत्राचा कांहीं भाग बिघडला होता, तो दुरुस्त करून चक्र पुन्हां चालू करण्यास १२ तास लागले, तोंपर्यंत २०० फुटांवरच्या खोलींत बसलेल्या माणसांची काय भयंकर अवस्था झाली असेल ह्याची कल्पना हें चक्र प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय सहज होण्यासारखी नाहीं.

नंतर आम्ही एफे नांवाचा प्रसिद्ध मनोरा पहावयास गेलों. हा ७००-८०० फूट उंच असावा असें म्हणतात. वरील चक्रापेक्षांही हें काम अचाट आहे. हा सर्व मनोरा लोखंडाचा आहे. दर माणशीं दोन फ्रँक दिल्यास खोलीसकट

मनोऱ्याच्या शिखरावर उचलून नेतात. वरून खालीं पाहण्याची देखील छाती होत नाहीं. आम्ही अर्धा मनोरा चढून गेल्यावर पाऊस सोसाट्यानें पडूं लागला व वारा सोसाट्याचा सुटला म्हणून वर जाण्याचा नाद सोडून खालीं उतरलों. हें असलें अचाट कृत्य इतका खर्च करून केलें असून तें कायम ठेवावें कीं पाडावें ह्याविषयीं म्युनिसिपालिटी वाद करीत आहे. हा मनोरा १८८९च्या प्रदर्शनासाठीं बांधला. हा पाडावा असें म्हणणाऱ्यांचा एक मुद्दा असा आहे कीं, मनोरा बेढब झाला आहे! कमाल आहे फ्रेंच सौंदर्याची!! नुकत्याच झालेल्या प्रदर्शनासाठीं बांधलेल्या भव्य व सुंदर इमारती पाडण्याचें काम चाललें आहे.

९॥ वाजतां पारीसहून निघून रात्रीं १ वाजतां कॅले येथें पोंचलों. इंग्लिशचॅनेल ओलांडण्यास १ तास लागला. येथें समुद्र नेहमीं खवळलेला असतो. आमच्या बरोबरच्या बहुतेकांस वांत्या झाल्या, मलाही फार मळमळलें. ता. ७ रोजीं सकाळीं ७ वाजतां लंडन येथें पोंहोंचलों. तेथें ३ दिवस राहून ता. १० संध्याकाळीं सुखरूप ऑक्सफर्ड येथें पोहोंचलों, येथें माझा प्रवास संपला. तो सुखाचा झाला, ह्याबद्दल परमेश्वराचा मी फार आभारी आहें.

---

## 'नॉटर डेम् ड ला गार्ड' देऊळ व तें पाहून सुचलेले विचार.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड.

ता. २९।११।१९०१.

पुण्यास जशी पर्वती, मुंबईस जसा बाबुलनाथ, तसें हें वरील नांवाचें देऊळ मार्सेय येथें आहे. ह्या फ्रेंच नांवाचा मराठींत अर्थ 'आमची रक्षक माता' असा होतो. ही माता म्हणजे श्री येशू खिस्ताची आई कुमारी मेरी ही होय. हीच ह्या देवळांतील मुख्य आराध्यदैवत आहे. शहराला लागूनच आग्नेय बाजूस एक उंच टेंकडी आहे. तिच्या माथ्यावर हें सुंदर देऊळ बांधिलें आहे. टेंकडी चढून वर जाईपर्यंत थकवा येतो. टेकडीच्या पायथ्यापासून तों माथ्यावर देवळाच्या दारापर्यंत लिफ्टनें प्रेक्षकजनांस वर उचलून नेण्याची योजना केली आहे, असें आम्हांस वर गेल्यावर कळून आलें. ही टेकडी समुद्राच्या कांठावर असल्यानें येथून एका बाजूस अनंत महासागराचा व दुसऱ्या बाजूस चित्रविचित्र मार्सेय शहराचा देखावा एकाच वेळीं दिसत होता. माथ्यावर पोंहोंचल्यावर देवळाचा दगडी घाट लागला. आजूबाजूस आंतबाहेर चहूंकडे झाडून साफ केलें असल्यामुळें, मनाला फार निर्मळ वाटलें. तसेंच ह्या उंच एकांत पवित्र स्थळीं माणसाची फारशी चाहूल नव्हती. म्हणून येथें लवकरच मन निःशंक होऊन खेळूं लागलें. देऊळ भक्कम दगडांचें बांधलें असून काम साधें, सफाईदार व सुबक झालें आहे. तळमजल्याचें दार झांकलें होतें व आंत अंधार दिसत होता. देवळाचा मुख्य भाग दुसऱ्या मजल्यांत होता म्हणून आम्ही वर गेलों. आम्ही हिंदुस्थानचे लोक परकीय यवनांस आमच्या पवित्र देवळांत येऊं देत नाहीं, तसेंच या देवळांतही आम्हां हिंदनांस जाऊं देतील कीं नाहीं ही अपवित्र शंका आमच्या मनांत येऊन आम्ही सगळे दारांतच घुटमळूं लागलों. इतक्यांत एका वृद्ध मनुष्यानें आंत जाण्यास खूण केली.

देवळांत शिरलों, तेव्हां १२ चा अम्मल होता. चोहींकडे शांत व गंभीर देखावा दिसत होता. विरळा एखादा प्रेक्षक अगर उपासक पावलांचा आवाज न करितां जपून पाहून अगर प्रार्थना करून नकळत जात असे. आंत गेल्याबरोबर दोन्ही बाजूंस दोन मोठ्या ७–८ फूट उंच पितळेच्या लखलखीत ठाणवया दिसल्या. त्यांवर २।३ फट लांब बारीक मोठ्या शेंकडों मेणबत्त्या जळत होत्या. हे खिस्ती नंदादीप पाहिल्यावर क्यॅथलिक धर्माचें साक्षात् स्वरूप पुढें दिसूं लागलें. खालपासून वरती गाभाऱ्यापर्यंत विशाल भिंतीवरून पौराणिक चित्रें टांगलीं आहेत. कोठें येशू मुलांस खेळवीत आहे, कोठें दुःखितांचे अश्रु पुशीत आहे, कोठें आजाऱ्यांस बरें करीत आहे तर दुसरीकडे कोठें स्वतः येशूचीच छळणा चालली आहे, कोठें त्यास सुळावर खिळून टाकलें आहे, अशीं नानातऱ्हेचीं चित्रें हुबेहुब रेखिलीं होतीं. शिवाय कोपऱ्यांत, कोनाड्यांत, चौकांत चौरंगावर निरनिराळ्या धातूंचे ओतलेले व दगडांचे घड-

विलेले येशूचे व त्याच्या शिष्यांचे पुतळे बसविले होते व त्यांपुढें धूप, दीप पुष्पादिकांचा थाट सजला होता. ही दिव्य शोभा पहात पहात आम्ही शिखराखालच्या मुख्य गाभाऱ्यांत उच्च स्थानीं देदीप्यमान् देव्हाऱ्यावर उभी असलेली कुमारी मरीआमा हिच्यापुढें आलों. ही उंचीनें वीस वर्षांच्या कुमारीइतकी होती. रंग सांवळा, पोशाक अगदीं साधा व पायघोळ आणि चेहरा उदात्त पण सचिंत आणि उदास दिसत होता. हिनें डाव्या कडेवर लहानग्या येशूस घेतलें होतें. ह्या उतावळ्या अर्भकाचें वय केवळ १॥ वर्षांचें असून तो कांहीं केल्या आईच्या बगलेंत ठरत नव्हता, ती आई तशीच बालकाकडे अर्धवट दुर्लक्ष करून, त्याचें पुढें कसें होईल ह्याच विवंचनेंत तटस्थ उभी होती. इकडे पोरांलाही आईच्या चिंतेची पर्वा मुळींच नसून उलट त्याच्या गुबगुबीत गालावर हास्याचें कमल फुललें होतें ! ! त्याच्या डोईवर काट्यांचा सोनेरी मुकुट लकाकत होता. दीनोद्धारासाठींच जणू ह्या अचाट कीर्तीच्या लहान मूर्तीनें आईच्या कडेवरून पुढें झेंप टाकिली होती. ह्या मायालेंकरांच्या दोन्ही बाजूंस नंदादीपाच्या तेजाचें हजारों कारंजीं सतत वहात होतीं ! अशाप्रकारें ह्या दैवी गुणांचें हें मंगल प्रदर्शन पाहून मन आपल्या स्वाभाविक धर्मास अनुसरून सर्व मंगल गुणांचें जें मूळ त्यास आळवूं लागलें ! क्षणमात्र सात्त्विक वृत्तीच्या उच्च वातावरणांत विहार करून पुन: मानवी कृतीचें कौतुक करण्यास तें खालीं उतरलें. इतक्यांत १२ चा ठोका पडून चर्चमधील माध्यान्ह घंटा दणदणूं लागली. आम्हांला इतर ठिकाणें पहावयाची घाई होती म्हणून आम्ही देवळाच्या दुसऱ्या बाजूचीं चित्रें व पुतळे लगबगीनें पाहून बाहेर पडलों.

तुळजापूरची भवानी, सौंदत्तीची यल्लमा, कोल्हापूरची महालक्ष्मी इत्यादि जीं जीं कांहीं पुरातन हिंदु देवस्थानें पाहिलीं आहेत त्यांची सहजच आठवण होऊन मार्सेयच्या मरीआमाच्या देवळाचें त्यांच्याशीं साम्यभेद काय आहेत ह्याविषयीं मनांत विचार येऊं लागले. साम्य हें कीं हिंदु उपासकांस बारामाहे आणि आठी प्रहर आपल्या देवळांत मोठमोठ्या दिव्यांची आवश्यकता वाटते, तशीच येथेंही खिस्ती उपासकांस वाटत आहे. हिंदु आपल्या देवळांतील भिंतीवर रामरावणाचीं व कौरव पांडवांचीं चित्रें काढितो तर खिस्त्यानेंही येथें आपल्या भिंती चित्रविचित्र केल्या आहेत. हिंदु आपल्या देवळांत मुख्य स्थानीं झगझगीत देव्हाऱ्यावर पार्थिव मूर्तीची स्थापना करितो, तशी येथें खिस्त्यानेंही आपल्या उपास्य देवतेची मूर्ति उभी केली आहे. येथपर्यंत दोघांचें केवळ साम्य आहे. खिस्त्यानें हिंदूस हीदन, आयडॉलेटर (मूर्तिपूजक) इ. नांवें ठेवून कितीही हिणविलें तरी त्यानें येथें आपली आकारप्रियता पूर्ण व्यक्त केली आहे. ही उणीव एखाद्या विशिष्ट धर्मपंथाची अगर मनुष्यवर्गाची नव्हे, तर हिचें मूळ मानवी स्वभावांतच आहे. म्हण आहे कीं, वाघ्याचा पाग्या बनला तरी त्याचा यळकोट जात नाहीं ! त्याचप्रमाणें तिकडे पौरस्त्यानें आपल्यास पूर्ण ब्रह्मज्ञानी, अद्वैती इ० इ० जाडया संज्ञा देऊनही त्याच्या पाठीचा लिंगपूजा अद्यापि सुटली नाहीं; आणि इकडे पाश्चात्य पॅगनचा खिस्ती झाला तरी मूर्तिपूजा आणि विभूतिपूजा ह्यांनीं कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें त्यांस घेरलें आहेच.

असो; मला येथें मूर्तिपूजेच्या युक्तायुक्तेबद्दल विचार मुळींच कर्तव्य नाहीं, उलट बाह्य देखावा व आकृति ह्यांच्या साह्यानें ईश्वराकडे मन जास्त लवकर लागतें—निदान साधारण मनुष्यास तर हाच मार्ग योग्य आहे, हा जो मूर्तिपूजेच्या अभिमान्यांचा मोठा मुद्दा आहे तो मीं तर्त येथें गृहित धरून चालतों ! आणि मीं वर जे हिंदु व खिस्ती देवळांमध्यें साम्य दाखविलें आहे त्यावरूनही वरील मुद्यालाच बळकटी येते; पण पुढें ह्या दोन्ही देवळांत भेद काय आहे तो पहा. देवळांत मुख्य स्थानीं ज्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली असते त्याविषयीं विचार केला तर बराच भेद दिसून येतो. कित्येक ठिकाणीं मारुतीच्या, कित्येक ठिकाणीं गणपतीच्या, कित्येक ठिकाणीं भयंकर देवींच्या मूर्ती असतात. कांहीं ठिकाणीं शेंदूर आणि तेल ह्यांच्या थराखालीं व कांहीं ठिकाणीं बेढब वस्त्रालंकारांखालीं मूर्तीच्या मूळच्या रूपाचा लोप झालेला असतो. देवळाच्या भिंतीवरील चित्राकडे लक्ष गेलेंच तर तेथें गांवठी जिनगराचें कौशल्य झळकत असतें. चित्रांतील विषय पाहूं गेल्यास कोठें मारुतीनें कुंभकर्णाच्या डोक्यावर गदा मारिली आहे, तर कोठें कृष्णानें राक्षस

कवटाळलें आहे, कोठें महिषासुरवध तर कोठें रासक्रीडा इत्यादि प्रकार चाललेले असतात.

धर्मसाधनाचे बाबतींत चित्रकार व शिल्पकार ह्यांची मदत अगदीं अवश्यच वाटल्यास वाटो. पण ती घ्यावयाची झाल्यास सौंदर्यशास्त्री आणि नितिशास्त्री ह्यांच्या सल्ल्यानें तरी ती घ्यावयाला पाहिजेना ? विशेषतः जेथें केवळ साधारण जनसमूहाच्याच फायद्यासाठीं मूर्तीची योजना झालेली असते, तेथें तर अधिक काळजी घ्यावयाला पाहिजे. एकाद्या तिऱ्हाईतानें इकडचीं देवळें व त्यांतील मर्ती पाहिल्या तर तो मूळचा निराकारवादी असला, तरी कदाचित् मूर्तिपूजक होण्याची इच्छा करील. पण त्याच तिऱ्हाईतास आमच्या एका देवळांत नेलें आणि त्याच्यापुढें मूर्तिपूजेवर कितीही लांब व्याख्यान दिलें, तरी तो विषय त्याच्या मनांत नीटसा भरणार नाहीं. इतका मोठा भेद पडण्याचें कारण काय असावें बरें ? आमच्यांत कलाकौशल्य कमी आहे काय ? आम्हीं नीतीनें कमी आहों काय ? कां आमच्या पुराणांत, दंतकथांतून व इतिहासांतून उदात्त विषयांची वाण आहे ? छे; ह्यांपैकीं एकही गोष्ट वरील भेदाचें कारण असावें असें आमच्या शत्रूसही वाटणार नाहीं. श्री ख्रिस्ताच्या चरित्रांतील देखाव्याचें इकडे जसें प्रदर्शन केलें जात आहे, तसें तिकडेही श्रीकृष्णाच्या कांहीं कृत्यांचें प्रदर्शन करितां येणार नाहीं काय ? आपल्या भक्तांचे घोडे धुणें, उष्टीं काढणें, आपल्या भक्ताची जी दासी तिची वेणी घालणें, तिला द लागणें, इ० पवित्र प्रेमाचे मासले ज्या विभूतीसंबंधानें ऐकतों, तिचीच विडंबना जागोजागीं व वेळोवेळीं काव्यांतून व चित्रांतून होत आहे आणि ती धर्माभिमान्यांस खपत आहे ! गौतमबुद्धाचा स्वार्थत्याग, बाबा नानकाची सुधारणा, कबीराची सत्यप्रीति आणि तुकोबाची भक्ति इ० अनेक सुबोधपर विषयांची निवडणूक करून रविवर्म्यासारख्या मार्मिक चित्रकारांनीं त्यांवर आपलें चातुर्य खर्चिलें, तर आमच्या देवळांच्या सौंदर्यांत व पावित्र्यांत किती भर पडेल बरें ! पण अलीकडे जे नवीन नवीन धर्मांच्या नांवानें उत्सव निघूं लागले आहेत आणि त्यांत ज्या मूर्तींचें व चित्रांचें प्रदर्शन होत आहे, त्यावरून पाहतां आमच्याकडील मूर्तिपूजकांचें लक्ष्य ह्या गोष्टीकडे लागेल, ह्याचा कांहीं संभव दिसत नाहीं.

---

## लंडन शहर.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड,

ता० १०।१।१९०२.

आमच्या कॉलेजास नाताळची रजा मिळाल्याबरोबर ती लंडन येथें घालवावी म्हणून तिकडे निघालों. ज्या पाश्चात्य सुधारणेचे गोडवे आपण शाळांतून, कॉलेजांतून, ग्रंथांतून, गुरुमुखांतून ऐकतों–इतकेंच नव्हे, तर जें हें सुधारणाचक्र, खाऊन पिऊन घरीं स्वस्थ राम राम म्हणत बसणाऱ्या आमच्या साध्या भोळ्या राष्ट्रास आज सुमारें १०० वर्षें सारखें चाळवीत आहे त्याचीं कांहीं कळसूत्रें वरील अचाट शहरांत दिसतील तीं पहावीं असा एक हेतु निघतेवेळीं मनांत दडून राहिला होता. कारण, ऑक्सफर्डचें विद्यापीठ हें एक थोरलें आश्रम असल्यासारखें आहे. येथें विद्याव्यासंगाशिवाय दुसऱ्या कसल्याही भानगडीचें वारें नाहीं. आणि आधुनिक सुधारणारूपी चीज तयार होण्याची लंडनएवढी मोठी वखार तर जगांत दुसरीकडे कोठें नाहीं. तेव्हां निघतांना माझ्या मनांत वरील हेतु असणें साहजिक आहे. पण लंडन येथें गेल्यावर निराळाच प्रकार झाला ! सुधारलेल्या उद्योगी लोकांचें ५६ लाख वस्तीचें हें मुख्य शहर. ह्यांत प्रथम गेल्याबरोबर मानवी महासागरांत आपण जणुं गटंगळ्या खातों आहों कीं काय असें वाटूं लागतें ! आमच्याकडील पारमार्थिक कवींनीं भवसागराविषयींची आपली भीति वारंवार प्रदर्शित केली आहे. त्यांपैकीं एखादा जर ह्या साक्षात् भवसागरांत येऊन पडला, तर बिचाऱ्याची कोण त्रेधा उडून जाईल ! कुठल्याही रहदारीच्या रस्त्यांत गेल्याबरोबर स्त्री–पुरुषांच्या लाटांवर लाटा थडकत असतांना पाहून जगावर मनुष्यप्राणी फार सवंग झाला आहे, असें वाटतें आणि त्याविषयीं फारशी पूज्यबुद्धि राहत नाहीं. शेंकडों मंडळ्या, हजारों संस्था, अनेक भानगडी व असंख्य चळवळी, सार्वजनिक हिताकरितां चाललेल्या आहेत हें गाईडबुकांवरून कळतें. पण त्या

कोणत्या कोपऱ्यांत आहेत व त्यांचें ह्या जनसमूहावर काय कार्य घडतें, ह्याचा कांहीं बोध होत नाहीं. अशा स्थितींत माझ्या वरील हेतूची काय वाट झाली असावी, हें निराळें सांगावयास नको. शिवाय स्पेन्सरनें आपल्या ‘ समाजशास्त्राचें अध्ययन ’ ह्या ग्रंथांत लिहिलेलें आठवतें कीं कोणी एक फ्रेंच प्रवासी इंग्लंडांत येऊन आठ दिवस राहिल्यावर त्यास इंग्रजांविषयीं एक ग्रंथ लिहावा असें वाटून तो लिहूं लागला. एका महिन्यानें त्याच्या मतांविषयीं त्यालाच खात्री वाटेना. एक वर्षभर राहिल्यावर तर ग्रंथ लिहिण्याचें काम त्यानें अजीबात टाकून दिलें ! तात्पर्य विश्रांतीकरितां मिळालेल्या सुट्टीत नुसते तर्क लढविण्याची दगदग न करितां ह्या अक्राळविक्राळ शहरांत नजरेस पडतील ते चमत्कार मुकाट्यानें पाहण्याचा मीं निश्चय केला !

कार्थेज, केरो, बगदाद, रोम इ. जगाच्या इतिहासावर परिणाम घडविणारीं जीं प्रचंड शहरें झालीं, त्याच तोडीचें पण त्या सर्वांहूनही मोठें लंडन हें होय. आणि ह्याचा प्रताप हल्लीं कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें सर्व जगाला भोंवत आहे. लोकसंख्येच्या मानानें हें आस्ट्रेलिया खंडापेक्षां सव्वा पटीनें मोठें आहे. स्काटलंड व वेल्स ह्या दोहोंची लोकवस्ती मिळविली तरी इतकी होत नाहीं. २० वर्षांपूर्वी ह्याच्या भोंवतीं जीं खेडीं होतीं तीं आतां ह्यांतील रस्ते झाले आहेत. तरी अद्यापि हें वणव्याप्रमाणें आसमंतात् झपाट्यानें पसरत आहे. ह्या शहरांत वाहनांची जी अचाट योजना केली आहे, तिजकडे परकीयांचें लक्ष आधीं जातें. कांहीं आगगाड्या जमिनीवरून धांवतात, कांहीं उंच कमानीवरून हवेंतून धांवतात, तर कांहीं जमिनीखालून खोल बोगद्यांतून धांवतात. टेम्स नदीवरून आगबोटी तरंगतात, नदीवरील उंच पुलावरून एखादी आगगाडी पाखरासारखी फडफडते, तर पाण्याखालून एखादी सरपटते ! ह्याशिवाय ट्रॅमबे, आम्नीबस् व साध्या गाड्या ह्यांची तर रस्त्यांत खेंचाखेंची ! अगदीं नुकतीच एक सेंट्रल लंडन रेल्वे म्हणून ८० फूट खोल भुईंतून जाणारी विजेची गाडी झाली आहे. प्रत्येक स्टेशनावर उतारू लोकांस लिफ्टनें खालीं सोडतात व वर घेतात. आंतील स्टेशनावर प्रकाशाची व हवेची इतकी सुंदर व्यवस्था केली आहे कीं, वरच्यापेक्षां खालींच बरें वाटतें. तीन तीन मिनिटांनीं एक गाडी अकस्मात् पुढें येते आणि हजारों लोकांना घेऊन एका मिनिटांत पसार होते. ही परंपरा सकाळपासून रात्रीच्या १२ पर्यंत घड्याळांतील कांट्याप्रमाणें नियमानें चालू असते. लंडनच्या जमिनींत खालीं कोठें काय आहे हें सांगवत नाहीं. विजेच्या दिव्यांच्या तारा, धुराच्या दिव्यांच्या तोट्या, पाण्याचे बंब, मैल्याचीं गटारें आणि आगगाड्यांचे बोगदे ह्यांनीं सगळी जमीन मधमाशांच्या पोळ्याप्रमाणें पोखरली आहे. खालीं जमिनींत ही नकशी, तर वरतीं हवेंतून टेलिग्राफ व टेलिफोनचें जाळें पसरलें आहे. जागजागीं टेलिफोनचीं ठिकाणें आहेत. त्यांतून जरूरीचे निरोप जाऊन लगेच उत्तर येतें; अगर दोघांचें संभाषण चालतें. ह्याप्रमाणें लंडन नांवाचें २००।३०० चौरस मैल क्षेत्रफळाचें एक सावयवी शरीर आहे !

इंग्लंड हें बोलून चालून व्यापाऱ्यांचें राष्ट्र-अर्थात् त्याचें मुख्य शहर म्हणजे सर्व जगाचें एक भलें मोठें मार्केट. तेव्हां त्यांतील दुकानें पहाण्यासारखीं असतील ह्यांत नवल काय ? माल तर मोहक खराच. पण तो दुकानांत मांडून ठेवण्याची ढब त्याहून मोहक. आमच्याकडील दुकानदार आपल्या मालाचे ढिगाचे ढीग दुकानांत लपवून ठेवून आपण दाराशीं येऊन बसतात. एखाद्यास वाटावें हे जणूं रखवालीच करीत आहेत. इकडे कांहीं निराळाच प्रकार: दुकान म्हणजे एक जंगी पारदर्शक पेटी—अथवा पदार्थसंग्रहालय—अगर एक लहानसें प्रदर्शनच. रस्त्यांतून धांवतांना देखील दुकानांतील सर्व जिन्नस किंमतीसहित दिसतील. हिंदुस्थानांत मागें एकदां प्रदर्शनाकरितां मेणाचे सुंदर पुतळे आणले होते, तसले पुतळे येथें प्रत्येक कापडवाल्याच्या दुकानांत उभे केलेले असतात. आणि त्यांवर दुकानांतील पोशाकाचे मासले चढविलेले असतात. पुतळ्यांकडे पाहून पोशाक घेण्याची इच्छा सहजच होते. काळोख पडल्यावर प्रत्येक पदार्थाजवळ एक एक विजेची बत्ती चमकूं लागते. दुकानावरच्या ज्या पाट्या आणि जाहिराती दिवसा शाईनें लिहिलेल्या दिसतात, त्या रात्रीं दिव्यानें अधिक स्पष्ट दिसतात आणि दुकानांस अधिकच शोभा येते. जाहिरातीनें तर इतका कहर उडवून दिला

आहे कीं पहावें तिकडे अक्षरें, चित्रें आणि पुतळे हींच दिसतात. कित्येक हालतात, कित्येक लकाकतात, तर कित्येक वारंवार आपला रंग बदलतात! शहरास कंटाळून बाहेर पडलों, तर शेतांतून व पिकांतूनही जाहिराती दिसाव्यात काय? भुई खालच्या विजेच्या गाडीकडे जाण्यास मी एकदां लिफ्टमधून खालीं उतरत असतांना माझी नजर काळोखांतून सहज भुयाराच्या भिंतीकडे गेली. तितक्यांतच लिफ्टच्या उजेडामुळें भिंतीवर एक जाहिरात दिसली!! अशा या मायावी लोकांपुढें व्यापारांत आमचा टिकाव कसा लागेल!

नुसत्या भपक्या–भपक्यानेंच यांचा व्यापार इतका वाढला आहे, असें म्हणणें केवळ भ्रममूलक आहे. अनियंत्रित व्यापार आणि कायदेशीर स्पर्धा ह्या तत्त्वाचा ह्या लोकांवर असा फायदेशीर परिणाम झाला आहे कीं गिऱ्हाइकांशीं बेशिस्तपणा, आडदांडपणा, बेविश्वास अगर किंमतींत अफरातफर केल्यास व्यापारी आपलें भांडवल लवकरच गमावून घेईल. आपल्या पेढीची कोणत्याही प्रकारें बदनामी होऊं नये इतकेंच नव्हे, तर लहान थोर दर्जाच्या कसल्याही गिऱ्हाईकाचें क्षुल्लक बाबतींतही मन दुखवूं नये म्हणून दुकानदार हरएक प्रयत्न करीत असतात. एकंदरींत सौंदर्य, बुद्धि आणि नीति ह्या तीनही मुख्य तत्त्वांचीं समान सांगड घालून दीर्घोद्योग व अचाट धाडस व निश्चळ श्रद्धा ह्यांच्या पायांवर ह्या लोकांनीं आपल्या व्यापार-शास्त्राची इमारत उभारली आहे म्हणन लंडन शहरास हल्लींचें वैभव आलें आहे!

हे लोक स्वार्थी आहेत, सुखार्थी आहेत, जड-वादी आहेत इ० समज पुष्कळ शहाण्या लोकांचेही होतात. आणि इकडे आल्यावर ह्यांचें वैभव, ह्यांची चैन, आणि फॅशन्स पाहून हेच ग्रह कायम होण्याचा पुष्कळ संभव आहे. इकडील बाजारांतील एक-चतुर्थांश तरी माल निव्वळ चैनीचा आहे असें दिसेल. परवां ‘ खिस्तमसबजार ’ ह्या नांवाचें केवळ नाताळाकरितां एक जंगी दुकान पिशांडण्यांत आलें होतें; त्यांत तळघरापासून तों वर ...मजल्यांपर्यंत लहान मुलांस नाताळांत नजर करण्याचीं खेळणीं मांडन ठेविलीं होतीं. हें लाखों रुपयांचें दुकान पाहून मला वाटलें कीं इंग्लंडांतील लहान मुलांनीं जर नुसतीं आपलीं खेळणीं विकलीं तर हिंदुस्थानांतील दुष्काळपीडितांचे प्राण वांचतील! असो, तो भाग वेगळा. पण पाश्चात्य सुधारणेचें सर्व रहस्य केवळ चैनींतच नाहीं. जगांत राहून सुख भोगण्याची अत्यंत लालसा ह्या लोकांस आहे हें खरें. पण, पृथ्वीवर राहून आकाशांतील स्वर्गाकडे उडी न घेतां येथेंच स्वर्ग उतरविण्याची ह्यांची दिशा आहे. हे लोक स्वार्थी आहेत हें तर खरेंच. पण स्वार्थ साधल्याबरोबर परमार्थास ते कसे लागतात, हें आम्हांस समजन घेणें आहे. असो. आज इकडील भौतिक प्रकार सांगितला. पुढें साधल्यास एक दोन बौद्धिक आणि नैतिक मासले सांगेन.

---

## ब्रिटिश म्युझियम.

मँचेस्टर कॉलेज ऑक्सफर्ड.

ता. ७–२–१९०२

‘ कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी. ’

ह्या विपुल पृथ्वीवर निरवधि कालांतून ज्या अनेक सुधारणांचा आजवर अवतार झाला आणि समाप्ति झाली, त्या सर्वांवर शिरोमणि होऊन बसलेली जी आधुनिक सुधारणा तिच्या साम्राज्याखालीं आम्ही आहों. जगाच्या इतिहासांत ज्यांनीं हजारों वर्षें आपले प्रताप गाजविले, अशा गत सुधारणांपैकीं कांहींचे हल्लीं फार थोडे अवशेष राहिले आहेत. कांहीं नुसत्या नामशेष झाल्या आहेत; आणि कांहींचा तर विस्मृतीच्या अभेद्य अंधार पटलांतून अद्यापि पत्ता लागला नाहीं. मागील सुधारणा जगाच्या रंगभूमीवरील एकेका कोपऱ्यांत आपापले प्रकाश पाडून अस्तास गेल्या; पण हल्लींचा सुधारणा–सहस्ररश्मी सर्व भूगोलावर आपला प्रकाश पाडन वरतीं तारामंडळांत चंद्र, मंगळ इत्यादि खगोलांकडे आपलीं किरणें सोडीत आहे. तथापि आमचे डोळे दिपून जाऊं नयेत. स्वकालीन सुधारणेविषयीं पक्षपात घडून अंगीं स्वयं-मन्यता शिरूं न दिली पाहिजे. कालचक्राच्या वाढत्या कलेकडे नजर दिली असतां, शास्त्र, कला, वाङ्मय इ० बाबतींत मागच्यांत न सांपडणारा असा एकादा जाज्वल्य विशेष गुण आधुनिकेंत आहे, असें जरी म्हणतां येत नाहीं,

तरी एक भेद फार लक्षांत ठेवण्यासारखा आहे. मागील सुधारणांचा प्रदेश आकुंचित होता; इतकेंच नव्हे, तर त्यांस परस्परांची खबरच नव्हती. ऐतिहासिक-प्रवृत्ति आणि तुलनात्मक शास्त्रीय पद्धति हे दोन गुण हल्लींप्रमाणें व हल्लींच्या प्रमाणानें मागें नव्हते, असें म्हटल्यास आत्मस्तुतीचा विशेष दोष घडेल असें वाटत नाहीं. ह्या प्रभेदाचें मूर्तिमंत स्वरूप पहावयाचें झाल्यास वर निर्दिष्ट केलेलें ब्रिटिश म्युझिअम हें अत्यंत उत्तम स्थान आहे. तर तें आपण पाहूं या.

लंडन शहराचे मध्यभागीं ब्लूमसबरीमध्यें ब्रिटिश म्युझिअमची विशाल इमारत आहे. इमारत अत्यंत सुंदर व त्याहूनही अफाट आहे खरी; पण तिच्याकडे पहाण्यास व तिचें मोजमाप घेण्यास आपणांस सध्यां वेळ नाहीं, तर आपण थेट मध्य दालनांत जाऊं या. अगणित पैसा अगदीं पाण्याप्रमाणें ओतून ह्या लोकांनीं जें हें विचित्र आणि विविध विषयांचें अदृष्टपूर्व संग्रहालय करून ठेविलें आहे, ह्याचा हेतु केवळ चार रिकामटेकड्यांनीं येथें सहज वाट चुकून येऊन आपल्या आळसावलेल्या मनाची चार घटका करमणूक करून घ्यावी एवढाच असेल, अशी कल्पना देखील मनांत आणूं नका. उलट ते पहा, मोठमोठे प्राचीन इतिहासशास्त्री, शोधक, लेखक, पंडित एकेका कोपऱ्यांतून एकाद्या पदार्थाकडे किती खोल दृष्टीनें टक लावून पहात आहेत ! तर आपण त्यांस कसलाही त्रास पोहोंचूं नये म्हणून पाऊल न वाजवितां हळूच आंत शिरूं या. चित्त वेधून जाऊन अंतःकरण तल्लीन होणें ही खरोखर ज्ञानप्राप्तीच्या वेळेची स्वाभाविक अवस्था होय. अगदीं लहान मुलें अशींच विनभ्रमानें पण मोठ्या कौतुकानें मानवी ज्ञानाचा मोठ्या महत्त्वाचा भाग केवळ पूर्व वयांतच शिकतात. तशांतलाच कांहींसा (प्रकृतीच्या मानानें अर्थात् कमी-जास्ती) प्रकार आपलाही येथें होईल, करमणूक तर होईलच होईल. पण नकळत ज्ञानप्राप्ति काय झाली, तें आपल्यास बाहेर पडल्यावर कळेल.

आतां आपण मध्य दालनांत उभे आहों. सभोंवतीं प्रागैतिहासिक कालाचा देखावा पसरला आहे. ह्या कालाचे मुख्यतः चार भाग होतात. १ ला. Palaeolithic age) पूर्वपाषाणयुग. ह्या पहा आमच्या पूर्वजांच्या सांपडलेल्या कांहीं अत्यंत जुन्या वस्तु आमचे बंधु जे इतर प्राणी त्यांच्यापासून आमचे पूर्वज येथें नुकतेच विभक्त झाले आहेत. संसारयात्रेंत अगर जीवनकलहांत त्यांनीं आपल्या शरीराबाहेरचीं प्रथम जीं उपकरणें उपयोगांत आणिलीं तीं हत्यारें हीं होत. अर्थात् हीं दगडाचींच असावयाचीं. हीं नदीच्या प्रवाहांतून व गुहांतून सांपडलीं आहेत. कारण आम्ही त्यावेळीं गुहांतूनच राहत होतों. हीं हत्यारें किती वेडीं वांकडीं ओबडधोबड आहेत ! त्यांतच पहा कांहीं लहान मोठीं हाडें मिसळून ठेविलीं आहेत. तीं हल्लीं लुप्तप्राय झालेल्या त्यावेळच्या पाण घोड्यांचीं व सांबरांचीं असावीत. हे लोक इंग्लंडांत व वेल्समध्यें कोणकोणत्या प्रदेशांत रहात होते, हें दाखविण्यासाठीं तो पहा भिंतीवर त्या वेळचा इंग्लंडचा नकाशा टांगला आहे. आम्ही त्यावेळीं भांडीं वापरीत होतों कीं नाहीं, तें सांगतां येत नाहीं. तसेंच आमच्या हत्यारांस मुठीही नाहींत. थोडेंसे पुढें चला, तुम्हांला मुठी दिसतील. शेवटीं येथें पहा किती सुंदर हस्तीदंती व शिंगटांच्या मुठींत हीं कत्यारें बसविलीं आहेत. ह्या मुठींवरून त्या त्या प्राण्यांचीं किती हुबेहुब चित्रें उठविलीं आहेत. हीं ह्या युगांतलीं नव्हत बरें ! ही पहा ह्या मोठ्या तावदानाच्या पेटींत आमच्या राहत्या गुहेची तळजमीन, जशीच्या तशीच आणन ठेविली आहे. ही फ्रान्सांत सांपडली.

२ रा. ( Neolithic Age उत्तर-पाषाणयुग. येथील हत्यारें चांगलीं घासलेलीं पुसलेलीं पाणीदार आहेत. ज्या प्राण्यांचीं हाडें येथें दिसतात, त्यांपैकीं कांहीं अद्यापि सांपडतात. येथें पहा कांहीं हत्यारें करण्याचे कारखाने सांपडले आहेत. कारण येथें अर्धवट बनविलेलीं पुष्कळ हत्यारें व हत्यारें बनविण्याचीं कांहीं यंत्रें व सामान सांपडलें आहे. तसेंच येथें थडग्यांत सांपडलेलीं कांहीं भांडीं आहेत, बहुतकरून आंत मृतांची राख असावी.

३ रा. (Bronze age) कांशाचें युग. इतक्या प्राचीन काळीं लोखंडाच्याही पूर्वी ही मिश्र धातु कशी आढळते, हा एक चमत्कारच आहे. येथें

भांड्यांत व हत्यारांत पुष्कळ सुधारणा झाली आहे त्यांचे कट्यारें, कोयते, सुऱ्या, बर्च्या, तरवारी इ. अनेक प्रकार आढळतात. तसेंच हे पहा सोन्याचे दागिने. पण रुपें मात्र अद्यापि नाहीं सांपडलें. ती पहा भिंतीवर टांगलेली कांशाची सुरेख ढाल. तशाच येथें कांशाचीं हत्यारें बन विण्याच्या कितीतरी मुशी जमा करून ठेविल्या आहेत! इकडे पहा स्विट्झरलंड व सव्हाय ह्या देशांतील सरोवरांच्या मध्य भागीं पाण्यांत डांब रोवून त्यावेळीं बांधलेल्या घरांचे कांहीं अवशेष ठेविले आहेत. ही चटकन् पाहिजे तेव्हां माघे घरतां यावेत म्हणून केलेली योजना बरें! ह्यावरून युरोपांतील पूर्वीच्या लोकांची रहाटी कशी होती तें कळतें. ह्या घरांचे अवशेष आतांपर्यंत जसेच्या तसेच कसे राहिले, ह्याबद्दलचा चमत्कार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे, तो हाः—हीं घरें आगीनें जळून ह्यांतील धातूचें व दगडांचें सामान पाण्यांत बुडून व चिखलांत रुतून शोधकांस सुरक्षित सांपडलें आहे. प्रथम आगीची क्रिया घडल्यावर तावडतोब पाण्याची क्रिया घडून वर चिखलाचें दाट दडपण पडल्यावर मग त्यास वज्रलेपच झाला म्हणावयाचा!

४ था. (Early Iron age) लोखंडी युग. ह्यांत आपल्यास माहीत असलेले बरेच पदार्थ आहेत शिवाय आपण इतिहासाच्या अगदीं जवळ येऊन भिडलों तर दुसरीकडे जाऊं या. हे पहा अंदमान आणि निकोबार बेटांतील रानटी माणसांचे हाडाचे दागिने व हार. हीं हाडें ह्यांच्या आप्तांची आहेत. हीं वापरल्यानें कित्येक आजार बरे होतात, अशी ह्यांची कल्पना आहे. येथें भयंकर मुखवटे ठेविले आहेत. रोग्यांस बरें करण्याकरितां सिलोनांतील पंचाक्षरी हे मुखवटे आपल्या डोक्यावर घालून नाचत असत. रामबाण उपाय! दुसऱ्या बाजूस आस्ट्रेलिया व आसपासच्या बेटांतील कांहीं विक्षिप्त मुखवटे ठेविले आहेत. हे घातले असतां त्यावेळीं पारधींत हटकून यश येत असे! इकडे हे वैसान बेटांतील देवाच्या मूर्ति, झगे व अक्राळ विक्राळ पिसांचे मुकुट ठेविले आहेत, ते पहावत देखील नाहींत! तसेंच मिशनरींनीं दक्षिण पासिफिक महासागरांतील दूरदूरच्या बेटांतून आणिलेल्या अनेक मूर्तीचा व चमत्कारिक पदार्थांचा बहुमोल संग्रह करून ठेविला आहे.

आतां अमेरिकन दालनांत चला. उत्तर अमेरिकेंत वर अगदीं थेट सरोवरापर्यंत अगदीं प्राचीन काळीं देखील भांडीं होतीं असें दिसतें. दगडांचीं हत्यारें व भांडीं ह्यांचें प्राचीन युरोपच्या मासल्याशीं किती साम्य आहे पहा! येथील प्राचीनांना तांब्याशिवाय दुसरी धातु माहित नव्हती. त्याचीं घडींव भांडीं थडग्यांतून व जुन्या इमारतीच्या पायांखालीं सांपडलीं आहेत. हीं पहा शिंपांचीं नाणीं, गारेच्या बर्च्या, बाणांचीं टोकें—आणि विसरूं नका-तंबाकूच्या चिलमी तावदानांत सुरेख मांडून ठेविल्या आहेत. पण ह्या नव्या जगाचा जुन्या जगाशीं पूर्वी कधीं काळीं कसला तरी संबंध होता कीं नाहीं हें कोडें अद्यापि उकललें नाहीं.

इतका वेळ पाहिलेल्या गोष्टींवरून प्रागैतिहासिक सुधारणांची थोडी तरी कल्पना तुमचे मनांत आली असेल. आतां आपण ऐतिहासिक कालाकडे वळूं या. ह्या ठिकाणी मिसर, आसिरिया, बाबिलोनिया, ग्रीक, रोमन इत्यादि गतराष्ट्रांच्या सुधारणांचे अवशेष राखून ठेविले आहेत. हीं ह्या सुधारणांचीं जणूं प्रेतेंच आहेत! कांहींचे बरेच भाग शाबूत आहेत. कांहीं काळरूपी गिधाडानें अगदीं छिन्नविच्छिन्न करून टाकिलीं आहेत. ही पहा इजिप्शियन ग्यालरी. आपण वेदांस अति प्राचीन मानितों, किंबहुना जगाच्या सुधारणेस येथूनच आरंभ झाला असें म्हणतों. इतकेंच नव्हे तर वेद अनादि आहेत असें मानण्यापर्यंतही आमची मजल जाते. पण ह्या बाबतींत ज्यांनीं परिश्रम केले आहेत ते वेदांस खिस्ती शकापूर्वी १५०० वर्षांपेक्षां अधिक मागें नेत नाहींत. त्यांचें म्हणणें खरें असेल तर आम्हांपासून वेदांचा उदय जितका दूर आहे, तितकाच जवळ जवळ इजिप्शिअन सुधारणेचा उदय वेदांपासून मागें दूर आहे असें म्हणावें लागतें. कारण खिस्तीशकापूर्वी ४५०० वर्षांच्याही मागचे इजिपशिअन लेख आणि राखून ठेविलेलीं प्रेतें आढळतात. इजिप्तच्या प्राचीन इतिहासांत जे राजे झाले त्यांचीं एकंदर तीस घराणीं आहेत. ह्यांनीं इ. स. पूर्वी ४४००—३४० पर्यंत राज्य केल्याचे लेख आढळतात. प्राचीन शाही (इ. स. पूर्वी ४४००-२४६५) मधली शाही (इ. स. पूर्वी २४६५—१२००)

नवी शाही ( इ. स. पूर्वी १२००–३४० ) असे ह्याचे भाग पडतात. पहिल्या तीन घराण्यांतील राज्यांची नुसत्या नांवापलीकडे कांहीं माहिती मिळत नाहीं. चौथ्या घराण्यानें आपल्या वैभवाचीं कायमचीं स्मारकें करून ठेविलीं आहेत. दुसरा राजा खुफु ( इ. स. पूर्वी ३७३३–३७०० ) ह्यानें गीझे येथील (Great Pyramid) मोठा मनोरा बांधिला. त्याचे कांहीं दगड उत्तरेकडील खोलींत ठेविले आहेत. पहिल्या खोलींत कालानुक्रमानें ममी व ममीच्या पेट्या मांडून ठेविल्या आहेत. ममी म्हणजे इजिप्शिअन लोकांनीं पुरातन काळीं अनेक प्रकारचे मसाले तयार करून त्यांत सुरक्षित स्थळीं राखून ठेविलेलीं प्रेतें होत. ह्या लोकांमध्यें ही चाल इ. स. पूर्वी ४५०० ( कदाचित् ह्यापेक्षांही पूर्वी ) वर्षांपासून इ. स. नंतर ५०० वर्षांपर्यंत होती. निजलेल्या मनुष्याचा आत्मा जसा पुनः परत येतो तसा मृत शरीरांतही आत्मा परत येणार आहे अशी ह्या लोकांची समजूत होती. म्हणून इतके श्रम करून व अकल खर्चून ते आपल्या नातलगांचीं प्रेतें जपून ठेवणें हें आपलें कर्तव्य मानीत. ममी करण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा होत्या. प्रेताचीं आंतडीं बाहेर काढून एका घटामध्यें घालून त्याच्या शेजारीं ठेवीत, आणि प्रेतास प्रथम अनेक प्रकारच्या क्षारांचे आणि अत्तरांचे लेप देऊन वर सुरेख तागाच्या पट्ट्यांनीं त्यास लपेटीत. कधीं कधीं ४०० यार्ड लांब पट्ट्या लागत असत ! गुंडाळतांना प्रेतास सपशेल उताणें निजवीत. ममी तयार झाल्यावर त्यास त्याच्याच आकाराच्या लांकडी अगर दगडी पेटींत घालून ती बंद करीत; वरतीं रंग देऊन प्रेताचें चित्र काढीत, व लेख खोदीत. बऱ्याच पेट्यांवरचा रंग व चित्रें अद्यापि जशींच्या तशींच आहेत पिवळा रंग हा ह्यांचा मोठा आवडीचा दिसतो.

इजिप्शिअन लोकांचीं अत्यंत पुरातन थडगीं म्हणजे मास्टाबा अथवा पिरामिड (मनोरे) हे होत. खालीं प्रथम देवळाच्या आकाराची एक खोली करून तिच्या एका भागांत मयताची मूर्ति बसवीत. तिच्याच खालीं जमिनींत तळघर करून त्यांत त्याची ममी ठेवीत. कित्येक ठिकाणीं खडकांतून अशीं पुष्कळ घरें खोदून त्यांत एका कुटुंबांतील अगर घराण्यांतील सर्व ममींची योजना केली जात असे. ह्या घरांच्या भिंतींवरून मयताच्या करमणुकीसाठीं त्याच्या चरित्रांतील घरगुती आणि सामाजिक प्रसंगांचीं सुंदर चित्रें काढीत. उत्तरेकडील दालनांत ह्या भिंतीवरचे पदर चित्रांसकट जसेच्या तसेच काढून लाविले आहेत ते पहा, म्हणजे ५।६ हजार वर्षांपूर्वीची इजिप्शिअन राहाटी तुम्हांला कळेल. त्याच भिंतीवर ' एबिडॉस ' ची फळी लाविली आहे, तिच्यावर इ. स. पूर्वी ४४००–१३३३ पर्यंतच्या सर्व राजांचीं नांवें कोरलीं आहेत. हा एक फार महत्वाचा ऐतिहासिक देखावा आहे. तसेंच मयतासाठीं त्याच्या जवळ मद्य, खाद्य व आंगाला लावण्यास उटी वगैरे जरूरीचे पदार्थ निरनिराळ्या पात्रांत भरून ठेविलेले असत. नंतर ४ च्या खोलींत कित्येक सुंदर खुजे, पेले, वाडगे ठेविले आहेत. कित्येकांवर त्यांच्या मालकांचीं अगर तत्कालीन राजांचीं नांवें आहेत. ह्यापैकीं जेव्हां कांहीं पात्रें सांपडलीं तेव्हां अद्यापि त्यांतील पदार्थ द्रवस्थितींत सांपडला ! ह्याशिवाय मयतांच्या आवडीचीं वाद्यें व इतर जिनसा आणि त्याच्या नातलगांच्या व मित्रांच्या देणग्याही सर्व ते आपल्या जवळच ठेवीत. मेन–काऊ-रा नांवाच्या न्यायी आणि दयाळू राजाच्या ममीवर पुढील शब्द लिहिले आहेत:—'ऑसिरिस, उत्तर दक्षिणाधिपति चिरंजीव, स्वर्गोत्पन्न " दैवी चमत्कार " ह्या रूपानें तुझी आई नट ही तुजवर पसरली आहे, हे मेन-काऊ रा तूं अजात शत्रु देव होशील असा तिनें आशिर्वाद दिला आहे.' ह्या खोलीच्या शेवटीं अखेरच्या न्यायप्रसंगाचें चित्र दाखविलें आहे तें पहाण्यासारखें आहे. वर सर्व देव आपापल्या दर्जाप्रमाणें न्यायासनावर बसले आहेत. त्यांच्यापुढें मयत जो अनी त्याच्या अंतःकरणाचें ( conscience ) वजन करण्याचें काम चाललें आहे. एका पारड्यांत एक लहानसें पीस ठेविलें आहे. व दुसऱ्यांत अनीचें अंतःकरण आहे. हलक्या पिसाशीं तुलना होणार मग अर्थात् न्याय कसोशीनें होईल ह्यांत शंका नाहीं. ॲन्युबीस तराजू पारखीत आहे. समोर विधी उभा आहे, मागें नशीब व जन्मदेवता अगर सटवाई उभीं आहेत, डावीकडे स्वतः अनी नम्रपणें उभा आहे, उजवीकडे थॉत् निकाल नमूद करीत आहे. पाठीमागें आमिमाईड राक्षस

गिळण्यास टपला आहे. त्याचें डोकें सुसरीचें, मध्यभाग सिंहाचा आणि मागील बाजू गेंड्याची आहे. हा देखावा पाहून जो पाप करील तो मात्र खरा निगरघट्ट म्हणावयाचा !

तिसऱ्या खोलींत कांहीं जनावरांच्या ममी करून ठेविल्या आहेत, बैल, सुसर, कुत्री, माकडें इ. प्राणी देवादिकांना फार प्रिय झाल्यामुळें, कालां तरानें ते स्वतःच पूज्य होऊन बसले, अर्थात् त्यांच्याही ममी करणें भाग पडलें. कानडी मुलखांत जसें 'बसवण्णाचें' फार माहात्म्य आहे तसें इजिप्तची पहिली राजधानी मेंफिस् येथें ऍफिस् बैलाची मोठ्या थाटाची पूजा होत असे. ज्यू लोकांच्या सैन्याच्या वासराची उत्पत्ति ह्या ऍफिसपासूनच झाली असावी.

असो; ह्याप्रमाणेंच असिरियन, बाबिलोनियन, ग्रीक, रोमन, फिनिअन व एट्रुस्कन वगैरे राष्ट्रांचें गतवैभव येथें साक्षात् दिसत आहे. तसेंच निरनिराळ्या दालनांतून हिंदु, बौद्ध, खिस्ती, महमदी व यहुदी धर्मांचें प्रदर्शन केलें आहे. आमच्या तेहतीस कोटी देवता, पुराणांतील कथाप्रसंग, पूजेचें संभार, तुलसीवृंदावनें आदिकरून हिंदु धर्मांचीं सौम्य, मधुर, उग्र, अशीं सर्व स्वरूपें येथें एके ठिकाणींच दिसतात. ह्या प्रकारें आपण प्रागैतिहासिक कालांतून प्राचीन कालांत व प्राचीनांतून अर्वाचीनांत हिंडतां हिंडतां शेवटीं खालच्या अवाढव्य पुस्तकालयांत उतरतों. हा जगांतील एक अत्यंत मोठा ग्रंथसंग्रह. येथें केवळ छापील पुस्तकांची संख्या वीस लक्षांवर आहे. हस्तलिखित पुस्तकांत हिंदु, आरबी, फारशी, चिनी, जपानी, इ० ५०,००० प्रतींचा संग्रह आहे. चिनांत छापण्याची कला कशी उद्भवली व नंतर तेथें आणि दुसरीकडे तिचा हळु हळु कसा विस्तार झाला, हें दाखविण्यासाठीं त्या त्या काळाचीं छापील बुकें अनुक्रमें लावून ठेविलीं आहेत. पंधराव्या शतकापासून तों अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत पुस्तक बांधण्याच्या कलेचा कसा विकास झाला, हें दाखविण्याकरितां शेवटच्या सहा कपाटांत निवडक बांधणीचीं मोठमोठीं पुस्तकें जुळवून ठेविलीं आहेत. मध्यभागीं सहा कपाटांत इ• स• पूर्वी २•• वर्षांपासून तों इ० स० नंतर १५०० वर्षांपर्यंत लेखनकलेचा इतिहास दाखविण्याकरितां त्या त्या काळच्या हस्तलिखित प्रति अनुक्रमें मांडून ठेविल्या आहेत. प्राचीन काळीं ईजिप्त देशांत पेपिरस नांवाच्या बोरूच्या झाडाच्या सालीचा एक प्रकारचा कागद बनवीत असत. ईजिप्तचे प्राचीन लेख ह्याच कागदावर लिहिले आहेत. सर्वांत जुना उपलब्ध लेख इ. स. पूर्वी ३५०० वर्षांचा आहे !........ ह्याशिवाय वर्तमानपत्रें आणि मासिकें ह्यांची एक निराळी खोली आहे. नवीन होणाऱ्या पुस्तकांचा ह्या संग्रहांत समावेश व्हावा म्हणून संयुक्त राज्यांतील प्रत्येक प्रकाशकानें आपल्या नवीन पुस्तकाची एकेक प्रत एडिंबरोची लायब्ररी, आणि ब्रिटिश-म्युझीयम येथें पाठवावी, असा पार्लमेंटानें सक्तीचा कायदा केला आहे. ह्या प्रकारें म्यूझिअम पाहून दारांत आल्यावर तोंडांतून आपोआप उद्गार येतो कीं कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी.

---

## लंडन येथील बालहत्यानिवारक गृह.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड,

ता. ७।३।१९०२.

ह्या अफाट शहराच्या मध्यभागीं गिल्डफर्ड रस्त्यांतून एके दिवशीं जात असतां एक भव्य व जुनी इमारत दिसली. तिचे दारावर लिहिलेलें वरील नांव वाचून मला आंत जाण्याची इच्छा झाली. पण सोमवारींच हें गृह प्रेक्षकांकरितां उघडें असतें म्हणून एका सोमवारीं ओळखीचें पत्र वगैरे मुद्दाम कांहीं न घेतां बरोबर एका सोबत्यास घेऊन पहावयास गेलों. रस्त्यांतील फाटक ओलांडल्यावर विस्तीर्ण आणि स्वच्छ पटांगण लागलें. त्यांतून चिटणीसांचे कचेरींत गेल्यावर आम्हांला सर्व गृह हिंडून दाखविण्याकरितां आह्मांबरोबर एका चौदा वर्षांच्या हुषार मुलास दिलें. ह्या छोकऱ्यानें आम्हांस मोठ्या व्यवस्थेनें चित्रांची खोली, कमिटी बसावयाची जागा, म्युझिअम ई० दाखविल्या आणि प्रत्येकाची थोडक्यांत चटकदार माहिती दिली. कमिटीच्या खोलींतील एका मोठ्या सुंदर तसबिरींत खिस्ताजवळ कांहीं लहान लहान मुलें खेळत होतीं, तिचे खालीं हें सोन्याचें वाक्य बायबलांतून लिहिलें होतें. 'लहानग्यांस मजकडे

येऊं द्या; कारण अशा करितांच देवाचें राज्य आहे.' चित्रांच्या खोलींत हँडल आणि हॉगर्थ ह्यांचीं प्रख्यात चित्रें ठेविलीं होतीं. म्युझिअममध्यें कित्येक मिशनऱ्यांकडून मुलांस नाताळानिमित्त बक्षिसें देण्यास पुस्तकें व इतर चिजा मिळालेल्या मांडून ठेविल्या होत्या. मध्यभागीं एका गोल टेबलावर कोणा एका मोठ्या एडिटरानें दिलेल्या बाहुल्या, फुलें, माळा, खेळणीं, कोनाकृति रचून ठेविल्या होत्या. ह्यानंतर आमच्या चिमुकल्या वाटाड्यानें आम्हांस भोजनगृहांत नेलें. १०० मुलें रांगेनें दोन्ही बाजूनें बसतील असें एक लांब टेबल होतें. ५।७ मुलें नाताळासाठीं भोजनगृह सुशोभित करण्यांत अगदीं गर्क झालीं होतीं. तीं सर्वच आम्ही आंत गेल्याबरोबर आम्हांजवळ आनंदानें हांसत हांसत आलीं. भिंतीवरच्या एका फळीवर जाड अक्षरांनीं लिहिलेलीं १०–१२ नांवें आम्हांला मोठ्या अभिमानानें दाखविण्यांत आलीं. तीं नांवें दक्षिण आफ्रिकेच्या लढाईंत ब्यांड वाजविण्यास नुकतेच पाठविलेल्या ह्यांच्या बंधूंचीं होतीं. एका पोटीं जन्मलेल्या भावांमध्यें देखील क्वचित् बाबतींत असा अभिमान आढळणार नाहीं! ह्याच खोलींत एका कोपऱ्यांत मुलांच्या लक्षांत सहज भरतील, अशा रीतीनें मोठमोठ्या आश्रयदात्यांचीं नांवें लिहिलीं होतीं.

एकंदर आश्रमाचे तीन भाग केले आहेत. ७ पासून १२ वर्षांच्या मुलांचा एक भाग. ७ पासून १५ वर्षांच्या मुलींचा दुसरा भाग. आणि ३ पासून ७ वर्षांच्या लहान मुला–मुलींचा तिसरा भाग. ह्यास अनुलक्षूनच इमारतीच्या दोन उभ्या बाजू आणि मधली आडवी रांग अशी योजना केली आहे. एका बाजूस मुलांची खालीं जेवणाची जागा, वरतीं निजण्याची जागा व मागें शाळा आणि दुसऱ्या बाजूस तशीच मुलींची व्यवस्था केली आहे.त्यांस एकमेकांत मिसळण्याची सक्त मनाई आहे.

नंतर आम्ही शाळेंत गेलों. एकंदर १०० मोठ्या मुलांचे वयाचे मानानें तीन वर्ग केलेले आहेत. तिन्हींचा अभ्यास चालला होता. मुख्य अध्यापकानें सांगितलें कीं मुलांकडून शाळेंतील अभ्यास अर्धा वेळ करून घेऊन बाकीच्या वेळांत त्यांस कसला तरी धंदा आणि विशेषेंकरून ब्यांड वाजविण्यास आणि कवाईत करण्यास शिकाविलें जातें. मुलींस सर्व घरगुती कामें करण्यास शिकवितात. १५ वर्षांनंतर मुलांस बहुतकरून लढाईंत ब्यांड वाजविण्यास अगर कोणत्यातरी धंद्यांत उमेदवारीस ठेवण्यांत येतें. मुलीस सभ्य कुटुंबांत तिच्या हुषारीप्रमाणें नोकरी पाहून देतात, २१ वर्षांपर्यंत मुलां-मुलींवर गृहाची नजर असते. नंतर तीं मुखत्यार होतात. अशा प्रकारें ह्या गृहांत अजमासें १०० मुलगे, १०० मुली आणि १०० लहान बालकें इतक्या अनाथांची जोपासना होत आहे. ह्याशिवाय जन्मल्यापासून तों ३ वर्षांपर्यंतच्या सुमारें २०० तान्ह्या मुलांची जोपासना निरनिराळ्या खेड्यांतून गृहामार्फतच होत आहे.

ह्यानंतर मुलांस कांहीं प्रश्न विचारल्यावर मग आम्ही बाहेरच्या पटांगणांत आलों; इतक्यांत लहान मुलांचा वर्ग सुटला. दोन दोन मुलें हातांत हात घालून रांगेनें लांबवर लुटू लुटू चालूं लागलीं. एक पोक्त बाई त्यांस हिंडवीत होती. ह्या चिमुकल्या पलटणीचा ड्रेस अगदीं एकसारखा असल्यामळें पुढें होणाऱ्या लढायांतील ह्यांत योद्धा कोण होता व त्याची शुश्रुषा करणारी दाई कोण होती हें सहज कळत नव्हतें. सर्वांची प्रकृति सुदृढ, चेहरे प्रफुल्लित दिसत होते. ह्या बाईशीं बोलत असतां मुलांनीं आम्हां भोंवतीं गराडा दिला. सर्वांशींच हात हालविण्यास आम्हांस वेळ नव्हता म्हणून बाकीच्यांनीं आम्हांस कोठें तरी नुसता स्पर्श करून आपली तृप्ति करून घेतली!

नंतर आम्हीं प्रार्थनामंदीर पाहिलें. हें मोठ्या थाटाचें असून ह्यांत दोन तीन हजार लोक सुखानें बसतील अशी सोय केली आहे. नंतर निजावयाची जागा पाहिली. अगदीं लहानापासून तों मोठ्यापर्यंत प्रत्येकास निराळी खाट आणि स्वच्छ मऊ व उबदार गाद्या आहेत. मागचे बाजूस आजारी मुलांकरितां दवाखाना आहे.

## गृहाचा इतिहास.

फ्रान्स, हालंड देशांतून अशा प्रकारच्या संस्था पाहून येऊन लंडन येथें टॉमस कोरम् नांवाच्या एका मोठ्या परोपकारी व्यापाऱ्यानें १७३९ त ही संस्था स्थापिली. प्रथम जरी दोन महिन्याच्या खालचींच मुलें घेतलीं जात होतीं तरी दारावर मुलें आणणाऱ्यांची मोठी गर्दी जमूं लागली व दंगे व मारामाऱ्याही होऊं लागल्या. ह्याप्र-

माणें पुष्कळ अर्भकांस नाइलाजास्तव परत पाठवावें लागत असे. म्हणून १७५६ मध्यें कमिटीनें पार्लमेंटकडे मदतीबद्दल अर्ज केल्यावरून दहा हजार पौंडांची मदत मिळाली. येतील तितक्या सर्व मुलांस आंत घ्यावें अशी पार्लमेंटची अट होती, म्हणून ह्या संस्थेचा सर्वांस योग्य फायदा मिळावा ह्या हेतूनें सर्व देशभर जाहिराती दिल्या आणि प्रांतानिहाय मुलें जमा करण्याकरितां योग्य स्थळांची योजना केली. हॉस्पिटलच्या दारावर एक टोपली टांगलेली असे. कोणींही मुलास टोपलींत ठेवून वर्दीची घंटा वाजवून चालतें व्हावें असा क्रम चालला. पहिल्याच दिवशीं (ता. २ जून १७५६) ११७ मुलें सांपडलीं! डिसेंबर ता. ३१ पर्यंत १७८३ मुलें आलीं!! पुढल्या वर्षी ३७२७ मुलें जमलीं!!! अशा अदूरदर्शी औदार्याचा काय परिणाम व्हावयाचा तो लवकरच झाला. ह्या व्यवस्थेनें पापाचरणास मोठें उत्तेजनच मिळाल्यासारखें झालें. शिवाय अशा कोंवळ्या वयांतील इतक्या मुलांची योग्य व्यवस्था ठेवणें गृहास न साधल्यामुळें पुढील ३ वर्षे १० महिन्यांत जीं एकंदर १४,९३४ मुलें सांपडलीं त्यांपैकीं १०,३८९ मुलें बाळपणींच वारलीं! कांहीं प्रांतांतील कंगालखान्यांतील अधिकाऱ्यांनीं आपला खर्च कमी करण्यास लबाडी अगर जबरी करून बरींच मुलें गृहांत पाठविलीं! कित्येक चांगल्या पण दरिद्री आईबापांनीं केवळ आपल्या मुलांच्या स्मशानयात्रेचा खर्च वांचविण्यास आपलीं मरणोन्मुख मुलें टोपलींत टाकलीं!! शेवटीं १७६० त पार्लमेंटास आपली अट काढून घ्यावी लागली व तिनें आपली मदतही बंद केली. तथापि एकदां आंत घेतलेल्या मुलांची अखेर वाताहत होईपर्यंत (१७७०) सर्व खर्च पार्लमेंटास द्यावा लागला. ह्यापुढें गृहाच्या बाणेदार चालकांनीं केवळ लोकाश्रयावर नियमांत योग्य फेरफार करून हें गृह चालविलें.

## सांप्रतची व्यवस्था.

मूल हवाली करण्यास स्वतः आईनेंच आणलें पाहिजे. तिला झालेला सर्व खरा प्रकार निवेदन करावा लागतो. कांहीं लटपट केल्यास अर्ज नामंजूर होतो. मूल जन्मेपर्यंत अगर जन्मल्यावर १ वर्षावर अर्ज घेण्यांत येत नाहीं. बाईची इतर बाबतींत वर्तणूक चांगली आहे, हल्लीं तिची दशा कठीण आहे, ज्या पुरुषानें तिजवर हा प्रसंग आणिला त्यानें तिला फांटा दिला आहे वगैरे नाजूक गोष्टींची पूर्ण चौकशी केल्यावर कमिटी अर्ज मंजूर करिते. आणि असें केल्यानें केवळ मुलाचेंच प्राण वांचवून त्याची जोपासना करिते असें नव्हे तर त्या बाईलाही सन्मार्गास लावून समाजांत मिसळविते. हीं सर्व नाजूक कामें पोक्त व थोर अशा माणसांची कमीटी स्वतःच सक्तपणें करिते. मुलांस फुकट घेण्यांत येतें इतकेंच नव्हे, तर गृहाच्या कोणत्याही अधिकाऱ्यानें कसलीही फी अगर खुशी घेतल्यास त्यास बडतर्फ करण्यांत येतें आणि ती दिल्याबद्दल अर्जदाराचा अर्ज नामंजूर होतो. विवाहित स्त्रियांची अगर विधवांची मुलें घेण्यांत येत नाहींत. विधवाविवाहास येथें मुळींच प्रतिबंध नसल्याकारणानें हा नियम योग्यच आहे.

हल्लीं गृहांत मुलें मुली मिळून ३२३ आहेत व निरनिराळ्या खेड्यांत २१९ तान्हीं मुलें दायांजवळ ठेविलीं आहेत. सर्दावर्दीनें प्रत्येक मुलामागें एकंदर खर्च सालीना २९ पौंड १४ शिलिंग ११ पेन्स येतो. १९०० सालीं ५५३ मुलांपैकीं खेड्यांत ६ वारलीं, गृहांत ३ वारलीं आणि दोन त्यांच्या आप्तांनीं नेलीं.

पापी पण अनुतापी आईच्या पोटीं यदृच्छेनें आलेल्या इतक्या मुलांचें येथें पोषण व शिक्षण होतें. वर सांगितलेल्या सुंदर भजनालयांत ह्यांच्यासाठीं दर रविवारीं उपासना होतात, त्यावेळीं शेजारच्या भागांतील भाविक सभ्य स्त्री–पुरुष उपासनेस येतात. उपदेशक पगारी आचार्य आहेत. प्रत्येक वेळीं धर्मार्थ फंड गोळा होतो. ह्या प्रकारें धर्माचें खरें लक्षण जो निष्काम परोपकार तो तेथें नित्य घडतो! आणि आमच्यासारख्या परस्थांस ह्या लोकांची एका दगडासरशीं दोनचार पांखरें पाडण्याची बेमालूम तोड पाहून भारी कौतुक वाटतें. मुलें काम करण्याच्या लायकीचीं झालीं म्हणजे त्यांना योग्य कामें व नोकऱ्या लावून देतात. आणि २१ वर्षांचीं होऊन मुखत्यार झालीं म्हणजे वर्षांतील एका नियमित रविवारीं त्यांच्या आभार–प्रदर्शनासाठीं म्हणून एक थाटाची उपासना होते. त्यावेळीं कोणा तरी नामांकित

बिशपचा उपदेश होतो. मुलांच्या तर्फे आभार मानल्यावर त्यांस बक्षिसें वांटून शिवाय चांगल्या वर्तणुकीबद्दल प्रेसिडेंटच्या सहीचीं शिफारसपत्रें मिळतात. गतसालीं ड्यूक ऑफ् पोर्टलंड ( उपाध्यक्ष ) ह्यांनीं बक्षिसें वाटलीं. ह्या प्रकारें अत्यंत सोंवळे धर्माधिकारी व बडेबडे जातिवंत मानकरी ह्यांना देखील ह्या संस्थेशीं प्रत्यक्ष संबंध ठेविण्यांत मुळींच लांछन वाटत नाहीं!! ग्रहाच्या म्यूझिअमूमध्यें दोन–हृदयांत बाणासारख्या घुसणाऱ्या–मूर्ति ठेविल्या आहेत, त्या अशा:— प्रस्थापक परोपकारी टॉमस् कोरम् ह्यांची वयानें वांकलेली गंभीर मूर्ति उभी आहे. त्यांच्या डाव्या हातांत नुकतेंच जन्मलेलें बालक खेळत आहे. त्यांच्या पायांजवळ पश्चात्तापाखालीं चुरडून गेलेल्या एका तरुण व मुग्ध पोरीनें गुडघे टेंकिले आहेत. तिनें आपलें शरमिंदें तोंड एका हातानें घट्ट झांकलेलें आहे. कोरम् साहेब मात्र दुसऱ्या हातानें शेक ह्यांड करीत आहेत! इकडे मुलानें कोरम साहेबांच्या वासकुटाची गुंडी घट्ट धरली आहे! जणुं काय, त्यांच्या परोपकाराचा फायदा तें हक्कानें मागत आहे!!

असो. अशा संस्थांचा उत्कर्ष होणें इष्ट आहे असें मुळींच नव्हे. पण मानवी स्वभावाची पूर्णता होईपर्यंत ह्या संस्था सर्व देशांत अवश्य आहेत, असें कष्टानें म्हणावें लागतें. विधवा–विवाहांस पूर्ण संमति असूनही ह्या देशांत अशा संस्थांची गरज भासत आहे, हें सुधारकांनीं ध्यानांत घेण्यासारखें आहे. आणि नुसती गरज आहे असें म्हणून स्वस्थ न बसतां आज शेंकडों वर्षें ही एकच नव्हे तर अशाच दुसऱ्या अनेक संस्था ह्या एका लंडन शहरांत चालू आहेत, ही गोष्ट, बालविधवांना देखील शास्त्रोक्त विवाह करण्याची जेथें सक्त मनाई आहे, तेथील सदय धर्माभिमान्यांनीं लक्ष्यांत आणावी.

जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले॥
तुका म्हणे सांगों किती। तोचि भगवंताची मूर्ति॥

कित्येक प्रत्यक्ष कृति करून तुकारामाचे भगवंत बनतात! कित्येक नुसता त्याचा उपदेश ऐकून माना डोलवितात! कित्येक कसल्याही भानगडींत पडत नाहींत! आणि कित्येक तर प्रार्थनासमाजानें असलीच एक संस्था पंढरपुरास चालविली आहे, म्हणून त्याच्यावर दांत ओंठ खातात!!

# सोमयागाचें वर्णन वाचून वाटलेला विस्मय व विषाद.

डेव्हनपोर्ट,

ता. ३।४।१९०२.

परवां गुड्फ्रायडेच्या दिवशीं येथील निरनिराळ्या ख्रिस्तीधर्मपंथांच्या देवळांत निरनिराळ्या थाटाच्या उपासना सर्व दिवसभर झाल्या. अज्ञान, दुराग्रह, संवय किंवा दुसऱ्या अनेक अज्ञेय आणि अनिर्वाच्य कारणामळें ह्या सुधारणेच्या शिखरास पोंहोंचलेल्या राष्ट्रांतसुद्धां अद्यापि धर्मभोळेपणाचे जे अवशेष राहिले आहेत, त्यांचें दिग्दर्शन वरील प्रसंगीं बरेंच झालें. त्यांपैकीं कांहीं अनुभवाचे मासले आपल्याकडे पाठविणार होतों, इतक्यांत ता. ११ मार्च १९०२ च्या केसरीनें कृष्णातटाकीं नुकत्याच घडलेल्या सोमयागाची गोष्ट यथासांग सांगितली. ती ऐकून दुसऱ्याचे घरीं डोकावून पाहून तेथें काय चाललें आहे त्यासंबंधीं चर्चा करण्यापूर्वीं आपल्याच पायांखालीं काय जळतें आहे, ह्याची पृच्छा करणें अधिक जरूर वाटलें. केसरीनें सांगितलेली गोष्ट ऐकून केसरीचे आभार व त्या गोष्टीबद्दल विस्मयपूर्वक विषाद एका दोघांसच नव्हे, तर पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. आणि खरोखर तो संभव नसेल तर विषाद वाटण्याला सोमयागाहूनही हें एक दुसरें जबर कारण आहे असेंच म्हणावें लागतें.

एकाद्या आडरानांत चार चौघा कोळ्यांनीं एकाद्या शेंदूर माखलेल्या दगडाच्या म्हसोबापुढें जमून ‘ जय म्हसोबा! भगतावर कृपा कर ’ अशी मराठींत साधी प्रार्थना करून एकादें कोंबडें कापलें आणि म्हसोबाचा प्रसाद म्हणून तें सर्वांनीं मिळून गिळिलें तर होणारा जो प्राकृत यज्ञ तो, आणि कृष्णातटाकीं वीस विद्वान् ब्राह्मणांनीं तीन बकऱ्यांस बुक्यांनीं मारून शेवटीं त्यांचें तिळाएवढें मांस खाऊन जी संस्कृत कंदुरी केली ती, ह्या दोहोंमध्यें वास्तविक फरक किती आहे! फरक जर असेल तर तो हाच कीं साध्या मराठी अनार्य यज्ञाचा साधारण समाजावर म्हणण्यासारखा परिणाम घडत नाहीं; आणि ह्या थाटाच्या खर्चाच्या सोंवळ्या आर्यजत्रेचा परिणाम उच्चवर्गापासून

तो खालपर्यंत समाजावर इतका जोरदार घडतो कीं बिचाऱ्या उदार धर्मास दोन पावलें आणि दोन दशकें मागें हटावें लागतेंच ! !

सोमयागाचें एकंदर वर्णन वाचून त्यांत तीन निरुपद्रवी बकऱ्यांचा सदोषवध अगर निरर्थक खून ह्याखेरीज दुसरे कांहींही घडघडीत अनीतीचें अगर अन्यायाचें नाहीं ही गोष्ट प्रथम दर्शनींच धर्मवेडाच्या अगदीं कट्टया शत्रूसही साफ कबूल करावी लागेल. ( तशी कांहीं अनीति अगर अन्याय असला तर कायद्यानें त्याचा सक्त बंदोबस्त कधींच झाला असता, हेंही सांगावयास नको. ) समाजांत उत्तरोत्तर विकसित होणाऱ्या न्याय, नीति आणि शिष्टाचार ह्या तीन गोष्टी संभाळून कोणाही व्यक्तीस अथवा समूहास आपले जुने आचार मोठ्या थाटानें साजरे करून मनाची करमणूक अगर दुसरी कसलीही समजूत करून घेण्याची पूर्ण मुभा आहे. ते जुने आचार त्यांच्या कितीही पूर्व दशेंतील असोत, त्यांची परंपरा आजघडीपर्यंत सारखी चालू असो, किंवा मध्यंतरीं हजारों वर्षांची खळ पडली असून आजच त्यांची आठवण होऊन त्यांच्या जीर्णोद्धाराचा काळ आला असो, कोणत्याही बाजूनें पाहिलें तरी ते आमचे आचार आम्ही करण्याचा आमचा जो बाणेदार उपजत हक्क आहे, त्यास रतीमात्र बाध येत नाहीं; इतकेंच नव्हे तर सार्वभौम सर्व सामर्थ्यवान् सरकारासही ह्या हक्काकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची छाती नाहीं. ह्या सर्व गोष्टी समाधानकारक आहेत ह्यांत शंका नाहीं.

पण येथें हक्काचा किंबहुना आवडीचाही विचार कर्तव्य नाहीं. ह्या घडलेल्या प्रकरणांत धर्म कितपत आहे किंवा तो मुळीं आहे कीं नाहीं, किंबहुना बकऱ्यांच्या रूपानें धर्माचाच येथें खून घडला आहे कीं काय, ही गोष्ट दिसल्याच पाहणें आहे, आणि डोळे उघडे असल्यास ती दिसण्यास मुळींच कठीण पडणार नाहीं, ह्याची खात्री आहे. घडलेला प्रकार जर गणपत्युत्सवाप्रमाणें केवळ राष्ट्रीय उत्साह वाढविण्याप्रित्यर्थ घडला असता तर त्यांत विशेष मन घालण्याची जरूरी नसती. पण ज्याअर्थी तो अस्सल धर्माच्या नांवावर घडला आहे, त्याअर्थी त्याजकडे सर्व मुमुक्षु जनांचें लक्ष पोंहोंचलें पाहिजे. आणि विशेषेंकरून धर्मसुधारकांचें ह्या बाबतींत औदासिन्य तर अगदींच अक्षम्य होईल.

अंत बाहेर सर्वत्र नांदणारा जो परमात्मा आणि व्यक्तिविशिष्ट जो जीवात्मा ह्यांचा परस्पर संबंध आणि निरंतर समागम ह्यांस धर्म ह्मणतात. अंतर्याम, उच्च मनोविकार, नैतिक शक्ति इत्यादिकांच्या द्वारें, बाह्यसृष्टि, अंतःसृष्टि आणि जगाचा विकासमय इतिहास ह्या तीन प्रदेशांत जिवंत जागृत परमेश्वराचे प्रतिक्षणीं काय काय व्यापार घडतात ते ओळखणें, कृतज्ञतापूर्वक त्याचें सान्निध्य साधणें आणि संसारांतील लहान मोठीं कामें त्याच्या सान्निध्यास शोभतील अशा रीतीनें करणें हीं आमचीं धार्मिक कर्तव्यें. तीन साडेतीन हजार वर्षांपूर्वी आमच्या आर्यपूर्वजांनीं जेव्हां हिंदुस्थानाच्या कांठावर प्रथम बिऱ्हाड ठेविलें असेल तेव्हां परमेश्वराचे बाह्यसृष्टींतील विलास पाहून ते किती मोहित झाले असावेत ह्याचे साद्यंत दाखले वेदांत आढळतात. आपल्या साध्या सरळ आणि जिवंत भाषेंत त्यांनीं देवावरचीं गाणीं गाइलीं. फूल नाहीं फुलाची पाकळी, जें कांहीं त्यांच्याजवळ होतें त्याचा थोडा भाग, नवीन भेटलेल्या देवास आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठीं त्यांनीं सांज-सकाळ अर्पण केला. हें त्यांस कितीतरी शोभलें ! पण कालांतरानें जेव्हां ह्या परकीयांच्या वसाहती उत्तर-हिंदुस्थानांत बऱ्याच पसरल्या आणि ह्यांचें सांपत्तिक व सामाजिक वैभव पुष्कळ वाढलें, तेव्हां अर्थात् वरील आराधनेचा स्वाभाविकपणा नाहींसा होऊन तिच्यांत कृत्रिमपणा शिरला. पूर्वी जें अंतःकरणाच्या देंठापासून निघत होतें, तेंच आतां जिभेच्या व ओठाच्या शेवटांपासून निघूं लागलें. पूर्वी प्रत्येक घरधनी आपला आपणच योद्धा, कुणबी व उपाध्याय होता; पण आतां त्या तीन कामकऱ्यांच्या तीन जाती बनल्या; आणि धर्माच्या नांवावर कर्मठपणा वाढूं लागला. पण अद्यापि ब्राह्मणतेज लयास गेलें नव्हतें. खरे जे ब्रह्मवीर होते, त्यांनीं अरण्यांतच राहून उपनिषदांतन ह्या कर्मठपणाचा जोरानें निषेध केला आणि धर्माची इमारत बाह्य सृष्टींतल्या साक्षात्कारांवरून उठवून ती अंतःसृष्टीच्या अधिक खोल व खंबीर पायावर उभारली. आमच्या धार्मिक इतिहासांतील हा पहिला निषेध ( Protestantism ) होय. पण ह्या रानांतील

मानासक चळवळीमुळें गांवांतील बहुजनसमाजांतील कर्मठपणा कमी होणें शक्य नव्हतें. म्हणन त्यास वैतागून गौतमबुद्धानें दुसरी धर्मसुधारणा केली. (खि. श. पूर्वी ४६८) सुमारें १०००-१२०० वर्षांनीं बुद्धाच्या सुधारणेचाही जोर संपला आणि कर्मठपणाच्या लाटा तर पूर्वीपेक्षांही जास्त उंच उसळं लागल्या! नंतर १२ व्या शतकापासून तों १६ व्या शतकाअखेर सर्व हिंदुस्थानभर नानक, चैतन्य, तुकाराम वगैरे साधु संतांनीं तिसरी सुधारणा केली. आतां २० व्या शतकांतला प्रकार आमच्या डोळ्यांपुढेंच आहे.

धर्माचें जें लक्षण वर सांगितलें आहे आणि त्या लक्षणाचा जो धर्म उपनिषदें, भगवद्गीता, गौतमबुद्ध आणि आधुनिक साधु ह्यांनीं प्रचारिला, त्या सनातन धर्माचा कोणता भाग किती अंशानें वरील सोमयागांत आहे आणि ज्यास प. वा. आगरकरांनीं आपल्या एका निबंधांत 'हे भीषण, बीभत्स हिंदुधर्मा....तूं आपलें तोंड लवकर काळें कर' अशी सक्त नोटीस दिली आहे, त्या धर्माचा किती अंश या सोमयागांत आहे, ह्याचा विचार धर्माची ज्यांना म्हणून किंचित् तरी पर्वा आहे, त्या प्रत्येकानें आपल्या स्वतःशीं केला पाहिजे. बाकी ज्यांना धर्माच्या नांवानें नुसती करमणूकच करावयाची असेल अगर दसरा कसला तरी अर्थ साधावयाचा असेल, त्यांस हाच काय पण दुसरा कोणताही प्रकार चालेल आणि शोभेल. कृष्णातटाकीं जमलेल्या वीस विद्वानांच्या विद्वत्तेसंबंधानें कोणासही शंका घेण्याचें कारण नाहीं. पांच दिवस एकसारखे तिन्ही वेदांचे पाठ ह्यांनीं बिनचूक आणि बिनविलंब म्हटलें तर श्रौतवाङ्मयांत ह्यांची नंबर एकची गति असली पाहिजे. पण ह्यांच्या ह्या अमूल्य संपादणुकीचें चीज अशा योगानें होईल काय? इकडे पाश्चात्य पंडित, जर्मन, फ्रेंच आणि इंग्लिश भाषांतून वैदिक वाङ्मयाचा प्रत्येक शब्द उतरवीत आहेत, तर ह्या ब्राह्मण विद्वानांनीं त्या वाङ्मयाचे निदान कांहीं वेंचे तरी देशीभाषेंत उतरविल्यास त्यांची योग्य संभावना होणार नाहीं काय? जुन्याचा खरा उद्धार अशा रीतीनें होईल कीं तीन हजार वर्षांपूर्वी ज्या गोष्टी जशा घडल्या त्या आतां तशाच उठविल्यानें होईल?

शेवटीं धर्माच्या बाबतींत उदासीन राहणाऱ्या नास्तिक व अज्ञेयवादी सुधारकांनींही हें लक्षात ठेविलें पाहिजे कीं धर्माच्या नांवानें जीं हीं थोतांडें वेळोवेळीं उपस्थित होतात व वाढत जातात तीं त्यांची केवळ थट्टा किंवा निंदा केल्यानें नाहींशी होत नाहींत. उलट लोकमतांचें ह्या थोतांडांस पूर्ण पाठबळ असल्यानें ह्या रिकामटेंकड्या सुधारक थट्टेखोरांचीच थट्टा होते. शिवाय हीं सर्व थोतांडें नाहींशीं झालीं तरी ह्मणजे मोठासा कार्यभाग झाला असें नाहीं. शुद्ध धर्माची ज्योत राष्ट्रांत सतत जळती राखल्यासच राष्ट्राच्या अनेक चळवळीस जोम येईल. आणि यास्तव प्रत्येक देशभक्तानें धर्मसुधारणेचें काम हस्तें परहस्तें करणें जरूर आहे.

---

## डेव्हनपोर्ट येथील गुड फ्रायडे.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड,

ता. १०-४-१९०२.

नाताळच्या खालोखाल ईस्टर हा खिस्ती लोकांचा मोठा सण आहे. ह्याची गणना चांद्र मानाप्रमाणें होत असल्यामुळें सौर वर्षांत ह्याची तारीख मागें पुढें बदलते. गुड फ्रायडे (चांगला शुक्रवार) पासून तो पुढच्या सोमवार अखेर, अत्यंत गरजेची-विशेषें करून दारूचीं दुकानें खेरीज करून, बाकी सर्व दुकानें सर्वत्र ह्या चार दिवसांत बंद असतात. हा चांगला शुक्रवार येशू खिस्ताची पुण्यतिथि होय. ह्याच दिवशीं ज्यू लोकांनीं त्यास सुळावर चढविलें. पुढें तीन दिवसांनीं आदित्यवारीं तो थडग्यांतून आपल्या जड शरीरासह उठला आणि आकाशांत देवाच्या उजवीकडे बसला अशी जुन्या खिस्ती लोकांची भोळी समजूत आहे. म्हणून शुक्रवार हा शोकाचा दिवस आणि आदित्यवार हा आनंदाचा दिवस मानून देवळांतील सर्व आराधनेचे प्रकार या समजुतीस अनुरूपच होतात. चांगल्या शुक्रवाराच्या पूर्वीच्या सहा आठवड्यास लेंट Lent हें नाव आहे. हा शब्द ॲंग्लो सॅक्सन भाषेंतील लेनिटन् Leneten या शब्दापासून आला आहे, लेनिटन्‌चा अर्थ लांबणें व ह्या सहा आठवड्यांत दिवस अधिकाधिक लांबत असतो व रात्र कमी होत असते. ह्यावरून

लेंटची संस्था खिस्ताच्याही पूर्वीची असून नंतर तिला खिस्ती धर्माचें स्वरूप आलें तें असें:–जॉन दि बाप्टिस्ट ह्यानें खिस्तास बाप्तिस्मा दिल्यावर खिस्तानें ४० दिवस वनवास भोगिला. चाळीस अहोरात्रीं त्यानें उपवास केला. ह्या अवधींत सैतानानें त्यास अनेक प्रकारें भुलविण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. यानंतर खिस्त, लोकांस उपदेश करण्यास निघाला. हे चाळीस दिवस आतां लेंट ह्या नांवानें पवित्र मानण्यांत येत आहेत. हिंदु लोक जसे चातुर्मासांत कोणतेही निषिद्ध पदार्थ खात नाहींत तसेंच खिस्ती लोकही लेंटमध्यें मांसाहार करीत नाहींत. पण खरोखरी हा निश्चय क्वचित्च पाळण्यांत येतो. आमचे हिंदु लोक जसे चातुर्मास साधला नाहीं तरी शेवटची कार्तिकी एकादशी तरी पाळतात तसे इकडेही निदान गुडफ्रायडेच्या दिवशीं पुष्कळ बायका, मुलें व म्हातारीं माणसें उपवास करितात. फराळाचे मुख्य जिन्नस म्हणजे मासे व अंडीं हे होत. आमच्याकडे जसें एकादशीच्या दिवशीं केळीं, रताळीं, भुईमूग इ. जिन्नस दोन प्रहरीं अगदीं महाग होतात. तसेंच येथें ( डेव्हनपोर्ट हें मासे धरण्याचें मुख्य ठिकाण असूनही ) शुक्रवारीं सकाळींच बाजारांत मासा म्हणजे अगदीं दुर्मीळ पदार्थ झाला होता, असें आमच्या घरवालीनें सांगितलें. अशा प्रकारचीं व्रतें आणि धार्मिकपणा रोमन कॅथोलिक लोकांमध्यें फार आढळतो. संध्याकाळीं एका कॅथोलिक देवळांतून बाहेर पडल्यावर एका गृहस्थाशीं बोलत असतांना त्यानें म्हटलें "हे प्रॉटेस्टंट लोक इतके उद्दाम आहेत कीं ते आज देखील मांस खातात!" मग मीं त्यांस विचारलें तुम्ही मासे नाहीं का खात! ते धार्मिक गृहस्थ म्हणाले 'मासे काय प्राणी आहेत?' हें ऐकून मी निरुत्तर झालों!

एकंदरींत हा सण शोकाचा व अनुतापाचा आहे. म्हणून क्वचित् कांहीं पापभीरू लोक कसलीही मौज, चैन अथवा करमणूक न करितां घरीं स्वस्थ चिंतनांत काल घालवितात; पण अशीं उदाहरणें दिवसें दिवस दुर्मीळ होऊं लागलीं आहेत असें दिसतें. सुशिक्षित आणि फॅशनेबल लोकांत तर कोणत्याही प्रकारचे सण पाळणें म्हणजे गांवढळपणाचें लक्षण समजलें जातें. हें राष्ट्र अत्यंत उद्योगी लोकांचें असल्यामुळें बहुजनसमाज सुट्टी मिळाल्याबरोबर सहजच ती चैनींत व करमणुकींत घालवितो. हा वसंत ऋतूचा काळ असल्यामुळें फुटबॉल, हॉकी इ. मोकळ्या हवेंतले खेळ खेळणें व ते पहाणें ह्या मुख्य करमणुकी. खालील वर्गाची मोठी करमणूक म्हणजे दारू पिणें. धर्माधिकारी ह्या सर्वच करमणुकी सरसकट बंद करण्यासाठीं कंठशोष करितात म्हणून त्यांस कोणीही विचारीत नाहींत!

आज सारा दिवसभर सर्व देवळांत उपासना चालू असतात. सकाळच्या उपासनेस येथील एका प्रॉटेस्टंट मुख्य देवळांत गेलों. उपासकांची संख्या १० पुरुष, ३० बायका, १०० मुलें इतकी होती. नेहमीं बायकापुरुषांचें प्रमाण बहुतेक असेंच असतें. कॅथोलिक देवळांत पूजेचा संभार विशेष आणि आराधनाक्रम अधिक थाटाचा असतो; तशांत जवळच प्लिमथ येथें कॅथोलिक कथीड्रल म्हणजे मुख्य मठस्थान आहे, म्हणून तेथें संध्याकाळच्या मुख्य उपासनेस गेलों. कथीड्रलची इमारत जुनी आणि भव्य आहे. जागोजागीं खिस्ताच्या व खिस्ती साधुसंतांच्या अनेक मूर्तींची स्थापना केली आहे. देवळांत सर्वत्र शोकचिन्हें दिसत होतीं. मुख्य गाभाऱ्यांतील देव्हारा व त्यांतील मूर्ति ह्यांवर काळ्या पडद्याचें झांकण होतें. इतर मूर्तीपुढें नेहमीं असणारा धूपदीप, पुष्पांचा थाटही आज नव्हता. ह्यामुळें देवळांत शिरल्याबरोबर असा कांहीं अवर्णनीय गंभीर देखावा दिसला कीं लवकरच अंतःकरण खेदमय भावानें भरून गेलें. पहावें तिकडे खिस्ताच्या दुःखपर्यवसायी चरित्राचें असें प्रदर्शन होत होतें कीं पुण्यशील आत्म्यास पश्चाताप घडावा! मग पाप्यांची काय कथा!

७॥ वाजतां उपासनेस प्रारंभ झाला. प्रत्येक स्त्रीपुरुष देवळांत आल्याबरोबर देव्हाऱ्यासमोर गुडघे किंचित् वांकवून पुढें जाई. नेमिल्या वेळीं बिशपचा छबिना आला. सर्वांपुढें वृद्ध आणि मौनव्रत धारण करणाऱ्या बिशपची स्वारी, त्याच्या मागून ८–१० धर्माधिकारी व त्यांच्या मागून सुमारें ६० गाणाऱ्या मुलांचा मेळा, अशा क्रमानें येऊन सर्व मुख्य गाभाऱ्यांत आपापल्या जागीं बसले. दोन रांगांच्यामध्यें एका व्यासपीठावर

बायबल ठेविलें होतें त्यांतील निवडक भाग प्रत्येक धर्माधिकारी पुढें पूर्वेकडे तोंड करून म्हणजे इतर सर्व उपासकांकडे पाठ करून वाचीत असे. नंतर दक्षिणेकडे व उत्तरेकडे पाहून जात असे. असें सर्व धर्माधिकाऱ्यांनीं केल्यावर मुख्य कॅननचा उपदेश झाला. त्यांत त्यानें खिस्तास सुळीं देण्याच्या प्रसंगाचें वर्णन केलें, त्याच्या रक्तानें भाविक मनुष्याच्या पापाचें क्षालन कसें होतें त्या प्रसंगीं जे अनेक चमत्कार घडले ते सर्व अक्षरशः खरे आहेत, त्याविषयीं जुन्या ज्यू लोकांच्या करारांतही भविष्य आहे. इ. इ. गोष्टी त्यानें सांगितल्या. त्याचा पोषाख, पायघोळ, पांढरी कफनी, छातीवर तांबडें वस्त्र, कंबरेस व दोन्हीं बाजूंनीं जरीकाठीं काळ्या कापडाच्या पट्ट्या, डोकीस मुकुटाकृती काळी टोपी असा होता. व्याख्यानांत जेव्हां खिस्ताचें नांव येई तेव्हां तो आपली टोपी उचलीत असे व सर्व उपासक नमन करीत. व्याख्यान आटपल्यावर मेळ्यांतील मुलांनीं अत्यंत करुण व दीर्घ स्वरानें कांहीं गाणीं म्हटलीं. आज कसलेंही वाद्य वाजविण्यांत आलें नाहीं. ह्यानंतर खिस्ताच्या प्राणोत्क्रमणाची वेळ आली. ह्यावेळीं पृथ्वीवर चहूंकडे मोठा अंधार पडला, धरणीकंप झाला आणि मोठा आवाज झाला इ० वर्णन बायबलांत आहे. म्हणून आतां तसेंच करण्यांत आलें. देवळांतील सर्व दिवे ग्यासचे असल्यानें ते एकदम नाहींसे केले. पांच मिनिटें चहूंकडे अंधार आणि सामसूम झालें. ह्यावेळीं ह्या मोठ्या देवळांत सुमारें ३०० लोक होते पण कोणीही मोठ्यानें श्वासोच्छ्वास देखील करीना. शेवटीं धरणीकंपाची नक्कल करण्यास्तव एका कोपऱ्यांतून धडधड असा बारीक आवाज झाला! मग सर्व दिवे एकदम लागले आणि उपासना आटपली!!

प्रॉटेस्टंट देवळांत ह्या नकला होत नाहींत, पण व्याख्यानांचा सारांश बहुतेक असाच असतो. युनिटेरिअन देऊळ गुड फ्रायडेच्या दिवशीं तर मुळीं बंदच होतें व इस्टरच्या आदित्यवारीं त्यांतील दोन्ही उपासना एका ब्राह्मानें चालविल्या!

---

# बोअर युद्धाचा शेवट व ऑक्सफर्ड येथील उल्हास.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड,

(सुबोधपत्रिका, ता. २०-७-१९०२.)

परीक्षेच्या घाईमुळें हें पत्र एकदोन आठवड्यांचें शिळें झालें आहे. तथापि मजकूर शांतीसंबंधाचा असल्यानें इतकी घाई केली नाहीं म्हणून कांहीं हरकत नाहीं.

दक्षिणारण्यांतील नरमेध तर संपला त्याची आतां गत गोष्ट झाली. आपले सुमारें ९६ हजार कामास आले. पैकीं सुमारें चौथाई तर यमानें जागच्या जागीं वसूल केली. हा जो इतक्यांना मोक्ष मिळाला तोही कांहीं फुकट नव्हे. तर मागें इळहळणाऱ्यांना त्याबद्दल जवळ जवळ ३ अब्जांचा खर्च आला आहे. प्रतिपक्षाचें काय काय नुकसान झालें ह्याचा अद्याप पत्ता नाहीं. भावी इतिहासकार रिकामपणीं त्याचा हळू हळू छडा लावतील!

धर्मयुद्ध असो वा कसेंही असो, युद्ध म्हणजे अनिष्ट. सतत विकास पावणाऱ्या मानवी आयुष्यांत सांग्रामिक कालाची आवश्यकता असेल, पण आवश्यकतेवरून त्याचा चांगुलपणा सिद्ध होत नाहीं. एकेकाळीं मानव जातीस विद्या, कला, शास्त्र ह्यांपेक्षां युद्धाचीच प्रौढी विशेष वाटत होती. आणि हल्लींच्या काळीं, स्पेन्सरसारख्या सात्विक ब्राह्मणांनीं सांग्रामिक युगाहून औद्योगिक युग अधिक श्रेयस्कर व उन्नत आहे असें कितीही प्रस्थापलें तरी वरील प्रौढी अद्यापि व्हावी तितकी कमी झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याच स्पेन्सर साहेबांनीं नुकताच आपला अगदीं शेवटचा म्हणून जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्यांत सुधारलेल्या जगांत हल्लीं ज्या अनार्यपणाच्या लाटा उसळत आहेत त्यांचें चांगलें दिग्दर्शन केलें आहे. पशुदशेंतून मानवदशेचा विकास झाला आहे हें डार्विनचें मत कित्येक कोमल अंतःकरणाच्या माणसांस पसंत नाहीं. तरी जोंवर राष्ट्रा राष्ट्रांतील वाद आम्हांस रक्तपाताशिवाय मिटविणें अशक्य दिसतें तोंवर आमच्या पूर्वज पशूंचे अवशेष आमच्यांत अद्यापि कायम आहेत हें कबूल करणें निदान समंजसपणाचें आहे.

कांहीं असो दक्षिण खंडाला शोभणारें हें रणकंदन एकदाचें आटपलें म्हणून ह्या उत्तर द्वीपांत सर्वत्र आनंदी आनंद झाला आहे. आबालवृद्ध स्त्रीपुरुष सुधारकउद्धारक ह्या सर्वांना अझूनी आनंदाचे उमाळे येत आहेत. ह्या लोकांची आनंद प्रदर्शित करण्याची तऱ्हा कांहीं अप्रतिमच! युद्ध चांगलें कीं वाईट हें सांगणें फार सोपें आहे. पण तें संपल्यावर ह्यांनीं जो आपला राष्ट्रीय उल्हास दाखविला—आणि तोही ऑक्सफर्डसारख्या पवित्र आणि शांत शहरीं—तो पाहून परकीयानें त्यास बरा अगर वाईट म्हणणें फार जोखमीचें काम आहे! म्हणून प्रथम एकदोन दिवशीं—विशेषतः रात्रीं येथें जो प्रकार घडला—नव्हे मला दिसला तो लिहीत आहें. वाचकांनींच आपापले तर्क जपून करावेत.

* * *

तहाची तार येथें, रविवारीं रात्रीं पोंहोंचली, म्हणून तेव्हां कांहीं विशेष घडलें नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं मी माझे खोलींत न्याहारीस बसलों असतां आमची घरवाली हातांत एक मोठी रंगी बेरंगी पताका घेऊन अवचित् माझ्यापुढें उभी राहिली. तिच्या तोंडावर विजयश्री स्पष्ट दिसत होती. नंतर खालील छोटासा संवाद झालाः——

मी—कायहो तुह्मां (बायकां) लाही आनंद होतो ना!

ती—हो. हो. हें काय विचारणें.

मी—राज्य मिळालें म्हणून कीं लढाई संपली म्हणून?

ती—दोन्ही रीतींनीं.

मी—म्हणजे दुसऱ्या रीतींनेंही होतो म्हणावयाचा?

ती—तर हो काय! भाकरीवर देखील कर बसविण्यापर्यंत मजल आली तर लढाई एकदाची संपली म्हणूनही आनंद कां वाटूं नये!

मी—तर मग ह्या निशाणीचें प्रयोजन काय?

ती—तो भाग वेगळा. ही निशाणी न लाविली तर संध्याकाळच्या आंत माझ्या खिडक्यांना तावदानें राहणार नाहींत!

मी—काय ह्मणतां?

ती—तर काय! मॅफकिंगचा जेव्हां वेढा उठल्याची बातमी आली तेव्हां येथील रस्त्यांतील पोरट्यांनीं कोण कहर केला!

मी—एकूण ह्या निशाणीचीं अनेक कारणें आहेत? एक, राज्य मिळालें ह्मणून, दुसरें, लढाई संपली ह्मणून, तिसरें, रस्त्यांतील उनाड देशाभिमानाला बुजगावणें ह्मणून इ. शेवटीं बाईनें हांसत घरावर निशाण लावलें.

* * *

नंतर मी दाराबाहेर येऊन पाहतों तों आळींतील प्रत्येक खिडकींतून युनिअनजॅक बाहेर पडत होता. हाम रस्त्यावर तर जारीनें तयारी चालली होती. दुकानदार, वखारीवाले आणि घरंदाज इत्यादि लोक आपापल्या परीं निरनिराळीं जयाचिन्हें उभारण्यांत गुंतले होते. लहानसान पताका, मोठे बावटे, गुढ्या, तोरणें ह्यांचा थोड्याच वेळांत मोठा गहजब उडाला. शहरांतील मुख्य रस्त्यांत तर रंगाची चंगळ झाली होती. दिवस जसजसा वर येऊं लागला तसतशी अधिक तयारी होऊन अधिक शोभा येऊं लागली. खटारेवाल्यांनीं आपल्या खटाऱ्यांवर व बगीवाल्यांनीं घोड्यांच्या कानांवर आणि चाबकांच्या शेवटांस निरनिराळ्या रंगाच्या फिती लावल्या! लष्करच बायसिकलस्वरूनही झेंडे फडकूं लागले अखेरीस ही आनंदाची साथ गुलहौशी बायकांच्या कुतऱ्यांपर्यंत पसरून त्यांचे गळे रंगले! अनुकरण आणि चढाओढ ह्यामुळें हा प्रकार कोठवर वाढेल ह्याचा सुमार लागेना. तिसऱ्या प्रहरीं लहान लहान मुलें खांद्यावर पताका ठेवून, तोंडानें कथिलाचीं शिंगें फुंकून त्यांचा कर्कश आवाज काढीत रस्त्यांतून भटकूं लागलीं!

सांजावून किंचित् कडोसा पडल्यावर देखावा बदलला. दुकानांवरून व घरांवरून ग्यासच्या चित्रविचित्र दिव्यांची रचना केली होती. त्या सर्वांनीं आतां पेट घेतला. कित्येक ठिकाणीं जपानी कागदी कंदीलांचीं तोरणें रस्त्यांवरून आडवीं टांगलीं होतीं. कांहीं कॉलेजांवरून कार्तिकांची विशेष शोभा दिसत होती. सार्वजनिक आनंद प्रदर्शनाचें ह्या लोकांचें मुख्य साधन बॉन फायर्स म्हणजे होळ्या. गावांत ह्या निरनिराळ्या ठिकाणीं ८।१० रचल्या होत्या. मोडकीं पेटारें,

डांबर ठेवण्याचीं पिंपें आणि इतर सटरफटर ह्यांनीं कांहीं होळ्या २५ फुटापर्यंत उंच गेल्या होत्या. ह्यांचाही आतां एकच भपका उडाला. इकडील गरीब व खालच्या वर्गाची एरवीं देखील सायंकाळीं फुरसतीच्या वेळची मुख्य करमणूक म्हणजे गांवांतील मुख्य रस्त्यांतून इकडे तिकडे मनसोक्त भटकणें. त्यांत तरुण मुलींचा भरणा विशेष! आज तर ह्या गर्दीला कांहीं निराळाच रंग आला होता. होळ्या पेटल्यावर रस्त्यांत अगदीं खेंचाखेंची झाली.

* * *

रात्रीचा पूर्ण अम्मल बसल्यावर ह्या देखाव्याचें तिसरें आणि भलतेंच रूपांतर झालें! सकाळीं पाडवा, संध्याकाळीं दिपवाळी तर रात्रीच्या काळोखांत ह्या उत्सवानें आमच्या शिमग्यासही लाजविलें! ह्या शिमग्यांतील मुख्य पार्ट युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांनीं बजावला!! संध्याकाळानंतर विद्यार्थी युनिव्हर्सिटीचा झगा आणि टोपीशिवाय खोलीबाहेर कोठेंही दिसल्यास त्यास दंड, ११ वाजल्यावर बाहेर दिसल्यास दंड, १२ वाजल्यावर दिसल्यास जबर दंड इ० ह्या युनिव्हर्सिटीचे नेहमींचे अगदीं कडक कायदे आहेत. पण मॅफकिंगच्या रात्रीच्या अनुभवावरून आज हे सर्व कायदे तहकूब करण्यांत आले होते. मग काय विचारतां! दहादहा बाराबारा रंगेल गडी हातांत हात घालून लांब रांगा बनवून गर्दीतून अर्धे उघडे बोडके हैदोस करीत निघत. गांवठी तरुण मुलींच्याही अशाच रांगा चालल्या! ह्या भिन्न जातींच्या रांगा जेव्हां समोरा समोर भिडत तेव्हां रांगांचें वर्तुळ बनत. मग क्षणमात्र 'चुंबति कामपि श्लिष्यति कामपि कामपि रमयति रामाम्' ही अस्सल गोकुळी रासक्रीडा होई! अशा प्रसंगीं सभ्य मुली बाहेर पडत नाहींत. पडल्या तर त्यांचा सभ्यपणा कायम राहत नाहीं. थोडा वेळ त्याचा भंग झाला म्हणून त्याचें त्यांस वाईट वाटत नाहीं. वाटलें तरी कोणी विचारीत नाहीं. अलीकडे आमच्या शिमग्यासंबंधीं निदान सुधारक पत्रांतून तरी थोडी टीका होते. पण तशी देखील इकडे कांहीं दिसली नाहीं. कारण बोलून चालून हा तात्पुरता पोरकटपणा, असा येथें सर्वांनुमतें ठराव झालासें दिसतें. कांहीं असो, नवख्यांस एकंदरींत हा प्रकार पाहून धक्का बसल्याशिवाय राहत नाहीं.

डोळ्यांचा भडका जसा कमी होऊं लागला तसें आजूबाजूचें फालतूक अडगळीचें समान आंत येऊन पडूं लागलें! एके ठिकाणीं तर एका मोडक्या घरावर हल्ला झाल्यामुळें, पोलीसास मध्यस्ती करावी लागली! अशा प्रकारच्या आनंदाच्या वेळीं ऑक्सफर्डमध्यें दुसरा एक विशेष मौजेचा प्रकार दृष्टीस पडतो. तो असाः—विद्यार्थ्यांच्या टोळ्या रस्त्यांतून हिंडत असतां गांवांतील टोळ्यांशीं कांहीं तरी कुरापत काढून मारामारी करितात. ह्या तंट्यांस येथें टाऊनीज ॲंड गाऊनीज फयडस्' म्हणजे झगेकरी व गांवकरी ह्यांचे तंटे असें म्हणतात. ही चाल फार पुरातन काळापासून आहे. पूर्वी खरोखरीच मोठे दंगे होत असत. ह्या वेळींही एका कॉलेजच्या दारांत सुमारें तासभर दंगामस्ती झाली. ह्याचें प्रथम मला फार आश्चर्य वाटून इकडे पोलीस कां दुर्लक्ष करितात ह्याबद्दल मीं एका शिपायास विचारिलें. येथील पोलीस म्हणजे धिप्पाड, कर्तव्यदक्ष, शांत आणि अति सभ्य लोक असतात. त्यांपैकींच एक म्हणाला—"अशा वेळीं आम्ही जास्त सवलत देतों. आम्हीच जर चिडलों तर सारा गांव खवळेल. हे दंगे विशेष विकोपास पेटले तरच आम्ही शांतपणें मिटवतों.' त्यानें असेंही हांसत हांसत सांगितलें—" भांडण मिटवितांना मला स्वतःलाच तीनदां मार खावा लागला!" ह्यावरून हा शेंदाड शिपाई होता असें नव्हे. तर चिडखोरपणा व अरेरावी ह्या गुणांची पोलिसास आवश्यकता नाहीं, इतकेंच त्यानें फार गोडपणें सुचविलें!

असो. ह्या प्रकारें पहिल्या एकदोन रात्रीं येथें अनेक तमाशे दिसले. पण हीच तमासगीर विद्यार्थी मंडळी दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें म्युजिअम, लायब्ररया, लॅबोरेटरी वगैरे ठिकाणीं आपापल्या व्यासंगांत गुंग झालेली दिसली!!

## राष्ट्रीय निराशा.

लंडन, ता. २७–६–१९०२.

आजचा दिवस म्हणजे इंग्लंडच्या इतिहासांत अत्यंत बहारीचा होणार होता. पण विलक्षण

दैवदुर्विलासामुळें त्या बहारीचा तूर्त पूर्ण विरस झाला आहे! त्यामुळें ह्या राष्ट्रास किती खेद वाटत आहे आणि कांहीं लोकांचें किती खासगी नुकसान झालें आहे, ह्याचा नुसता अंदाज लागणेंही अशक्य आहे.

ह्या राज्यारोहणाचा डंका आज जवळ जवळ वर्षभर सान्या जगभर गाजत होता तेव्हांपासून त्याची सारखी जय्यत तयारी चालली होती. नुकत्याच संपलेल्या बोअर युद्धामुळें तर इंग्रजी साम्राज्याचा अगदीं कळस होऊन गेला आहे. लढाई मिटविण्याच्या कामीं स्वतः बादशहांनीं खटपट केल्यामुळें ते अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. ह्या अनेक कारणांमुळें हा समारंभ अपूर्व होणार होता. ह्या आठवड्याचे आरंभीं जगांतील देशोदेशीचे राजे अगर त्यांचे प्रतिनिधी लंडन शहरीं दाखल झाले. पाहुण्यांची इतकी गर्दी झाली कीं ह्या अफाट शहरीं देखील ह्या आठवड्यांत जागा मिळण्याची मारामार पडूं लागली. दिवसां लंडनमध्यें समारंभ पाहून रात्रीं ऑक्सफर्डमध्यें निजावयास जाण्याची देखील कांहीं लोकांस योजना करावी लागली!

गेल्या आठवड्यांतच बादशहांची प्रकृति किंचित् नादुरुस्त झाली होती. पण ती इतक्या विकोपास जाईल असें कोणास वाटलें नव्हतें. गेल्या सोमवारीं दोनप्रहरीं आमची गाडी ऑक्सफर्डहून लंडन येथील पॅडिंगटन् स्टेशनावर १२॥ वाजतां पोहोंचली असतां तेथें कांहीं विशेष गडबड दिसूं लागली. शहराचें स्वरूप तर अगदीं पालटलेलें होतें. माळा निशाणें आणि तोरणें ह्यांनीं सर्व शहर जणं हांसत होतें. आळींतील गोजिरवाणीं मुलें आपले चिमकले बावटे कंटाजनांच्या आंत खुपसून आगगाडीच्या रस्त्याच्या दोहीं बाजस उभीं होतीं, इतक्यांत वुईंडसर किल्ल्यांतून एक गाडी मोठ्या तोऱ्यानें फुसफुसत स्टेशनांत आली. तिच्या एंजिनवरचा देदिप्यमान मुकुट पाहून हिला इतका गर्व कां झाला होता हें सहज कळलें. भाग्यशाली एडवर्ड बादशहांची स्वारी आगगाडींतून घोड्याच्या गाडींत बसतांना त्यांच्या राजनिष्ठ प्रजेनें एकच आनंदाचा टाहो फोडिला!

शहराच्या रस्त्यांतून ह्याच दिवशीं इतकी गर्दी उसळलेली होती कीं, पायवाटेनें कोठें जाऊं लागल्यास अतिशय वेळ लागूं लागला. ता. २६–२७ रोजीं छावण्यांचा रस्ता सकाळीं ८ पासून बंद होईल असें शहर पोलीसनें जाहीर केलें. ज्यांच्याजवळ बसावयाच्या जागेचें तिकिट होतें त्यांसच रस्त्यांत येण्याची परवानगी होती. सुमारें ७ मैल लांबीच्या रस्त्यांत नानातऱ्हेची शोभा व रोषनाई केली होती. जागोजाग ३।४ मजले उंच प्रेक्षक बसण्याकरितां सुंदर पायऱ्या केल्या होत्या. प्रेक्षकांच्या जागेचें तिकिट १ पासून तों ७ गिनीपर्यंतचें (सुमारें १०० रुपये) होतें. निरनिराळ्या वसाहतीमार्फत जागोजाग भव्य व सुंदर कमानी उभारिल्या होत्या. अमेरिकेंतील कानडा देशांतून इंग्लंडास धान्याचा मुख्य पुरवठा होत असतो म्हणून कानड्याचे कमानीवर त्या देशांत पिकणारीं सर्व धान्यें, भाजीपाला, फळफळावळ आणि खाद्य प्राणी ह्यांचें प्रदर्शन केलें होतें.

मंगळवारीं (ता. २४) दोनप्रहरीं लंडनच्या रस्त्यांत विपरीत देखावा दिसला. भराभर जादापत्रकांचे अंक खपूं लागले! जो तो कोपऱ्यावर उभा राहून आंतील मजकूर आधाशासारखा वाचूं लागला! घटकेपूर्वीं ज्या राष्ट्राचा आनंद पोटांत मावेनासा होऊन त्यास काय करूं आणि काय न करूं असें झालें होतें, त्यासच आतां निराशेचा असा जबर धक्का बसला कीं, त्यानें तें कांहीं वेळ सुन्न होऊन गेलें. आदले दिवशीं बादशहाच्या आजारानें उलट खाल्ल्यामुळें आज त्यांवर अत्यंत कठिण शस्त्रक्रिया करण्याची पाळी आली! बादशहास आपल्या आजारापेक्षां आपल्या प्रजेची अशी सडतर निराशा झाली आणि त्यांचें इतकें जबर नुकसान झालें ह्याची वेदना अधिक दुःसह झाली. आणि 'मी मेलों तरी बेहत्तर पण वेस्टमिनिस्टर मठापर्यंत जाईन' असें त्यांच्या तोंडचें वाक्य पार्लमेंटमध्यें ना. बाल्फर साहेबांनीं सांगितलें! समारंभाची तर गोष्ट राहिलीच. पण बादशहाच्या प्रकृतीकडे सर्वांचें चित्त लागलें आहे. आज दोन दिवस सर्व कामें तशींच तहकूब पडलीं आहेत, काय करावें हें कोणासच सुचत नाहीं. पुष्कळ पाहुणे व प्रेक्षक आणि राजांच्या स्वाऱ्या विन्मुख परत गेल्या! असो,

आतां ही निराशेची कहाणी ह्यापुढें मी शब्दांनीं सांगण्यापेक्षां आपण कल्पनेनें जाणावी !

जुन्या युगांतील एकछत्री राजसत्ता व खासगी स्वामीनिष्ठा आणि नव्या युगांतील सार्वजनिक प्रजासत्ता व स्वातंत्र्यप्रीति ह्या परस्पर भिन्न वस्तूंचें बेमालूम मिश्रण इंग्लंडच्या हल्लींच्या राज्यघटनेंत आहे! ही घटना आमच्या रामराज्याहून जशी निराळी आहे तशीच हल्लींच्या युनायटेडस्टेट्समधील केवळ लोकनियुक्त राज्यांहूनही निराळी आहे. राजकीय मानसशास्त्रां तील हें एक अपूर्व कोडेंच आहे म्हणावयाचें! हें कोडें आज एक दोन दिवसांत जसें नजरेस आलें तसें कधींच आलें नसेल. कित्येक नजरेस अमेरिकन लोक ही घेडगुजरी राज्यपद्धति पाहून हांसतात. पण एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, इंग्रजी साम्राज्याची बळकटी ह्या कोड्यांतच आहे. येथवर तर शहाण्या इंग्रज मुत्सद्यांनीं हें गाडें सुरळित आणलें. पुढें काय ठेविलें आहे तें हरी जाणें !

---

## बर्टन खेड्यांतील शाळा कशी दिसली !

वुडसाइड रे. कार्लाइल.

( सुबोधपत्रिका, ता. २४–८–१९०२. )

इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर ब्रिडपोर्ट नांवांचा एक टुमदार गांव आहे. त्याचे पूर्वेस तीन मैलांवर बर्टन नांवाचें एक सुमारें ७०० वस्तीचें चिमुकलें खेडें आहे. खेड्याबाहेर गांवकुशींत एका जुन्या पण स्वच्छ इमारतींत मीं एक शाळा पाहिली. तिच्या भोंवतालीं निर्मळ साधें पण विस्तीर्ण पटांगण होतें. येथून एका हाकेवर टेंकडीच्या पलीकडे समुद्र पसरला होता. शाळेंत शिरतांना एक लहानशी देवडी लागली. तींत मुलांच्या टोप्या ठेवण्यास भिंतींत खुंट्या ठोकल्या होत्या. खालीं नंबर लावले होते. प्रत्येकाचा नंबर ठरलेला होता. शाळेची मधली मोठी मुख्य खोली ६० फूट लांब व २० फूट रुंद होती. तींत मुलांच्या वयाच्या मानानें केलेले दोन मोठे वर्ग बसले होते. मुलांची संख्या ७१ व मुलींची ६७ होती. तीं सर्व मिळूनच बसल्यामुळें मुलगे व मुली अशा फाजील जातिभेदास ह्या शाळेंत कोठें जागा राहिली नव्हती. माणसांच्या निरनिराळ्या जातिभेदांस तर ह्या बेटांतूनच हद्दपार केलें आहे, हें येथें नव्यानें सांगावयास नकोच.

शाळेंत गेल्यावर प्रथम भिंतीवर खिस्ताचीं मोठमोठीं चित्रें अगदीं लहान मुलांसही कळतील अशीं दिसलीं. समोरच्या तसबिरींत तो कांहीं लहान मुलांस आपल्या जवळ घेत होता. खालीं हें त्याचेंच वाक्य होतें. 'लहानग्यांस मजकडे येऊं द्या. स्वर्गीय राज्य अशांचेंच आहे!' भोंवतालीं त्याच्या इतर परोपकाराचें प्रदर्शन केलें होतें. शिवाय भिंतीवर चंद्र, चौक, कोन, गोल इ. अनेक रंगाच्या निरनिराळ्या आकृती जागोजाग लावल्या होत्या. मधून खंडाचे व देशांचे नकाशे कायमचे सोडले होते. शिवाय कांहीं प्रसिद्ध पुरुषांचे व स्थळांचे लहान मोठे फोटो टांगले होते.

हेडमास्तर हुषार दक्ष व अत्यंत आदरशील दिसले. त्यांची पत्नीही शाळेंत शिकवीत होती. व दुसरी एक मदतनीस शिक्षकीण होती. वहिवाटीप्रमाणें मुलांच्या सात इयत्ता होत्या; पण शिक्षकांच्या अनुभवाप्रमाणें शिक्षणाच्या सोईप्रमाणें व मुलांच्या हुषारीप्रमाणें, मुलांचे खरें वर्ग चारच होते. वर्षांतून एकदोनदां शाळेंत येणाऱ्या उंटावरील शहाण्या इनस्पेक्टरांची मास्तरांच्या मागें कोरडी पिरपिर फारशी दिसली नाहीं. त्यांस व्यक्तिस्वातंत्र्य बरेंच आहे.

६ व्या अगर ७ व्या वर्षीं मुलांचा शाळेंतील नियमित अभ्यासक्रम सुरू होतो. त्याच्या पूर्वीही कांहीं अर्भकें शाळेंत खेळावयास येतात. गरीबांचीं मुलें १५ व्या वर्षीं शाळेंतून बाहेर काम पाहण्यास जातात. शाळा खेड्यांतील असल्यामुळें मुलामुलींच्या शिक्षणांत कांहीं फरक दिसला नाहीं. मुलांपेक्षां मुली मोठ्या दिसल्या. कारण मुलांस आपला धंदा शिकण्यास लवकर शाळेंतून सुटण्याची घाई असते. शाळेंतून बाहेर पडल्यावर ५–६ वर्षांत कोणता तरी विशेष धंदा शिकून स्वतःचा निर्वाह साधावा लागतो. मुलीस तितकी घाई नसते. शाळा सकाळीं ९ पासून १२ पर्यंत व दुपारी २ ते ५ पर्यंत उघडी असते. दररोज २ प्रमाणें वर्षांतून निदान प्रत्येक मुलाच्या ४०० तरी हजिऱ्या असल्या पाहिजेत.

बाजूच्या एका खोलींत लहान मुलांचा वर्ग अगर बिनयत्ता होती. ह्यांच्या स्लेटीवर खिळ्यानें कायमच्या आडव्या उभ्या रेघा मारल्या होत्या; अक्षरें व आंकडे लिहावयाचे ते प्रत्येक चौकांत एक असे लिहीत. त्यामुळें लहानपणापासूनच प्रमाणशीर व्यवस्थेनें व रांगेनें लिहिण्याची संवय लागे. ह्याचा परिणामही मला लवकरच दिसला. कांहीं लेखी परीक्षेच्या उत्तरांचे कागद मीं पाहिले. कागदाचे छापलेले व आंखलेले ठरीव नमुने होते. उत्तरें इतक्या व्यवस्थेशीर रीतीनें लिहिलीं होतीं कीं परीक्षेच्या घाईंत तीं लिहिलीं असावींत हें संभवनीय वाटेना. पण तीं तशीं लिहिलीं होतीं ह्यांत शंका नाहीं. कोठेंही डाग अगर ठिपका दिसला नाहीं. तीन चार वर्षांचीं तीन अर्भकें लांकडाच्या निरनिराळ्या आकृतींच्या तुकड्यांनीं घरें बांधून एका बाजस खेळत होतीं.

एका मोठ्या कपाटांत शाळेची म्युझिअम होती ती अशी:—वरच्या खान्यांत साबण तयार करण्याची सामुग्री क्षार, तेलें वगैरे व निरनिराळे साबणाचे मासले; खालच्या खान्यांत दगडी कोळसा व इतर उद्भिजें; दुसऱ्या बाजूस साखरेची सामुग्री, उसाचें कांडें, मक्याचें कणीस, इ. पासून तयार झालेल्या साखरेपर्यंत रूपांतरें; त्याच्या खालीं रेशमी किड्यांच्या वेष्टणापासून तों तयार केलेल्या सुंदर लडीपर्यंत रूपांतरें; दुसऱ्या बाजस शेजारच्या कॉगडन डोंगरावर सांपडलेले जुन्या रोमन लोकांचे दांत, हाडें, थडग्यांतील भांडीं, हत्यारें वगैरे; खालच्या खणांत धान्यें, बीजें आणि कापसापासून तों कापडापर्यंत गिरणींतील रूपांतरें; दुसरीकडे भूमितीचें ज्ञान करून देण्यास निरनिराळ्या आकाराचे लहान मोठे ठोकळे ठेविले होते. एका तावदानी पेटींत शिसपेन्सिलीचे पर्याय व दुसरींत पोलाद व तांब्याच्या पट्टीपासून तों टांकाच्या टोंकापर्यंत कृति दाखविली होती. एका बाजूस चित्रांचे कांहीं कित्ते ठेविले होते त्यांत खेड्यांतील दोंदील पाटीलबुवा व दरबारांतील रणधीर सेनानी ह्यांचें तारतम्यदर्शक हावभाव हुबेहूब पण साध्या रेघांनीं दाखविले होते. कांहीं निरनिराळ्या घाटांचे गोंडस खोजे व मातीचीं इतर भांडींही होतीं. कपाटाखालीं झाडाचें एक खोड कित्येक सहस्र वर्षांपूर्वी भूगर्भामध्यें दडपून जाऊन साक्षात् दगड बनलेलें पाहण्यासाठीं ठेविलें होतें. ह्या सामुग्रीच्या साहाय्यानें मुलांच्या कुवतीप्रमाणें खालील विषयांवर गोष्टीच्या रूपानें सप्रयोग व साक्षात् पदार्थ दाखवून मुलांचें लक्ष वेधलें जाई.

| बिन यत्ता. | १, २, ३ री इयत्ता. | ४, ५, ६, ७ वी इयत्ता. |
|---|---|---|
| ऍपल पळ. | एंजिन, | दगडी कोळसा. |
| सूर्यकमळ. | सेफटी लँप. | मीठ. |
| मध, मधमाशी. | कापड, घड्याळ | वाफेचें यंत्र, पंप, |
| साबण, चामडें. | छत्री, बेडूक, | मेघवृष्टि. |
| खेड्यांतील बाग, ससा. | कांच, सुई, | 'आमचीं निशाणें' |
| पोस्टशिपाई, ऑफिस. | झाडाचे भाग, | गलबतें, समुद्र, |
| दीपस्तंभ, वर्फ, | आगकाड्या | गवत, |
| पाऊस. | इ. इ. | तारायंत्र. इ. इ. |

कोणत्याही मुलास फी मुळींच पडत नाहीं. इतकेंच नव्हे तर पुस्तकें, वह्या, पाट्या व पेना देखील शाळेंतूनच मिळतात. शाळा सुटतांना शाळेच्या वस्तु शाळेंतच व्यवस्थेनें मांडून ठेवण्याची जी कवाईत होते ती प्रेक्षणीय असते. ह्या शिवाय प्रत्येक कौंटींत २० मुलांच्या आणि २० मुलींच्या स्कालरशिपांची दरसाल गुणांप्रमाणें वांटणी होते.

मुलांचा शाळेंत जो अभ्यास होतो तेवढाच. घरीं धडे बिलकुल देत नाहींत. घरीं धडे घोकीत बसलेला एकही कोंवळा विद्यार्थी मला अजून तरी दिसला नाहीं. अलीकडे येथें सर्व शाळांतून ड्राईंगवर फारच मेहनत घेतली जाते. १२–१४ वर्षांच्या मुलांनीं काढलेल्या चित्रांची सुबकता पाहून मन थक्क झालें. चित्रकलेनें हातास कुशलता, डोळ्यांस मार्मिकता व चित्तास रसिकता येते म्हणून ह्या कलेच्या भौतिक, मानसिक व नैतिक गुणांची ह्या लोकांस मोठी चहा वाटत आहे. निदान कमींत कमी १०–१२ तरी चित्रें जींत नाहींत अशी मला ह्या देशांत एकही झोंपडी अद्यापि आढळली नाहीं. शेवटीं मुलांकडून कांहीं गाणीं म्हणून दाखविलीं. आरंभीं हारमोनिअममधून गाण्याचा सूर मास्तर सांगे. नंतर सर्व मुलें अशीं ठेक्यांत म्हणत कीं जणूं एक ब्यांडच. ह्या वरून लहानग्यांसही सुरांची माहिती झालेली दिसली. बायबलाची साधारण माहिती, कोणत्याही

विशिष्ट पंथाचीं मतें अगर धर्मवेड मुलांच्या मनांत न भरवितां शाळेंतूनच देण्यांत येतें.

शाळा सुटण्याच्या पूर्वीं शिक्षकानें प्रार्थना केली नंतर 'हे दयाळू पित्या...' अशी आर्तरवानें ह्या अर्भकांची प्रार्थना सुरू झाली. शेवटीं प्रभूप्रार्थना संपून Amen (तथास्तु) म्हटल्यावर माझे डोळे उघडले. ते केव्हां मिटले होते हें मला कळलेंच नव्हतें.

प्रार्थना आटपल्यावरोबर प्रत्येक मुलगा लष्करी थाटाचा सलाम करून आपली टोपी व्यवस्थेनें घेऊन बाहेर पडला. व्यायामशाळेंत मुलांस लष्करी व साधे डील आणि डंबेल्स शिकवितात. शाळा सुरू असतां मुलांस वरचेवर ५।१० मिनिटें पटांगणांत खेळावयास सोडतात.

कोणत्याही मोठ्या शहरापासून दूर व समुद्रकांठच्या डोंगराळ प्रदेशांतील ह्या क्षुद्र खेड्यांतील शाळेची ही व्यवस्था पाहून माझे डोक्यांत विचारांचे व मनांत विकारांचे काहुर माजलें. ह्यांत काय नवल वर! नसतें तर मात्र नवल खरें!!

---

## विभूतिपूजा.

(सुबोधपत्रिका १९–१०–१९०२.)

असा कोण हतभागी आहे कीं ज्यास शेक्सपिअर माहीत नाहीं? आणि असा कोण त्याहूनही हतभागी आहे कीं ज्यास, शेक्सपिअरच्या काव्यांचें 'भराभर पाठांतर' करून अगर त्याचीं नाटकें पाहून अनेकवार टाळ्या पिटूनही अखेर त्याची सार्वत्रिकता कळून आली नाहीं! असा कोणी दुर्दैवी असेलच तर त्यानें आपल्या अंधारकोठडींतून बाहेर उजेडांत यावें, म्हणजे तात्काळ ही गोष्ट दिसेल.

शेक्सपिअर ही विभूति आहे. इतर विभूतींप्रमाणें ती सर्व जगासाठीं आहे. अर्थात् सर्व जगाची आहे. असें असून इंग्रज जर तिला केवळ स्वदेशीय आणि राष्ट्रीय देणगी असें समजून कवटाळतील, तर ते जगाच्या हंशास पात्र होतील. ड्रायडन्, पोप वगैरे त्यांचे राष्ट्रीय कवि होत, शेक्सपिअर नव्हे. त्याच्यांत सर्व जगाचें प्रतिबिंब आहे. सर्व जगांत त्याचें प्रतिबिंब आहे म्हणून त्यास जग कळतें, जगास तो कळतो. शेक्सपिअर जर नसता इंग्रज ठरेल तर ख्रिस्त हा नुसता ज्यू ठरेल. आणि बुद्ध हाही शाक्य ठरेल. कोपर्निकसाचे सिद्धांत केवळ उलट पक्षास निरुत्तर करण्यासाठीं, एडिसनचे शोध केवळ पेटंटसाठीं असल्यास ह्या सगळ्या गोष्टींत सारखेंच सत्य आहे.

शेक्सपिअर जर सर्व जगाची विभूति आहे, तर सर्व जगानें तिची पूजा केली पाहिजे. 'दिक्कालाद्यनवच्छिन्न' जी वस्तु तीच विभूतिपदाला पोहोंचते. म्हणजे देशी, विदेशी, राष्ट्रीय, प्रांतिक, प्राचीन, अर्वाचीन हे गुण तिला फार थेंटे येतात. शेक्सपिअरास इंग्रज राष्ट्रीय म्हणत असतील, किंवा नसतील, पण केवळ ते म्हणतात म्हणून इतरांनीं शेक्सपिअरवरचा आपला हक्क सोडणें हा अस्सल मेषपात्रपणा होय. आणि ह्यास स्वदेशाभिमानाचें कारण असेल तर मात्र थट्टेची परमावधिच झाली म्हणावयाची! जगाच्या एका विभूतीस एका राष्ट्रानें बळकाविलें असें वाटल्यास इतर राष्ट्रांनीं अभिमानास पेटून आपापल्या देशांत असतील नसतील त्या विभूतींचीच फक्त पूजा करण्याचा हट्ट धरला तर ही विभूतिपूजा होणार नाहीं. केवळ मोहोरमी डोलेपूजा होईल. कारण हिच्यांत पुजेपेक्षां हमरीतुमरीचा अंश अधिक असतो.

असो. जगाच्या ज्या सर्व साधारण विभूति आहेत त्यांची सर्वांनीं मिळून गोडीगुलाबीनें पूजा केली पाहिजे. तरच पूजेचें श्रेय येईल. नाहीं तर हिंदुमुसलमानांसारखे दंगे होणार हें उघड आहे. कोठें शास्त्राचे, कोठें शिव्यांचे, कोठें सभ्य टीकेचे, कोठें आंतल्याआंत धुमसत असलेल्या विकारांचे निरनिराळे दंगे चालू राहतील. मानवी अंतःकरणास विभूतीच्या पूजेची गरज आहे. कोण नाहीं म्हणेल? पण ती वरील दंगेधोपे न माजवितां भागविणें साध्य आहे हें समंजस लोक तरी कबूल करितील.

कार्लाईलचें 'विभूति आणि विभूतिपूजा' हें पुस्तक ज्यांनीं वाचलें असेल–निदान वरवर तरी चाळलें असेल–त्यांस माहीत असेलच कीं विभूतिपूजेच्या आजपर्यंत तीन पायऱ्या झाल्या आहेत. पहिली पायरी विभूति म्हणजेच साक्षात् देव मानण्याची. हिला साक्ष प्रत्यक्ष श्रीकृष्णानें गीतेच्या दहाव्या अध्यायांत दिली आहे. 'अर्जुना

विभूति मग ती मनुष्यच नव्हे, पशु, पक्षी, पाणी, पर्वत, हवा, देव, दानव इ. इ. कांहीं असो, विभूति म्हणजे मीच स्वतः ' विभूतीचा अर्थ येथें बराच ताणला आहे. तथापि तात्पर्याला फारसा बाध आलेला नाहीं. नंतर दुसरी पायरी माणसांना जसा एकच कपडा नेहमीं आवडत नाहीं, तसाच एकच विचारही फार दिवस आवडत नाहीं. म्हणून दुसरी पायरी, विभूति म्हणजे ज्यांच्याठायीं ईश्वराची प्रेरणा होते ते थोर पुरुष असे मान ण्याची. देशी भाषेत सांगावयाचें झालें तर हे पुरुष कांहीं निव्वळ देव नव्हत तर त्यांच्या अंगांत केव्हां केव्हां देव येतो. उदाहरणार्थ शिवाजीच्या अंगांत अंबाबाई येत असे, महमदाच्या कानांत कबूतर स्वर्गाचा निरोप सांगत असे, साधु पाल ह्यास खिस्तानें उपदेशास बोलाविलें वगैरे समजुती. कालांतरानें हाही विचार जुना झाला. सर्वच माणसांच्या अंगांत देव कमीअधिक प्रमाणानें प्रसंगविशेषीं येतो असा अलीकडे शोध लागला आहे! पशूंच्या अंगांत देव कधीं येत नाहीं. अंगांत देव येणें हेंच मुळीं माणूसपणाचें लक्षण. ज्यांच्यांत हा माणूसपणा अत्यंत प्रबळ असतो त्या विभूति. ही तिसरी पायरी होय. मोठे कवि, मोठे मुत्सद्दी, मोठे जनपदहितकर्ते हे विभूति होत. हे देव नव्हत किंवा माणूस आणि देव ह्यांमधील मिश्रजात देवमाणूसही नव्हत. तर केवळ विशेष वाढलेलीं माणसेंच होत असें समजण्याचा हल्लीं प्रघात पडत चालला आहे. प्रथमपासून आजपर्यंत ज्या विभूति झाल्या त्या सर्व एकच जातीच्या. पण त्यांच्या पूजेच्या भिन्न भिन्न प्रकारामुळें त्या आह्मांस भिन्न भिन्न भासत आहेत.

शेक्सपिअर ही एक चालू पूजेची विभूति आहे. हिच्या पूजेचा प्रकार स्ट्रॅटफर्ड–ऑन–एव्हन ह्या गांवीं मला जो दिसला, तो थोडक्यांत लिहीत आहें. ऑक्सफर्डहून स्ट्रॅटफर्ड हा सुंदर आणि टुमदार गांव ४० मैलांवर आहे. तिकडे निघालों असतां वाटेनें स्ट्रॅटफर्डचा रस्ता विच्यारल्यावर लोक कौतुकानें म्हणत "कायहो, शेक्सपिअरचें घर पहावयाला निघालां? त्याची बायको ॲना ह्यातवेट हिची झोंपडी पाहण्यास विसरूं नकाहो" ह्याचा अर्थ असा कीं, आपल्याकडे जसें देहूस जावयाचें झालें तर तुकोबासाठीं, पंढरपुरास विठो बासाठीं, तसें इकडे स्ट्रॅटफर्डला जाणें तें शेक्सपिअरसाठीं. तेथें गेल्यावर तर शेक्सपिअर म्हणजे त्या गांवचा कायमचा राजाच आहे असें दिसून आलें. एलिझाबेथचें राज्य जाऊन ब्रिटनवर हल्लीं एडवर्डचें राज्य आलें आहे; पण स्ट्रॅटफर्ड येथील राजनिष्ठ प्रजेवर शेक्सपिअरचं राज्य करीत आहे व राहील. रस्त्यांतील बाया–माणसांना देखील त्याच्या चरित्रांतील खडानखडा माहिती विचारा. तो जन्मला तें घर जसेंच्या तसेंच राखून ठेविलें आहे. तेथें गेल्याबरोबर तुमच्या भोंवतीं कृष्णातटाकीं संकल्प सांगणाऱ्या ब्राह्मणांप्रमाणें रस्त्यांतील भिकार मुलांची गर्दी जमते आणि तीं सर्व एकदमच न विचारतां परवाचा म्हटल्याप्रमाणें शेक्सपिअरचें त्रोटक चरित्र ठेक्यांत पाठ म्हणूं लागतात! त्यांत शेक्सपिअरनें एकदां तरुणपणीं एक हरीण कसें चोरलें, त्याबद्दल त्यास कसें पकडलें वगैरे वगैरे चटकदार वर्णन तर पुढें पुढें येऊन गातात. शेक्सपिअर जन्मला तें घर, तो रहात होता तें घर आणि त्याच्या बायकोची झोंपडी ह्या तिन्ही ठिकाणांची उत्तम व्यवस्था शेक्सपिअरस्मारक मंडळीकडून ठेवण्यांत येत आहे. प्रत्येक ठिकाण ८।१२ आणे फी दिल्यास पहावयास मिळतें. दाखविण्यास व त्यासंबंधाची माहिती सांगण्यास माणसें ठेविलीं आहेत. घराचा ३०० शें वर्षांचा जुनेपणा जितका शाबूद राखणें शक्य आहे, तितका राखिला आहे. हा कवि लहानपणीं नेहमीं चुलीजवळच्या कोनाड्यांत बसत असे. तेंही ठिकाण दाखविण्यास कोणी विसरत नाहीं.

ह्या घराचा अति महत्वाचा भाग म्हणजे कवि ज्या खोलींत जन्मला ती खोली होय. ती अगदीं ओबडधोबड आहे. पण तिचें माहात्म्य किती! साधारण अजमासें किती लोक हें स्थळ पहावयास येतात म्हणून नोकरांस विचारतां त्यानें सांगितलें कीं, गेल्या वर्षी जगांतील निरनिराळ्या ४० राष्ट्रांचे ३०,३७६ प्रेक्षक ही खोली पाहून गेले! तावदानावर, तुळईवर, भिंतीवर सर वॉल्टर स्कॉट, कार्लाईल, ब्राउनिंग, थॅकरे इ० मोठमोठ्या दस्तुरखुद्द सह्या आहेत! परसांतील बागेत शेक्सपिअरनें आपल्या ग्रंथांत ज्या ज्या वनस्पतींचा व फुलाफळांचा उल्लेख केला आहे, त्या सर्वांची लागवड आहे. घरांत दुसऱ्या एका बाजूस

शेक्सपिअरच्या ज्या ज्या जिनसा मिळाल्या आहेत, त्यांचा संग्रह करून ठेविला आहे. घरांतून बाहेर पडल्यावर रस्त्यांतील एका दुकानाकडे पाहिल्यास चहाच्या चिनी पेल्यावर अगर एकाद्या लहानशा गुंडीवरही कवीच्या बायकोच्या झोंपडीचा ठसा उमटलेला दिसेल. कवि राहत होता त्या घरांतही त्याच्या जिनसांचा मौजेचा संग्रह आहे. चिलमी व दारूच्या पेल्यापासून तों बसावयाच्या खुर्चीपर्यंत. बागेंत एके ठिकाणीं शेक्सपिअरनें स्वतः लाविलेल्या झाडाची एक फांदी लाविली आहे. तिचें आतां जुनें झाड झालें आहे. शेक्सपिअरबरोबरच त्याच्या झाडालाही अमर करण्याचा त्याच्या भक्तांचा विचार दिसतो. एवढ्यानेंच त्यांची इच्छा तृप्त झालेली नाहीं. शेक्सपिरअरस्मारक नाटकगृह नांवाची एक भव्य आणि सुंदर इमारत व संस्था एव्हन नदीच्या कांठीं गांवाबाहेर उभी केली आहे. येथें पुस्तकालय, संग्रहालय आणि नाटकालय असे तीन भाग आहेत. शेक्सपिअरबद्दल जितकें म्हणून वाङ्मय अगर सामुग्री उपलब्ध आहे, तिचा येथें संग्रह केला आहे. चोहोंकडे कवीच्या जन्मापासून तों मरणापर्यंत निरनिराळ्या अवस्थांचें चित्रांनीं व पुतळ्यांनीं दिग्दर्शन केलें आहे. दरवर्षी त्याच्या जयंतीचा उत्सव दोन तीन आठवडे मोठ्या थाटाचा व गर्दीचा होतो. त्यावेळीं नाटकालयांत प्रसिद्ध मंडळीकडून त्याच्या प्रसिद्ध नाटकांचे प्रयोग होतात. ते पाहण्यास गांवोगांवचे रसिक लोक येतात. मागच्या ज्युबिलीच्या वेळीं तर ह्या गांवीं शेक्सपिअरपूजेची परमावधि झाली. तिचें मौजेचें वर्णन ऐकण्यांत येतें. तेव्हां ह्या कवीची मोठी मिरवणूक काढण्यांत आली होती. एका रथांत कवीचा पुतळा बसवून त्याभोंवतीं गांवांतील तरुणी देवदूतांचा पोषाख करून तुताऱ्या वाजविण्यास उभ्या केल्या होत्या. रथापुढें गावांतील शेठसावकार, महाजन वगैरेंची स्वारी चालली होती. एकंदरींत हा एक इंग्लंडासारख्या प्रॉटेस्टंट देशांतला १९ साव्या शतकांतला शेक्सपिअरदेवाचा अपूर्व छबिना निघाला होता.

मनुष्यप्राण्याची स्वाभाविक उत्सवप्रियता वेळोवेळीं कोणत्या ना कोणत्या तरी वाटेनें वर उफाळून येते. वर आल्यावर तिचा प्रवाह कोणीकडे वाहील ह्याचा नियम नसतो. समाजाचे खरे व कळकळीचे नायक असतात, ते ह्या प्रवाहास योग्य वळण लावून हित साधतात. धोरणी व व्यापारी लोक असतात ते ह्या वाहत्या पाण्यांत हात धुऊन घेतात. जिवंत मासे प्रवाहांतून उलट सुलट पोहून खेळतात. मेलेले मासे लाटांबरोबर वरवरच तरंगत जातात.

ह्या प्रकारें विभूतिपूजेचें माहात्म्य आहे.

---

## मँचेस्टर कॉलेज.

( सुबोधपत्रिका, ता. १७–८–१९०२.)

गेल्या ऑक्टोबरच्या ११ तारखेच्या तिसऱ्या प्रहरीं एक हिंदु विद्यार्थी मँचेस्टरकॉलेजचें दार ठोठावीत होता. हा ह्या देशांत एव्हां नुकताच आला असल्यामुळें, ह्याचे तोंडावर नवख्याचें प्रत्येक चिन्ह स्पष्ट दिसत होतें. आगगाडींतून ऑक्सफर्ड विद्यापीठाचें दुरून दर्शन झाल्यापासून ह्याच्या मुद्रेंत आदराची झांक कलेकलेनें वाढत होती. मँचेस्टरकॉलेज पाहिल्यावर तर ह्याची भावना ह्यालाच कळेनाशी झाली ! दाराजवळ पोहोंचल्याबरोबर ह्यास सुंदर व सुवाच्य शिलालेख दिसला तो हा–'सत्य, स्वातंत्र्य व धर्म ह्यांस वाहिलेले !' हें बाणेदार ब्रीद ह्यांस पुढें कॉलेजांतील भजनालयाच्या व पुस्तकालयाच्या दारांवरही कोरलेलें दिसलें. कांहीं वेळानें देवडीवाल्यानें ह्यास आंत नेलें. थोड्याच वेळानें वयानें व त्याहून अधिक विद्येनें वांकलेली एक लहानशी आकृति ह्याजपुढें आली. अर्थात् ती परमपूज्य डॉ॰ प्रिन्सिपाल डूमंडसाहेबांचीच होती. भर्तृहरीच्या लक्षणाप्रमाणें हे खरोखरीच 'नम्रत्वेनोन्नमंतः संतः' आहेत, ह्यांत अतिशयोक्ति अगर पक्षपात लेशमात्र नाहीं. ह्यावरही ज्यास वरील वचनाची शंका येत असेल, त्याचेंच कमनशीब म्हणावयाचें ! प्रिन्सिपालसाहेबांनीं ह्या परक्या विद्यार्थ्याचें इतक्या कळकळीनें स्वागत केलें कीं, जणुं ह्याची व त्यांची फार दिवसांची ओळख आहे. असो. पण हा हिंदु विद्यार्थी ह्या विलायतेंतील धार्मिक कॉलेजाचें दार ठोठावीत कां उभा आहे ! भरतभूमि एके काळीं सुवर्णभूमि होती; पण आतां दुष्काळाचें माहेरघर

झाली आहे म्हणून कांहीं हिंदु विद्यार्थी कायदे, कला इ. ऐहिक विषय शिकण्यास इकडे आल्यास तें येथें साहजिक आहे. पण धर्माबद्दल आर्यांच्या कीर्तीचा नगारा परके देशांत देखील हल्लीं वाजत असतां हा वेडा पीर येथें कां ? आर्यांच्या वंशजांस बापुडें मँचेस्टरकॉलेज धर्म तो काय शिकविणार ? कांहीं दृष्टीनें ही शंका अगदीं यथार्थ आहे. धर्म ही बाब मुळीं पढिक शिक्षणाची नव्हेच. येथें परमेश्वरच गुरु, विश्व हीच शाळा आणि सृष्टि हेंच पुस्तक, हें कोण सुज्ञ नव्हे म्हणेल ? मनुष्य काय मनुष्यास धर्म देणार ! ह्या दृष्टीनें पाहतां जेथें धर्म नाहीं, तेथें तो उत्पन्न करण्याचा स्वतः मँचेस्टर कॉलेजचाही इरादा नाहीं. दुसऱ्या दृष्टीनें पाहतां धर्मशिक्षणांत प्राणायाम कसा करावा, श्राद्धमंत्र कसे म्हणावेत, अगर बाप्तिस्मा अथवा होली कम्यूनियन कसें घ्यावें वगैरे प्रकारच्या गोष्टी येत असल्यास आर्यांच्या वंशजांस धर्म शिकविण्याची गोष्ट तर एकीकडेसच राहो, पण येथील खिस्त्यांसही असला लौकिक खिस्तीधर्म शिकविण्यास मँचेस्टर कॉलेज केवळ नालायक आहे; आणि ह्या नालायकीबद्दल कॉलेजास मुळींच वाईट वाटत नाहीं. ज्या धर्माचे उपदेशक तयार करण्यास्तव ह्या कॉलेजाची योजना आहे त्या धर्मांतच अशा गोष्टींस थारा मिळत नाहीं. तर ह्या वरील कला शिकूं इच्छिणारांनीं मँचस्टरकॉलेजाच्या वाटेस जाऊं नये हेंच बरें ! धर्माची देणगी देवानें माणसास आधींच देऊन ठेविली आहे व हल्लींही दरघडी तो ती देत आहे. पण ह्या बीजरूपी देणगीची लागवड करणें हें माणसाचें काम आहे आणि त्यांतच दात्यानें दिल्याचें चीज होणार आहे. देव देतो म्हणून गुडघ्यांत डोकें खुपसून बसणें केवळ नेभळेपणाचें लक्षण आहे. उत्तरोत्तर विकास पावणाऱ्या मानवी शक्तीच्या साहाय्यानें व बदलणाऱ्या परिस्थितीस अनुसरून, श्रेष्ठानें कनिष्ठांस, जाणत्यानें नेणत्यांस, पवित्रानें पतितांस ह्या देणगीचा फायदा दिला नाहीं आणि स्वतः आपल्यामध्यें ती वाढविली नाहीं, तर धर्माची मूळज्योत विझली आहे असें समजावें. ह्या शुद्ध बुद्धीच्या काळांत श्रद्धेची बाजू उदार धर्मानें बरीच राखिली आहे. आणि शुद्ध बुद्धीच्या पायावर धर्मशिक्षण येथल्याप्रमाणें इतर थोड्याच ठिकाणीं मिळत असेल. ह्या कॉलेजांतून विद्यार्थी बाहेर पडल्याबरोबर त्याच्या अंगीं धर्माचा दिग्विजय करण्याची पात्रता येते असा मुळींच अर्थ नव्हे. ती त्या त्या व्यक्तीच्या बळावर अवलंबून आहे. इतिहास, तत्त्वज्ञान, श्रुतिग्रंथ, तुलनात्मक टीका, धर्मोपदेश आणि शुद्ध खासगी वर्तन इ. अनेकद्वारां धर्मशिक्षणाचें काम हें कॉलेज निःपक्षपातानें, कळकळीनें, दक्षतेनें, धैर्यानें आणि शांतपणें बजावीत आहे. आर्यांचा वंशज असो कीं आफ्रिकेंतील शिद्दी असो; कॉलेजाचीं द्वारें दोघांसही सारखींच उघडीं आहेत. दोघांसही शिकविण्यास कॉलेजाचा अधिकार आहे. शिकणाऱ्यांत शिकण्याचीच पात्रता आहे कीं नाहीं ही शंका शोभेल, पण वरील शंका शोभत नाहीं.

ह्यावरून इतकें तरी दिसून येईल कीं, हा हिंदु विद्यार्थी येथें आला ही कांहीं नवगी गोष्ट झाली नाहीं. तशांत ह्या कॉलेजांत आलेला हा पहिला विद्यार्थी नव्हे. ह्याचेमागें तीन विद्यार्थी येथें आले असून ते आतां बंगाल्यांत धर्मप्रचाराचें काम मोठ्या आस्थेनें बजावीत आहेत. शिवाय हल्लीं जपानांतूनही एक जपानी विद्यार्थी ह्याच हेतूनें ह्या कॉलेजांत उदार धर्माचें शिक्षण मिळवीत आहे. ह्या सुधारलेल्या शतकांत केवळ भौतिक सुधारणाच होत आहे, जडवाद मानत आहे, धर्माची ग्लानि होत आहे वगैरे निराशेचे उद्गार शहाण्या लोकांच्या तोंडांतूनही कधीं कधीं ऐकूं येतात, ते केवळ त्यांचें लक्ष ह्या नवीन धर्मजागृतीकडे जावें तितकें न गेल्यामुळेंच होय. १९ व्या शतकापासून सर्व सुधारलेल्या जगांत धर्मविचार, आचार आणि संस्था ह्यांत जी हळू हळू उत्क्रांति घडत आहे, तिची लाट हिंदुस्थानांतही ब्राह्मसमाजाच्या रूपानें उसळली आहे. अर्थात् निरनिराळ्या ठिकाणीं एकाच उदात्त हेतूनें प्रेरित होऊन काम करणाऱ्यांमध्यें परस्पर सहानुभूति उत्पन्न होणें साहजिक आहे; आणि वर सांगितल्याप्रमाणें ह्या कॉलेजांत पूर्वेचा व पश्चिमेचा जो संबंध घडत आहे तो ह्या सहानुभूतीचाच परिणाम होय. अशा रीतीनें परस्परांस परस्परांची नीट समज पडून, सर्वांत एकच तत्त्व मंगलकार्य घडवीत आहे ह्याची प्रचीति पटली; परमेश्वरानें समग्र

मानव जातीस जगाच्या इतिहासांत जो वारंवार उपदेश केला आहे, जे पवित्र आत्मे पाठविले आहेत व जो अनुभव दिला आहे ती सर्व जगाची समाईक संपत्ति आहे. तिचा माझें तुझें न करितां गोडीगुलाबीनें उपभोग घेण्यास आम्ही शिकलों तर वावगें होईल काय ? मँचेस्टरकॉलेज तर ह्याहून दुसरें कांहीं शिकवीत नाहीं. अशा उदार प्रयत्नानें जर का एकाद्या धर्माच्या संस्थेस खरो-खरच धक्का पोहोंचत असेल, तर ती संस्था चोरांच्या किल्ल्याप्रमाणें जितक्या लवकर ढासळेल तितकें बरेंच म्हणावयाचें ! आणि ती तशी ढासळल्यास चोरांशिवाय इतरांस वाईटही वाटणार नाहीं !!

पण धर्माशीं ज्या गोष्टींचा मुळींच संबंध नाहीं अशांमुळें खऱ्या धर्माच्या मार्गांत ह्या सुधारलेल्या काळांत अद्यापिही अडथळे येत आहेत. आमचा देश बोलून चालून पुराणप्रिय, अवजड आणि न हालणारा. परंतु वाऱ्याच्या वेगानें प्रगतीच्या वाटेनें धांवणाऱ्या इकडील राष्ट्रांत तरी काय विशेष आहे ! सबंध युरोपांत मँचेस्टरकॉलेज हें एकच आणि तें ही एकलकोंडें. पाखांड्यांचें कॉलेज म्हणून त्यावर जो एकदा शिक्का बसला आहे तो अद्यापि पुसला गेला नाहीं. ऑक्सफर्डच्या विद्यापीठांत नावडतीच्या पोराप्रमाणें त्याची हेळसांड होत आहे. ह्या सोंवळ्या युनिव्हर्सिटीस अद्यापि ह्या कॉलेजाचा विटाळ खपत नाहीं. तथापि सुधारणेची सांथच अशी कांहीं तीव्र आहे कीं, ह्या कॉलेजचीं उदार मतें नकळतच इंग्लंडच्या साऱ्या चर्चेमधून झिरपत आहेत ! त्यामुळें युनिटेरिअन धर्माचा प्रसार दलदलींत पडलेल्या पावसाप्रमाणें, वर दिसावा तितका दिसत नाहीं. धर्माच्या इतर कॉलेजांतील अध्यापकांस व विद्यार्थ्यांसही ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या व चवथ्या शतकांत मतांचे जे एकदा जुने नमुने ठरून गेले आहेत त्यांप्रमाणें आपला विश्वास आहे अशी उघडपणें प्रतिज्ञा घ्यावी लागते. असल्या फासांत ह्या कॉलेजास कांहीं करमणूक वाटत नसल्यामुळें ते येथें घडत नाहींत. ह्या कॉलेजाबाहेर उदार मतच नाहीं असें म्हणणें म्हणजे ब्राह्मसमाजाबाहेर हिंदुस्थानांत सुधारणाच नाहीं असें म्हणण्याप्रमाणें चुकीचें होईल. पण आधुनिक शास्त्रांस व तत्त्वज्ञानास पटेल अशा प्रकारचें धर्माचें उदार मत उघड उघड प्रतिपादणें ह्या समाजाच्या सर्व दर्जांतें पसरविण्यास उपदेशक व आचार्य तयार करणें हें काम मात्र ह्याच एका कॉलेजांत होत आहे.

कॉलेज म्हणजे ५।७ प्रोफेसर असावयाचे. त्यांनीं एकाद्या युनिव्हर्सिटींत होणाऱ्या परीक्षांकरितां दरसाल २००।३०० विद्यार्थ्यांस ठराविक पुस्तकांतील विषयांत ठराविक पद्धतीनें तयार करावयाचें, व शिकणाऱ्यांनींही परीक्षेच्या धोरणानें संधान बांधावयाचें, इ. इ. कल्पना आमच्या लोकांच्या मनांत साहजिक येतात; पण वरील कॉलेजाचा ह्या कल्पनांशीं फार थोडा मेळ बसतो. हें कॉलेज मागें सांगितल्याप्रमाणें केवळ धार्मिक अध्यापनाकरितां असून, ह्याचा बहाणा अट्टल सुधारकी असल्यामुळें कोणत्याही बुढ्या युनिव्हर्सिटीस ह्याचा संसर्ग सोसत नाहीं ( आणि ह्या कॉलेजासही त्याविषयीं पर्वा नाहीं ) म्हणून अर्थात् कॉलेजांतील अध्ययनाचा युनिव्हर्सिटीच्या परीक्षांशीं कसलाही संबंध नाहीं. शिवाय कॉलेजाचा उद्देश उमेदवारांस सुधारकी पदव्या देण्याचा नसून, उदार व जिवंत धर्माचा समाजांत सतत प्रसार करण्यासाठीं दरवर्षीं ताज्या दमाच्या तरुण उपदेशकांचा पुरवठा करण्याचा आहे.

अठराव्या शतकांत युरोपांत आधुनिक शास्त्राचा बहार अगदीं नवा होता. तेव्हां जुना धर्म व नवें शास्त्र ह्यांमध्यें मोठा लढा पडला होता. ह्या दोहोंमध्यें कधीं समेट होणें शक्य नाहीं असें सुशिक्षितांना वाटूं लागलें होतें. ' प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हेंच धर्माचें लक्षण आणि जड वस्तु व जड चमत्कार ह्यांची वरवर मीमांसा करणें हीच काय ती शास्त्राची इतिकर्तव्यता, असा जोंपर्यंत समज आहे, तोंपर्यंत वरील दोन्ही तत्त्वें परस्परविघातक आहेत अशी तर्कप्रिय माणसांस भ्रांति पडणें अगदीं साहजिक आहे. पण मँचेस्टरकॉलेजच्या संस्थापकांना तर्कच केवळ प्रिय नव्हता आणि वरील दोन्ही तत्त्वांचीं विलक्षण लक्षणेंही त्यांना मान्य नव्हतीं. म्हणून त्यांनीं अशा आणीबाणीच्या प्रसंगीं म्हणजे इ० स० १७८६ सालीं हें कॉलेज काढलें. वास्तविक पाहतां ही संस्था इ० स० १७५७ सालीं वॉरिंगटन अकॅडमी या नांवानें वॉरिंगटन येथें स्थापन झाली

श्री ... नं. ....

होती; हिचें पुढें स. १७८६ साली मँचेस्टर कॉलेज असें रूपांतर झालें. ह्या क्रांतीच्या काळीं संस्थापकांचा धर्म व शास्त्र ह्या दोहोंवरही सारखाच विश्वास होता. म्हणजे ह्यांचा धर्म शास्त्रीय होता व ह्यांचें शास्त्र धार्मिक होतें. म्हणूनच केवळ असली अद्वितीय संस्था तशा काळीं उद्भवली. जुना धार्मिकपणा व नवी राहटी ह्या दोन कुबड्यांवर चालूं पाहणारे सभ्य गृहस्थ हल्लींच्या प्रगतीच्या काळींही कांहीं कमी सांपडतील असें नाहीं, पण ह्या कॉलेजच्या चालकांच्या अंगीं तेव्हांपासून आतांपर्यंत आपल्या पायांवरच कुबड्यांच्या साह्याय्यावांचून चालण्याइतकी सचोटी आणि बळ हीं दोन्ही आहेत; इतकेंच नव्हे, तर व्यायामामुळें हीं दोन्हीं सारखीं वाढत आहेत. वॉरिंगटन अकॅडमींतील धर्मशास्त्राचे (Theology) पहिले अध्यापक ( १७५७—१७६१ ) डॉ. जॉन् टेलर हे वर्षारंभीं आपलें व्याख्यान सुरू करण्यापूर्वी खालील चार तत्वें विद्यार्थ्यांच्या मनावर पूर्ण ठसवीत असत:—

१ सत्यदेवतेच्या नांवानें मी तुम्हांस बजावितों कीं, तुम्ही आतांच्या व पुढच्या धर्माध्ययनांत, श्रुतिग्रंथांतील साधक–बाधक प्रमाणें आणि तुमची स्वतःची सदसद्विवेकबुद्धि ह्या दोहींकडे दक्षतेनें, निःपक्षपातानें व कसोशीनें नेहमीं लक्ष्य पुरवा; कल्पनेचा झपाटा आणि निराधार तर्क ह्यासंबंधीं सावध असा.

२ मीं प्रस्थापलेलें कोणतेंही तत्त्व अगर विचार ह्यांचा जो भाग तुम्हांस सप्रमाण दिसेल, त्यापेक्षां अधिक मुळींच पत्करूं नका.

३ मीं हल्लीं शिकविलेलें व तुम्हीं मानलेलें कोणतेंही तत्त्व तुम्हांस पुढें कच्चें अगर खोटें दिसेल, तर त्याबद्दल शंका बाळगा किंवा तें मुळींच टाकून द्या.

४ आपलें मन नेहमीं मोकळें ठेवा; दुराग्रह व पक्षाभिमान ह्यांस थारा देऊं नका; इतर ख्रिस्ती बंधूंशीं प्रेमानें व सलोख्यानें राहण्याचें साधन करा; स्वतः विचार करून स्वतः निवाडा करण्याचा जो तुम्हांस जन्मतः हक्क आहे, त्याच्या आड दुसऱ्यांस येऊं देऊं नका आणि दुसऱ्याच्या हक्काच्या आड तुम्ही जाऊं नका.

ही आरंभींच्या अध्यापकांची गोष्ट झाली. मध्यंतरीं डॉ. मार्टिनो ह्या कॉलेजांत पुष्कळ वर्षें अध्यापक होते. त्यांचें स्वतःचें धार्मिक अध्ययन ह्याच कॉलेजांत झालें होतें. इ. स. १८९७ सालीं त्यांचें या कॉलेजांतील अध्ययन संपून बरोबर ७० वर्षें झालीं, म्हणून कॉलेजकमिटीनें त्यांस अभिनंदनपत्र पाठविलें; त्यांस पाठविलेल्या उत्तरांत मार्टिनोचे खालील सुंदर उद्गार आहेत.

" ह्या कॉलेजनें मला एक बोध दिला आहे; तो हा कीं मीं नेहमीं शिकत रहावें, आणि शिकवीत असतांना तर विशेषेंकरून शिकत असावें. हा बोध मजमध्यें पूर्णपणें बिंबला नसेल, तर माझा हा ७० वर्षांचा संबंध ह्या प्रगमनशील कॉलेजास, एखाद्या रिकामा पगार खात शिलकेंत पडलेल्या पेन्शनदाराप्रमाणें, केवळ भारभूत झाला असेल. कॉलेज–शिक्षकांचा मी एका गोष्टीविषयीं अत्यंत ऋणी आहें, ती ही कीं जी गोष्ट आपणास 'एकदां' खरी वाटली ती फिरफिरून दोनदां शिकविणें हा गुन्हा आहे, हें त्यांनीं मला शिकविलें, ....नवे विचार आणि ताजें वाङ्मय ह्यांचा समाजांत जसजसा प्रसार होईल, तसतसा आपण मागें बांधलेल्या विचाररचना विसकळून त्यांच्या पायांवर नव्या इमारती उभारल्या पाहिजेत. म्हणजेच *शिक्षकांच्या मनावर गंज चढणार नाहीं व त्यांची गणना केवळ मोडक्या तोडक्या टाकाऊ सामानांत होणार नाहीं....*" ही मधली स्थिति झाली. हल्लींचे प्रिन्सिपाल डॉ. ड्रमंड ह्यांनींही गेल्या वर्षाचे आरंभीं आपलें व्याख्यान सुरू करण्यापूर्वी आम्हांस मोठ्या कळकळीनें सांगितलें कीं, बाबांनो, आम्हीं जो तुमच्यापुढें कसलाही विचार करितों तो केवळ तुमच्या विचारास मदत व्हावी म्हणून होय; त्यावर जबरी करण्यासाठीं नव्हे. तुम्हांस नापसंत झालेलीं आमचीं मतें तर बाजूसच राहोत. पण जर एकादें मत आम्हीं निरुत्तर प्रतिपादिलें आणि त्याचीं सर्व प्रमाणें मिळालीं असें तुम्हांस वाटलें तरी तेवढ्यावरच तुम्ही तृप्त राहूं नका. तुमचे व्यक्तिविषयक शोध नेहमीं चालू असावेत, आमच्या प्रयत्नानें तुमचे शोध अडूं नयेत किंवा आळसाऊं नयेत.

ह्या प्रकारें स्वातंत्र्य आणि मोकळेपणा हें कॉलेजचें ब्रीद केवळ शब्दांतच नाहीं तर करणींतही आहे. कॉलेजचें एकंदर धोरण वाऱ्याप्रमाणें

मोकळें, निर्भय व निःशंक आहे. ही गोष्ट प्रोफेसरांची जी नेमणूक झाली आहे त्यावरून दिसून येत आहे. इक्सले ह्यांनीं मागें एकदां म्हटलें होतें कीं जर्मनी व हॉलंद ह्या दोन देशांखेरीज सान्या यूरोपांत कोठेंही धर्मशास्त्राच्या अध्यापकास स्वतंत्र विचार व शोध करण्याची सवड नाहीं. ( कारण जुन्या धर्मांचीं जीं कांहीं ठराविक मतें आहेत त्यांबाहेर अध्यापक जाईल तर त्याची वरणी बंद होते. ) इक्सलेसाहेबांस म्यांचेस्टर कॉलेजचा अपवाद आठवला नसावा. किंवा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचें मोठें नांव व दुर्भेद्य दुराग्रह इकडेच त्यांचें सर्व लक्ष्य लागलें असावें. ह्या कॉलेजांतील अध्यापकामागें ही अडाणी दहशत मुळींच नाहीं. तथापि हें सुधारकी कॉलेज म्हणून ह्यांतील सर्व अध्यापक जहाल सुधारक आहेत असेंही नाहीं. तसें असल्यास ह्याची स्वतंत्रता केवळ एकदेशीय झाली असती. आणि अशा बेफाम स्वातंत्र्याचें तुफान—तारूं कधींच एकाद्या खडकावर आपटून नामशेष झालें असतें. पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. हल्लीं कॉलेजांत पांच कायमचे व दोन हंगामी अध्यापक आहेत. कायमच्या पांचांपैकीं जुन्या कराराचे अध्यापक रेव्ह. ॲडिस हे इतके जुन्या मताचे आहेत, कीं हे युनिटेरियन आहेत, कीं नाहींत ह्याची पुष्कळ वेळां शंका येते. तथापि कॉलेजाकडून त्यांस कसलीही उपाधि पोंचत नाहीं. इतकेंच नव्हे तर साप्ताहिक उपासनेंत पाळीप्रमाणें ह्यांचीही उपासना होते. मात्र तेव्हां तरुण विद्यार्थ्यांत व गांवांतील कांहीं युनिटेरियन मंडळींत किंचित् कुजबुज होते. (आमच्या प्रार्थनासमाजांतील व्यासपीठावरून एकाद्याचा नकळत अद्वैताकडे तोल गेल्याबरोबर समाजाची मंडळी लगेच कशी एकमेकांच्या कानांशीं जाते ह्याची मला ह्या प्रसंगीं आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. )

उलट पक्षीं, तुलनात्मक धर्मांचे अध्यापक प्रो. कार्पेंटर व तत्वज्ञानाचे अध्यापक प्रो. ॲपटन् हे अगदीं बावनकशी सुधारक आहेत. प्रि. परमपूज्य डा. ड्रूमंड हे जणू तोल राखण्यासाठींच कीं काय, मध्येंच मेरूप्रमाणें स्थिर आहेत. सुधारक, उद्धारक, नवे जुने हीं विशेषणें त्यांस लागू नाहींत. ते आपल्या आध्यात्मिक तेजोबलानें द्वंद्वातीत आहेत. ( येथें डॉ. भांडारकरांची आठवण होते. )

असो. ह्याप्रमाणें येथील हवा अगदीं मोकळी व शुद्ध आहे. स्वातंत्र्याचा प्रकार पूर्ण व पवित्र आहे. पुष्कळ वेळां असें होतें कीं स्वातंत्र्याची पताका खांद्यावर घेऊन नाचत सुटणारी मंडळी आपल्याच पायांखालीं दुसऱ्या मुक्या प्राण्यांचें स्वातंत्र्य तुडवीत असतात, तें घाईंत बिचाऱ्यास कळतच नाहीं. तसें येथें होत नाहीं. स्वातंत्र्यामुळें पुरातन वस्तूसंबंधानें अनादर उत्पन्न होत नाहीं. तर त्या वस्तकडे जाण्याची वाट मोकळी होते आणि तिचें साक्षात् दर्शन होऊं लागल्यामुळें आदरबुद्धि वाढूं लागते. जुन्या नव्याचा कलह मिटतो. असें कां तर कॉलेजच्या दारावर ‘ स्वातंत्र्य ’ येवढींच अक्षरें नाहींत तर त्या बरोबर ‘ सत्य ’ व ‘ धर्म ’ हीं हीं आहेत. ‘ स्वातंत्र्य ’ दारावरच नाहीं तर आंतही आहे हें वर सांगितलें. त्याप्रकारें ‘ सत्य ’ व ‘ धर्म ’ ह्यांचींही कार्यें घडत आहेत. तीं कॉलेजांतच नव्हे तर त्याद्वारें सर्व युनिटेरियन् समाजांत घडत आहेत. कसें तें हळु हळु पुढें कळेल.

---

## युनिटेरिअन् समाज.

### पूर्वपीठिका व इतिहास.

हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें ब्राह्म अगर प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज ह्या उदार धर्मांच्या संस्था पुरातन हिंदुधर्मांतून विकास पावून, आधुनिक शास्त्र, तत्वज्ञान व विचारपद्धति ह्यांशीं विसंगत न होतां ज्या एका सनातन व सार्वत्रिक धर्माचें कार्य करीत आहेत त्याच धर्माचें कार्य युनिटेरिअन् समाज हा इंग्लंड, अमेरिका इ. सुधारलेल्या पाश्चात्य देशांत करीत आहे.

युनिटेरिअन् ह्या इंग्रजी पदाचा अर्थ एकवादी असा आहे. १६ व्या शतकांत खिस्ती धर्मांत जी मोठी सुधारणा झाली त्यानंतर हें नांव प्रचारांत आलें. पण ह्याचा खरा अर्थ कळण्यास खिस्ती धर्माच्या अगदीं मुळाशीं गेलें पाहिजे. खिस्ती लोक जरी देव एकच आहे असें मानतात, तरी त्याचे तीन पुरुष आहेत अशी त्यांची समजूत आहे. पितादेव, पुत्रदेव ( खिस्त ) पवित्र आत्मा हें त्र्यात्मक कोडें प्रचलित खिस्ती

धर्मांचें केवळ जीव आहे. ह्या कोड्यावर ज्यांचा विश्वास नाहीं ते जुन्यांच्या मतें खिस्ती नव्हत व त्यांस पुढें गतिही नाहीं. ह्याच्या उलट युनिटेरिअन् लोक परमेश्वर सर्वतोपरी एकच आहे व खिस्त हा केवळ एक अति पवित्र साधु पुरुष पण इतरांसारखा मनुष्य होता असें समजतात. खिस्ती श्रुतीचें व धर्मेतिहासाचें काळजीपूर्वक संशोधन केल्यास जिज्ञासूला सहज दिसून येईल कीं, हा कूटात्मक त्रयवाद मुळांत नसून खिस्ता नंतर सुमारें ३०० वर्षांनीं धर्माधिकाऱ्यांनीं कांहीं कारणास्तव आंत घुसडला आहे. स्वतः खिस्तास अगर त्यानें नेमलेल्या बारा संदेशकांस हें कोडें माहीत नव्हतें. त्याच्या शिकविण्यांत ह्याचा उल्लेख नाहीं हें साहजिक आहे. मागाहून सेंट पॉल ह्यास संदेशक नेमण्यांत आलें. खिस्ती धर्मात खिस्ताच्या खालोखाल पॉल ह्यानें अति मोठी कामगिरी बजावली आहे. किंबहुना पॉल झाला नसता, तर खिस्तानें केलेलें धर्मविधान जुन्या यहुदी धर्माचाच केवळ एक सुधारलेला पंथ बनून थोड्या काळांत नामशेष झालें असतें. खिस्ताप्रमाणें त्याचे बाराही संदेशक यहुदीच होते. खिस्ताचा उपदेश ऐकूनही त्यांचीं मनें व्हावीं तितकीं उदार झालीं नव्हतीं. त्यानें दिलेल्या सार्वत्रिक देणगीचा फायदा यहुदी तर बाह्य जगास देण्यास ते तयार नव्हते व समर्थही नव्हते. पण स्वभावतः हिंमतवान पॉल ह्यास खिस्तानें जरी संदेशक नेमलें नव्हतें, तरी त्याच्या अतिरिक्त चांगुलपणानें त्यास झपाटलें होतें. त्या प्रेरणेसरशीं पॉल बेफाम झाला. आणि यहुदी कोतेपणाचा कोट फोडून ग्रीक, रोमन, मॅसिडोनियन इ. लोकांत त्यानें शुभवर्तमानाची दौंडी पिटविली. ह्या प्रकारें शुभवर्तमानाचा चोहोंकडे प्रसार झाला खरा, पण त्यासरसा त्याच्या शुद्ध साधेपणाला बराच बाध आला. ग्रीक, अलेक्झांड्रियन् वगैरे लोक स्वभावतःच तत्त्वज्ञानपटु व तर्कप्रिय. तेथील ब्राह्मणांनीं ह्याच्या पूर्वीच अध्यात्मशास्त्रांत पुष्कळ सिद्धान्त व कोटिक्रम केले होते. खिस्ताचें शुभवर्तमान व विचित्र चरित्र हे विषय पुढें आल्यावर खिस्तानंतर पहिल्या तीस शतकांत त्याच्या जन्माविषयीं व स्वरूपाविषयीं नाना मतें, नाना उपपत्त्या आणि तदनुसारें परस्पर विरोधी पंथही उद्भवले. ग्रीक तत्त्वज्ञांनीं खिस्त म्हणजे शब्दब्रह्म (Logos) असें ठरविलें. इतरांनीं त्यावर आपला अवतारवाद लादला. शेवटीं ह्या मतांची व पंथाची इतकी गर्दी व मारामारी झाली कीं, खिस्ती धर्माच्या अभिषिक्त अधिकाऱ्यांस धर्माचें मुख्य विधान कोणतें, तें कायम कसें राखावें आणि त्याची अंमलबजावणी कशी करावी ह्याची मोठी काळजी पडली. ह्याच संधीस कान्स्टँटिनोपलचा रोमन बादशहा कॉन्स्टँटाइन हा राजकीय हेतूनें खिस्तीधर्माकडे वळला होता. त्याला ही खिस्तीधर्माची डळमळणारी इमारत सावरावयाची होती. म्हणून त्यानें इ. स. ३२५ सालीं नायसिया येथें मोठी धर्मपरिषद् भरविली. तींत सर्व धर्माधिकारी विवादक जमले होते. त्यांनीं अर्धा वाद, अर्धी जबरी करून शेवटीं वरील कूटात्मक त्रयवाद (Trinity) स्थापला. पण एवढ्यानेंच हा खिस्ताच्या स्वरूपाविषयीं वाद मिटला नाहीं. एरियस आणि त्याचे अनुयायी खिस्ताचें मनुष्यत्व वेळोवेळीं प्रतिपादूं लागले. इ. स. ४५१ पर्यंत चार परिषदा भरल्या. शेवटीं रोमचा पहिला पोप लिओ दि ग्रेट यानें फर्माविलें कीं, खिस्त हा पूर्ण मनुष्यही आहे आणि पूर्ण देवही आहे. मेरीच्या पोटीं जन्मला म्हणून मनुष्य, आणि मेरी ही कुमारी होती तिच्यांत गर्भ देवापासून आला म्हणून तो देव, इ०. ह्या अवधींत रोमच्या मठाचा अधिकार पूर्ण स्थापित झाला होता. पोपच्या हातीं स्वर्गाच्या किल्ल्या आल्या होत्या इतकेंच नव्हे, तर यूरोपच्या राजकीय गादीचा मक्ताही त्यानें आपलेच हातीं घेतला होता. ह्या राजकीय व सामाजिक एकछत्री राज्याचीं पुढील एक हजार वर्षे यूरोपच्या इतिहासांत अंधारयुग ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. धर्माचीं मतें, समाजाचीं कृत्रिम बंधनें व व्यक्तीचे आचार ह्याचे जे एकदा कायमचे ठसे बनून गेले ते पुढील हजार वर्षांत कोणाच्यानेंही पुसवले नाहींत.

१६ व्या शतकांत लथर आणि कॅल्व्हिन् ह्या पराक्रमी पुरुषांचा उदय झाला. त्यांनीं पोपचें प्रामाण्य, त्याच्या हस्तकांचा जुलूम, प्रायश्चित्ताचा बाजार वगैरे अनेक अधर्माविरुद्ध धर्मयुद्ध करून अर्ध्या अधिक यूरोपाचा उद्धार केला. पण लथर अगर कॅल्व्हिन् हे कांहीं पूर्ण सुधारक नव्हते. (कोणाही एका व्यक्तीस सुधारणेंत पूर्ण यश

मिळविणें फार कठीण आहे.) ह्या दोघांनीं पोपचें प्रामाण्य झुगारून पाडिलें; पण कॅथॉलिक मतानें ४ थ्या ५ व्या शतकांत धर्ममताचे जे ठसे जुळवून ठेविले होते ते जसेच्या तसेच स्वीकारले, इतकेंच नव्हे तर ह्या दोघांनीं आपल्या नवीन अधिकार-बळानें वरील मतांचें प्रामाण्य गाजविलें. सुधारलेल्या धर्मांत श्रुति शब्दशः प्रमाण झाल्या इतकेंच नव्हे तर त्या शब्दांचा अर्थही वरील मतास अनुसरूनच करणें भाग पडलें. परंतु ह्या सुधारणेमुळें धर्मबाबतींत स्वतंत्र विचाराची जी एकदां लाट उसळली ती अशी मध्येंच थांबविणें शक्य नव्हतें. साधुसंतांच्या मूर्तींची पूजा बंद केली, प्रायश्चित्तें विकण्याची चाल बंद केली, बायबलाची सुधारून नवी आवृत्ति काढली तथापि कांहीं विचारी माणसांचा उपद्व्याप राहिला नाहीं. खिस्त हा मनुष्य कीं देव, केवळ त्याच्यावर विश्वास ठेविल्यानें मोक्ष मिळतो कीं सत्कर्म केल्यानें मिळतो, मनुष्यप्राणी जन्मतःच पापी आहे काय, कांहीं आत्म्यास गति व कांहींस अधोगति ही देवानें आधींच निवडानिवड केली आहे हे खरें काय, वगैरे जुन्या प्रश्नांसंबंधी पुनः विचार सुरू झाला. पण लूथर आणि कॅल्व्हिननें ह्या बाबतींत अगदीं दुराग्रह धरिला. इ. स. १५३९ सालीं कॅथराईन वीगल नांवाच्या एका वृद्ध बाईस ह्यासंबंधी स्वतंत्र विचार केल्याबद्दल जिवंत जाळण्यांत आलें. सर्व्हिटस् नामक एका स्पॅनिश डॉक्टरानें 'खिस्तीधर्माचा उद्धार' ह्या नांवाचा एक स्वतंत्र विचाराचा ग्रंथ लिहिला. म्हणून त्यास पाखंडी ठरवून कॅल्व्हिन् ह्या सुधारकानें इ. स. १५५३ त जिवंत जाळविलें. सर्व्हिटस् हा पहिला नांवाजलेला युनिटेरिअन् होय.

## पोलांड ट्रान्सिल्व्हानिया व हंगेरी.

हॅलॅमनें म्हटलें आहे कीं, सर्व्हिटसच्या राखेंतून धर्मसहिष्णुतेचा पहिला अंकुर उगवला. सर्व्हिटसच्या मागें ब्लँड्राटा नांवाच्या एका इतालियन वैद्यानें युनिटेरिअन् मताचा प्रसार पोलांड देशांत चालविला. हा देश जरी कॅथॉलिक् होता तरी त्यावेळीं तेथें पहिला व दुसरा सेजिस्मंड असे यूरोपांतील तेव्हांचे अत्यंत उदार मतांचे राजे होते. त्यांनीं धर्मबाबतींत पूर्ण स्वतंत्र्य राखिलें होतें. म्हणून ब्लँड्राटा ह्यास पोलांडांत इ. स. १५६५ सालीं पहिला युनिटेरिअन समाज स्थापितां आला. लवकरच सर्व देशभर ह्याच्या शाखा निघाल्या. इतर ठिकाणचे युनिटेरियन्सही तेथील छळानें गांजून येथें आश्रयासाठीं जमूं लागले. राको येथें सुमारें एक हजार विद्यार्थ्यांचें कॉलेज काढिलें. शेजारच्या ट्रान्सिल्व्हानिया व हंगेरी ह्या देशांतही ह्या मताचा झपाट्यानें प्रसार होऊन त्यांत अनुक्रमें ४०० व ३७ समाजांची स्थापना झाली; आणि क्लॉसेनूबर्ग येथें एक मोठें कॉलेज निघालें. पण ह्यांचा हा उत्कर्ष फार वेळ टिकला नाहीं. ज्या दोन उदार राजांमुळें ह्यांना अवसर मिळाला होता ते दोघे १५७१, १५७२ सालीं वारले व त्यांच्या मागें कॅथॉलिक् कारकीर्द सुरू झाली. जुने दुर्धारक कॅथॉलिकस व नवे सुधारक म्हणविणारे पण तितकेच दुराग्रही व असहिष्णु लूथर व कॅल्व्हिन् ह्यांचे अनुयायी ह्या दोघांसही हें युनिटेरिअन् उदार मत खपण्यासारखें नव्हतें. म्हणन त्यांचा दोहोंकडूनही छळ होऊं लागला. इ. स. १६३८ सालीं पोलांडांतील त्यांचें कॉलेज पाडून टाकलें, अध्यापकांस हद्दपार केलें आणि उपासनामंदिरें बंद करण्यांत आलीं. १६६० त त्यांचा तेथें पूर्ण बीमोड झाला. त्यांचीं मतें स्वीकारणाऱ्यांस अगर कोणा युनिटेरिअनास घरीं आश्रय देणाऱ्यांसही देशांत शिक्षेचा हुकूम झाला. हंगेरींतील ३७ समाज नाहींसे झाले, ट्रान्सिल्व्हानियांतील ४०० पैकीं १०० समाज कसे तरी जीव धरून राहिले. इ. स. १८५७ सालीं जेव्हां आस्ट्रियानें रोमशीं स्नेह जोडला तेव्हां वरील १०० समाजांचा नाश करण्याचा शेवटचा प्रयत्न झाला होता. पण इंग्लंडांतील युनिटेरियनांच्या मदतीनें ह्यांचा त्या संकटांतून निभाव लागला व आतांपर्यंत त्यांची हळूहळू वाढ होत आहे.

## इंग्लंड.

सोळाव्या शतकांत इंग्लंडांतही पुष्कळ युनिटेरिअनांची दुराग्रहास आहुती देण्यांत आली. इ. स. १५५० सालीं जोन बौचर नामक एका बाणेदार बाईनें खिस्ताच्या अवताराविरुद्ध आपलें मत प्रतिपादल्याबद्दल तिला जीवंत जाळलें. स्मिथफिल्ड येथें ही बाई चितेवर उभी असतांना मरतांना तरी तिनें आपलें मन बदलावें म्हणून एक पाद्रीसाहेब तिच्या जवळ उपदेश करण्यास गेले; पण बाईनें ह्या भल्या गृहस्थास घरीं जाऊन पुनः एकवार

बायबल शांतपणें वाचण्यास सांगितलें, व धैर्यानें प्राण सोडला. इ. स. १६१२ त शेवटचे दोन बळी पडले. पण माणसांबरोबर मतांची राख झाली नाहीं. पोलांडांतील युनिटेरियन पुस्तकें इंग्लंडांत छपवून आणून त्यांचा प्रसार करण्यांत आला. १७ व्या शतकांत इंग्लंडांत प्युरिटन मताचें जें मोठें वादळ झालें त्याच्या तळाशीं युनिटेरिअन् मताचा प्रवाह जोरानें वाहत होता. व्यवस्थितपणें ह्या मताचा प्रवाह जोरानें वाहत होता. व्यवस्थितपणें ह्या मताचा समाज जरी तेव्हां स्थापन झाला नव्हता तरी त्या काळचे मोठमोठे विवेचक मिल्टन, लॉक्, न्यूटनप्रभृति ह्याच मताचे होते.

१६ व्या शतकांतील मोठ्या सुधारणेंत इंग्लंडांत जरी प्रॉटेस्टंट धर्माची स्थापना झाली तरी लोकांस स्वतंत्र रीतीनें विचार करण्यास व उपासना करण्यास सवड नव्हती. राजकीय व धार्मिक बाबती एकांत एक अशा मिसळून गेल्या होत्या कीं सर्व लोकांस राष्ट्रीयधर्मानें ( Eatablished church ) रेखन दिल्याप्रमाणेंच आपलें सर्व धर्माचरण राखणें भाग पडत होतें. ह्यामुळें चिडून कित्येक लोकांनीं आपापल्या स्वतंत्र शाखा काढून आपले व्यवहार व बंधनें स्वतंत्र रीतीनें पाळण्याचा प्रयत्न केला होता. ह्या लोकांस नॉन कन्फॉर्मिस्ट किंवा डिसेंटर्स असें म्हणतात. १६७९ तील राज्यक्रांतीनंतर ह्या सर्व लोकांस उपासनास्वातंत्र्य मिळालें. ( Act of Toleration ). ह्यापैकीं प्रेस्बिटर शाखेचे लोक जेव्हां आपल्यासाठीं स्वतंत्र मंदिरें बांधूं लागले तेव्हां त्यांत उपदेश करणाऱ्यांचीं मतें अमक्याच प्रकारचीं असावींत अशी त्यांनीं अट ठेविली नाहीं, त्यामुळें ह्या शाखेंत युनिटेरियन् मताचा स्वतंत्र विचार झपाट्यानें होऊं लागला. युनिटेरिअन हें पाखंडी नांव घेण्याची मात्र ह्या शाखेची छाती नव्हती व इच्छाही नव्हती तथापि नकळत त्यांची ह्या मताकडे प्रगति होत होती.

पण एका धीटास असें लटेसरशी वाहत जाणें आवडेना. तो त्या काळचा प्रसिद्ध रसायनशास्त्री डा. जोसेफ प्रीस्टले हा होय. जी बुद्धि ऑक्सिजन् व विद्युत् ह्या तत्त्वांची पारख करण्यांत तो नेहमीं खर्चीत असे तीच आतां चालू धर्मतत्त्वांची देखील पारख करण्यांत घालण्याचें त्यानें धाडस केलें, इतकेंच नव्हे, तर त्यानें युनिटेरिअन मताचा राजरोसपणें पुकारा केला. बिचारी प्रेस्बिटर शाखा चपापून गेली. पण प्रिस्टलेचें तोंड कांहीं केल्यानें राहीना. शेवटीं प्रेस्बिटर पंथाला आढळून आलें कीं, आपण खरोखरींच युनिटेरिअन आहों. तरी उघडपणें ते असें नांव घेईनात. पण जग त्यांस खऱ्या नांवानें ओळखूं लागलें. बॅप्टिस्ट व कॉंग्रिगेशनलिस्ट वगैरे जुन्या मतांच्या शाखा ज्या आतांपर्यंत त्यांच्याशीं व्यवहार करीत होत्या त्यांनीं आतां व्यवहार बंद केला. हल्लीं प्रेस्बिटरोयिन लोकांस युनिटेरिअन म्हणवून घेण्याची फारशी लाज वाटत नाहीं.

ह्याचवेळीं इंग्लंडांत राष्ट्रीय चर्चमध्येंच एक सुधारणेची चळवळ चालू होती. इतिहासांत हिला 'लॅटिट्युडिनेरिअनझम' असें नांव आहे. ही चळवळ करणाऱ्यांस ख्रिस्ती धर्ममतांतील पुष्कळ गोष्टी विकसित, मानवी बुद्धीला अत्यंत अग्राह्य वाटूं लागल्या होत्या. हे सर्वही सुधारक स्थापित धर्माचेच लहान मोठे अधिकारी होते. त्यांनीं शेवटीं मतासंबंधीं ज्या ३९ प्रतिज्ञा प्रत्येक उपदेशकास हल्लीं घ्याव्या लागतात, त्या तशा असूं नयेत अशाबद्दल पार्लमेंटकडे अर्ज केला. पण हा अर्ज मुळीं स्वीकारूंच नये, असें एकास तीन मतांनीं पार्लमेंटांत ठरलें. ह्यानंतर वरील सुधारक मंडळी स्वस्थ बसली. कारण कोणतीही सुधारणा लोकांत राहून व लोकांत घेऊनच करावी असें त्यांचें म्हणणें पडलें. पण त्यांपैकीं एकाची मात्र अशी सुलभ आणि सोईची समजूत पडली नाहीं. तो थिओफिलस् लिंडसे हा होता. त्यानें आपलें यॉर्कशायरमधलें मिळकतीचें आचार्यपद सोडलें आणि लंडन येथील एसेक्स स्ट्रीट मध्यें एक जुनी लिलाव करण्याची जागा उपदेश करण्यासाठीं स्वतःच्या खर्चानें भाड्यानें घेतली. ह्या प्रकारें सन १७७३ सालीं इंग्लंडांतील प्रथम युनिटेरिअन समाजाची उघडपणें स्थापना झाली. लिंडसेच्या सहकारी लॅटिट्युडिनेरिअन सुधारक मंडळीनें त्यास पंथ सोडून बाहेर पडून सुधारणा करूं लागल्यामुळें सुधारणेस हरकत होणार असा दोष दिला होता. पण काळानें सत्य कोणत्या बाजूस होतें हें दाखविलें आहे. लिंडसेची सहकारी मंडळी कोण होती ह्याचा

आतां अगदीं विसर पडला आहे, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष त्यांच्या सुधारणेची चळवळ 'लॅटिटयडिनेरिअनझम' ही काय होती हें पहाण्यासही आतां मागील इतिहासाचीं पानें शोधावीं लागत आहेत, त्यांत मात्र तिचें नांव आढळतें. उलटपक्षीं लिंडसेच्या लिलावाच्या खोलीचें मोठें मंदिर बनलें. व त्यांत थोड्याच काळांत राजकीय सुधारक, बॅरिस्टर, शास्त्री व पार्लमेंटचे सभासद वगैरे बड्या बड्या मंडळीची गर्दी जमूं लागली, तथापि सन १८१३ पर्यंत युनिटेरिअन्सविरुद्ध कडक प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी होत होतीच. इ. स. १७८६ सालीं कोणतीही मतासंबंधीं अट न घालतां धर्माचें स्वतंत्र शिक्षण देण्यासाठीं व उपदेशक आणि प्रचारक तयार करण्यासाठीं मँचेस्टर कॉलेजची स्थापना झाली. चोहींकडे देशभर समाज निघूं लागले. सन १८२५ त इंग्लंडांत व बाहेर युनिटेरिअन मतांचा प्रसार करण्यासाठीं ब्रिटिश ॲंड फॉरेन् युनिटेरिअन असोसिएशन नांवाची मंडळी स्थापण्यांत आली.

## अमेरिका.

☞ अमेरिका हा नवा देश असल्यामुळें व पारतंत्र्यास कंटाळून बाहेर पडलेल्या लोकांनीं वसविलेला असल्यामुळें तेथें राष्ट्रीय स्थापित धर्माचें प्रस्थ माजलेलें नाहीं. लोकसत्तात्मक पद्धतीवर लोकांनीं आपापले धर्मसमाज चालविले आहेत. तथापि बहुसमाज अद्यापि वरून तरी जुन्या मताचाच आहे. सन १७८५ सालीं बॉस्टन येथील एका समाजानें उघडपणें युनिटेरियन मत स्वीकारलें. तेव्हांपासून त्याचा तेथें हळू हळू प्रसार होऊं लागला. इकडे इंग्लंडांत डॉ. प्रिस्टले ह्यांचा लोकांनीं फार छळ मांडिला. बर्मिंगहाम् येथील त्यांचें घर जाळलें. लंडन येथेंही त्यास सुखानें राहूं दिलें नाहीं, म्हणून त्यास शेवटीं त्रासून अमेरिकेंत जावें लागलें. तेथील लोकांनीं त्यांचा बहुमान केला व त्याच्यामुळें तेथें उदारमतप्रसारास अधिक मदत झाली. मॅसाचसेट्स प्रांतीं डॉ. चॅनिंगचीं व्याख्यानें सुरू झालीं. त्याच्या जोरदार प्रेरणेनें त्या प्रांतांतल्या सुमारें अर्ध्या समाजांनीं हें उदार मत स्वीकारलें. पुढें लॉंगफेलो लोवेल वगैरे कवि, एमर्सनसारखे लेखक व थिओडर पार्करसारखे उपदेशक ह्यांनीं युनिटेरिअन मत देशभर पसरविलें.

असो. एथवर युनिटेरिअन मताची प्रॉटेस्टंट सुधारणेच्या पूर्वींची पीठिका व नंतरचा त्या समाजाच्या १९ व्या शतकाच्या आरंभापर्यंत त्रोटक इतिहासाचा थोडक्यांत विचार केला. ह्या पुढें २० व्या शतकाच्या आरंभीं ह्या समाजाची कशी स्थिति आहे व एकंदर जगाच्या धर्मप्रगतींत ह्याची पायरी कोणती आहे हें ठोकळ मानानें पाहूं.

## हल्लींची स्थिति.

युनिटेरिअन समाजाच्या मतौदार्याची मजल हल्लीं एकंदरींत कोठवर गेली आहे ह्याची थोडक्यांत पण ठाम कल्पना मराठी वाचकांस करून देणें हें मोठें कठीण काम आहे. डॉ. प्रिस्टले व लिंडसेप्रभृति आदि युनिटेरिअन्स् व डॉ. मार्टिनो, रेव्ह. आर्मस्ट्रॉंगप्रभृति अलीकडचे युनिटेरिअन्स ह्यांच्यांत महदंतर पडलें आहे. जें अंतर आदिब्राह्मसमाज व हल्लींचा साधारण ब्राह्मसमाज ह्यांमध्यें आहे तेंच १९ व्या शतकाच्या पूर्वीच्या व नंतरच्या युनिटेरिअन समाजांत आढळतें. प्रिस्टले इत्यादिकांना प्रचलित धर्माचे हटवाद व खिस्ताचें देवत्व जरी मान्य नव्हतें तथापि खिस्ती धर्म म्हणजे केवळ एक अप्रतिम ईश्वरी सत्य आहे आणि त्याची प्रतीति येशूनें अनेक चमत्कार दाखवून मनुष्यांस करून दिली असें त्यांस वाटत होतें. निस्पृह सुधारक थिओडर पार्कर ह्याचें देखील मन श्रौत चमत्काराबद्दल साशंकच होतें. पण हल्लीं कोणताही युनीटेरियन केवळ बायबलावरच हात टेकून बसलेला आढळणार नाहीं. ह्यावरून ते बायबलचा अनादर करितात असें मुळींच नव्हे. तर मनुष्यकृत बायबलांत ईश्वरी प्रेरणा किती आहे व मानवी उपाधि व अफरातफर किती आहे ह्याचा ते प्रांजलपणें, दक्षतेनें व अत्यादरपूर्वक विचार करितात, इतकेंच नव्हे तर धर्म ही बाब केवळ एकाद्या बाह्यप्रणित शब्दासंबंधी मीमांसा, विचक्षणा अगर चिकित्सा करण्याची नव्हे किंवा केवळ मानसिक विश्वासाचीही नव्हे तर ती अंतःकरणाच्या उच्च भावनांची व स्वभावाच्या वाढीची आहे अशी त्यांची दृढ समजूत होऊं लागली आहे. किंबहुना युनिटेरिअन ह्या शब्दाचा व्यापक अर्थ घेतला तर हल्लींचा

युनिटेरिअन समाज हा सुधारलेल्या पाश्चात्य जगाचें 'प्रबुद्ध अंतर्याम' (enlightened conscience) होय असें ह्मटल्यास अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं— हल्लीं जें ह्या समाजाच्या रूपानें इतकें धर्मौदार्य प्राप्त झालें आहे, तें यूरोपांत गेल्या शतकांत मानवी विचाराची व शोधाची ज्ञानमार्गांत जी अश्रुतपूर्व मजल पोंहोंचली तिचें प्रत्यक्ष फळ होय. ही विचार-गति मुख्यत्वेंकरून चार निरनिराळ्या दिशेनें झपाट्यानें झाली व अद्यापि चालली आहे ती अशी.—

१. पहिली चळवळ अनुभवजन्य शास्त्राची हिचा आरंभ १९ व्या शतकापूर्वींच झाला होता. पण प्रथम जड शास्त्रांच्या विशिष्ट शाखांत लहान मोठे प्रयोग करणें, अनुभव मिळविणें व त्यांचा केवळ भौतिक उन्नतीकडे उपयोग करणें ह्यांतच ही चळ-वळ खपली होती. पुढें १९ व्या शतकांत शास्त्रानें तात्त्विक दिशा घेतली आणि अनेक बाह्य प्रमाणांनीं डार्विन व स्पेन्सर ह्यांनीं उत्क्रांति तत्त्वाची अभेद्य स्थापना करून मोठा दिग्विजय संपादिला.

२. ह्या अनुभवजन्य ज्ञानाबरोबरच अतींद्रिय ज्ञानानेंही जर्मनींत मोठी मजल मारिली. कँट, हेगल व त्यांच्या अनुयायांनीं असा सिद्धांत स्थापिला कीं विश्वांतील भौतिक, मानसिक व नैतिक चम-त्कारांच्या तळाशीं एकाच स्वयंसिद्ध शक्तीचें कार्य अबाधितपणें चालू आहे.

३. शास्त्र व तत्त्वज्ञान ह्यांच्या अशा अभ्युदया-मुळें ईश्वरप्रणित मानलेल्या धर्मांची इमारत डळमळूं लागली. ज्या शास्त्रीय पद्धतीनें अनुभविक व तार्किक ज्ञानांत इतकें कार्य केलें तिचा लवकरच धर्मांच्या पवित्र व सोंवळ्या प्रदेशांतही प्रवेश झाला. इतर ठिकाणांपेक्षां जर्मन युनिव्हर्सिटींतील धर्म शास्त्राच्या अध्यापकांना अधिक मतस्वातंत्र्य होतें, म्हणून खिस्ती श्रुति जे जुना व नवा करार त्यांतील निरनिराळीं प्रकरणें कोणीं, कधीं, कशा स्थितींत लिहिलीं, त्यांत ऐतिहासिक भाग किती, व निव्वळ कल्पित व भाविक भाग किती, जुन्या यहुदी धर्मांचा परिणाम कोणता व लॅटिन आणि ग्रीक विचारांचा परिणाम कोणता वगैरे गोष्टींची स्ट्रॉस, बॉवर, फ्लीडरर इत्यादिकांनीं पूर्ण निःपक्ष-पातानें चिकित्सा केली.

४. शेवटीं अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे तुलनात्मक धर्मशास्त्राचा. यरोपांत अनेक जुन्या व नव्या भाषांचा (विशेषेंकरून संस्कृताचा) तुलना-त्मक अभ्यास सुरू झाल्यापासून जगांतील प्रमुख धर्मांच्या सर्व श्रुतिग्रंथांचें मूळ भाषेंतून अध्ययन, संशोधन होऊं लागलें. प्रो० मॅक्समूलरसारख्या पंडितांच्या विलक्षण उद्योगानें ब्राह्मण, बौद्ध, चिनी, पार्शी, महंमदी इ. पौरस्त्य धर्मांच्या पवित्र ग्रंथांचें पाश्चात्य भाषांत भाषांतर झालें. इतकेंच नव्हे तर खिस्ती शकापूर्वीं ३।४ हजार वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या असीरिअन, बाबिलोनियन व इजिप्शिअन् लोकांचे धार्मिक शिलालेख जमिनींतून उकरून काढून त्यांची मीमांसा केली! शिवाय नव्या जगांत अगदीं अलगपणें विकास पावणाऱ्या मेक्सिको व पेरू ह्या देशांतील धर्मांचेंही परिशीलन केलें. इतक्या विस्तृत प्रमाणांवरून धर्मशास्त्राच्या नवीन इमारतीचा पाया घातला. ह्या प्रकारें शास्त्र, तत्त्वज्ञान, मीमांसा व इतिहास ह्या चारी बाजूंनीं हाच सिद्धांत स्थापित झाला आहे कीं, रानटी अवस्थेंतील मानवी आत्म्यांत प्रथम जागृति झाल्यापासून आतांपर्यंत धर्मबुद्धीचा सारखा विकास होत आहे.

ह्या सर्व गोष्टी घडवून आणणारे युनिटेरिअन समाजाचेच सभासद होते असें नाहीं. पण युनि-टेरिअन समाजाला आतां जें स्वरूप आलें आहे तें ह्या चारी प्रयत्नांचें प्रत्यक्ष कार्य होय. धर्मबाबतींत उपासनामंदिरांतील गीतें, प्रार्थना, उपदेश ह्यांची जितकी अवश्यकता आहे तितकीच अवश्यकता वरील चारी प्रयत्नांची आहे अशी त्यांची समजूत असल्याचें त्यांच्या कृतीवरूनही दिसून येतें. ह्यामुळें त्यांच्यावर पुष्कळ वेळां असा आक्षेप घेण्यांत येतो कीं, ते केवळ बुद्धिवादी आहेत आणि त्यांच्यांत भक्ति कमी आहे. भक्तीसंबंधीं आक्षेप बहुतांशीं त्या त्या आक्षेपकाच्या भक्तीच्या कल्प-नेवर अवलंबून आहे. विश्वांत मनुष्यशक्तीहून अनंतपटीनें मोठी शक्ति जी नांदत आहे तिज-संबंधी आदर, प्रेम, विनम्रभाव इ. गुण इतरांपेक्षां युनिटेरिअनांमध्यें कमी आहेत असें म्हणतां येत नाहीं. बुद्धिवादाविषयीं म्हटलें असतां ह्यांचा कटाक्ष विशेषेंकरून निषेधार्थी आहे. बुद्धीला अग्राह्य वाटणाऱ्या व आत्म्याच्या बुद्धीला केवळ

अनवश्यक अशा गोष्टींत जेथें जुने लोक आग्रह धरितात तेथें युनिटेरिअन उदासीन असतात, आणि ज्या गोष्टींत स्वतः जुन्या लोकांचाही खरो-खर विश्वास नसतां केवळ परंपरागत म्हणून चालू आहेत त्यांचा ते उघडपणें निषेध करितात. वरवर पाहणारांस असें दिसतें कीं, साधारण युनिटेरिअन मनुष्य धर्मसमजुतींत निषेधदृष्टया बुद्धिवादाचा जितका उपयोग करितो तितका विधिदृष्टया करीत नाहीं आणि कांहीं अंशीं हें खरेंही आहे. पण ह्याचें कारण त्याच्या बुद्धीची शक्ति निषेधांत कुशल व विधींत पंगु आहे म्हणून नव्हे, तर मागें गेलेल्यांनीं बुद्धिवादाचा अतिरेक केल्यामुळें त्यांचे हटवाद जसे आतां भोंवत आहेत तसेंच आतांच्यांनीं जर आतां वाटणाऱ्या शुद्ध बुद्धीच्या सिद्धान्तांबद्दल आग्रह धरला तर लवकरच त्यांचे हटवाद बनून पुढें येणारांस ते जाचतील, इतकेंच नव्हे तर आतांच्या समाजांतही दुही व भेद माजतील ही गोष्ट ते पक्की जाणून आहेत. म्हणून ते ईश्वराचे गुण, त्याचे व्यापार, त्याचें केवळ स्वरूप, मानवी आत्म्याची मागील व पुढील स्थिति इ. अनाकलनीय गोष्टींसंबंधानें आपलें अगदीं ठाम मत बनविण्याच्या भानगडींत ते पडत नाहींत. पण एवढ्यावरून जाणिवेला अगदीं गुंडाळून ठेवून नुसतें हरि हरि म्हणून धर्मसाधन करीत आहेत, असें नव्हे तर मानवी अंतरात्म्यांत निरंतर शोधाचा घोष लागला आहे, वेळोवेळीं नीतीचा उद्गार होत आहे, बाह्य सृष्टीच्या सौंदर्याची अंतरांत रसिकता वाटत आहे, आत्मा आत्म्यांशीं अधिकाधिक बिलगत आहे, आशा वाढत आहे, मानवी प्रयत्नांस अधिक हुरूप येत आहे वगैरे हे जे अंतश्चमत्कार त्यांच्या पायांवर इंग्लंडांत डा० मार्टिनो ह्या अध्वर्यूनें व त्याच्या युनिटेरिअन अनुयायांनीं आस्तिक्य-बुद्धीची इमारत रचली आहे. तसेंच बाह्य सृष्टींतही अनादि नियमांचें अव्यभिचरित, साम्राज्य आणि जीवांच्या व समाजांच्या घटनांचा सतत विकास ह्या गोष्टी ज्या स्पेन्सरसाहेबांनीं स्थापल्या त्याचेच युनिटेरिअन अनुयायी मि. सॅव्हेज व जॉन फिस्क ह्यांनीं ह्या तत्त्वांवर आस्तिक्य मत स्थापिलें. ( स्पेन्सरचें नांव चहूंकडे बहुतकरून उत्क्रान्तिवादापेक्षां अज्ञेयवादाबद्दलच प्रसिद्ध झालें आहे. आणि त्याच्या नांवावर कित्येक लोक नास्तिक्यांत तृप्ति पावून उत्साहहीन झाले आहेत. मि. सॅव्हेज ह्यांनीं जेव्हां आपला ‘ उत्क्रांति धर्म ’ नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला तेव्हां ह्याच स्पेन्सर-साहेबांनीं त्यांचें अत्यंत अभिनंदन केलें. ) ह्या प्रकारें युनिटेरिअन तत्त्वज्ञानांतच काय तो बुद्धिवाद आहे असें नाहीं. तर बहुतेक व्यासपीठांतूनही, आधुनिक शास्त्राचे व तत्त्वज्ञानाचे शोध आणि राजकीय व सामाजिक उदार घडामोडींविषयीं चर्चा व अभिनंदन करण्यांत येतें. ह्याप्रमाणें युनि-टेरिअन बुद्धिवाद निषेधात्मक आहे व विध्यात्म-कही आहे. विचाराचा हटवाद व कृतीचें ढोंग आणि अंधपरंपरा ह्यांवर तो आपलें निषेधास्त्र चालवितो आणि विचाराची अश्रद्धा व मनाचें औदासिन्य व कृतीचा निरुत्साह ह्यांवर तो आपलें विध्यस्त्र सोडतो ! विचाराचें पूर्ण स्वातंत्र्य आणि उपासनेचा सोहळा ह्या दोहोंचें दुर्लभ सख्य युनिटेरिअन देवळांतून नित्य घडत असलेलें पाहूनही युनिटेरिअन लोकांत भक्ति नाहीं असें कोण म्हणत असतील तर असोत !

शेवटीं ह्यांच्या नांवासंबंधीं थोडा उलगडा करणें इष्ट आहे. कित्येकांस आपल्यांस युनिटेरिअन् ख्रिश्चन म्हणून घेणें आवडतें, कित्येकांस युनिटेरिअन् हेंच नांव बस्स आहे. कांहींची हीं दोन्हीं नांवें आपल्या मताला अगदीं थोटीं आहेत अशी कुरकुर आहे. पण कोणाचा कोणत्याही नांवांत आग्रह नाहीं. ज्यांना ख्रिश्चन म्हणून घ्यावें असें वाटतें त्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, ख्रिस्तीधर्माशीं आपला जो ऐतिहासिक संबंध आहे तो हें नांव टाकल्यानें तुटल्यासारखा होईल. ज्यांना ‘ युनिटेरिअन् ’ एवढेंच म्हणून घ्यावेंसें वाटतें, त्यांच्या मनांत ख्रिस्ती धर्माशीं संबंध तोडावा असें नाहीं. तर इतर धर्मांतून उदार प्रयत्न करणाऱ्यांशीं संबंध जोडण्यांत ख्रिश्चन ह्या नांवापासून कदाचित् अडथळा येण्याचा संभव आहे, त्यास जागा राहूं नये. ख्रिस्त व बायबल ह्यांशीं युनिटेरिअनांचा संबंध म्हटला म्हणजे असा कीं ख्रिस्त हा जगांतील अनेक धर्मशिक्षकांत अगदीं वरिष्ठ शिक्षक होय असें ते मानतात व उपासनेंत बहुतेक प्रसंगीं बायबलाचाच उपयोग करितात. तथापि ह्यांची प्रवृत्ति श्रौत धर्मांतून उत्तरोत्तर नैसर्गिक धर्माकडे

झपाट्यानें होत आहे. आणि तुलनात्मक धर्माध्ययनामुळें यूरोपांत इतर धर्मग्रंथांचा जसजसा जास्त प्रसार होईल तसतसें इतर धर्मविभूतींचें व धर्मविचारांचें साधारण लोकांनाही अधिक महत्त्व समजून येईल. आणि तें समजून घेण्याची सर्व समाजाची इच्छा आहे इतकेंच नव्हे तर प्रयत्नही चालू आहेत.

---

## इंग्लंडांतील आधुनिक धर्मविषयक चळवळ आणि लिव्हरपूल येथील त्रैवार्षिक युनिटेरिअन् परिषद.

( सुबोधपत्रिका ता. २४–५–१९०३. )

सर्व सुधारलेल्या जगांतील अत्यंत प्रमुख जें इंग्रजी राष्ट्र, त्याचा गेल्या चार शतकांचा इतिहास वाचून, एखादा परकीय गृहस्थ ह्या राष्ट्राच्या निरनिराळ्या संस्था आणि जीवन प्रत्यक्ष पाहण्यास येथें आल्यावर कांहीं काळानें त्याच्या मनाची विलक्षण स्थिति होते. त्याचें बाहेरचें इतिहासाध्ययन व येथील प्रत्यक्ष निरीक्षण, हीं दोन्ही जर केवळ फावल्या वेळचीं असतील, तर त्याचा मत ह्या देशासंबंधीं फारसा अनुकूल न होतां, उलट तो स्वदेशीं गेल्यावर सार्‍या आधुनिक सुधारणेसही नांवें ठेवीत सुटण्याचा संभव आहे. त्यांत विशेष त्याचा कटाक्ष धर्मसंबंधीं असतो. पण वरील अध्ययन व प्रवास निर्मळ मनानें, केवळ शिकण्याच्या व साधनाच्या हेतूनें, व कळकळीनें कोणत्याही बाजूस तोल न जाऊं देतां, घडेल तर अनायासच नव्हे तर आत्म्यासही मोठी मिळकत मिळेल अशी माझी खात्री आहे. इतकेंच नव्हे तर जगाच्या इतिहासांत वेळोवेळीं ज्या सुधारणा झाल्या, जीं मन्वंतरें घडलीं आणि एकंदरींत पाहतां मानवी प्राण्यांची जी सारखी उन्नतिच होत आहे त्या सर्वांच्या तळाशीं, मानवतेचें मुख्य लक्षण जी धर्मबुद्धि, तिचेंच मंगल आणि सतत कार्य घडत आहे. ह्या साधारण सिद्धांताची प्रत्यक्ष साक्ष ह्या अध्ययनांत व प्रवासांत पटते!

सोळाव्या शतकाच्या आरंभीं युरोपांत जी प्रचंड धर्मक्रांति झाली तिच्यानंतर आधुनिक युगास आरंभ झाला. वरील शतकांत इंग्लंडांत सुधारलेल्या धर्माची पूर्ण संस्थापना झाल्यावर धर्माचें कार्य संपलें असें नव्हे तर उलट तेव्हांपासून त्याचा आरंभ झाला. पोपच्या कचाट्यांतून इंग्लंड सुटलें खरें, म्हणून तें स्वतंत्र झालें असें नव्हे. पोपचें स्थान इंग्लंडच्या राजानें घेतलें. संस्थापित चर्च नांवाच्या राष्ट्रीय धर्माची संस्थापना झाली. आणि त्या उलट खरें स्वातंत्र्य मिळविण्यास पुनः एक शतकभर ह्या राष्ट्रास थोरांच्या रक्ताची सारखी आहुती द्यावी लागली. सतराव्या शतकाचे अखेरीस ( १६८९ ) Toleration Act सहिष्णुतेचा कायदा पास झाला. लोकांस आपल्या मताप्रमाणें आपल्या हुकमतीनें व आपल्या बळावर, पंथ, समाज व मंदिरें स्थापण्याची मोकळीक झाली. अठराव्या शतकांत, प्रेस्बिटेरिअन ( गुरुजनसत्तात्मक ), कॉंग्रेगेशनल ( लोकसत्तात्मक ), बॅप्टिस्ट, वेस्लियन इत्यादि अनेक पंथांचा प्रसार झाला. पण अद्यापि लोकांत विचारांचें स्वातंत्र्य व औदार्य आलें नव्हतें. चौथ्या पांचव्या शतकांत खिस्ती धर्माचीं जीं एकदां मतें व सिद्धान्त बनून गेले होते त्यांच्या उलट ब्र काढल्यास डोकें फुटण्याची अद्यापि भीति होतीच. १९ व्या शतकाच्या आरंभीं ती भीतिही समूळ नाहींशी झाली. १८१३ सालीं युनिटेरिअन् लोकांसही पूर्ण स्वातंत्र्य मिळालें.

ह्याप्रमाणें १६ व्या शतकांत पोपची सत्ता झुगारून दिल्यावर ह्या राष्ट्रानें सतराव्या अठराव्या शतकांत, धर्मबाबतींत राजकीय सत्तेपासूनही स्वतंत्र होण्याचे प्रयत्न केले, आणि ते बहुतांशीं सफळ झाले. हल्लीं राष्ट्रांतील निम्म्यांहून अधिक लोकसंख्या नॉन कन्फार्मिस्ट म्हणजे स्वतंत्र सत्तेची आहे. बाकीची जी राष्ट्रीय संस्थेंत आहे ती ही केवळ आपखुषीनें आहे. १९ व्या शतकांत धर्मचळवळीची दिशा अगदींच बदलली. आधुनिक शास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार होऊं लागल्यापासून धर्माच्या मुळाशींच कुऱ्हाडीचे घाव बसूं लागले. खिस्तीधर्मपंथांचें शास्त्रीय व ऐतिहासिक पद्धतीनें संशोधन, निरनिराळ्या राष्ट्रांचे आचारविचारांत दळणवळण वाढल्यामुळें निरनिराळ्या धर्मांची होऊं लागलेली तुलना, विश्वविद्यालयांत चाललेलें सर्व धर्मांचें तुलनात्मक अध्ययन इत्यादि

अनेक कारणांमुळें निरनिराळ्या पंथांतील लोकांच्या मतांत परस्पर अधिकाधिक सहानुभूति, सहिष्णुता व औदार्य वाढूं लागलें, इतकेंच नव्हे तर युनिटेरिअन, ह्युमेनिटेरिअन, पॉझिटिव्हिस्ट इ० नवीन विचारांला अनुकूळ अशा नवीन पंथांचा उदय व प्रसार होऊं लागला.

हल्लीं स्थिति कशी आहे ? राष्ट्रीय संस्था, तद्विरोधी निघालेले नाना स्वतंत्र पंथ, आणि ह्या सर्वांसही न जमानतां स्वतंत्रपणें व उदारपणें धर्माचरण करणारे युनिटेरिअनादि समाज ह्या सर्वांचेंही कार्य सारखें जोरानें चाललें आहे. साप्ताहिक उपासना, रविवारच्या धर्मशिक्षणाच्या शाळा, मासिक आणि वार्षिक सभा, गरिबांकरितां स्वदेशांतील मिशनें आणि परकीयांकरितां चारी खंडांतील परदेशांत जगडव्याळ मिशनची योजना इ० निरनिराळीं कामें सर्व पंथांतून चढाओढीनें होत आहेत.

ह्या सर्व प्रकार पाहून परकीयांचें मन प्रथमदर्शनीं गोंधळून जातें. धर्मासारख्या पवित्र बाबतींत ह्या राष्ट्रानें ३।४ शतकें इतकी डोईफोड व रक्तस्राव कां केला ? आतांच्या ह्या शांततेच्या व समजुतीच्या काळीं देखील ह्याच्यांत इतके भिन्न भिन्न पंथ व इतक्या चुरशीची चढाओढ कां आहे ! नवे पंथ आणि नव्या संस्था निघाल्या आहेत त्यांत जुन्यांचा लय कां होत नाहीं? उलट दोहोंचेंही कार्य इतक्या नेटानें चालणें येथें कसें शक्य आहे? इ. प्रश्नांमुळें बिचाऱ्या नवख्याची त्रेधा उडते आणि अखेर इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट धर्माचें खरें लक्षण काय, त्याची मुख्य बळकटी कशांत आहे हें नीट कळेपर्यंत त्याचें समाधान होत नाहीं.

आजपर्यंत धर्मबाबतींत आमची दोन भिन्न प्रकारची स्थिति होत आली आहे ती अशीः जगाच्या सांसारिक उपाधींचा शीण आणि वीट येऊन आम्ही एकदम विरक्त होतों आणि जगांतून उठतों. मानवी आत्म्याची अंतिम अवस्था काय होणार तिचा ठाव घेण्यांत आणि अखिल विश्वाचीं पाळेंमुळें शोधून काढण्यांत आमच्या बुद्धीचा लय लागतो. ह्याप्रमाणें आमचें बंड म्हणजे साऱ्या विश्वाविरुद्ध, आमची स्वतंत्रता म्हणजे निस्संगता, आमचे जय म्हणजे व्यक्तीचे जय, आमचा मोक्ष आमच्या पुरताच, आमचे अनुभव, आमचे शोध व आमची भारती ही जगाच्या वाङ्मयांत कालवशानें अत्यंत उच्च स्थान घेतात. पण आमच्या समाजाची काय वाट ! गोरगरीब तडीतापडी ह्यांस शांतीचें व शेवटचें वाक्य कोण सांगतो? त्यांची धार्मिक भूक निवारण्याची काय योजना आहे ?

उलट पक्षीं, आमचीं भव्य व पुरातन देवस्थानें बारा ज्योतिर्लिंगें, तीर्थें, यात्रा, पूजेचे संभार विधींचें अवडंबर, ब्राह्मण, बडवे, पुजारी व सेवेकरी, वर्णव्यवस्था आणि मठस्थापना, शंकराचार्य आणि जगद्गुरु, वेदकाळापासून चालत आलेले आचार, नवीन नवीन निघणारे धार्मिक उत्सव आणि वेदोक्तासारख्या नव्या सुधारणा इ० एक कां दोन, अनेक तऱ्हेनें धर्माच्या दुसऱ्या बाजूची आमची जय्यत तयारी आहे. असें असून आमच्यांत धर्म नाहीं असें कोण म्हणेल ?

पण वर जीं धर्माचीं दोन लक्षणें सांगितलीं त्यांतील एकही इंग्लंडांतील धर्मास मुळींच लागू पडत नाहीं. येथेंही नाना पंथ, नाना मतें, धार्मिक कलह आणि वैमनस्यें हीं आहेत. केव्हां केव्हां दंगे, क्वचित् खूनही होतात. पण ह्या सगळ्यांचें एक सामान्य लक्षण आहे. एक प्रकारचें राष्ट्रीय ऐक्य आहे आणि त्यांतच नव्याजुन्या साऱ्यांची बळकटी आहे. हें लक्षण दोन शब्दांतच सांगतां येतें तें असें. स्वातंत्र्य आणि व्यावहारिकता. ह्या स्वातंत्र्यासाठीं राष्ट्र पोपविरुद्ध उठलें, प्रजा राजाचें ऐकत नाहीं, फार काय, मुलगा बापाची पर्वा ठेवीत नाहीं ! हें स्वातंत्र्य म्हणजे एक नुसतें खूळ नाहीं. सर्व योजना व सर्व खर्च राष्ट्राकडून मिळत असतां त्या सर्वांवर पाणी सोडून उलट अत्यंत कष्टमय छळ सोसूनही लोकांनीं आपापले पंथ स्थापले, इतकेंच नव्हे, तर सुंदर आणि टोलेजंग मंदिरें बांधलीं, मंडळ्या स्थापिल्या, धर्मशिक्षणाच्या शाळा व कॉलेजें उभारलीं आणि परदेशीं प्रचंड मिशनें पाठविलीं. हें सर्व केवळ स्वातंत्र्याचें खूळ नव्हे तर स्वतःची हिम्मत व कळकळ. दुसरा मोठा गुण म्हणजे व्यावहारिकता. लोकशिक्षण आणि गरिबाची दाद ह्या बाबतींत ह्या पंथांनीं आजवर अविश्रांत परिश्रम केले आहेत व अद्यापिही करीत आहेत. लोकोपयोगी कृत्यें करण्यांत नाना प्रकारच्या

लालुची व करमणुकी दाखवून गरीब व उनाड लोकांस व्यसनापासून दूर ठेवण्यांत ह्या निरनिराळ्या पंथांची एकमेकांवर ताण होत असते. अगदीं लहान लहान कंगाल खेड्यांत जाऊन कांहीं एक वेतन न घेतां, अडाणी लोकांच्या कानांवर येशूच्या सद्बोधाचीं चार वाक्यें ठेवण्याचें कामीं गृहस्थ उपदेशकांची योजना करण्याची मेथॉडिस्ट पंथाची हातोटी लंडनसारख्या मोठ्या शहरीं कुमार्गांत पडून सर्वतोपरी भ्रष्ट झालेल्या तरुण बालिकांचा उद्धार करून पुनः त्यांच्याकडूनच तशा दुसऱ्या पतितांस हातभार देण्याचे मुक्ति फौजेचे प्रयत्न, क्वेकरपंथाची सात्विकता, कॉंग्रिगेशनल पंथाचें स्वातंत्र्य आणि स्वावलंबन इत्यादि अनेक बाजूंनीं अनेक पंथांकडून देशाचा व्यावहारिक फायदाच होत आहे. याप्रकारें जरी वरवर या विरोधी पंथांत परस्पर भिन्नता आहे तरी राष्ट्रहिताच्या कामीं यांचा तात्काल एक दिल होतो.

गेल्या पांचपंचवीस वर्षांत धर्माची नवी चळविचल चालली आहे ती ही कीं या विरोधी पंथांच्या मोठमोठ्या वार्षिक परिषदी जमूं लागल्या आहेत आणि त्या सर्वांचें एक साधारण संम्मेलन स्थापन झालें आहे. या जुटीमुळें यांना अधिकाधिक बळ येत चाललें आहे, व संख्या वाढत आहे. याप्रमाणें सुमारें अर्ध्या राष्ट्राचा विरोध पडल्यामुळें धर्माची जी राष्ट्रीय संस्था तिला राजकीय मदत मिळते ती बंद करण्याची खटपट चालू आहे.

पण वरील साधारण संमेलनांत युनिटेरियन् पंथाचा मात्र अद्यापि शिरकाव होऊं शकत नाहीं. कारण या पंथाचीं मतें इतकीं उदार आहेत कीं जुन्या ख्रिस्ती लोकांच्या आग्रहास तीं पटत नाहींत. म्हणून युनिटेरिअनांस अद्यापि वाळींतच रहावें लागत आहे. त्यांची ही लिव्हरपूल येथें थोड्या दिवसांपूर्वी एक मोठी त्रैवार्षिक सभा भरली होती.

इंग्लंडांतील युनिटेरिअन चळवळीचें वास्तविक स्वरूप वाचकांच्या मनांत नीट भरविण्याकरितां गेल्या आठवड्याच्या पत्रांत इंग्लंडांत हल्लीं धर्माचें कार्य कसें चाललें आहे, ह्याचा साधारणपणें विचार केला आहे. पंधरा दिवसांपूर्वी लिव्हरपूल येथें युनिटेरिअन लोकांची आठवी त्रैवार्षिक परिषद् भरली होती; तिजसंबंधी एक दोन विचार ह्या पत्रीं कळविण्याचा हेतु आहे.

युनिटेरिअन मताचा आणि समाजांचा पूर्वापार इतिहास आणि हल्लीं हा समाज, धर्म व कोणती व कशी सुधारणा घडवीत आहे, ह्यासंबंधीं मी मागें एका पत्रांत त्रोटक माहिती दिली आहे. इंग्लंडदेश सुधारणेच्या शिखरास पोहोंचला आहे, विद्येचा व लोकशिक्षणाचा अत्यंत प्रसार झाला आहे व अद्यापि झपाट्यानें होत आहे, व्यक्तिस्वातंत्र्यास पूर्ण मुभा आहे आणि उलटपक्षीं, युनिटेरिअन समाजही, ऐतिहासिक ख्रिस्ती धर्मांत जीं शुद्ध व सार्वत्रिक तत्त्वें आहेत तीं कायम राखून त्यावर मध्ययुगांत जी धूळ सांचली आहे ती झाडून टाकण्याचा सावधपणें व सादरपणें प्रयत्न करीत आहे इ० गोष्टी मनांत आणतां कोणाही परकीयास सहज असें वाटण्याचा संभव आहे कीं, इंग्लंडांत सर्वत्र नाहीं तरी बहुसंख्या तरी ह्याच मताची असेल. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, प्रकार अगदीं उलट आहे. इंग्लंड, स्काटलंड आणि आयर्लंड येथील एकंदर मिळून ३६४ च युनिटेरिअन मंदिरें आहेत. इतकेंच नव्हे तर याहून आश्चर्याची गोष्ट ही कीं, १८४० त या समाजाची जी स्थिति होती त्याहून हल्लीं केवळ संख्येच्या मानानें पाहतां मुळींच प्रगति झालेली नाहीं. यास पुष्कळ कारणें आहेत, तीं सर्व एथें लिहिण्यास स्थळ नाहीं. तथापि ही परिषद् कशी अस्तित्वांत आली, याचा वरील गोष्टींशीं बराच संबंध असल्यामुळें त्याचा थोडक्यांत उल्लेख करणें इष्ट आहे.

सन १८१३ त युनिटेरिअन लोकांस कायद्यानें पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यावर १८२५ त ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरियन असोसिएशन नांवाची, हल्लीं मोठ्या प्रमाणावर काम करणारी मंडळी स्थापण्यांत आली. ठिकठिकाणच्या गरीब समाजांस मदत करणें, मंदिरें बांधून देणें, पुस्तकें छापून वाटणें, बाहेर देशीं मिशन पाठविणें, आणि बाहेर देशीं उदार धर्माची चळवळ करणाऱ्यांशीं स्नेहसंबंध जोडणें इत्यादि महत्त्वाचीं कामें ही मंडळी आजपर्यंत करीत आली आहे. पण ही मंडळी केवळ व्यक्तिविषयक सभासदांची बनलेली आहे आणि हिची कमिटी अर्थात् या सभासदांकडूनच नेमण्यांत येते. उलट पक्षीं ठिकठिकाणच्या समाजांची सर्व अंतर्बाह्य व्यवस्था लोक-

सत्तात्मक पायांवर, तेथील सभासदांकडून होत असते. स्थानिक समाजांची सर्व व्यवस्था राख ण्याची जबाबदारी जशी त्या त्या समाजांच्या सर्व सभासदव्यक्तींवर आहे तशीच अशा सान्या समाजांची एक मध्यसंस्था स्थापून तिच्याकडून मध्यव्यवस्थेचें व प्रसाराचें काम करविण्याची जबाबदारीही ह्या ठिकठिकाणच्या समाजांच्या कमिटीवरच आहे हें उघड आहे. पण आजपर्यंत हें काम ब्रिटिश अँड फॉरेन ह्या थोडया व्यक्तींच्या मंडळीकडूनच होत असल्यामुळें, समाजांत यावा तितका जोर अद्यापि आला नाहीं. ही स्थिति लक्षांत आणून सन १८८२ सालीं सर्व समाजांच्या प्रतिनिधींची ही परिषद् स्थापण्यांत आली. दर तीन वर्षांनीं तिची एक बैठक होते. गेल्या पंधरावड्यांत तिची आठवी बैठक लिव्हरपूल शहरीं झाली. उपदेशकांचा पगार वाढविणें, त्यांना पेन्शन देणें, मँचेस्टर कॉलेज ऑक्सफर्ड येथें आणणें, वगैरेसाठीं मोठमोटे फंड जमविणें आणि इतर बरीच कामें ह्या परिषदेमुळें ह्या २१ वर्षांत झालीं आहेत. ही आठवी परिषद् भरण्यापूर्वी गेल्या सबंध वर्षांत एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं वाटाघाट होत होती; ती अशी कीं, आजपर्यंत परिषदेनें नुसते ठराव पास केले आहेत, तर ह्यापुढें तिच्या कमिटीची एक मोठी कार्यकारी संस्था बनावी, तिच्या सेक्रेटरीनें नेहमीं देशभर हिंडून सर्व समाजांचा प्रत्यक्ष समाचार घ्यावा व लागेल ती मदत करावी, या कामास त्यानें आपणास वाहून घ्यावें व त्यास भरपूर पगार द्यावा; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे युनिटेरियनांचा एक मोठा संघ (church) स्थापावा.

ह्याप्रकारें आज वर्षभर चर्चा होऊन शेवटीं परवां एकसारखें चार दिवस ह्या परिषदेचें काम लिव्हरपूल येथें झालें. याची साद्यन्त हकीकत इन्क्वायर पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. त्यांतील अध्यक्षांचें भाषण व उपदेश, मुख्य कामासंबंधीं रेव्ह. वुड ह्यांचा कागद, जाहीर सभेंतील रेव्ह. जॅक्स व विक्सटीड ह्यांचीं भाषणें फार मनन करण्यासारखीं आहेत. परिषद् मला कशी दिसली हें थोडक्यांत लिहितों.

लिव्हरपूल हें शहर अत्यंत श्रीमंत आणि सान्या इंग्लंडांत पुढारलेलें आहे. तेथील परिषदेच्या व्यवस्थापक मंडळीनें बाहेरून आलेल्या सुमारें ६०० प्रतिनिधींची उत्तम व्यवस्था सर्व आपल्या खर्चानें केली होती. टाऊन हालांतील सुंदर आणि भव्य गायनशाळेंत चार दिवस सकाळीं १० पासून तों रात्रीं १० पर्यंत सभेचें काम चालत असे. नेहमीं सुमारें १००० चा श्रोतृवृंद शांतपणें बसून ऐकत असे. मध्यंतरीं एका जवळच्या मोठ्या होटेलांत सर्व प्रतिनिधींचा व पाहुण्यांचा एकाच स्थळीं मोठ्या समारंभानें भोजनविधि होत असे. तिसऱ्या प्रहरीं चहासाठीं एकदां बैठक उठे तेव्हांही निरनिराळ्या भागांतून आलेल्या बंधुभगिनींची परस्पर ओळख होऊन अगत्याचीं संभाषणें होत. ह्या समाजांत स्त्रीपुरुषांची संख्या बहुतेक समसमानच होती. मुख्य दिवसांचें काम बरेंच महत्वाचें आणि वादग्रस्थ असूनही वादविवाद अगदीं सुरळीतपणें झाला. पहिले दिवशीं परिषदेच्या उपासनेच्या वेळीं फिलार्मोनिक हॉल नांवाच्या अत्यंत भव्य सार्वजनिक मंदिरांत सुमारें १३०० स्त्री-पुरुषांची गर्दी जमली होती. प्रार्थनेच्या आरंभीं—

Awake our souls! Away our fears!

ह्या पद्याचा टाहो एकदम जेव्हां १३०० कंठांतून फुटून बाहेर आला, तेव्हां इमारतीच्या दगडांनाही जणूं हुरूप येऊन ते प्रतिध्वनीच्या मिषानें आम्हास हांक देऊं लागले. जाहीरसभेंत श्रोतृवृंद १६०० वर हजर होता. मीं मागें एकदां युनिटेरिअन समाज म्हणजे सुधारलेल्या जगाचें प्रबुद्ध अंतर्याम असें म्हटलें होतें. त्याची मला येथें चागली प्रचीति आली. राजकीय, सामाजिक आणि धार्मिक ह्या सर्व बाजूंनीं जरी जहाल सुधारकी भाषणें झालीं, तरी चहूंकडून टाळ्यांचा गजरच झाला. जणूं चेतलेल्या अंतर्याम-देवतेची ही गर्जनाच! शेवटीं एके दिवशीं रात्रीं वॉकर्स आर्ट ग्यालरी नांवाच्या एका अफाट चित्रसंग्रहालयांत परिषदेचा सामाजिक मेळा (Conversazione) जमला; त्या वेळीं इकडील रिवाजाप्रमाणें सायंकाळचा प्रेक्षणीय पेहराव करून येथील कुलीन व प्रमुख कुटुंबांतील सुमारें दोन हजार स्त्री-पुरुषें जमलीं होतीं. अखेरीस शहरच्या कंगाल वस्तींत गरीबांसाठीं स्थापलेल्या एका मिशन-मंदिरांत मद्यपान-निषेधाची एक टोलेजंग सभा होऊन परिषदेचें

काम आटपलें. मुख्य काम जें मध्यसंघ स्थापण्याविषयींचें, त्याविषयीं सर्व समाजांच्या मतानुरूप सविस्तर विचार करून अखेर निकाल लावण्याचा अधिकार परिषदेच्या कमिटीस देण्यांत आला.

असो वाचकहो, आणि विशेषतः ब्राह्म बंधूंनो, ह्या सातासमुद्रांपलीकडच्या सात हजार मैलांवरच्या परदेशीं गप्पा तुम्हाला सांगण्यांत काय तात्पर्य बरें ! आज आम्ही ब्राह्मबंधु युनिटेरिअनांप्रमाणें सारख्याच नावेंत बसून संगतीनें एकाच तीराकडे निघालों आहों. त्यांच्या सारख्याच पण शतपट अधिक आह्मांपुढें अडचणी आहेत. त्यांच्या सारखीच पण सहस्रपट अधिक आमच्यावर जबाबदारी आहे. पण ते करीत आहेत त्या खटपटी, नजरेनें पाहून त्यांच्या अंशमात्रही खटपट करण्यास आम्ही कचरतों, ह्याला काय म्हणावें ! इंग्लिश लोकांचें युनिटेरिअन चळवळीवांचून विशेषसें अडतेंच असें नाहीं. येथें कोणी नव्या पंथाचा असो कीं जुन्या पंथाचा असो, मानवी प्रगतीच्या प्रत्येक बाबतींत हरतऱ्हेनें तो आपलें पाऊल पुढेंच टाकीत असतो. आमचें तसें आहे काय ? नवीन घोडे जुंपलेल्या गाडीप्रमाणें आमच्या राष्ट्राची ओढाताण होत आहे. आम्ही एकीकडे ओढावें तर ब्राह्मसमाजाबाहेरचे आमचे बंधु अगदीं उलट दिशेनें ओढ घेतात. फार काय पण समाजांतलेच आमचे बंधू वेळेला अंग चोरतात ! सपशेल जूं टाकून मोकळे होतातही केव्हां केव्हां ! प्रत्येकानें आपली शिकस्त केली तरी आमच्या अवजड राष्ट्राची गाडी हालेल कीं नाहीं याची भीति असूनही आम्हीं धरसोड चालविली आहे ! आमचे समाज थोडे, आमचे सभासद कमी, याबद्दल वाईट वाटावयाला नको. आहेत त्याच समाजांचा परस्पर संबंध समाधानकारक नाहीं, आहेत त्याच सभासदांच्या कर्तव्याची वांटणी न्यायाची नाहीं, ह्याबद्दल मात्र अवश्य वाईट वाटलें पाहिजे; वाटत नसेल तर मग सभासदांची संख्या कशी वाढेल ? आणि वाढून तरी काय फळ ! आमच्या युनिटेरिअन मित्रांना मध्यसंघाची अवश्यकता वाटून तिच्या तयारीला ते लागले देखील. पुढील त्रैवार्षिक परिषदेच्या आधींच तें काम उरकून जाईल. पण आमची वाट काय ? आम्ही आमचा प्रसार कां होत नसावा ह्या बद्दल नुसतें आश्चर्य मानीतच बसणार काय ?

---

## सुशिक्षित धर्मभगिनींस अनावृत पत्र.

( सुबोधपत्रिका ता० ९-८-१९०३. )

इकडे शुद्ध व उदार धर्माच्या अनेक चळवळी चालू आहेत, त्यांत स्त्रिया अलीकडे बहुतेक पुरुषांच्या बरोबरीनें पुढाकार घेऊं लागल्या आहेत. युनिटेरिअन्स हे सुधारलेल्या देशांतले सुधारक असल्यानें त्यांच्यांत तर हा प्रकार विशेष दिसून येतो आणि तो दिवसेंदिवस वाढतच आहे. उपासनामंदिरांत नेहमीं स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां सर्वत्र दुप्पट असतेच, पण कार्यसभेंतही ह्यांची संख्या निदान पुरुषांइतकी असते; इतकेंच नव्हे, तर प्लॅटफॉर्मवरही ह्या आपलें काम दक्षतेनें बजावतात. मागच्या वर्षी लंडन येथें युनिटेरिअन वार्षिक सभेंत दोघींचीं भाषणें झालीं, तर ह्या वर्षी कांहीं आठवड्यांपूर्वी जी मोठी परिषद् भरली होती, तींत चौघींनीं स्वानुभवाचीं जोरदार व मुद्देसूद भाषणें केलीं.

पण केवळ स्त्रियांनींच जें काम आपलेकडे घेतलें आहे आणि जें त्या मोठ्या मार्मिकपणें व उमेदीनें बजावीत आहेत तें पोस्टल मिशन हें होय. तें काम असें आहे.—

प्रमुख युनिटेरिअन आचार्यांचे साधे आणि मनोवेधक उपदेश पुस्तकरूपानें युनिटेरिअन मंडळी प्रसिद्ध करिते. त्यांपैकीं कांहींची प्रथम निवड करून, ह्या बाया कोणाही वाचकांस फुकट आपल्या खर्चानें पाठविण्यासंबंधींच्या जाहिराती, इकडील प्रसिद्ध पत्रांतून आपल्याच खर्चानें देतात. ह्या पत्रांचा युनिटेरिअन मतांशीं कसलाही संबंध बहुतेक नसतो. संशयानें गांजलेल्या लोकांकडून अगर केवळ काय आहे हे पाहण्याच्या इच्छेनें इतरांकडून ह्या पुस्तकांस सहजच मागणी येते. पुस्तक पाठवितांना अशी एक लहानशी सूचना करण्यांत येते कीं वाचून कांहीं शंका आल्यास त्यांच्या निरसनार्थही यत्न होईल. शंका कळविल्यास त्याचें समाधान ज्यांत मिळेल, अगर समाधान कळविल्यास त्याचें दृढीकरण ज्यांकरून

सत्तात्मक पायांवर, तेथील सभासदांकडून होत असते. स्थानिक समाजांची सर्व व्यवस्था राख ण्याची जबाबदारी जशी त्या त्या समाजांच्या सर्व सभासदव्यक्तींवर आहे तशीच अशा साऱ्या समाजांची एक मध्यसंस्था स्थापून तिच्याकडून मध्यव्यवस्थेचें व प्रसाराचें काम करविण्याची जबाबदारीही ह्या ठिकठिकाणच्या समाजांच्या कमिटीवरच आहे हें उघड आहे. पण आजपर्यंत हें काम ब्रिटिश अँड फॉरेन ह्या थोडया व्यक्तींच्या मंडळीकडूनच होत असल्यामुळें, समाजांत यावा तितका जोर अद्यापि आला नाहीं. ही स्थिति लक्षांत आणून सन १८८२ सालीं सर्व समाजांच्या प्रतिनिधींची ही परिषद् स्थापण्यांत आली. दर तीन वर्षांनीं तिची एक बैठक होते. गेल्या पंधरावड्यांत तिची आठवी बैठक लिव्हरपूल शहरीं झाली. उपदेशकांचा पगार वाढविणें, त्यांना पेन्शन देणें, मँचस्टर कॉलेज ऑक्सफर्ड येथें आणणें, वगैरेसाठीं मोठमोठे फंड जमविणें आणि इतर बरींच कामें ह्या परिषदेमुळें ह्या २१ वर्षांत झालीं आहेत. ही आठवी परिषद् भरण्यापूर्वी गेल्या सबंध वर्षांत एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं वाटाघाट होत होती; ती अशी कीं, आजपर्यंत परिषदेनें नुसते ठराव पास केले आहेत, तर ह्यापुढें तिच्या कमिटीची एक मोठी कार्यकारी संस्था बनावी, तिच्या सेक्रेटरीनें नेहमीं देशभर हिंडून सर्व समाजांचा प्रत्यक्ष समाचार घ्यावा व लागेल ती मदत करावी, या कामास त्यानें आपणास वाहून घ्यावें व त्यास भरपूर पगार द्यावा; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे युनिटेरियनांचा एक मोठा संघ (church) स्थापावा.

ह्याप्रकारें आज वर्षभर चर्चा होऊन शेवटीं परवां एकसारखें चार दिवस ह्या परिषदेचें काम लिव्हरपूल येथें झालें. याची साद्यन्त हकीकत इन्क्वायर पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. त्यांतील अध्यक्षांचें भाषण व उपदेश, मुख्य कामासंबंधीं रेव्ह. वुड ह्यांचा कागद, जाहीर सभेंतील रेव्ह. जॅक्स व विक्सटीड ह्यांचीं भाषणें फार मनन करण्यासारखीं आहेत. परिषद् मला कशी दिसली हे थोडक्यांत लिहितों.

लिव्हरपूल हें शहर अत्यंत श्रीमंत आणि साऱ्या इंग्लंडांत पुढारलेलें आहे. तेथील परिषदेच्या व्यवस्थापक मंडळीनें बाहेरून आलेल्या सुमारें ६०० प्रतिनिधींची उत्तम व्यवस्था सर्व आपल्या खर्चानें केली होती. टाऊन हालांतील सुंदर आणि भव्य गायनशाळेंत चार दिवस सकाळीं १० पासून तों रात्रीं १० पर्यंत सभेचें काम चालत असे. नेहमीं सुमारें १००० चा श्रोतृवृंद शांतपणें बसून ऐकत असे. मध्यंतरीं एका जवळच्या मोठ्या होटेलांत सर्व प्रतिनिधींचा व पाहुण्यांचा एकाच स्थळीं मोठ्या समारंभानें भोजनविधि होत असे. तिसऱ्या प्रहरीं चहासाठीं एकदां बैठक उठे तेव्हांही निरनिराळ्या भागांतून आलेल्या बंधुभगिनींची परस्पर ओळख होऊन अगत्याचीं संभाषणें होत. ह्या समाजांत स्त्रीपुरुषांची संख्या बहुतेक समसमानच होती. मुख्य दिवसांचें काम बरेंच महत्त्वाचें आणि वादग्रस्थ असूनही वादविवाद अगदीं सुरळीतपणें झाला. पहिले दिवशीं परिषदेच्या उपासनेच्या वेळीं फिलार्मोनिक हॉल नांवाच्या अत्यंत भव्य सार्वजनिक मंदिरांत सुमारें १३०० स्त्री-पुरुषांची गर्दी जमली होती. प्रार्थनेच्या आरंभीं—

Awake our souls! Away our fears!

ह्या पद्याचा टाहो एकदम जेव्हां १३०० कंठांतून फुटून बाहेर आला, तेव्हां इमारतीच्या दगडांनाही जणूं हुरूप येऊन ते प्रतिध्वनीच्या मिषानें आम्हास हांक देऊं लागले. जाहीरसभेंत श्रोतृवृंद १६०० वर हजर होता. मीं मागें एकदां युनिटेरिअन समाज म्हणजे सुधारलेल्या जगाचें प्रबुद्ध अंतर्याम असें म्हटलें होतें. त्याची मला येथें चांगली प्रचीति आली. राजकीय, सामाजिक आणि धार्मिक ह्या सर्व बाजूंनीं जरी जहाल सुधारकी भाषणें झालीं, तरी चहूंकडून टाळ्यांचा गजरच झाला. जणूं चेतलेल्या अंतर्याम-देवतेची ही गर्जनाच! शेवटीं एके दिवशीं रात्रीं वॉकर्स आर्ट ग्यालरी नांवाच्या एका अफाट चित्रसंग्रहालयांत परिषदेचा सामाजिक मेळा (Conversazione) जमला; त्या वेळीं इकडील रिवाजाप्रमाणें सायंकाळचा प्रेक्षणीय पेहराव करून येथील कुलीन व प्रमुख कुटुंबांतलि सुमारें दोन हजार स्त्री–पुरुषें जमलीं होतीं. अखेरीस शहरच्या कंगाल वस्तींत गरीबांसाठीं स्थापलेल्या एका मिशन–मंदिरांत मद्यपान–निषेधाची एक टोलेजंग सभा होऊन परिषदेचें

काम आटपलें. मुख्य काम जें मध्यसंघ स्थापण्याविषयींचें, त्याविषयीं सर्व समाजांच्या मतानुरूप सविस्तर विचार करून अखेर निकाल लावण्याचा अधिकार परिषदेच्या कमिटीस देण्यांत आला.

असो वाचकहो, आणि विशेषतः ब्राह्म बंधूंनो, ह्या सातासमुद्रांपलकिडच्या सात हजार मैलांवरच्या परदेशीं गप्पा तुम्हाला सांगण्यांत काय तात्पर्य बरें! आज आम्ही ब्राह्मबंधु युनिटेरिअनांप्रमाणें सारख्याच नावेंत बसून संगतीनें एकाच तीराकडे निघालों आहों. त्यांच्या सारख्याच पण शतपट अधिक आह्मांपुढें अडचणी आहेत. त्यांच्या सारखीच पण सहस्रपट अधिक आमच्यावर जबाबदारी आहे. पण ते करीत आहेत त्या खटपटी, नजरेनें पाहून त्यांच्या अंशमात्रही खटपट करण्यास आम्ही कचरतों, ह्याला काय म्हणावें! इंग्लिश लोकांचें युनिटेरिअन चळवळीवांचून विशेषसें अडतेंच असें नाहीं. येथें कोणी नव्या पंथाचा असो कीं जुन्या पंथाचा असो, मानवी प्रगतीच्या प्रत्येक बाबतींत हरतऱ्हेनें तो आपलें पाऊल पुढेंच टाकीत असतो. आमचें तसें आहे काय? नवीन घोडे जुंपलेल्या गाडीप्रमाणें आमच्या राष्ट्राची ओढाताण होत आहे. आम्ही एकीकडे ओढावें तर ब्राह्मसमाजाबाहेरचे आमचे बंधु अगदीं उलट दिशेनें ओढ घेतात. फार काय पण समाजांतलेच आमचे बंधू वेळेला अंग चोरतात! सपशेल जूं टाकून मोकळे होतातही केव्हां केव्हां! प्रत्येकानें आपली शिकस्त केली तरी आमच्या अवजड राष्ट्राची गाडी हालेल कीं नाहीं याची भीति असूनही आम्हीं धरसोड चालविली आहे! आमचे समाज थोडे, आमचे सभासद कमी, याबद्दल वाईट वाटावयाला नको. आहेत त्याच समाजांचा परस्पर संबंध समाधानकारक नाहीं, आहेत त्याच सभासदांच्या कर्तव्याची वांटणी न्यायाची नाहीं, ह्याबद्दल मात्र अवश्य वाईट वाटलें पाहिजे; वाटत नसेल तर मग सभासदांची संख्या कशी वाढेल? आणि वाढून तरी काय फळ! आमच्या युनिटेरिअन मित्रांना मध्यसंघाची अवश्यकता वाटून तिच्या तयारीला ते लागले देखील. पुढील त्रैवार्षिक परिषदेच्या आधींच तें काम उरकून जाईल. पण आमची वाट काय? आम्ही आमचा प्रसार कां होत नसावा ह्या बद्दल नुसतें आश्चर्य मानीतच बसणार काय?

---

## सुशिक्षित धर्मभगिनींस अनावृत पत्र.

( सुबोधपत्रिका ता० ९-८-१९०३. )

इकडे शुद्ध व उदार धर्मांच्या अनेक चळवळी चालू आहेत, त्यांत स्त्रिया अलीकडे बहुतेक पुरुषांच्या बरोबरीनें पुढाकार घेऊं लागल्या आहेत. युनिटेरिअन्स हे सुधारलेल्या देशांतले सुधारक असल्यानें त्यांच्यांत तर हा प्रकार विशेष दिसून येतो आणि तो दिवसेंदिवस वाढतच आहे. उपासनामंदिरांत नेहमीं स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां सर्वत्र दुप्पट असतेच, पण कार्यसभेंतही ह्यांची संख्या निदान पुरुषांइतकी असते; इतकेंच नव्हे, तर प्लॅटफॉर्मवरही ह्या आपलें काम दक्षतेनें बजावतात. मागच्या वर्षीं लंडन येथें युनिटेरिअन वार्षिक सभेंत दोघींचीं भाषणें झालीं, तर ह्या वर्षीं कांहीं आठवड्यांपूर्वीं जी मोठी परिषद् भरली होती, तींत चौघींनीं स्वानुभवाचीं जोरदार व मुद्देसूद भाषणें केलीं.

पण केवळ स्त्रियांनींच जें काम आपलेकडे घेतलें आहे आणि जें त्या मोठ्या मार्मिकपणें व उमेदीनें बजावीत आहेत तें **पोस्टल मिशन** हें होय. तें काम असें आहे.—

प्रमुख युनिटेरिअन आचार्यांचे साधे आणि मनोवेधक उपदेश पुस्तकरूपानें युनिटेरिअन मंडळी प्रसिद्ध करिते. त्यांपैकीं कांहींची प्रथम निवड करून, ह्या बाया कोणाही वाचकांस फुकट आपल्या खर्चानें पाठविण्यासंबंधींच्या जाहिराती, इकडील प्रसिद्ध पत्रांतून आपल्याच खर्चानें देतात. ह्या पत्रांचा युनिटेरिअन मतांशीं कसलाही संबंध बहुतेक नसतो. संशयानें गांजलेल्या लोकांकडून अगर केवळ काय आहे हें पाहण्याच्या इच्छेनें इतरांकडून ह्या पुस्तकांस सहजच मागणी येते. पुस्तक पाठवितांना अशी एक लहानशी सूचना करण्यांत येते कीं वाचून कांहीं शंका आल्यास त्यांच्या निरसनार्थही यत्न होईल. शंका कळविल्यास त्याचें समाधान ज्यांत मिळेल, अगर समाधान कळविल्यास त्याचें दृढीकरण ज्येणेंकरून

होईल अशीं दुसरीं पुस्तकें पाठवितात. त्याबरोबर लहानसें पण सहानुभूतीचें पत्रही जातें. अशा रीतीनें सहजच पत्रव्यवहार वाढून, शेवटीं आपण युनिटेरिअन आहों असें प्रत्येकास कळून येतें. पुस्तकें पाठविण्यांत विनाकारण घाई अगर मिशनरी लोकांत कांहीं ठिकाणीं दिसून येणारा अधाशीपणा न होऊं देण्याची खबरदारी घेतली जाते. पत्रव्यवहारही जिज्ञासूंच्या अनुसंधानानेंच चालतो. अशा रीतीनें, युनिटेरिअन म्हणजे धर्मलंड अगर धर्माभिमानशून्य वगैरे ज्या भ्रामक कल्पना झाल्या असतात, त्यांचा निरास होऊन वाचक युनिटेरिअन मंदिरांत उपासनेस जाण्यास राजी झाले, असें दिसल्यावर त्यांस त्यांच्या गांवांतील युनिटेरिअन मंदिराची वाट दाखविण्यांत येते, अगर आचार्यांची ओळख करून देण्यांत येते. आतांपर्यंत जी मदत पत्र मार्गानें होते ती ह्यापुढें प्रत्यक्ष होऊं लागून लवकरच वाचक झालेल्या उपकाराबद्दल उतराई होण्यास उत्साहपूर्ण युनिटेरिअन होतो.

ही कल्पना मूळ अमेरिकन युनिटेरिअन स्त्रियांत निघाली. ती लंडन येथील स्त्रियांनीं उचलली. जाहिराती व टपालखर्चासाठीं लहानशी वर्गणी स्थापून युनिटेरिअन स्त्रियांनीं आपल्यांतच एक अशी मंडळी बनविली. १८८७ सालीं एकच मंडळी होती. १८८९ सालीं ह्या देशांतील निरनिराळ्या शहरांत अशा १३ मंडळ्या निघाल्या. हल्लीं २३ मंडळ्या असून त्यांचे सभासद वाढतच आहेत. ह्या सर्वांचें एक साधारण संमेलन लंडन येथें आहे. गेल्या तीन वर्षांत ५००० लोकांकडून मागण्या आल्या. व त्यांस १५००० वर पुस्तकें पाठविण्यांत आलीं. अशीं पुस्तकें वाचून युनिटेरिअन झालेल्यांपैकीं कांहीं थोडे आचार्य बनले, बरेच साधारण उपदेशक बनले, कित्येक आदित्यवारच्या शाळेंत शिकवूं लागले.

त्रैवार्षिक, वार्षिक आणि प्रांतानिहाय युनिटेरिअन समाजाच्या इतर ज्या सभा भरतात त्यांत ह्या मंडळ्याही जमतात. तेव्हां त्या आपल्या कामाचा ऊहापोह करून आपली हकीकत प्रसिद्ध करितात. अशावेळीं जीं भाषणें व्हावयाचीं असतात, तीं जे लोक ह्या मिशनच्या द्वारें युनिटेरिअन बनलेले असतात, त्यांच्याकडूनच होतील अशी योजना असते. कांहीं पत्रांचे उतारे वाचतात त्यांचे मासले येणेंप्रमाणें:—

जुन्या मताचा उपदेशक—'मि० बोबीसाहेबांचा उपदेश ऐकल्यापासून मी स्वतःशीं युनिटेरियन आहे कीं काय असा विचार करीत आहे. तो उपदेश प्रत्येक पीठांतून व्हावा असें वाटतें....'

खाणींतील मेथॉडिस्ट मजूर—'मार्टिनोसाहेबांचा Seat of Authority in Religion हा ग्रंथ वाचण्याची आमची इच्छा आहे. पण विकत घेण्याची शक्ति नाहीं. आमच्या समाजांतील कांहीं जणांचीं मतें तुमच्यासारखींच आहेत. तुमचा समाज तुम्हांला वाटतो त्यापेक्षां मोठा आहे....'

अज्ञेयवादी—'तुम्हीं मला पाठविलेलीं पुस्तकें वाचून सुमारें १२ जण युनिटेरिअन झाले आहेत...माझें कोडें उकललें....तुम्हीं दाखविलेलें देवाचें स्वरूप इतकें सहज आहे कीं, त्याचें प्रेम मला अपरिहार्य झालें आहे.'

ह्याप्रमाणें असें हें काम केवळ बायकांनींच मिळून नीटनेटकें बिनबोभाट व बिनतक्रार चालविलें आहे. पुरुष हकीकत ऐकण्यास मात्र सभेस येतात. लहानमोठ्या पुस्तकांचा सांठा मात्र युनिटेरिअन असोसियनकडून लागेल तितका खुषीनें मिळतो, त्यांत काय नवल !

वर मीं जी हकीकत दिली आहे, ती केवळ वाचून हर्ष आणि आश्चर्य मानण्याकरितां एक विलायती चुटका पाठविला आहे असें नव्हे. तर हें काम तुम्हांकडूनही होण्यासारखें आहे व होणें जरूर आहे.

मी गेल्या वर्षीं एकदां लंडनमध्यें असतां ह्या मंडळीच्या मुख्य अध्यक्षबाईस ह्या कामाची माहिती विचारली. प्रत्यक्ष ओळख नसतां ह्या बाईनें मला आणि मुख्य सेक्रेटरीबाईला आपले घरीं भेटविलें आणि दोघांनीं मोठ्या आनंदानें व अगत्यानें मला सर्व माहिती करून दिली. लागच आमचे बंधु रा० सुखटणकर ह्यांनीं हें काम आपल्या अंगावर घेतलें व आतांपर्यंत अनेक अडचणी सोसून तिकडे हें काम चालविलें आहे पण आतां त्यांना इकडे येणें आहे.

हें काम खरोखर स्त्रियांनाच योग्य आहे, आणि स्त्रियांना खरोखरी तूर्त हेंच काम आहे, हें इक-

ढच्या अनुभवावरून निर्विवाद आहे. आर्यमहिला समाजांत तुमच्यापैकीं कित्येकींनीं निबंध वाचलेले ऐकिवांत आहे. असे निबंध वाचण्यापेक्षां वरील पोस्टल मिशनचीं दोन चार ओळींचीं पत्रें लिहिणें विशेष अवघड आहेसें वाटत नाहीं. उलट फायदा मात्र पुष्कळ होईल. यावरून आर्य महिला–समाज बंद करा असें माझें म्हणणें नाहीं, तर त्यांत एक तुमचेंच पोस्टल मिशन वरील धोरणावर काढा अशी विनंति आहे. रा. सुखटणकर तेथें आहेत तोंपर्यंत आपल्या अनुभवाचा फायदा तुम्हांला अगदीं आनंदानें देतील. ह्या कामाला मोठी एक परिषद् भरविली पाहिजे असें नाहीं. हें काम बोभाट्याचें अगर भपक्याचें मुळींच नव्हे. तर तुम्हांला शोभेल अशा मर्यादेचें आहे. दिवाणखान्यांत पडद्याआड बसून मुलांस खेळवीत खेळवीतही तुम्ही हें काम उरकूं शकाल. प्रत्येक पोस्टमास्तर व पोस्टाचा शिपाई तुम्हांस बेमालूम मदत करील–करणें भाग आहे.

जिन्नसांची उणीव आहे म्हणावें, तर तसेंही नाहीं. आज हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून कित्येक तरुण विद्यार्थ्यांचीं पत्रें लंडन येथील सेक्रेटरीबाईकडे येत आहेत. ती बाई तीं मजकडे पाहण्यास पाठविते. घरच्याघरीं तेथें तुम्हीं हें काम पतकरल्यास किती सोय होईल !

युनिटेरिअनांचा, आमचा व इतर सर्वांचा देव एकच आहे. सर्वांच्या अंतःकरणांतल्या खऱ्या गरजा व वेदना एकच आहेत. म्हणून ह्या बाबतींत तुम्हांला इंग्रजींत जितक्या म्हणून वाङ्मयाची गरज पडेल तितकें सर्व इकडील तुमच्या बहिणींकडून मोठ्या आनंदानें पुरविण्यांत येईल. येशू खिस्त किती जरी चांगला मनुष्य होता अशी इकडे ह्यांची समजूत आहे, तरी आमच्या लोकांनीं त्याचेच गोडवे गावे अशी ह्यांची कोती इच्छा नाहीं. आधुनिक विचारपद्धतीस पूर्ण पटतील अशीच केवळ ईश्वरविषयक पुस्तकें लागतील तितकीं पाठवतील. इतकेंच नव्हे तर आफ्रिकेंतून कांहीं मुसलमान लोकांकडून पत्रें आलीं आहेत; त्यांच्यासाठीं, राजा राममोहनराय ह्यांनीं मागें मुसलमानांसाठीं कुराणासंबंधीं कांहीं लेख लिहिलेले उपलब्ध आहेत काय म्हणून अध्यक्षबाई मिस् टॅगर्ट हिनें मला परवां लंडन येथें विचारलें. ते लेख मिळतील तर इकडे छापून निघण्यास अडचण पडणार नाहीं. ह्याचप्रमाणें आमचे पुढारी केशवचंद्र व प्रतापचंद्र इत्यादिकांचेही लहान लहान लेख रा. सुखटणकरांनीं तिकडे छापून ह्याच कामासाठीं काढिले आहेत. सवडीप्रमाणें व मदतीप्रमाणें मराठी पुस्तकांचीही ह्यांत भर पडत जाईल.

म्हणून आमच्या समाजांतील तुम्हां सर्व बहिणींस–खुशी असल्यास बाहेरच्यांसही–अशी अगत्याची विनंति आहे कीं रा. सुखटणकर हे हिंदुस्थान सोडण्यापूर्वीं तुम्हीं आपल्यांत एक पोस्टल मिशन स्थापावें. प्रथम प्रथम जड गेल्यास एका दोघांकडून मदत घ्यावी. पुष्कळ जणी जमण्याची जरूरी नाहीं. एक अध्यक्ष, एक खजिनदारीण आणि खरोखर झटून काम करणारी एक सेक्रेटरी मिळाल्यास पुरे. सर्व कांहीं ह्या एकीवरच अवलंबून आहे. टपालखर्च भागविण्यास इतर वर्गणीदार स्त्रिया मिळतील तितक्या थोड्याच.

इतर पाल्हाळ लिहिण्याची गरज नाहीं. सार्वजनिक कामें करण्याचा स्त्रियांना हक्क आहे व त्यांच्यांत शक्तिही आहे अशा अर्थाचे बरेच लेख सुधारकांनीं लिहिले आहेत; व तुम्हांस ते पटले आहेत. हें एक लहानसें काम घरीं बसूनच होणारें आहे. त्याचा विचार व्हावा.

---

## आपला व खालील प्राण्यांचा संबंध.

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड.

( सुबोधपत्रिका ता० ५–१०–१९०२. )

मुलांनो, आमच्यापेक्षां खालील प्राण्यांस बुद्धि नाहीं, अक्कल नाहीं असें आम्ही नेहमीं मोठ्या तोऱ्यानें बोलत असतों. पण, आज मी तुम्हांस ह्या प्राण्यांबद्दल दोन तीन गोष्टी सांगणार आहें. त्यांसंबंधानें तुम्ही आपल्याशींच विचार करा.

डेव्हन पोर्ट शहरीं एके दिवशीं मी आपल्या खोलींत वाचीत बसलों होतों. जवळच घरचें मांजर धुरधुरत बसलें होतें. कांहीं वेळानें त्यास बाहेर जावेंसें वाटलें. पण, दार घट्ट झांकलें होतें. ह्या देशांत थंडीमुळें घराचीं सर्व दारें आणि

खिडक्या सुमारें ६ महिने नेहमीं बंद ठेवावीं लागतात. तें दोन तीनदां ओरडलें. पण माझें लक्ष तिकडे गेलें नाहीं. शेवटीं मीं जेव्हां तिकडे पाहिलें तेव्हां मांजर आपल्या पायांवर ताठ उभारून मजकडे पहात पहात दाराच्या कडीकडे आपले रेशमी हात पोहोंचविण्याचा प्रयत्न करूं लागलें. एवढी खूण मला पुरे झाली. मीं दार उघडल्यावर मांजर मुकाट्यानें बाहेर चालतें झालें! बोलतां आलें असतें तर मांजर ' थँक यू ' म्हणून आभार मानल्याशिवाय राहतें ना!

पण एवढ्यावरून सर्वच प्राणी ह्या मांजरासारखे मुके आहेत असें समजूं नका. थोड्या वर्षां पूर्वी तुम्हां स्वतःला जितकें बोलतां येत होतें त्या पेक्षां अधिक व जास्त स्पष्टपणें—आणि तेंही इंग्रजींत माझ्याशीं एक पक्षी बोलला त्याची हकीकत अशी:

स्कॉटलंड देशाची राजधानी एडिंबरो ह्या शहराजवळ 'फर्थ ऑफ फोर्थ' नांवाच्या खाडीवर एक मला जंगी पूल बांधला आहे. तो पाहण्यास मी एके दिवशीं गेलों होतों. पाहून झाल्यावर पुलाखालच्या खेड्यांतील एका गृहस्थानें मला चहाला बोलाविलें. कोणी नवीन पाहुणा घरीं आल्यास त्याची आधीं घरांतील सर्व मंडळींशीं शिष्टसंप्रदायाप्रमाणें हात हालवून ओळख करून देण्याची इकडे चाल आहे. पण, ह्या वेळीं घरांतील सर्व मुली बाहेर गेल्या असल्यामुळें घरधनिणीनें आपला आवडता पोपट मजपुढें आणिला. पोपटबुवांची मुद्रा गंभीर आणि अति संभावित दिसली. पुढें आल्या बरोबर पॉलपंतांनीं मला ' हाऊ डु यू डू' (कसें काय आहे?) असें इंग्रजींत स्पष्ट कुशल विचारिलें आणि लगेच आपला उजवा पंजा पुढें केला! ही असाधारण सभ्यता पाहून मी जरी चकित झालों होतों, तरी आपलें बोट स्वारीच्या पंजांत घालून त्याच्याशीं मला सख्य करावें लागलें. आम्ही सर्वजण बसल्यावर पॉलसाहेबही खिडकींतून पुलाचा देखावा पाहत बसले. धनिणीनें त्यांस गावयास सांगितल्यावर ' आय् हॅव्ह गॉट् कोल्ड ' ( मला थंडी झाली आहे. ) अशी थाप ठेवून दिली! स्वारीस गावयास येत होतें कीं नाहीं, ह्याची शंकाच होती! पण त्यांच्या गाण्यापेक्षां त्यांची थाप ऐकूनच मला विशेष कौतुक वाटलें. शेवटीं टेबलावर चहाची तयारी झाल्यावर ' आय वॉंट अ कप् ऑफ टी ' (मला एक चहाचा पेला आणा) असें कितीदां तरी म्हटलें. निरनिराळ्या देशांच्या चालीरीतीसंबंधानें बोलणें निघून आम्ही मध्यें जेव्हां जेव्हां हासूं, तेव्हां तेव्हां पोपटही जणूं कळल्याप्रमाणें हुबेहुब माणसांसारखेंच हासे. त्याचें खोटें हासूं ऐकून आम्हांला अधिकच हासूं येई; तरी तिकडे त्याचाच गोंगाट अधिक! स्वारी लहरींत आल्यास केव्हां केव्हां पुष्कळ वक्तृत्व दाखविते असें त्याच्या धनिणीनें सांगितलें.

मुलांनो, खालील प्राण्यांत केव्हां केव्हां दिसणाऱ्या ह्या चमत्कारिक गुणांचें आम्ही घटकाभर करमणुकीपलीकडे विशेष महत्व मानीत नाहीं, कां तर ह्यांहून पुष्कळपट मोठे गुण आमच्या स्वतः मध्यें किती तरी आहेत! बरें असो. मी आतां तुम्हांस तिसरी गोष्ट सांगतों.

इंग्लंडच्या उत्तर भागीं सरोवर प्रांतीं हेलव्हेलन नांवाच्या एका उंच पर्वतशिखरावर मी एके दिवशीं चढत होतों. चढण बरीच कठीण होती. चढून गेल्यावर शिखरावर मला एक सुंदर संगमरवरी शिळा उभी केलेली दिसली. अशा कठीण व एकांत स्थळीं कोणा तरी थोर साधूचें हें स्मारक असावें असें वाटून मी त्यावरील लेख वाचण्यासाठीं जवळ गेलों. लेख पुढील अर्थाचा होता. इ. स. १८०५ सालीं चार्लस गाऊ नांवाचा कोणी गृहस्थ ह्या पर्वतावरून हिंडत असतांना खालीं पडून बर्फांत गोठून मरण पावला. त्याचा प्रामाणिक कुत्रा त्याच्या प्रेताचें रक्षण करीत तीन महिने त्या ओसाड डोंगरांत होता. शेवटीं धन्याचीं वाळलेलीं हाडें राखीत असतांना हा कुत्रा एका धनगरास आढळला! ह्या एकनिष्ठ दैवी पशूच्या स्मारकार्थ प्राण्यांची कनवाळू प्रसिद्ध फ्रान्सिस पॉवर कॉबबाई हिनें हा सुंदर शिलालेख सन १८९० मध्यें रोंविला. ह्या दगडांच्या स्मारकाहून अधिक महत्वाचें स्मारक वर्डस्वर्थ कवीनें Fidelity म्हणजे एकनिष्ठा ह्या नांवानें कवितेच्या रूपानें करून ठेविलें आहे! मुलांनो, ह्या भयाण व निर्जन प्रदेशांत कडक हिंवाळ्याच्या बर्फांत तीन महिने ह्या कुत्र्यानें आपली उपजीविका तरी कशी केली असेल! ह्याचें उत्तर वर्डस्वर्थनें आपल्या कवितेच्या शेवटीं दिलें आहे तें असें.

How nourished here through such long time-
He knows that gave that love sublime;
And gave that strength of feeling great;
Above all human estimate!

मुलांनो, तुम्हांस इंग्रजी येत नसेल कदाचित् तर वरील ओळींचा अर्थ इंग्रजी जाणणाऱ्या तुमच्या वडिलांस विचारा. आणि नुसता शब्दार्थच नव्हे तर खोल अर्थ-व तो तुम्हांस स्वतःला नीट उमजेपर्यंत वडिलांची पाठ सोडूं नका.

चिमुकल्यांनो, ह्या तीन गोष्टी झाल्या. अशा आणखी किती तरी सांगतां येतील! पुष्कळ तुम्हीं स्वतःच पाहिल्या असतील, पण त्या तुम्हांला दिसल्या नसतील-म्हणजे कळल्या नसतील, आतां तुम्हांला घरांतील कुत्रीं, मांजरें, गोठ्यांतील गाई घोडें, बागेंतील चिमण्या, राघू ह्यां संबंधानें काय वाटतें? त्यांस ईश्वरानें केवळ आमच्या काबाडकष्टांकरितां व तुमच्या खेळांकरितांच उत्पन्न केलें असेल काय? ईश्वर आम्हांवर जशी प्रीति करितो तशी त्यांच्यावरही करितो. आम्हांस जसे गुण दिले आहेत तसेच थोडेबहुत त्यांना दिले आहेत; ही गोष्ट आतां आम्ही कबूल करावीच काय! देवाच्या मोठ्या कुटुंबांत हे प्राणी आमचीं लहान भावंडें आहेत असें म्हणण्याची अद्यापि थोडी लाज वाटते नव्हे! एकेकाळीं कमी दर्जाच्या माणसांस देवानें मोठ्या दर्जाच्या माणसाच्या उपयोगासाठींच केलें आहे, असा समज होता; पण, आतां हा अडाणी समज कमी होऊन सर्व मनुष्यजात एकाच बापाचीं लेंकरें आहेत असें हळू हळू वाटूं लागलें आहे.

हलक्या मनाच्या मनुष्यास देवानें संपत्ति मिळाली कीं तो आपल्या पूर्वीच्या गरीब नातलगांस तुच्छ मानूं लागतो. मुलांनो, तुम्ही खालील प्राण्यांशीं आपलें खरें नातें विसराल तर तुमच्यावरही वरील दोष येईल. तर कुत्र्या-मांजरांत तुमचे जे खेळगडी असतील, त्यांच्यांशीं आतांपासून प्रेमानें व गोडीनें वागाल ना!

---

## पृथ्वीच्या पोटांत ४४० यार्डांखालीं.

### ऑक्सफर्ड.

(सुबोधपत्रिका, ता. १८-१-१९०३.)

मुलांनो, दगडी कोळसा तुम्हाला पाहून, निदान ऐकून तरी माहित असेलच. लोखंड आणि दगडी कोळसा म्हणजे इंग्रज लोकांचें हाड आणि मांस असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या कोळशाच्या खाणी सुदैवानें ह्या लहानशा बेटांत इतक्या विपुल पसरल्या आहेत कीं, ह्या राष्ट्राच्या जगड्व्याळ गरजा भागूनही त्यास दरवर्षी अगणित खंडी बाहेरदेशीं पाठवितां येतात. आफ्रिकेंतील हिऱ्यांच्या खाणी घेऊन येथील कोळशाच्या खाणी द्या, असें कोणीं म्हटल्यास हे लोक कबूल होणार नाहींत! तर अशा ह्या अमोल द्रव्याची एकादी खाण आपण पाहूं चला.

आपण सध्यां मँचेस्टर शहराच्या उत्तरेकडे सुमारें ५ मैलांवर आलों आहों. हें पहा एक मोठें आवार आणि त्यांतील पटांगण मधोमध सुमारें २०-२५ फूट उंचीवर एक भलें मोठें चक्र उभें फिरत आहे. त्या चक्रावरून भली भक्कम लोखंडी काढणी पृथ्वीच्या पोटांत गेली आहे. बरोबर त्या चक्राच्या खालीं जमिनींत सुमारें १० फट लांब, रुंद, चौकोनी आडाप्रमाणें एक खळगा आहे. एकंदरींत हा सर्व देखावा एकाद्या साधारण रहाटगाडग्यासारखा दिसतो. त्याशिवाय सभोंवतीं ह्या पटांगणांत दुसरें कांहींच विशेष दिसत नाहीं आणि मी तर तुम्हांस येथें कोळशाची एक आश्चर्यकारक खाण दाखविण्यास आणिलें! मुलांनो, निराश होऊं नका. आपल्या पायांखालींच पृथ्वीच्या पोटांत सुमारें पाव मैलाखालीं एक ३-४ मैल लांबीची भली मातब्बर खाण पसरली आहे बरें! ती पहा, आपणांस खालीं नेण्याकरितां पाताळांतून एक पिंजऱ्यासारखी खोली आडाच्या तोंडाशीं आली. मी तुमच्यासाठीं मॅनेजर साहेबांच्या परवानगीची वगैरे सर्व व्यवस्था केली आहे. पहा, आम्ही परकीय पाहुणे म्हणून येथील लोक एकादी गोष्ट किती आदरानें दाखवितात. आमचे बरोबर संभाळण्यास एक स्नेही व स्वतः मॅनेजरही खालीं उतरत आहेत; तर तुम्हांस भिण्याचें कांहीं

कारण नाहीं. पण थांबा, उतरण्यापूर्वीं आधीं तुमचे चांगले कपडे काढून जुने कपडे चढवा. कोळशाच्या धुळीमुळें ते खराब झाले तरी हरकत नाहीं. तुमच्याजवळ आगकाडया अगर दुसरा कसलाही ज्वालाग्राही पदार्थ असल्यास तो वरच ठेवा. तो खालीं तुमच्याजवळ निघाल्यास खाडकन् सर्वांस कैदेची शिक्षा होईल हो!

चला, तर आपण पिंजऱ्यांत जाऊं. हें पहा आतां ७ वाजून १५ मिनिटें झालीं आहेत. आमच्यासकट एवढा मोठा पिंजरा, एकादा धोंडा जसा पडावा, तसा एका मिनिटांत खालीं जाईल. पहा, आपल्यास हा वेग दुःसह होऊं लागला आहे नव्हे! पोटांत कालवतें, उरांत धस्स होतें, डोकें भणभणतें, आमच्यांत एकादी मुलगी असती, तर तिनें किंकाळीच फोडली असती! आतां आम्ही तळाशीं पोहोंचलों देखील! घडयाळांत पहा ७-१६ मिनिटांवर थोडीं सेकंदें झालीं आहेत! तरी आम्ही नवखे असल्यामुळें, पिंजऱ्यास तितका वेग दिला नव्हता. कानांत कशा कळा येऊं लागल्या आहेत, ऐकूं अगदींच कमी येतें! कां तें समजलें काय? आम्ही पृथ्वीवर होतों, त्यापेक्षां आतां १३२० फूट खालीं आल्याकारणानें कानांतील पडद्यावर हवेचें तितकें जास्त दडपण पडत आहे व एका मिनिटांतच हा फरक पडल्यामुळें, किंचित् कळा येऊं लागल्या आहेत. लवकरच ह्या दडपणाची संवय होऊन पूर्ववत् ऐकूं येईल.

हें खाणीचें तोंड एकाद्या अवीट बोगद्यासारखें दिसत आहे. कामदार, मजूर, घोडीं व खटारे हीं सर्व सारखींच राबत आहेत. सूर्याची येथें खबरही नाहीं; तथापि त्यावांचून कांहीं अडलें नाहीं. चहूंकडे ग्यासचे तोंडे पेटले आहेत. त्या उजेडांत भिंती आणि छत ह्यांचा, गुळगुळीत पांढऱ्या विटांनीं मढविलेला अर्धगोल स्पष्ट दिसत आहे. एकंदरींत आपल्यास आज एका नव्याच सृष्टीचा शोध लागल्याचा भास होत आहे. बाजूच्या तबेल्यांत जाऊन आपण मूळ खाणीकडे जाण्याची तयारी करूं या. ह्या तबेल्यांत हल्लीं अठरा घोडे कामावरून येऊन चंदी चरत उभे आहेत. येथें अत्यंत अवश्य तितकाच प्रकाश आहे. भिंतीवर कायसें हालत आहे, तें पाहिलें काय? अहो तीं झुरळें! उबट हवा, अंधार, माणसांची फारशी वहिवाट नाहीं अशा ठिकाणीं ह्या अमंगळ प्राण्यांचा सुकाळ असणारच. मुलांनो! आपल्या शरीरांत आळस व मनांत अज्ञान सांचूं दिल्यास त्यांत ह्या प्राण्यांहून किती तरी जास्त अमंगळ विचारांची हेंदर वाढते बरें! असो.

खाणीचा गर्भ येथून सुमारें २ मैल लांब आहे. येथून पुढें कोठेंही तुम्हांला प्रकाशाचें एक किरण अगर आगीची एकादी ठिणगीही नजरेस पडणार नाहीं. कारण खाणींतील वातावरणांत कोळशाचा पेट घेणारा वायु केव्हां केव्हां बराच मिसळत असल्यामुळें त्यांचा यत्किंचित्ही अग्नीशीं संयोग झाल्यास मोठा प्रळय घडेल. पण कामकऱ्यास दिसलें तर पाहिजेच म्हणून प्रत्येकाजवळ एक बत्ती दिलेली असते. ती अशा सुरक्षितपणें कंदिलांत बसविलेली असते कीं, आंतील ज्योतीचा बाहेरील वायूशीं संयोग होत नाहीं. कामदार लोकांजवळ वुल्फ लॅंप नांवाचा नवीन निघालेला कंदील असतो. एकादे ठिकाणीं जर ग्यास बराच सुटला असला, तर ह्या कंदिलांतील दिवा आपोआपच नाहींसा होतो. व त्याप्रमाणें खबरदारी राखण्यास सांपडतें. हा दिवा पुनः आपोआपच पेटण्याचीही त्यांत व्यवस्था असते. पहा मुलांनो, पृथ्वि, पाणी, वायु, अग्नि, असलीं महाभूतें हल्लींच्या काळीं माणसांचीं अगदीं खेळणीं झालीं आहेत!

आपणही प्रत्येकजण एका हातांत एक कंदील व दुसऱ्या हातांत टेकण्यास आंखुडशी एक काठी घेऊन निघूं या. बोगदा पुढें अगदीं लहान होईल. तेथें तर आपणांस अगदीं ओणव्यानें जावें लागेल; तेव्हां काठीचा उपयोग होईल. ह्या खाणीचें नांव 'डो.' हिच्यांतील कोळशाचा मुख्य थर आठ फूट जाड व ५६० यार्ड लांब आहे. कोळशाच्या गाड्या ओढण्याला वाटेनें लोखंडी रूळ टाकले आहेत. खुणेची घांट वाजवून पाहिजे त्या ठिकाणीं वर्दी पोहोंचविण्यास भिंतीवर विजेची तार आहे. समोरून एक कोळशाची ट्रेन येत आहे, म्हणून आपण जपून एका बाजूस उभे राहूं या. एका खटाऱ्यावर ३ घनफुटांची एक पेटी आहे. तींत सुमारें ७ हंड्रेडवेट कोळसा भरला आहे. असे १८ खटारे एकच घोडा रूळांवरून ओढीत खाणीच्या तोंडाशीं जात आहे. नंतर तितकेही खटारे आपण वर प्रथम पाहिलेल्या

ऱ्हाटगाडग्यानें वर ओढून घेतात. प्रत्येक रात्रीं अशा १८ खटाऱ्यांच्या २६ सफरी होतात. दिवसां त्याच्या दुप्पट! आणि असेंच नेहमीं.

चला आपण पुढें जाऊं. थोडें वर वळून पहा. कोळशाचे कसे पहर सुटलेले आहेत! ते खालीं कातरून पडूं नयेत म्हणून भिंतींत भक्कम तुळया मारलेल्या आहेत. तथापि येथें कधीं कधीं कोण भयंकर अपघात होत असतील! आमच्या बरोबर असलेल्या स्नेह्यानें आपल्यावर आलेल्या एका अरिष्टाचें नुकतेंच वर्णन केलें. तें कादंबरीकाराच्या कल्पनेंतही येणार नाहीं. असो. आतां, येथें एक उंच डिगर लागली आहे. घोडयाचा येथें निभाव लागत नाहीं म्हणन खटारे पाठविण्याची कशी करामत लढविली आहे पहा. डिगरीवरून कोळशाच्या भरलेल्या गाडया खालीं धांवत जातांना जी शक्ति उत्पन्न होते तिचाच उपयोग रिकाम्या गाडया दुसऱ्या बाजूनें डिगरीवर ओढण्यांत केला जात आहे. आणि ह्या प्रकारें ह्या २६ गाडयांची घडामोड एकटाच मनुष्य एका साध्या यंत्राच्या सहाय्यानें मध्यें उभा राहून चालवीत आहे!

आणखी थोडें पुढें जाऊं या. येथें जागा फार कठीण आहे. घोडा फिरण्याला जागा नाहीं. वाफेचें यंत्र चालविणें म्हणजे त्याहून धोक्याचें. म्हणून येथें एक मनुष्य पाण्याच्या जोरानें यंत्र हांकीत आहे. आपण आंग सांभाळून ह्या कचाट्यांतून पुढें थेट खाणीच्या गर्भांत जेथें कोळसा उकरण्याचें काम चाललें आहे तिकडे जाऊं या. आपल्या बरोबर खाणींतील दगाफटक्यासंबंधीं जबाबदार तपासणीदार आहे. खाणींतील सुरुंग उडविण्याचेंही काम त्याचेंच आहे. इतरांनीं खणून तयार केल्यावर हा तो भरून उडवितो. त्याचे आधीं कोठें ग्यास बाहेर पडत आहे कीं काय, ह्याबद्दलची आपल्या दिव्यानें तपासणी करतो. एका बारानें जवळ जवळ १० टनांचा कोळसा कातरला जातो. खाणीच्या मुळाशीं कांहीं विशेष पाहण्यासारखें काम चाललेलें नसतें. कोळसा उकरणें व भरणें, आणि निरुपयोगी जी भुकटी राहते ती वाटेंतन दुसरीकडे रचणें ही खटपट चाललेली असते. पण ह्या चरकांत जे प्राणी गुंतले असतात त्यांची स्थिति मात्र पाहण्यासारखी आहे. अंगावर केवळ लाज राखण्यापुरता कपडा, नखशिखांत कोळशाच्या भुकटीचा लेप, घामाच्या सारख्या धारा चाललेल्या. त्या रेघांतून ह्यांची जी अंगकांति दिसते तेवढ्यावरूनच हे प्राणी, वरील जगांत गाडींतून हिंडणाऱ्या लॉर्ड साहेबांचे नातलग आहेत असें ओळखावयाचें.

मुलांनो, आमचें मानवी वैभव व ऐहिक ऐश्वर्य ह्यांची जी एकंदर इमारत आहे, तिचा पाया अशा काबाडकष्टाच्या आणि धोक्याच्या खंदकांत रोंविला आहे बरें! त्या पायाशीं आम्ही नाहीं तरी आमचेसाठीं दुसरे कोणी तरी निरंतर राबत असतात. आम्हीही आमचेपरी जर मनानें, नीतीनें आणि शरीरानें देखील असें न राबूं तर आम्ही खातों तें अन्न आणि भोगितों तीं सर्व सुखें निव्वळ हरामाचीं आहेत हें मीं सांगावयास पाहिजे काय! ह्या खाणींत येऊन तुम्हीं जे निरनिराळे सृष्टिनियमाचे व मानवी करामतीचे अद्भुत चमत्कार पाहिले त्याबद्दल तुम्हांस आश्चर्य व आनंद झाला असेलच. पण त्यांत कांहीं विशेष नाहीं. हीं दोन्ही जंगली माणसासही होण्यासारखीं आहेत. पण अशीं कृत्यें पाहून जर आम्हांस सर्व मानवी कुटुंबाबद्दल कृतज्ञता व धन्यता वाटली नाहीं आणि स्वतःला नवा दम आणि ईर्षा आली नाहीं, तर आपण जगचालकाचे पदरीं मोठे करंटेच म्हणावयाचें!

आतां इतक्या खोलांत इतकें विपुल जळण, तळघरांत सांठवून ठेवल्याप्रमाणें कोणीं साठविलें असावें, हें कोडें तुम्हांला पडलें असेल. लक्षावधी वर्षांपूर्वीं पृथ्वीच्या पाठीवर जी दाट झाडी लागून गेली होती ती भूकंपाच्या जब्बर धक्यासरशी खालीं खचून, अत्यंत दाबामुळें आतां दगड होऊन राहिली आहे. ह्यासंबंधीं माहिती मोठी चटकदार आहे. ती तुम्ही आपल्या वडिलांस अगर शिक्षकांस विचारा, सोडूं नका.

---

## जनांतून वनांत आणि परत.

(सु. प. १।२।१९०३.)

इंग्लंडच्या उत्तरभागीं कंबर्लंडशायरमध्यें सरोवर प्रांत (Lake District) नांवाचा प्रदेश आहे. उंच पहाड, विस्तृत सरोवरें, दाट वनराजी इ०

बहुविध सृष्टिसुंदरी तेथें नटली आहे. तशांत वर्डस्वर्थ, कोलरिज्, साउदे इ. प्रासादिक कवींच्या सहवासानें हें शांतिस्थल अधिकच पवित्र झालें आहे. उष्णकाळीं इंग्लंडचे किंबहुना साऱ्या सुधारलेल्या जगाचें हें एक हवा खाण्याचें ठिकाण आहे. गेल्या उन्हाळ्याच्या सुटींत प्रो० कार्पेंटर साहेबांनीं आमच्या कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांस आपल्या बरोबर आपल्या कुटुंबांत पंधरा पंधरा दिवस सदर ठिकाणीं रहावयास बोलाविलें होतें. कॉलेजांतील व्याख्यानपीठांतून व मंदिरांतील व्यासपीठांतून दिलेल्या ईश्वरविषयक ज्ञानाची पुरवणी वरील उदात्त स्थळीं प्रगटलेलें स्वरूप प्रत्यक्ष दाखवून करून देण्याचाच जणूं ह्या गुरुवर्यांचा हेतु होता.

गेल्या जुलैंत मी तिकडे ऑक्सफर्डहून निघालों. पुढें मिळणारा धडा मनावर नीट बिंबावा म्हणूनच कीं काय वाटेंत निराळाच अनुभव आला. आमची गाडी लांब पल्ल्याची असल्याकारणानें ती एक्सप्रेस होती. वाटेंत बर्मिंगहॅमपासून तों लँकेस्टरपर्यंत अगदीं निराळा मुलूख लागला. इंग्रजानें बहुतेक सगळ्या जगाचें कंत्राट आपल्याकडे घेतलें आहे. म्हणून अर्थात् एवढा प्रदेश म्हणजे जगाची एक मोठी वखारच ! बर्मिंगहॅम, स्टॅफर्ड, शेफिल्ड, मँचेस्टर अशीं अचाट धडामोडीचीं शहरें आणि त्यांच्या दरम्यान इतर कारखान्यांचीं गांवें ह्यांची कशी येथें खेंचाखेंची झाली आहे. दाट जंगलांतून एकादी चेतलेली वाघीण जशी सुटावी तशी आमची एक्सप्रेस हजारों जीवांना घेऊन, अशा दाट वस्तींतून लांब लांब झापा टाकीत सुटली. स्टॅफर्डहून लँकेस्टरपर्यंत सुमारें दीडशें मैलांचा पल्ला तर तिनें एकाच उडीसरशी मारला. त्यास पुरे दोन तासही लागले नाहींत !

'लहान वस्तु ती स्थूल दिसली ।
तुटकी वाटे कुणी जुडली ॥
सहज कुटिला सरला झाली ।
जवळी न बाजुस अथवा आतां दूर न
मज कांहीं ॥ १ ॥

असें झाल्यानें मी दुष्यंत राजाच्याच रथांत बसलों आहेसें वाटूं लागलें. शहरें, खेडीं, नद्या, नाके इ० आमच्या पायांखालून पार निघून जात. अशा वेगानें आम्ही जात असतां समोरून एकादी अशीच राक्षसी आमच्या आंगावर एक मोठा फुत्कार टाकून विजलीसारखी चमकून जाई ! वाटेनें मोठीं स्टेशनें आलीं म्हणजे आमच्यापुढें रुळांच्या जाळ्यांचा गुंता पसरलेला दिसे, पण त्यांतूनही ही नेमकी निसटून पार होई !

बाहेर धुरानें व धुळीनें दिशा धुंद झाल्या होत्या. मांडीवरच्या वर्तमानपत्रावर दोन चार मिनिटांतच कोळशाची भुकटी सांचे. छाती करून बाहेर डोकावल्यास चहूंकडे नुसतीं गिरण्यांचीं धुरांडीं व त्यांतून निघणारे धुराचे कल्लोळच दिसत. घरें, देवळें, झाडें व रस्ते हीं सर्व सारखींच काळवंडून गेलीं होतीं. म्हणून त्या प्रदेशास ब्लॅक कंट्री म्हणजे काळा देश असें नांव आहे. अशा वातावरणांत अष्टौप्रहर राहून निर्जिव यंत्राप्रमाणें झीज सोसणाऱ्या हतभागी मजुरांची काय दशा असेल ! आमच्या कवींनीं नुसत्या कल्पनेनेंच भवचक्राचीं चित्रें काढलीं आहेत. येथें मात्र तें चक्र प्रत्यक्ष भ्रमत असलेलें दिसत आहे ! प्रगतीची ही काळी खरबरीत बाजू पाहून माझ्या तोंडांतून आपोआपच हे उद्गार निघाले:—

'अहागे सुधारणे ! तूं दिवाणखान्यांत येतांना कशी नटून येतेस ! तुझ्या पदरावर माशीदेखील बसलेली खपत नाहीं. तुझा नाजूक बांधा, कोमल गात्रें, उंची पोषाक व जडजवाहीर पाहून आम्हा पौरस्त्यांस कितीही कौतुक केलें तरी पुरेसें होत नाहीं ! पण हें गे काय तुझें एथलें स्वरूप ! किती हे तुझे कष्ट, कोण ह्या घामाच्या धारा आणि हे हातापायांला घट्टे ! येथें तुला नुसतें श्वासोच्छ्वास करण्यालाही वेळ मिळेना. तीच तूं मंडळींत बसलीस म्हणजे काय काय ढंग करितेस ! येथें तुला नुसती मोकळी हवाही मिळत नाहीं. दुसरीकडे काय तुझ्या क्रीडा, करमणुकी, चैनीचे प्रवास, रुचीच्या आलटापालटी ! नाहीं आम्हांला हे तुझे बहुरूपी प्रकार कळत. कार्यालयांतून क्रीडालयांत व क्रीडालयांतून पुनः अशा कार्यालयांत जाणारी जर तूंच असशील तर असे वेश पालटण्यांत तुला किती शरम वाटत असेल ? हाल आणि श्रमाची तर गोष्ट राहूं दे. जगांत राहण्याची कला आपल्यास चांगली साधली आहे, असें तूं किती वेळां तरी म्हणतेस; पण नाहीं सुधारणे,

तुला देखील अद्यापि पुष्कळ सुधारलें पाहिजे आहे. तें कसें तें सांगण्याची आमच्यांतही शक्ति नाहीं, तोंवर तुला तरी नांवें ठेवून काय फळ! तरी दिसला तो प्रकार कळविण्याचें तूर्त आमचें काम आहे.'

ज्या सुधारणेनें आपल्यावर इतकें जब्बर मोहिनी–अस्त्र टाकलें आहे तिचीं अशीं कोणतीं व किती व्यंगें दिसलीं कीं मी तिला इतकें टाकून व टोचून बोललों? मी तर अग्निरथांतून वाऱ्याच्या वेगानें चाललों होतों. पण तशांतच ह्या सुंदरीचें कृष्ण आणि कठोर स्वरूप असें दिसून आलें कीं वरील उद्गार मला नकळतच निघाले! एकाद्या भयंकर स्वप्नाचा काळ फार तर एक दोन पळेंच असतो, पण तेवढ्यांत किती तरी स्थितींचा आपल्यास अनुभव येतो! इतकेंच नव्हे तर जागें झाल्यावरही त्यांचा परिणाम मनावर घडत असतोच! ह्याचें कारण हें कीं स्वप्नांतले देखावे आपण जागृतींत आधींच निरनिराळ्या वेळीं पाहिलेले असतात. फक्त त्यांचें एकीकरण मात्र मनाच्या केंद्रस्थानीं एक दोन क्षणांतच झाल्यानें आपली अशी कासावीस होते. अशांतलाच कांहींसा प्रकार ह्यावेळीं माझा झाला. दम न घेतां सारखा दोन तास धांवत होतों तरी खिडकींतून बाहेर मोकळा प्रदेश असा फार वेळ पहावयाला सांपडेना. व्यापाराची घडामोड व उद्योगाची धडधड किती लगट केली तरी मागें राहीनात. एकादें पटांगण नजरेस पडल्यास त्यांत धुरकट व दमट हवेंत आणि कोळशाच्या राखेंत कंगाल पोरें बागडत आहेत असें दिसावें! घरें पाहावींत तर कबुतराच्या खुराड्यांसारखीं रांगेत नेमकीं बसविलेलीं. सोय आणि शांति ह्यामुळें माणसें इतकीं सवंगलीं आहेत कीं बिचाऱ्यांस राहतां भुई पुरेना. कांहीं हौसेनें, कांहीं केवळ निरुपायानें तीं अशीं दिवसेंदिवस अधिकाधिक गर्दी करून राहत आहेत. एकाद्या आधुनिक मोठ्या शहरांत सावकाशपणें हिंडूं लागल्यास त्यांतील मातबर चौक, उपवनें, संग्रहालयें, चित्रालयें इत्यादि मोहक स्थळें नजरेस येतात आणि त्या झुरक्यासरशी शहरांतील इतर ठिकाणच्या नानाविध यातनांचा विसर पडतो हें खरें. पण त्याच शहराकडे असें विहंगमदृष्ट्या पाहूं गेल्यास त्याचें रूप तितकें मोहक दिसत नाहीं. ह्यावरून मला असें वाटूं लागलें कीं, कांहीं गोष्टी सावकाश पाहिल्याशिवाय कळत नाहींत तर कांहीं झटक्यासरशीं पाहिल्याशिवाय कळत नाहींत. असो! अशा रीतीनें मी पेनारिथ स्टेशनावर येऊन पोहोंचलों. येथें दगदगीचें जग संपलें आणि पुढें निराळेंच जग दिसूं लागलें.

## जन आणि वन.

जगाचे दोन भाग आहेत. एक जन, दुसरें वन. ह्यांसच आधुनिक शास्त्रीय नांवें द्यावयाचीं झाल्यास एकास नीति व दुसऱ्यास निसर्ग असें म्हणतां येईल. निसर्गांत नीतीचा अत्यंताभाव आहे असें नाहीं. उलट स्वतः नीतीचा कोणताही प्रदेश निसर्गाच्या बाहेर आहे असेंही नाहीं. निसर्गाच्या विराट मंडळांत नीतीचा लहान गोल पोकळींतल्या परमाणूंप्रमाणें तरंगत आहे! ह्याच विषय दुसऱ्या बाजूनें निराळा दिसतो. नीतीचें अधिष्ठान मन. निसर्गाचें मूळ प्रकृति. प्रकृतींत मन मुळींच मावण्यासारखें नाहीं. उलट प्रकृति किती जरी अनंत भासली तरी मन तिला क्षणांत गिळून बसतें. पण गिळतें म्हणून त्यास कळतें थोडेंच! मन आणि माया, नीति आणि निसर्ग अथवा जन आणि वन ह्या द्वंद्वांचें परस्पर नातें काय आहे, तें कोण सांगूं शकेल? ह्या द्वंद्वांचें मूळ जी महावस्तु तिचें केवळ स्वरूप कोठें दिसेल! 'नकळे महिमा वेद मौनावले जेथें पांगुळलें मन पवन' तें ह्याच ठिकाणीं! महंतांनीं जर प्रांजलपणें ही कबुली दिली आहे तर आमच्यासारख्या लहानांनीं काय विचक्षणा करावी! असा प्रकार असून आम्ही प्रसंगीं दुसऱ्याचे शब्द उसने घेऊन ज्ञानाची कितीतरी प्रौढी मिरवतों! वासनेचा थोडा कोठें हिसका बसला कीं तीनदां उलथून पडतों, तरी पुनः उठल्यावर 'अहं ब्रह्मास्मि' म्हणावयाला आहेच तयार!

प्रयत्नशाली जे महावीर आहेत ते जनांत राहून सुधारणा साधोत. ज्ञानशाली जे महायोगी आहेत ते वनांत राहून सत्य शोधोत. विषय हेंच ज्यांचें सुख ते विषयाची खटपट करोत. वाद हेंच ज्यांचें ज्ञान ते वादाचा घटपट करोत. मध्यंतरीं आम्ही साधारण माणसें विश्रांतीसाठीं व उपासनेसाठीं कांहीं काळ जनांतून वनांत जाऊं या!

पेनारिथपासून केसिकपर्यंत सरोवर प्रांतांत जाण्यास सुमारें १८ मैल आगगाडीचा एक फाटा

आहे. पेन्‌रिथ सोडल्यापासून नीतीचा गोंधळ मागें दूर दूर राहूं लागला आणि निसर्गाचा सोहळा पुढें जवळ जवळ येऊं लागला. दोहों बाजूंस उंच उंच पर्वत हिरव्या गवताच्या झुली पांघरून हत्तीप्रमाणें तटस्थ उभे राहिलेले आणि गंभीर दिसूं लागले. अस्तास जाणाऱ्या सूर्याचीं शेवटचीं किरणें त्यांवर रेंगाळत होतीं. समुद्रावरील ताजा आणि मंद वारा आणि रानांतील झाडपाल्याचा वास काळ्या प्रदेशांतून नुक्तेच बाहेर पडलेल्या प्रवाशांस सुखवूं लागले. केसिक येथें पोहोंचल्यावर सुधारणेची शेवटची खूण जी आगगाडी तिलाही निरोप दिला. माहेरीं आल्यावर सासरच्या गड्यास निरोप देतांना कितीसें वाईट वाटतें हें प्रत्येक सासुरवासिणीस माहीत आहेच.

स्टेशनावर आम्ही तिघे विद्यार्थी उतरलों. आम्ही येण्याची वेळ जरी कळविली नव्हती तरी आमचे प्रोफेसरसाहेब व आमच्या पूर्वींचे आलेले एक विद्यार्थी आम्हांस घरीं नेण्याकरितां तेथें वाट पाहत उभे होतेच. ऑक्सफर्ड विद्यालयांत नेहमीं विद्यार्थ्यांसंगांत पाहिलेल्या प्रोफेसरसाहेबांची मूर्ति येथें किती निराळी दिसली! अंगांत पहाडी सडा पोषाख, हातांत रानटी काठी, खांद्यावरून आडवी जानव्यासारखी सोडलेली कातड्याच्या वादीस लटकलेली लहानशी दुर्बिणीची थैली, गालावर हांसें, तोंडांत माहितीचा पुरवठा (खिशांतलें गाइडबुक जणूं पाठच केलेलें!) भाषणांत विनोद, वर्तनांत तत्परता, असें गुरूचें चालतें बोलतें चित्र पाहून आम्ही वाटेचे सर्व क्लेश केव्हांच विसरून गेलों. बॉरोडेल—दरींत लीथस् कॉटेज हें आमचें ठिकाण येथून चार मैल होतें. आमचें सर्व सामान घरीं रवाना केल्यावर, डरवेंट वॉटर सरोवरावरून बोटींतून लीथस् कॉटेजला जाण्यास निघालों.

गाडींतून उतरल्याबरोबर बदललेल्या परिस्थितींत व बदललेल्या पेहरावांत आपल्या गुरूस पाहून आम्ही आमचे श्रम विसरलों असें वर सांगितलें, पण स्टेशनांतून बाहेर येऊन सभोंवतीं पाहतों तों गुरूंचा गुरु जो परमेश्वर त्यानें तर ह्या ठिकाणीं आपला पेहराव अधिकच बदलेला पाहून आम्ही श्रमच काय पण स्वतःलाही हळू हळू विसरूं लागलों. डरवेंट वॉटर सरोवर केसिक गांवाला अगदीं येऊन भिडलें आहे. प्रोफेसर, सगळे विद्यार्थी आणि एक युनिटेरियन् आचार्य इतकेजण आम्ही एका क्रीडानौकेंत बसून निघालों! सूर्यास्त होऊन गोड संधिप्रकाश पडला होता. अशा शांत समयीं देव कसा दिसला! ज्यानें जन निर्माण केलें त्यानेंच वनही केलें आहे. जो समाजांत वसत आहे, तोच सृष्टींतही वसत आहे. असें असतां दर्शनांत किती तरी हा फरक! तिकडे समाजांत तो सत्त्वरूपानें प्रगटतो. पण तें सत्त्वदर्शन कित्येकांस होतें? आणि ज्या थोड्यांस होतें तें तरी कितीदां होतें? आणि जें होतें तें तरी किती कष्टानें, किती अनुतापानें आणि किती आत्मदंडानें आणि इतक्याही सायासानें एकदां कृपा झाली तर ती टिकते किती वेळ! तुकोबा सांगतात कीं, 'आठवाचि पुरे। सुख अवघे मोहोरे' पण ह्या आठवेच्या मार्गांतच अगणित अडथळे घडलेलेही पुन्हां त्यांनींच वर्णिलें आहे कीं, 'कामक्रोध आड पडले पर्वत। राहिला अनंत पलीकडे' तेव्हां जन म्हणजे अशा अडथळ्यांचा डोंगराळ प्रदेश. त्यांत आधींच अदृश्य असें जें सत्त्वरूप त्याचें दर्शन होणें म्हणजे अति कठीण. पण येथें पहा तोच देव कसा सुंदर रूपानें प्रगटला आहे. आठवण करण्याचेही श्रम नकोत. डोळे उघडले कीं पुरे; सुख अवघें मोहोरें! समाजांत जो इतका दुर्लभ तो येथें किती तरी सुलभ झाला आहे. समाजांत जो दुर्मिळ त्याचा सृष्टींत हा कोण सुकाळ! शास्त्रकारांस आणि स्मृतिकारांस जो तेथें सहसा लाभत नाहीं तो येथें पशुपक्ष्यांस भेट देऊन रमवीत आहे! येथें येण्याचाच अवकाश कीं तावडतोब भेट व लगेच सलगी देखील! पश्चात्ताप नाहीं, प्रायश्चित्त नाहीं, इंद्रियदमन नको, देहदंडन नको, पापाची आठवणच नाहीं. मग क्षमेची गोष्ट कशाला! पुनर्जन्मच हा!!

समाजांत सुख आहे, ऐश्वर्य आहे, प्रीति आहे, प्रगति आहे; पण तेथें पुष्कळ अंशीं ह्या गोष्टी असतात. आम्ही बसलों आहों ही नाव जर पुढें न्यावयाची झाली तर आधीं वल्ह्यांनीं पाणी मागें ढकललें पाहिजे. आणि हाच प्रकार सर्वदां नाहीं तरी पुष्कळदां समाजांत चालला असतो. माझें धन तें दुसऱ्याचें ऋण; माझा आराम तो दुसऱ्याचा कष्ट; गर्दींतून माझें पाऊल पडावें म्हणून मी इतरांस मागें रेटीत असतों. असा प्रकार असल्यामुळें समाजांत शुद्ध सुख मिळणें फार

कठीण होतें. तेथें इतर आत्म्यांमध्यें परमात्म्याचें जें प्रतिबिंब दिसतें तें स्थानमानानें थोडें बहुत अशुद्धच असतें. पण सृष्टींतला प्रकार वेगळा. येथें आपण व परमात्मा ह्यांमध्यें इतर कोणी येत नाहीं म्हणून एथलीं सर्व सुखें निर्भेळ असतात; निश्चित असतात; निरालंब असतात !

असो. आम्ही पाळींपाळीनें दोघे दोघे वल्हवीत, भोंवतालची शोभा पाहत, मधून मधून विनोद करीत, प्रसंगानुसार ह्या प्रदेशाची प्रोफेसरांच्या तोंडून चटकदार माहिती ऐकत निघालों. ह्या विस्तीर्ण सरोवराचें पाणी इतकें स्वच्छ आणि शांत होतें कीं एक मोठा आरसाच पसरलेला ! केसिक गांव लवकरच वळणांत लपून गेल्यावर आसमंतात् कोठेंही जीवांची हालचाल दिसेना. आमच्या बोटींभोंवतीं लाटांची काय ती थोडी हालचाल होती तेवढीच. सर्वत्र एकच निर्विकल्प समाधी लागली होती. एका बाजूस सुमारें एक हजार फुटांचा एकदम तुटलेला काळाकुट्ट कडा अगदीं किनाऱ्यावर तोल संभाळून तटस्थ उभा होता. दुसऱ्या बाजूस हळू हळू उंच उंच होत जाणाऱ्या पर्वतसपाटीवर दाट गवताचा हिरवा गालिचा पसरला होता. पुढें पुढें हे दोहोंकडचे डोंगर अगदींच जवळ येऊन सरोवरास कवटाळं लागले. अखेरीस सरोवर संपलें व आम्ही दरवेंट नदीच्या पात्रांत शिरून तसेंच बॉरोडेल नांवाच्या रमणीय दरींतून वर वर जाऊं लागलों. नागिणीसारखी नदी वरचेवर वळसे मारूं लागली. येथें सौंदर्याची तर अगदीं सीमा झाली आणि सृष्टिसुंदरीचा गर्व तिच्या पोटांत मावेना असें उघड दिसूं लागलें. किनाऱ्यावरील झाडें, लता आणि पर्वत ह्यांच्या प्रतिबिंबाची तर काय बहार ! कुलस्त्री एकांतांत असतांना आरशांत आपलें रूप पाहून आपल्यासच धन्य मानीत असलेली दिसल्यास कोणास बरें परमावधीची धन्यता वाटणार नाहीं ! आमची नौका पुढें नेऊन ह्या तरुणीचा रसभंग करण्याचें आम्हांला जीवावर आलें ! आम्ही आतां अगदीं लीथ्‌स् कॉटेजच्या जवळ पोहोंचलों. नौका एका झाडाच्या मुळाशीं बांधून किनाऱ्यावर पाय ठेवितों तोंच मिसेस् कार्पेंटरबाईंनीं झोपडीच्या खिडकींतून बाहेर डोकाविलें आणि आपला हातरुमाल हालवून मोठ्या प्रेमानें आमचें स्वागत केलें !

## बॉरोडेल्‌मधील प्रार्थना व भेट !

लीथ्‌स् कॉटेज ह्या वन्य कुटिकेंत आमचे जे पुढील पंधरा दिवस अति सुखाचे गेले त्याची गोड सूचना, गुरुपत्नीनें वर सांगितल्याप्रमाणें प्रथमदर्शनीं दुरूनच जें स्वागत केलें त्यांत मिळाली होती.

इंग्लिश सरोवर–प्रांत हें एक साऱ्या युरोपांत पाहण्यासारखें स्थळ आहे, आणि त्यांत डरवेंटवाटर हें सुंदर सरोवर व त्याच्या कांठचें बॉरोडेल नांवाचें खोरें हीं तर एकाद्याला अगदीं वेड लावून टाकतात. म्हणूनच मागें ह्या ठिकाणीं मोठमोठे राष्ट्रीय कवि व लेखक संसार अगदीं विसरून भृंगांसारखे गुंगत राहिले; व आतां तर युरोप आणि अमेरिकेहूनही रसिकांच्या झुंडीच्या झुंडीच येथें येतात ! प्रख्यात सौंदर्यवादी जॉन् रस्किन् हा जेव्हां अगदीं लहान होता तेव्हां दाईनें त्यास एकदा ह्या सरोवराच्या कांठीं फ्रायर्स क्रॅग नांवाच्या लहानशा खडकावर आणिलें; त्यावेळीं त्या मुलाच्या अति कोंवळ्या व ग्रहणशील मनावर निसर्गानें येथें असा कायमचा छाप मारिला कीं, ही त्याची प्रथम भेट रस्किन् मरे तोंपर्यंत वारंवार उत्कंठेनें आठवीत असे. आतां ह्या खडकावरील झाडींत रस्किन्‌च्या चहात्यांनीं वरील भेटीच्या स्मारकार्थ एक सुंदर शिलालेख रोंविला आहे !

आमच्या गुरूची कुटिका बॅरोडेल दरीच्या तोंडाशीं, डरवेंट् नदीच्या कांठीं, डोंगराच्या बगलेंत जेथून सर्व सरोवर नजरेंत चांगलें भरेल अशा नाक्यावर उभी आहे. त्यामुळें येतां जातां, उठतां बसतां, कार्य करतां, ग्रास गिळतां, घरीं दारीं शय्येवरी देखील हो ! सृष्टीचें प्रसन्न मुख आम्हांस सतत दिसत असे. जेवणाच्या पंगतींत बसलों असतां एकाएकीं दूर स्किडॉच्या शिखरावर सूर्यकिरणाची अपूर्व शोभा दिसे; दिवाणखान्यांत क्रीडेंत गुंगलों असतां मध्येंच सरोवरावर मेघधारा नाचूं लागत तिकडे लक्ष जाई; खोलींत वाचीत बसलों असतां भिंतीखालच्या नदीशीं वायू अकस्मात् धिंगाणा घाली, आणि पाहतां पाहतां गुलाम दरींतून शीळ घालीत पार निसटून जाई ! ह्या प्रकारें सृष्टिबाला आमच्याशीं अहोरात्र सलगी करी पण ती मोठ्याची कन्या म्हणून तिच्या प्रत्येक चेष्टेचें आह्मा सर्वांना उलट मोठें कौतुकच वाटे !

एके दिवशीं संध्याकाळीं जेवण आटपल्यावर मी एका समानशील सोबत्याबरोबर बॉरोडेल दरींत शतपावलीस निघालों. अहा ! ही शतपावली कधीं तरी विसरणें शक्य आहे काय ! ह्या डोंगरांतील सडकही रुंद, प्रशस्त आणि धुतल्यासारखी स्वच्छ होती. दोहीं बाजूंस हजार हजार फुटांचे उंचवटे क्वचित् अगदीं अंगाला येऊन भिडत, क्वचित् पुन्हां मागें हटत, त्यावरून नाना जातींचीं झाडें पालवलीं होतीं, फुलें फुललीं होतीं, लता लोंबत होत्या, लोहाळें लगटलें होतें, भारतीय देखाव्यांचीं प्रमुख लक्षणें जी रंगीबेरंगी शोभा आणि परिमळाचा दर्प तीं मात्र येथें नव्हतीं, तथापि सौंदर्यांत उणीव भासत नव्हतीच. उजवीकडचा कडा सरळ तुटला होता. डावीकडे डरवेंट नदी खडकांतून उतरत असतां आपल्याशींच मंद स्वरांत मंजुळ ओव्या गात होती. त्या स्वरास सृष्टि–राग म्हणतात असें माझ्या मित्रानें सांगितलें.

चहूंकडे इतकें निवांत कीं पातळ पानही लवत नव्हतें. शांतीचें साम्राज्य जणूं डोळ्यांनीं निरखूं लागलों. सुधारणेचीं कटकें तिनें येथून बारा कोस पळविलीं होतीं. सुधारणा, उद्धारणा वगैरे विचारांचा गवगवाही बंद पडला. बाह्य शांतीमुळें अंतरांतील खोल शब्द अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागले. ९॥ वाजले होते तरी असा गोड संधिप्रकाश पडला होता कीं, वाचतां सहज यावें. समोर कॅसल ऱ्हॅग्च्या निमूळत्या मनोऱ्यावर दशमीचा चंद्र लोंबत होता. आम्ही दोघे संगतीनें चाललों होतों तरी बोलत नव्हतों. स्वतः कौतुक करण्याचीही वेळ मागेंच टळून गेली होती; मग संवादाला जागा कुठें राहिली ! जसजसें पुढें जावें तसतशी दरी आकसूं लागली. नकळतच सृष्टीनें आम्हांला शेवटीं अगदीं अंतःपुरांत नेलें ! तेथें जिवलग जनांचीही स्मृति उरली नाहीं. निकट विषयांचेंदेखील भान उडालें. लौकिकांतून नाहींसेच झालों !

असा कोण जादूवाला ह्या भरलेल्या अंतःपुरांत होता कीं, ज्यानें आमची अशी पाहतां पाहतां पराधीन अवस्था करून सोडली ! वरतीं जो एकदा लय लागला तो खालीं करण्याची कांहीं शक्ति उरली नाहीं.

आनंद होत होता काय आम्हांला ?

सांगवत नाहीं. कांहीं वेळापूर्वीं मात्र झाला होता खरा.

आम्ही कांहीं पहात होतों काय ?

नव्हतों ! दिसत होतें पण कांहींतरी !

मागितलें कां कांहीं ?

छे हो ! काय मागावयाचें ?

जिवाला कसें होत होतें ?

मधून मधून सुसकारे बाहेर पडत होते !

ते कां म्हणून ?

कोणी सांगावें ! कांहींतरी आंतून बाहेर निघत होतें व कांहीं बाहेरून आंत शिरत होतें–छे, मी कांहींतरी वेड्यासारखें वर्णन करीत आहें.

एकूण हा प्रकार काय ? आणि तें कोण ?

" Prayer is the burthen of a sigh,
The falling of a tear,
The upward glancing of an eye,
When none but God is near " !!
(Montgomery.)

( मुखीं श्वास; आसवें गाळी ।
नेत्रीं वरतीच न्याहाळी ।
अशा या प्रार्थनेच्या काळीं ।
जवळी तोचि एकला ॥ १ ॥ )

कवीनें हे वरील उद्गार कोणत्या वेळीं काढले असतील ते असोत. मला तर आतां असें कळून चुकलें आहे कीं, वरील जो प्रकार घडला ती माझी प्रार्थना होती. आणि परमेश्वरावांचून जवळ कोणी नव्हतें. एकूण प्रार्थनेचें काम इतकें साधें व सोपें आहे काय ? होय. कार्लाइलही तेंच सांगत आहे. 'Prayer is and always remains a native and deepest impulse of the soul......On the whole, silence* is the one safe form of prayer known to me in this poor sordid era--though there are ejaculatory words too, which occasionally rise on one, with a felt, propriety and variety." देवा ! अशी प्रार्थना करावयाला व ही भेट

* ह्याचें भाषांतर तुकारामाच्या विचारांत असें आलें आहे. । 'करावी ते पूजा मनेंची उत्तम । लौकिकाचें काम काय तेथें' ॥ १ ॥

घ्यावयाला सरोवर प्रांतापर्यंत येण्याचीच जरूरी आहे काय? नाहीं. जेथें कसली उपाधि नाहीं, अशा कोठल्याही उघड्या जागेंत आणि मोकळ्या हवेंतही उपासना घडण्यासारखी आहे. माणसांच्या गर्दीतही देवा तूं भेटतोस. नाहीं कसें म्हणूं! घरीं आईची माया, वहिणीची प्रीति, पत्नीचा अनुराग, पुत्राचें वात्सल्य, समाजांत शेजाऱ्यांची सहानुभूति, मित्रांचा स्नेह, राष्ट्रांत देशभक्तांची कळकळ व संतांचा अनुग्रह आणि शेवटीं जगतांत महात्म्यांची निरपेक्ष अनुकंपा इत्यादि दर्शनेंही तुझ्याशिवाय इतर कोणाचीं असूं शकतील? जनांत तुझा असा साक्षात्कार घडतो खरा, पण तो किती विरळा. उलटपक्षीं किती कठीण अनुभव येतो! पण एथलें तुझें रूप कसें अबाधित आणि अखंड आहे! हें वरचें आकाशाचें छत कधीं फाटेल काय! हा खालचा सरोवराचा आरसा कधीं फुटेल किंवा मळेल काय! ह्या पाखरांचे गळे कधीं बसतील काय! हे पर्वताचे तट! हा वाऱ्याचा पंखा! वृक्ष, वल्ली, दळ, पाषाण, पाणी, आकाशांतील मेघ ह्यांवरूनही सर्वत्र ईश्वरा 'तुझी कुशलधाम नामावली' कशी सुवाच्य रेखाटली आहे! लहान बालकें देखील ती वाचून आनंद पावतात! मग आम्हीं कां असें वारंवार विन्मुख व्हावें! हे कल्याणनिधान, आम्ही स्वतःभोंवतीं जो क्षुद्र चिंतेचा गुंता निरंतर गोवित असतों तो तूंच करुणेनें उकल; आणि आतांसारखेंच वेळो-वेळीं आपल्याकडे कृपाहस्तानें आम्हाला ओढून घे. आमच्या इच्छेनेंच तुजकडे येण्याची आमची शक्ति नव्हे!

वगैरे वगैरे प्रार्थना, देव भेटून गेल्यावर, उघड पणें करीत आम्ही परत कुटिकेंत आलों.

## वर्डस्वर्थची भेट आणि डव्ह कॉटेजची यात्रा.

मर्तपूजक आणि सौंदर्योपासक असे जे प्रकृतीचे भक्त आहेत, त्यांचें हा सरोवर प्रांत म्हणजे एक मोठें क्षेत्रच आहे. ह्या क्षेत्रांतील उपाध्यायाची कायमची नेमणूक वुइल्यम वर्डस्वर्थ ह्यांजकडे आहे. ह्या कवीचा लौकिक जीवनकाळ जरी १७७०–१८५० ह्या अवधींतच आटपला तरी ह्या क्षेत्रांत उपाध्येपणाचा धंदा तो अद्यापि चाल-वीत आहे असें म्हणण्यास फारशी हरकत येणार नाहीं. ह्या प्रांतीं पदोपदीं कोणातरी मोठ्या पुरुषाचें स्मारक पहाण्यांत येतें अगर पुण्यकथा ऐकण्यांत येतेच. झाडीं, माळ, रस्ते, वाटा एकंदरींत सर्व वातावरणच ह्या पवित्र आत्म्यांनीं गजबजून गेलें आहे. ह्यामुळें येथें येणाऱ्या परकीयांची, विशेषतः मजसारख्या पौरस्त्याची मोठी चमत्कारिक स्थिति होऊन जाते. मूळ देश पहावा तर तळहाता-एवढा. भूगोलांतच नव्हे तर इतिहासांतही आकृति लहान पण हल्लीं पराक्रम भूमंडळीं मावे-नासा झाला आहे. पराक्रम खोटा आहे, असें कोणीही समंजस मनुष्य म्हणत नाहीं. गुणांचा मक्ता कांहीं ह्याच राष्ट्राला दिलेला नाहीं. ते सर्वांत कमजास्त आहेत. पण गुणांचें चीज किंबहुना बोभाटा देखील करण्याची इकडच्या लोकांना जी हातोटी साधली आहे ती पाहून निदान पौरस्त्याला तर फार फार कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. मोठा पुरुष जन्मला कीं पुरे तो सर्व राष्ट्राचें धन होऊन बसतो. त्याच्या पश्चात् त्याचें स्मारक काय करूं, कसें करूं असें सर्व राष्ट्राला होऊन जातें. मोठ-मोठ्या शहरांत जेथें माणसांची गर्दी फार तेथें स्मारकांचीही गर्दी जमली असते, हें सांगावयाला नकोच. पण अशा निर्जन व निवांत स्थळीं देखील कोणत्याना कोणत्या तरी रूपानें स्मारकेंही पुढें येतातच. हें पाहून ह्या राष्ट्राची मोठी धन्यता वाटते. ह्यावरून पाहतां वर्डस्वर्थला येथें जो आदर मिळत आहे तो त्याच्या थारवीला मुळींच जास्त नाहीं. जास्त असो, कमी असो जो मिळतो तो असा बिनबोभाट मिळत आहे कीं, एकांतप्रियता हा त्याचा मोठा गुण त्याच्या स्मारकांत विशेषच खुलून दिसत आहे.

वर्डस्वर्थची कविता म्हणजे सायंकाळच्या चिंतनासारखी शुद्ध आणि उदात्त, गंभीर आणि प्रसन्न आहे. तिचें सेवन केल्यानें मनाला क्षोभ होत नाहीं कीं माज येत नाहीं; किळस वाटत नाहीं किंवा आळस वाटत नाहीं. ह्याची कृति म्हणजे खासगी अनुभवाचीं लहान लहान पद्यें, जणूं रामबाणमात्रेच्या गोळ्याच! इतरांचे सूर नुसते कानांतच राहतात. पण ह्याच्या सुरांचे ठसे अंतरांतल्या फोनोग्राफवर तात्काळ उठून पुनः कधीं तसा बाह्य प्रसंग आल्यास ते आपोआप आंत वाजू लागतात! फ्रेंच ग्रंथकार व्हॉल्टेअर म्हणतो

कीं 'काव्यामध्यें नीतीचा उद्गार इंग्रजी कवींनीं जितक्या जोरानें केला आहे त्याहून जास्त इतर कोणींही केला नाहीं.' आणि वर्डस्वर्थनें अस्सल नीतीची जी कामगिरी बजावली आहे, तशी इतर कोणत्याही इंग्रज कवीनें बजावलेली नाहीं. नीतिच नव्हे तर त्याच्या काव्यांत धर्माचीही जिवंत आणि जागती जोत जळत आहे. त्याचें पद्य म्हणजे परमात्म्याचें परंपरया स्तोत्रच. 'परंपरया' म्हटलें म्हणून त्याची प्रत्यक्षता कमी असें मुळींच नव्हे, उलट अनेक रूढ धर्मांत देवाच्या ज्या सहस्र नामावळींचा घोष चालू आहे, त्यावरूनही परमेश्वराचा संबंध इतक्या प्रत्यक्षपणें जडण्याचा मुळीं संभव नाहीं. वर्डस्वर्थची नीति आणि धर्म हीं दोन्ही नवीन जन्मलेल्या बालकाच्या उल्हासासारखीं ताजीं आणि नेणतीं आहेत; आणि तितकींच तंतोतंत निकट प्रत्यक्ष आहेत! ह्याचें कारण हेंच कीं, मुलाप्रमाणें वर्डस्वर्थनेंही आपला सृष्टीशीं अगदीं अव्यभिचारित आणि अखंडित संबंध राखला होता. तो म्हणतो:—

The world is too much with us,
late and soon;
Getting and spending,
we lay waste our powers;
Little we see in Nature, that is ours;
We have given our hearts away,
a sordid boon.

ज्या फुलाजवळून आम्ही सहज न पाहतां जाऊं त्यांतच भ्रमर येऊन तासानुतास अडकून पडतो तशीच स्थिति वर्डस्वर्थची होत होती हें त्याच्या खालील चरणावरून दिसतें.

To me the meanest flower that blows can give thoughts that do often lie too deep for tears.

अशा हा सृष्टीचा भक्त आणि भोक्ता ईश्वराचे गुण डोळ्यानें पाहून, तोंडानें गात मरे तोंपर्यंत ह्याच प्रदेशांत राहून गेला. बॅरोडेलहून सुमारें २५ मैलांवर डोंगराच्या कुशींत ग्रासमिअर नांवाच्या सुंदर सरोवराच्या कांठीं ग्रासमिअर खेड्यांत डव्हकॉटेज नांवाच्या कुटिकेंत वर्डस्वर्थ राहत असे ती पाहण्यास आम्ही एके दिवशीं गेलों.

स्ट्रटफर्ड–ऑन–एव्हन ह्या गांवीं शेक्सपियरच्या स्मारकाचा जो भपका, थाटमाट आणि गोंगाट दिसला तशांतला येथें मुळींच प्रकार नव्हता. एक झोंपडी केवळ साधेपणाची आणि शांतीची मूर्तिच! दगडमातीचें हें माणसांनीं बांधलेलें घरकुलें पण भोंवतालची सर्व सृष्टि त्याकडे कशी आदरपूर्वक पहात बसली होती. झोंपडीच्या भिंती मजबूत पण ठेंगण्या होत्या. त्यांना आंत बाहेर चुन्याची सफेती फांसली होती. ( हल्लीं ह्या देशांत अशा सफेत भिंती क्वचित् एकाद्या जुन्या खेड्यांत आढळतात ) खपरेल अगदीं खालपर्यंत येऊन नम्रता दाखवीत होतें. इंग्लिश घराचें मुख्य लक्षण जें धुराडें तें तर फारच जुन्या चालीचें, त्यावर शेंकडों हिंवाळ्याच्या खुणा दिसत होत्या. घराभोंवती पुराणपद्धतीचें पण हल्लीं दुरुस्त राखलेलें वळणदार कंपौंड होतें. त्यांतून आंत जाण्यास १८ व्या शतकांतलें फाटक होतें. आम्ही प्रत्येक ६ आण्याचें टिकीट घेऊन आंत गेलों.

आंत गेल्यावर १०० वर्षांमागची इंग्रजी साधी राहाटी आणि उच्च विचार ह्यांचे दाखले खालीं, फरशीवर, बाजूस भिंतीवर, वरती पाटणीवर भरपूर दिसूं लागले. कवि १८०२ मध्यें एकदां लंडनला गेला असतां त्याचे असे उद्गार निघाले होते.

... ... ... ... I am oppressed
To think that now our life is only drest
For show; mean handy work of craftman,
cook
Or groom—we must run glitting
like a brook
In the open sunshine or we are unblest.
rapine avarice, expense
This is Idolatory and these we adore.

१८०२ सालीं जर बिचाऱ्याला ही स्थिति दिसली तर १९०२ सालीं परवां झालेला राज्याभिषेकसमारंभ पाहून त्याला काय वाटलें असतें! तें कांहीं असो. पण हा समारंभ आणि ही झोंपडी दोन्ही एकाच देशांत एकाच काळीं कशीं असूं शकतात, ह्याचें मला मोठें कोडें पडलें. ही झोपडी पाहण्यास वर्डस्वर्थचे भक्त म्हणविणाऱ्या हजारों खुशालचंदांची जी येथें गर्दी येते त्यांच्यांत वर्डस्वर्थचा साधेपणा दशांशानेंही नसतो, तरी ते ह्या झोंपडीचें कौतुकच करीत असतात! तिचे फोटो घेतात; तिच्या प्रतिकृति बनवितात! कवीला लंडनांतली मूर्तिपूजा सोसली नाहीं. मला तर ग्रासमिअरमधील मूर्तिपूजा अधिक दुःसह झाली! असो.

ह्या खोपटींत कवि आणि त्याची जिवलग आणि चहाती बहीण डोरोथी अशीं दोघेंच रहात असत. तळमजल्यांत काळ्या दगडाची फरशी होती ती अगदीं झिजली होती. ती पहात पहात आम्ही जेव्हां भिंतींतील मोठ्या व ओबडधोबड चुलीजवळ आलों, तेव्हां कवीच्या एकंदर रहाटीचें चित्र पुढें दिसूं लागलें. चुलीजवळ रिकाम्या चकाट्या पिटण्यांत कवीला कधीं आनंद होत नसे. तो म्हणतो.

Better than such discourse, doth silence long,
Long, barren silence, square with my desire;

To sit without emotion hope or aim,
In the loved presence of my cottage fire,
And listen to the flapping of the flame.
Or kettle whispering its faint under song.

वरच्या मजल्यांत बसावयाच्या खोलींत कवीच्या कांहीं वस्तु, चित्रें वगैरे, दोन जड खुर्च्या आणि इतर कांहीं सामान ठेविलें आहे. निजावयाचे खोलींत त्याचें हांथरूण तसेंच राखून ठेविलें आहे. दुसऱ्या एका खोलींत त्याच्या पुस्तकाच्या सर्व आवृत्ति व हस्तलिखितें तावदानांत व्यवस्थेनें मांडून ठेविलीं आहेत. कांहीं महत्त्वाचीं हस्तलिखितें भिंतीवर कांचेंतून टांगलीं आहेत. त्यानें जीं सृष्टींतील निरनिराळ्या देखाव्यांवर गाणीं ( Sonnets ) रचलीं आहेत, त्यांचे विषय हुबेहुब दाखविण्याकरितां कांहीं वास्तविक व कांहीं काल्पनिक फोटोग्राफ एका चौकटींत एकीकडे टांगले आहेत.

ही झोंपडी डोंगराच्या अगदीं पायथ्याशीं चिकटलेली असल्यामुळें दुसऱ्या मजल्यांतून मागच्या बाजूनें बाहेर पडलें कीं आपण परसांत येतों. हें परसूं म्हणजे डोंगराची सरळ उतरणच आहे. बागेंत सृष्टीवर कोठेंही बलात्कार केल्याचें चिन्ह दिसत नाहीं; पण तिच्या संमतीनें जी साफसफाई आणि वेणीफणी करावयाची तित कीच केली आहे. बागेंतील आसनें म्हणजे खडकांतल्या पायऱ्या, झाडांच्या वांकलेल्या फांद्या वगैरे. आगंतुक जड एकच बांक जें ठेविलें आहे त्याचीही भोंवतालच्या परिस्थितीशीं पूर्ण संगति आहे ! हल्लीं येथें कोणी राहत नाहीं; फक्त दाखविण्यासाठीं एक दोन बाया मात्र असतात.

नंतर आम्ही ग्रासमिअर खेड्यांतील देवळाच्या स्मशानभूमींतील कवीचें कबरस्थान पाहिलें, तें तळ्याच्या अगदीं कांठालाच आहे. त्याचें आणि त्याच्या प्रिय बहिणीचें थडगें एकमेकाला चिकटून आहेत. दोन लांब चौकोनी गुळगुळीत सपाट निराळ्या फरशा आणि त्या भोंवतीं दाट हिरवें गवत ह्याशिवाय येथें कांहीं नाहीं. देवळाची इमारत किंचित् मोठी जुन्या ओबडधोबड नॉर्मन घाटाची आणि भक्कम बांधणीची आहे. देवळांत एका खांबावर कवीचा संगमरवरी मुखवटा ठेविला असून खालीं ह्या अर्थाचा लेख आहे.

To the memory of W. Wordsworth...who, by the special gift and calling of God, was raised up to be the chief minister not only of the noblest poetry but of high and sacred truth....

असो ह्याप्रकारें आमचे ह्या प्रांतांत १५ दिवस अगदीं नकळतच गेले. ह्यापैकीं बहुतेक दिवस, सकाळीं ८ वाजतां न्याहारी करून संध्याकाळीं ८ वाजतां जेवणाचे वेळपर्यंत, खांद्यावर फराळाच्या पडशा टाकून जंगलांतून हिंडत, पाण्यावरून तरंगत, पर्वतावरून सरपटत काळ घालविला म्हणावयाचा. ऑक्सफर्डचे प्रोफेसर व विद्यार्थी म्हणजे केवळ पुस्तकांतील किडे नव्हत. लीथस् कॉलेजमध्यें निघणाऱ्या आमच्या एका गमतीच्या पाक्षिक पत्रिकेंत प्रोफेसर कार्पेंटर साहेबाबद्दलचा जो उल्लेख आहे तो अगदीं खरा आहे आणि मासलेवाईक आहे.

Each day he does a mountain climb,
A ten mile row, three meals, a witticism
And fills the intervening time with
pali texts and hebrew criticism.

खरोखर आम्हां सर्वांत प्रोफेसरच अधिक बळकट व काटक ठरले. किती चाललें तरी तोंडावर थकल्याचें चिन्ह नसे. वाट शोधून काढणें, लहानसान माहिती देणें, श्रमाचीं सर्व कामें स्वतः हौसेनें व काळजीनें करणें वगैरेंची कशी अगदीं त्यांना संवयच जडलेली. कोणी थकून मागें राहिल्यास पुन्हा त्याचेसाठीं मागें जात. कोणी फार पुढें गेल्यास वाट चुकतील म्हणून पुढेंही जात, वरोंही निरनिराळे खेळ खेळून व नाना सुभाषितें सांगून नेहमीं सर्वांस उल्हासांत ठेवीत.

अशा भल्या गुरूची, गुरुपत्नीची व आनंदी सहाध्यायाची शेवटीं रजा घेऊन मीं एका स्कॉच सरोवराची वाट धरली.

## स्कॉच् सरोवरांत.

स्कॉटलंडचें राजधानीचें शहर एडिंबरो हें सगळ्या ग्रेटब्रिटनांत अत्यंत सुंदर आहे. समुद्रकांठीं टेंकडयांच्या आंदोलावर, ह्यास ठिकाण फार अनुकूल मिळालें असून, स्वतःचा बांधाही पांखराप्रमाणें आटपशीर व टुमदार आहे. त्यामुळें अवजड्या लंडनसारख्या शहरांतून आलेल्या पांथाचें मन हें सकृद्दर्शनींच हरण करितें. यूरोपांत हें एक पाहण्यासारखें स्थळ असून, आत्मसंतुष्ट स्कॉच लोकांस ह्याबद्दल मोठा अभिमान वाटत आहे. आजूबाजूच्या सात टेंकडयांमध्यें हें वसलें असल्याकारणानें स्कॉच लोक ह्यास आधुनिक अथेन्स असें म्हणतात, व आल्यागेल्यांस त्यांचें मत विचारतात. इतकेंच नव्हे तर अथेन्सची सर आणण्यास तेथील एका प्राचीन इमारतीच्या अवशेष राहिलेल्या खांबांच्या रांगेचें येथें एका टेंकडीवर हुबेहुब अनुकरण केलें आहे. ह्या स्वच्छ व सुखी नगरींत. एक आठवडा चालवून पुढें मी ग्लासगो येथें गेलों. उद्योगाची घडघड, व्यापाराची घडामोड, गर्दी, धूर आणि धुरळा इ० आधुनिक सुधारणेची वरवर दिसणारीं लक्षणें येथें भरपूर आहेत. तीनच दिवस येथें राहून माझें इष्ट स्थळ जो स्कॉच् सरोवर प्रांत, तिकडे निघालों. पण तितक्याच अवधींत मला भावी एकांताच्या सेवनार्थ फार चांगली भूक लागली होती.

ग्लासगोच्या एका धुरकटलेल्या बोगद्यांतून आगगाडीनें मला फरपटीत बाहेर ओढून एके सुप्रभातीं क्लाइडनदीच्या खाडींत निवांत पाण्यावर आणून सोडिलें. किती तरी आराणूक वाटली मनाला! पण येथेंही माणसांची गर्दी कांहीं चुकली नाहीं. इतका वेळ कामांत गुंतलेल्यांच्या गर्दींत होतों, तर आतां विश्रांति घेणाऱ्यांच्या गर्दींत पडलों! ज्या बोटींत मी उतरलों ती आधींच भरून गेली होती. अशा भरलेल्या बोटी वेळोवेळीं बंदरांतून निघून, गिरिगव्हर, मैदान, जंगल इ० निरनिराळ्या प्रांतीं शिरत. ह्या गर्दींपैकीं कांहींना काम फार पडल्यामुळें व कांहींना काम मुळीं नसल्यामुळें शीण आला होता. तथापि शरण आलेल्यांचे गुणावगुण न पाहतां सृष्टिमाता सर्वांचें सारखेंच सांत्वन करूं लागली. सुधारणेचा ताप किती आहे हे खरें पहावयाचें असल्यास एकाद्यानें अशा विश्रांतीच्या ठिकाणीं किती व कोणत्या प्रकारची झांगड लागून गेलेली असते तें पहावें. इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड इतकेंच नव्हे तर युरोपांतील निरनिराळ्या ठिकाणांहून, विशेषेंकरून अमेरिकेंतून लोक येथें येतात व तसेंच इतर ठिकाणींही जातात. डोंगराच्या खबदडींतही सुखाचें प्रत्येक साधन पुरविणारीं, व अहर्निश सृष्टि–नटीचे सर्व हावभाव दाखविणारीं हॉटेलें येथें सर्वत्र सज्ज होऊन वाट पहात उभीं आहेत. खुश्कीनें व जलमार्गानें प्रवासाचे दर कमी करून भपकेदार वर्णनाचीं गाइडबुकें लिहून, जाहिराती देऊन वगैरे वगैरे नाना उपायांनीं व्यापारी लोक गिऱ्हाइकांस घरांतून बाहेर काढितात. तशांत, फॅशनदेवीचे नवस पुरविणेंही इकडे फार जरूरीचें झालें आहे. ज्या ठिकाणीं हिंवाळा व पावसाळा घालविला तेथेंच उन्हाळ्यांतही राहणें म्हणजे इकडच्या संभावितपणाला शोभत नाहीं. अशा अनेक कारणांमुळें मला ही गर्दी जमलेली पाहून फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. आश्चर्य वाटलें तें हें कीं, ह्या लोकांची विश्रांति घेण्याची तऱ्हाहा दगदगीचीच. निदान मला ती तशी भासली. रेल्वेवर काम करून शिणलेले तरुण पुरुष, पोष्टांत खपणाऱ्या तरुण मुली, गिरणींतले मजूरही, एथील निरनिराळ्या भागांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें, व सुंदर देखावे रात्रीचा दिवस करून पाहून जात असतात.

असो, आमची आगबोट क्लाइड नदीच्या रुंद खाडींतून लवकरच लॉख् लॉंग नांवाच्या सुंदर व चिंचोळ्या सरोवरांत शिरली, व स्कॉट्लंडच्या पश्चिम भागांतील हायलँड नांवाच्या जगप्रसिद्ध डोंगरी प्रदेशांत वरवर जाऊं लागली. दाहींकडे केवळ सामसूम झालें. शांति आणि समाधान हीं स्वर्गीय भावंडें पहाटेच्या प्रहरीं येथें विश्रमानें दोहों कांठावर झोंपींच गेलीं होतीं जणूं! प्रत्येक वळशासरशी नवेनवेच पडदे आम्हांपुढें पसरत. आतां सरोवर संपलें, पुढील खडकावर आम्ही उतरणार असें म्हणतों तोंच पुनः पाणी आणि पर्वत, गवत, वृक्ष आणि वेली ह्यांचें अकल्पित भांडार पुढें दिसूं लागे. अखेरीस लॉखलॉंगच्या अगदीं शिरोभागीं ॲरोखर

नांवाच्या जंगली बंदरांत आगबोट रिकामी झाली. ह्या लहानशा ठिकाणीं घरांपेक्षां हॉटेलांचीच संख्या अधिक होती आणि घरांत राहणाऱ्या साध्याभोळ्या हायलंडरांनाही ह्या लाघवी सुधारणेनें पैशाची चट लावून दिली होती हें लवकरच दिसून आलें.

येथून दीड मैलावर, सगळ्या, 'स्कॉच सरोवराची राणी' जी लॉखलोमंड तिचा अंमल सुरू होतो. ह्या सर्व प्रदेशांत वस्ति फार विरळ विरळ आहे. मैल दीड मैलावर एखादी शेतकऱ्याची झोंपडी अगर गृहस्थाचा वाडा लागतो. सुदैवानें ह्या एकांतस्थलीं मला तीन निरनिराळ्या झोंपड्यांत जागा मिळाल्यानें ह्या सर्व प्रदेशांत फिरून पाहण्यास सांपडलें; आणि हॉटेलांत राहणाऱ्या नागरिक लोकांचा संसर्गही थोडा वेळ चुकवितां आला. लॉखलोमंडच्या दुसऱ्या बाजूस ४–५ मैलांवर प्रख्यात कवि सर वॉल्टर स्कॉट ह्याच्या 'लेडी ऑफ दि लेक' ह्या काव्यांतील मुख्य स्थळ लॉख् कॅट्रीन हें आहे. ही तर सौंदर्याची खाणच स्कॉट कवीला लाधली होती. सरोवराच्या शिरोभागीं ट्रोसॉक्स नांवाच्या मनोहर दरीकडे जातांना एलन्स आईल नांवाचें वरील काव्यांताल नायिकेचें सुंदर स्थान लागतें. त्याला अगदीं चिकटूनच प्रेक्षकांची नौका जात असतांना प्रत्येकाचें अंतःकरण सद्गदित झाल्यावांचून राहत नाहीं. यावत्काळ हा डोंगर, हें सरोवर व ही दरी पृथ्वीवर राहतील तावत्काळ स्कॉटच्या नांवाला व त्याच्या साध्या, सरळ व सोप्या भारतीला बाध येणार नाहीं ही साक्ष पटते. मी दरींत शिरलों तेव्हां

"All in the Trossak's glen was still,
Noon tide was sleeping on the hill"

हा कवीचा दाखला मला प्रत्यक्ष पटला! येथून पाऊल परत घेणें जिवावर आलें!

## बेन लोमंड शिखरावरील समाधि.

ऑगस्ट महिन्यांत एके दिवशीं सकाळीं लगबगीनें न्याहारी आटपून, लोमंड सरोवराच्या कांठीं हार्बेट बंदरावर आगबोटीची वाट पहात मी उभा होतों. जिच्या मुद्रेत सायंकाळचे प्रसंगीं एक प्रकारच्या आध्यात्मिक औदासिन्याची आणि चिंतनगांभीर्याची शोभा दिसत असे ती ही 'स्कॉच सरोवरांची राणी' आज सकाळीं आपल्या सर्व परिवारासह अत्यंत सुप्रसन्न दिसत होती. आज दिवस इतका स्वच्छ व सोज्ज्वळ होता कीं, ह्या उन्हाळ्यांतला हा अगदीं पहिल्या प्रतीचा असें लोक ह्मणूं लागले. पैलतीरावर 'बेन्‌लोमंड' पर्वताचें निमुळतें शिखर इतरांहून उंच आकाशांत गेलें होतें. येथून सुमारें ५ मैलांवर पर्वताचे पायथ्याशीं रॉबर्टनान् नांवाच्या एका कोपऱ्यांतील बंदरावर मी एकटाच उतरलों आणि हळुहळु चढण चढूं लागलों. येथें एकांत ह्मणजे अगदीं पूर्ण प्रतीचा होता. जिवलग माणसें व देशबांधव हजारों कोसांवर; एतद्देशीय मित्र, ओळखीही शेंकडों कोस दूर; आसमंतात् माणसांची कोठेंही चाहूल दिसेना; प्रदेश अनोळखीचा, वाट गैरमाहितीची; इतकें असूनही मी अपरिचित स्थळीं आहें असें वाटेच ना. जंगली हिंस्र पशूंची तर गोष्ट राहोच, पण साप, विंचू इत्यादि क्षुद्र किड्यांची येथें वार्ताही नाहीं. फार तर काय पायांत कांटाही मोडण्याची भीति नाहीं, अशीं येथील डोंगर व रानें अगदींच माणसाळून गेलीं आहेत. एकदोन शतकांपूर्वीं ज्या प्रसिद्ध व बाणेदार रॉबरॉय रामो. शानें हा सारा प्रदेश दणाणून टाकला होता त्याचीच गुहा व कबर पाहण्यास आतां कॉलेजांतील तरुण मुली बायसिकलवरून शेजारच्या पहाडांत एकट्याच हिंडत आहेत! असो. ह्या प्रकारें ह्या स्थळाचा आतां उग्रपणा जरी सर्वस्वी नाहींसा झाला आहे तरी येथील एकांतवासाला व जंगली शोभेला अद्याप तिळमात्र बाध आलेला नाहीं.

मी रान तुडवीत वरवर चाललों. एका टेंकडीच्या माथ्यावर जावें तों अवचित पुढें दुसरी टेंकडी दत्त ह्मणून उभी राही. तरी चढण्याचा कंटाळा येईना कीं थकवा वाटेना. भोंवतालीं प्रदेश अगदीं उघडा, झाड ना झुडुप, पायाखालीं मात्र हिरवें गार गवताचें दाट आणि दमट हांतरूण हांतरलें होतें. नजरेंत कोठें पशू येईना कीं पांखरूही येईना. केव्हांतरी एकाद्या दगडाच्या मागें रवंथ करीत पडलेलें एकादें स्कॉच मेंढरूं दिसे. पण ह्या सत्त्वशून्य प्राण्याच्या अशा क्वचित् दर्शनामुळें माझ्या एकांतांत ह्मणण्यासारखा व्यत्यय येत नव्हता. सहज चुकून मागें नजर गेल्यास, खालीं लांबवर पसरलेला अप्रतिम देखावा दिसे. २५ मैल लांब त्रिकोणाकृति लॉखलोमंड सरोवर अगदीं क्लाईड नदीला जाऊन भिडलें होतें; जणूं एक भलें मोठें पिंपळाचें

पानच कोठूनतरी तुटून ह्या विस्तीर्ण प्रदेशांत पडलें आहे ! पण तें पाहूनही माझ्या आत्मचिंतनाचा भंग होईना की ऊर्ध्वगतींत खंड पडेना.

'आत्मैवात्मनो बंधुः' ही वाणी मला आजच्या इतकी पूर्वी कधींच कळली नव्हती. आपल्या खोल कपाटांत अनुभव आणि अनुताप, ज्ञान आणि दर्शन, बोध आणि प्रेरणा, इ. एक कां दोन अनेक तऱ्हेचें दैवी भांडार भरलें असतां आम्ही एकमेकांपुढें आपलें दैन्य आणि दारिद्र्य किती तरी दाखवितों. भोंवतालच्या वनस्पती–पायांखालचें गवतही नाहीं का आपल्या बळावर वाढत ! मग आम्हीच कां अशी स्वतःची हेळसांड आणि पुष्कळदां असा दुरुपयोगही करतों ! मदत मागावयाची ती दुसऱ्याला कां ? ज्ञान धुंडावयाचें तें बाहेर कां ? पुस्तकांचें प्रामाण्य, माणसांचें माहात्म्य, मातीधोंड्याची आवश्यकता, वगैरे वगैरे कोण हे समजुतीचे व आग्रहाचे प्रकार ! आणि अशा हट्टानें किती डोईफोड ! हा जो आमचा असा छळ होतो तो कोणी कोपलेला देव करीत नाहीं किंवा देवाचा कोणी प्रतिस्पर्धी सैतानही करीत नाहीं. तर आम्हीच आमच्या स्वतःचें न ऐकतां असे आत्मशत्रु बनतों. लाज आणि संतोष, शिक्षा आणि शिफारस, बंधन आणि मोक्ष ह्या सर्व बाबतींत आमचें आम्हीच कारण आणि ह्याला साक्षही स्वतःचीच ! अशा ह्या आत्मसंभाषणांत मी गुंतलों होतों. मजबरोबर जणूं कोणी तरी पोक्त माणूस चाललें आहे. आणि मी जर इकडे तिकडे पाहीन अगर मध्येंच थांबेन तर ह्या माणसांचा जणूं मोठा उपमर्द होईल अशा कांहीं भावनेमुळें मी आजूबाजूस वाजवीपेक्षां फारसें लक्ष न पोहोंचवितां सारखा सरळ चढत होतों. अखेरीस अशा नादांतच बेनलोमंडच्या माथ्यावरील सर्वांत उंच टोंकावर मी आलों.

येथें दोन तरुण विद्यार्थी भेटले. आश्चर्याचा पहिला झटका निघाल्यावर, व अशा परक्या स्थळीं अशा तीन परक्यांचें जें साहजिक स्वागत व संभाषण व्हावयाचें तें झाल्यावर ते दोघेही डोंगर उतरून दरींत दिसेनासे झाले. मी मागें माझ्याच समागमांत राहिलों. बेन नेव्हीसचें शिखर खेरीज करून, सर्व ग्रेटब्रिटन देशांतील अत्यंत उंच स्थानीं एका शिळेवर मी आपलें आसन मांडिलें. क्षुद्र पण क्षम्य गर्वाची थोडी झुळुक वाहिल्यावर, लगेच आंतबाहेर निवांत झालें.

बारा वाजले होते; वारा वाहत नव्हता, थंडी वाजत नव्हती, उष्मा वाटत नव्हता, बाजूस थें दोनशें कदम कोरडी आणि सपाट जमीन होती. शेवटीं एकदम कडे तुटले होते. वर पसरलेलें आकाशाचें अवीट घुमट खालीं भोंवतालच्या विस्तीर्ण क्षितीजवलयावर टेकलें होतें. त्यावर मध्यंतरी ढगाचा कोठेंही डाग लागला नव्हता. दिनमणी मघोमघ तळपत होता. त्या प्रकाशांत चाळीस मैलांवरचा ग्लासगो शहरांतला धूर आणि धुरळा दिसत होता. ( समुद्रसपाटीपासून हें स्थान ३१९२ फूट उंच आहे. ) पर्वत, नद्या, सरोवरें, बेटें, माळरानें वगैरे आसमंतांतलि सुमारें १०० मैलपर्यंतची कारागिरी चर्मचक्षूंपुढें दिसूं लागली. अनंत स्थळ आणि अनंत काल हे दोन भिन्न जातीय गोल परस्परांच्या पोकळींत तरंगत आहेत, असा देखावा चित्तचक्षूला दिसूं लागला. खालीं लोमंड सरोवरावरून एकादी आगबोट केव्हांतरी दुरून तरंगत जात असतांना लहानशा हंसीसारखी दिसे. पुढें पसरलेल्या एवढ्या अफाट चित्रपटांत त्या हंसीशिवाय चैतन्याची इतर खूण म्हणून दिसेना ! तसेंच चित्तचक्षूंपुढें पसरलेल्या स्मृतिपटांत केव्हांतरी एकादें व्यक्तिचरित्रांतील पापपुण्य अगर मानवी इतिहासांतलें सुखदुःख ह्याची नुसती ओझरती आठवण होऊन जाई, ह्यापेक्षां जास्त येथेंही हाल चाल घडेना. हळुहळु हे दोन्ही बाहेरचे व्यापार बंद पडूं लागले. आंत काय व्यापार चालला होता तें कोण लिहूं शकेल ! कांहीं काळानें सर्वच सामसूम झालें !!

दोन वाजतां ही समाधि आटपली. नंतर मी वनांतून परत जनाकडे हळुहळू उतरूं लागलों.

मोठ्यांचीं एकदोन वाक्यें आठवलीं आहेत तीं येथें देतों.

I had heard of Thee by hearsay;
But now my eye seeth Thee.

Book of Job XLII 5 Old Test.

कां जे ध्युर्लोक आणि पाताळ । अथवा पृथिवी आणि अंतराळ । अथवा दशदिशा समाकुळ । दिशाचक्र ॥ १५ ॥ हे आघवेंचि तुवां एकें । भरलें देखत आहे कौतुकें । परी गगनाही संकट

भयानकें । आप्लविजे जेविं ॥ १६ ॥ नातरी अद्भुत रसाचीया कल्लोळीं । जाहाली चवदाहि भुवनांसि कडियाळी । तैसें आश्चर्यांचि मग मी आकळीं । काय एक ॥ १७ ॥ नावरे व्यासि हे असाधारण । न साहवे रूपाचें उग्रपण । सुख दूरी गेलें तरी प्राण । विपायें धरी जग ॥ १८ ॥ ज्ञानेश्वरी गीता अ. ११ श्लोक २०.

वरील पत्रांत मीं माझ्या निरनिराळ्या खासगी अनुभवांस ' प्रार्थना ' ' भेट ' ' समाधि ' अशीं मोठीं नांवें दिलीं आहेत. त्यावरून वाचकांस ही आत्मप्रौढी आहे असें वाटेल आणि केलेलें वर्णन अतिशयोक्तीचें आहे असा आरोप येईल. पण खरा प्रकार तसा नाहीं. वरील प्रसंगीं कोणाही यःकश्चित् मनुष्याची वरील अवस्था होणें साहजिक आहे. फार तर काय, खालील प्राण्यांतही जेथें जेथें चैतन्याचा अधिक विकास झालेला असतो तेथें तेथें वरील सौंदर्यदर्शनाचे प्रसंगीं वरील समाधीचा म्हणजे चैतन्याच्या एकीकरणाचा प्रकार सहज घडतो. मेघास पाहून मोर नाचून नाचून तटस्थ होतो. वसंतगामी कोकिळा गाऊन गाऊन स्तब्ध बसते. ' सर्प भुलोनि गुंतला नादा । गारुडिये फांदा घातलासे ।' हें तुकाराम सांगतात. असा जर सर्वत्र सृष्टिनियम आहे तर त्याला माझेंच मन कां अपवाद असेल !

आतां, वरील अनुभव सर्वसाधारण मानानें सर्वच माणसांस होण्यासारखा असून, किंबहुना होत असूनही जर कांहींजण तिकडे तादृश लक्ष्य पुरवीत नसतील अगर लक्ष्य पुरवूनही त्या त्या अनुभवांचा तादृश अर्थ करीत नसतील तर ती त्यांची खुशी. पण ह्या बाहेरच्या खुशीच्या भिन्नत्वामुळे आंतील स्वाभाविक अनुभवांस बाध येत नाहीं किंवा भिन्नत्वही येत नाहीं. अनुभव तो प्रकृतीच्या आणि प्रसंगाच्या मानानें सर्वत्र सारखाच यावयाचा. त्या अनुभवाचा झटका केव्हां केव्हां इतका जब्बर बसतो कीं, काव्य, कादंबरी, साहित्य हीं सर्व बापुडीं त्याच्या यथार्थ वर्णनाचे कामीं केवळ पंगू ठरतात. मग अतिशयोक्तीची गोष्ट कशाला !

---

## बंगलूरच्या रस्त्यांतील एक फेरी.

( सुबोधपत्रिका. २७-१२-१९०३. )

—वारीं सकाळीं ७ वाजतां कॉफी आटपल्यावर ब्राह्मबंधु—स्वामी मजकडे आले व आम्ही दोघे मिळून शहर पाहण्यास निघालों. युरोपीय शहरांचा देखावा स्मृतिपटलावर अद्यापि ताजा असल्यामुळें त्याच्या तुलनेनें आजच्या देखाव्याचें मला विशेषच कौतुक वाटूं लागलें. हिंदुस्थान म्हणजे रशिया खेरीज करून बाकीच्या युरोपाप्रमाणें एक खंडच आहे, असें म्हणतात तें पुष्कळ दृष्टीनें खरें आहे. उत्तर युरोपांतून आल्प्स् चढून खालीं दक्षिणेस इतालींत उतरल्यावर पाहणारास जी देखाव्याची पालट दिसते तीहूनही जास्त मला येथें दिसूं लागली. दक्षिण युरोपांत जुन्या ग्रीक व लॅटिन सुधारणांच्या सांगाड्यांवरून आधुनिक सुधारणेचें मांस भरलेलें कांहीं ठिकाणीं तर नुसता रंग चढलेला पाहून इतिहासभक्तांस जो विस्मय वाटण्यासारखा आहे त्याहून अधिक दक्षिण हिंदुस्थानांत वाटतो-निदान मला तरी वाटला. आज सकाळच्या फेरींत रस्त्यानें मला जागोजाग एक ना दोन, चार सुधारणा आढळल्या—द्रविडी, आर्य, मुसलमानी, इंग्रजी. मोठी मौज ही कीं, कांहीं ठिकाणीं चारींची बेमालूम भेसळ होऊन गेली आहे तर कांहीं ठिकाणीं एकीवर दुसरीचीं, दुसरीवर तिसरीचीं अशी पुटें बसलेलीं आहेत. रस्त्यांत जाणाऱ्या येणाऱ्याकडे नुसतें घटकाभर निरखून पाहिलें तरी बस; मानवजातिशास्त्राचे एक दोन धडे सहज समजतात. काळा वर्ण तर सांगावयास नकोच. पण बसकें नाक, पसरट तोंड, लोंबते ओंठ, एकंदरींत बावळी व राकट मुद्रा ही खालील वर्गांची साधारण चेहरेपट्टी पुष्कळ ठिकाणीं उच्च वर्णांसही लागू पडते. जातिभेदाचे ठरावीक नियम अद्यापि जरी महाराष्ट्रांतल्याही पेक्षां अधिक कडकपणें इकडे पाळले जात आहेत तरी, आर्य आणि अनार्य ह्या नैसर्गिक वर्णांचा संकर कधींच होऊन गेला आहे हें उघड दिसतें. हल्लींच्या अय्यर, अयंगार, राव, कोमटी, मुदलीयार, नायडू, बक्कलग्यार, कुरुबर, पारिया इत्यादि जाती, हिंदुस्थानच्या इतर भागांतल्या जाती आणि वेदांतल्या चार जाती ह्यांचा

कसा काय मेळ बसवावा ह्यासंबंधी घोंटाळा रस्त्यानें जातां जातां मनांत माजत असे. ह्या घोंटाळ्यांत मन आहे तोंच एकादी पारिया (महार) बाई (तिनें स्वतः अगर तिच्या बापानें खिस्तीधर्माचा स्वीकार केला असल्यामुळें) मडमसाहेबांसारखा पोषाख करून एकाद्या दुकानांत शिरतांना दिसे आणि मुख्य शेटजी तिला खडी ताजीम देऊन आपल्या सर्व जिनसा दाखविण्यास पुढें पुढें करीत. इकडे तिचा जातिबंधुच पण 'स्वधर्मे निधनं श्रेयः' ह्मणून परधर्माला भिणारा एकादा पारिया गटारावरच उभा असलेला दिसे. असो.

ह्याप्रमाणें—स्वामींशीं इंग्रजींत बोलत, स्वामींचे शब्द मात्र इंग्रजी पण उच्चार अस्सल तामिळी व कित्येक ठिकाणीं वाक्यरचनाही तीच! इकडे वरचेवर लक्ष जाई पण न गेल्यासारखें दाखवीत रस्त्यानें चाललों असतां ह्या द्राविडी शहराची अस्ताव्यस्त शोभा नजरेंत भरूं लागली. भक्कम वर्तुलाकार मध्यें झिजलेल्या खांबाच्या रांगा गुळगुळीत चुनेगचीच्या थंडगार ओस्या, स्वच्छ धुतलेलीं दगडी आंगणीं, त्यांवर घातलेल्या रांगोळ्या, मधून मधून लहान लहान शेणाच्या गोळ्यांत रोवून ठेविलेलीं भोपळ्याचीं फुलें, (मला वाटतें लक्ष्मीचीं आवडतीं जीं कमळें त्यांच्या ऐवजीं हीं असावींत) किंचित् आखुड पण भक्कम लांकडी दरवाजे आणि उंबरठे आणि त्यांवर ओढलेले हळदीकुंकवाचे पट्टे वगैरे पाहून खरोखर आल्हाद होत असे. आणि स्वच्छता व नीटनेटकेपणा ह्या गुणानें पाश्चात्यांनीं आमच्यापुढें विशेष घमेंड मारूं नये असें वाटूं लागतें तोंच, ह्या स्वच्छ घरापुढच्या गलिच्छ गटारांत केवळ सार्वजनिक हलगर्जीपणाची हेंदर सांचली होती आणि कित्येक ठिकाणीं तर स्वतः गटारांचाच हमरस्त्यांत लोप होऊन गेला होता तें पाहून वरील तुलनात्मक बाबींत पुनः विचार करणें भाग पडे. नागरिक नीटनेटकेपणा राखण्याची जबाबदारी सर्व नगरावर आहे; आणि ती सक्तीनें पाळण्याचें काम नागरिक अधिकाऱ्यांचें आहे हें कांहीं नुसतें सरकाराबरोबर भांडून अम्हांला कळण्यासारखें नाहीं. आमच्या रस्त्यांत सुंदर इमारती नाहींत असें नाहीं. चालतां चालतां एका चौकांत आल्याबरोबर आड गल्लींतल्या लाल मसजीद नांवाच्या एका सुंदर मुसलमानी उपासनामंदिराकडे माझी नजर गेली. मंदिराची मासलेवाईक बांधणी आणि रसिक सुबकता मनांत एकदम भरल्यामुळें तें नीट पाहिल्याशिवाय पुढें पाऊल पडेना. तें सर्व पाहून बाहेर पडल्यावर बाजूचा दरिद्री व घाणेरडा देखावा पाहून चमत्कारिक हिरमोड झाला. एका बाजूस बुरुडांनीं आपल्या उंच वेळूंचीं भलींमोठीं जुडगीं आणि तट्ट्याचीं मेंडोळीं मशिदीला लागूनच ठेविलीं होतीं. तीं मशिदीहून उंच दिसत होतीं आणि जवळ त्यांच्या तक्रारी व्यापारांचा गलबला चालला होता. मशिदीच्या दारांतच मिठाईवाल्याची भर्जी तळण्याची एक जंगी कढई कढत होती. आणि ह्या खाण्याचा माल विकणाऱ्याची मूर्ति व तिचा पेहराव हीं दोन्ही कढईपेक्षांही काळीं कुळकुळीत दिसत होतीं. दुसऱ्या बाजूस कोळसेविक्यांचीं दुकानें लागलीं होतीं. ह्या प्रकारें ह्या मशिदीच्या सौंदर्याची व सात्त्वीकतेची चोहोंकडून हलाखी चाललेली पाहून सादृश्यामुळें चटकन् माझ्या मनांत निराळेच विचार आले. जो आमच्या रस्त्यांत हा प्रकार नित्य चालला आहे त्याहून ओंगळ प्रकार आमच्या धर्मांत नाहीं का चालला? धर्मांत किती शुद्ध, सात्त्विक व सुंदर तत्त्वें आहेत, धर्माच्या इतिहासांत किती थोर प्रयत्न झालेले आहेत आणि त्या साऱ्यांवर आतां भलत्याच गोष्टींचें किती कठीण वेष्टण पडलें आहे आणि कोण गवगवा माजला आहे! लाल मशिदीची काळजी काजीसाहेबास असावयाला पाहिजे खरी. तथापि त्यांनीं आपलें काम केलें नाहीं अगर त्यास करतां आलें नाहीं म्हणून एकादा म्युनिसिपालिटीचा कामगार येऊन केवळ रस्त्यांतील शोभेची नाहक हानि होते ती न व्हावी ह्या हेतूनें, मशिदीच्या दारांतल्या भल्या मिठाईवाल्यास आपलें दुकान तेथून उठविण्यास ताकीद देऊं लागला तर त्यास काजीसाहेब खात्रीनें अनुकूल होतील काय? तें कांहीं असो, काजीसाहेबाचा व दुकानदारांचा अंतस्थ संबंध कांहीं असो किंवा त्या मशिदीचें कांहीं होवो, सध्या धर्मांत जी बाजारी लोकांनीं चोहींकडे धुमाकूळ उडवून दिली आहे ती निवारण करणारा कोणीतरी चांगला खवीस आला पाहिजे खास.

जेरुसलेमच्या देवळांत नित्य जमून गिल्ला करणाऱ्या सराफांना येशूनें एकदां पार धुडकावून दिलें होतें असें कित्येकांनीं कित्येकदां केलें आहे तरी हे सराफ पुनः जमतात. त्यांना वेळोवेळीं हुसकून लावण्याची वेळोवेळीं योजना झालीच पाहिजे. दुसरा इलाज नाहीं.

ह्या प्रकारें ह्या दक्षिणेंतील शहरांत हिंडत असतां द्रविडी देवळांचीं पसरट व बोथट शिखरें, ख्रिस्ती चर्चचीं गाथिक निमूळतीं स्पायर्स, मुसलमानी मशिदीचे पांढरे शुभ्र मनोरे ह्या सार्‍यांचें एकच विसंगत चित्र नजरेस दिसूं लागलें. एकादा अस्सल आर्य, कडकडीत सोंवळा, अर्धा उघडा, मानेवर लांब शेंडीचा झुपका लटकत असलेला असा आयंगार आपल्या वाटेंत एखादी गरीब पारियाबाई—जिच्या एकंदर शारीरिक व मानसिक विकासावरून पहातां ती हिंदुस्थानापेक्षां आफ्रिकेंत राहण्यास योग्य दिसत आहे—आली ह्मणून तिजवर डोळे वटारीत आहे तोंच मागून एक बाईसिकल घंटी न वाजतां एकदम आलेली पाहून पारियाबाई व आपण दोघेजण गटारावर उभीं राहतात, व एकादा सोजीर बेगुमान दौडत जातो. एकादा अर्धवट शिकलेला अंडरग्राजुएट पायांत जोडा वरती पाटलून घालून कानडी हेलांत इंग्रजी बोली रस्त्यानें मोठमोठ्यानें आपल्या सोबत्याशीं बोलत जात आहे. एकादा मुसलमान ज्याच्या जातीची स्थिति टिपुसुलतानाच्या वेळीं कशी असेल ती असो. आतां मात्र तिचा मोठा धंदा ह्मणजे गाडी हाकण्याचा झाला आहे, इतका कीं परवा कुतब्याचा मोठा सण होता ह्मणून गाड्या अत्यंत महाग झाल्या होत्या—असा तो सणानिमित्त भपकेदार कपडे घालून निमाज पडण्यास निघाला आहे. असे नानाविध चमत्कार दाखविणारा जीवंत सिनेमेटोग्राफ मला बंगळरच्या रस्त्यांत दिसला!

ही अपूर्व विसंगतता व विविधता पाहून हिंवाळ्याच्या थंड हवेंत हिंदुस्थानांत चैनीसाठीं फिरावयास आलेल्या युरोपियन प्रवाशास मोठी मौज वाटत असेल. पण मद्रासच्या राष्ट्रीय सभेस निघालेल्या एकाद्या यात्रेकरूस व देशभक्तास काय वाटेल! बिचाऱ्याच्या मानेवर केवढी प्रचंड जबाबदारी! असलीं परस्पर विरुद्ध तत्वें एकत्र ठोकून त्यांचें एक राष्ट्र घडवावयाचें केवढें जोखमीचें आणि दीर्घोद्योगाचें काम हें. हें पांचपंचवीस वर्षांत होणारें नव्हे तर शतकेंच्या शतकें करीत राहिलें पाहिजे, आणि तें एकाच बाजूनें करून होणार नाहीं तर सर्वच बाजूंनीं अनेक अडथळे सोसून करीत राहिलें पाहिजे. खरोखर धार्मिक काम हें!

---

# मंगळूर येथील कांहीं विशेष गोष्टी.

## मंगळूर शहर.

(सु. प. १२-१०-१९११.)

प्राचीन अथेन्स शहर सात टेंकड्यांवर वसलें होतें असें इतिहासकार सांगतात. एडिंबरो हेंही टेंकड्यांवर वसलेलें आहे म्हणून स्कॉच लोक त्यास अर्वाचीन अथेन्स असें अभिमानानें म्हणतात. पण मंगळूर शहर सातांहून अधिक टेंकड्यांवर वसलेलें असून वरील दोन्ही अथेन्सलाही स्वाभाविक सौंदर्यानें खात्रीनें लाजवीत आहे. तशांत पावसाळा संपून दसरा झाला कीं, मंगळापुरी (मंगळूर) दरवर्षी जणूं उपवनच होते. प्रेक्षकांनीं तिला ह्याच वेळीं पहावयाला यावें. दंतकथा सांगते कीं, गोरखनाथाची कोणी मंगळा नांवाची दासी होती, तीच आतां मंगळापुरी (मंगळा+उरु=शहर=मंगळूरु) ची अधीष्ट देवता झाली आहे. तिचें मोठें जुनें देऊळ शहराच्या नैर्ऋत्य कोनाला प्रसिद्ध आहे. आतां देवी होऊन सर्वांना पूज्य होऊन बसलेली मंगळा ती पूर्वी गोरखनाथाची चटीक होती हें काय गौडबंगाल! पण समजुतदार माणसेंही आपल्या जिभेची जबाबदारी न ओळखतां स्वेच्छेप्रमाणें कांहींतरी सांगत सुटतात, मग ती जी बोलून चालून दंतकथा तिच्या जिभेला हाड कोठून असणार? कसेंही असो. मंगळादेवीचे नवरात्र आम्ही येथें पोंचल्या दिवशींच संपून दसरा चालला होता. पण मंगळूरचे नवरात्र सर्व हिंवाळाभर चालणार आहे. चहूंकडे हिरवें गार गवत म्हणजे अगदीं मी म्हणत आहे. बहुतेक मुख्य रस्ते टेकड्यांच्या बगलांतून बोगदेवजा खणून काढलेले असल्यामुळें त्यांच्या दोहों बाजूस ७।८ फूट उंच ज्या भिंती आहेत त्यांवरही दोन दोन हात लांब गवताच्या झिपऱ्या लागलेल्या व त्यावर बारीक शुभ्र फुलें लटकलेलीं दिसतात. शहर म्हणजे एक निबिड अरण्यच जसें. छपरावरील एकही कउल असें मिळणार नाहीं कीं ज्याला अर्धा तास सारखें सूर्यदर्शन मिळतें; मग बाहेर कडक उन्हाळा कां असेना! दोन घरें ओलांडलीं नाहीं

तोंच एक खाचर लागतें व त्यांत मस्तावलेला भात झुलत असलेला दिसतो. हिंदु, मुसलमान, खिस्ती हे तीन धर्म, तुलव, मलिआळी, कानडी व कोंकणी–शिवाय मोडक्या तोडक्या इंग्रजीचे शिंतोडे रस्तोरस्तीं उडतात ते वेगळेच. अशा ह्या 'साडेचार भाषा' ह्यांतून येथील सुमारें ४० हजार लोकसंख्या बहुतेक सारखीच विभागलेली आहे. असल्या ह्या विचित्र पुरींत ऐक्य पाहूं जाणारा 'तो एक मूर्खच.' 'सारस्वत' आणि 'कोंकणी' हे अगदीं जवळचे जातभाई. पण त्यांच्यांत अगोदरच प्रेमाचा उल्हास होता त्यांत येथें जन्मास आलेल्या संयुक्त परिषदेनें फाल्गुनमासाची भर घातली आहे. जें सख्य सारस्वतांत व कोंकण्यांत तेंच येथील शेंकडों वर्षांपूर्वी क्यॉथोलिक झालेल्यांत व नुकताच बाझल मिशननें बाप्तिस्मा दिलेल्या खिस्त्यांत.

## ब्राह्मसमाज.

अशा ह्या कोनाकोपऱ्यांतील शहरांतही ब्राह्मसमाजाची स्थापना होऊन ३०–४० वर्षे झालीं. कालिकतच्या बाजूनें येथें आगगाडी तर अगदीं अलीकडेच आली. तोंपर्यंत येथें यावयाचें तर जलमार्गानेंच. तोही मार्ग पावसाळ्यांत चार महिने बंद व बाकीच्या आठ महिन्यांत आतां कोठें सुखाचा झाला आहे. अशा अडचणींत ब्राह्मधर्माचें बीं कोठून व कसें येऊन पडलें व त्याचें झाड आज असें कसें फैलावलें आहे, हें एक नवलच आहे. हा सर्व इतिहास फारच मजेचा आहे. तो सर्व येथें देण्यास अवकाश नाहीं. ह्या समाजाचा वार्षिक उत्सव नुकताच साजरा करण्यांत आला. त्यांत विशेष हा कीं, येथील मंदिर लहान असून फार जुनें झालेलें होतें, तें वाढवून पुन्हां बांधण्यांत येऊन उत्सवाचे पहिले दिवशीं (सपटंबर ता० २९ रोजीं) उघडण्यांत आलें. त्या दिवशीं समाजाचे अध्यक्ष परमपूज्य रघुनाथय्या ह्यांनीं गांवांतील आमंत्रित प्रत्येक जातीच्या प्रतिनिधीच्या हातांतून अक्षता जमवून मंदिराच्या चारी बाजूला टाकल्या. त्यांत पंचम जातीचाही मनुष्य होता. ब्राह्ममंदिर हें सर्व जातींसाठीं आहे. म्हणून हें सर्वांच्या हातांनीं शुद्ध व सर्वांच्या आशीर्वादानें धन्य झालें, असा ह्या कृतीचा अर्थ होता. जुन्या मंदिराचा संकोच येथील मंडळीला बरेच दिवस भासत होता. येथील उद्योगी सेक्रेटरी रा० के० रंगराव म्हणाले, ह्याविषयीं मी किती दिवस तरी मनांत खंती बाळगीत होतों. आमच्या सार्वत्रिक ब्राह्ममंदिरापेक्षां ह्या गांवांतील नाडीवाल्या बिल्लव लोकांची भूतस्थानें ही कितीतरी विस्तीर्ण आणि सुंदर आहेत, असा मीं वेदीवर बसून कितीवेळां तरी प्रार्थनेंत व उपदेशाचे वेळीं आक्रोश केला होता. पण तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. शेवटीं मंदिराचे बाजूवरील एका मोठ्या आंब्याच्या झाडालाच करुणा आली व तें अकस्मात् मंदिराच्या मुखशाळेवर कोसळून पडलें ! मग काय विचारतां मंदिराचें देवानें जणू नाकच कापलें ! आणि आम्हाला हें ऐसपैस नवीन मंदिर बांधावें लागलें. ह्या मंदिरासाठीं येथील वृद्धतरुण सभासदांनीं अगदीं अविश्रांत श्रम केले आहेत. आतां सुमारें ३०० जण सुखानें बसून उपासना ऐकतील असा आश्रय झाला आहे. पण झालेलें कर्ज फेडावयास व भोंवतालचे कंपाउंड व आंतील सामान विकत घेण्याला अद्यापि निदान दीड हजार रुपयांची फार नड आहे. ती भागविण्यासाठीं कांहीं तरुण मंडळी रजा घेऊन बाहेरगांवीं भिक्षेस निघणार आहेत. कदाचित् मुंबईलाही एकदां येइल, कां नये येऊं ? उत्सवांत नेहमींप्रमाणें सर्व प्रसंग झाल्यावर यंदां मराठींत कीर्तन झालें. येथील सारस्वत मंडळीला मराठीचा फार अभिमान वाटतो; विशेषतः बायकांना तरी गीर्वाण भाषेप्रमाणें पूज्य वाटते, म्हणून मंदिराकडे ज्यांनीं कधीं तोंडही फिरविलें नव्हतें अशा पुष्कळ स्त्रीपुरुषांची मंदिरांत कीर्तनाचे वेळीं गर्दी जमली होती.

## नये मागें पाहों वाट फिरोनिया ।
## दुसरा संगिया साहकारी ॥

ह्या तुकारामवचनाच्या आधारें श्रीकृष्णचरित्राचें आख्यान लावण्यांत आलें होतें. वावगें म्हणावें तर, साक्षात् श्रीकृष्णाचें चारित्र तुकारामानें गाइलेलें, चांगलें म्हणावें तर त्याचा निस्पृहपणा केवळ दुःसह होता, म्हणून जमलेली गर्दी बुचकळ्यांत पडून घरोघर गेली.

## निराश्रित साह्यकारी मंडळी.

दुसरा संगिया साहकारी याची वाट मागें फिरून न पाहतां अस्पृश्य वर्गाच्या उद्धारार्थ काम आज जवळ-जवळ १३ वर्षे येथील ब्राह्मसमाजाचे सेक्रेटरी रा० के० रंगराव हे निश्चयानें करीत आहेत. हल्लीं तर त्यांनीं आपला २५।३० वर्षांचा वकिलीचा धंदा गेल्या आगष्टांत आवरून संपूर्णपणें अंत्यजांचीच सेवा स्वीकारली आहे. ते आपल्या कुटुंबासह आतां ब्राह्ममंदिरासमोरील प्रचाराश्रमांत येऊन राहिले आहेत, व नांवाशिवाय अनभिषिक्त प्रचारकच बनले आहेत. स्वीकारलेल्या कामांत वेळोवेळीं त्यांची मित्रमंडळी त्यांचे दोष काढीत आहेत, त्यांना सरसकट एकच उत्तर म्हणून आपल्या टेबलाजवळील भिंतीवर 'Fault finders will find fault even in Paradise.' हें वाक्य भव्य अक्षरांनीं एका तांबड्या फळीवर कोरून ठेविलेलें आहे. त्यांच्या शाळेंतील हजेरीपटावर ७३ पारियांच्या मुलांचीं नांवें आहेत. रोजची सरासरी सुमारें ६० आहे. एक मुलगा शिकून शिक्षक बनला आहे. मुलें २।३ मैलावरून शिकावयास येतात, म्हणून त्यांस दोन–

प्रहरचें एक जेवण शाळेंत यावें लागतें. ६ हातमागांपैकीं ३ चांगले चालले आहेत. पण कापडाला मागणी चांगली नाहीं. कारण गिरणींतील हलक्या स्वस्त दराच्या व वरून सारखेंच दिसणाऱ्या नगापुढें हातमागाच्या भरींव पण महाग कापडाचा टिकाव लागत नाहीं, पण एरंडी रेशमाच्या किड्यांची लागवड करण्यांत रा० रंगरावांनीं बरेंच श्रेय व प्रसिद्धि संपादन केली आहे. कोइमतूर येथील शेतकीच्या कॉलेज्यांतून ह्या किड्यांसाठीं त्यांच्याकडे पुष्कळ मागणी येत आहे, हें रेशीम तयार करण्याचे कामीं उच्च शिक्षण मिळविण्यारितां मि०मेलोथ नांवाच्या एका अनुभवी गृहस्थास रा० रंगरावांनीं मिशनच्या मार्फतीनें बंगाल्यांतील पुसा येथील कॉलेजांत पाठविलें आहे. मंगळूरच्या कलेक्टर साहेबांनीं ह्या कामगिरीचें महत्त्व जाणून सरकारांतून ५०० रु० देणगी देवविली आहे. रा. मेलोथ हे लवकरच परत येतील व पश्चिम किनाऱ्यावर जागजागीं मिशनचीं ठाणीं उघडण्यांत आपल्यास मदत करतील अशी रा. रंगरावांना मोठी उमेद आहे. रा. रंगरावाचें सर्वांत नांवाजण्यासारखें व मदतीस अवश्य पात्र असें काम म्हणजे मंगळूरहून एका मैलावरील एका सुपीक टेकडीवर त्यांनीं घातलेली पारियांची वसाहत होय. तेथें हल्लीं १७ कुटुंबांची कशी तरी सोय झाली आहे. पैकीं चौघांस मात्र पक्क्या इमारती मिळाल्या आहेत. बाकी तात्पुरत्या झोपड्यांत आहेत. सरकारानें इमारती लांकूड फुकट दिलें असल्यानें व मजुरी ज्याची त्यानेंच पुरवावयाची असल्यानें ३६ रुपयांत एका कुटुंबासाठीं एक पक्कें घर मिळेल अशी रंगरावांनीं सोय केली आहे ५० रु. दिल्यास दोन कुटुंबांची कायमची सोय होईल असें घर तयार होतें. एकंदर साठ कुळें राहतील एवढी जागा आहे. इकडे श्रीमंत उदार गृहस्थांचें लक्ष जाईल काय ? एक मोटारगाडी म्हणजे २०० पारियांच्या झोपड्या हें रंगरावाचें कोष्टक मुंबईचा एकादा भाटिया शिकेल तर गरिबांचें कोटकल्याण होणार आहे ! ह्या वसाहतींत दोन विहिरी काढल्या आहेत; दोन्हींसही गोडें पाणी लागलें आहे. पैकीं एकीचा खर्च सुमारें ५०० रु. अंदमान बेटांतील कैद्यांकडून मि. सदाशिव पिले नांवाच्या एका सद्गृहस्थानें जमवून दिला आहे; म्हणून तिचें नांव अंदमान विहीर असें पडलें आहे. एकूण अंदमानांतील कैद्यांना हिंदुस्थानांतील पारियांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य आहे काय ?

---

# बंगालची सफर.

(सुबोधपत्रिका, २८-१-१९०६.)

ब्राह्मधर्मांची परिषद १८८९ सालीं प्रथम मुंबईस भरल्यापासून एक दोन वर्षें खेरीज करून जरी सालोसाल दर कॉंग्रेसच्या वेळीं भरत आली आहे, तरी तिजसंबंधीं माहिती पुष्कळांना झालेली नव्हती. केवळ कॉंग्रेसकरितां आलेलेच लोक कायते जमत. व त्यांच्याही आठवणींत ती फार दिवस टिकत नसे. पण मुंबईस भरलेल्या १९०४ च्या परिषदेपासून हिची प्रसिद्धि होऊं लागली, ती काशी येथील परवांच्या परिषदेमुळें तर बरीच झाली. ह्या परिषदेंत बंगाल्यांतील दोन्ही पक्षांचीं परस्पर बरीच सहानुभूति वाढली व शिवाय निरनिराळ्या प्रांतांतील ब्राह्मांचा बराच स्नेह झाला. अशा हितकारक परिषदेची खबर अधिक पसरावी, मुंबईकडील कामाची हकीकत इकडच्या दूरदूरच्या समाजास कळवावी, ( कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज ह्यांतीलही भेद न जाणणारे कांहीं ब्राह्मण इकडे भेटले) कांहीं प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी, मुख्य मुख्य समाज समक्ष पहावे, शिवाय सर्व समाजांची एक डिरेक्टरी करावयाची आहे, त्याअर्थी कांहीं माहिती स्वतः मिळवावी वगैरे हेतूनें मी बंगाल व आसाम प्रांतांत फिरतीवर निघालों. ता. २ जानेवारी रात्रीं ११ वाजतां मी—

## बांकीपूर.

बहारप्रांतांतील मुख्य शहर येथें आलों. बांकीपूर, पाटणा व दिनापूर हीं मोठमोठीं शहरें एकमेकांला अगदीं लागूनच भागीरथीच्या कांठीं आहेत. हा देश जरी बहारी ( हिंदुस्थानी ) लोकांचा, तरी येथें बंगाली लोकांची बरीच वस्ती आहे; व सरकारी नोकऱ्या पटकावण्याच्या व विद्याव्यासंगाच्या बाबतींत ह्यांचा पुष्कळच पुढाकार आहे. अर्थात् एतद्देशीय बहाऱ्यांस हें आवडत नाहीं, हें बंगाली जाणून आहेत. वायव्येकडील प्रांतांत ज्याप्रमाणें एकही ब्राह्म एतद्देशीय सांपडणें कठीण, त्याप्रमाणेंच सबंध बहार प्रांतांतही बहारी ब्राह्मांची संख्या एकाच हाताच्या बोटावर मोजतां येण्यासारखी आहे. पण ही उणीव केवळ ब्राह्मसमाजाचीच आहे असें नव्हे. स्त्रीशिक्षणासारख्या

तोंच एक खाचर लागतें व त्यांत मस्तावलेला भात झुलत असलेला दिसतो. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती हे तीन धर्म, तुळव, मलिआळी, कानडी व कोंकणी– शिवाय मोडक्या तोडक्या इंग्रजीचे शिंतोडे रस्तोरस्तीं उडतात ते वेगळेच. अशा ह्या 'साडेचार भाषा' ह्यांतून येथील सुमारें ४० हजार लोकसंख्या बहुतेक सारखीच विभागलेली आहे. असल्या ह्या विचित्र पुरींत ऐक्य पाहूं जाणारा 'तो एक मूर्खच.' 'सारस्वत' आणि 'कोंकणी' हे अगदीं जवळचे जातभाई. पण त्यांच्यांत अगोदरच प्रेमाचा उल्हास होता त्यांत येथें जन्मास आलेल्या संयुक्त परिषदेनें फाल्गुनमासाची भर घातली आहे. जें सख्य सारस्वतांत व कोंकण्यांत तेंच येथील शेंकडों वर्षांपूर्वी क्यॉथोलिक झालेल्यांत व नुकताच बाझल मिशननें बाप्तिस्मा दिलेल्या ख्रिस्त्यांत.

## ब्राह्मसमाज.

अशा ह्या कोनाकोपऱ्यांतील शहरांतही ब्राह्मसमाजाची स्थापना होऊन ३०–४० वर्षें झालीं. कालिकतच्या बाजूनें येथें आगगाडी तर अगदीं अलीकडेच आली. तोंपर्यंत येथें यावयाचें तर जलमार्गानेंच. तोही मार्ग पावसाळ्यांत चार महिने बंद व बाकीच्या आठ महिन्यांत आतां कोठें सुखाचा झाला आहे. अशा अडचणींत ब्राह्मधर्माचें बीं कोठून व कसें येऊन पडलें व त्याचें झाड आज असें कसें फैलावलें आहे, हें एक नवलच आहे. हा सर्व इतिहास फारच मजेचा आहे. तो सर्व येथें देण्यास अवकाश नाहीं. ह्या समाजाचा वार्षिक उत्सव नुकताच साजरा करण्यांत आला. त्यांत विशेष हा कीं, येथील मंदिर लहान असून फार जुनें झालेलें होतें, तें वाढवून पुन्हां बांधण्यांत येऊन उत्सवाचे पहिले दिवशीं (सपटंबर ता० २९ रोजीं) उघडण्यांत आलें. त्या दिवशीं समाजाचे अध्यक्ष परमपूज्य रघुनाथय्या ह्यांनीं गांवांतील आमंत्रित प्रत्येक जातीच्या प्रतिनिधीच्या हातांतून अक्षता जमवून मंदिराच्या चारी बाजूला टाकल्या. त्यांत पंचम जातीचाही मनुष्य होता. ब्राह्ममंदिर हें सर्व जातींसाठीं आहे. म्हणून हें सर्वांच्या हातांनीं शुद्ध व सर्वांच्या आशीर्वादानें धन्य झालें, असा ह्या कृतीचा अर्थ होता. जुन्या मंदिराचा संकोच येथील मंडळीला बरेच दिवस भासत होता. येथील उद्योगी सेक्रेटरी रा० के० रंगराव म्हणाले, ह्याविषयीं मी किती दिवस तरी मनांत खंती बाळगीत होतों. आमच्या सार्वत्रिक ब्राह्ममंदिरापेक्षां ह्या गांवांतील नाडीवाल्या बिल्लव लोकांची भूतस्थानें ही कितीतरी विस्तीर्ण आणि सुंदर आहेत, असा मीं वेदीवर बसून कितीवेळां तरी प्रार्थनेंत व उपदेशाचे वेळीं आक्रोश केला होता. पण तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. शेवटीं मंदिराचे बाजूवील एका मोठ्या आंब्याच्या झाडालाच करुणा आली व तें अकस्मात् मंदिराच्या मुखशाळेवर कोसळून पडलें! मग काय विचारतां मंदिराचें देवानें जणू नाकच कापलें! आणि आम्हाला हें ऐसपैस नवीन मंदिर बांधावें लागलें. ह्या मंदिरासाठीं येथील वृद्धतरुण सभासदांनीं अगदीं अविश्रांत श्रम केले आहेत. आतां सुमारें ३०० जण सुखानें बसून उपासना ऐकतील असा आश्रय झाला आहे. पण झालेलें कर्ज फेडावयास व भोवतालचे कंपाउंड व आंतील सामान विकत घेण्याला अद्यापि निदान दीड हजार रुपयांची फार नड आहे. ती भागविण्यासाठीं कांहीं तरुण मंडळी रजा घेऊन बाहेरगांवीं भिक्षेस निघणार आहेत. कदाचित् मुंबईलाही एकदां येईल. कां नये येऊं? उत्सवांत नेहमींप्रमाणें सर्व प्रसंग झाल्यावर यंदां मराठींत कीर्तन झालें. येथील सारस्वत मंडळीला मराठीचा फार अभिमान वाटतो; विशेषतः बायकांना तरी गीर्वाण भाषेप्रमाणें पूज्य वाटते, म्हणून मंदिराकडे ज्यांनीं कधीं तोंडही फिरविलें नव्हतें अशा पुष्कळ स्त्रीपुरुषांची मंदिरांत कीर्तनाचे वेळीं गर्दी जमली होती.

**नये मागें पाहों वाट फिरोनिया।**
**दुसरा संगिया साह्यकारी॥**

ह्या तुकारामवचनाच्या आधारें श्रीकृष्णचरित्राचें आख्यान लावण्यांत आलें होतें. वावगें म्हणावें तर, साक्षात् श्रीकृष्णाचें चरित्र तुकारामानें गाइलेलें, चांगलें म्हणावें तर त्याचा निस्पृहपणा केवळ दुःसह होता, म्हणून जमलेली गर्दी बुचकळ्यांत पडून घरोघर गेली.

## निराश्रित साह्यकारी मंडळी.

दुसरा संगिया साह्यकारी याची वाट मागें फिरून न पाहतां अस्पृश्य वर्गाच्या उद्धारार्थ काम आज जवळ जवळ १३ वर्षें येथील ब्राह्मसमाजाचे सेक्रेटरी रा० के० रंगराव हे निश्चयानें करीत आहेत. हल्लीं तर त्यांनीं आपला २५।३० वर्षांचा वकिलीचा धंदा गेल्या आगष्टांत आवरून संपूर्णपणें अंत्यजांचीच सेवा स्वीकारली आहे. ते आपल्या कुटुंबासह आतां ब्राह्ममंदिरासमोरील प्रचाराश्रमांत येऊन राहिले आहेत, व नांवाशिवाय अनभिषिक्त प्रचारकच बनले आहेत. स्वीकारलेल्या कामांत वेळोवेळीं त्यांची मित्रमंडळी त्यांचे दोष काढीत आहेत, त्यांना सरसकट एकच उत्तर म्हणून आपल्या टेबलाजवळील भिंतीवर 'Fault finders will find fault even in Paradise.' हे वाक्य भव्य अक्षरांनीं एका तांबड्या फळीवर कोरून ठेविलेलें आहे. त्यांच्या शाळेंतील हजेरीपटावर ७३ पारियांच्या मुलांचीं नांवें आहेत. रोजची सरासरी सुमारें ६० आहे. एक मुलगा शिकून शिक्षक बनला आहे. मुलें २।३ मैलांवरून शिकावयास येतात, म्हणून त्यांस दोन-

प्रहरचें एक जेवण शाळेंत द्यावें लागतें. ६ हातमागांपैकीं ३ चांगले चालले आहेत, पण कापडाला मागणी चांगली नाहीं. कारण गिरणींतील हलक्या स्वस्त दराच्या व वरून सारखेंच दिसणाऱ्या नागपुर्डे हातमागाच्या भरींव पण महाग कापडाचा टिकाव लागत नाहीं, पण एरंडी रेशमाच्या किड्यांची लागवड करण्यांत रा० रंगरावांनीं बरेंच श्रेय व प्रसिद्धि संपादन केली आहे. कोइमतूर येथील शेतकीच्या कॉलेज्यांतून ह्या किड्यांसाठीं त्यांच्याकडे पुष्कळ मागणी येत आहे, हें रेशीम तयार करण्याचे कामीं उच्च शिक्षण मिळविण्याकरितां मि०मेलोथ नांवाच्या एका अनुभवी गृहस्थास रा० रंगरावांनीं मिशनच्या मार्फतीनें बंगाल्यांतील पुसा येथील कॉलेजांत पाठविलें आहे. मंगळूरच्या कलेक्टर साहेबांनीं ह्या कामगिरीचें महत्त्व जाणून सरकारांतून ५०० रु० देणगी देवविली आहे. रा. मेलोथ हे लवकरच परत येतील व पश्चिम किनाऱ्यावर जागजागीं मिशनचीं ठाणीं उघडण्यांत आपल्यास मदत करतील अशी रा. रंगरावांना मोठी उमेद आहे. रा. रंगरावाचें सर्वांत नांवाजण्यासारखे व मदतीस अवश्य पात्र असें काम म्हणजे मंगळूरहून एका मैलावरील एका सुपीक टेकडीवर त्यांनीं घातलेली पारियांची वसाहत होय. तेथें हल्लीं १७ कुटुंबांची कशी तरी सोय झाली आहे. पैकीं चौघांस मात्र पक्क्या इमारती मिळाल्या आहेत. बाकी तात्पुरत्या झोपड्यांत आहेत. सरकारानें इमारती लांकूड फुकट दिलें असल्यानें व मजुरी ज्याची त्यानेंच पुरवावयाची असल्यानें ३६ रुपयांत एका कुटुंबासाठीं एक पक्कें घर मिळेल अशी रंगरावांनीं सोय केली आहे ५० रु. दिल्यास दोन कुटुंबांची कायमची सोय होईल असें घर तयार होतें. एकंदर साठ कुळें राहतील एवढी जागा आहे. इकडे श्रीमंत उदार गृहस्थांचें लक्ष जाईल काय ? एक मोटारगाडी म्हणजे २०० पारियांच्या झोपड्या हें रंगरावाचें कोष्टक मुंबईचा एकादा भाटिया शिकेल तर गरिबांचें कोटकल्याण होणार आहे ! ह्या वसाहतींत दोन विहिरी काढल्या आहेत; दोन्हीसही गोडें पाणी लागलें आहे. पैकीं एकीचा खर्च सुमारें ५०० रु. अंदमान बेटांतील कैद्यांकडून मि. सदाशिव पिले नांवाच्या एका सद्गृहस्थानें जमवून दिला आहे; म्हणून तिचें नांव अंदमान विहीर असें पडलें आहे. एकूण अंदमानांतील कैद्यांना हिंदुस्थानांतील पारियांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य आहे काय !

---

# बंगालची सफर.

(सुबोधपत्रिका, २८-१-१९०६.)

ब्राह्मधर्माची परिषद १८८९ सालीं प्रथम मुंबईस भरल्यापासून एक दोन वर्षें खेरीज करून जरी सालोसाल दर कॉंग्रेसच्या वेळीं भरत आली आहे, तरी तिजसंबंधीं माहिती पुष्कळांना झालेली नव्हती. केवळ कॉंग्रेसकरितां आलेलेच लोक कायते जमत. व त्यांच्याही आठवणींत ती फार दिवस टिकत नसे. पण मुंबईस भरलेल्या १९०४ च्या परिषदेपासून हिची प्रसिद्धि होऊं लागली, ती काशी येथील परवांच्या परिषदेमुळें तर बरीच झाली. ह्या परिषदेंत बंगाल्यांतील दोन्ही पक्षांचीं परस्पर बरीच सहानुभूति वाढली व शिवाय निरनिराळ्या प्रांतांतील ब्राह्मांचा बराच स्नेह झाला. अशा हितकारक परिषदेची खबर अधिक पसरावी, मुंबईकडील कामाची हकीकत इकडच्या दूरदूरच्या समाजास कळवावी, ( कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज ह्यांतीलही भेद न जाणणारे कांहीं ब्राह्मण इकडे भेटले) कांहीं प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी, मुख्य मुख्य समाज समक्ष पहावे, शिवाय सर्व समाजांची एक डिरेक्टरी करावयाची आहे, त्याअर्थीं कांहीं माहिती स्वतः मिळवावी वगैरे हेतूनें मी बंगाल व आसाम प्रांतांत फिरतीवर निघालों. ता. २ जानेवारी रात्रीं ११ वाजतां मी—

## बांकीपूर.

बहारप्रांतांतील मुख्य शहर येथें आलों. बांकीपूर, पाटणा व दिनापूर हीं मोठमोठीं शहरें एकमेकांला अगदीं लागूनच भागीरथीच्या कांठीं आहेत. हा देश जरी बहारी (हिंदुस्थानी) लोकांचा, तरी येथें बंगाली लोकांची बरीच वस्ती आहे; व सरकारी नोकऱ्या पटकावण्याच्या व विद्याव्यासंगाच्या बाबतींत ह्यांचा पुष्कळच पुढाकार आहे. अर्थात् एतद्देशीय बहाऱ्यांस हें आवडत नाहीं, हें बंगाली जाणून आहेत. वायव्येकडील प्रांतांत ज्याप्रमाणें एकही ब्राह्म एतद्देशीय सांपडणें कठीण, त्याप्रमाणेंच सबंध बहार प्रांतांतही बहारी ब्राह्मांची संख्या एकाच हाताच्या बोटांवर मोजतां येण्यासारखी आहे. पण ही उणीव केवळ ब्राह्मसमाजाचीच आहे असें नव्हे. स्त्रीशिक्षणासारख्या

तोंच एक खाचर लागतें व त्यांत मस्तावलेला भात झुलत असलेला दिसतो. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती हे तीन धर्म, तुलव, मलिआळी, कानडी व कोंकणी—शिवाय मोडक्या तोडक्या इंग्रजीचे शिंतोडे रस्तोरस्तीं उडतात ते वेगळेच. अशा ह्या 'साडेचार भाषा' ह्यांतून येथील सुमारें ४० हजार लोकसंख्या बहुतेक सारखीच विभागलेली आहे. असल्या ह्या विचित्र पुरींत ऐक्य पाहूं जाणारा 'तो एक मूर्खच.' 'सारस्वत' आणि 'कोंकणी' हे अगदीं जवळचे जातभाई. पण त्यांच्यांत अगोदरच प्रेमाचा उल्हास होता त्यांत येथें जन्मास आलेल्या संयुक्त परिषदेनें फाल्गुनमासाची भर घातली आहे. जें सख्य सारस्वतांत व कोंकण्यांत तेंच येथील शेंकडों वर्षांपूर्वी कॅथोलिक झालेल्यांत व नुकताच बाझल मिशननें बाप्तिस्मा दिलेल्या ख्रिस्त्यांत.

## ब्राह्मसमाज.

अशा ह्या कोनाकोपऱ्यांतील शहरांतही ब्राह्मसमाजाची स्थापना होऊन ३०-४० वर्षे झालीं. कालिकतच्या बाजूनें येथें आगगाडी तर अगदीं अलीकडेच आली. तोंपर्यंत येथें यावयाचें तर जलमार्गानेंच. तोही मार्ग पावसाळ्यांत चार महिने बंद व बाकीच्या आठ महिन्यांत आतां कोठें सुखाचा झाला आहे. अशा अडचणींत ब्राह्मधर्माचें बीं कोठून व कसें येऊन पडलें व त्याचें झाड आज असें कसें फैलावलें आहे, हें एक नवलच आहे. हा सर्व इतिहास फारच मजेचा आहे. तो सर्व येथें देण्यास अवकाश नाहीं. ह्या समाजाचा वार्षिक उत्सव नुकताच साजरा करण्यांत आला. त्यांत विशेष हा कीं, येथील मंदिर लहान असून फार जुनें झालेलें होतें, तें वाढवून पुन्हां बांधण्यांत येऊन उत्सवाचें पहिले दिवशीं (सपटंबर ता० २९ रोजीं) उघडण्यांत आलें. त्या दिवशीं समाजाचे अध्यक्ष परमपूज्य रघुनाथय्या ह्यांनीं गांवांतील आमंत्रित प्रत्येक जातीच्या प्रतिनिधीच्या हातांतून अक्षता जमवून मंदिराच्या चारी बाजूला टाकल्या. त्यांत पंचम जातीचाही मनुष्य होता. ब्राह्ममंदिर हें सर्व जातींसाठीं आहे. म्हणून हें सर्वांच्या हातांनीं शुद्ध व सर्वांच्या आशीर्वादानें धन्य झालें, असा ह्या कृतीचा अर्थ होता. जुन्या मंदिराचा संकोच येथील मंडळीला बरेच दिवस भासत होता. येथील उद्योगी सेक्रेटरी रा० के० रंगराव म्हणाले, ह्याविषयीं मी किती दिवस तरी मनांत खंती बाळगीत होतों. आमच्या सार्वत्रिक ब्राह्ममंदिरापेक्षां ह्या गांवांतील ताडीवाल्या बिलव लोकांची भूतस्थानें ही कितीतरी विस्तीर्ण आणि सुंदर आहेत, असा मीं वेदीवर बसून कितीवेळां तरी प्रार्थनेंत व उपदेशाचे वेळीं आक्रोश केला होता. पण तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. शेवटीं मंदिराचे बाजूवरील एका मोठ्या आंब्याच्या झाडालाच करुणा आली व तें अकस्मात् मंदिराच्या मुखशाळेवर कोसळून पडलें! मग काय विचारतां मंदिराचें देवानें जणू नाकच कापलें! आणि आम्हाला हें ऐसपैस नवीन मंदिर बांधावें लागलें. ह्या मंदिरासाठीं येथील वृद्धतरुण सभासदांनीं अगदीं अविश्रांत श्रम केले आहेत. आतां सुमारें ३०० जण सुखानें बसून उपासना ऐकतील असा आश्रय झाला आहे. पण झालेलें कर्ज फेडावयास व भोवतालचे कंपाउंड व आंतील सामान विकत घेण्याला अद्यापि निदान दीड हजार रुपयांची फार नड आहे. ती भागविण्यासाठीं कांहीं तरुण मंडळी रजा घेऊन बाहेरगांवीं भिक्षेस निघणार आहेत. कदाचित् मुंबईलाही एकदां येईल. कां नये येऊं? उत्सवांत नेहमीप्रमाणें सर्व प्रसंग झाल्यावर यंदां मराठींत कीर्तन झालें. येथील सारस्वत मंडळीला मराठीचा फार अभिमान वाटतो; विशेषतः बायकांना तरी गीर्वाण भाषेप्रमाणें पूज्य वाटते, म्हणून मंदिराकडे ज्यांनीं कधीं तोंडही फिरविलें नव्हतें अशा पुष्कळ स्त्रीपुरुषांची मंदिरांत कीर्तनाचे वेळीं गर्दी जमली होती.

**नये मागें पाहों वाट फिरोनिया।**
**दुसरा संगिया साह्यकारी॥**

ह्या तुकारामवचनाच्या आधारें श्रीकृष्णचरित्राचें आख्यान लावण्यांत आलें होतें. वावगें म्हणावें तर, साक्षात् श्रीकृष्णाचें चारित्र तुकारामानें गाइलेलें, चांगलें म्हणावें तर त्याचा निस्पृहपणा केवळ दुःसह होता, म्हणून जमलेली गर्दी बुचकळ्यांत पडून घरोघर गेली.

## निराश्रित साह्यकारी मंडळी.

दुसरा संगिया साह्यकारी याची वाट मागें फिरून न पाहतां अस्पृश्य वर्गाच्या उद्धारार्थ काम आज जवळ-जवळ १३ वर्षे येथील ब्राह्मसमाजाचे सेक्रेटरी रा० के० रंगराव हे निश्चयानें करीत आहेत. हल्लीं तर त्यांनीं आपला २५।३० वर्षांचा वकिलीचा धंदा गेल्या आगष्टांत आवरून संपूर्णपणें अंत्यजांचीच सेवा स्वीकारली आहे. ते आपल्या कुटुंबासह आतां ब्राह्ममंदिरासमोरील प्रचाराश्रमांत येऊन राहिले आहेत, व नांवाशिवाय अनभिषिक्त प्रचारकच बनले आहेत. स्वीकारलेल्या कामांत वेळोवेळीं त्यांची मित्रमंडळी त्यांचे दोष काढीत आहेत, त्यांना सरसकट एकच उत्तर म्हणून आपल्या टेबलाजवळील भिंतीवर 'Fault finders will find fault even in Paradise.' हे वाक्य भव्य अक्षरांनीं एका तांबड्या फळीवर कोरून ठेविलेलें आहे. त्यांच्या शाळेंतील हजेरीपटावर ७३ पारियांच्या मुलांचीं नांवें आहेत. रोजची सरासरी सुमारें ६० आहे. एक मुलगा शिकून शिक्षक बनला आहे. मुलें २।३ मैलांवरून शिकावयास येतात, म्हणून त्यांस दोन-

प्रहरचें एक जेवण शाळेंत यावें लागतें. ६ हातमागां-पैकीं ३ चांगले चालले आहेत. पण कापडाला मागणी चांगली नाहीं. कारण गिरणींतील हलक्या स्वस्त दराच्या व वरून सारखेंच दिसणाऱ्या नगापुढें हातमागाच्या भरींव पण महाग कापडाचा टिकाव लागत नाहीं, पण एरंडी रेशमाच्या किड्यांची लागवड करण्यांत रा० रंगरावांनीं बरेंच श्रेय व प्रसिद्धि संपादन केली आहे. कोइमतूर येथील शेतकीच्या कॉलेज्यांतून त्या किड्यांसाठीं त्यांच्याकडे पुष्कळ मागणी येत आहे, हें रेशीम तयार करण्याचे कामीं उच्च शिक्षण मिळविण्यारितां मि०मेलोथ नांवाच्या एका अनुभवी गृहस्थास रा० रंगरावांनीं मिशनच्या मार्फतीनें बंगाल्यांतील पुसा येथील कॉलेजांत पाठविलें आहे. मंगळूरच्या कलेक्टर साहेबांनीं ह्या कामगिरीचें महत्त्व जाणून सरकारांतून ५०० रु० देणगी देवविली आहे. रा. मेलोथ हे लवकरच परत येतील व पश्चिम किनाऱ्यावर जागजागीं मिशनचीं ठाणीं उघडण्यांत आपल्यास मदत करतील अशी रा. रंगरावांना मोठी उमेद आहे. रा. रंगरावाचें सर्वांत नांवाजण्यासारखे व मदतीस अवश्य पात्र असें काम म्हणजे मंगळूरहून एका मैलावरील एका सुपीक टेकडीवर त्यांनीं घातलेली पारियांची वसाहत होय. तेथें हल्लीं १७ कुटुंबांची कशी तरी सोय झाली आहे. पैकीं चौघांस मात्र पक्क्या इमारती मिळाल्या आहेत. बाकी तात्पुरत्या झोपड्यांत आहेत. सरकारानें इमारती लांकूड फुकट दिले असल्यानें व मजुरी ज्याची त्यानेंच पुरवावयाची असल्यानें ३६ रुपयांत एका कुटुंबासाठीं एक पक्कें घर मिळेल अशी रंगरावांनीं सोय केली आहे ५० रु. दिल्यास दोन कुटुंबांची कायमची सोय होईल असें घर तयार होतें. एकंदर साठ कुळें राहतील एवढी जागा आहे. इकडे श्रीमंत उदार गृहस्थांचें लक्ष जाईल काय ? एक मोटारगाडी म्हणजे २०० पारियांच्या झोपड्या हें रंगरावाचें कोष्टक मुंबईचा एकादा भाटिया शिकेल तर गरिबांचें कोटकल्याण होणार आहे ! ह्या वसाहतींत दोन विहिरी काढल्या आहेत; दोन्हींसही गोडें पाणी लागलें आहे. पैकीं एकीचा खर्च सुमारें ५०० रु. अंदमान बेटांतील कैद्यांकडून मि. सदाशिव पिले नांवाच्या एका सद्गृहस्थानें जमवून दिला आहे; म्हणून तिचें नांव अंदमान विहिर असें पडलें आहे. एकूण अंदमानांतील कैद्यांना हिंदुस्थानांतील पारियांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य आहे काय !

---

# बंगालची सफर.

(सुबोधपत्रिका, २८-१-१९०६.)

ब्राह्मधर्माची परिषद १८८९ सालीं प्रथम मुंबईस भरल्यापासून एक दोन वर्षे खेरीज करून जरी सालोसाल दर कॉंग्रेसच्या वेळीं भरत आली आहे, तरी तिजसंबंधीं माहिती पुष्कळांना झालेली नव्हती. केवळ कॉंग्रेसकरितां आलेलेच लोक कायते जमत. व त्यांच्याही आठवणींत ती फार दिवस टिकत नसे. पण मुंबईस भरलेल्या १९०४ च्या परिषदेपासून हिची प्रसिद्धि होऊं लागली, ती काशी येथील परवांच्या परिषदेमुळें तर बरीच झाली. ह्या परिषदेंत बंगाल्यांतील दोन्ही पक्षांचीं परस्पर बरीच सहानुभूति वाढली व शिवाय निरनिराळ्या प्रांतांतील ब्राह्मांचा बराच स्नेह झाला. अशा हितकारक परिषदेची खबर अधिक पसरावी, मुंबईकडील कामाची हकीकत इकडच्या दूरदूरच्या समाजास कळवावी, (कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज ह्यांतीलही भेद न जाणणारे कांहीं ब्राह्मण इकडे भेटले) कांहीं प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी, मुख्य मुख्य समाज समक्ष पहावे, शिवाय सर्व समाजांची एक डिरेक्टरी करावयाची आहे, त्याअर्थी कांहीं माहिती स्वतः मिळवावी वगैरे हेतूनें मी बंगाल व आसाम प्रांतांत फिरतीवर निघालों. ता. २ जानेवारी रात्रीं ११ वाजतां मी—

## बांकीपूर.

बहारप्रांतांतील मुख्य शहर येथें आलों. बांकीपूर, पाटणा व दिनापूर हीं मोठमोठीं शहरें एकमेकांला अगदीं लागूनच भागीरथीच्या कांठीं आहेत. हा देश जरी बहारी (हिंदुस्थानी) लोकांचा, तरी येथें बंगाली लोकांची बरीच वस्ती आहे; व सरकारी नोकऱ्या पटकावण्याच्या व विद्याव्यासंगाच्या बाबतींत ह्यांचा पुष्कळच पुढाकार आहे. अर्थात् एतद्देशीय बहाऱ्यांस हें आवडत नाहीं, हें बंगाली जाणून आहेत. वायव्येकडील प्रांतांत ज्याप्रमाणें एकही ब्राह्म एतद्देशीय सांपडणें कठीण, त्याप्रमाणेंच सबंध बहार प्रांतांतही बहारी ब्राह्मांची संख्या एकाच हाताच्या बोटावर मोजतां येण्यासारखी आहे. पण ही उणीव केवळ ब्राह्मसमाजाचीच आहे असें नव्हे. स्त्रीशिक्षणासार...

सर्वमान्य सामाजिक सुधारणेंतही इकडे महागाई फार आहे. बांकीपूर येथें एक मुलींचें खासगी हायस्कूल आहे तें मूळ बंगाल्यांनींच काढिलें हल्लीं एकंदर सुमारें १०० मुलींपैकीं बहारी मुली ४ च आहेत. बाकीच्या बंगाली मुलींपैकीं २४ ब्राह्मांच्या आहेत. सर्व स्त्री व पुरुषशिक्षक ब्राह्मच आहेत. ह्या शाळेची व्यवस्था बहुतेक येथील प्रमुख ब्राह्मांच्याच हातीं आहे. ह्याचें श्रेय येथील वृद्ध पेन्शनर आचार्य बाबू प्रकाशचंद्र राय, व विशेषें-करून त्यांची परलोकवासी पत्नी अघोरकामिनी ह्यांजकडे आहे. मध्यें एकदां ही शाळा मोडकळीस आली असतां अघोरकामिनीनें सर्व व्यवस्था आपल्याकडे घेतली व शाळा हायस्कूलच्या दर्जास आणून सोडिली. ब्राह्मसमाजाच्या दृष्टीनें पाहतां कलकत्त्याच्या खालीं डाक्का व त्याचे खालीं बांकी-पूरचाच नंबर लागतो. येथें जरी दोन पक्षाचे हल्लीं दोन समाज आहेत तरी परस्पर बरीच सहानुभूति आहे व ती वाढत्या कलेवर आहे. तथापि अगदींच भेद मिटून पूर्ण ऐक्य होण्याची नुसती आशा देखील तूर्त दिसत नाहीं. मात्र दोन्ही पक्षांकडून प्रामाणिकपणें यत्न होत आहे.

## बांकीपूर ब्रह्मसमाज.

हा नवविधान पक्षाचा आहे. हा सन १८६६ मे ता. २४ दिवशीं स्थापण्यांत आला. ह्यापूर्वी एकदां केशवचंद्र ह्यांनीं येथें येऊन एका व्याख्या-नानें सर्व प्रदेश दणाणून सोडला असें सांगतात. हल्लीं ह्या समाजांतील उपासकांची संख्या स्त्रीपुरुष व मोठीं मुलें मिळून सुमारें ५० आहे. शिवाय हितचिंतक. हल्लीं जुनें मंदिर पाडून नवीन बांध-ण्याचें काम चालू आहे. अघोरकामिनीच्या परिश्र-मानें स्थापन झालेल्या दोन संस्था हल्लीं तिच्या नांवानें चालू आहेत. अघोर नारी समिति नांवाची सभा स्त्रियांच्या उन्नतीसाठीं व इतर परोपकाराचीं कामें करीत आहे. अघोरपरिवार नांवाचें सुमारें १०।१२ लहान मुलींचें बोर्डिंग बाबू गौरीप्रसाद मुजुमदार व त्यांची पत्नि ह्यांचे व्यवस्थेखालीं आहे. शिवाय कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरितां एक बोर्डिंग आहे त्यांत हल्लीं ११ विद्यार्थी राहत आहेत. हे जरी ब्राह्म नाहींत तरी त्यांस ब्राह्मधर्माचेंच वळण लागत आहे.

## बांकीपूर ब्राह्म कांग्रिगेशन.

हें साधारण समाजपक्षाचें आहे. सुमारें १८९६ चे सुमारास कलकत्त्याच्या साधनाश्रमांतून भाई प्रकाशदेव, सुंदरसिंग, गुरुदास चक्रवर्ती, सतीश-चंद्र चक्रवर्ती, एम्. ए. व श्रीरंग बिहारीलाल, एम्. ए. असे पांचजण केवळ ईश्वरावर भरंवसा ठेवून धर्मप्रचारार्थ निघाले ते वाटेंत बहारप्रांतीं आरा येथें उतरले व तेथें त्यांनीं एक साधनाश्रम स्थापिला. सन १८९६ आगष्ट महिन्यांत तो आश्रम आरा येथून बांकीपूर येथें नेण्यांत आला. तेव्हांपासून ह्या समाजाची सुरुवात झाली. सुंदर-सिंग परलोकीं गेले, भाई प्रकाशदेव ह्यांनीं लाहो-रास ठाणें दिलें व मागें राहिलेल्या तिघांनीं जिवा-पाड श्रम करून नांवाजण्यासारखीं कामें उभारलीं आहेत. ह्यांचें स्वतःचें अद्यापि मंदिर नाहीं. प्रचारक गुरुदास चक्रवर्ती ह्यांचे घरींच समाज दर रविवारीं सायंकाळीं भरतो. हल्लीं ब्राह्मउपासकांची संख्या स्त्रिया, पुरुष व मुलें मिळून एकंदर ६० आहे.

राममोहनराय सेमिनरी ही १८९७ जानेवारी ता. १ रोजीं स्थापिली. ह्या शहरीं हे एक पहिल्या नंबरचें हायस्कूल झालें आहे. लोक व सरकारी अधिकारी ह्या दोघांच्याही आदरास तें पात्र झालें आहे. शाळेस एक भक्कम व पुरेशी इमारत स्वतःच्या मालकीची आहे. व तिच्या भोंवतीं विस्तीर्ण पटांगण व कंपौंड आहे. मुलांची संख्या १०९ आहे. शाळेंतच ब्राह्ममुलांकरितां एक बोर्डिंग आहे. प्लेग-मुळें बोर्डिंगांत मुलांची संख्या फार कमी झाली आहे. हल्लीं ६ मुलें आहेत, पैकीं २ च ब्राह्म आहेत. पण बाकीच्या चौघांस पूर्ण रीतीनें ब्राह्म वळण लावण्याचे अटीवरच घेण्यांत आलें आहे. ह्या शाळेची इमारत विकत घेण्याचे बाबतींत बरेंच कर्ज झालें होतें तें शेठ दामोदरदास **गोवर्धनदास** ह्यांच्या उदार देणगीनें फेडण्यांत आलें. ह्या बाबतींत चालक मंडळींनीं फार फार आभार प्रदर्शित केले. ह्याशिवाय एक स्त्रियांची सभा, एक आदित्यवारचा लहान मुलांचा वर्ग आणि तरुण ब्राह्मगण अशा संस्था आहेत. गरीब लोकांकरितां एक रात्रीची शाळा आहे. दुष्काळांत व विशेषेंकरून प्लेगमध्यें आश्रमानें फार मेहनत घेतल्यामुळें प्रचारक मंडळीचें बरेंच वजन आहे.

ह्याशिवाय बहारी यंग मेन्स इन्स्टिट्यूट नांवाची संस्था ह्यांच्याच हाताखालीं आहे.

ता. ३ रोजीं अघोरपरिवारांत उपासना चालविली. ता. ४ रोजीं सायंकाळीं बाबू प्रकाशचंद्र राय ह्यांचे घरीं दोन्ही पक्षांची प्रमुख मंडळी जमली. मीं प्रथम मुंबईकडची सर्व हकीकत सांगितली. नंतर दोन पक्षांचें एकत्र कार्य कसें होईल ह्याविषयीं संभाषण चाललें. प्रकाशचंद राय हे जरी पक्के नवविधानी आहेत तरी ह्यांचा दोघांसही एकत्र आणण्याचा प्रयत्न आहे. शेवटीं उत्सवांत एकमेकांनीं कार्यक्रम मिळून ठरवावा व एकमेकांच्या उपासनेस वगैरे पाळीपाळीनें जावें असें ठरलें. ता. ५ रोजीं दोहींकडील स्त्रियांची सभा मि. दास बारिस्टर ह्यांचे घरीं जमली होती. पोस्टल मिशन, डोमेस्टिक् मिशन, सामाजिक मेळा वगैरे कामें स्त्रियांनीं कशीं करावयाचीं आहेत ह्याविषयीं बोललों. मुलींना देखील माझें इंग्रजी भाषण कळलें. हेमंतकुमारी चौधरी शिलहतहून कॉन्फरन्सला आलेल्या डेलिगेटही त्यावेळीं हजर होत्या. त्यांनीं हिंदींत भाषण केलें.

## मोंगीर.

ता. ६ रोजीं दोनप्रहरीं येथें आलों. मोंगीर थीचे तटीं हें मोठें रमणीय स्थान आहे. विशेषें करून जुन्या किल्ल्यांतील भाग मनोहर आहे. इंग्रज पाठलाग करीत असतां मीरकाशीम ह्यांनीं येथेंच शेवटचें ठाणें दिलें होतें. पुराणांतील राजा दानशूर कर्ण ह्याची दान देण्यास बसण्याची जागा गंगेच्या तिरावर एका लहानशा उंचवट्यावर अद्यापि दाखविण्यांत येते. हल्लीं ह्या ठिकाणीं बेद रामपूरच्या जमीनदारानें आपला सुंदर महाल 'कर्णचौडा' बांधला आहे. येथून पुढें गंगाजीचें विस्तीर्ण व बांकदार पात्र व माठोमोंगीर गांवां भोंवतालच्या टेंकड्यांची अर्धगोल रांग व त्यावरची दूर क्षितिजांत दिसणारीं सुपारीचीं झाडें ह्या सर्वांचा एकंदर देखावा प्रेक्षकांचें मन दंग करून टाकतो. एका फ्रेंच प्रवाशानें तर ह्या देखाव्यास अगदीं अप्रतिम असें शिफारसपत्र दिल्याचें ऐकण्यांत आलें.

असो. ब्राह्म यात्रेकरूंस ह्या स्थळाचें महत्त्व असें सांगण्यांत येतें कीं, ब्राह्मसमाजांत भक्तिसंप्रदाय जो सुरु झाला तो मूळ ह्या ठिकाणीं. सन १८६८ च्या सुमारास ई. आय. रेलवेचे ऑडिट ऑफीस जेव्हां कलकत्त्याहून मोंगीरजवळ जमालपूर येथें आणिलें तेव्हां त्यांतील ४।५ ब्राह्म कारकून मोंगीर येथें राहूं लागले. पुढें त्यांच्या श्रमानें येथील समाज स्थापण्यांत आला व नंतर १८७२ त हल्लींचें मंदिर बांधण्यांत आलें. मंदिरांत एकदां कांहीं वैष्णव मंडळीस भजनास बोलाविलें होतें. त्यांपैकीं एका चांडाळ जातीच्या भक्तानें इतकें प्रेमळ व आवेशयुक्त भजन केलें कीं त्याचा मंडळीवर विलक्षण परिणाम झाला. पुढें साधू अघोरनाथ ब्राह्मप्रचारक ह्यांचें भजनाविषयीं प्रेम अधिकाधिक वाढून शेवटीं स्वतः केशवचंद्रसेन एकदां येथें असतां त्यांच्यावरही भजनाचा परिणाम घडला, व येथें समाजाचें कार्य बरेंच वाढलें. पुढें हा भक्तीचा वेग जरी सर्व ब्राह्मसमाजांत पसरला आणि मोंगीर समाजांत एका काळीं ४० । ५० सभासद होते तरी हल्लींची येथली ओसाड व दीनवाणी स्थिति पाहून अंतःकरण गहिंवरतें व मानवी मनाची अस्थिरता पाहून विस्मयतें. मंदिरापुढील पटांगणांत केशवचंद्रसेन, साधु अघोरनाथ, दीनानाथ चक्रवर्ती प्रचारक ह्यांच्या तीन समाधी मध्यभागीं एका चौथऱ्यावर बांधल्या आहेत. मंदिराकडे पाहून व इतिहास ऐकून मनास जी उदासीनता प्राप्त होते तिच्याच जणूं ह्या तीन दृश्य मूर्ती.

पुढें लवकरच कर्ताभजा मंडळीचा कोणी एक पुरुष ह्या गांवीं आला. इकडे ह्या नांवाची एक ईश्वराच्या कर्तृत्व गुणाची उपासक मंडळी आहे. ह्यांचें लक्षण जवळ शाक्तमार्गीयांप्रमाणेंच असावेंसें वाटतें. केवळ मनोविकारालाच वश होऊन समाजांत आलेली कांहीं नादलुब्ध मंडळी वरील पुरुषाच्या नादीं लागली. सुमारें १८८० सालीं कृष्ण प्रसन्नसेन नांवाच्या समाजांतील एका हितचिंतकानें सनातनधर्म मंडळीची नवीनच एक ध्वजा उभारली. ह्याप्रकारें मंडळी कमी होतां होतां शेवटीं मध्यें ऑडिट् आफीसही पुनः पूर्वस्थळीं गेलें. १९०२ त ह्या गांवीं आर्यसमाजाची स्थापना झाली पण तोही नीट चालत नाहीं. हल्लीं मंदिरांत फार तर ३।४ जण उपासनेस जमतात. बागची बाबू (द्वारकानाथ बागची) नांवाचे एक वृद्ध गृहस्थ मंदिरांतच असतात. कुचबिहारच्या महाराजांकडून त्यांस दरमहा ४ रु. मिळतात. आपल्या पित्याच्या

समाधीपुढें दिवा लावण्याकरितां म्हणून महाराणी दरमहा ३ रु. देते.

येथील कॉलेजांतील एक तरुण प्रोफेसर बाबू सुरेशचंद्रराय हे सभासद आहेत व दुसरे एक बोर्डिंग सुपरिंटेंडंट हितचिंतक आहेत. त्यांच्याशीं व इतर कांहीं मंडळीशीं दोनप्रहरीं संभाषण झालें व येथील तरुण विद्यार्थ्यांकरितां कांहीं धार्मिक संस्था काढावी असें ठरलें. ह्यानंतर

## भागलपूर

येथें ता.७ रोजीं आदित्यवारीं ७॥ वाजतां पोहोंचलों. एकांतस्थळीं एक लहानसें पण सुंदर मंदिर आहे. उपासना संपत आली होती. स्त्रियापुरुष मिळून उपासक १०।१२ होते. दुसरे दिवशीं सकाळीं आचार्य हरीसुंदर बोस ह्यांचे घरीं केशवचंद्रसेन ह्यांच्या पुण्यतिथीसंबंधीं उपासना त्यांनींच चालविली. येथील प्रमुख लोकांचा विशेष कल जरी नवविधान पक्षाकडे आहे तथापि मंत्री बाबु निवारणचंद्र मुकरजी हे फार समजुतदार व वजनदार असल्यानें समाजाचें एकंदरींत धोरण अगदीं तिऱ्हाईतपणाचें आहे. आनुष्ठानिक ब्राह्मउपासकांची एकंदर संख्या सुमारें ६० व इतर ५ आहे.

हा समाज ता. २२ माहे फेब्रुवारी सन १८६४ रोजीं, विशेषेंकरून बाबु ब्रजकृष्ण बसू व नवकुमार राय ह्यांच्या प्रयत्नानें व प. वा. प्रतापचंद्र मुझूमदार ह्यांच्या सल्ल्यानें स्थापित झाला. राजा शिवचंद्र बानर्जी नांवाच्या एका अत्यंत आस्थेवाईक हितचिंतकानें स्वतः सर्व खर्च सोसून मंदिर बांधविलें तें केशवचंद्र ह्यांचे हस्तें ता. २२ फेब्रुवारी १८८० रोजीं उघडण्यांत आलें. ह्याचे पूर्वी सन १८७८ सालीं ह्या जागेला लागूनच एक भली मोठी जागा विकत घेऊन त्यांत ५ ब्राह्म कुटुंबांनीं आपलीं राहण्याचीं मोठमोठीं घरें बांधलीं.

समाजांत थोडीका होईनात पण बडीबडी प्रमुख व वृद्ध मंडळी आहेत. पण उपासनेशिवाय दुसरें कांहीं काम होत नाहीं. संगतसभा, बायकांची सभा, तरुण ब्राह्मगण, मुलांसाठीं शाळा, सामाजिक मेळे वगैरे बरेच सुखसोहळे उपभोगून हा समाज आतां शांत झाला आहे. ता. ९ रोजीं सायंकाळीं सुमारें ५।६ तरुण पदवीधर ब्राह्म मंडळीपुढें मुंबईच्या तरुण ब्राह्मगणांचे छापील नियम वाचून दाखविले व विचाराअंतीं यथील पूर्वीची तरुणांची संस्था पुनः सुरू करण्याचें ठरलें. ह्यानंतर रात्रीं ७ वाजतां बाबू निवारणचंद्र मुकर्जी ह्यांचे घरीं प्रमुख मंडळी जमली त्यापुढें मीं मुंबईकडील कामाची हकीकत सांगितली. बहुतेकांस ती नवीनच असल्यानें ऐकून फार समाधान झालें व दोघांनीं तर वारंवार अशी इच्छा प्रदर्शित केली कीं मुंबई व बंगालप्रांतांतील ब्राह्मांचे अधिक निकट संबंध जुळविणें फार इष्ट आहे व त्याकरितां परस्पर विवाह-व्यवहार करणें, अवश्य आहे. मीं म्हटलें कीं, निरनिराळ्या प्रांतांतील ऐपतदार ब्राह्म गृहस्थांनीं सहकुटुंब निरनिराळ्या प्रांतांत प्रवास केल्याविना वरील विवाह-व्यवहार कधींही शक्य होणार नाहीं आणि अशा प्रवासामुळें सर्व पक्षीं अत्यंत हित होणार आहे. नवविधान व साधारण समाज ह्यांतील दुहीसंबंधानें मुंबईकडील समाजांचें अगदीं तिऱ्हाइतपणाचें वर्तन पाहून इकडील पुष्कळ ठिकाणच्या दोहों पक्षांच्या कट्टया अभिमान्यांसही बरें वाटतें हें मोठें सुचिन्ह आहे.

ता. १० सकाळीं मी कुचबिहारकडे निघालों. भागलपुराजवळ वाळवंट व प्रवाह मिळून गंगेचें ७ मैल अफाट पात्र आहे. तें आगगाडी व आगबोटींतून ओलांडलें. पुढें दोनप्रहरीं

## काठीहार

म्हणून रेलवेचें जंक्शन लागलें तेथें माझ्या गाडीला बराच अवकाश होता. ह्या ठिकाणीं मागें एक समाज होता असें नुसतें भागलपुरास ऐकलें होतें. त्यासंबंधीं कांहीं शोध लागल्यास घ्यावा म्हणून सामान स्टेशनावर ठेवून गांवांत गेलों. ह्या गांवास रेलवे जंक्शनमुळेंच महत्त्व आलें असल्यामुळें चहूंकडे बकाली वस्तीच होती. बरीच चौकशी केल्यावर मंदिराचा पत्ता लागला. समारें २५ फूट लांब व १५ फूट रुंद एक चांगली पक्की चुनेगची इमारत आहे. पण काम मध्येंच बंद पडल्यामुळें दारें व खिडक्या मात्र लावावयाच्या आहेत आणि तेव्हांपासून ही इमारत अशीच बेवारशी उघडी पडल्यामुळें हिला अकालीं जीर्णावस्था आलेली पाहून फार वाईट वाटलें आणि हें मुक्तद्वार गौड बंगाल आहे तरी काय ह्याचा पत्ता लावावा म्हणून मी रात्रीपर्यंत राहिलों. शेजारच्या एका मुसलमान गृहस्थानें सांगितलें कीं, बहुतेक

तयार झालेली ही इमारत अशी अनाथ पडल्यामुळें हिचा क्वचित् प्रसंगीं अत्यंत खेदजनक दुरुपयोग होतो.

रात्रीं एका जुन्या माहितगाराचा, तेथील हेडमास्तरच्या साहाय्यानें पत्ता लागला. एका खोलींत चार रेलवेनोकर कामावरून दमून येऊन करमणुकीसाठीं बुद्धिबळें खेळत होते. अशांत माझी त्यांची अवचित मुलाखत करण्यांत आली. शेवटीं माहिती मिळाली कीं सन १८८७ सालीं कांहीं रेलवेंतील ब्राह्म नोकरांनीं विशेषकरून जानकीनाथ गांगोली व रखलदर्श चाटर्जी ह्यांच्या प्रयत्नानें येथें समाज स्थापन झाला. त्यावेळीं १० समासद होते. १८९९ सालीं हल्लींची इमारत बांधण्यास सुरवात झाली. ८०० रु. चें काम झालें. आणखी १००।२०० रुपयांत काम पुरें होण्यासारखें आहे. पण इतक्यांत येथील रेलवेआफीस एकदम कलकत्ता येथें गेल्यामुळें येथें एकही ब्राह्म उरला नाहीं. इमारत तशीच पडली आहे. येथपर्यंत हकीकत ऐकत असतांना ह्या इमारतीप्रमाणेंच बुद्धिबळाचा डावही अगदीं बहारांत आलेला तसाच तहकुब पडला होता. मीं मंडळीस म्हटलें—दिवसभर काम करून तुम्हांला रात्रीं करमणूक अवश्य आहे पण करमणूक होऊन शिवाय आत्म्याला थोडी बहुत उन्नति व शांति मिळाल्यास कसें ? आणि ह्यासाठीं तुम्हाला ही इमारत पूर्ण करून वहिवाटीस मिळाल्यास कसें ? मात्र एकच अट कीं ह्याठिकाणीं जें भजन होईल तें केवळ एकच ईश्वरास उद्देशून व हिंदू मुसलमान इ. कोणाही धर्मीयांस चालेल असें झालें पाहिजे. संभाषणाअंतीं मंडळीस कल्पना पूर्ण पसत पडली. मंदिर उपयोगास मिळाल्यास बिच्छायतीचा व दिवाबत्तीचा खर्चही सोसण्यास मंडळी तयार झाली. पण मंदिर पूर्ण व्हावें कसें ?

येथून १८ मैलांवर पूर्णीया हें जिल्ह्याचें गांव आहे. येथें बाबू हजारीलाल नांवाचे आस्थेवाईक ब्राह्म गृहस्थ असतात. कॉन्फरन्समध्यें त्यांची ओळख झाली होती. पूर्णीयाकडे आगगाडी रात्रीं १० वाजतां निघाली. तींतून निघून रात्रीं सुमारे १वाजतां

## पूर्णीया

येथें बाबु मजकुरांचे घरीं पोहोंचलों. आकस्मित् येथें आलेले तारकनाथराय नांवाचे आस्थेवाईक ब्राह्म मित्राची गांठ पडली. दोघांस हेतू कळविला. पूर्वीच्या फंडापैकी २०० रु. अद्यापि शिल्लक आहेत असें कळलें. विचार ठरल्यावर झोंपीं गेलों. पूर्णीया येथें समाज आहे, मंदिर नाहीं. दोनच आनुष्ठानिक ब्राह्म कुटुंबें आहेत. प्रातःकाळीं दुसऱ्या कुटुंबांत उपासना झाली. दोनप्रहरीं आम्ही चौघेजणही पुनः काठीहार येथें गेलों. सायंकाळीं तेथील हायस्कुलांत व्याख्यान झालें. येथील मुख्य अधिकारी मुनसफ एक उदार मताचे मुसलमान बॅरिस्टर गृहस्थ आहेत. त्यांनीं आपल्याच सहीनिशीं सर्व रेलवेवरच्या नोकर लोकांस आमंत्रणपत्रिका पाठविली. व अध्यक्षस्थानही पतकरलें. ह्या कामीं येथील तरुण हेडमास्तरांनीं मोठ्या उत्साहपूर्वक साहाय्य केलें. व्याख्यानानंतर बाबू हजारीलाल हे येथील कांहीं मंडळीच्या सल्ल्यानें बाकी उरलेल्या शिलकेंतून मंदिर पुरें करून देण्याचें ठरवून नंतर पूर्णीयाकडे निघाले आणि मीं रात्रीं १ वाजतां कुचबिहाराची वाट पुनः धरली.

ह्याप्रकारें बहारप्रांतांतील काम झाल्यावर मीं श्रीगंगेचा निरोप घेऊन तिचा पिता जो पर्वतराज हिमाचल त्याचे चरणांगुलीवर विराजमान झालेली वनश्रीची जणूं माहेरकडची जिवलग सखी जी कुचबिहार नगरी तिच्या आंत सायंकाळच्या शांत समयीं अत्यादरपूर्वक प्रवेश केला.

## कुचबिहार.

बहार सोडून बंगाल्यांत शिरल्यावर भोंवतालच्या देखाव्यांत हळू हळू पालट होतो. गीतलदाहा जंक्शनवर रेलवेचा मुख्य रस्ता सोडून कुचबिहार संस्थानच्या लहानशा गाडीचा आश्रय करावा लागतो. सडक अरुंद आणि मुंड्सपाट, डबे चिमुकल, एंजिन तर घरच्या मांजराप्रमाणें माणसाळलेलें, स्थानगृहें अगदीं खोपटवजा, स्टेशनमास्तर व गार्ड वगैरे अधिकारी ह्यांची मुद्रा व पेहरावही अगदीं साधे घरगुती, एकंदरींत जी. आय. पी. सारखा आढ्यतेचा व भोळ्यांना भेवडावणारा सरंजाम व फाजील धडपड कोठेंच दिसत नव्हती हें पाहून मन किंचित् विसवलें. भोंवतालचा प्रदेश सौम्य, अफाट आणि अगदीं रूळ फिरविल्यासारखा सपाट, त्यांत मधून मधून वेळुचीं बनें, केळीचे कुंज आणि पोफळीच्या राया—फार काय सांगावें, श्रीमान् हिमाचलाचेंच तें प्रत्यक्ष आंगण मोठ्यांच्या घरीं प्रवेश करावयाचा तो विनम्रभावा-

नेंच केला पाहिजे. कोठें त्या विभूतांची दैवी थोरवी, कोठें आम्हां मानवी किड्यांची क्षुद्र आल्पता! म्हणून कुचबिहार स्टेट रेलवेची हीनता व एकंदर संस्थानाची साधी राहटी अगदीं योग्य होती.

ह्या संस्थानची हद्द भूतानच्या हद्दीला लागूनच आहे. येथील मूळचे रहिवाशी जे अर्धवट जंगली लोक शेतकी करून आहेत त्यांची सांपत्तिक हद्दही कंगालपणाच्या शिवेला लागूनच आहे. ह्यांच्या चेहऱ्यांत आर्यछायेपेक्षां मोंगली छाया अधिक दिसते. कुचबिहारचें राजघराणें ह्याच जगली जातीचें आहे. राजा, प्रजा व मानकरी मंडळ हे सर्व एक जात असून, ह्यांचे दरम्यान अधिकारी वर्ग मात्र कारकुनापासून तों थेट दिवाणापर्यंत बंगाली बाबूंचाच आहे. आणि मनुष्यस्वभावास अनुसरून ह्यांचे एतद्देशियांशीं प्रसंगीं अरेरावीचें वर्तन पाहून किंचित् कौतुकच वाटतें. हें संस्थान उत्पन्नाच्या मानानें पाहतां जवळ जवळ आमच्या कोल्हापुराइतकें आहे. पण बंगाल्यांत हें पहिल्या प्रतीचें गणलें जाऊन शिवाय ब्रिटिश सरकारच्या मर्जींतलें असाविसें दिसतें. हल्लींचा राजा तर अगदीं इंग्रजी तालमींत वाढला असल्यामुळें पक्का 'जंटल्मन' बनला आहे. व्हॉइसरायचे दरबारीं आणि प्रत्यक्ष बादशहाच्या घरीं परलोकवासी महाराणीच्या वेळेपासून ह्यांच्या कुटुंबांतील माणसांचा फार घरोबा आहे, इतका कीं, एका कुमाराचे नांव प. वो. आजीबाईनें आपलें स्वतःचें नांव व्हिक्टर असें ठेवलें आहे. इंग्रजसरकारच्या वजनामुळें व येथील बरेच दिवस काम पाहत असलेल्या हुषार व अनुभवी दिवाणाच्या दक्षतेमुळें संस्थानची बरीच सुधारणा होत आहे. येथ एक एम्. ए. पर्यंतचें पूर्ण दर्जाचें कॉलेज आहे. त्यांत सुमारें ३०० विद्यार्थी आहेत; आणि फी तर सपशेल माफ आहे! शिवाय एतद्देशीय विद्यार्थ्यांसाठीं एक फुकट बोर्डिंग आहे या मोफत छात्रालयांत सुमारें ३० विद्यार्थ्यांची सोय आहे. असें उदाहरण दुसरीकडे कोठें मिळेलसें वाटत नाहीं. असो. ह्याप्रकारें राजघराण्यावर व संस्थानच्या कांहीं खात्यांमध्यें पाश्चात्य सुधारणेचे परिणाम घडलेले दिसतात तरी प्रत्यक्ष कुचबिहार नगरावर व त्यांतील अस्सल प्रजेवर अद्यापि हिमालयाचेंच पुरातन साम्राज्य चालू आहे, व तें यावचंद्रदिवाकरौ चालण्यासारखें स्वतः हिमालयाइतकेंच स्थिर व गंभीर आहे. राजाचा महाल, चार बऱ्या लोकांचीं घरें आणि कांहीं ठळक ठळक सरकारी इमारती आणि एका कालीचें संस्थानचें देऊळ इतकींशिवायकरून गांवांतील बाकी सर्व लहान-मोठ्यांचीं घरें म्हणजे खरोखर अक्षरशः झोंपड्याच. गांवाकडे नजर फेंकल्याबरोबर असें वाटतें कीं, केळी-पोफळीच्या एका विस्तीर्ण व सुंदर बनांत एकांत जागा पाहून आधुनिक सुधारणेच्या प्लेगाला कंटाळून जणूं एक सेग्रिगेशन कँपच बांधलें आहे. रुंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनीं ह्या बांबूच्या झोंपड्या, दरम्यान बरीचशी मोकळी जागा टाकून हारीनें बांधलेल्या दिसतात. प्रथम सुमारें ३ फूट उंचीचा ओटा बांधून त्यावर झोंपडी उभारलेली असते. तिची जमीन वेळूची, भिंती वेळच्या, वरचें छत व छप्पर वेळूचें, आंतील सामान वेळचें आणि बाहेरील भक्कम कँपौंडही वेळूचेंच. ह्याचीं कारणें पुष्कळ आहेत. एक तर लोक गरीब आणि अल्पसंतुष्ट. दुसरें, देश दलदलीचा, सर्द व अति पावसाचा. तिसरें, घरें बांधण्यास दगड किंवा चिखल दोन्ही मिळत नाहींत. जमीन राखेच्या रंगाच्या बारीक व मऊ रेतीची; तिच्या विटाही बनत नाहींत. बरें, इतक्यालाही न जुमानतां आळ्यतेनें जर का एकादें पक्कें घर उभारलें, तर हिमालयबोवा वरचेवर भूकंपाचे धक्के देऊन जागे करण्यास तयार आहेतच. उलट पक्षीं अशा दलदलीच्या जागीं अशीं वेळूचीं घरेंच राहण्याला सोईस्कर व आरोग्यकारक आहेत; आणि म्हणूनच, राजाचा सुमारें १३ लक्षांचा सुंदर व भव्य प्रासाद व भोंवतालचा विस्तीर्ण बाग पाहून बाहेर राजरस्त्यांत प्रेक्षक येतो, तोंच दुतर्फा सेग्रिगेशन कँप पाहून त्याचा आधीं बराच हिरमोड होतो; आणि मग, ही साधी रहाणीच बरी, हा वाडा काय तीन दिवसांचा, इ. नाइलाजाचें तत्त्वज्ञान मागून सुचूं लागतें.

असो; ब्राह्मयात्रेकरूंस कुचबिहारचें महत्त्व कोणतें बरें? कुचबिहारचें नांव माहित नाहीं असा कोणीतरी ब्राह्म असूं शकेल काय? ब्राह्मधर्माचा दिग्विजय करण्याकरितां केशवचंद्रानें जी प्रचारक

सेनेची अभेद्य फळी उभारली होती, तिचा दुफळा केली ती ह्याच कोपऱ्यांतल्या कुचविहारनें. कुचबिहारच्या राजपुत्राला केशवनें आपली मुलगी दिली ती काय ईश्वरी प्रेरणेनें किंवा धूर्त व लौकिक दृष्टीनें, हें ठरविण्याची ही वेळ नव्हे व स्थळही नव्हे; पण केशवाचा हेतु कांहीं असो, येथें येणाऱ्या प्रत्येक ब्राह्म नवख्याला एक गोष्ट विशेष निरखून पहावी असें साहजिक वाटतें, ती ही; बुद्धधर्माला जसा अशोक, खिस्तीधर्माला जसा कॉन्स्टंटाईन तसा ब्राह्मधर्माला एकादा राजबिंडा पुरस्कर्ता कुचबिहारपुरता तरी झाला आहे कीं काय ? पुढें काय होईल तें सांगवत नाहीं; पण हल्लींची वस्तुस्थिति थोडक्यांत अशी आहे.

## कुचबिहार ब्राह्म-समाज.

ब्राह्मधर्माचें कार्य कुचबिहार येथें कुचबिहार विवाहाच्या पूर्वींपासून चालू आहे. रायबहादूर कालिकादास दत्त हे ब्रिटिश सरकारच्या एका बड्या नोकरीवरून सन १८६९ सालीं कुचबिहारचे दिवाण होऊन येथें आले ते अद्यापि तेंच काम करीत आहेत. हे गृहस्थ लहानपणापासून ब्राह्म लोकांच्या सहवासांत वाढले असल्यामुळें ब्राह्मसमाजसंबंधीं व विशेषेंकरून महर्षि देवेंद्रनाथ, केशवचंद्र, शिवनाथशास्त्री वगैरे पुढाऱ्यांविषयीं त्यांना फार आदर वाटत आहे. हे गृहस्थ व राय यादवचंद्र चक्रवर्ती बहादूर, त्या काळचे येथील न्यायाधीश, ह्या दोघांच्या निमंत्रणावरून, प्रचारक विजयकृष्ण गोस्वामी हे सन १८७८ सालीं येथें आले व त्यांनीं ब्राह्मसमाजाची स्थापना केली. त्यावेळीं सुमारें १४ हितचिंतक मंडळी समाजांत सामील होती. त्यांनीं उपासनेकरितां एक झोंपडी बांधली, ती दोन वर्षांनीं जळल्यावर सुमारें ५ वर्षें उपासना बंद होती. त्यानंतर हल्लींचे जागीं मंदिर बांधण्यांत आलें. तेंही सन १८९७ च्या भूकंपांत पडल्यामुळें त्याच्याच पायावर हल्लींचें पक्कें मंदिर नुकतेंच बांधलें आहे. ह्यांत सुमारें ६०।७५ मंडळी उपासनेस बसतील इतकी जागा आहे. भोंवतालीं पुष्कळशी मोकळी जागा आहे. शेजारीं मिशनरी कोणी आल्यास राहण्यास झोंपडी तयार आहे. ह्या समाजांत दीक्षित असे सभासद कोणीच नाहींत. मात्र समाजाचे कायमचे १८ वर्गणीदार आहेत. पण नित्याचे उपासनेस ह्यापैकीं कचीतच कोणी तरी येतो. बाहेरचे ४।५ विद्यार्थी मात्र जमतात. कलकत्त्याच्या साधारण समाजाचा मिशनरी वर्षांतून आपल्या फिरतीवर १।२ दां येऊन जातो. यथील दिवाणसाहेबच समाजाचे कायमचे अध्यक्ष आहेत, व पैशाच्या वगैरे लौकिकबाबतींत त्यांचा मोठाच आधार आहे. आणि स्वतः दिवाणसाहेबांचे विचारही पूर्णपणें उदार असूनही त्यांची व्यवहारकुशलता त्याहूनपण परिपूर्ण असल्यामुळें त्यांची समाजाच्या बाबतींत आजपर्यंत केवळ हितचिंतक आणि उदार आश्रय ह्यापलीकडे मजल गेलेली नाहीं. ह्याबाबतींत त्यांच्याशीं खुलाशाकरितां समक्ष एकदोन वेळां संभाषण झाल्यावेळीं त्यांनीं आपली खरी खरी बाजू मोकळेपणें सांगितली ही एक त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय. दिवाणसाहेब मोठे सूज्ञ आदरशील व उदार आहेत. संस्थानांत त्यांचें अपरंपार वजन आहे. सर्व सूत्रें त्यांचेच हातीं आहेत. साधारण ब्राह्मसमाजाकडून कांहीं प्रचारणेप्रीत्यर्थ प्रयत्न होईल तर आपण शक्य ती मदत करूं असें म्हणत आहेत. पण केवळ अशा लौकिक पुरुषाकडून हल्लीं होत आहे त्यापेक्षां आणखी काय होणार ! अशा स्थितींत साधारण समाजाकडून एकादा ताज्या दमाचा प्रचारक तेथें जाऊन कांहीं दिवस तेथील सुमारें ३०० कॉलेजच्या विद्यार्थ्यांत काम करील तर बरेंच यश येण्यासारखें आहे.

## कुचबिहार नवविधानसमाज.

सन १८७८ सालीं केशव चंद्रसेन ह्यांच्या ज्येष्ठ कन्येचा विवाह कुचबिहारचा हल्लींचा राजा सर नृपेंद्र नारायण भूपबहादुर सि. आय. इ. यांच्याशीं झाला. कुचबिहार येथें पूर्वींपासून जो समाज होता त्यांतील मंडळीस नवविधान पक्षाचीं मतें पटत न पडल्यामुळें म्हणा, किंवा हल्लींचे दिवाण ह्यांच्या मुत्सद्दीपणामुळें त्यांस, धर्माच्या कामाशीं संस्थानाचा प्रत्यक्ष संबंध नसावा व जी पूर्व परंपरा चालू संस्थानांतून देणगी चालू आहे ती तशीच चालावी असें वाटत असल्यामुळें म्हणा किंवा राजेसाहेबांस आणि राणीसाहेबांसच आपल्या बाजूचा एक स्वतंत्र समाज असावा असें वाटल्यामुळें म्हणा, सन १८८६ सालीं आगष्ट महिन्याच्या १५ व्या तारखेस कुचबिहार नवविधानसमाज स्थापण्यांत आला. ह्याचपूर्वी केशवचंद्र सन १८८४ त वारले होते. ते असे

तोंपर्यंत हा समाज निघाला नाहीं. इतकेंच नाहीं पण त्यांच्या हयातींत केशव स्वतः येथें एकदोनदां आले असूनही व्याख्यान वगैरे देणें हीं त्यांची नित्याचीं कामें त्यानें ह्या गांवीं केल्याचेंही ऐकण्यांत आलें नाहीं. ह्यावरून विवाहाच्या द्वारें संस्थानांत समाजाचा शिरकाव करावा हा त्याचा लौकिक हेतु असावा असें फारसें संभवत नाहीं. असो. हल्लीं ह्या समाजाचे प्रमुख स्वतः राजेसाहेबच आहेत. पण खरी व्यवस्था राणीसाहेबांच्या कडूनच सर्व होते. राजाचें कुटुंब धरून समाजांत एकंदर ११ अनुष्ठानिक कुटुंबें आहेत. त्यांत एकंदर सुमारें ७० मुलेंमाणसें आहेत, शिवाय सुमारें ४० हितचिंतक आहेत. समाजाच्या खर्चाकरितां संस्थानांतून सालीना ५००० रु. ची नेमणूक आहे. त्यांत एक कायमचा मिशनरी, एक गायक ह्यांचा खर्च व इतर खर्चही होत असतो. शिवाय आर्यनारीसमाजाची दरमहा १ सभा होत असते, महाराणी येथें असतांना ही सभा दर आठवड्याला त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरत असते. हिच्यांत सुमारें १५ सभासद व १० इतर स्त्रिया जमत असतात.

## मंदिर.

समाजाचें अर्थातच एक सुंदरसें मंदिर आहे खरोखर इतकें सुंदर ब्राह्म-मंदिर हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठें नसेल, निदान माझ्या तरी पाहण्यांत नाहीं. राजाश्रयानें बांधलें गेलें आहे म्हणून हें केवळ शृंगारून सुंदर केलें आहे असें नव्हे तर ह्याचा एकदरींत घाटच साधा, सात्विक आणि उपासनालयास साजेल असा आहे. डाका, कलकत्ता वगैरे ठिकाणीं ह्यापेक्षां मोठमोठालीं मंदिरें आहेत; पण तीं केवळ व्याख्यान-मंदिरेंच. आत्म्याला जागृत करण्यासारखा विशेष कांहीं सात्विक भाव त्यांच्यांत नाहीं. काव्य आणि गायनकला ह्यांचे द्वारें धर्माचें अंशतः कार्य निदान बंगाल्यांत तरी होत आहे; पण शिल्पकला आणि चित्रकला ह्यांचेद्वारें आत्म्याचें किती तरी पोषण होण्यासारखें आहे. ह्याविषयीं नीटशी कल्पना कोणा तरी ब्राह्माच्या मनांत आली असेल कीं नाहीं, ह्याविषयीं मोठी शंकाच आहे. रविवारीं सायंकाळीं उपासना झाली, तीही मोठी गंभीर झाली. बराच धूप जळत असल्यामुळें चहुंकडे मंदीरभर सात्विक गंध सुटला होता. नियमित वेळीं गंभीर घंटानाद झाल्यावर नेमणुकीचे उपासक वेदीवर बसले. ते दुर्गानाथराय, हे केशवच्या प्रिय शिष्यांपैकीं एक असून, फार साधे व सात्विक गृहस्थ आहेत. गायन सुस्वर आणि भजन प्रेमळ झालें. भजनाचा रस जेव्हां दाटत असे व मृदंगाचा नाद वरतीं घुमटांत घुमूं लागे तेव्हां पडद्यांतील अदृश्य स्त्रियांनीं आपल्याजवळचे मोठे शंख वाजवून त्यांच्या गंभीर ध्वनींचा मेळ भजनांत असा मिळवून द्यावा कीं, श्रोत्यांचीं सर्व गात्रें बंद पडून तो केवळ कांहीं वेळ आत्मरूपानेंच उरावा!

मी कुचबिहार येथें ता. १९ रोजीं गेलों. नदीच्या काठीं 'केशव-आश्रम' नांवाचा समाजाच्या मालकीचा एक मोठा बगीचा आहे, त्यांत एक लहानशी इमारत बांधण्यांत येत आहे. ह्या बागेंतच राणीसाहेब आपला आर्यनारीसमाज भरवीत आहेत. ह्या बागेसमोरच्या जागेंत, समाजाच्या खर्चानें कॉलेजांतील ब्राह्म-विद्यार्थ्यांस राहण्याकरितां दोन सुंदर कुटिका करून दिल्या आहेत. त्यांत हल्लीं चार विद्यार्थी राहतात, माझी राहण्याची व्यवस्था ह्या छात्रकुटिकेंत केली होती. ता. १३ रोजीं तिसऱ्या प्रहरीं येथील टाऊनहॉलमध्यें धर्म हा जीवनाचा पाया Religion as the Basis of Life यावर माझें इंग्रजींत व्याख्यान झालें. दिवाणसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. ता. १४ रोजीं केशव-आश्रमांत वनभोजन झालें, त्या वेळीं दोन्ही समाजाच्या मंडळीनें मोठ्या प्रेमानें भोजन केलें. नंतर मी मुंबईकडची हकीगत सांगितली, त्याच दिवशीं आदित्यवारची सायंकाळीं मंदीरांत उपासना झाली. उपासनेनंतर लगेच सुमारें २०-२५ तरुणांची सभा जमली, त्यांचेपुढें मुंबईच्या तरुण ब्राह्मगणाचे नियम खुलासेवार वाचण्यांत आले. तेथील समाजांतील तरुणांची सभा बरेच दिवस बंद पडली होती. तिची पुनः मुंबईच्या सभेच्या नियमाप्रमाणें रचना करून, ह्या सभेस जोडण्याचा विचार ठरला.

कुचबिहार येथें दोन समाज आहेत. एकाचे अध्यक्ष स्वतः राजेसाहेब व व्यवस्थापक राणीसाहेब, दुसऱ्याचे अध्यक्ष दिवाणसाहेब, शिवाय तत्वज्ञानाच्या अध्ययनाविषयीं सर्व बंगाल्यांत नांवाजलेले

प्रो. ब्रजेंद्रनाथ सील तेथील कॉलेजचे विद्यार्थ्यांना प्रिय असलेले प्रिन्सिपाळ हेही ब्राह्म. मी तेथें असतांना तेथील कॉलेजांतील कांहीं विद्यार्थ्यांनीं दाखविलेली जिज्ञासा व तत्परता, तरुणांची सभा पुनः सुरु करण्याविषयींची उत्सुकता व त्यानंतर त्यांची आलेलीं पत्रें ह्या सर्वांवरून, कुचबिहार संस्थानांत एकादा ताज्या दमाचा प्रचारक पाठविल्यास पुष्कळ काम होण्यासारखें आहे. पण तें होईल तेव्हां होवो, मी मात्र मुक्काम्यानें जानेवारी ता. १५ रोजीं सकाळीं ब्रह्मपुत्रेची वाट धरली. दोन दिवस येथील लहान थोर मंडळीनें माझें फार स्वागत केलें. गाडी सुटतेवेळीं ह्या दूर देशच्या बांधवांचा निरोप घेतांना माझें अंतःकरण भरून आलें !

## डूब्री.

"ब्राह्मधर्माचा प्रचारक होण्यांत मला जी धन्यता व सुख वाटत आहे त्यापुढें राजसुखही तुच्छ होय !" हें वाक्य जेव्हां मीं बाबू उपेंद्रनाथ बोस, जे डूब्री ब्राह्मसमाजाचे एक वजनदार पुरस्कर्ते, ह्यांपुढें उच्चारलें तेव्हां त्यांची मुद्रा किंचित् चमत्कारिक झाली. कोठें आरबीसमुद्रावरील मुंबईबेट, कोठें आसामप्रांतांतील हा अप्रसिद्ध डूब्रीगांव. पण ज्या सनातन ब्राह्मधर्माचा मी वार्ताहर होतों त्याचा शुभ महिमा असा आहे कीं, त्यायोगें ह्या विशाल भरतखंडाचींच नव्हे तर ह्या विपुल पृथ्वीचींही दूरदूरचीं टोकें पवित्र प्रेमरज्जनें एकत्र होणार आहेत व हल्लीं होतही आहेत. तथापि वरील उद्गार ह्या विशिष्ट प्रसंगीं निघण्याचें कारण केवळ हें अंतरींचें सुखच होतें असें नव्हे तर त्यांत भोवतालच्या शांत, गंभीर देखाव्याची जब्बर भर पडली होती. सायंकाळीं ( ता. १५ जाने. ) आगगाडींतून उतरल्याबरोबर बाबू मजकुराबरोबर मीं ब्रह्मपुत्रेच्या उंच, विस्तीर्ण आणि शीतल तीरावर फिरावयास निघालों होतों. प्रथम अगदीं अक्षरशः तटस्थ व एकांतस्थळीं—जणूं प्रार्थनेंत मग्न झालेलें—ब्राह्ममंदिर पाहिलें. मंदिराच्या दाराशींच एका गत ब्राह्मबंधूची सुंदर संगमरवरी समाधि पाहिली. ह्या बंधूच्या प्रार्थना फार प्रेमळ व तन्मय होत असत. व अशीच एकदां प्रार्थना करीत असतां तिच्या भरांत ह्याचें देहावसान झालें म्हणून त्या प्रसंगाच्या स्मारकार्थ समाजमंडळींनीं हा समाधि बांधली आहे हें ऐकून व पाहून झाल्यावर मागें वळतों तोंच साक्षात् ब्रह्मपुत्रेनें आपलें विराट रूपाचें दर्शन दिलें. 'मृत्योर्मा अमृतं गमय' असें केवळ मनांत येतें न येतें तोंच अमृताची पताकाच तोंपुढें फडकूं लागली. हिमालयाच्या पलीकडे कैलासपर्वताच्या पूर्व पायथ्याशीं असलेल्या मानससरोवरांतून निघून पित्यास प्रदक्षिणा घालून आलेली ही महाभाग ब्रह्मपुत्रा. हिनें केवळ दर्शनहेळामात्रेंकरून किती देशांची वार्ता सांगितली, किती काळाची साक्ष दिली. डुब्री गांवच्या तिन्ही बाजूंनीं हिचा प्रवाह असल्यानें हिनें गांवास अगदीं कवटाळल्यासारखें दिसतें. महासागरास पाहून ईश्वराच्या अनंतपणाची व गंभीरपणाची थोडी कल्पना येते खरी, पण अशा महानदाच्या विभूति पाहिल्याशिवाय ईश्वराचें कार्य व संसाराची प्रगति ह्याविषयींची प्रत्यक्षता येण्यासारखी नाहीं. असो. अस्तमान झपाट्यानें होऊं लागला, व सर्व दृश्यजगावर रात्रीचा अभेद्य पडदा पडूं लागला, मातीच्या डोळ्याला जसजसें कमी दिसूं लागलें तसतसें स्मृतीच्या डोळ्यास अधिकाधिक स्पष्ट दूरदूरचा प्रदेश दिसूं लागला. किती देश, किती भाषा, किती जाती, किती रीती—पण सद्धर्माची किंचित् आंच लागल्याबरोबर हे सर्व भेद विरघळून जाऊन एकच प्रेमरस कसा पाझरतो ! धर्माची पताका धारण करून निघालों म्हणजे किती पाहुणचार, किती आदर, किती कळकळ हीं आपला जणूं शोध काढीत येतात आणि मग आलेल्या वाटेनें आपल्यामागें हें प्रेमसुताचें जाळें किती फैलावलेलें दिसतें; तशीच पुढील खाचखळग्याची दिसणारी वाट जसजशी पायांखालीं येते तसतशी कशी सपाट होते, आजच्या चिंताच उद्यांच्या आनंदास कशा कारणीभूत होतात, काल भागलेले क्षणिक शारीरिक कष्ट आज कसे अक्षय मानसिक सुख देतात—ह्याप्रकारें बाहेरील ब्रह्मपुत्रेचे तरंग जरी दिसेनासे झाले तरी आंतील मानससरोवरांतून निघणाऱ्या ह्या स्मृतिनदीचे सुखदाई तरंग एकावर एक स्वप्नवेगानें सुटूं लागले असतां वरील उद्गार माझे तोंडून सहज निघाले ह्यांत काय नवल ?

हा गांव लहान व येथला समाजही अगदीं लहान आहे तरी समाजांतील मंडळीची जूट व एकमेकांविषयीं अगत्य पाहून संतोष झाला. विशेषेंकरून स्त्रियांमध्यें उपासनेसंबंधीं आतुरता दिसली.

त्याच रात्रीं मी घरीं परत येऊन पोषाख बदलून प्रार्थनेला गेलों; तों स्त्रिया आधींच पडद्याआंत बसल्या होत्या. बहुतेक सर्व उपासना हिंदुस्थानींतच करावी लागली. माघोत्सवाची सुरुवात होती, म्हणून पुढें दोन दिवशीं सकाळीं दोघां सभासदांच्या घरीं पहांटेस सामाजिक उपासना झाल्या. त्यांचे आधीं कांहीं सभासद नगरसंकीर्तन करीत तेथें ता. १६ जानेवारी रोजीं संध्याकाळीं मंदिरांत 'Some Ideals for Modern India' ह्यावर माझें इंग्रजींत व्याख्यान झालें व ता. १७ सकाळीं तरुणांसाठीं शाळेंत व्याख्यान झालें. ज्यांचे घरीं मी उतरलों होतों, ते जरी समाजाचे सभासद नव्हते, तरी समाजास त्यांचाच सर्व प्रकारें मोठा आधार होता व जातिभेदापेक्षांही पडद्याचें जें बंड बंगाल्यांत फार आहे, तेंही ह्या गृहस्थाकडे नव्हतें. ता. १७ रोजीं तेथून निघून नदीवरून आगबोटीनें मध्य रात्रीं जगन्नाथगंज येथें गेलों व नंतर ता. १८ रोजीं

## मैमनसिंग

येथें पोहोंचलों. येथें हल्लीं दोन पक्षाचे दोन समाज आहेत. बाबू इशानचंद्र विश्वास हे गृहस्थ येथें कलकत्त्याहून येऊन त्यांनीं सन १८५५ चे सुमारास एका ब्राह्मसभेची स्थापना केली, त्या वेळीं अगदीं समाजाच्या पद्धतीनें ३–४ जण उपासना करीत. नंतर डॉ० जगदीशचंद्र बोसचे वडील भगवानचंद्र येथें आल्यापासून ह्या समाजाची भरभराट होऊन, सुमारें २५–३० सभासद जमले; तथापि गांवांत ह्यांना फार हाल काढावे लागत. हा सर्व गांव येथील जमीनदाराचे ताब्यांत असल्यामुळें व गांवचे लोकांनीं त्याचे कान फुंकल्यामुळें गांवांत मंदिर बांधण्यास मुळींच जागा मिळेना म्हणून अगदीं गांवाबाहेर लांब 'साहेबक्वार्टर्स' म्हणजे सरकारी जागेंत जागा घेऊन एक मंदिर प्रथम १८६९ त बांधण्यांत आलें, पण तें १८८६ सालच्या भूकंपांत पडलें म्हणून पुनः बांधण्यांत आलें. ह्याचे पूर्वींच १८७८ सालीं कुचबिहारचे लग्नामुळें ब्राह्मसमाजाला जो धक्का बसला होता तेव्हांच समाजमंदिराचे मालकीसंबंधीं तंटा होऊन कोर्टमार्फत तडजोड झाली होती कीं, नवविधानी मंडळींनीं आदित्यवारीं सकाळीं उपासना करावी व साधारणीयांनीं सायंकाळीं करावी. पुढें १८८६ सालीं मंदिर पडल्यावर साधारणीयांनीं गांवांत निराळेंच मोठें मंदिर बांधिलें. ह्याच धरणीकंपांत ज्या जमीनदारानें गांवांत मंदिर बांधण्यास जागा दिली नव्हती, त्याचाही मोठा वाडा जमीनदोस्त झाला. पुढें जें ब्राह्ममंदिर बांधिलें तेंही पुनः १८९७ च्या जबर भूकंपांत पार कोसळून गेलें. हल्लीं जें मंदिर बांधलें आहे, त्याचे उंच व नकशीचे भारी किंमतीचे दरवाजे,तुळया व इतर सामान, संगमरवरी दगड वगैरे बरेंच सामान, ज्याच्याकडून पूर्वीं जागाही मिळाली नाहीं त्याच जमीनदाराकडून मिळालें आहे, व तो जमीनदार आतां चांगला वयांत आल्यामुळें त्याला चांगलें कळूं लागलें आहे. त्याची समाजासंबंधीं सहानुभूति आहे. नवविधान समाजांत एकंदर बायका, मुलें, पुरुष मिळून २६ व साधारणसमाजांत ७८ आहेत. साधारणसमाजाचे आचार्य श्रीनाथचंद्र ह्यांनीं गांवाबाहेर बरीच विस्तीर्ण जागा घेऊन तेथें ब्राह्मलोकांचें एक लहानसें खेडें वसविलें आहे. हल्लीं तेथें ८ ब्राह्मकुटुंबें रहात आहेत. श्रीनाथबाबूंनीं आपल्या घराला लागून, एक नित्याच्या उपासनेकरितां भजनमंदिर बांधलें आहे. त्यांत नित्य सकाळीं खेड्यांतील मंडळी भजनास जमते. ता. १९ रोजीं संध्याकाळीं साधारणसमाजमंदिरांत महर्षि देवेंद्रनाथाच्या प्रथम श्राद्धासंबंधानें उपासना झाली; ती श्रीनाथबाबूंनीं बंगालींत चालविली. नंतर महर्षींचे चरित्रासंबंधीं इंग्रजींत व्याख्यान झालें. ता. २० रोजीं सकाळीं मी

## फौरेड

म्हणून अगदीं लहान खेडें मैमनसिंगहून डाकाच्या वाटेवर आहे तेथें गेलों. हें खेडें नामदार के. जी. गुप्त, कमिशनर, ह्यांचे मालकीचें असून, शेतांत साहेबमजकुराचें एक घर नदीचे अगदीं काठींच आहे व जवळ एक सुंदरसें मंदिर आहे. बाबू कालीनाथ गुप्त हे वृद्ध गृहस्थ आपल्या भाविकपणाबद्दल व सात्त्विकपणाबद्दल सर्व ब्राह्मसमाजांत प्रसिद्धच आहेत, ह्यांच्या आवडीचें हें घर व मंदिर आहे. एकंदरींत हें स्थळ शांत व पूर्ण एकान्तिक आहे. कोणी अतिथि आल्यास त्याची सर्वप्रकारें सोय, नेमलेलीं नोकरमाणसें मोठ्या आदरानें करीत. येथें माघोत्सवाचे वेळीं आसपासची ब्राह्ममंडळी कांहीं दिवस जमतात. येथें एक दिवस एकांत व आत्मसमागम भोगून ता. २१ रोजीं डाका येथें गेलों.

# शांतिनिकेतन.

## बोलपूर.

(सु. प. ५–२–११.)

त्या गोष्टीला सुमारें ४०–४५ वर्षें झालीं असतील; महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर हे कलकत्त्यापासून सुमारें १०० मैलांवर बिरभूम जिल्ह्यांत धर्मसाधनार्थ भ्रमण करीत होते. कलकत्त्यापासून फार दूर नाहीं व फार जवळही नाहीं. व जेथें सृष्टीचें शांत आणि सौम्य मुखावलोकन निरंतर घडेल असें चिंतनानुकूळ ठिकाण शोधून काढण्यांत ते बरेच दिवस गुंतले होते. इतक्यांत त्यांचे स्नेही बाबू श्रीकांतसिंह (हल्लींच्या नामदार एस. पी. सिंहचे चुलते) ह्यांनीं महर्षींना वरील जिल्ह्यांतील आपल्या जमीनदारीच्या ठिकाणीं कांहीं दिवस रहावयास बोलाविलें; आणि त्यांना ज्या प्रकारचें ठिकाण हवें होतें, तें आपल्या जमिनींतून पसंत करण्यास आग्रहानें सांगितलें. त्यावरून महर्षींनीं बोलपूर गांव आणि कोपाईनदी ह्यांच्या मधोमध १॥–२ मैलांवरच्या अफाट ओसाड उंचवट्या वरील एका माळावर थोडीशी जागा आश्रमाकरितां पसंत केली.

असें सांगतात कीं, त्यावेळीं ह्या प्रदेशांत चोरट्यांची व वाटमाऱ्यांची फारच भीति होती. म्हणून दुसरी जागा पसंत करण्यास महर्षींना सांगण्यांत आलें; तरी पण त्यांनीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. ह्याच माळावर एक जुना सप्तपर्ण वृक्ष (बंगालींत ह्याला च्छातीम हें नांव आहे) होता. त्याचे खालीं बसून सूर्यास्ताकडे पाहात पाहात ध्यानस्थ होणें त्यांना फार आवडत असे. एकादोघांकडून माझे ऐकण्यांत असें आलें कीं, तेथील चोरट्यांचा मुख्य दारिक सरदार नांवाचा रामोशी एकदां महर्षींच्या अंगावर अपाय करण्यासाठीं चालून आला; पण त्यांची ती भव्य, पण निरुपद्रवी आकृति व सौम्य मुद्रा आणि ते लवकरच ध्यानांत गढून गेलेले पाहून, त्याची वृत्ति अगदीं पालटून गेली! पुढें पुढें तर महर्षींची तेथेंच कायमची वसति होऊं लागल्यामुळें दारिक सरदारानें आपला क्रूर पेशा अजीबात सोडून दिला; शेवटीं हल्लींचा शांतिनिकेतन आश्रम तयार झाल्यावर महर्षीजवळ त्यानें बरींच वर्षें दरवानाची नोकरी केली. दारिक सरदार अद्यापि जिवंत आहे. असें ऐकल्यावर तर मी मोठ्या कौतुकानें जवळच्या भुवनडांगा नांवाच्या खेड्यांत त्याला मुद्दाम भेटावयास गेलों, तों त्यानें खेड्याबाहेरील कालीच्या देवळासमोरील आंगणांत गुरांची पात जुंपून धान्याची मळणी चालविली होती. जवळ जवळ ऐंशींच्या घराला येऊन पोंहोंचला आहे तरी त्याची आंगकाठी सरळ आहे आणि त्याच्या डोळ्यांत एक प्रकारची चमक आहे.तो आमच्याशीं फार नम्रपणें बोलला, व त्याच्या पारदर्शक संभाषणांतून महर्षींसंबंधाचा त्याचा आदर स्पष्ट दिसत होता, इतकेंच नव्हे तर त्यांनीं त्याच्या आयुष्यांत नव्हे, आसमंतांतील सर्व माळरानांत घडवून आणलेली क्रांति अंधुक अंधुक दिसून येत होती. राकट रामोशाचा हा प्रामाणिक शेतकरी बनलेला आणि गुरें जुंपून धान्याची मळणी करण्याच्या मिषानें प्रत्यक्ष चामुंडेच्या नाकासमोर शांतिदेवीचे स्तुतिपाठ ह्मणणारा दारीक सरदार पाहून मला आंतल्या आंत गहिंवर आला! असो.

दारिकसरदाराच्या ह्या भुवनडांगा खेड्यापासून अर्ध्या मैलाच्या आंतच महर्षींचा पवित्र आणि रम्य **शांतिनिकेतन** नांवाचा प्रसिद्ध आश्रम आहे. भरतखंडांतील दूरदूरच्या ब्राह्मांना हें एक तीर्थयात्रेचें ठिकाण आहे म्हणण्यास हरकत नाहीं. गुजराथेंत स्वामिनारायणपंथ आणि बंगाल्यांत ब्राह्मधर्म ह्या दोहोंचा उदय समकालीन असून स्वामिनारायणपंथी भाविक भक्तांना गुजराथेंतील क्षेत्रें पाहून 'दर्शनहेळा मात्र तया होय मुक्ति' हा अनुभव यावा आणि बंगाल्याबाहेरच्या आमच्या बहुतेक ब्राह्मबंधूंना शांतिनिकेतनासारखें प्रेरक, पवित्र आणि क्रांतिकारक स्थळ नुसत्या नांवानेंही माहीत नसावें हें काय गौड बंगाल! आमचा धर्म मोठा 'सुधारलेला धर्म' आहे असें म्हणून आम्ही वेळोवेळीं स्वतःस थोपटून घेतों पण सुधारणा आणि धर्म ह्या दोहोंच्या झटापटींत 'सुधारणे' चे चाळे फार माजून बिचाऱ्या धर्मबुद्धीस नावडतीप्रमाणें मागील दारींच बसून रहावें लागतें हें आम्हां 'अप-टु-डेट' ब्राह्मांच्या लक्षांत यावें तसें येत नाहीं. तें कांहीं असो, कितीही कडकडीत पोषाकाचा, इंग्लंडाहून

नुकताच परतलेला तरणा बांड ब्राह्म ह्या निकेतनांत आला असतां त्याच्यावर जुन्या जगांतल्या धर्मभावनेचा किंचित् तरी परिणाम येथें झाल्याशिवाय रहाणार नाहीं, असें एक आपलें मला वाटतें.

कलकत्त्याहून इ. आय. आर. नें बरद्वानपर्यंत ६७ मैल गेल्यावर लूपलायन रेलवेचा फांटा लागतो. त्यानें पुढें २३ मैल गेल्यावर ६ वें स्टेशन बोलपूर हें लागतें. तेथून १॥ मैलावर शांतिनिकेतन आहे. वाट चांगली सडकेची आहे. अगोदर तेथील कोणाही रहिवाशास किंवा नुसतें सुपरिटेंडेंट अशा पत्त्यावर लिहिल्यासही स्टेशनावरून पाहुण्यांना नेण्याकरितां गाडीची व्यवस्था सहज करण्यांत येते. निकेतनांत पाहुण्याची राहण्याची वगैर व्यवस्था ज्या ठिकाणीं करण्यांत येते तो एक छोटेखानी राजवाडाच आहे; एकंदर दब बडेजावीची असल्यामुळें, असल्या वन्य आश्रामंतही महर्षींच्या गर्भश्रीमंतीची साक्ष पटविणारा त्यांचा पाहुणचार त्यांच्यामागें अजूनही अनुभवास येतो. शांतिनिकेतनाचा सर्व खर्च व व्यवस्था महर्षींनीं ट्रस्टीकडे सोंपविली आहे, व ती त्यांचे विरक्त चिरंजीव बाबू रविंद्रनाथ व नातू द्विपेंद्रनाथ अगदीं नियमाप्रमाणें चालवितात. एकांतांत कांहीं दिवस धर्मसाधन करूं इच्छिणाऱ्या कोणाही प्रचारक अगर लोकसेवकानें येथें येऊन रहावें अशी महर्षींची इच्छा असे. तिला विसंगत असें अद्यापि घडलेलें कांहीं दिसून येत नाहीं. तरी ह्या उदार इच्छेचा फायदा कलकत्त्यांतील कोणत्याही शाखेच्या प्रचारकांनीं किंवा इतरांनीं आजवर घ्यावा तितका घेतलेला आढळून येत नाहीं; बाहेरच्यांची तर गोष्टच राहिली.

महर्षींनीं आश्रमाकरितां हीच जागा कां पसंत केली ह्यासंबंधीं विचारपूस करितां उत्तर असें मिळालें कीं ह्या ठिकाणचा नैसर्गिक शोभा आणि शांति, हेंच कारण होय. वरवर पाहणारास ह्या ठिकाणीं निसर्गाची मनास थक्क करून सोडणारी अशी कांहीं विशेष शोभा आहे असें मुळींच दिसत नाहीं. शांति म्हणावी तर महर्षि प्रथम येथें आले तेव्हां वाटमाऱ्यांनीं हा मुलूख बेजार करून सोडला होता. असें सांगतात कीं ज्या सप्तवर्णवृक्षाखालीं बसून महर्षि तासांनुतास ध्यानमग्न होऊन जात त्याच्या तळाशीं एकदां खणून पाहिलें असतां एक नरकपाळांची रासच आढळली! ह्यावरून आजच्या शांतिनिकेतनाच्या स्थळाचे स्वरूप १।२ पिढ्यांमागें किती भेसूर होतें हें कळून येईल. ह्याप्रमाणें वरवर पाहतां नैसर्गिक शोभा आणि मानवी शांति ह्यांपैकीं कोणतेंही म्हणण्यासारखें कारण हेंच स्थान विशेषेंकरून पसंत करण्यास दिसून येईना. म्हणून मी दुसरे दिवशीं पहाटे उठून ह्या स्थळाचें अधिक निरीक्षण करण्याचें हेतूनें त्याचे आसमंतात् ४।५ मैल हिंडून आलों. परत येऊन विशेष विचार करितां ह्या स्थळाचें रहस्य मला कळलें. महर्षि हे सृष्टीचे मोठे भोक्ते होते. हिमालयाचीं उंच शृंगें व गंभीर दऱ्या, खोरीं, गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा अशा नद्यांचे प्रशस्त प्रवाह, विस्तीर्ण पात्रें आणि समुद्राच्या लाटा इ० रूपांशीं ज्या महर्षींचा अहर्निश सहवास घडत असे त्यांची सृष्टीसंबंधीं अभिरुचि कळसाला पोहोंचली असली पाहिजे. सृष्टीची शोभा तिच्या अपवादक रूपांतच आढळते असा सामान्य माणसासारखा महर्षींचाही ग्रह असणें शक्य नाहीं. शांतीविषयीं म्हणावें तर हिंस्र पशु अथवा लुटारूंच्या उपद्रवामुळें प्राचीन मुनींच्या शांतीचा जसा भंग होत नसे, त्याचप्रमाणें आधुनिक महर्षींच्या शांतीलाही ह्या नैसर्गिक अपायांची बाधा वाटली नाहीं. मुनींच्या मनाच्या शांतीला बाधा होते ती सृष्टीच्या अपायामुळें नव्हे, तर ह्या संसारांत सरपटणाऱ्या क्षुद्र नरनारी आपल्या ऐहिक अथवा पारलौकिक योगक्षेमांचे वेळोवेळीं नीच उपाय योजतात त्यामुळेंच होते. ज्या ठिकाणीं अशा उपायांचा शिरकाव नाहीं, जेथें भूमीचा विस्तीर्ण प्रदेश एकदम नजरेच्या आटोक्यांत येतो आणि जेथून भोंवतालीं दूरवर पाहतां क्षितिजाचें सुंदर आणि विशाल वलय—जणूं जमीनअस्मानाचें गाढ आलिंगनच—अहोरात्र दिसतें त्याच ठिकाणीं शांति आणि शोभा ह्या दोन्ही जुळ्या बहिणींचें चिरसाम्राज्य पहावयास मिळतें. महर्षींनीं स्थापलेलें शांतिनिकेतन ह्या साम्राज्याचें एक सिंहासनच होय!

भोंवतालीं भला मोठा ओसाड उघडा माळ आहे आणि मध्यें सुमारें २ एकर जमीन ह्या निकेतनासाठीं पसंत करून महर्षींनीं ती आतां तरुलतांनीं गजबजन टाकिली आहे. आम्र, अशोक,

देवदार इत्यादि प्रकारचे गगनचुंबित वृक्ष एक मेकांच्या खांद्यावर आपले प्रशस्त बाहू ठेवून डोलत आहेत. मध्यभागीं महालवजा दोनमजली पक्की आणि भव्य इमारत आहे. तिच्या समोर बागेंत टुमदार, स्वच्छ, शुभ्र संगमरवरी दगडाचें ब्राह्म मंदिर आहे. त्याचे अग्र भागीं मोकळा मंडप असून त्यावर लोहशलाकाचें नाजूक, निमूळतें, गोल घुमट आहे. मंदिराच्या चारी भिंती भिंगाच्याच असल्यानें उपासनेस बसलें असतांही चहूं बाजूंचा दूरवर देखावा दिसतो. उपासकासाठीं रांगेनें आसनें मांडलीं असून, मध्यभागीं वेदीसाठीं एक लहानसा संगमरवरी चौरंग आणि त्यावर दोन शुभ्र शंख ठेविले आहेत. भिंतीला लागूनच चारी बाजूंनीं प्रदक्षिणा करण्याकरितां येण्यासारखी उंच चबुतऱ्यावरून वाट आहे. त्यानंतर चोहींकडून थोडीशी मोकळी जागा राखून, भोंवतालीं छातीइतका प्राकार आहे. मंदिराच्या दारावर ॐ हें अक्षर लावलेलें असून त्याच्या खालील कमानीवर पुढें दिल्याप्रमाणें त्याचा अर्थ लिहिला आहे. सर्वे वेदा यत्पदमामनंति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति ॥ यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् ॥ १ ॥ बाहेरील बागेंत जागजागीं सुंदर वृंदावनें आणि कुंड्या आहेत. त्यांच्या बाजूवर उपनिषदांतील गंभीर उतारे व लहान मोठीं वचनें उल्लेखिलीं आहेत. त्यांपैकीं खालीं लिहिलेलें अवतरण वाचून तर ह्या स्थळाचें महात्म्य मनांत चांगलें बाणतें.

" एष सेतुर्विधरण एषां लोकानामसम्भेदाय । नैनं सेतुमहोरात्रे तरतो न जरा न मृत्युर्न शोको न सुकृतं न दुष्कृतं । सर्वे पाप्मानोऽतो निवर्तन्तेऽ अपहतपाप्मा ह्येष ब्रह्मलोकः॥" इ. इ. हीं वचनें वाचीत प्रेक्षक अगदीं बाहेरील दाराजवळ आला असतां भिंतींत बसविलेला खालील लेख वाचून ह्या आश्रमाच्या उदार आणि पवित्र हेतूची त्याला कल्पना येते इतकेंच नव्हे तर ही स्वर्गीय तत्त्वें खुद्द त्याच्या अंतःकरणांत खोल रुजूं लागतातः—

"सर्वेषामेवास्मिन् शांतिनिकेतने ब्रह्मोपासनायामधिकारः इह खलु निराकारमेकं ब्रह्मैवोपासीत । संप्रदायप्रथितां देवमूर्तिं मनुष्यं पशुं पक्षिणं प्रतिकृतिं लिंगं देवप्रतीकं च नार्चयेत । नापि पावकं जुहुयात् । धर्मं स्वोदरं वा समुद्दिश्य किमपि भूतं मा हिंस्यात् । आमिषं मद्यपानं विवर्जयेत् । कस्याप्युपास्यं नावमन्येत । ब्रह्मयोगं मैत्री शमादिकं च परामृश्य समुपदिशेत् । क्रीडाकरं प्रमोदं चोत्सृजेत् ।

ह्या निकेतनांतील मुख्य प्रेक्षणीय भाग म्हणजे उपरि निर्दिष्ट सप्तपर्ण वृक्षच होय. महर्षींचे हें अत्यंत आवडीचें स्थान होतें. ह्या आश्रमांत चोहींकडेच पण विशेषतः ह्या ठिकाणीं महर्षींचा पुण्यात्मा जणूं घेर घालीत आहे असा भास होतो. ह्या जीर्ण वृक्षाचे तळाशीं जेथें महर्षि नेहमीं बसत तेथें आतां एक सुंदर संगमरवरी वेदी बांधली आहे. तिच्या शिरोभागीं 'तिनि अमार प्राणेर आराम, मनेर आनंद, आत्मार शांति' हे शब्द आहेत. ह्या वेदीवर बसलें असतां सुमारें १०।१२ पावलांवर एका संगमरवरी स्तंभावरील फलकावरची । शांतं शिवमद्वैतम् । हीं अक्षरें डोळ्यांत भरतात. तेथून हालावेंसेंच वाटत नाहीं.

मंदिरांत दररोज प्रातःकाळीं ७ वाजतां नित्याची उपासना होते, त्यासाठीं एक आचार्य व दोन गायक ह्यांची नेमणूक झाली आहे. एरव्हीं वाटेल तेव्हां वाटेल त्यास ध्यान, भजन तेथें करतां येण्यासारखें आहे. दर बुधवारीं व गुरुवारीं मुख्योपासना होतात, त्या बाबू रविंद्रनाथ हे चालवितात. त्यावेळीं येथील ब्रह्मचर्याश्रमांतील १२५। १५० विद्यार्थी सर्व हजर असतात. पौष्यमासीं ( डिसेंबर ) दरवर्षी येथें एक मोठी जत्रा भरते, तेव्हां आजूबाजूच्या खेड्यांतील ३।४ हजार खेडवळ जमून जुन्या जत्रेंतलेच निरनिराळे खेळ करून ३।२ दिवस करमणुकींत घालवितात.

ह्या ठिकाणीं महर्षींची समाधि कशी नाहीं, ह्याचें आश्चर्य वाटल्यावरून शोधाअन्तीं त्यांचे नातू द्विपेंद्र बाबू ह्यांनीं असें कळविलें कीं आपल्या रक्षेवर समाधि, थडगें अगर कोणतेंही स्मारक कोठेंही उभारूं नये अशी महर्षींनीं अगदी कडकडीत आज्ञा दिली आहे; भोंवतालच्या खेड्यांतील लोकांत महर्षींसंबंधीं इतका अलोट आदर आहे कीं, ह्या निराकाराच्या निष्काम आणि एकांतिक भक्तांची ही शेवटची इच्छा जर पूर्णपणें पाळली गेली नाहीं तर त्यांचे देव्हारे हां हां म्हणतां माजतील, ह्यांत तिळमात्र संशय नाहीं.

## ' रा. गो. भांडारकर. '

### ह्यांचे

### ' धर्मपर लेख व व्याख्यानें. '

(सु. प. १२।२।१९११.)

मधाबद्दल फुलाचे अधिक आभार मानावेत कीं मधमाशीचे, हें सांगणें एक वेळ सोपें जाईल; पण वरील सद्ग्रंथाचे उत्पादक व संपादक ह्यांच्याविषयीं वाचकांची जी उपकृतबुद्धि होणार आहे तिचा निर्णय करणें मुळींच सोपें नाहीं. फुलांतील मधुर द्रव्याची सांठवणी केल्याशिवाय त्यास मुळीं मधपणाच येत नाहीं हें जसें खरें आहे तसेंच फुलावर लुब्ध होणें हा जो मधमाशीचा आद्यगुण तो तर फुलाशिवाय मुळींच शक्य नाहीं हेंही खरें आहे. प्रस्तुत उत्पादकांनीं स्वतः पहिल्या आवृत्तीच्या निवेदनपत्रिकेंतच जरी म्हटलें आहे कीं ' ह्याविषयीं सर्व श्रेय माझे मित्र रा. रा. द्वा. गो. वैद्य ह्यांचेकडे आहे ' तरी ह्या पुस्तकाचें श्रेय कोणाकडे आहे, हें ठरविण्याची कठिणता कमी होत नाहीं. कारण यद्यपि रा. वैद्यांनीं हें पुस्तक प्रकाशित करण्यांत, सर्व तरुणांनीं उदाहरण घेण्यासारखा उद्योग आणि उत्साह दाखविला आहे तरी दुसरे पक्षीं ज्या गुणांमुळें ते ह्या परमपूज्य गुरुवर्यांचे अनन्य अनुगामी झाले आहेत ते लक्ष्यांत आणतां त्यांना मिळालेल्या प्रस्तुत श्रेयाचें मूळस्थान पुनः गुरुवर्यच होतात.

आमचें मराठी वाङ्मय अद्यापि कंगाल स्थितींतच आहे, हें कोणी कितीही स्वाभिमानी असला तरी त्याला कबूल करावें लागेल. तशांत धर्मपर पुस्तकांची—विशेषतः आधुनिक संस्कृतीला साजेल अशा ग्रंथांची—तर मोठीच उणीव आहे; इतकेंच नव्हे तर अशा वाचनाची अद्यापि अभिरुचिदेखील आमच्या वाचकवर्गांत उत्पन्न झाली आहे किंवा नाहीं ह्याबद्दल आजपर्यंत जबर शंकाच वाटत होती. पण थोड्याच काळांत रा. वैद्यांना ह्या पुस्तकाची वाढविलेली दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आला—नव्हे त्यांनीं आणिला ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच.

प्रस्तुत पुस्तकाचे ' धर्मपर लेख, ' ' व्याख्यानें ' आणि चरित्र असे तीन भाग होतात. पहिल्या म्हणजे लेखांच्या भागाचा काळ म्हणजे प्रार्थना-समाजाच्या जवळ जवळ आरंभाचा काळ (१८७८–८२) होता. म्हणून अर्थातच हा वादविवादात्मक झाला आहे. डा. भांडारकर समाजाचे सभासद होण्यापूर्वीं समाजाच्या तत्त्वांची मांडणी व शब्दरचना जी कठोर आणि अपूर्ण होती तिला डाक्तरसाहेबांनीं हल्लींचें सौम्य व पूर्ण स्वरूप दिलें; इतकेंच नव्हे, तर त्यांचा मराठी जाणणाऱ्यांमध्यें अधिक विस्तारानें प्रसार केला. तो ज्या लेखांच्याद्वारें केला त्यांची ही मालिका होय. पूर्वीप्रमाणें हल्लीं जरी समाजमताला बाहेरून उघड उघड विरोध येत नाहीं तरी ह्या भागाची उपयुक्तता कमी झाली आहे असें नाहीं. कारण समाजमतांची तपशीलवार माहिती करून घेऊं इच्छिणारांना ह्या भागापासून विशेष फायदा होण्यासारखा आहे, इतकेंच नव्हे, तर स्वतः गुरुवर्यांनींच सावधगिरीची सूचना केल्याप्रमाणें समाजाच्या निषेधक बाजूची पूर्ण जाणीव कायम ठेवण्यासाठीं समाजाच्या सभासदांनाही हा भाग आवश्यक आहे.

पण ज्याला सर नारायणरावांनीं Invigorating tonic to the mind, sanctifying discipline of life ( मनाला हुरूप आणणारें पौष्टिक, व जीवित शुद्ध करणारी प्रणाली ) असें ह्मटलें आहे, तो भाग ह्मणजे व्याख्यानांचाच होय. पहिल्या भागाप्रमाणें ह्यांत, तोडीस तोड आणि फेकीस फेंक हा प्रकार नसल्यामुळें कित्येकांस हा तितका रुचण्याचा संभव नाहीं. पण वरवर वाचणारांच्या करमणुकी-करितां, किंवा कोटीक्रमाची जुळवाजुळव करणाऱ्या वावदुकाकरितां हा भाग नाहीं. हा विध्यात्मक व पौष्टिक भाग आहे. धर्मपर व्याख्यानाचा अथवा उपदेशाचा उद्देश प्रतिपक्षाचा पाडाव करण्याचा किंवा एकाद्या सिद्धांताची प्रतिपत्ति करण्याचा नसतो. उपदेश हा ईश्वरोपासनेचा एक भाग आहे. ध्यान, भजन, प्रार्थना इ. च्या द्वारां चित्त निर्मळ, निर्लेप आणि ग्रहणशील झाल्यावर अभ्यंतरीं उमटणारी, 'अबोलण्या' ईश्वराकडून मिळालेली ती एक खुण आहे. हा बसल्या बैठकीला भरकन् वाचून टाकण्याचा भाग नव्हे. थकल्या भागल्या वेळीं एकच उपदेश वाचला कीं कार्यभाग होणार आहे. हा निराळाच छापून काढला असता तरी

बरें झालें असतें. तिसरा भाग चरित्राचा; तो ह्या दुसऱ्या आवृत्तीचा एक विशेष असल्यामुळें हिला विशेष मोहकपणा आला आहे. डा. भांडारकरांसारख्या मोठ्या माणसांचें चरित्र ह्मणजे एक राष्ट्रीय धनच. तें खरें पाहिलें असतां ह्याहून पुष्कळच मोठ्या प्रमाणावर संपादित झालें पाहिजे; तें योग्य वेळीं होईलच. पण तूर्त हातीं घेतलेल्या कार्याला अनुरूप असा लेख लिहून रा० वैद्यांनीं वाचकांला डाक्टर साहेबांचें विस्तृत चरित्र जाणण्याबद्दल जो चटका लावून दिला आहे, तो वाखाणण्यासारखा आहे. रानडे आणि भांडारकर हीं दोन्हीं नांवें त्यांच्या प्रतिपक्ष्यांच्याही तोंडीं मिळूनच असावयाचीं. आधुनिक महाराष्ट्र मेरूचीं हीं दोन अति उंच शिखरें. एक अनेक संस्था, चळवळी, आणि प्रेरणांची बीजें पेरणारा मुत्सद्दी व दुसरा त्या सर्वांची शास्त्रोक्त उपपत्ति स्थापन करणारा मार्गदर्शक; एक प्रवर्तक व दुसरा पंडित. पण दोघेही एकाच आधुनिक उदार धर्माच्या मंडपांत बसून एकाच राष्ट्रयज्ञाची कामें चालविणारे, परस्पर सहाय्यक अध्वर्यू डॉ. भांडारकर हे केवळ शाळेंतील व कॉलेजांतीलच अध्यापक नाहींत, तर सामाजिक आणि धार्मिक सुधारणेचेही अध्यापक आहेत हें ह्या अल्पशा चरित्रलेखांत चांगलें दाखविलें आहे. विशेषेंकरून पहिल्या १७ पानांत त्यांच्या कॉलेजांतील अध्यापनाच्या माहितीचा जो सांठा केला आहे तसाच पुढील त्यांच्या सुधारणेच्याही अध्यापनाची माहिती देण्यांत आली असती तर बरें झालें असतें. पुढील ६० पानांत सामाजिक व धार्मिक मतांची लेखकानें चर्चा केली आहे, ती बहुतेक माहित असलेली व पुढील भागांत आलेलीच आहे. ह्यापेक्षां ह्या मतांच्या प्रसारार्थ डॉक्टर साहेबांनीं व त्यांच्या साथीदारांनीं काय काय प्रयत्न केले व त्या कामीं त्यांचेवर काय काय प्रसंग गुदरले ह्याचें अधिक दिग्दर्शन ह्यांहून थोड्या पानांत केलें असतें तरी जास्त फायदेशीर झालें असतें. अशा गोष्टी डॉक्टर साहेबांच्या चरित्रांत पुष्कळ मिळण्याचा संभव आहे व त्यांपैकीं संमतिवयाचें बिल, त्यांच्या कन्येचा पुनर्विवाह वगैरे कांहीं रा. वैद्यांनीं दिल्याही आहेत. पण ज्या थोड्या कालावधींत आपला नित्याचा उद्योग संभाळून ही दुसरी आवृत्ति इतक्या सुंदर रूपानें छापून काढिली तो विचार मनांत घेतां रा. वैद्यांनीं केली आहे हीच कामगिरी मोठी भूषणावह आहे ह्यांत संशय नाहीं. पण ह्याहून विस्तृत चरित्र डॉ. भांडारकरांच्या नांवाला शोभण्यासारखें कालानुसार प्रसिद्ध करण्याचें धाडस व पात्रता रा. वैद्यांच्याच अंगीं आहे असेंही म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

---

## प्रार्थनासमाज अप्रिय असल्यास तो कां ?

(सु० प० ८–४–१९०६.)

ह्या विषयावर 'स्पष्टवक्त्या' नें उपस्थित केलेल्या वादासंबंधीं माझें मत आपण विचारून बरेच दिवस झाले. आज प्रसिद्धपणें ह्या विषयावर अशी वाच्यता करण्याची मला स्वतःला मोठीशी अवश्यकता दिसत नाहीं. तथापि तुमचा इतका सद्धेतूपूर्वक आग्रह आहे, ह्यामुळें फायदा होईल असें इतर कांहीं मंडळीलाही वाटत आहे, आणि ह्यांत फायदा नाहीं तरी तोटाही नाहीं असें स्वतः मलाही वाटत असल्यामुळें खालील चार ओळी आपल्याकडे पाठविल्या आहेत.

(१). समाज अप्रिय असल्यास तो कां ? ह्या विषय घेऊन त्याचा खल करीत बसण्यापेक्षां समाजाची प्रगति होत नसल्यास ती कां ? ह्या विषयाचा खल होणें अधिक योग्य व इष्ट होतें असें मला वाटतें. तथापि प्रस्तुतच्या वादांत पहिल्या नांवाखालीं दुसऱ्या विषयाचा बराचसा भाग येऊन गेला आहे. एकाद्या संस्थेची लोकप्रियता व तिची प्रगति ह्यांचा वस्तुतः अगदीं अवश्य कार्यकारणसंबंध असतोच असें नाहीं. खिस्ती समाजाची गेल्या शतकांत ह्या देशांत—आम्हीं ह्या गोष्टीकडे किती जरी डोळेझांक केली तरी—पुष्कळ प्रगति निदान प्रसार तरी झाला आहे. ह्यावरून त्याची लोकप्रियता वाढली म्हणून प्रसार झाला असें मुळींच नाहीं. उलटपक्षीं, राजकीय सुधारणा, औद्योगिक सुधारणा व कांहीं अंशीं सामाजिक सुधारणा इत्यादि गोष्टींची लोकप्रियता झपाट्यानें वाढत आहे पण त्या मानानें त्यांची प्रगति होते असेंही म्हणवत नाहीं. तिसऱ्या पक्षीं

आर्यसमाज पूर्वीप्रमाणेंच आतांही अप्रिय आहे पण त्याचा वाढ पुष्कळ झाली आहे. चवथ्या पक्षीं, केवळ लोकप्रियतेच्याच जोरावर भराभर वाढलेल्या पण दुसरें कांहीं सत्व नसल्यामुळें आतां हटत चाललेल्या बऱ्याच चळवळींचा उल्लेख करितां येईल. असो. एकंदरींत प्रियता व प्रगति ह्यांचें कांहीं म्हणण्यासारखें साहचर्य नाहीं. म्हणून प्रगतीची बाज अगदीं एकीकडे ठेवून केवळ प्रिय व अप्रियतेचाच येथें मला विचार विषयाच्या नांवामुळें नाइलाजानें करावा लागत आहे.

(२). अप्रिय ह्या शब्दानें दोन अर्थ मनांत येतात, एक समाजाचा लोक अगदीं द्वेष करितात असा. आणि दुसरा समाज लोकांना प्रिय नाहीं असा. म्हणजे लोकांची समाजाकडे ओढ नाहीं असा. पहिल्या अर्थान्वयें समाज अप्रिय आहे असें माझ्या जरी अल्प अनुभवावरून दिसत नाहीं तरी कांहीं अप्रबुद्ध विद्यार्थी व अशिक्षित माणसें प्रसंगविशेषीं समाजाचा—त्यांतील कांहीं व्यक्तींविषयीं तिटकारा दाखवीत असतील. मागें आरंभीं समाजाचा द्वेष लोकांनीं केला असेल; पण हल्लीं केवळ द्वेषाचा प्रकार क्वचित्‌च आढळतो. दुसऱ्या अर्थानें मात्र समाज अप्रिय आहे व हें साहजिकच आहे.

(३). आतां ह्या अप्रियतेच्या कारणासंबंधों ज्या कोट्या नेहमीं लढविण्यांत येत आहेत त्या मला स्वतःला अगदीं व्यर्थ दिसत आहेत. त्यांत दोन मुख्य आहेत, त्या ह्या. समाजाचे विचारविधी अध्ययन, अध्यापन, उपदेशाचे वेळीं घेतलेले वेंचे ह्यांमध्यें देखील परावलंबीपणा व परकीयानुकरण आहे म्हणून समाजाकडे लोकांचें मन घेत नाहीं. ही कोटी दोन्ही बाजनीं बरोबर नाहीं. एक तर वस्तुस्थिति अशी आहे कीं समाजांतील स्वकीय आणि परकीय विचारांच्या विधींची आणि वेंच्यांची जर खरोखर गणती केली तर पहिली बेरीज दुसरी पेक्षां कितीतरी मोठी होईल! इतकी कीं समाजानें जरी सार्वत्रिक धर्म स्वीकारला आहे तरी व सर्व साधु व सर्व धर्मग्रंथ समाजाला सारखेच मान्य असावयाला पाहिजेत तरी, संवय, परिस्थिति, शिक्षण, आनुवंशिक संस्कार इ० च्या जोरानें समाज ह्या बाह्य गोष्टींत अद्यापि केवळ हिंदुच आहेत असें म्हणावें लागेल. म्हणजे ब्राह्मधर्म जरी सनातन व सार्वत्रिक आहे तरी हिंदुस्थानांतील ब्राह्म लोक अथवा इंग्लंडांतील युनिटेरीयन लोक ह्यांच्या सामाजिक पद्धती व गृहकर्मे हीं तद्देशीयच आहेत व तसें नसणें शक्यही नाहीं. इंग्रजी वाङ्मयाची व शिक्षणपद्धतीची छाप सर्व हिंदुराष्ट्रावरच बसून गेल्यामुळें इतर बाबतींप्रमाणें समाज रचनेंतही एक दुसऱ्याचें अवलंबन कदाचित् जास्त करीत असेल. तथापि दोन्ही देशांतील उदार धर्मांचे समाजांत अद्यापि पुष्कळच एकदेशीयता आहे. नुकताच युनिटेरिअन लोकांच्या इनक्कायरर पत्रांत, उपासनेच्यावेळीं जे पीठावरून पवित्र ग्रंथांतील उतारे वाचावयाचे ते बायबलांतूनच घ्यावेत कीं दुसऱ्या कोणत्याही प्रासादिक ग्रंथांतून घ्यावेत ह्याविषयीं पुष्कळ पत्रव्यवहार होऊन शेवटीं बहुमताचा कल हल्लींची एकदेशीयता सोडली पाहिजे असें जोरानें प्रतिपादण्याकडेच होता. दुसऱ्या बाजूनें ह्या कोटीचा पोकळपणा असा दिसून येतो कीं समाजांत जे वेंचे घेण्यांत येतात किंवा विवेचन करण्यांत येतें त्यांत समाज स्वकीयांचें अनुकरण करीत आहे कीं परकीयांचें, ही कांहीं, ऐकणारांनीं शोधून पाहण्याची मुख्य गोष्ट नव्हे. तर समाज केवळ नक्कल करीत आहे कीं मनोभावानें म्हणा किंवा प्रसंगवशात् प्रेरित झाला आहे ही आहे. केवळ नक्कलच असल्यास ती स्वकीय काय परकीय काय, जुनी काय नवी काय, सारखीच अप्रीतीला कारण झाली पाहिजे. पण उलट जर खऱ्या खोट्याचा विचार न करितां केवळ स्वकीय परकीयावरच प्रीति अप्रीतीचे तरंग उठूं लागले तर तो दोष वस्तुस्थितीचा नसून लोकदृष्टीचा म्हणावा लागेल, किंबहुना स्पष्ट वक्त्याच्या कोटीचाही म्हटल्यास चालेल. ह्या प्रकारचा समाजावर जो अनुकरणाचा आक्षेप आहे तो वस्तुतः व विचारतः दोन्ही दृष्टीनें माझ्या अल्पमतीला बरोबर पटत नाहीं.

(४). दुसरा आक्षेप समाज मतांप्रमाणें कृति करीत नाहीं, म्हणून अप्रिय झाला आहे. ह्या बाबतींत मी समाजाची मुळींच तरफदारी करीत नाहीं व कोणीं सभासदानें कधीं केली आहे असें मला आठवत नाहीं. उलट मताबरोबर कृति न ठेवल्यास समाजाची प्रगति कधींच न होतां कृतीविना उगाच मतांचाच गोंधळ माजविल्यास समाज नष्ट होईल हें तो जाणून आहे, व ह्या

बाबतींत कोणी कितीही फुकाचें स्पष्ट भाषण करून कांहीं अधिक मिळेल असें होणार नाहीं. पण मताप्रमाणें कृति अधिक केल्यानें समाज लोकांत अधिक प्रिय होईल ही आशा मात्र मला व्यर्थ दिसते. वरच्या प्रमाणेंच ही कोटी देखील मला विचारतः व वस्तुतः निराधार दिसते. चोरी करणें हें वाईट असें लोकांचें खरोखर मत आहे. मी उद्यां चोरी करणें चांगलें असें प्रतिपादूं लागलों तर अप्रिय होईन आणि परवां जर खरोखरीच चोरी केली तर मी प्रिय होईन काय ? बरें जातिभेद मोडणें व चोरी करणें ह्या दोन गोष्टींत लोकमतांच्या दृष्टीनें सादृश्य नाहीं असें म्हटलें; कारण जातिभेद मोडणें चांगलें एवढें म्हटल्यानें कोणी अप्रिय होत नाहीं, मात्र प्रत्यक्ष मोडूं लागल्यानें होतो तर तेथेंही वरची कोटी कशी लागते ? ज्या लोकांना आमचीं मतेंच अप्रिय आहेत त्यांना आम्ही कृतीनें कसे प्रिय होणार ? त्यांची मतांसंबंधीं अप्रीति खरी असेल तर आम्ही कृति करूं लागल्यावर तर ते आमचा अगदीं द्वेष करूं लागतील. लोकांची अप्रीति जर खरी अंतःकरणापासून नसली, वरवर दाखविण्यांतच असली तरी देखील आम्ही कृतीनें कसे जास्ती प्रिय होऊं ? ज्यांच्यांत मतांबद्दल प्रीति दाखविण्याइतकें धैर्य नाहीं किंवा सरळपणा नाहीं त्यांची कृति पाहून काय वाट होणार ? काय झाली त्याचा थोडासा अलीकडे अनुभवही आहे ! आतां जे लोक मित्रे आहेत पण सरळपणें आपला मित्रपणा मनांत किंवा जनांत कबूल करितात अशांना समाज मुळीं अप्रिय नाहींच. ज्या अंशानें समाजाची कृति होते त्या अंशानें हे समाजाचें अभिनंदन करितात व जेथें कृति होत नाहीं तेथें अनुकंपा दाखवितात. असो एकंदरींत ह्या बाबतींत लोकप्रीतीचा हिशेब करीत बसणें अप्रयोजक आहे. आतां वस्तुतःही ह्या कोटीची निराधारता आहे ती अशी. प्रार्थना-समाजापेक्षां ब्राह्मसमाजांत कृति अधिक आहे व अशी प्रसिद्धिही आहे म्हणून ब्राह्मसमाज बंगाल्यांत अधिक प्रिय आहे काय ? उलट तो तिकडे किती अधिक द्वेषाला मात्र पात्र झाला आहे हें तिकडे त्यांची जी अप्रबुद्ध माणसांकडून नालस्ती करण्यांत येते त्यावरून दिसते, व चांगल्या प्रबुद्ध माणसांचाही त्यांच्यावर असा आक्षेप येतो कीं समाज कृति करून एकलकोंडा झाला हें फार वाईट झालें. तुकाराम ह्मणतात, ' लोक जैसा ओक धरिता धरवेना ' हें खरें आहे. ह्यावरून समाजानें कृति करण्यांत हेळसांड करावी असें माझ्या मुळींच ह्मणणें नाहीं. कृतीवरच सर्व प्रगति अवलंबून आहे असें वर म्हटलें आहेच. जसजशी कृति व सत्प्रयत्न जास्त करूं तशीतशी सभासदांची व हितचिंतकांची संख्या वाढेल म्हणजे समाज मोठा होईल किंवा प्रगति होईल कीं जशी आर्यसमाजाची होत आहे. पण ह्या पलीकडे बहुजनसमाजांत तो कधीं प्रिय होईल असा तूर्त संभव दिसत नाहीं.

(५) मग ह्या अप्रियतेचें कारण काय असावें बरें? ह्यांत काय मोठेंसें गूढ आहे असेंही नाहीं. ह्याची चर्चाही नको होती. आरंभींचा नेणतेपणामुळें जो द्वेष होता तो बहुतेक नाहींसा झाला आहे. मागें उरलेली पंगू अप्रियता अशी रहाणारच. तिचें कारण मानवी स्वभावाचा स्वयंभू सुस्तपणा हेंच होय. समाज जसजसा आपली स्वतः सुस्ती टाकून प्रयत्न करील तसतसा तो स्वतः मोठा होईल, पण दिवा किती मोठा केला किंवा लहान केला तरी त्यानें प्रकाशित केलेल्या प्रदेशापलीकडे जसें नैसर्गिक अंधकाराचें अपार वलय रहाणारच. तसें ह्या समाजाभोंवतीं ह्या प्राकृत अप्रियतेचें वलयही रहाणारच. आणि जेव्हां ह्या समाजाचाच जीवनाग्नि विझून जाऊन मागें, जसें उत्तरेस शीख समाजाचें व दक्षिणेस लिंगायतसमाजाचें केवळ जड शरीर मात्र उरलें आहे तसें ह्याचेंही उरेल, तेव्हां तद्वत्च हाही प्रिय आहे कीं अप्रिय आहे व तो कां इ० सर्व वाद मिटून जाईल. बरें उलटपक्षीं ह्याचा भडका हिंदुस्थानावर होऊन ईश्वरी योजनेनें ह्याच्या जीवनज्वाला जरी चारी खंडांत पसरूं लागल्या तरी म्हणजे हें अप्रियतेचें वलय नाहींसें होईल थोडेंच. ख्रिस्ती समाजाचें उदाहरण आपल्या-पुढें आहे व तो इतका जरी पसरला आहे तरी जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत त्याच्या भोंवतालच्या प्रदेशांत तो अप्रिय असणारच व आहेही. तोच बुद्धधर्म बिचारा थंड झाला आहे, त्याचे कोणीही वाटेस जात नाहीं.

(६) ह्यावरून लोकप्रीतीचा मी वाजवीपेक्षां अधिक अनादर करितों असें नाहीं. उलट प्रत्येक व्यक्तीनें आपल्या तत्त्वास व कर्तव्यास बाध न येईल अशा रीतीनें शक्य तेवढी लोकप्रीति अवश्य संपादन करावी व हें ज्यांना साधतें तें धन्य होत असें मला वाटतें आणि तें न साधल्यामुळें जे उगाच लोकप्रीतीचा अनादर करितात किंवा अशा विरळा धन्य पुरुषास नांवें ठेवितात त्याचें करणें कोल्ह्यानें द्राक्षें आंबट ठरविण्याप्रमाणेंच होय हेंही मी कबूल करितों. पण ही सर्व व्यक्तीची गोष्ट झाली. समाजाला, विशेषेंकरून धार्मिक समाजाला असें प्रिय होणें शक्य नाहीं. एकादा गायनसमाज प्रिय होईल, एकादी साहित्यपरिषद् प्रिय होईल. पण धार्मिक समाज प्रिय होणार नाहीं; कारण झाला तर तेवढा प्रीतीचा प्रदेश–ती प्रीति खरी असेल तर–त्या समाजांत समाविष्ट होतो व त्याच्या भोंवतालचें वलय पूर्वीपेक्षां अधिकच मोठें होतें एवढेंच मला म्हणावयाचें.

शेवटीं माझ्या समाजबंधूंनीं आपल्या अंतर्यामदेवतेनें प्रकाशित केलेली पायवाट धीराधीरानें क्रमाक्रमानें पुढें जावें, भोंवतालच्या तमोवलयाकडे पाहून उगाच वेळोवेळीं आपले व आपल्या सोबत्यांचे पाय गाळूं नयेत किंवा ह्या रात्रीच्या विस्तीर्ण आकाशांतील दूरदूरच्या मोहक ताऱ्यांची गणना करण्यांत किंवा तद्विषयक वाद माजविण्यांत आपली अमोल्य वेळ दवडूं नये ही एक विनवणी आहे.

---

## मुरळी.
### अथवा
## पश्चिम हिंदुस्थानांतील हिंदु देवळांतील अनीतिमूलक आणि बीभत्स प्रकार.

(आक्टोबर १९०७ च्या प्युरिटी सर्व्हंटच्या मासिकांत इंग्रजीमध्यें प्रसिद्ध झालेल्या लेखाचें भाषांतर.)

हिंदुदेवळांना लहान मुली वहाण्याचा किंवा हिंदुदेवांशीं त्यांचा विवाह करण्याचा जो चमत्कारिक प्रघात या देशांत पुरातन कालापासून चालत आला आहे, त्याचें मूळ काय आणि त्याची वाढ कशी झाली आहे याविषयींचा इतिहास उपलब्ध नाहीं. बहुतकरून ही चाल वांझ बायकांनीं आपल्याला मुलें व्हावींत म्हणून जे देवभोळेपणाचे नवस करीत असतात त्यामुळें किंवा तरुण आणि धर्मभोळ्या बायकांच्या धर्मवेडामुळें ही चाल बहुतकरून अस्तित्वांत आली असावी. धर्मांच्या इतिहासांत कांहीं प्राचीन राष्ट्रांमध्यें धर्माच्या नांवानें व्यभिचार करण्याचा एक दुष्ट प्रकार होता, त्यामुळें ही चाल पुढें पडली असेल असें एकाद्या भावी इतिहासशोधकानें शोधून काढीपर्यंत या विचित्र चालीचें मूळ असेंच अज्ञात रहाणार आहे. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे " हिरॉडोटस आणि स्टॅबो यांच्या ग्रंथांमध्यें असा उल्लेख आहे कीं मायलेटा (ग्रीक लोकांची अफ्रोडाइट) देवीच्या देवळामध्यें प्रत्येक तरुण मुलीनें एकदां तरी व्यभिचार करावा अशी चाल आसिरिअन आणि बाबिलोनियन या प्राचीन राष्ट्रांमध्यें होती." या चालीचे दुष्ट प्रकार आम्हाला हिंदुस्थानांतील मोठमोठ्या देवळांतून आणि तेथून सर्व हिंदुसमाजामध्यें पसरत असलेले अद्यापि दिसून येतात. हे प्रकार इतर ठिकाणांपेक्षां मद्रास इलाख्यामध्यें फार आढळतात. अबेडुबॉय यानें आपल्या ग्रंथांत (पान ५९२ ते ६०४) वर्णिलेले बीभत्स प्रकार हल्लींच्या सुधारलेल्या मनूमध्यें दक्षिण प्रांतीं अद्यापि किती चालले आहेत हें तिकडील लेखकाचें काम आहे. पश्चिम हिंदुस्थानांत ही चाल दक्षिणेंतूनच आली असावी. जरी इकडे तिकडच्या इतके दुष्ट प्रकार दिसून येत नाहींत आणि जे आहेत तेही हळू हळू कमी होत आहेत तरी पण लेबळ्यावरून समाजामध्यें या बाबतींत जें दुर्लक्ष दिसून येत आहे, किंवा नुकत्याच सरकारानें या बाबतींत प्रसिद्ध केलेल्या पत्रव्यवहारामध्यें 'चाललें आहे तें ठीक आहे,' असा जो ध्वनि निघत आहे तो क्षम्य आहे, असें होत नाहीं. कांहीं सन्मान्य पुढाऱ्यांनीं या बाबतींत जो सरकाराकडे अर्ज केला आणि त्याला सरकारानें ज्या अधिकाऱ्यांच्या मतांमुळें बादशाही उत्तर देऊन वाटेस लाविलें त्यांपैकीं पुढील एक मासलेवाईक मत पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें दिलें आहे. 'देवाला आपल्या मुली वाहण्याची चाल हिंदुसमाजाच्या खालच्या वर्गांतच दिसून

येत आहे, आणि ती देखील अर्जदार म्हणतात तितक्या मोठ्या प्रमाणावर नाहीं. गेल्या दहा वर्षांत मुरळ्यांची संख्या १००० वरून ३०० पर्यंत आली आहे असें सांगतात. शिक्षणाचें प्रमाण जसजसें वाढत आहे तसतसें ही चाल कमी कमी होत आहे. परंतु ज्या लोकांमध्यें ही चाल आहे त्या लोकांमध्यें शिक्षणाचा प्रसार फार हळू होत असल्यामुळें, ही चाल हळू हळू कमी होत आहे. शिवाय हेंही लक्षांत घेण्यासारखें आहे कीं ही चाल खंडोबा आणि इतर अशीं देवस्थानें ज्या भागांत आहेत तेवढ्याच भागांत चालू आहे. यावरून हें उघड होत आहे कीं ही चाल बंद करण्यासाठीं सरकारानें तीव्र उपाय योजावे अशी इची मोठी व्याप्ति नाहीं.'

आतां या चालीची व्याप्ति आणि धर्माच्या नांवानें दुराचार करणाऱ्या बायकांची नक्की संख्या हें सांगणें कोणाही खासगी गृहस्थाला शक्य नाहीं. तो अधिकार खानेसुमारीच्या खात्यासच आहे. पण या ठिकाणीं लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही आहे कीं, अशा बायकांना मुरळी हेंच नांव नाहीं. निरनिराळीं नांवें धारण करून निरनिराळ्या देवळांशीं संबंध असणाऱ्या किंवा कोणत्याही देवळाशीं संबंध नसणाऱ्या असंख्य बायका आपले निरनिराळे संप्रदाय चालवीत आल्या आहेत. महाराष्ट्र, कारवार, कोंकण आणि कर्नाटक या भागांतील किती मोठ्या प्रदेशांत ही चाल चालू आहे, हें खालील कोष्टकावरून कळून येईल.

| वाहिलेल्या मुलींच्या वर्गाचें नांव. | देवता. | क्षेत्र. | जिल्हा. |
|---|---|---|---|
| मुरळी | खंडोबा | जेजूरी | पुणें |
| ,, | जोतिबा | कोल्हापुराजवळ | कोल्हापूर |
| जोगवीण | अंबाबाई | तुळजापूर | निजामचें संस्थान |
| भावीण } | रवळनाथ | सानापूर | बहार |
| नायकीण } | भूतनाथ | मालिगांव | कोंकण |
| कलावंतीण } | महाबळेश्वर | गोकर्ण | कारवार |
| बसवी } | दारेश्वर | कुमठा | ,, |
| देवदासी } | गुत्यम्मा | शिरशी | कॉनरा |
| देवळी } | यल्लम्मा | सौंदत्ती | बेळगांव |
| जोगती | दुर्गव्वा | कणकेरी | बेल्लारी |
| मातंगी | दामव्वा | गुड्डूर | गदग |
| शरणी | मारुती | ... | ... |

मुरळ्यांची संख्या पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटन वर सांगितल्याप्रमाणें खरोखर १००० पासून ३०० वर आली असली, तरी दुसऱ्या नांवानें इतर देवळांत वाहिलेल्या इतर असंख्य बायकांचा प्रश्न शिल्लक राहिलाच.

| धंदा. | १९०१ | १८९१ | वाढ. |
|---|---|---|---|
| कसबिणी | १७५२८४ | ११६८८८ | ५८३९६ |
| कुंटणी | ८१९७ | ४७६५ | ३४३२ |
| इतर | ८१४१ | ४५९८० | ६१८२८ |
| एकंदर दुराचारी स्त्रिया | १९१६२२ | १६७६३३ | २३९८९ |

वर सांगितलेल्या खानेसुमारीच्या कोष्टकावरून दिसून येईल कीं, दुराचारी माणसांची संख्या गेल्या दहा वर्षांमध्यें शेंकडा १३ नीं वाढली आहे आणि कसबिणींची संख्या शेंकडा ५० नीं वाढली आहे. पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनीं वर सांगितल्याप्रमाणें मुरळ्यांची संख्या शेंकडा ३० नीं कमी झाली आहे व खानेसुमारीच्या वरच्या कोष्टकान्वयें एकंदर वेश्यांची संख्या शेंकडा ५० नीं जास्त झाली आहे, तर या दोन गोष्टींचा मेळ बसविण्याची जादू नुसत्या शिक्षणाच्या कांडीनें कशी साधावी! म्हणून मॅजिस्ट्रेट साहेबांच्या सांगण्याविषयीं जबर शंका येत आहे. शिवाय ज्यांना म्हणून हिंदुस्थानांतील व्यभिचाराच्या कारणांची

थोडीशी तरी माहिती आहे, त्यांना कळून येईल कीं मुंबई इलाख्यांतील वेश्यांची एकंदर संख्या १७५२८४ आहे, त्यांपैकीं ३०० पेक्षां जास्त मुरळ्या खात्रीनें असाव्यात. शिवाय केवळ शिक्षण प्रसारानेंच मुरळ्या नाहींशा होतील असें समजणें म्हणजे शिक्षणानें देशांतील चोर भामटेही नाहींसे होतील, असें समजण्यासारखेंच व्यर्थ आहे. पोलीस खात्याच्या ऐवजीं केवळ शिक्षणखात्याचीच योजना करून जर चोरी आणि भामटेगिरी बंद करतां येत नाहीं, तर त्या खात्याकडून बेकायदेशीर आणि अनीतिपर चाली व त्यामुळें उघड होणारा व्यभिचार तो कसा बंद होणार! सर्वच व्यभिचार बंद करणें हें शक्य नाहीं, तरी पण त्याचीं जीं कारणें बंद करण्यासारखीं आहेत, तीं करूं नयेत असें होत नाहीं. तथापि "जोंपर्यंत वेश्यांकरितां मागणी आहे तोंपर्यंत या चालीमुळें नाहीं तरी, दुसऱ्या कारणांवरूनच वेश्यांचा पुरवठा होणारच" असें एका फरडेशाही अधिकाऱ्यानें आपलें मत दिलें आहे व तशाच मताचा परिणाम कांहीं अंशीं सरकारावर घडून त्यांनीं वरील सन्मान्य अर्जदारांना जबाब दिला आहे असें दिसतें. मागणीवरून पुरवठा होतो, हें जरी खरें आहे तरी पुरवठ्यावरून अधिक मागणी येते, हेंही विशेषतः निदान या बाबतींत तरी दुप्पट खरें आहे. आणि शिवाय वेश्या म्हणजे तिच्या बाहेरील मागणी साठीं करविला जाणारा केवळ निर्जीव मालच नव्हे, तर ती स्वतः सजीव मागणीही आहे. ती नवीन पुरवठ्याला उत्पन्न करिते. शिवाय देवाला वहाण्याच्या चालीचे अप्रत्यक्ष रीतीनेंही दुसरे अनिष्ट परिणाम होतात. चांगल्या आईबापांच्या मुली देवाला वाहिल्यामुळें कसबिणी होतात इतकेंच नव्हे तर ज्या अगोदरच वेश्या होऊन बिघडलेल्या असतात त्या आपला धंदा अधिक प्रतिष्ठित रीतीनें चालावा, मग तो खालच्या लोकांत कां होईना आणि समाजामध्यें आपला अधिक राजरोसपणें शिरकाव व्हावा म्हणून त्या कोणताही विशेष प्रकारचा विधि न करतां मुरळ्या बनतात. मुरळ्या वहाण्याच्या या दुष्ट चालीच्या प्रतिकारार्थ इंडिअन पिनलकोडाचीं ३७२ आणि ३७३ हीं कलमें असूनही ही चाल अद्याप राहूं दिली गेल्यामुळें त्या चालीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दुष्ट परिणाम झाले आहेत. ही चाल अद्याप तशीच रहाण्याचीं दोन कारणें अशीं आहेत कीं तिच्या उलट जो कायदा आहे त्याची अम्मलबजावणी सक्तीनें होत नाहीं. व या चालीच्या उलट, जोराचें लोकमत प्रक्षुब्ध केलें जात नाहीं. ही चाल केवळ खालील जातींमध्येंच आहे म्हणून तिच्या संबंधानें कांहीं तीव्र उपाय योजण्याचें कारण नाहीं असेंही दाखविण्यांत आलें आहे. मुरळी अथवा जोगतीण ही स्वतः कदाचित् खालील जातींतील बाई असेल पण तिच्या मोहपाशांत सांपडणारे किंवा तिचा फायदा घेणारे सर्वच पुरुष खालील जातीचे असतात कशावरून! एका वेश्येमागें म्हणजे निदान पांच दहा बदफैली पुरुष हें प्रमाण उघडच आहे. ते सर्व खालील जातींतील असतीलच कशावरून! आणि ते जरी असले तरी तेवढ्यावरून हें अरिष्ट कमी घातुक आहे हें कशावरून!

पुन्हां मुलीच देवाला वहातात असें नाहीं तर मुलगेही वहातात. खंडोबाचा वाघ्या, आंबाबाईचा आराध्या, यामव्वाचा पोतराज आणि यल्लामाचा जोग्या, या सर्वांना लग्न करून इतरांप्रमाणें घरगुती पेशानें रहाण्याची सक्त मनाई असल्यानें त्यांचें जीवित कमी—अधिक प्रमाणानें बदफैली असतें यांत नवल काय? मात्र बायकांइतकी त्यांची संख्या मोठी नसते आणि त्यांच्या वागणुकीचा हलगर्जीपणाही बायकांच्या इतका नजरेंत भरण्यासारखा नसतो. धड पुरुष नव्हे, धड बायको नव्हे! अशा कांहीं नपुंसक माणसांचा एक तिसरा वर्ग आहे. या दुर्दैवी माणसांमध्यें अनीतीपेक्षां असभ्यतेचाच प्रकार जास्ती आढळतो आणि ते सहजच कुंटणपणाचे व इतर लांछनास्पद निंद्य धंदे करीत असतात, आणि त्यांना कित्येक सृष्टिनियमाविरुद्ध संवयीही लागलेल्या असतात. त्यांना कांहीं दुष्ट हेतूनें अशा स्थितींत टाकलेलें असतें कीं, ते जन्मतःच तसें असतात कीं नाहीं, हें सांगण्यास येथें अवकाश नाहीं. परंतु अंबाबाई, यल्लमा वगैरे देवींच्या देवळांशीं त्यांचा कोणत्या तरी रीतीनें संबंध जडलेला असतो. अशांची बरीच संख्या पुणें येथील सासून हॉस्पिटलजवळील बोलाईच्या देवळाभोंवतीं नाचतांना आणि टेहळतांना दिसते. यांना नपुंसकत्व कसें प्राप्त झालें आणि त्यांची अशी अव-

नति कशी झाली याविषयीं शोध करण्यापलीकडे यांच्या बाबतींत कांहीं करतां येईल, असें वाटत नाहीं; पण त्यांना व्यक्तिशः विशेष कांहीं मदत करतां आली नाहीं तरी त्या दुर्दैवी माणसांना सृष्टिदेवीनें जो आधींच शाप दिला आहे त्याचे बीभत्स धिंडवडे आज समाजापुढें जे राजरोस चालू आहेत ते तरी कायद्यानें आणि लोकमतानें सहज बंद करण्यासारखे असतांना यांतील एकाही रीतीनें कां प्रयत्न होत नाहीं हें कळत नाहीं. या बेकायदेशीर अनीतिपर आणि सृष्टिविरुद्ध देव ळांतील प्रकारांचा केवढा मोठा व्याप आणि त्यांचें स्वरूप कसें अनिवार्य आहे हें ध्यानांत आणून हल्लींच्या सुधारलेल्या काळींही शिक्षण आणि कायदा यांना न जुमानतां हें अरिष्ट कसें चालू आहे हें पाहिलें असतां कोणाही शुद्ध अंतःकरणाच्या न्यायी मनुष्याला याची सक्तबंदी एकदम तीव्र उपायानेंच झाली पाहिजे असें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. या बाबतींत विलंब, वादविवाद आणि मीमांसा यांची मुळींच आवश्यकता नाहीं. इतकेंच नव्हे तर हीं सर्व केवळ अक्षम्य आहेत असें कळून येईल. अशा प्रकारें शेवटीं हा आवश्यक प्रश्न कोणीं आपल्या हातीं घ्यावा, आणि तो कसा सोडवावा या मुद्याला आपण येऊन पोहोंचतो. हा घातुक प्रकार ज्या खालच्या जातींत आढळतो त्या ह्या. भंडारी, कुणबी, धनगर, नाइक, कोळी, वेडर, डासर, कबलिगार, तळवार, महार, मांग, वगैरे. या अडाणी जातींवर आधुनिक शिक्षणसंस्थांचा आणि आधुनिक सभ्यतेचा संस्कार होण्यासारखा नाहीं म्हणन या बाबतींत राजसंस्था व धर्मसंस्था यांच्याकडेच पहावें लागत आहे, पण दुर्दैवानें या देशांतील सत्वशील राजसत्ता आणि जिवंत ( खिस्ती ) धर्मसंस्था या दोन्हीही परकी आहेत. सरकारानें, बरोबर असो किंवा चुकीचें असो, आपलें तटस्थपणाचें एक निराळेंच धोरण ठेविल्यामुळें आणि खिस्तीधर्मानें आपल्या उलट आपल्या चमत्कारिक मिशनरी पद्धतीमुळें लोकांमध्यें दुराग्रह आणि अविश्वास यांचा एक अवाढव्य ढीग सांचूं दिल्यामुळें या सामाजिक सुधारणेच्या बाबतींत राजसत्ता आणि धर्मसंघ या दोन्हीही शक्ती पंगू झाल्या आहेत. उलटपक्षीं, एतद्देशीय धर्मसंस्था आणि लोकमत ह्यांचें तर या बाबतींत नांवच घ्यावयास नको, इतकी त्यांची ढिलाई आहे.

या बाबतींत उपाय करावयाचे ते दोन प्रकारचे. एक प्रतिबंधक व दुसरा उपशामक. पहिल्या संबंधानें इंडियन पिनल कोडचें ३७२ व ३७३ हीं कलमें करून सरकारानें आपलें कर्तव्य बजाविलें आहे. यापुढें त्या कायद्याची सक्तीनें अम्मलबजावणी करून आणि ज्यांना देवास वाहण्यांत आलें आहे त्यांची सोडवणून करण्याची कामगिरी सरकाराला वाजवीपेक्षां जास्त अंगावर घेतां येत नाहीं व ती त्यांनीं घेऊंही नये. सरकारानें केलेल्या कायद्याचा फायदा घेण्यासाठींच नव्हे तर त्यांच्या पुढील कामगिरी बजाविण्यासाठीं या बाबतींत एकाद्या खासगी, परोपकारी मंडळीनेंच संघटित स्वरूपानें पुढें आलें पाहिजे. ही खासगी संस्था एकाद्या विशिष्ट पंथाची अथवा धर्मसंघाची असूं नये. तर हल्लींच्या हिंदुस्थानांतील मिश्र लोकसमाजाच्या निरनिराळ्या घटकावयवाचे प्रतिनिधी या मंडळीमध्यें असले पाहिजेत. परंतु अशा घाटाची मंडळी मुंबईमध्यें आधींच होऊन चुकली आहे. म्हणून या बाबतींत वायफळ तर्क वितर्क न लढवितां किंवा भाविक सदिच्छा प्रकट न करितां मी या मंडळीच्या सेक्रेटरींनीं काढलेले जाहिर पत्र खालीं जसेंच्या तसेंच देत आहें. सरकार, मिशनरी. सुधारक, परोपकारी, आणि नीतिशास्त्रवेत्ते या सर्वांनींच या मंडळीचें मनःपूर्वक स्वागत करून आपापल्या परीनें शक्य तितकी मदत करावयास पाहिजे.

## पश्चिम हिंदुस्थानांतील मुलांचे रक्षण करणारी संस्था.

### संस्थेचे हेतू.

(अ) मुलांची नीति बिघडविण्याचे होत असलेले प्रयत्न व ह्यांच्या बाबतींत खासगी रीतीनें होणारे अन्याय यांचा प्रतिकार करणें.

(ब) त्यांच्या संरक्षणार्थ कायद्यांची अम्मलबजावणी होईल अशी व्यवस्था करणें व इष्ट वाटल्यास अशा कायद्यांची दुरुस्ती करून घेणें.

(क) वरील हेतु सफळ होण्याकरितां कामगार नेमणें

(ड) वरील हेतू साधण्याकरितां दुसऱ्या सर्व कायदेशीर गोष्टी करणें.

(ई) व्याख्यानें, हस्तपत्रकें वगैरेसारख्या उपायांनीं मुलांच्या शिक्षणाविषयींच्या व त्यांना योग्य वळण लावण्याविषयींच्या विचारांचा प्रसार करणें व न्यायास अनुसरून मुलांना वागविणें अशा प्रकारचें लोकमत तयार करणें.

## सभासद.

वार्षिक पांच रुपयांपेक्षां कमी नाहीं इतकी वर्गणी देणाऱ्या कोणत्याही स्त्रीला अथवा पुरुषाला या संस्थेचे सभासद होतां येतें. मात्र या संस्थेच्या दोघां सभासदांनीं त्याची किंवा तिची शिफारस करून मॅनेजिंग कमिटीमध्यें त्याची किंवा तिची निवड व्हावयास पाहिजे.

## काम करण्याच्या रीती.

पहिली—संस्थेच्या वरील ( इ ) कलमांत सांगितलेल्या शिक्षणाच्या कामाकरितां जरूर वाटेल तेव्हां हिंदु, मुसलमान, खिस्ती, किंवा पार्शी यांना आपापल्या धर्माच्या लोकांपुढें व्याख्यान देण्यास सांगण्यांत येईल, व्याख्याते इतर धर्माच्या श्रोतृवृंदापुढें आपल्या धर्माचें प्रवचन करणार नाहींत.

दुसरी—( अ ) आणि ( ब ) या कलमांत सांगितलेल्या कामाची अम्मलबजावणी करितांना कोणत्याही अज्ञान मुलास त्याच्या धर्माहून निराळ्या धर्माच्या मनुष्याच्या किंवा संस्थेच्या हातीं दिलें जाणार नाहीं.

तिसरी—एकाद्या अज्ञान मुलाच्या मार्फत ही संस्था जेव्हां त्याच्या फिर्यादीचें किंवा बचावाचें काम हातीं घेईल तेव्हां तें मूल त्याच्या धर्माहून निराळ्या धर्माच्या, संस्थेच्या प्रतिनिधीकडे असणार नाहीं. पंढरपूर, धुळें, अहमदाबाद येथील व लेडी नॉर्थकूट या अनाथ बालकाश्रमांनीं संस्थेच्या ताब्यांत असलेल्या मुलांना आश्रमांत घेण्याचें कबूल केलें आहे.

चवथी—संस्थेच्या सर्व कामगारांना अशी सक्त ताकीद आहे कीं, त्यांनीं आपला धर्म, अज्ञान मुलांच्या धर्माहून निराळा असेल, तर त्यांना त्याचा उपदेश करूं नये.

## कार्यकारी मंडळी.

मुंबईचे बिशप—अध्यक्ष.

ऑनरेबल सर नारायण चंदावरकर, ऑनरेबल मि. जी. के. पारख, डॉ. मॅकिकन, सर भालचंद्र कृष्ण. .... ... उपाध्यक्ष.

एच्. आर. एच्. वुइलकिनसन मुंबई स्कॉटिश हायस्कूलचे प्रिन्सिपाल, वि. रा. शिंदे एलफिन्स्टनरोड, मुंबई, बी. एन. भाजेकर आंग्र्याची वाडी, गिरगांव. ... ... सेक्रेटरी.

---

# बहिष्कृत भारत !

( मार्च सन १९०९ मध्यें प्रसिद्ध झालेला लेख )

ह्या पृथ्वीवर सर्व मनुष्यजातीच्या इतिहासांत जर कोठें कधीं कोणावर प्रचंड बहिष्कार घालण्यांत आला असेल, आणि जो पुरातन काळापासून चालत येऊन आज पूर्ण दशेला पोंहोंचला असेल, तर तो ह्या भरतखंडांतील नीच मानलेल्या जातीवरचा भयंकर बहिष्कारच होय ! भारतवासियांनो ! स्वार्थाला, मानवजातीला आणि ईश्वराला स्मरून हा घातकी, पातकी आत्मबहिष्कार नाहींसा करा !!

## मायो.

* सुमारें एक हजार वर्षांपूर्वी गुजराथ देशाची पाटण नामें राजधानी होती. तेथें इ. स. १०९४-११४३ पर्यंत सिद्धराजा नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें एकदा सहस्रलिंग नांवाचा एक मोठा तलाव बांधण्यास सुरुवात केली. पण कांहीं केल्या तलावांत पाणी म्हणून ठरेना. तेव्हां धर्माचार्यांच्या सूचनेवरून राजानें कोणा तरी एकास बळी देण्याचें ठरविलें. 'देवो दुर्बलघातकः!' बळी देण्याकरितां मायो नांवाच्या एका धेडास आणून उभें करण्यांत आलें. शिरच्छेद करतेवेळीं "शेवटची काय मागणी असेल ती माग !" अशी आज्ञा होतांच मायो गहिंवरून म्हणाला ! "महाराज ! माझा हा नीच

* मुंबई गॅझेटियर, काठेवाड, पुस्तक ८, पान १५७

देह सार्वजनिक हिताकडे लागणार ह्याबद्दल मला आनंदच होत आहे. माझ्या तिरस्कृत जाति बांधवांवर आपण एवढीच कृपा करावी कीं, आजपर्यंत त्यांना शहरापासून दूर अंतरावर जंगलांत राहावें लागत आहे आणि त्यांच्या नीचपणाची खूण म्हणून त्यांना निराळाच पोशाक करावा लागत आहे, तसें ह्यापुढें होऊं नये; त्यांना शहराजवळ राहण्याची परवानगी असावी.'

सिद्धराजानें ही विनंति मान्य केली आणि मायेनें आनंदानें प्राण सोडिला !

वाचकहो ! ही साडेसातशें वर्षांपूर्वी घडलेली गोष्ट वाचून आपल्याला आज काय सुचतें ? आपल्या ह्या चमत्कारिक देशांत जातिभेदरूपी सहस्रलिंग म्हणजे दुहीच्या हजारों खुणा किंवा लहरी दाखविणारा जबरदस्त तलाव आहे. आज हजारों वर्षे ह्यांतलें पाणी स्थिर आहे, पण ह्याच्या तळाशीं गाळामध्यें मायेचे असंख्य नीच मानलेले जातिबांधव जिवंत आणि वंशपरंपरेनें रुतले आहेत. मायेच्या स्वार्थत्यागानें किंवा सिद्धराजाच्या मेहरबानगीनें ह्या जाति जरी नगराजवळ राहूं लागल्या आहेत, तरी नगरवासी होण्यास, अर्थात् सुधारलेल्या जगांत राहण्यास त्यांना अद्यापि ह्या विसाव्या शतकांतही परवानगी मिळालेली नाहीं ! ह्यांना अद्यापि अस्पृश्यच ठेवण्यांत आलें आहे !

## अंत्यज हे कोण आहेत ?

महार, मांग, धेड, पारिया, नामशूद्र इत्यादि ज्या अगदीं नीच मानिलेल्या जाति सर्व हिंदुस्थान देशभर आढळतात, त्यांना ओळखण्याकरितां अद्यापि चांगलेंसें एक सर्व साधारण नांव प्रचारांत आलेलें नाहीं; आणि तसें एकादें नवीन नांव कल्पून प्रचारांत आणणें हेंही कांहीं सोपें नाहीं. मुंबई शहरांत म्युनिसिपालटीच्या ह्या लोकांकरितां ज्या स्वतंत्र शाळा आहेत, त्यांना 'निराश्रित-शाळा' असें नांव देण्यांत आलें आहे. त्याला अनुसरून ह्या शहरांत 'प्रार्थना-समाजा' च्या लोकांनीं ह्या लोकांच्या साहाय्याकरितां जें एक मिशन काढलें आहे त्याच्या शाळेलाही 'निराश्रित-शाळा' असें म्हटलें आहे; परंतु खरें म्हटलें असतां निराश्रित हें नांव ह्या मंडळीस अगदीं अन्वर्थक आहे असें नाहीं. इंग्रजींत Depressed classes ह्याचें मराठींत शोभेलसें रूपांतर होण्यासारखें नाहीं. ह्या सर्व वर्गांचें एक मुख्य आणि साधारण लक्षण अथवा खूण म्हटली म्हणजे 'अस्पृश्यता' ही होय. ह्यांना शिवून घेण्यांत येत नाहीं म्हणून ह्यांना अस्पृश्य ह्या नांवानें ओळखावें, तर तो शब्दही चांगलासा प्रचारांत नाहीं व तितका साधा आणि सोपाही नाहीं. पंचम हें नांव अलीकडे मद्रास इलाख्यांत ह्या वर्गाला नवीन देण्यांत आलें आहे, आणि तें यथार्थ असून त्यांत कोणत्याही प्रकारचा तिरस्कार ध्वनित होत नाहीं. पण तें नांव ह्या प्रांतीं प्रचारांत नाहीं. अंत्यज हा शब्द मात्र बराच व्यवहारांतला आहे. पण हे लोक खरोखरच सर्वांच्या शेवटीं जन्मले, अशांतला मुळींच प्रकार नव्हे ! म्हणून हें नांव त्यांच्यापैकीं पुष्कळांना आवडण्यासारखें नाहीं, तथापि वरील सर्व अडचणींचा विचार करतां एकंदरींत तूर्त लेखन-व्यवहाराच्या सोईसाठीं अंत्यज हेंच नांव नाइलाजानें पसंत करावें लागत आहे, आणि अंत्यज म्हणजे ज्यांचा दर्जा हिंदुसमाजांत अगदीं खालच्या प्रतीचा अथवा शेवटचा समजला जात आहे असे लोक, एवढाच अर्थ प्रस्तुत विषयासंबंधीं ह्या नांवाचा घेतला आहे.

### व्याप्ति.

आतां प्रथम ह्या अफाट हिंदुस्थानांतील अनेक धर्मांच्या, असंख्य जातींच्या जनसमूहामध्यें ह्या अंत्यज वर्गांची व्याप्ति किती आहे, व अंत्यज ह्या सदराखालीं कोणकोणत्या जाति येण्यासारख्या आहेत, व त्या कोणत्या कारणांनीं येतात, ह्याचा विचार करूं. एकंदर हिंदी जनसमूहाकडे पाहिलें असतां त्याच्यामध्यें इतका विचित्रपणा व विस्कळितपणा दिसून येतो कीं, कोणत्याही दृष्टीनें एका विवक्षित कारणासाठीं ह्या जनसमूहाचें नीटसें वर्गीकरण करूं म्हटलें असतां जवळजवळ अशक्यच वाटतें. तथापि आपण हल्लीं प्रचारांत असलेले सर्व जातिभेद व वर्गभेद घटकाभर बाजूस ठेवून केवळ विद्या, आचार, विचार व गृहस्थिति इत्यादि मिळून एकंदरींत सामाजिक दर्जाच्या दृष्टीनें पहातां ह्या अफाट जनसमूहाचे ठोकळमानानें पांच वर्ग करतां येण्यासारखे आहेत.

१ ला. वरिष्ठ वर्ग—ह्यांत मोठमोठे अधिकारी, सरदार, मानकरी, गोठमोठे व्यापारी वगैरे बड्या लोकांचा समावेश होतो.

२ रा. मध्यम वर्ग—ह्यांत साधारण नोकऱ्या करणारे, कलाकौशल्याच्यीं कामें करून उदरनिर्वाह करणारे, लहान-लहान दुकानदार व आपल्या मालकीची शेती करणारे वगैरे पांढरपेशांचा समावेश होतो.

३ रा. कनिष्ठ वर्ग—आपल्या पोटासाठीं केवळ काबाडकष्ट करणारे, उदाहरणार्थ, न्हावी, धोबी, कोळी, साळी, माळी, स्वयंपाकी, पाणक्ये, शागीर्द, कुणबी इत्यादिकांचा ह्या वर्गांत समावेश होतो.

वर सांगितलेल्या तिन्ही वर्गांचा हिंदी समाजांत समावेश होतो. लग्नकार्य झालें तर ब्राह्मण, सरदार आणि युरोपियन अधिकाऱ्यांपासून तों अगदीं कनिष्ठ नोकरापर्यंत सर्व एकाच दिवाणखान्यांत जमूं शकतात. एकादी सभा अगर व्याख्यान झालें तर वरील तिन्ही वर्गांपैकीं कोणीही सारख्याच हक्कानें येऊं शकतो व त्यांना कोणीही मनाई करूं शकत नाहीं. रोटीबेटीव्यवहाराचा भाग मात्र निराळा. त्या दृष्टीनें पाहतां हिंदी समाजांतच काय, पण हिंदुसमाजांत व त्यांतल्या कोणत्याही एका नांव घेण्यासारख्या मुख्य जातींत देखील एकोपा नाहीं! पण सार्वजनिक, किंवा विशेष एकाद्या खासगी प्रसंगीं एकत्र बसणें, उठणें हा जो साधारण सामाजिक व्यवहार आहे, त्यांत वरील तिन्ही वर्गांचा सारखाच समावेश होतो. इतकेंच नव्हे, तर अगदीं कनिष्ठ वर्गांतला एकादा न्हावी, धोबी जर आपल्या अंगाच्या करामतीनें आपली विद्याचारसंपन्नता वाढवील, तर त्याला सभेसारख्या सार्वजनिक ठिकाणींच नव्हे, तर लग्न कार्यासारख्या घरगुती प्रसंगींही मानपान देण्यास हल्लीं जुन्या चालीचा देखील कोणी गृहस्थ कचरत नाहीं! उलट, जर कोणी वरच्या वर्गांतल्या मनुष्यानें आपल्या बेअकलीपणानें आपली सर्व विद्याचारसंपन्नता घालविली, तर तो वरील मानपानास खास मुकतो; पण तोसुद्धां एकत्र बसण्याउठण्याच्या सामाजिक हक्काला मुकत नाहीं.

४ था. हीन वर्ग—ह्यांत महार, मांग, चांभार, पारिया, थिक्रिया, नामशुद्र, डोंब, भेड, मेहत्तर, मिरासी इत्यादि अनेक नीच मानलेल्या जातींचा समावेश होतो. हा वर्ग हिंदी समाजाला लागून पण समाजांत नाहीं असा आहे. समाज ह्यांजवर कांहीं बाबतींत अवलंबून आहे व ह्या वर्गाची उपजीविकाही समाजावरच चालते. हा वर्ग हिंदी साम्राज्याची कर देणारी रयत आहे. हिंदी राष्ट्राचा योगक्षेम चालवित आलेला हा घटक आहे. पण असें असून हिंदी समाजांत वरील तीन वर्गांप्रमाणें ह्याचा मुळींच समावेश होत नाहीं! हा वर्ग हीन आहे म्हणून समाजबाह्य आहे. किंवा समाजबाह्य आहे म्हणन हीन आहे, ह्याचा विचार पुढें करूं. पण सध्यां वस्तुस्थिति एवढीच ध्यानांत घ्यावयाची आहे, कीं, राष्ट्राचा हा एक घटक असून समाजबाह्य आहे.

५ वा. अलग वर्ग—ब्रिटिश राज्य व एतद्देशीय संस्थानें ह्यांच्या सरहद्दीवर डोंगरांतून व जंगलांतून राहणारे कोंग, शिकलगार, चिगलीबगली, भिल्ल, खोंड, सांताळ वगैरे अर्धवट रानटी जातींचा ह्यांत समावेश होतो. हिंदी राष्ट्राशींच मुळीं ह्या वर्गाचा अद्यापि संबंध जडला नाहीं. हे वर्ग सरकारची रयत नाहींत. आपल्या पंचायती ते स्वतःच करितात. शिकारीवर पोट भरलें नाहीं तर परकीयाप्रमाणें आपल्याजवळचा कांहीं ओबडधोबड माल गांवखेड्यांतून विकून परत जंगलांत शिरतात व तेथें परस्परांशीं व सर्व हिंदी समाजाशीं अगदीं तुटून राहतात.

वर जे स्थळ मानानें आपण पांच वर्ग केले, त्यांत ह्या विशाल भरतखंडांतील हल्लीं राहत असलेल्या सर्व मनुष्यप्राण्यांचा समावेश होत आहे. प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें पाहतां ह्या पांच वर्गांचे तीन मुख्य भेद होतात. ते असे:—

पहिले तीन म्हणज वरिष्ठ, मध्यम, कनिष्ठ हे वर्ग हिंदी साम्राज्यांतर्गत असून समाजांतर्गतही आहेत, म्हणून ते तिन्ही मिळून एक मुख्य भेद समजण्यास कांहीं हरकत नाहीं. चवथा जो हीन वर्ग, तो हिंदी साम्राज्यांतर्गत आहे तथापि समाजबाह्य आहे म्हणून तो निराळा दुसरा मुख्य भेद समजला पाहिजे. पांचवा जो अलग वर्ग तो साम्राज्यबाह्य आणि समाजबाह्य आहे म्हणन तो तिसरा मुख्य भेद होय.

आतां मघला मुख्य भेद जो साम्राज्यांतर्गत असून समाजबाह्य आहे, त्यालाच आपण प्रस्तुत लेखाच्या केवळ सोईसाठीं प्रचारांत असलेलें अंत्यज हें नांव दिलें आहे. ह्याच वर्गाच्या अवनत स्थितीसंबंधीं आमचा आजचा लेख आहे. ह्या गरीब जाति खरोखरच अंत्यज आहेत असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर ह्या अमंगल आणि अन्यायमूलक नांवाचा प्रचार होतां होईल तों लवकर बंद व्हावा अशी आमची इच्छा आहे. म्हणूनच ह्या निबंधाच्या मथळ्यांत ह्या नांवाचा प्रवेश होऊं न देण्याची आम्हीं मद्दाम काळजी घेतली आहे.

## मूळ.

आपल्या देशांत महार, मांग, चांभार, पारिया इत्यादि ज्या अनेक नीच मानलेल्या जाति आहेत, त्यांची बरोबर मूळपीठिका शोधून काढण्यास येथें अवकाश नाहीं. आणि प्रस्तुत तशी जरुरीही नाहीं. ह्यासंबंधीं प्राचीन शास्त्रांत या आणि हल्लीं पाहण्यांत व ऐकण्यांत येणाऱ्या कांहीं थोड्या ढोबळ गोष्टींचा निर्देश केला म्हणजे पुरे आहे. आमच्या आद्य श्रुतींमध्यें व त्यानंतरच्या भगवद्गीतेमध्यें चारच वर्ण सांगितले आहेत. मध्यंतरींच्या स्मृतींमध्यें मनूनें १० व्या अध्यायांत स्पष्ट म्हटलें आहे:—

**ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः ।**
**चतुर्थ एकजातिस्तु शूद्रो नास्ति तु पंचमः ४**

अर्थः—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण दोनदां जन्मतात; म्हणजे एकदां सृष्टिक्रमानें व मागून उपनयनसंस्कारानें. शूद्र सृष्टिक्रमाप्रमाणें एकदाच जन्मतो, ह्या चारीपेक्षां पांचवा असा वर्णच नाहीं.

म्हणजे चंडाल म्हणून जो वर्ग आहे तो वरील चार जातींचीच कशी तरी भेसळ होऊन झाला आहे, हें त्याच अध्यायांतील पुढील श्लोकावरून उघड होतें.

**शूद्रादायोगवः क्षत्ता चंडालश्चाधमो नृणाम् ।**
**वैश्यराजन्यविप्रासु जायन्ते वर्णसंकराः ॥१२॥**

अर्थः—शूद्र पुरुष आणि त्याच्यावरील वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण जातींतील स्त्री ह्यांच्यामध्यें प्रातिलोम म्हणजे उलट्या शरीरसंबंधामुळें जी प्रजा होते, तिला अनुक्रमें अयोगव, क्षत्ता आणि चंडाल अशीं नावें आहेत, त्यांत शूद्र आणि ब्राह्मणी ह्यांची संतति जी चांडाल तिला अत्यंत नीच मानून अस्पृश्य ठेवण्यांत आलें आहे.

मनूनें वर्णसंकराचा जो निषेध केला आहे, तो प्रतिलोमाचाच म्हणजे खालच्या जातीचा पुरुष आणि वरच्या जातीची स्त्री ह्यांच्या संबंधाचाच केला आहे. ह्याच्या उलट जो अनुलोमसंकर त्याचा निषेध केला नाहीं. स्मृतींत स्पष्ट म्हटलें आहे:—

**शूद्रायां ब्राह्मणाज्जातः श्रेयसा चेत्प्रजायते**
**आश्रेयान्श्रेयसीं जातिं गच्छत्यासप्तमाद्युगात् ॥**
**शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ।**
**क्षत्रियाज्जातमेवं तु विद्याद्वैश्यात्तथैव च ॥६५॥**

अर्थः—शूद्र कन्येला ब्राह्मणापासून कन्या झाली, त्या कन्येला पुनः ब्राह्मणापासून कन्या झाली आणि अशा सात पिढ्या झाल्यावर जी संतति होईल, ती अगदीं ब्राह्मणच उपजली असें होय. ह्याप्रमाणें शूद्राचा ब्राह्मण व ब्राह्मणाचा शूद्र बनतो,

ह्यांतील तत्त्व असें मानलें गेलें आहे कीं, स्त्रीपेक्षां पुरुषाचें अर्थात् क्षेत्रापेक्षा बीजाचें सामर्थ्य श्रेष्ठ, म्हणून प्रतिलोमापेक्षां अनुलोम संकर श्रेष्ठ आणि प्रतिलोमांतही स्त्रीपुरुषांत जितकें वर्णांचें जास्त अंतर असेल तितका संकर अधिक निषिद्ध आणि शेवटीं शूद्र आणि ब्राह्मणी ह्यांच्यांतील संकर तर अत्यंत अधम होय. तो करणें गुन्हा समजून त्याला अस्पृश्यत्वाची शिक्षा दिली आहे.

## गुन्हा आणि कडेलोटची शिक्षा.

असो. हा गुन्ह्याचा विचार एकीकडे ठेवला तर वस्तुतः पाहतां शूद्र पुरुष व ब्राह्मणकन्या ह्यांची संतति केवळ शूद्रसंततीपेक्षां अधिक श्रेष्ठ असली पाहिजे. मात्र येथें ब्राह्मण, शूद्र इत्यादि जातींचा दर्जा ठरवावयाचा तो केवळ गुणधर्माप्रमाणेंच ठरविला पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहतां आज अंत्यज मानलेले सर्व लोक वर सांगितल्याप्रमाणें जर खरोखरच शूद्रपुरुष आणि ब्राह्मणस्त्रिया यांच्या संबंधापासून उत्पन्न झालेले असते आणि त्यांना आजपर्यंत असली जबर शिक्षा भोगावी लागली नसती, तर त्यांची स्थिति आजच्या केवळ शूद्रांपेक्षां खात्रीनें उच्च दिसून आली असती.

मद्रासेकडील कर्नल आल्काटच्या पारिया शाळेंतील विद्यार्थ्यांची शाळेंतील इतरांच्या मानानें दिसून येणारी प्रगति आणि वऱ्हाड व मध्यप्रांतांतील रेलवेचीं कंत्राटें वगैरे घेऊन, पुढें सरसावलेल्या कांहीं महार मंडळीची अलीकडे झालेली सुस्थिति, ह्या गोष्टी लक्ष्यांत घेतां असें दिसून येतें कीं, ह्या तिरस्कृत वर्गांना योग्य रीतीनें थोडीशी सवलत किंवा मदत मिळाली असतां, त्यांच्या अंगीं बराच काळ दबून गेलेले चांगले गुण लवकरच विकास पावूं लागतात; पण तसा सुयोग फारच विरळा. एकंदरींत ह्या विस्तीर्ण देशांतील ह्या हतभागी लोकांची अवाढव्य संख्या लक्ष्यांत घेतली असतां, ह्यांची स्थिति सर्व बाजूंनीं केवळ शूद्रांपेक्षां अत्यंत हीन झाली आहे, हें उघड होतें.

ह्यावरून दोन प्रकारचीं अनुमानें निघतात. एक असें कीं, सांप्रत अस्पृश्य असलेल्या लोकांच्या सर्वच पूर्वजांनीं कांहीं वरील प्रतिलोमसंकरांचा गुन्हा केलेला नसावा. ह्यांच्यांतील बरेच लोक विशेषत: दक्षिणेकडील जाति केवळ एतद्देशीय अर्धवट रानटी अनार्य लोक असावे आणि त्यांचा वरील कोणत्याही श्रेष्ठ वर्णाशीं कसलाही शरीरसंबंध झालेला नसावा आणि ज्या अर्थी भिल्ल, गोंड, वहारी इत्यादि जाति जरी अद्यापि रानटी स्थितींत असूनही त्यांना अस्पृश्य समजण्यांत येत नाहीं, त्या अर्थी, ह्यांच्यांतील पुष्कळांना ही धर्मशास्त्राची शिक्षा लागू पडत नसावी. दुसरें अनुमान असें कीं, ज्यांच्या पूर्वजांनीं हा गुन्हा केला असेल, त्यांना आजपर्यंत झालेली ही अस्पृश्यत्वाची शिक्षा वाजवीपेक्षां अत्यंत कठोर झाली आहे. त्यांची स्थिति केवळ शूद्रांच्यापेक्षां स्वभावत: बरी असावी, ती तशी नसून उलट इतकी हीन झाल्यामुळें नुसतें त्यांचेंच नव्हे, तर राष्ट्राचेंही जबर नुकसान झालें आहे.

## शिक्षेचा सूड.

आर्य–अनार्यांचा विरोध उत्तर हिंदुस्थानापेक्षां दक्षिणेंतच जास्त दिसून येतो. त्यांत कर्नाटकाच्या खालीं दक्षिणेंत जसजसें जावें तसतसें तर हा स्पृश्यास्पृश्यविधि अधिक तीव्र होत जातो. रंग, चेहरा, चालीरीति वगैरेवरून पाहतां कर्नाटकांतील व्हलिया ( महार ), मादिग ( मांग ) इत्यादि ज्या जाति आहेत; त्यांचा वरच्या जातींशीं फारच कमी संकर झालेला असावा असें दिसतें. हे आपल्याला मूळचे एतद्देशीय समजतात, ह्यांना जंबु असेंही नांव आहे, ह्यांचा मूळ पुरुष जंबु नांवाचा होता. पूर्वी पृथ्वीचा हा भाग दलदलीचा आणि डळमळीत होता, तो *जंबूनें आपल्या मुलास जिवंत पुरून स्थिर केला, अशी ह्या लोकांमध्यें दंतकथा आहे. ह्या दंतकथेंत जरी विशेष तथ्य नसलें, तरी आर्य लोकांनीं ह्यांच्यापासून जमीन हिसकावून घेऊन तिला पुढें जंबुद्वीप हें नांव दिलें असावें, हें कांहीं अंशीं संभवतें. ह्या लोकांचा आर्यांच्या तीन वर्णांशीं जरी फार क्वचित्च संकर झालेला दिसतो, तरी जेव्हां जेव्हां तो झाला, तेव्हां तेव्हां त्याचा परिणाम फारच भयंकर झाला असावा, हें खालील आख्यायिकेवरून दिसन येतें.

ह्या व्हलिया जातींत *पोतराज ( रेड्याचे राजे ) ह्या नांवाची एक शाखा आहे. कर्नाटकांतील बहुतेक लहान मोठ्या गांवांत जेव्हां पटकी वगैरे भयंकर व्याधीच्या शमनार्थ ग्रामव्वाची ( दुर्गादेवीची ) जत्रा गांवकऱ्यांकडन करण्यांत येते, तेव्हां हे पोतराज—मुख्य हक्कदार, जत्रेंतले अध्वर्यूच असतात. जत्रेंत पुष्कळ रेड्यांचा वध होत असतो, त्यांतील मुख्य रेड्याचें शिर डोक्यावर घेऊन ह्या पोतराजांस, गांवपंचांस बरोबर घेऊन, नगरप्रदक्षिणा करावयाची असते. ह्या पोतराजांच्या उत्पत्तीसंबंधीं अशी एक चमत्कारिक दंतकथा आहे कीं, यांच्या मूळ पुरुषानें आपण ब्राह्मण आहों असें भासवून ग्रामव्वा नांवाच्या एका ब्राह्मणीशीं विवाह केला, पुढें जेव्हां तिला पोतराजाची हीन जात कळून आली, तेव्हां तो भिऊन रेड्याचें रूप घेऊन पळाला. ग्रामव्वानें आपल्या घरास आग लावून, पोतराजाचा पाठलाग केला आणि त्याचा वध केला.

मागें केव्हां तरी एखाद्या प्रमुख अनार्यानें आर्यस्त्रीशीं वर्णसंकर केला असेल व त्यावरून ही भयंकर झटापट झाली असेल. हल्लीं अमेरिकेंत एखाद्या गोरकाय तरुणीवर एखाद्या काळ्या निग्रोनें हात टाकला, तर कायद्याची वाट न पाहतांच सार्वजनिक रीतीनें त्याचा वध करण्यांत येतो, त्याला लिंचिंग असें म्हणतात. हें लिंचिंग जरी

* मुंबई गॅझेटियर सन ( १८८४ ), पुस्तक २२ पान २१४–२१७.

हल्लीं आमच्या देशांत उघडपणें होत नाहीं, तरी आजपर्यंत कर्नाटकांत ह्या प्राचीन लिंचिंगचें ओबडधोबड स्मारक ह्या जत्रेच्या रूपानें राहिलें आहे. अजूनही हे पोतराज ह्या जत्रेच्या शेवटीं देवीच्या समोर तिला शिव्याशाप देत, कित्येक गरीब कोंवळ्या कोंकरांना हातांत धरून दांतानें त्यांच्या अंगावरचें सर्व कातडें जिवंतपणीं सोलतात! हीं कोंकरें म्हणजे मूळ ह्या मव्वा नांवाच्या ब्राह्मणीचीं मुलें असें मानून त्यांचा असा भयंकर घात करून हे लोक आपल्या मूळ पोतराजाच्या लिंचिंगचा सूड उगवितात.

## मराठे वगैरे जातींशीं ह्यांचें साम्य.

हल्लीं ह्या देशांतील नीच मानिलेल्या एकंदर लोकांची स्थिति किंचित् सहानुभूतीच्या दृष्टीनें आणि उदार बुद्धीनें अवलोकन केल्यास असें दिसून येईल कीं, ह्यांच्यामध्यें अनेक प्रसंगीं अनेक कारणांनीं वरील पुष्कळ जातींची भेसळ होत आहे. गुजराथ, सिंध, गंगथडी इत्यादि प्रांतांत रहाणाऱ्या मेघवाल महारांचें असें म्हणणें आहे कीं, मागें काठेवाडांत एकदा बारा वर्षांचा दुष्काळ पडला होता, तेव्हां मेलेलीं जनावरें उचलून नेण्याचें काम केल्यामुळें त्यांना ही हीन दशा आली. *काठेवाडाकडील भंग्यांचे सहा पोटभाग आहेत, त्या सर्वांचीं नांवें पुढीलप्रमाणें अस्सल रजपुतांचीं आहेत. १ मकवान, २ परमार (पवार). ३ राठोड, ४ सोळांकी, ५ वाघेला व ६ डोरी. महाराष्ट्रांतील महारांमध्येंही मराठ्यांच्या अस्सल ९६ कुळांपैकीं बऱ्याच कुळांचीं नांवें आढळतात. तीं जाधव, साळुंके, चालुक्य, पवार, मोरे ( मौर्य ), गाईकवाड, शेलार, साळवी, सुरवसे, ( सूर्यवंशी ) इत्यादि.

महाराष्ट्रांतील महारांची भाषा पाहिली असतां त्यांचे उच्चार, स्वर व एकंदर बोलण्याची ढब मराठी कुणब्यांसारखीच आहे असें दिसून येतें. कोळी वगैरे गांवांत राहणाऱ्या खालील जातीच्या लोकांच्या भाषेंत कांहीं फरक दिसतो, पण ह्या बहिष्कृत लोकांच्या भाषेंत तितका फरक दिसत नाहीं. ह्यांच्या देव्हाऱ्यांवर खंडोबा, बहिरोबा, भवानी वगैरे मराठ्यांच्याच देवतांच्या मूर्ति दिसतात. नाशिक, त्र्यंबक, पैठण, पंढरपूर, तुळजापूर इत्यादि क्षेत्रांचे ठिकाणीं इतरांबरोबर ह्यांची गर्दी जमते आणि वारकरी, कथेकरी, भाविणी, वाध्ये वगैरे धर्मसंप्रदाय मराठ्यांप्रमाणें ह्यांच्यांतही पूर्वीपासून चालू आहेत. ह्या सर्व गोष्टींत ह्यांनीं आपल्याला उच्च म्हणविण्यासाठींच मराठ्यांचें केवळ अनुकरण केलें असावें असें म्हणावें, तर ह्यांच्या वरच्या कोळी वगैरे जातींनीं हें अनुकरण कां केलें नाहीं ? शिवाय, अनुकरण करून आपल्यास उच्च म्हणवून घेण्याचें चातुर्य ह्यांच्यांत असतें तर तें ह्यांनीं मराठ्यांचेंच कां केलें ? सर्वांत उच्च समजले गेलेले जे ब्राह्मण, त्यांचें अनुकरण ह्यांनीं कां केलें नसावें ?

## ह्यांच्या अंगचे गुण.

ह्या लोकांत इमानीपणा, करारीपणा, शौर्य इत्यादि नैतिक गुण अगदीं उपजत असलेले आढळतात. महारासारखी निमकहलाल जात दुसरी क्वचित्च सांपडेल ! म्हणूनच जुन्या व अलीकडच्या अमदानींतदेखील रखवालदारीचें, सरकारी पोतें पोंहोंचतें करण्याचें वगैरे विश्वासाचीं कामें ह्या लोकांकडेच चालत आलेलीं आहेत. मद्रास इलाख्यांत अव्वल इंग्रेजीचा पाया घालण्याच्या कामीं ज्या लढाया झाल्या, त्यांत तिकडच्या पारिया मंडळीनें अतुळ बहादुरी गाजविली आहे. क्लाइव्हच्या सैन्यामध्यें गोऱ्या सोजिरांस भात देऊन आपण वरचें नुसतें पाणी पिऊनच ह्या पारिया पलटणींनीं लढाया जिंकिल्या, अशी तिकडे प्रसिद्धि आहे; पण बिचाऱ्यांचा इतिहास लिहितो कोण !

आत्मिक गुणांचीही ह्या लोकांत वाण नाहीं उत्तरेकडे रोहिदास चांभार व महाराष्ट्रांत चोखोबा महार हे महान् साधुपुरुष प्रसिद्धच आहेत. "बुद्धि, विद्वत्ता आणि साधुता ह्यासंबंधीं प्राचीन काळीं पुष्कळ पंचम वर्गाचे लोक प्रसिद्धीस आले होते. आद्यकवि वाल्मिकी हा पंचम जातीचा होता, अशी कथा आहे. पद्मपुराण व ज्ञानवासिष्ठ ह्यावरून ह्या कथेला दुजोरा मिळतो. सुप्रसिद्ध ग्रंथ कुरळ ह्याचा कर्ता तिरुवेल्लुवर आणि वैष्णव लोकांनीं पूज्य मानलेले जे बारा संत झाले त्यांपैकीं एक तिरुप्पानियल्वर हे दोघेही मुळीं पंचम जातीचेच होते. यमुनाचार्यांचेच शिष्य मारनेर नंबियर हे एक महान् पंडित साधु

* मुंबई गॅझेटियर, महिकांठा पुस्तक ५, पान ६३.

झाले. ते पंचम असूनही त्यांना ब्राह्मण संन्याशा-प्रमाणें समाधि देण्यांत आली. "*

दुराग्रह टाकून ह्या आणि अशा अनेक गोष्टींचा विचार केला असतां कळून येतें कीं, हल्लीं नीच मानलेल्या ज्या असंख्य जाति आमच्या ह्या अफाट देशांत पसरल्या आहेत, त्यांचें खरें मूळ काय हें ठरवणें जरी कठिण आहे व पूर्वीपासून वरच्या जातींतून ह्यांच्यांत कशी कशी भर पडत गेली आहे तेंही कळण्यास जरी फारसा मार्ग नाहीं, तथापि एवढें मात्र उघड आहे कीं, ह्या वर्गांचे सर्वच लोक जितके मानण्यांत येत आहेत तितके मुळापासूनच नीच नाहींत. त्यांच्यांत वरिष्ठ वर्गापासून तों कनिष्ठ वर्गापर्यंत सर्वांचें अनेक कारणामुळें देशकालमानानें मिश्रण होत आलें आहे; आणि आज हजारों वर्षें ह्यांच्याशीं वरील वर्गांचा व्यवहार जबरीनें बंद पाडल्यामुळें ह्यांची अर्थातच अशी हीन आणि करुणास्पद स्थिति झाली आहे.

आजकाल आमच्या देशांत लहानमोठ्या सर्वांच्या अगदीं परिचयांतली अशी गोष्ट म्हणजे बहिष्कार ही होय.

> ह्या पृथ्वीवर सर्व मनुष्यजातीच्या इतिहासांत जर कां कोठें कधीं कोणावर प्रचंड बहिष्कार घालण्यांत आला असेल, व जो पुरातन काळापासून चालत येऊन हल्लीं पूर्णदशेला पोंहोंचला असेल, तर तो ह्या नीच मानलेल्या जातीवरचा हा भयंकर बहिष्कार होय ! !

मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायांत ह्या बहिष्काराचा सुमारें दोन हजार वर्षांपूर्वींचा असा दाखला आढळतोः—

**चांडालश्वपचानां तु बहिर्ग्रामात्प्रतिश्रयः ।**
**अपपात्राश्च कर्तव्या धनमेषां श्वगर्दभम् ५१**
**वासांसि मृतचैलानि भिन्नभांडेषु भोजनम् ।**
**कार्ष्णायसमलंकारः परिव्रज्या च नित्यशः ५२**
**न तैः समयमन्विच्छेत्पुरुषो धर्ममाचरन् ।**
**व्यवहारो मिथस्तेषां विवाहः सदृशैः सह ५३**
**अन्नमेषां पराधीनं देयं स्याद्भिन्नभाजने ।**
**रात्रौ न विचरेयुस्ते ग्रामेषु नगरेषु च ॥ ५४ ॥**
**दिवा चरेयुः कार्यार्थं चिह्निता राजशासनैः ।**
**अबांधवं शवं चैव निर्हरेयुरिति स्थितिः ॥ ५५ ॥**
**वध्यांश्च हन्युः सततं यथाशास्त्रं नृपाज्ञया ।**
**वध्यवासांसि गृण्हीयुः शय्याश्चाभरणानि च ५६**

**अर्थः**—चंडाल, श्वपच इत्यादि जातींनीं गांवाबाहेर रहावें, ह्यांच्याजवळ भांडीं नसावीं; कोंबडी आणि गाढव हेंच ह्यांचें धन; प्रेतावरचे कपडे, हींच ह्यांचीं वस्त्रें; ह्यांनीं फुटक्या मडक्यांत खावें, काळ्या लोखंडाचे अलंकार ल्यावे, नित्य भटकत असावें; इतरांनीं ह्यांच्यांशीं कसलाही व्यवहार करूं नये; त्यांना पाहूंही नये; ह्यांना अन्न द्यावयाचें असल्यास दुसऱ्याकडून खापरांतून देववावें; शहरांत किंवा खेड्यांत ह्यांनीं रात्रीं येऊं नये; दिवसा कामासाठींच कांहीं चिन्ह धारण करून यावें; तें काम म्हणजे बेवारशी प्रेत नेण, देहान्त शिक्षा झालेल्यांचा राजाज्ञेनें वध करणें व त्यांचे कपडे, दागिने वगैरे घेणें हीं होत.

दोन हजार वर्षांहूनही अधिक काळपर्यंत अशा ह्या घोर बहिष्काराचें जबरीचें वंशपरंपरागत वतन स्वीकारावें लागल्यामुळें, ह्या हतभागी लोकांची जी अवनति झाली आहे, तिच्याविषयीं यथार्थ ज्ञान इतरांना होणें कठीण ! इतकेंच नव्हे, तर स्वतः या लोकांनाही करून देणें जवळ जवळ अशक्य आहे ! असा बहिष्कार कधीं आणि कोठेंही घालण्यांत आला नसावा ! जरी असेल तरी त्याला इतकी पूर्ण सिद्धि आलेली नाहीं हें अगदीं खास ह्या बहिष्कार-कुठाराला दोन धारा आहेत. एका धारेनें ज्यांच्यावर हा बहिष्कार आहे, त्यांची स्वाभिमानबुद्धि कापून नष्ट केलेली आहे. ह्या दैवहतकांचा उपजत स्वाभिमान असा नष्ट झाल्यामुळें, जरी कदाचित् कोणी अपवादक दयेनें प्रेरित होऊन ह्यांना जवळ करण्यास गेला, तरी दोन हजार वर्षांच्या संवयीमुळें हे स्वतःच आपल्या हितकर्त्यापासून दूर दूर पळतात ! कारण, संवय म्हणजे दुसरा स्वभावच ! उलटपक्षीं, ह्या कुठाराच्या दुसऱ्या धारेमुळें ज्या उच्च वर्गांनीं हें बहिष्कार-शस्त्र पिढ्यान् पिढ्या आपल्या हातांनीं चालविलें, त्यांच्या ह्या लोकांसंबंधीं विवेक आणि करुणा ह्या दोन्ही शक्ति नष्ट झाल्या आहेत ! सर्व माणसांनीं

* मि. सि. वाय्. चिंतामणी ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या इंडियन् सोशल रिफॉर्म ह्या पुस्तकांतील मि० के. रामानुजाचार्य एम्. ए. बी. एल्. ह्यांचा निबंध पहा.

आपल्या गुणकर्माप्रमाणें गुजारा करावा, त्यांत कोणीं कोणास अडथळा करूं नये व हा उपजत हक्क ह्या नीच मानलेल्यांना आहे, हें साधें आणि उघड तत्त्व दुसऱ्यांना नीच मानणाऱ्या व आपल्याला उच्च म्हणविणाऱ्या कोळया–माळयापासून तों क्षत्रिय–ब्राह्मणापर्यंत कोणालाही मान्य होत नाहीं, ह्यांत त्यांचा कांहीं जाणूनबुजून अविचार किंवा कठोरपणा आहे, असेंच केवळ नव्हे; तर हा प्रताप केवळ त्या बहिष्कार–कुठाराच्या दुसऱ्या धारेचा! तिच्यामुळें ह्या स्वतःस उच्च म्हणविणाऱ्या व दुसऱ्यांस नीच मानणाऱ्या लोकांचा साहजिक विवेक आणि दया नष्ट होऊन ह्यांना संवयीनें असें वाटत आहे कीं, नीच मानलेल्या लोकांस देवानेंच ज्या अर्थी ह्या स्थितींत उत्पन्न केलें आहे, त्या अर्थी तीच स्थिति त्यांना योग्य आहे व म्हणून तिजबद्दल कोणालाही दोष देतां येणार नाहीं.

ह्यापेक्षां थोडा अधिक विचार केल्यास हे लोक असेंही म्हणूं लागतात कीं, ह्या नीच मानलेल्या लोकांस जर उच्च स्थितींत आणिलें, तर ते हल्लीं जीं समाजाचीं मलमूत्र साफ करण्यासारखीं हलकीं कामें करीत आहेत तीं पुढें कोण करील? जर कोणी तीं कामें करील तर तेही असे नीच मानल्यांत येतील! त्यापेक्षां हेच ह्या अवस्थेंत आहेत हें काय वाईट?

सुधारकांनीं विधवाविवाहाची प्रथम जेव्हां चर्चा सुरू केली, तेव्हां विधवांचीं लग्नें झाल्यास कुटुंबांत पोळया लाटण्याचें, मुलांचीं हागओक काढण्याचें, करपातर करण्याचें व अशींच दुसरीं फुकट्या मोलकरणींचीं कामें कोण करील? अशी एक मोठी अडचण त्यांचे प्रतिपक्षी काढीत असत! ती लक्ष्यांत घेतली असतां वरील शंका पाहून फारसें आश्चर्य वाटावयास नको! स्वतःच्या आयाबहिणी आणि मुली ह्यांच्यासंबंधीं देखील ज्यांची साहजिक दया, प्रेम व विवेक केवळ संवयीच्या जोरानें नष्ट होऊन जे असले कोटिक्रम करण्यास तयार होतात, ते गांवाबाहेरील महार–मांगांविषयीं वरील शंका काढतील यांत नवल काय? समाजाचीं असलीं घाणेरडीं कामें अनादिकालापासून माणसेंच करीत आलीं आहेत, आणि अनंत काळपर्यंत माणसांनींच तीं केलीं पाहिजेत, किंबहुना माणसांनाच तीं करावीं लागतील, असें कांहीं खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. मुसलमान लोक इकडे येण्याचे पूर्वी ह्या देशांत पायखान्यांची व्यवस्था हल्लीं आहे अशीच होती कीं काय? असती, तर मनुस्मृतींत चंडालाकरितां जीं सर्व नीच कामें सांगितलीं आहेत, त्यांत ह्याचा उल्लेख झाल्याशिवाय राहताना.* ह्या प्रांतांत म्युनिसिपालिट्यांची स्थापना झाल्यावर पायखाने साफ करण्याकरितां भंगी लोकांना गुजराथ, काठेवाड आणि पंजाब येथून आणावें लागलें. कारण येथील कोणीच अंत्यज मंडळी हें काम पत्करीना. ह्यावरून पायखान्यांची ही चाल उत्तरेकडूनच आली असावी, व ज्या अर्थी भंगी लोकांमध्यें बहुतेक मुसलमानच फार आहेत त्या अर्थी ही चाल मुसलमानांकडून प्रथम आली असावी, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. यद्यपि, भंगी लोक मुसलमानांतून आले नसले, तरी आज ज्या असंख्य लोकांवर हा सार्वजनिक बहिष्कार पडला आहे, ते सर्वच कोठें भंगी आहेत? आणि जे फार थोडे भंगी आहेत त्यांच्यावर तरी असा बहिष्कार कां असावा? इराण, अरबस्थान वगैरे मुसलमानांच्या देशांत, किंबहुना पृथ्वीवरच्या कोणत्याही देशांतील भंगी लोकांवर हा बहिष्कार नाहीं; मग आमच्याच देशांत हा राष्ट्रघातकी सोंवळेपणा कां असावा?

महार, चांभार, मांग, ढोर वगैरे सर्व अस्पृश्य वर्ग आमच्या हिंदुधर्मांतच मोडतात, ह्यांना जर कोणी परधर्मीयांनीं बाटविलें आणि त्यांची स्थिति सुधारली, तर आम्ही धर्माभिमानी आमच्या धर्माची महान् हानि झाली म्हणून आक्रोश करितों, पण ज्या महारांना ते हिंदुधर्मांतच राहून कितीही चांगले धंदे करून संपन्न असले तरी आम्ही स्पर्श करण्यास किंवा आमच्या उंबरठ्याचे आंत येऊं देण्यास तयार नसतों, तेच महार ख्रिस्ती किंवा मुसलमान झाले, कीं त्यांच्याशीं हात हालविणें–किंबहुना प्रसंगीं आडजागीं एखादा चहाचा पेलाही झोंकणें, ह्यांत आम्हांला कांहीं वाटत नाहीं! मग हा जो बहिष्कार आहे, तो ह्या अंत्यज मंडळीवर कीं त्यांच्यामध्यें असलेल्या हिंदुधर्मावर? एका बाजूनें अशा मंडळीस ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं बाटविलें कीं आक्रोश करा.

* मुंबई गॅझेटियर, ठाणें, पुस्तक १३, भाग १, पान १९०.

वयाचा, आणि दुसऱ्या बाजूनें अशा ह्या बाटग्या अंत्यजांवरचा सर्व बहिष्कार काढून त्यांना उद्योग धंद्यांत आणि स्पर्शव्यवहारांत मोकळीक ठेवावयाची, आणि जे हिंदु राहिले त्यांचा मात्र तिरस्कार करावयाचा हा कोण विसंगतपणा !

मनुस्मृतींत दहाव्या अध्यायांत स्पष्ट म्हटलें आहे:—

**शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः।**
**शूद्रो हि धनमासाद्य ब्राह्मणानेव बाधते १२९**

**अर्थ**—अंगीं सामर्थ्य असलें तरी शूद्रानें धनसंचय करूं नये कारण अशापासून ब्राह्मणास बाधा होते.

शूद्रालाच संपन्नता मिळविण्याची धर्मशास्त्रांत परवानगी नाहीं! मग अतिशूद्राला ती कोठून असणार ? पण अशा अतिशूद्रानें वाटल्यास ह्या हिंदुधर्माच्या कचाट्यांतून सुटून परधर्मांत जावें. म्हणजे त्याला मनुष्यजातीचे सर्व उपजत हक्क मिळतात ? असें समजून वरील विसंगतपणा टाळावयाचा कीं काय ?

ह्या लोकांच्या पूर्वजांनीं असा कोणता गुन्हा केला असेल कीं, त्यांच्या वंशजास आम्ही अद्यापही अशी भयंकर सजा द्यावी? वर्णसंकर, व्यभिचार, देशद्रोह, राजद्रोह, धर्मद्रोह ह्यांपैकीं कोणताही भयंकर गुन्हा हल्लीं कोणी करीत नाहीं काय? जे करतात त्यांना अशी जबर शिक्षा हल्लीं समाजाकडून होत आहे काय ? तर मग, ह्यांच्या पूर्वजांनीं तो केला ह्मणून ह्यांनाच हा बहिष्कार भोगावा लागतो ह्याचें कारण काय? केवळ रूढि चालत आली आहे, आणि ह्या बाबतींत पुढारी मंडळी जोरानें चळवळ करून लोकमत जागृत करीत नाहीं व सतत प्रयत्न होत नाहीं, ह्मणूनच हा प्रकार चालू आहे. ईश्वरानें निर्माण केलेला असा कोणताही प्राणी नाहीं कीं, तो अस्पर्श मानला आहे ! मनुष्यप्राण्यांपैकीं मात्र ह्या लोकांना बाहेर ठेवलें जात आहे ! महाराच्या घरच्या कुत्र्यालाही आम्ही शिवूं, पण त्या महाराला शिवणार नाहीं !

### बहिष्कारामुळें झालेली हल्लींची स्थिति.

वर सांगितल्याप्रमाणें आज हजारों वर्षें हा असा बहिष्कार भोगल्यामुळें व हल्लींच्या प्रगतीच्या काळींही हा बहिष्कार व्हावा त्या मानानें कमी न झाल्यामुळें, ह्या दुर्दैवी लोकांची स्थिति सांपत्तिक, नैतिक व धार्मिक इत्यादि सर्वच बाजूंनीं अगदीं करुणास्पद झाली आहे. तथापि कांहीं सुशिक्षित मंडळींस हें म्हणणें पटत नाहीं, ह्याचें कारण असें कीं, अलीकडे रेलवे वगैरे संबंधीं लहानमोठीं कंत्राटें घेऊन क्वचित् महार मंडळी चांगली श्रीमंत झालेली आढळते; पण असे अपवाद किती थोडे आहेत ह्याचा विचार करावयाला नको काय ? दुष्काळ किंवा प्लेग वगैरे आधिदैविक संकटें ह्या गांवाबाहेरच्या लोकांस कशीं भोंवतात, त्यांचीं प्रत्यक्ष उदाहरणें डोळे उघडे ठेवणारास पावलोपावलीं दिसून येतील.

कोणी कोणी असेंही म्हणतात कीं, नीच मानलेल्या लोकांना वाटेल तें काम करण्याची मुभा असल्यामुळें त्यांना इतरांपेक्षां मजुरी चांगली मिळते. हाडें, कातडें, चरबी वगैरे संबंधीं सर्व उद्योग चांभार, ढोर ह्या खालच्या जातींकडेच आहे, हें खरें; पण ह्या धंद्यांत केवळ मजुरी मात्र ह्या लोकांकडे राहिली आहे व भांडवल आणि व्यापाराचा सर्व फायदा उच्च वर्गाच्या हिंदूंनीं नसला तरी मद्रासी मुसलमान व बोहऱ्यांनीं बळकावला आहे. याचें कारण हेंच कीं, या लोकांची सभ्यता, संस्कार व एकंदरींत सर्व सामाजिक स्थिति बहिष्कारामुळें अत्यंत हीन राहिल्यामुळें, जरी चांभार वगैरे वर्गांची मिळकत व पुंजी कोळ्यामाळ्यांपेक्षां बरी असली, तरी त्या स्थितीचा फायदा घेऊन यांना आपली हिंदुसमाजांत बढती करून घेण्यास कांहीं वाव उरला नाहीं. यामुळें आपलें वडिलोपार्जित डबोलें चुलीजवळ पुरून ठेवून फाटकी लंगोटी आणि फुटकें मडकें यावरच पिढयान पिढया गुजारा करण्याची चांभार वगैरे जातींना संवय लागली आहे. बहिष्काराचा वरवंटा डोक्यावर सारखा फिरत असल्यामुळ त्याखालीं त्यांच्या महत्त्वाकांक्षेला अवकाशच रहात नाहीं. असा प्रकार असतांना त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली आहे म्हणून एखाद्या कुणब्याला हेवा वाटेल काय ? सुशिक्षित मंडळीकडूनच असा आक्षेप केव्हां केव्हां निघतो, ह्याचें कारण केवळ बहिष्कारकुठाराच्या दुसऱ्या धारेचा परिणामच होय, दुसरें काय !

केवळ शारीरिक आरोग्याच्या दृष्टीनें पाहतांही ह्या लोकांच्या स्थितींत कसा फरक दिसून येतो,

त्याचा एक मासला खालील आंकड्यांवरून दिसेल. हे आंकडे इ. स. १९०१ सालच्या हिंदुस्थानच्या खानेसुमारीवरून घेतलेले आहेत.

**मुंबई इलाखा.**

| | एकंदर तपासलेल्या लोकांची संख्या. | तपासल्यापैकीं महारोगी आढळले त्यांची संख्या. |
|---|---|---|
| ब्राह्मण | १,००,००० | |
| युरेशिअन | १,००,००० | ३१ |
| महार, धेड | १,००,००० | ८८ |
| मराठे | १,००,००० | ७७ |
| **वऱ्हाड.** | | |
| धनगर | १७,७१६ | २३ |
| कुणबी | १,८७,२०३ | २५९ |
| महार | ९६,३८१ | ८६ |
| पठाण | १२,७७० | ११ |
| **मध्यप्रांत.** | | |
| भिल्ल | २२,११० | ६ |
| ब्राह्मण | ३,९१,५१९ | ८४ |
| चांभार | ३५,२६२ | ३८६ |
| तेली | ७,१२,१७० | ५७० |
| **मद्रास.** | | |
| ब्राह्मण | ११,९८,९११ | ३९५ |
| युरेशिअन | २६,२१० | २७ |
| होलिया,(महार) | १,४७,९८७ | १२८ |
| कामाठी | ४,२८,१८८ | १३९ |

नैतिक बाबतींत विशेष लिहावयास नकोच! अलीकडच्या कोणत्याही लष्करी छावणींत गेल्यास तेथें ज्या हतभागी स्त्रियांनीं दुकानें मांडून स्वतःचे देह विकावयास ठेविलेले आढळतात त्या कोणत्या वर्गांतल्या असतात हें प्रसिद्ध आहे.

धार्मिक बाबतींत तर विचारच करावयाला नको. हिंदुधर्म बोलूनचालून ह्या वर्गासंबंधीं बेजबाबदार! इतकेंच नव्हे, तर त्यानें आज इतकीं वर्षें ह्या पामरांवर बहिष्कारशस्त्र धरलें आहे. वास्तविक पाहतां, हे धर्मबाह्यच आहेत. अलीकडील देशाभिमानाचें वारें अंगांत शिरल्यापासून कांहीं 'दे. भ.' 'दे. वं.' ह्या वर्गांशीं नुसता शाब्दिक आपलेपणा जोडीत आहेत; पण खरे धर्माभिमानी ह्यांना कितपत आपले म्हणतात हें जगजाहीर आहे! मुसलमानांनींही आजवर ह्यांचा तिरस्कारच केला आहे. मुसलमानांचा सगळा रोख हिंदु म्हणविणारांना बाटविण्याकडे होता. तेव्हां त्यांना ह्या ग्रामबाह्य लोकांना सहज मुसलमान करून घेतां आलें असतें; परंतु तसा प्रकार कोठें आढळत नाहीं, ह्यावरून अव्वल मुसलमानींत ह्या वर्गांची गणना हिंदूंत होती की नाहीं, ह्याबद्दल शंका येते. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं मात्र ह्यांच्यासाठीं पुष्कळ प्रयत्न चालविले आहेत व त्यांत त्यांना बरेंच यशही आलें आहे. केवळ परोपकाराच्या दृष्टीनें पाहतां इतर बाबतींप्रमाणेंच ह्याही बाबतींत ख्रिस्तीधर्माची आणि मिशनरी मंडळीची, करावी तितकी स्तुति थोडीच आहे.

एकंदरींत कोणत्याही दृष्टीनें पाहतां हल्लीं अस्पृश्य मानलेल्या ह्या वर्गांची स्थिति अत्यंत शोचनीय आहे, हें आपल्यांपैकीं पुष्कळांस कबूल होत नसल्यास इतकेंच म्हणणें भाग पडतें कीं 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे!' पण राष्ट्रीय दृष्टीनें पाहतां यांची स्थिति सर्व राष्ट्राला घातक आहे, हें तरी निदान त्यांच्या वंशास न जातांहि कळावयाला पाहिजे आहे!

## संख्या.

येथवर ह्या हतभागी लोकांची मूळ उत्पत्ति, त्यांच्यावर पुरातन काळापासून आजपर्यंत पडलेला घोर बहिष्कार व त्यामुळें त्यांची सर्व बाजूंनीं आज दिसून येणारी हीनदीन स्थिति वगैरे गोष्टींचा स्थूल दृष्टीनें विचार केला. आतां ह्या अफाट देशांत अशा हीन दशेप्रत पोहोंचलेल्या वर्गांतील लोकांची एकंदर संख्या किती आहे, हें पाहूं.

वर सांगितलेल्या भयंकर अन्यायाचे प्रसंग ह्या लोकांवर कितीहि गुदरले असले, आणि सहृदय मनुष्यास लाज आणणारे हे प्रकार हजारों वर्षें जरी घडत असले, तथापि त्याचा दुष्परिणाम ज्यांना प्रत्यक्ष भोगावा लागतो, अशांची संख्या अगदीं थोडीथोडकी असती, आणि मग तिकडे आमच्या लोकांनीं दुर्लक्ष्य केलें असतें, तर एकादे वेळीं चालतें असत! कारण, हल्लीं आमच्या देशाचा पाया सर्वच दिशांनीं पाहतां खोलांत चालला आहे, अशा वेळीं आमच्या पुढाऱ्यांना पुष्कळ मोठमोठ्या राष्ट्रीय महत्त्वाच्या गोष्टींत मन घालावें लागत असल्यामुळें, कांहीं व्यक्तींवर किंबहुना एक—

दोन जातींच्या एक दोन लाख माणसांवर एकादा स्थानिक अथवा प्रासंगिक तात्पुरता अन्याय होत असता आणि तिकडे आमच्या उद्योगी पुढाऱ्यांचें लक्ष्य वेधलें नसतें, तर त्यांत फारसें आश्चर्य नव्हतें. पण वस्तुतः तसा प्रकार मुळींच नाहीं ! उलट अतिशय आश्चर्याची गोष्ट ही कीं, हिंदु-साम्राज्यांत ह्या अंत्यज वर्गाची प्रचंड संख्या असून व ती ह्या खंडवजा विशाल देशांत सर्वत्र पसरली असून, ती किती आहे व कशी पसरली आहे, ह्याची बरोबर कल्पना करून घेण्याची कोणाला इच्छाहि होत नाहीं ! दर दहा वर्षांनीं सरकारी खानेसुमारींत ह्या वर्गाची संख्या प्रसिद्ध होत असते. तथापि ती एकत्र केली असतां किती मोठी होईल, हें देखील कोणी पाहण्याची तसदी घेत नाहीं !

ता. ३१ मार्च १९०१ रोजीं रात्रीं करण्यांत आलेल्या हिंदी साम्राज्यांतील (बलुचिस्तान, ब्रह्मदेश, निकोबार, अंदमान हीं सर्व मिळून) खानेसुमारीवरून हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या २९,४३,६१,०५६ होती ह्यांत एकंदर अंत्यज संख्या ५,३२,३६,६३२ आहे. हा एकूण आंकडा सन १९०१ च्या सेन्सस रिपोर्टाच्या भाग १, पान ५६०-५६९ मध्यें जी जातवारी दिली आहे. हा तिच्यावरून तयार केला आहे. तयार करतांना मूळ कोष्टकांत ज्या जातींना Untouchable or Depressed classes म्हणजे अस्पृश्य अथवा निकृष्ट झालेल्या जाति असें नांव दिलें आहे, त्यांचाच अंत्यज नांवाखालीं समावेश करण्यांत आला आहे. मुसलमान लोकांमध्येंहि अश्राफ (वरिष्ठ) अज्‌लाफ (मध्यम) आणि अर्जाल (हीन), असे भेद दाखविण्यांत आले आहेत व त्यांची संख्या उत्तर हिंदुस्थानांतील गणतीमध्यें निरनिराळी दाखविली आहे. अर्जाल वर्गाचे मुसलमान बहुतेक मूळचे अंत्यज जातींतून मुसलमान झाले असावे, आणि म्हणनच ह्यांनीं धर्मांतर केलें तरी इस्लामसारख्या एकांतिक धर्मांतहि ह्यांना हीन मानण्यांत येत असावें. हिंदुस्थान देशांत एकंदर मुसलमानांची संख्या ६,२४,५८,०७७ आहे व त्यापैकी उत्तर हिंदुस्थानांत हीन मुसलमानांची संख्या ८६,२८,५६६ दाखविण्यांत आली आहे. पण ह्यांचा समावेश वरील अंत्यज संख्येंत करण्यांत आलेला नाहीं. कारण, हे मुसलमान असल्यानें ह्यांची स्थिति कितीहि हीन असली तरी हिंदु अंत्यजाइतकी ती असेल कीं काय, ह्याबद्दल शंका आहे. तथापि हिंदु जातिभेदाचा परिणाम कडकडीत मुसलमानी धर्मावरही कसा घडत आहे, ह्याचें वरील हीन मुसलमानांची संख्या हें एक चांगलें उदाहरण आहे. बलुचिस्थान व सरहद्दीवरील तुर्की-इराणी प्रदेशांतील मुसलमानांमध्यें उत्तम, मध्यम व कनिष्ठ असा भेद केलेला दिसत नाहीं. ह्याचे कारण, तेथील मुसलमानांमध्यें हिंदूंतून मुसलमान बनविलेल्यांची भेसळ क्वचितच झालेली आहे हें होय. तसेंच दक्षिणेंतील मुसलमानांमध्येंहि असा भेद केलेला नाहीं. ह्याचें कारण असें असावें कीं, इकडील हल्लींचे बहुतेक मुसलमान पूर्वींचे हिंदूच असल्यानें असा भेद असणें शक्य नाहीं. मध्यंतरीं उत्तर-हिंदुस्थानांतल्या मुसलमानांतच हा उचनीच भेद दिसून येणें शक्य आहे व तो तसा दाखविण्यांत आला आहे. ह्याप्रमाणें बलुचिस्थान व वायव्य सरहद्द आणि तसेंच नर्मदेच्या खालचें सर्व दक्षिण हिंदुस्थान इतका भाग वगळला असतां, बाकी जो अस्सल उत्तर-हिंदुस्थानचा भाग पंजाब, काश्मीर, राजपुताना, संयुक्तप्रांत, बंगाल, बिहार, ओरिसा इत्यादि राहतो; त्यामध्यें मुसलमानांची एकंदर संख्या ४,७०,४८,५८१ आहे आणि त्यापैकीं ८६,२८,५६६ म्हणजे एक षष्ठांशाहून अधिक हीन मानलेले मुसलमान आहेत. तथापि ह्यांची गणना अंत्यजांत केलेली नाहीं, हें वर सांगितलेंच आहे.

## अंत्यज आणि एकूण हिंदूंची प्रांतनिहाय संख्या.

| प्रदेश. | | अंत्यज. | एकूण हिंदु. |
|---|---|---|---|
| हिंदु आर्य | (पंजाब, काश्मीर, राजपुताना इ.) | ३६,३८,७४५ | १,९७,३१,५९२ |
| सिथियो-द्रविड | (मुंबई, बडोदा, कूर्ग.) | ३४,७९,०८४ | १,६७,३४,९५२ |
| द्रविड | | | |

| | | |
|---|---|---|
| मद्रास, म्हैसूर. | १,५३,७४,०७३ | ५,२६,२६,३६६ |
| ( अ )—( हैदराबाद, त्रावणकोर, कोचीन ) | | |
| ( ब )—( छोटा नागपूर इ. ) | ३९,३७,७९९ | ६४,००,३६० |
| ( क )—( वऱ्हाड आणि मध्यप्रांत ) | २३,४५,२१० | १,३३,३२,३९८ |
| आर्य द्रविड | | |
| ( अ )—( संयुक्तप्रांत. ) | १,००,४८,८५८ | ४,०६,४९,३९१ |
| ( ब )—( बिहार. ) | ४१,१६,०८३ | १,८९,८८,७०३ |
| मोंगल द्रविड | | |
| ( अ )—( बंगाल. ) | ७९,५८,७२१ | १,७७,२१,०८० |
| ( ब )—( ओरिसा. ) | ११,०६,७९३ | ३७,६६,५२७ |
| मोंगल ( आसाम, सिक्कीम इ. ) | १२,३१,२६६ | २७,६८,३६९ |
| एकूण | ५,३२,३६,६३२ | १९,८७,१९,७३८ |

ज्यांचें वर्गीकरण करतां आलें नाहीं व जे अर्धवट रानटी स्थितींत आहेत; अशा हिंदु-लोकांची संख्या ह्याशिवाय आहे. ती धरली असतां एकूण हिंदूंची संख्या २०,७१,४७,०२६ इतकी होते.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतील एकूण हिंदुसंख्येमध्यें अति उच्च मानलेल्या व अति नीच मानलेल्या जातींचें दर शेंकडा प्रमाण खालीं दिल्याप्रमाणें आढळन येतें.

| प्रदेश. | ब्राह्मण. | अंत्यज अथवा पंचम. |
|---|---|---|
| १ पंजाब, काश्मीर, राजपुताना. | १२ | १८ |
| २ मुंबई, बडोदें, कूर्ग. | ६ | १७ |
| ३ मद्रास, म्हैसर, हैदराबाद. | ४ | ३० |
| ,, छोटानागपूर. | ३ | ५८ |
| ,, मध्यप्रांत, वऱ्हाड. | ८·५ | १६ |
| ४ संयुक्त प्रांत, अयोध्या, अलाहाबाद. | १३ | २५ |
| ,, बिहार. | ५ | २१ |
| ५ बंगाल. | ६ | ४५ |
| ,, ओरिसा. | १० | ३० |
| ६ आसाम, सिकीम, कुचबिहार. | ३ | ४४ |

**उत्तर-हिंदुस्थानांतील मुसलमान लोकांचे उच्च नीच दर्जाचे विभाग.**

| | पंजाब, काश्मीर. | संयुक्त प्रांत, बिहार. | बंगाल, ओरिसा. |
|---|---|---|---|
| अश्राफ् ( वरिष्ठ ) | १५,१६,९९८ | ४५,९०,०६० | १,९९,८०,५४७ |
| अजलाफ ( कनिष्ठ ) | ५६,६८,६४९ | १३,६१,९८३ | ८,८७,६८९ |
| अर्जाल् ( हीन ) | ५८,४६,४६६ | २७,७५,००३ | ७,०९७ |
| वर्गीकरण न केलेले | २३,०२,६९४ | १५,६७,४०० | ५,४४,०७५ |
| एकूण | १,५३,३४,८०७ | १,०२,९४,४४६ | २,१४,१९,४०८ |

| | |
|---|---|
| उत्तर-हिंदुस्थानांतील एकंदर मुसलमानांची संख्या. | ४,७०,४८,५८१ |
| सदरपैकीं हीन मुसलमान वर्गांची संख्या. | ८६,२८,५६६ |
| सर्व हिंदुस्थानांतील एकूण मुसलमानांची संख्यां. | ६,२४,५८,०७७ |

### अंत्यज अथवा पंचम वर्गाच्या कांहीं मुख्य जातींची सर्व हिंदुस्थानांतील एकूण संख्या.

| जात. | वसतीचा प्रदेश. | एकूण संख्या. |
|---|---|---|
| चांभार | बहुतेक भाग | १,११,३७,३६२ |
| मोची | ,, | १०,०७,८१२ |
| डोंब | बंगाल, आसाम, पंजाब. | ९,७७,०२६ |
| भंगी | मुंबई, संयुक्तप्रांत, राजपुताना. | ६,५६,५८६ |
| ढाणूक | बंगाल, पंजाब. | ८,७०,५५७ |
| बागडी | बंगाल, आसाम. | १०,४२,५५० |
| बळई | माळवा, मध्यप्रांत. | ५,८४,३३४ |
| च्छुरा | उत्तर हिंदुस्थान. | १३,२९,४१८ |
| नामशूद्र चंडाल | ,, | २०,३१,७२५ |
| राजवंशी | ,, | २४,०८,६५४ |
| महार | मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत. | २९,२८,६६६ |
| मांग | ,, | ५,७९,३०६ |
| व्हलिया (महार) | कर्नाटक, मद्रास. | ७,७०,८९९ |
| मादिक (मांग) | ,, | १२,८१,२५२ |
| पारिया | मद्रास, ब्रह्मदेश, | २२,५८,६११ |
| शिक्लिया | ,, | ४,७८,४९६ |
| माल | मद्रास, बंगाल. | १८६३,९०८ |
| इतर सर्व | | २,०९,९९,४७० |
| एकूण | | ५,३२,०६,६३२ |

| | |
|---|---|
| हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या | २९४३,६१,०५६ |
| एकूण हिंदु लोकसंख्या | २०,७१,४७,०२६ |
| एकूण अंत्यज लोकसंख्या | ५,३२,०६,६३२ |
| हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या | २९,४३,६१,०५६ |
| एकूण मुसलमान लोकसंख्या | ६,२४,५८,०७७ |
| पैकीं हीन मुसलमान लोकसंख्या | ८६,२८,५६६ |

ह्या आंकड्यांवरून असें सिद्ध होतें कीं, हिंदु लोकांपैकीं एकचतुर्थांशापेक्षां अधिक संख्या हीन मानलेल्या अंत्यज जातीची आहे, व मुसलमान लोकांपैकीं जवळ जवळ एक सप्तमांश हीन मानलेल्या अर्जाल वर्गाची आहे. ह्या हीन मुसलमानांची संख्या विचारांत न घेतां नुसत्या हिंदु अंत्यजांची संख्या हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येशीं ताडून पाहिली तरी ती तिच्या एक षष्ठांशाहून अधिक भरते! म्हणजे, प्रत्येक सहा हिंदी माणसांमध्यें ( मग ते कोणत्याही जातीचे किंवा धर्माचे अथवा रंगाचे असोत ) एक अगदीं टाकाऊ—शिवून घेण्याला देखील अयोग्य मानलेला असा मनुष्यप्राणी सांपडतो !!!

### पुढें काय ?

येथवर ह्या भारत देशानें आपल्याच एका भागावर कसा कडक बहिष्कार घातला आहे ? ह्या बहिष्काराचा आतांपर्यंत काय परिणाम झाला आहे ? आणि हा बहिष्कृत झालेला ह्या देशाचा कितवा भाग आहे, याविषयीं विचार झाला. आतां पुढें काय करावयाचें व त्यासंबंधीं हल्लीं काय चाललें आहे. याचा विचार करण्यापूर्वी या गोष्टी संबंधीं एकदोन आगंतुक मुद्दयांचा विचार करणें अवश्य आहे.

### इंग्रजी अमलांतील स्थिति.

इंग्रजी या शब्दानें आमच्या देशांतील इंग्रज सरकार आणि पाश्चात्य आधुनिक सुधारणा या दोन्हींचा अंमल दर्शित करण्यांत येतो. एका पिढीच्या मागें इंग्रज सरकार म्हणजे मायबाप सरकार ( Parental Government ) अशी तत्कालीन समजुतदार माणसाची कल्पना होती. इंग्रज सरकार हें शहाणें आणि जबरदस्त आहे आणि त्याच्यापासून हिंदुस्थानचें हित बरेंच झालें आहे आणि पुढेंही होण्याची आशा अद्यापि नष्ट झाली नाहीं, असें पुष्कळ समजुतदार माणसांना अद्यापिही वाटत आहे. हल्लीं युगांतर झपाट्यानें होत असल्यामुळें या कल्पनेस प्रस्तुत काळीं बराच आळा बसला आहे. आणि हें योग्यच आहे. कारण, आईबापांची कामगिरी सरकारी रीतीनें मागें कधींच झाली नाहीं आणि पुढें होईल अशी आशा करणें मनुष्यजातीला शोभत नाहीं. म्हणून इंग्रज सरकाराला ते मायबाप नाहींत म्हणून दोष देणाऱ्या माणसांत मुळीं माणुसपणाच कमी आहे, असें म्हणणें फारसें वावगें होणार नाही. इंग्रज लोक या देशांत केवळ आधुनिक सुधारणेचा अंमल गाजविण्याकरितां जरी आले नाहींत—मायबापगिरी बाजूला राहिली—तरी पर्यायानें त्यांच्यामुळें सुधारणेचा हितकारक अंमल बसत चालला आहे, हें त्यांच्या शत्रूंसही कबूल करावें लागेल. इंग्रजी राज्य आणि आधुनिक सुधारणा ह्यांचें प्रस्तुत विषयाला अनुलक्षून पाहतां एक प्रकारें ऐक्य आहे, असें दिसून येईल.

आतां अलीकडे इंग्रजी राज्यांत आणि सुधारलेल्या मनूंत ह्या बहिष्काराचा कडकपणा पुष्कळ कमी झाला आहे कीं काय, असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. ह्या मध्यंतरींच्या दीर्घ काळांत ह्यांची कडक अंमलबजावणी झाली आहे, ह्याला पुष्कळ दाखले सांपडतील; पण हल्लीं इंग्रजींच्या महात्म्यानें हा कडकपणा बऱ्याच ठिकाणीं कांहीं अंशीं कमी झाला आहे, ही गोष्ट ह्या लोकांच्या अत्यंत कळकळीच्या कनवाळूसही कबूल करावी लागेल, आणि ह्याबद्दल त्याला आनंदहि वाटेल. तथापि हल्लींच्या सर्व बाजूंनीं होणाऱ्या प्रगतीच्या मानानें व इंग्रजसरकारच्या सत्तेच्या, संपत्तीच्या आणि शहाणपणाच्या मानानें पाहतां ह्या लोकांचा आज जी दाद लागत आहे, ती फारच अल्प होय, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. मिठावरचा आणि जमिनीवरचा कर, जकात आणि दुसऱ्या अशाच सर्वसाधारण करांची वसुली करते वेळीं सरकार अमुक जाति उच्च आणि अमुक जाति नीच हा भेद पाहत नाहीं; पण असें असूनहि न्यायकोर्टें, दवाखाने, शाळा, पोस्ट आफिसें इत्यादि सार्वजनिक जागीं नीच मानलेल्या वर्गास उच्च म्हणविणारांच्या दृष्टीनें वागविण्यांत येतें, त्यामुळें ह्या आधींच रंजलेल्या बापड्यांस अनेक अपमान, अडचणी आणि पुष्कळ वेळां अन्यायहि सोसावे लागतात. कर घेतेवेळीं सरकार जी समदृष्टि ठेवितें ती प्रजापालनाचे वेळीं कां ठेवित नाहीं? ती ठेवणें जर कांहीं राजकीय धोरणामुळें अशक्य किंवा अनिष्ट असेल, तर कर घेण्यांतहि तशीच विशेष सूट असावयाला नको होती काय? असो; ह्या बाबतींत सरकाराचा कदाचित् फारसा दोष नसेल. आपल्या राज्यांत सर्वांना सारखे हक्क आहेत असें सरकारानें जाहीर केलें आहे व तशी त्याची इच्छा व प्रयत्नहि आहेत. पण ह्या जाहीर इच्छेची अखेरची अंमलबजावणी आमच्या लोकांवरच अवलंबून असल्यामुळें सरकार केव्हां केव्हां अगदीं पंगू बनून जातें. तथापि सरकारचा फार नसला तरी थोडा तरी दोष आहेच. लोकांच्या धर्मसमजुतींत हात घालावयाचा नाहीं, हें सरकारचें धोरण जरी फार इष्ट आणि अवश्य आहे, तरी प्रजेपैकीं कांहीं वर्गांच्या धर्मसमजुती, सार्वजनिक शांतता, वगैरे सबबींवरून एकाद्या वर्गाच्या उपजत हक्कांची पायमल्ली होते तेव्हां सरकारानें तिकडे काणाडोळा करणें म्हणजे आपल्या प्रजापालनाच्या कर्तव्यास अंशतः तरी चुकणेंच होय. वऱ्हाडप्रांतांत अंत्यज मुलांस शाळांतून इतरांबरोबर बसविण्यांत येतें; इतकेंच नव्हे, तर सरकारी नोकरींतहि ह्या जातींपैकीं थोड्यांचा शिरकाव झाला आहे, ही गोष्ट खरी आहे; आणि ती तेथील सरकारी अंमलदार आणि उच्च वर्ग ह्या दोघांनाहि भूषणावह आहे. तथापि इतर प्रांतांत मोठमोठ्या शहरांतूनहि याच्या अगदीं उलट प्रकार राजरोस चालू आहेत! सरकारच्या तगाद्यामुळें म्युनिसिपालट्यांनीं मोठमोठ्या गांवीं अंत्यजांसाठीं वेगळ्या शाळा काढिल्या आहेत; पण अंत्यज शाळेकरितां चांगले हुषार मास्तर नेमण्यासंबंधीं म्युनिसिपल बोर्डाकडून फारच थोडी काळजी घेण्यांत येते. एकादी धर्मार्थ शाळा उघडली कीं, आपलें कर्तव्य आटोपलें, असें बाडास वाटतें. शाळा कोठें तरी दूर कोपऱ्यांत असावयाची, तेथें एक अर्धवट शिकलेला मुसलमान मास्तर ठेवावयाचा, आणि असा जुलमाचा रामराम करून वेगळें व्हावयाचें!

सरकारी नोकरीसंबंधींहि या लोकांवरचा बहिष्कार वऱ्हाड प्रांताबाहेर जसाचा तसाच आहे. मागें लष्करखात्यांत या लोकांची चांगली बढती होत असल्यामुळें यांच्यांत कांहीं चांगली पेन्शनर मंडळी अद्याप आढळते; पण १८९२ सालापासून ह्या बाबतींतहि कांहीं अकल्पित घाड आल्यामुळें ह्यांची पिच्छेहाट होत आहे. ह्या नोकरीच्या बाबतींत आपलेच लोक आपल्या ह्या दीन देशबांधवांस कसें खालीं रगडीत आहेत, हें खालील गोष्टीवरून कळण्यासारखें आहे.

मंगळूर येथें तेथील ब्राह्मसमाजाच्या सेक्रेटरींनीं पंचम लोकांकरितां एक शाळा काढिली आहे. त्या शाळेंत शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांना कोठें तरी चांगली नोकरी मिळवून देण्याकरितां हे गृहस्थ फार झटत असतात. त्यांच्याकडून आलेल्या एका खासगी पत्रांत पुढील मजकूर आहे:—

"मीं किती खटपट केली तरी एकाहि विद्यार्थ्यास नोकरी मिळवून देतां आली नाहीं! शेवटीं एका भल्या युरोपियन डिस्ट्रिक्ट जजांनीं पुढें जी चपराशाची जागा रिकामी होईल ती पंचमास द्यावी, असा ठराव केला. जागा रिकामी होऊन एका पंचमाचा अर्ज गेल्याबरोबर त्य सर्व खात्यां

तील सुमारें १०० शिपाई मिळून जजसाहेबांच्या बंगल्यावर जाऊन आडवे पडले आणि मेहेरबानांनीं पंचमाला नोकरीवर घेऊन आपल्यास हिणवूं नये, अशी मागणी इतक्या नेटानें केली, कीं, शेवटीं मेहेरबानांस ती मान्य करावीच लागली ! ”

ह्या बाबतींत जो अन्याय घडला तो स्वदेशी कीं परदेशी, ह्याचा निर्णय वाचकांनींच करावा ! मुळीं अन्यायच घडला नाहीं असा निर्णय करणारे वाचक भेटल्यास लेखकाचें नशीब म्हणावयाचें ! !

असो. बहिष्काराचे ह्यापेक्षांहि खडतर मासले नित्य आपल्या डोळ्यांसमोर दिसत आहेत आणि त्रावणकोरसारख्या अगदीं सुधारलेल्या संस्थानांत देखील ह्या लोकांची जी अपेष्टा चाललेली सर्वांच्या ऐकण्यांत येते, तीवरून आधुनिक सुधारणेच्या मानानें आमचें पाऊल ह्या बहिष्काराच्या बाबतींत अद्यापि फारच मागें आहे, असें कष्टानें कबूल करावें लागतें.

## खिस्ती पंथ.

व्यवहारांत धर्माच्या नावानें जितक्या चुका झाल्या आहेत व होत आहेत तितक्या कशानेंच झाल्या नसतील ! केवळ व्यवहारांतच नव्हे, तर भाषेंतहि तितक्याच चुका होतात. खरें पाहूं जातां धर्म एकच आहे आणि हिंदु, मुसलमानी, खिस्ती इत्यादि केवळ त्याचे पंथ होत. असें असतां, हे सर्व पंथ निरनिराळे धर्मच मानण्यांत आल्यामुळें त्या परस्परांतील तेढी अत्यंत तीव्र झालेली आहे. मनुष्यप्राण्याला स्वभावसिद्ध असलेली ही धर्मप्रवृत्ति ह्या सर्वच पंथांत निरनिराळ्या रूपानें व कमी अधिक शुद्ध स्थितींत प्रगट होत आहे. ही धर्मवृत्तीच कायती शाश्वत आणि हे सर्व पंथ देशकालमानाप्रमाणें बदलत जाणारे आहेत, हें इतिहासावरून उघड दिसत असतांहि खिस्त्यांना असें वाटतें कीं, खिस्ती धर्मच काय तो सार्वत्रिक धर्म Universal Religion आणि हिंदूंनीं तर आपल्या धर्माला ‘ सनातन ’ हें नांव कधींच दिलेलें आहे !

धर्म आणि त्याचे पंथ यांविषयीं वरील शुद्ध आणि निरपेक्ष सत्य ध्यानांत ठेवून खिस्तीपंथानें प्रस्तुत विषयासंबंधीं जी कामगिरी बजाविली आहे, तिचा थोडक्यांत कृतज्ञपणानें पण निर्भीडपणें विचार करूं या. हे आमचे विचार खिस्ती, हिंदु, खिस्ती झालेले किंवा हिंदूच राहिलेले अस्पृश्य वर्ग ह्यापैकीं पुष्कळांना पटणार नाहींत, हें आम्ही जाणून आहों; पण त्याला इलाज नाहीं. हिंदुपंथानें हीन समजन टाकून दिलेल्या ह्या जातींचा खिस्तीपंथानें जो आजवर परामर्श घेतला आहे व त्याची अंशतः तरी उन्नति केली आहे, त्याबद्दल ह्या पंथाचे जितके धन्यवाद गावे तितके थोडेच आहेत. या बाबतींत खिस्ती मिशनरी केवळ परोपकारबुद्धीनें काम न करितां ह्या गरीब लोकांना आपल्या कळपांत ओढण्याचा त्यांचा कावा असतो, असा जो कांहींचा आक्षेप असतो, त्यांतहि विशेष अर्थ नाहीं. खिस्ती मंडळीला जर आपला पंथ चांगला वाटतो, तर त्यांत दुसऱ्यांनीं यावें असा त्यांनीं प्रयत्न करणें हेंच त्यांच्या खिस्तीपणाला शोभतें. उलट, ज्या हिंदूंला ह्या गरीब जाती आपल्या धर्मांत राहिल्या काय, अथवा गेल्या काय सारख्याच वाटतात, आणि ह्या लोकांनीं हिंदुधर्मांत असे तोंपर्यंत मात्र दूर रहावें आणि खिस्ती होऊन पोषाख बदलून जवळ आल्यास हरकत नाहीं, असें वाटतें, त्यांच्या उदासीनपणाला व विसंगतपणाला दुसऱ्या कशाचीहि उपमा दिसत नाहीं !

पण मुख्य प्रश्न बाजलाच राहिला आहे. तो हा कीं, जवळ जवळ ५॥ कोटी प्रजेनें अशा हीन स्थितींत राहून चालेल काय ? हिंदुपंथ तर आपला सोंवळेपणा सोडावयाला तयार नाहीं, आणि तो सोंवळेपणा कायम आहे तोंपर्यंत या जातीला पुढें सरकावयाला जागा नाहीं. तर मग हें व्हावें कसें ? इतक्या सगळ्यांनीं एकदम खिस्ती व्हावें ? यक्षिणीची कांडी फिरवून इतक्या लोकसमुदायाला कोणी एकदम खिस्ती करील म्हणावें तर तेंहि संभवनीय नाहीं. तथापि हिंदु लोकांची उदासीनता व विसंगतता शाश्वत राहिली, तर मात्र वरील चमत्कारहि घडण्याचा संभव आहे. असा प्रकार खरोखरीच घडून आला, तर राष्ट्रीय दृष्ट्या काय प्रकार होईल पहा. हल्लीं भारतीय साम्राज्यांत खालील प्रमाणें लोकसंख्या आहे.

(इतर १५+हीन ५॥ मिळून) २१ कोटी हिंदु.
(इतर ५+हीन १ मिळून) ६ कोटी मुसलमान.
३० लक्ष खिस्ती.
१ कोटी जंगली.
१ कोटी बुद्ध, जैन शीख वगैरे;

हिंदुपंथाची उदासीनता आणि ख्रिस्तीपंथाची चळवळ आतांप्रमाणेंच कायम राहील तर पुढें खालीं दिल्याप्रमाणें गणना होण्याचा संभव आहे:—

१५ कोटी हिंदु. ६ कोटी मुसलमान.

७ „ ख्रिस्ती १ „ बुद्ध, जैन, शीख व०

म्हणजे राष्ट्रीयदृष्ट्या आतां जी हिंदुमुसलमानांची दुही आहे तिच्याऐवजीं वरील प्रकार घडलाच तर हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती यांचा तिरपगडा होणार! १५ कोटी मवाळ हिंदु आणि जवळजवळ तितकेच कडवे मुसलमान आणि ख्रिस्ती मिळून ह्या तिघांचें सूत कसें जमणार ईश्वर जाणे!

यावर कांहीं ख्रिस्ती मंडळींचें म्हणणें असें पडतें, कीं, ५॥ कोटी हीन दशेंतल्या महारमांगांचें व त्यांना दूर दूर ठेवणाऱ्या १५ कोटी इतर हिंदूंचें आतां तरी कोठें सूत जमत आहे? हे ५॥ कोटी महारमांग ख्रिस्ती होऊन सुशिक्षित आणि सुखवस्तु झाल्यानें राष्ट्राचें पाऊल मागें पडण्यापेक्षां पुढेंच पडणार नाहीं कशावरून? इतके लोक ख्रिस्ती झाल्यावर ते ह्या देशांतलेच कायमचे राहणारे असल्यानें इतर हिंदूंशीं ते राष्ट्रीय बाबतींत विरोधानेंच वागतील कशावरून? दुसऱ्या पक्षीं, कांहीं जुन्या मताच्या आणि तटस्थ वृत्तीच्या हिंदु मंडळींचें असें म्हणणें पडतें कीं, वरिष्ठ हिंदु कितीहि उदासीन राहिले तरी हीन मानलेले लोक कालांतरानें आपली आपणच सुधारणा करून घेऊन एक वेगळी जात बनवून सुखानें रहाणार नाहींत कशावरून? मग त्यांच्या उद्धारासाठीं एवढा खटाटोप कशाला हवा आहे?

हिंदूंचा उदासीनपणा कायम धरून चार प्रकारचे परिणाम संभवतात. (१) हे ५॥ कोटी लोक अशाच स्थितींत राहतील; किंवा (२) आपणच आपला उद्धार करून नवी जात बनवीतील; किंवा (३) ख्रिस्ती होऊन हिंदूंशीं विरोधानें वागतील; किंवा (४) धर्म बदलला तरी राष्ट्रीय बाबतींत सलोख्यानें वागतील. पण हे चारी प्रकार हिंदुस्थानांतील कोणाहि बाणेदार प्रगमनशील हिंदूला समाधानकारक वाटणार नाहींत. हिंदुस्थानांतील जातिभेद हिंदी राष्ट्राला घातक आहे, हें आतां इतके दिवस सामाजिक ... शालेली 'काळ' 'भाला' 'केसरी' सारखीं पत्रेंहि कंठरवानें सांगूं लागलीं आहत! हिंदूंच्या तटस्थपणाचा आतां बहुतेकांला वीट येऊन चुकला आहे. ह्या ५॥ कोटी प्राण्यांचा उद्धार होऊन हे भावी हिंदी समाजांत व हिंदी-साम्राज्यांत एकजीव होऊन जावे, अशी सर्वांची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. पण ही संजीविनी देणारा द्रोणागिरि कोणीं उचलन आणावा, हाच प्रश्न आहे. हिंद, ख्रिस्ती, मुसलमान इत्यादि पंथांचें जुनाट आणि जाड कवच फोडून धर्मप्रवृत्तीचा नवीनच एक अंकुर बाहेर आला पाहिजे. धर्मसंचाराशिवाय केवळ स्वार्थी आणि दिखाऊ प्रवृत्तीच्या जोरावर हें काम होण्यासारखें नाहीं. आणि धर्माची प्रेरणा झाली तरी ती पंथाची जाड भिंत फोडण्याइतकी बळकट नसेल तर आंतल्याआंतच विरून जाण्याचा संभव आहे. ही भिंत फोडून कांहीं नवीन अंकुर ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज ह्यांच्या रूपानें ह्या देशांत वर येऊं लागले आहेत. त्यांच्यांत अंतरींचें बळ किती आहे हें पाहण्याची कसोटी प्रस्तुत विषयांत आहे.

विचार करतां करतां आपण प्रेरणेच्या प्रदेशांत येऊन पोहोंचलों. या प्रदेशांत आपल्या दृष्टीस काय काय पडत आहे, या हीन दीन लोकांच्या उद्धारासाठीं आपल्या लोकांचे कसकसे प्रयत्न चालले आहेत व ते कितपत सफल झाले आहेत अगर होण्याचा संभव आहे, याचा विचार पुढील भागीं करूं.

## निराश्रित साहाय्यक मंडळी.

हिंदुस्थानांतील अस्पृश्य मानलेल्या लोकांची स्थिति अत्यंत शोचनीय आहे व त्यांच्या उन्नतीसंबंधीं आपण कांहींतरी प्रयत्न केले पाहिजेत, असें वरिष्ठ वर्गांतील लोकांना पुष्कळ वर्षें वाटत आहे; पण आपल्या महाराष्ट्र प्रांतात ह्या कामीं प्रथमतः खऱ्या प्रयत्नाला आरंभ केल्याचें श्रेय परलोकवासी श्रीयुत जोतिबा फुले ह्यांनाच द्यावें लागेल. त्यांच्याच श्रमानें पुणें मुक्कामीं ह्या लोकांसाठीं एक दोन शाळा स्थापन करण्यांत आल्या, हल्लीं त्या तेथील म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत आहेत. त्यानंतर ह्या हतभागी लोकांकडे ज्या दुसऱ्या उदार अंतःकरणाच्या पुरुषाचें लक्ष गेलें, ते परलोकवासी श्रीयुत रामचंद्र आण्णाजी कळसकर हे होत. ह्यांनीं प्रथम 'यांगी व्हिलेज एज्युकेशन सोसायटी'

जातींतील आत्मोन्नतीसंबंधीं ज्या कांहीं चळवळी चालल्या होत्या त्यांकडे समाजाच्या प्रचारकांचेंही बरेंचसें लक्ष्य वेधलें व पुढें लवकरच (हल्लीं परलोकवासी झालेले) स्वामी स्वात्मानंद आणि मी हे दोघे अहमदनगराल फिरतीवर गेलों असतां तेथील नवीनच स्थापन झालेल्या 'सोमवंशीय समाजा' मार्फत भिंगार नांवाच्या खेडयांतील महारवाडयांत आमचीं कांहीं व्याख्यानें झालीं.

लोकांची हलहल या विषयाकडे सहानुभूति वळूं लागली, आणि विशेषेंकरून मुंबई प्रार्थनासमाजाच्या आणि सोशल रिफॉर्म असोशिएशनच्या उदार मनाच्या अध्यक्षांनीं या कामांत बरेंच प्रोत्साहन दिल्यामुळें मीं एक निबंध लिहून त्यांत या लोकांची कशी स्थिति आहे, संख्या किती आहे, यांच्यासाठीं कोणीं काय काय केलें आहे, या मुद्दयाचें विवरण केलें आणि शेवटीं यांना वर आणण्याकरितां एतद्देशीय लोकांनीं आपले पौरस्त्य आचार, रीतिरिवाज आणि परंपरा यांना धरून एक कायमचें मिशनच स्थापलें पाहिजे आणि तें सध्याच्या स्थितींत प्रार्थनासमाजाशिवाय दुसऱ्याकडून होणें विशेष संभवनीय नाहीं, असे विचार, उदार मतवादी समाजबंधूंपुढें मांडले. हा निबंध 'इंडियन सोशल रिफॉर्मर' च्या ता. २९ जुलै १९०६ च्या अंकांत प्रसिद्ध झाला व नंतर स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रार्थनासमाजाच्या | पोस्टल मिशनच्या आश्रयानें त्याच्या पुष्कळ प्रती वाटण्यांत आल्या.

विचार केला, सहानुभूति मिळाली, निर्णय झाला, निश्चय झाला. तथापि 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' हें त्रिकालसत्य कधीं खोटें व्हावयाचें नाहीं. म्हणून ह्या तांदुळांची वाट कांहीं दिवस पहावी लागली.

## भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीची संस्थापना.

तारीख १८ आक्टोबर १९०६ रोजीं कार्तिकी वर्षप्रतिपदेचा शुभ दिवस आला. दोनच दिवसांपूर्वीं मुंबईतील प्रार्थनासमाजाच्या उदार उपाध्यक्षांनीं अशा मंडळीची स्थापना होऊन काम सुरू व्हावें म्हणून एक हजार रुपये दिले होते. पाडव्याच्या शुभ दिवशीं सकाळीं नऊ वाजतां (१८ आक्टोबर १९०६) एलफिन्स्टन् रोड स्टेशन लगतच्या मुरारजी वालजीच्या बंगल्यांत मंडळीची पहिली शाळा उघडण्याकरितां गांवांतील चार शिष्ट मंडळी जमली. मंडळीचे अध्यक्ष नामदार न्यायमूर्ति चंदावरकर ह्यांनीं जमलेल्या मुलांना पहिला धडा घालून देऊन मंडळीचें काम सुरू करण्यापूर्वीं आपल्या भाषणांत खालील अर्थाचें सूत्रवाक्य सांगितलें कीं, "ह्या नीच मानलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यानें आम्ही स्वतःलाच वर आणित आहों. हें पवित्र कार्य करित असतां, ह्या लोकांचा आम्ही उद्धार करणार ! हा घमेंडीचा विचार आमच्या अंतःकरणांत न शिरो आणि आम्हां सर्वांना ह्या घोर अन्यायामुळें जी अधोगति मिळाली आहे, ती टळून सर्वांचा सारखाच उद्धार होणार आहे. असा साधा आणि सात्विकभाव आम्हांमध्यें निरंतर जागृत राहो !" आणि ह्या भावाला अनुसरूनच आज दोन वर्षें मंडळीचें काम चाललें आहे.

### हेतु.

हिंदुस्थानांतील महार, मांग, चांभार, धेड, पारिया वगैरे (विशेषेंकरून पश्चिम-हिंदुस्थानांतील) निकृष्ट वर्गांना व इतर अशाच रीतीनें निराश्रित झालेल्या लोकांना (१) शिक्षण, (२) कामधंदा, (३) ममतेची आणि समतेची वागणूक, (४) धर्म, नीति, आरोग्य आणि नागरिकता इत्यादिविषयक उदार तत्वांचा उपदेश व अशा इतर साधनांच्या द्वारें आत्मोन्नति करण्याचे कामीं साहाय्य करणें, हा ह्या मंडळीचा हेतु असून हिच्या विद्यमानें सध्या खालील संस्था काम करित आहेत.

### शाळा.

जी. आय. पी. आर. परळ स्टेशनाजवळील नंबर १ ची इंग्रजी—मराठी शाळा आहे. येथें हल्लीं मराठी धुळाक्षरांपासून तों इंग्रजी चार इयत्तांपर्यंत शिक्षणाची उत्तम सोय केली आहे. मुलगे १९० आणि मुली ३० शिकत आहेत. कुर्ल्याजवळ देवनार येथील कचरापट्टींत नंबर २ ची प्राथमिक शाळा आहे. तीमध्यें ४१ मुलें आणि १ शिक्षक आहे. भायखळा येथें नंबर ३ ची प्राथमिक शाळा आहे तीमध्यें १०१ मुलें

तील सुमारें १०० शिपाई मिळून जजसाहेबांच्या बंगल्यावर जाऊन आडवे पडले आणि मेहेरबानांनीं पंचमाला नोकरीवर घेऊन आपल्यास शिवूं नये, अशी मागणी इतक्या नेटानें केली, कीं, शेवटीं मेहेरबानांस ती मान्य करावीच लागली ! "

ह्या बाबतींत जो अन्याय घडला तो स्वदेशी कीं परदेशी, ह्याचा निर्णय वाचकांनींच करावा ! मळीं अन्यायच घडला नाहीं असा निर्णय करणारे वाचक भेटल्यास लेखकाचें नशीब म्हणावयाचें ! !

असो. बहिष्काराचे ह्यापेक्षांहि खडतर मासले नित्य आपल्या डोळ्यांसमोर दिसत आहेत आणि त्रावणकोरसारख्या अगदीं सुधारलेल्या संस्थानांत देखील ह्या लोकांची जी अपेष्टा चाललेली सर्वांच्या ऐकण्यांत येते, तीवरून आधुनिक सुधारणेच्या मानानें आमचें पाऊल ह्या बहिष्काराच्या बाबतींत अद्यापि फारच मागें आहे, असें कष्टानें कबूल करावें लागते.

## खिस्ती पंथ.

व्यवहारांत धर्मांच्या नावानें जितक्या चुका झाल्या आहेत व होत आहेत तितक्या कशानेंच आल्या नसतील ! केवळ व्यवहारांतच नव्हे, तर भाषेंतहि तितक्याच चुका होतात. खरें पाहूं जातां धर्म एकच आहे आणि हिंदु, मुसलमानी, खिस्ती इत्यादि केवळ त्याचे पंथ होत. असें असतां, हे सर्व पंथ निरनिराळे धर्मच मानण्यांत आल्यामुळें त्या परस्परांतील तेढी अत्यंत तीव्र झालेली आहे. मनुष्यप्राण्याला स्वभावसिद्ध असलेली ही धर्मप्रवृत्ति ह्या सर्वच पंथांत निरनिराळ्या रूपानें व कमी अधिक शुद्ध स्थितींत प्रगट होत आहे. ही धर्मवृत्तीच कायती शाश्वत आणि हे सर्व पंथ देशकालमानाप्रमाणें बदलत जाणारे आहेत, हें इतिहासावरून उघड दिसत असतांहि खिस्त्यांना असें वाटतें कीं, खिस्ती धर्मच काय तो सार्वत्रिक धर्म Universal Religion आणि हिंदूंनीं तर आपल्या धर्माला 'सनातन' हें नांव कधींच दिलेलें आहे !

धर्म आणि त्याचे पंथ यांविषयीं वरील शुद्ध आणि निरपेक्ष सत्य ध्यानांत ठेवून खिस्तीपंथानें प्रस्तुत विषयासंबंधीं जी कामगिरी बजाविली आहे, तिचा थोडक्यांत कृतज्ञपणानें पण निर्भीडपणें विचार करूं या. हे आमचे विचार खिस्ती, हिंदु, खिस्ती झालेले किंवा हिंदूच राहिलेले अस्पृश्य वर्ग ह्यापैकीं पुष्कळांना पटणार नाहींत, हें आम्ही जाणून आहों; पण त्याला इलाज नाहीं. हिंदुपंथानें हीन समजन टाकून दिलेल्या ह्या जातींचा खिस्तीपंथानें जो आजवर परामर्श घेतला आहे व त्याची अंशतः तरी उन्नति केली आहे, त्याबद्दल ह्या पंथाचे जितके धन्यवाद गावे तितके थोडेच आहेत. या बाबतींत खिस्ती मिशनरी केवळ परोपकारबुद्धीनें काम न करितां ह्या गरीब लोकांना आपल्या कळपांत ओढण्याचा त्यांचा कावा असतो, असा जो कांहींचा आक्षेप असतो, त्यांतहि विशेष अर्थ नाहीं. खिस्ती मंडळीला जर आपला पंथ चांगला वाटतो, तर त्यांत दुसऱ्यांनीं यावें असा त्यांनीं प्रयत्न करणें हेंच त्यांच्या खिस्तीपणाला शोभतें. उलट, ह्या हिंदूंला ह्या गरीब जाती आपल्या धर्मांत राहिल्या काय, अथवा गेल्या काय सारख्याच वाटतात, आणि ह्या लोकांनीं हिंदुधर्मांत असे तोंपर्यंत मात्र दूर रहावें आणि खिस्ती होऊन पोषाख बदलून जवळ आल्यास हरकत नाहीं, असें वाटतें, त्यांच्या उदासीनपणाला व विसंगतपणाला दुसऱ्या कशाचीहि उपमा दिसत नाहीं !

पण मुख्य प्रश्न बाजलाच राहिला आहे. तो हा कीं, जवळ जवळ ५॥ कोटी प्रजेनें अशा हीन स्थितींत राहून चालेल काय ? हिंदुपंथ तर आपला सोंवळेपणा सोडावयाला तयार नाहीं, आणि तो सोंवळेपणा कायम आहे तोंपर्यंत या जातीला पुढें सरकावयाला जागा नाहीं. तर मग हें व्हावें कसें? इतक्या सगळ्यांनीं एकदम खिस्ती व्हावें ? यक्षिणीची कांडी फिरवून इतक्या लोकसमुदायाला कोणी एकदम खिस्ती करील म्हणावें तर तेंहि संभवनीय नाहीं. तथापि हिंदु लोकांची उदासीनता व विसंगतता शाश्वत राहिली, तर मात्र वरील चमत्कारहि घडण्याचा संभव आहे. असा प्रकार खरोखरीच घडून आला, तर राष्ट्रीय दृष्ट्या काय प्रकार होईल पहा. हल्लीं भारतीय साम्राज्यांत खालील प्रमाणें लोकसंख्या आहे.

(इतर १५+हीन ५॥ मिळून) २१ कोटी हिंदु.
(इतर ५+हीन १ मिळून) ६ कोटी मुसलमान.
३० लक्ष खिस्ती.
१ कोटी जंगली.
१ कोटी बुद्ध, जैन शीख वगैरे;

हिंदुपंथाची उदासीनता आणि खिस्तीपंथाची चळवळ आतांप्रमाणेंच कायम राहील तर पुढें खालीं दिल्याप्रमाणें गणना होण्याचा संभव आहे:—

१५ कोटी हिंदु. ६ कोटी मुसलमान.

७ ,, खिस्ती १ ,, बुद्ध, जैन, शीख व०

म्हणजे राष्ट्रीयदृष्ट्या आतां जी हिंदुमुसलमानांची दुही आहे तिच्याऐवजीं वरील प्रकार घडलाच तर हिंदु, मुसलमान, खिस्ती यांचा तिरपगडा होणार! १५ कोटी मवाळ हिंदु आणि जवळजवळ तितकेच कडवे मुसलमान आणि खिस्ती मिळून ह्या तिघांचें सूत कसें जमणार ईश्वर जाणे!

यावर कांहीं खिस्ती मंडळींचें म्हणणें असें पडतें, कीं, ५॥ कोटी हीन दशेंतल्या महारमांगांचें व त्यांना दूर दूर ठेवणाऱ्या १५ कोटी इतर हिंदूंचें आतां तरी कोठें सूत जमत आहे? हे ५॥ कोटी महारमांग खिस्ती होऊन सुशिक्षित आणि सुखवस्तु झाल्यानें राष्ट्राचें पाऊल मागें पडण्यापेक्षां पुढेंच पडणार नाहीं कशावरून? इतके लोक खिस्ती झाल्यावर ते ह्या देशांतलेच कायमचे राहणारे असल्यानें इतर हिंदूंशीं ते राष्ट्रीय बाबतींत विरोधानेंच वागतील कशावरून? दुसऱ्या पक्षीं, कांहीं जुन्या मताच्या आणि तटस्थ वृत्तीच्या हिंदु मंडळींचें असें म्हणणें पडतें कीं, वरिष्ठ हिंदु कितीहि उदासीन राहिले तरी हीन मानलेले लोक कालांतरानें आपली आपणच सुधारणा करून घेऊन एक वेगळी जात बनवून सुखानें रहाणार नाहींत कशावरून? मग त्यांच्या उद्धारासाठीं एवढा खटाटोप कशाला हवा आहे?

हिंदूंचा उदासीनपणा कायम धरून चार प्रकारचे परिणाम संभवतात. (१) हे ५॥ कोटी लोक अशाच स्थितींत राहतील; किंवा (२) आपणच आपला उद्धार करून नवी जात बनवीतील; किंवा (३) खिस्ती होऊन हिंदूंशीं विरोधानें वागतील; किंवा (४) धर्म बदलला तरी राष्ट्रीय बाबतींत सलोख्यानें वागतील. पण हे चारी प्रकार हिंदुस्थानांतील कोणाहि बाणेदार प्रगमनशील हिंदूला समाधानकारक वाटणार नाहींत. हिंदुस्थानांतील जातिभेद हिंदी राष्ट्राला घातक आहे, हें आतां इतके दिवस सामाजिक सुधारणा वगैरे लेखलेल्या 'काळ' 'माला' 'केसरी' सारखीं पत्रेंहि कंठरवानें सांगूं लागलीं आहेत! हिंदूंच्या तटस्थपणाचा आतां बहुतेकांला वीट येऊन चुकला आहे. ह्या ५॥ कोटी प्राण्यांचा उद्धार होऊन हे भावी हिंदी समाजांत व हिंदीसाम्राज्यांत एकजीव होऊन जावे, अशी सर्वांची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. पण ही संजीविनी देणारा द्रोणागिरि कोणीं उचलन आणावा, हाच प्रश्न आहे. हिंद, खिस्ती, मुसलमान इत्यादि पंथांचें जुनाट आणि जाड कवच फोडून धर्मप्रवृत्तीचा नवीनच एक अंकुर बाहेर आला पाहिजे. धर्मसंचाराशिवाय केवळ स्वार्थी आणि दिखाऊ प्रवृत्तीच्या जोरावर हें काम होण्यासारखें नाहीं. आणि धर्माची प्रेरणा झाली तरी ती पंथाची जाड भिंत फोडण्याइतकी बळकट नसेल तर आंतल्याआंतच विरून जाण्याचा संभव आहे. ही भिंत फोडून कांहीं नवीन अंकुर ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज ह्यांच्या रूपानें ह्या देशांत वर येऊं लागले आहेत. त्यांच्यांत अंतरींचें बळ किती आहे हें पाहण्याची कसोटी प्रस्तुत विषयांत आहे.

विचार करतां करतां आपण प्रेरणेच्या प्रदेशांत येऊन पोहोंचलों. या प्रदेशांत आपल्या दृष्टीस काय काय पडत आहे, या हीन दीन लोकांच्या उद्धारासाठीं आपल्या लोकांचे कसकसे प्रयत्न चालले आहेत व ते कितपत सफल झाले आहेत अगर होण्याचा संभव आहे, याचा विचार पुढील भागीं करूं.

## निराश्रित साहाय्यक मंडळी.

हिंदुस्थानांतील अस्पृश्य मानलेल्या लोकांची स्थिति अत्यंत शोचनीय आहे व त्यांच्या उन्नतीसंबंधीं आपण कांहींतरी प्रयत्न केले पाहिजेत, असें वरिष्ठ वर्गांतील लोकांना पुष्कळ वर्षें वाटत आहे; पण आपल्या महाराष्ट्र प्रांतात ह्या कामीं प्रथमतः खऱ्या प्रयत्नाला आरंभ केल्याचें श्रेय परलोकवासी श्रीयुत जोतिबा फुले ह्यांनाच द्यावें लागेल. त्यांच्याच श्रमानें पुणें मुक्कामीं ह्या लोकांसाठीं एक दोन शाळा स्थापन करण्यांत आल्या, हल्लीं त्या तेथील म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत आहेत. त्यानंतर ह्या हतभागी लोकांकडे ज्या दुसऱ्या उदार अंतःकरणाच्या पुरुषाचें लक्ष गेलें, ते परलोकवासी श्रीयुत रामचंद्र आण्णाजी फळसकर हे होत. ह्यांनीं प्रथम 'बांगी व्हिलेज एज्युकेशन सोसायटी'

नांवाची संस्था वांगी येथें स्थापन करून नंतर ती बारामती येथें नेली. ह्या संस्थेच्या आश्रयाखालीं त्यांनीं महार लोकांकरितां खेडयांतून कांहीं शाळा उघडल्या होत्या; पण त्या फार दिवस चालल्या नाहींत; हें काम भरपूर द्रव्य साहाय्याशिवाय नांवा-रूपांस येणें शक्य नव्हतें; सरकार, संस्थानिक आणि श्रीमंत व्यापारी ह्यांच्याजवळ द्रव्यबळ आणि सत्ताबळ हीं असतात; पण तेवढ्यानें अशीं कामें उदयाला येत नाहींत, हीं मुंबईसारखी धनाढ्य शहरें आणि इंग्रजांसारखें मातबर आणि न्यायी सरकार ह्या देशांत पिढ्यान् पिढ्या असूनहि ह्या दीन लोकांचें भाग्य उदयास आलें नाहीं ह्यावरून उघड होतें. महानुभाव श्रीमंत सयाजीराजे ह्यांच्या कारकिर्दींत मात्र ह्या दीनांची बरीच दाद लागत आहे व अलीकडे कोल्हापुर येथेंहि बरीच चळवळ चालली आहे; पण कांहीं होवो हें कार्य इतकें अवजड आहे कीं तशीच असाधारण धर्म-प्रेरणा झाल्याशिवाय आणि कोणत्यातरी एका नव्या जोमाच्या उदार पंथानें पुढाकार घेतल्याशिवाय ह्याला कांहीं रूप येईल, हें अद्यापि संभवत नाहीं.

प्रार्थनासमाज ह्या कामीं हळहळू पण बिनबोभाट आज बरींच वर्षें अल्पस्वल्प प्रयत्न करित आला आहे. मुंबई, पुणें, सातारा, अहमदनगर ह्या ठिकाणीं ह्या लोकांकरितां रात्रीच्या शाळा उघडून त्यांतून समाजाचे प्रचारक थोडाबहुत धार्मिक आणि नैतिक उपदेश आज बरींच वर्षें करीत आहेत. अलीकडे ह्या वर्गाविषयीं कळवळा वाटणारांना हुरूप येण्यासारखा एक नवीन प्रकार दिसून येतो, तो हा कीं, आज कित्येक वर्षें अज्ञान आणि कंगाल अवस्थेच्या चिखलांत रुतून गेलेल्या ह्या हतभागी लोकांतच स्वतःची स्थिति सुधारण्या-संबंधीं जागृति दिसूं लागली आहे.

ह्या अपूर्व जागृतीस इंग्रजी राज्याचें औदार्य आणि त्या औदार्याची अपूर्णता ह्या दोन्ही परस्पर भिन्न गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत, इंग्रजी राज्यांतील समतेच्या वागणुकीमुळें महारमांगांची लष्करांत भरती होऊन गेल्या दोनतीन पिढयांत ह्या वर्गांतील बरेच लोक हवालदार, जमादार आणि सुभेदार—बहादूर अशा पदवीला पोहोंचले होते. शिवाय, साहेबलोकांच्या खासगी तैनातींत बटलरचे वगैरे धंदेही इमानानें बजावून त्यांच्या साहजिक समागमानें ह्या वर्गांतील बरींच कुटुंबें अंमळ सुखवस्तु झालीं; पण ह्या बाबतींतील आपल्या उदार धोरणाचा विकास उत्तरोत्तर जास्त होऊं देण्याचें नैतिकधैर्य आणि शक्ति, ह्या जाति-भेदानें छडलेल्या देशांत, इंग्रजबहादुरांच्याही अंगीं कायम राहिली नाहीं व सुमारें पंधरा वर्षांपासून अलीकडे ह्या लोकांची लष्करांत पूर्वींप्रमाणें भरती होईनाशी झाली आहे. पुढें येण्याला जो एकच मार्ग खुला होता, तोही अशा रीतीनें बंद झालेला पाहून ह्या लोकांचे आपल्या निराश्रित अवस्थे-संबंधीं डोळे किंचित् उघडूं लागले. ह्या बाबतींत प्रथम जे प्रयत्न झाले व अजन चालू आहेत त्याचें बरेंचसें श्रेय पुणें येथील महार जातींतील पाणीदार गृहस्थ श्रीयुत शिवराम जानबा कांबळे यांजकडे आहे. श्रीयुत कांबळे ह्यांचा मुख्य रोख जरी सरकारांत आपल्या जातीची पूर्वींप्रमाणें भरती व्हावी म्हणून कायदेशीर पद्धतीनें अर्ज करण्याचाच अद्याप आहे, तरी आपल्या जातीला शिक्षण मिळून तिचें पाऊल पुढें पडावें म्हणून त्यांचे दुसऱ्या बाजूनेंही अविश्रांत श्रम चालले आहेत. त्यांनीं 'सोमवंशीय समाज' नांवाची संस्था पुण्यास काढली असून तिच्याच नमुन्या-वर अहमदनगर येथें श्रीयुत श्रीपतराव थोरात आणि पांडोबा डांगळे ह्यांच्या परिश्रमानें दुसरा एक 'सोमवंशीय समाज' सन १९०५ सालच्या जून महिन्यांत स्थापन झाला आहे. ह्या पूर्वीं नागपुराजवळ मोहपा येथें श्रीयुत किसन फागू नांवाच्या एका तरुण आणि स्वार्थत्यागी गृहस्थानें धर्माच्या पायावर एक समाज स्थापून चळवळ चालविली होती. मुंबई येथील प्रार्थनासमाजाच्या पोस्टल मिशनचीं कांहीं उदार मताचीं पुस्तकें वाचून ह्या तरुण गृहस्थाचें मन प्रार्थनासमाजाकडे वळलें. प्रार्थनासमाजाविषयीं प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठीं म्हणन मंबई प्रार्थनासमाजाच्या १९०५ सालाच्या वार्षिक उत्सवाला श्रीयुत किसनफागू हे आले होते. तेथें पंधरा दिवसांच्या पाहुण-चारामुळें त्यांची आणि समाजाच्या कांहीं मंड-ळीची ओळख होऊन परस्पर हेतं[illegible] आणि प्रयत्नाची परस्परांस चांगली माहिती [illegible] झाली. शेवटीं हे गृहस्थ समाजाच्या प्रीतिभो[illegible] जनांतही हजर असल्याचें प्रसिद्धच आहे. ह्य[illegible] ओळखीमुळें [illegible]

जातींतील आत्मोन्नतीसंबंधीं ज्या कांहीं चळवळी चालल्या होत्या त्यांकडे समाजाच्या प्रचारकांचेंही बरेंचसें लक्ष्य वेधलें व पुढें लवकरच (हल्लीं परलोकवासी झालेले) स्वामी स्वात्मानंद आणि मी हे दोघे अहमदनगरास फिरतीवर गेलों असतां तेथील नवीनच स्थापन झालेल्या 'सोमवंशीय समाजा' मार्फत भिंगार नांवाच्या खेड्यांतील महारवाड्यांत आमचीं कांहीं व्याख्यानें झालीं.

लोकांची हळुहळु या विषयाकडे सहानुभूति वळूं लागली, आणि विशेषेंकरून मुंबई प्रार्थनासमाजाच्या आणि सोशल रिफॉर्म असोसिएशनच्या उदार मनाच्या अध्यक्षांनीं या कामांत बरेंच प्रोत्साहन दिल्यामुळें मीं एक निबंध लिहून त्यांत या लोकांची कशी स्थिति आहे, संख्या किती आहे, यांच्यासाठीं कोणीं काय काय केलें आहे, या मुद्द्याचें विवरण केलें आणि शेवटीं यांना वर आणण्याकरितां एतद्देशीय लोकांनीं आपले पौरस्त्य आचार, रीतिरिवाज आणि परंपरा यांना धरून एक कायमचें मिशनच स्थापलें पाहिजे आणि तें सध्याच्या स्थितींत प्रार्थनासमाजाशिवाय दुसऱ्याकडून होणें विशेष संभवनीय नाहीं, असे विचार, उदार मतवादी समाजबंधूंपुढें मांडले. हा निबंध 'इंडियन सोशल रिफॉर्मर' च्या ता. २९ जुलै १९०६ च्या अंकांत प्रसिद्ध झाला व नंतर स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रार्थनासमाजाच्या पोस्टल मिशनच्या आश्रयानें त्याच्या पुष्कळ प्रती वाटण्यांत आल्या.

विचार केला, सहानुभूति मिळाली, निर्णय झाला, निश्चय झाला. तथापि 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' हें त्रिकालसत्य कधीं खोटें व्हावयाचें नाहीं. म्हणून ह्या तांदुळांची वाट कांहीं दिवस पहावी लागली.

## भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीची संस्थापना.

तारीख १८ आक्टोबर १९०६ रोजीं कार्तिकी वर्षप्रतिपदेचा शुभ दिवस आला. दोनच दिवसांपूर्वी मुंबईतील प्रार्थनासमाजाच्या उदार उपाध्यक्षांनीं अशा मंडळीची स्थापना होऊन काम सुरू व्हावें म्हणून एक हजार रुपये दिले होते. पाडव्याच्या शुभ दिवशीं सकाळीं नऊ वाजतां (१८ आक्टोबर १९०६) एलफिन्स्टन् रोड स्टेशन लगतच्या मुरारजी वालजीच्या बंगल्यांत मंडळीची पहिली शाळा उघडण्याकरितां गांवांतील चार शिष्ट मंडळी जमली. मंडळीचे अध्यक्ष नामदार न्यायमूर्ति चंदावरकर ह्यांनीं जमलेल्या मुलांना पहिला धडा घालून देऊन मंडळीचें काम सुरू करण्यापूर्वी आपल्या भाषणांत खालील अर्थाचें सूत्रवाक्य सांगितलें कीं, "ह्या नीच मानलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यानें आम्ही स्वतःलाच वर आणित आहों. हें पवित्र कार्य करित असतां, ह्या लोकांचा आम्ही उद्धार करणार! हा घमेंडीचा विचार आमच्या अंतःकरणांत न शिरो आणि आम्हां सर्वांना ह्या घोर अन्यायामुळें जी अधोगति मिळाली आहे, ती टळून सर्वांचा सारखाच उद्धार होणार आहे. असा साधा आणि सात्त्विकभाव आम्हांमध्यें निरंतर जागृत राहो!" आणि ह्या भावाला अनुसरूनच आज दोन वर्षें मंडळीचें काम चाललें आहे.

### हेतु.

हिंदुस्थानांतील महार, मांग, चांभार, धेड, पारिया वगैरे (विशेषेंकरून पश्चिम-हिंदुस्थानांतील) निकृष्ट वर्गांना व इतर अशाच रीतीनें निराश्रित झालेल्या लोकांना (१) शिक्षण, (२) कामधंदा, (३) ममतेची आणि समतेची वागणूक, (४) धर्म, नीति, आरोग्य आणि नागरिकता इत्यादिविषयक उदार तत्त्वांचा उपदेश व अशा इतर साधनांच्या द्वारें आत्मोन्नति करण्याचे कामीं साहाय्य करणें, हा ह्या मंडळीचा हेतु असून हिच्या विद्यमानें सध्या खालील संस्था काम करित आहेत.

### शाळा.

जी. आय. पी. आर. परळ स्टेशनाजवळील नंबर १ ची इंग्रजी—मराठी शाळा आहे. येथें हल्लीं मराठी धुळाक्षरांपासून तों इंग्रजी चार इयत्तांपर्यंत शिक्षणाची उत्तम सोय केली आहे. मुलगे १९० आणि मुली ३० शिकत आहेत. कुर्ल्याजवळ देवनार येथील कचरापट्टींत नंबर २ ची प्राथमिक शाळा आहे. तीमध्यें ४१ मुलें आणि १ शिक्षक आहे. भायखळा येथें नंबर ३ ची प्राथमिक शाळा आहे तीमध्यें १०१ मुलें

आणि ३ शिक्षक आहेत. एकंदर मुलांची संख्या सरासरीनें ५०० असते.

ज. जे. हॉस्पिटलसमोर भंगी लोकांकरितां १ व महालक्ष्मी स्टेशनाजवळील कचरापट्टींत १ अशा दोन दिवसाच्या व एक रात्रीची अशा तीन गुजराथी शाळा चालू आहेत. त्यांत १२५ मुलें आहेत.

## पुस्तक बांधण्याचें काम.

मुलांना ५ तास सारखें शिकण्याचा कंटाळा येऊं नये म्हणून व कांहीं तरी हातकाम यावें म्हणून दररोज दोन तास मोठ्या मुलांना परळच्या शाळेंत पुस्तकें बांधण्याचें व लहानमोठ्या वह्या, ब्लॉटिंग पॅड्स वगैरे तयार करण्याचें काम शिकविण्यांत येतें.

## उद्योगशाळा.

सन १९१२ एप्रिलपासून पं० लो० वासी शेठ एन्. एम्. वाडिया ह्यांच्या इस्टेटींतून दर महा ५०० रु. तीन वर्षेपर्यंत मिळणार असल्यामळें, मंडळीनें एक उद्योगशाळा उघडली आहे त्यांत सुतारी व शिवण काम शिकविलें जातें.

## शिवणकाम.

मलींना व गिरण्यांतून काम करूं न इच्छिणाऱ्या निकृष्ट वर्गांतल्या, पण अब्रूदार बायकांना घरीं बसल्या आपले व मुलांचे कपडे शिवतां यावे म्हणन त्यांना साधें शिवणकाम शिकविण्याची व्यवस्था परळच्या शाळेंत केली आहे. सध्यां एक चांभाराची बाई शिकून तयार झाली आहे.

## पुस्तकालय.

शेट तुकाराम जावजी, मेसर्स बाबाजी सखाराम आणि कंपनी, व मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, वगैरेंच्या साहाय्यानें ३०४ पुस्तकें जमविलीं आहेत. गेल्या वर्षी ह्यांपैकीं २५८ पुस्तकें वाचण्याकरितां देण्यांत आलीं. वाचनालयांत २ दैनिक, ५ साप्ताहिक पत्रें आणि ४ मासिक पुस्तकें ठेवण्यांत येत असतात.

## मैदान क्लब.

तरुण मुलांनीं वाईट नादाला लागूं नये म्हणन त्यांचा एक क्रिकेट फुटबॉल क्लब आहे. विशेषें करून शिमग्यासारख्या सणांत चांदण्यारात्रीं शिक्षक लोकांच्या नजरेखालीं आट्यापाट्या वगैरे खेळ खेळण्यांत येतात. सन १९०७ सालच्या होळीच्या दिवशीं खेळांत हुषार ठरलेल्या गड्यांस, सर भालचंद्र कृष्ण ह्यांच्या हस्तें बक्षिसें वांटण्यांत आलीं व वरील क्लब उघडण्यांत आला. हल्लीं ४० मेंबर व तीन क्रिकेटच्या टोळ्या आहेत. व्यायामाशिवाय ह्या क्लबामार्फत मधूनमधून व्याख्यानें, संमेलनें, वनभोजनें इत्यादि ज्ञानवृद्धि, स्नेहवृद्धि आणि करमणूक करण्याचेंहि प्रकार होत असतात.

## देवनार कचरापटी.

येथें सुमारें ५०० म्युनिसिपल कामकरी अंत्यज मानलेल्या लोकांची वसाहत आहे. ही मुंबई म्युनिसिपालटीच्या मालकीची जागा असून म्युनिसिपालिटीच्या हद्दीबाहेर म्हणजे ठाणें जिल्ह्यांत असल्यानें मंडळीनें पुष्कळ प्रयत्न करूनही ह्या लोकांच्या शिक्षणाची सोय करण्याचा म्युनिसिपालिटीस अधिकारच नाहीं असें शेवटीं ठरलें. आणि मालकी मुंबई म्युनिसिपालिटीची आहे म्हणून ठाणें जिल्ह्यांतूनहि शिक्षणाची व्यवस्था अद्यापि झाली नाहीं ! मिळून आज कित्येक वर्षें इतक्या लोकांची उणीव भरून निघाली नाहीं. शेवटीं तेथें वरील शाळा आपल्याच खर्चानें उघडून मंडळीनें ही गरज भागविली. हल्लीं शेठ हाजी युसफ हाजी इस्मायल ह्यांच्या उदार मदतीनें एक झोंपडी बांधून तिच्यांत एक दिवसा आणि एक रात्रीं अशा शाळा चालू आहेत. शिवाय मंडळीकडून मधून मधून व्याख्यानें, कीर्तनें, बक्षीस-समारंभ वगैरे होत असतात.

## वाङ्मय.

अस्पृश्य मानलेल्या लोकांची कठीण स्थिति वरिष्ठ लोकांच्या नजरेस यावी व त्यांची सहानुभूति मिळावी म्हणून इंग्रजींत तीन लहान पुस्तकें छापून त्यांच्या पुष्कळ प्रति फुकट वांटण्यांत येत आहेत. शिवाय प्रमुख इंग्रजी मराठी आणि गुजराथी पत्रांतून वेळोवेळीं ह्या लोकांच्या स्थितीसंबंधीं व कामासंबंधीं लेख येत असतात.

# निराश्रित सेवासदन.

केवळ शाळा आणि दवाखाने स्थापिल्यानें आणि मधूनमधून व्याख्यानें दिल्यानें ह्या लोकांची गृहस्थिति आणि सामाजिक स्थिति सुधारावयाची हा मंडळीचा जो मुख्य हेतु तो अंशतःहि पूर्ण

व्हावयाचा नाहीं. ह्या कामीं कांहीं स्वार्थत्यागी आणि भक्तिमान् माणसांनीं आपल्याला वाहूनच घेतलें पाहिजे; त्यांनीं ह्या लोकांच्या वसतींत राहून त्यांच्या घरीं वरचेवर जाऊन त्यांच्या बायांबापड्यांना कामकाज, करमणूक, भजन, प्रार्थना इत्यादिकाच्या निमित्तानें आपल्या घरीं बोलावून व एकंदरींत अशा रीतीनें त्यांच्यांशीं मिळून मिसळून राहिलें पाहिजे व मंडळीच्या ज्या निरनिराळ्या संस्था चालू आहेत त्यांकडे त्या लोकांचें लक्ष वेधलें पाहिजे; अशा प्रकारच्या एका आश्रमाची अत्यंत उणीव भासूं लागली. मंडळीच्या चालकांच्या मनांत हे विचार येण्याच्या संधीस ईश्वरकृपेनें त्यांची व एका उदार अंतःकरणाच्या सत्पुरुषाची अवचित् गांठ पडून असा आश्रम निघत असेल तर आपण त्याच्या खर्चासाठीं दरमहा शंभर रुपयांची नेमणूक करून देऊं असें वचन देऊन फेब्रुवारी १९०७ महिन्यापासून त्यांनीं ही नेमणूक चालू केली! व ता. २१ मे रोजीं निराश्रित सेवासदन ह्या नांवानें हा आश्रम सुरू झाला.

हल्लीं प्रार्थनासमाजांतील दोन पुरुष व दोन स्त्रिया यांनीं मंडळीचें काम अंगमेहनतीनें करण्याचें पत्करिलें आहे.

### मंगळूर.

दक्षिण कानडा जिल्ह्यांत पारिया लोकांची स्थिति फारच दुःखद आहे. मंगळूर ब्राह्म समाजाचे सेक्रेटरी श्रीयुत के रंगराव हे एकटेच ह्या गरीब लोकांसाठीं गेलीं दहा वर्षे खपत आहेत सरकारापासून एक प्रशस्त जागा घेऊन त्यांनीं आतां येथें एक पैसपैस पक्की इमारत बांधली आहे त्यांची अलीकडे बंद पडलेली शाळा फिरून तारीख ३ नवंबर १९०७ रोजीं ह्या इमारतींत उघडण्यांत आली. हल्लीं येथें पारियांची ५१ मुलें शिकत आहेत. पैकीं ४ मुलांना दोन्ही वेळ जेवण घालून शाळेंतच ठेवण्यांत येतें आणि २६ मुलांना दोन प्रहरीं एक वेळ जेवण घालून रात्रीं घरीं पाठविण्यांत येतें. अशा व्यवस्थेशिवाय शाळा चालणेंच शक्य नाहीं. येथील ब्राह्मसमाजांतील सुमारें बारा तरुणांनीं एकत्र जमून एक 'तांदूळ फंड' स्थापन केला आहे. दर रविवारीं उपासनेनंतर ते घरोघर जाऊन एक एक मुष्टीभर तांदूळ जमवितात. तारीख २७ नवंबर १९०७ रोजीं उद्योगशाळा उघडण्यांत आली. हल्लीं सहा भागींत चालू आहेत. त्यावर मुलांना विणकाम शिकविण्यांत येतें. ह्या शाळेकरितां सध्यां दोन हजार रुपयांची फार जरूरी आहे. त्यासाठीं पन्नास रुपयांचा एक असे चाळीस भाग काढले आहेत, उदार गृहस्थांनीं या कामीं मदत करणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

### मंडळीच्या शाखा व संस्था.

१ मुंबई—४ दिवसाच्या शाळा; विद्यार्थी ५००. १ वसतिगृह, विद्यार्थी २६. २ भजनसमाज. १ उद्योगशाळा ( सुतारी, शिवणकाम व बांधकामाचें शिक्षण ).

२ पुणें—१ दिवसाची शाळा, विद्यार्थी २००. १ भजनसमाज. सुतारीचे व शिवणाचे वर्ग. १ लायब्ररी इ.

३ सातारा—१ रात्रीची शाळा. १ भजनसमाज.

४ महाबळेश्वर—१ उद्योगशाळा ( दोरखंड व नवार करणें ).

५ दापोली, ६ ठाणें व ७ मालवण—येथें गरीब विद्यार्थ्यांस मदत करणाऱ्या कमिट्या.

८ मंगळूर—१ दिवसाची व १ रात्रीची शाळा. १ विणण्याचा कारखाना. १ वसतिगृह. १ वसाहत.

९ मद्रास—२ दिवसाच्या व २ रात्रीच्या शाळा, विद्यार्थी १३०.

१० हुबळी—१ दिवसाची, १ रात्रीची शाळा. १ वसतिगृह.

११ अकोला—३ रात्रीच्या शाळा. १ वसतिगृह.

१२ अमरावती—२ रात्रीच्या शाळा.

१३ भावनगर—१ दिवसाची शाळा. १ दवाखाना.

१४ इंदूर—१ रात्रीची शाळा.

एकूण १४ शाखांच्या २४ शाळा व ५ वसतिगृहें आहेत १२ इतर संस्था त्यांत ५५ शिक्षक व ११०० विद्यार्थी आहेत दरसाल मंडळीचा खर्च वीस हजार २०००० रुपयांवर आहे.

येणेंप्रमाणें आपल्या प्रांतीं ह्या हतभागी वर्गाच्या स्वातंत्र्यबंधाच्या प्रयत्नांची थोडक्यांत हकीगत

आहे. ह्या वर्गाच्या अफाट संख्येच्या मानानें हे प्रयत्न सिंधूंत बिंदूप्रमाणें फारच अल्प आहेत हें जरी खरें आहे, तथापि ज्या माहात्म्यांच्या उदार अंतःकरणांत शुभ प्रेरणा होऊन ह्या अल्प प्रयत्नास सुरुवात झालेली आहे त्यांच्या मंगल कामनेप्रमाणें त्यांनीं आरंभिलेल्या प्रयत्नांस कांहीं कालानें विशाल स्वरूप प्राप्त होईल, अशी आम्ही आशा बाळगितों.

हल्लीं मंडळीच्या कामाकरितां मुंबई आणि पुणें मुक्कामीं इमारतींची फार नड भासत आहे. निदान पश्चिमहिंदुस्थानांतील निकृष्ट वर्गाच्या हिताकरितां मंडळीच्या मनांत जें कांहीं करावयाचें आहे, त्याच्या खर्चासाठीं पैशाची फारच मोठी गरज आहे.

'ह्या नीच मानलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यानें आम्ही स्वतःलाच वर आणित आहों,' ह्या, ह्या संस्थेच्या संस्थापनेच्या वेळीं संस्थेचे अध्यक्ष न्यायमूर्ति सर चंदावरकर यांनीं सांगितलेल्या मंत्रवाक्याचा सतत जप करून प्रत्येक महाराष्ट्रीय धनी, निर्धन, स्त्री, पुरुष सुशिक्षित, अशिक्षित, ब्राह्मण, शूद्र शक्त्यनुसार ह्या हीनदीन लोकांच्या हितासाठीं तनमनधनानें प्रयत्न करील अशी आम्ही उमेद बाळगितों.

तो सत्य संकल्पाचा दाता भगवान् आमची ही मंगल कामना पूर्ण करो !

# भाग दुसरा,—व्याख्यानें.

## डॉ. भांडारकरांस मानपत्र.

( सु. प. ५-२-१९०५ )

(गु. डॉ. भांडारकरांना मुंबई युनिव्हर्सिटीची एल्. एल्. डी. ही पदवी मिळाली, त्या वेळीं त्यांचें अभिनंदन करण्याकरितां जी सभा भरविली होती त्या सभेमध्यें झालेल्या भाषणाचा सारांश.)

आजच्या प्रसंगीं मी माझ्या मनाच्या कला-प्रमाणेंच वागावयाचें झाल्यास मी मुळींच बोलावयास उठलों नसतों. कारण आम्हां पौरस्त्यांमध्यें मर्यादेचे व विनयाचे जे नियम आहेत, त्याप्रमाणें एकानें दुसऱ्याचा आणि विशेषेकरून लहानांनीं वडिलांचा बहुमान करावयाचा झाल्यास तो शब्दांनीं व्यक्त करूं नये, तर वर्तनानेंच दाखवावा असें आहे. एकाद्यास कोणी म्हटलें कीं, तुझ्या आईवर तुझी प्रीति आहे, हें शब्दांनीं सिद्ध कर किंवा पित्यासंबंधीं तुझी पूज्यबुद्धि असल्याचें आम्हांस उघड प्रत्ययास आणून दे, तर त्याला काय वाटेल? त्याच प्रकारें, आज मला प्रत्यक्ष आमच्या गुरुवर्यांचे पुढें उभे राहून त्यांचेविषयीं आम्हांला असें वाटतें, तसें वाटतें इ. म्हणावें लागत आहे. ह्यांत एका दृष्टीनें मजवर मोठा जुलूम होत आहे. पण असो. ज्या अर्थी मी त्यास वश झालों आहें त्या अर्थी मला आपलें काम बजावलें पाहिजे.

प्रथम कोणी अशी शंका घेतील कीं, डॉ. साहेबांस हा अपूर्व मान मिळून आज किती दिवस तरी झाले आणि ही समाजांतील तरुण मंडळी त्यांच्या अभिनंदनास अगदीं सर्वांच्या मागून अशी रेंगाळत कां आली आहे? पण खरा प्रकार असा आहे कीं, जरी ह्या मंडळीनें सर्वांच्या मागून अभिनंदन उघड रीतीनें केलें आहे, तरी तें करण्याचा विचार ह्यांच्या मनांत सर्वांच्या आधीं झाला आहे. मला पक्कें आठवतें कीं, डॉ. साहेबांस ही पदवी मिळाल्याबरोबर लगेच एक सामाजिक तरुण मजकडे आला आणि विचारूं लागला, कीं आतां आम्हीं काय करावयाचें? आम्हांस तर फारच आनंद होत आहे. मी तेव्हां इतकेंच म्हणालों कीं, आम्हीं तूर्त हेंच करावयाचें कीं लोकांत कोण बडी बडी मंडळी आमच्या गुरुवर्यांचें कसकसें अभिनंदन करतील तें कौतुकानें पाहावें. आणि खरोखर आमचा समाज म्हणजे एक कुटुंब, डॉ. साहेबांशीं आमचें घरगुती नातें. तर बाहेर लोकांकडून अनेकवार *सन्मान* व *अभिनंदन* पावून डॉ. साहेब अखेरीस घरीं आले असतां आम्हीं घरांतील लहान मंडळींनीं त्यांचें असें उल्हासानें स्वागत करावें ह्यांत कांहींच वावगें नाहीं, तर तें यथायोग्यच झालें.

ह्या प्रसंगीं मी डॉ. मजकुरांची मोघम स्तुति किंवा त्यांचे कांहीं सामान्य गुण गात बसत नाहीं. आतां जी फुलांची माळ आम्ही त्यांच्या गळ्यांत घातली आहे, ती जशी ते थोडाच वेळ केवळ उपचारासाठीं घेऊन शेवटीं येथल्या येथेंच ठेवून ते व आम्हीही निघून जाणार आहों, तशीच गत अशा स्तुतीच्या माळेची होईल. म्हणून डॉ. साहेबांचे एक दोन विशेष गुण जे अगदीं माझ्या अनुभवासच आले ते मी सांगत आहें. आणि तेही आमच्या फायद्यासाठीं, त्यांच्या बढाईसाठीं नव्हे. समाजाचे *गुणदोष समाजास* सांगण्यांत डॉ० सा० अगदीं निस्पृह आहेत हें तर आतां बहुश्रुतच आहे, पण ह्याहूनही एका दृष्टीनें दुर्लभ जो गुण *खासगी व्यवहारांतही* आपलें कर्तव्य बजावतेवेळीं निर्भय व निर्भीडपणा ठेवणें, हा त्यांच्यांत आहे. एका व्यक्तीसंबंधीं आपलें मत ह्याच्या समक्ष अगदीं सरळपणें व सात्त्विकपणें सांगून टाकण्यांत ते मुळींच कसूर करीत नाहींत; ह्यामुळें त्यांच्या समागमांत राहणाऱ्या तरुणांस फार लाभ होण्यासारखा आहे. दुसरी विशेष गोष्ट मीं पाहिलेली त्यांची नित्याची कौटुंबिक उपासना

ही होय. स्वाध्यायनिवेदन व आत्मपरिक्षणांनीं परिपूर्ण भरलेल्या त्यांच्या व्यक्तिप्रार्थना, आम्हांला पान उलटण्याचीही फुरसद न मिळतां त्यांना समयोचित सुचणारे तुकोबाचे अभंग, अगदीं विनीत भावानें त्यांच्या भोंवतालीं बसलेलीं त्यांचीं मुलें, नातू व नाती व त्यांचें भजन हें सर्व पाहून परक्याचे मनावर देखील फार खोल व शुभ परिणाम होण्यासारखा आहे.

बंगाल्यांतील महर्षि देवेंद्रनाथ हे आतां परलोकवासी झाले. पण आमचे महर्षि आमच्यांत अद्यापि आहेत ही किती भाग्याची गोष्ट ! हे महर्षीही त्याप्रमाणेंच आमच्या समाजाचे प्रधान आचार्य आणि महनीय उपाध्याय आहेत. उपासना व उपदेश ह्याशिवाय कौटुंबिक विधिसंस्कार ह्यांनींच प्रथित करून ठेविले आहेत. इतकेंच नव्हे तर उपनयन, विवाह, नामकरण, आदिकरून घरगुती विधि ह्यांच्या हस्तें जितके झाले आहेत, तितके समाजांत इतरांकडून झाले नसतील. शेवटीं गुरुवर्यांजवळ एकच मागणी मागून मी रजा घेतों. आमच्या समाजाच्या मतांसंबंधीं एकाद्या वजनदार ग्रंथाची हल्लीं मोठी उणीव आहे. बाह्य ग्रंथाचें प्रामाण्य समाज मानीत नाहीं, तेव्हां अशा ग्रंथास पुढें भलतेंच महत्त्व येईल अशी भीति कोणास बाळगण्याचें कारण नाहीं. तर डॉ. सा. ह्याच हस्तें असा ग्रंथ होईल तर आम्ही फार आभारी होऊं.

---

## ब्राह्मसमाज व आर्यसमाज.

### ( ह्यांतील हल्लींचे साम्यभेद व पुढें ऐक्यार्थ यत्न. )

मुंबई येथें फ्री रीडिंगरूम, बोरीबंदर येथें झालेलें व्याख्यान. सु. प. ता. २२–११–१९०३.

सन १८३० सालीं राजा राममोहनरायांनीं बंगाल्यांत ब्राह्मसमाज काढिला. स्वामी दयानंदजींनीं येथें १८७५ चे सुमारास आर्यसमाज स्थापला. ह्या दोन महापुरुषांच्या सामर्थ्यानें व त्यांच्या अनुयायांच्या उद्योगामुळें हिंदुस्थानांत शुद्ध स्वतंत्र आणि उदार धर्माच्या प्रसारार्थ गेल्या शतकांत प्रचंड यत्न झाला व तो अद्यापि वाढतच आहे. मुंबई इलाख्यांतल्या कांहीं ब्राह्ममताच्या समाजांस जरी प्रार्थनासमाज हें नांव आहे, व क्वचित् उपासनासमाज असेंही नांव आढळतें, तथापि वस्तुतः सर्व ब्राह्मांचीं स्वीकृत मतें व इष्ट हेतु एकच असल्यानें संज्ञेच्या सोयीसाठीं सर्वांस ब्राह्मसमाज ह्या एकच साधारण नांवानें ओळखल्यास कांहीं बाधा नाहीं. तसेंच, पंजाबांत जरी कांहीं अंतस्थ कारणामुळें आर्यसमाजांतही दुही आणि तट पडले आहेत, तरी सर्व 'आर्यां'चा बहाणा एकच असल्यानें आर्यसमाज हें साधारण नांव त्यांनाही सारखेंच लागू पडतें.

#### आतां ह्या दोन मोठ्या सुधारकपंथांमधील प्रधान गोष्टींत साम्य

काय आहे तें थोडक्यांत पाहूं. ईश्वर आहे इतकेंच नव्हे तर, ईश्वर म्हणजे केवळ एक अंध आणि अहेतुक शक्ति नसून, ती जीवंत, जागृत, सर्वत्र व्यापारमय वस्तु आहे. विश्वविकासांत त्याचा मंगल हेतु आहे, व अवीटप्रमाणावर त्याच्या योजनेला यशच येत चाललें आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर तो पुरुष आहे–पुरुषोत्तम म्हणण्याचें कारण, आमच्यासारख्या अपूर्ण पुरुषांहून त्याची भिन्नता दाखविण्यासाठीं. अर्थात् तो एकच अद्वितीय आहे. केवळ चिन्मय असल्यानें त्यास अवयवाची जरूरी नाहीं.

आत्मा—आह्मां जीवांमध्यें अहंकारमूलक जो आत्मा आहे तोही वस्तु आहे; केवळ भास नव्हे. ईश्वराचे ठायींच त्याची वसति आणि वाढ आहे. त्याला नाश नसून तो सदैव प्रगमनशील आहे.

उपासना.—आम्ही जी ईश्वराची उपासना करावयाची ती बाह्योपचारिक नसावी, किंवा तिच्यांत विधिसंस्काराचें वृथा अवडंबर नसावें. म्हणजे एकपक्षीं मुळीं ईश्वरच निरवयव, निराकार असल्यानें त्याची कोणत्याही सृष्ट पदार्थानें मूर्ति घडवतां येत नाहीं व दुसऱ्या पक्षीं त्याचें सूक्ष्म स्वरूप व त्याचा आपल्याशीं सर्व बाजूनें असलेला निकट संबंध ह्यांचें ग्रहण आपल्या मनानेंच करून घेण्याचा कमी अधिक मानानें सर्वांच माणसांचा अधिकार आहे; म्हणून त्याच्या उपासनेस कसल्याही जड साधनांची गरज नाहीं.

ह्याप्रमाणें एक ईश्वर, सतत विकास पावणारा आत्मा, आध्यात्मिक उपासना इत्यादि धर्माच्या

पारमार्थिक तत्त्वांसंबंधीं ब्राह्म आणि आर्य ह्या दोघांचें साम्यच नव्हे, तर ऐक्य आहे. इतकेंच नव्हे, तर धर्म म्हणजे वरील शुद्ध विचार इतकें ठरवून स्वस्थ न बसतां त्यांच्या पायावरच आपले ऐहिक आचार करण्याचा दोघांचाही आग्रहपूर्वक यत्न आहे. म्हणून सामाजिक बाबतींत सर्व माणसांचें बंधुत्वाचें नातें आहे; त्यांचे हक्क सारखे आहेत; गुण—कर्मादि आगंतुक गोष्टी शिवाय वस्तुतः त्यांच्यांत भेद नाहींत; रूढीमुळे जे पाळण्यांत येतात ते पाळूं नयेत, केवळ जड हेतूनें सामाजिक सुधारक ज्या कांहीं सुधारणा आज घडवूं पाहतात, त्या सर्व धर्माच्या उच्च पाया वरून घडून याव्यात; अशी दोघांचीही सारखी खटपट आहे.

राजकीय बाबतींतही, राजा म्हणजे केवळ देव नव्हे; तो माणसांचाच प्रतिनिधि आहे. माणसांमध्यें जी धर्मबुद्धि आहे तिच्याच आश्रयानें सर्व राजकारण आटपावें, असें दोघांसही वाटतें.

ह्याप्रमाणें तात्विक व व्यावहारिक धर्माचा जो प्रधान भाग त्याविषयीं कोठें फारसा भेद येत नाहीं. भेद येतो तो येथें कीं, ज्या साधनांनीं हें धर्मज्ञान मनुष्यांस होतें, अशी समजूत असते, त्या साधनांविषयीं आग्रह धरण्यांत. ह्या गौण गोष्टीस वेळो. वेळीं फाजिल प्राधान्य दिल्यामुळें धर्माच्या नकाशांत किती चित्रविचित्र रंग भरले आहेत व किती हिडिस हेंदर साचली आहे, हें सांगण्यास येथें स्थळ नाहीं.

## गौण भाग.

वर जो साधनांविषयीं आग्रह सांगितला, तो चार प्रकारचा. एक विभूतिप्रामाण्य, दुसरा ग्रंथप्रामाण्य तिसरा मठ (church) प्रामाण्य, व चवथा रूढिप्रामाण्य. ज्या हिंदु धर्मांतून ब्राह्म आणि आर्य हे पुढें आले त्यांची स्थापना खिस्त—बुद्धासारख्या एकाच विभूतीकडून नियमित काळीं झाली नसल्यामुळें मूळ जुन्या हिंदु धर्मांतच इतर धर्माप्रमाणें विभूतीविषयीं हटवाद नाहीं. अवतारवादाविषयीं जो आग्रह आहे तोही ब्राह्मांप्रमाणेंच आर्यांनीं सोडून दिला आहे. त्याचप्रमाणें तिसरा आणि चौथा आग्रह (अगर आचार्यपीठ) जो मठ आणि रूढीसंबंधाचा तोही आर्यांनीं बिनबोभाट बाजूस ठेविला आहे. बाकी एक जो आग्रह उरला आहे आणि जो ब्राह्म आणि आर्य ह्यांच्यामधील अल्प आणि दिवसेंदिवस कमी कमी होत जाणाऱ्या भेदाला कारण झाला आहे, तो ग्रंथप्रामाण्यासंबंधीं होय. ह्या उरलेल्या आग्रहाची जागाही किती आकुंचित झाली आहे पहा. जुन्या मताप्रमाणें श्रुति, स्मृति, पुराणें आणि तंत्रें हीं सारीं पुस्तकें हिंदु उपासनेला व व्यवहाराला प्रमाण मानलीं आहेत. कचित् जरी कांहीं हिंदु धर्माभिमान्यांनीं 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' अशी हिंदु धर्माची व्याख्या केली आणि आर्यसमाजाला हिंदूंत गणलें, तरी तेवढ्यावरूनच हिंदुसमाजाला वेदच मान्य आहेत असें होत नाहीं. उलट आर्यांनीं मात्र चार वेदांशिवाय बाकी सर्व पुस्तकांचा अधिकार बेलाशक झुगारून दिला आहे. बाकी उरलें तें चार वेदांचें प्रामाण्य.

येथवर जे ब्राह्म आणि आर्य संगतीनें चालले त आतां एकमेकांकडे टवकारून पाहूं लागतात. जणूं काय ह्या गोष्टीचा उलगडा झाल्याशिवाय पुढें त्यांना पाऊल टाकणें शक्यच नाहीं. जणूं काय आतांपर्यंत त्यांची संगति झाली ती ह्या गोष्टीच्या अज्ञानामुळेंच. जणुं काय बाह्य जगाचा जो विरोध आहे तो दोघांसही पुरेसा नाहीं. असो.

उगाच कांहीं तर्कट लढवून दोघांचें नसतें साम्य दाखवून ह्या खोट्या साम्याचा गळेबंद दोघांच्या गळ्यांत नकळत अडकविण्याचा माझा उद्देश नाहीं. तर जो भेद आहे तो कायमचा व अखेरचा आहे काय? आम्ही जे भेदाचे मोठमोठे डोंगर ओलांडून आलों, ते आतां या भेदाच्या सापासारख्या दिसणाऱ्या दोरीला भिऊन निरनिराळ्या दिशेनें एकमेकांपासून दूर पळावें काय? ह्याचा विचार दोघांनीं करावा एवढाच आजचा हेतु आहे.

वेद शब्दाचा अर्थ करण्यांत आमचे आर्य बंधु जें अलौकिक विचारस्वातंत्र्य दाखवितात, जें मनाचें औदार्य आणि प्रचाराची प्रगति दाखवितात, इतकेंच नव्हे, तर आधुनिक सुधारणा आणि आधुनिक परिस्थिति ह्यांचा त्यांना कोठेंच अडथळा न येतां पुनः वेदाच्या प्रामाण्याविषयीं त्यांचा जो आग्रह आहे तो पाहून वेदप्रामाण्यासंबंधानें त्यांची लौकिकापेक्षां कांहीं तरी निराळी समजूत असावी असें वाटतें. म्हणजे वेदाचें जें अर्थप्रामाण्य मानतात

तें बाह्य नव्हे तर अंतरप्रामाण्य असलें पाहिजे,आर्यांशीं पुष्कळ वेळ बोलल्यावर शेवटीं त्याची मजल येथवर जाते कीं वेद ह्मणजे हीं बाहेरलीं पुस्तकें नव्हत तर सनातन ईश्वरीज्ञान होय. या ठिकाणीं आतां

## ब्राह्मांची प्रामाण्यबुद्धि

कशी आहे ती थोडक्यांत सांगणें भाग आहे. ब्राह्मांस त्याच्या बाहेर प्रमाणभूत वस्तु अशी काय ती एक ईश्वरच. त्याच्या प्रामाण्याचा बोध जो ब्राह्मांस होतो तो बाहेरून नव्हे, तर त्यांच्या अंतर्यामांतून आणि विवेकबुद्धींतून. ह्यावरून ब्राह्मांना प्रमाणभूत असें कांहींच नाहीं, ते स्वैर आहेत असें होत नाहीं. उलट ब्राह्मांचें असें म्हणणें आहे कीं, ज्यांना हें अंतरप्रामाण्य मान्य नाहीं किंवा पुरेसें तें ज्यांस भासत नाहीं, तेच बाहेरच्या अनेकविध प्रामाण्यांच्या भानगडींत पडतात. आतां जर कोणी ब्राह्मांस विचारतील कीं, अंतरप्रामाण्यांत सर्वत्र सारखेपणा व निश्चितपणा कोठें आढळतो? तर त्यांचें सांगणें असें पडतें कीं, बाह्य पुस्तकांत व आचारांत तर आंतल्याहून अधिक घरसोड, उडवाउडव, आणि अफरातफर आढळते आणि ती निवारण्यास पुनः आपल्या शुद्ध व सात्विक बुद्धीचाच उपयोग करावा लागतो, असो. ब्राह्मांनाही अंतरप्रामाण्य कबूल आहे हें निर्विवाद आहे. इतकेंच नव्हे, तर ह्या दृष्टीनें त्यांना हिंदूंचे वेदच काय पण निरनिराळ्या राष्ट्रांत निरनिराळ्या काळीं ईश्वराकडून मानवी बुद्धीला ज्या ज्या प्रेरणा मिळाल्या आहेत. त्या सर्व सारख्याच पूज्य व स्वीकरणीय आहेत. ईश्वरी शब्दांस रुकार देण्याचा मनुष्यास जो अनुपम अधिकार आहे, त्याच्या बळावर त्यानेंच निरनिराळ्या काळीं जे उद्गार काढिले आहेत त्यांना ईश्वरी म्हटलें काय, मानवी म्हटलें काय, त्यांची योग्यता जास्त होत नाहीं कीं कमी होत नाहीं! ईश्वरी सत्य जें आहे तें सनातनच आहे पण त्याचा वेळोवेळीं जो मानवी शब्दांनीं स्फोट होतो तो देशकालांनीं परिच्छिन्न असतो म्हणून शब्दाविषयीं आग्रह न धरतां सत्याविषयीं आदर धरणें हेंच प्रामाण्यबुद्धीचें खरें लक्षण आहे.

## समेट.

वर जो आपण धर्माचा प्रधान भाग पाहिला आणि त्यांत ब्राह्मांचें व आर्यांचें ऐक्य आहे हें दाखविलें, त्या भागाचें आचरण करण्यांत आपली शक्ति खर्च करावी कीं तो भाग अमूक ग्रंथांत आहे आणि अमूक ग्रंथांत नाहीं ह्याचा निर्णय करण्यांत खर्चावी? केवळ सत्य आणि केवळ असत्य असा कोणताच ग्रंथ नाहीं आणि, मध्यंतरीं कोणत्या ग्रंथांत किती सत्य आहे हें पाहण्याचें काम, ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य निरपेक्षपणें विद्याव्यासंगास वाहिलें आहे अशा पंडितांचेंच आहे. तें काम धर्मप्रचारकांनीं आपल्याकडे घेतलें. इतकेंच नव्हे, तर अमुक एकच श्रुतिग्रंथ सर्वांशीं प्रमाण आहे असा आग्रह धरिला तर त्याच्यावर तीन प्रकारची जबाबदारी येते. पहिली ही कीं, ज्या ग्रंथाचें प्रामाण्य त्यास स्थापावयाचें आहे त्यांतील सर्व विधानें हल्लीं विकास पावलेल्या बुद्धीस पटतात हें दाखविण्याची. ह्याच्यामुळें त्या पुस्तकांतील सर्व कथाभागाचा आणि त्या वेळच्या समजुतीचा आतांच्या चालीरीतीला लागूं पडेल असा अर्थ करण्यांत येतो. दुसरी जबाबदारी ही कीं, आतां अवगत झालेलें सर्व सत्य त्यांत आहे हें दाखविण्याची. ह्यामुळें मांसभक्षण व मद्यपान ह्यांचाही निषेध वेदांत आहे असें दाखविण्यांत येतें. तिसरी अत्यंत जोखमीची जबाबदारी ही कीं ह्याशिवाय इतर श्रुति आहेत त्या प्रमाण नव्हत हें सिद्ध करण्याची. ही तिसरी जबाबदारी अत्यंत शोचनीय आहे. हिला कोणत्याही श्रुतींत आधार नसून प्रत्येक ग्रंथाभिमानी ती बळेंच आपल्यावर ओढून घेतो.

वर सांगितलेल्या ह्या तीन जोखमा आमचे आर्य बंधु आपल्यावर विनाकारण घेतात. वेद-प्रामाण्यासंबंधीं त्यांनीं थोडा खोल विचार केला तर त्यांच्यांत व ब्राह्मांत फार मोठा भेद राहणार नाहीं. जरी किंचित् राहिला तरी, प्रधान भागांत जें त्या दोघांचें ऐक्य आहे आणि गौणभागांतही त्याचा पुष्कळ भेद नाहींसा झाला आहे हें पाहून दोघांनींही आपला धर्मसुधारणेचा एकत्र इष्ट हेतु आतां अधिक एकीनें करायाला पाहिजे आहे.

ब्राह्मांनीं श्रुति अगदीं टाकिल्या आहेत असें नाहीं, तर उलट सर्वच जगांतल्या श्रुति त्यांनीं स्वीकारल्या आहेत हें वर सांगितलें. पण ह्यापेक्षांही आर्यांनीं हें ध्यानांत घ्यावें कीं ब्राह्मास वेदाचा जो शेवटचा व उत्तम भाग उपनिषदें ही

पूर्ण मान्य आहेत, इतकेंच नव्हे तर भगवद्गीता आणि आधुनिक तुकाराम, नानक, चैतन्यादि साधूंचे प्रयत्नही ब्राह्मांस पटत आहेत, आणि त्यांच्याच वचनाच्या द्वारें मंदिरांत उपदेशही होत असतात. ह्यापुढें ब्राह्म आणि आर्य ह्यांमधील भेद जर अपाल्यानें कमी व्हावा असें दोघांला वाटत असेल तर दोघांनीं परस्परांचें रहस्य जाणलें पाहिजे तें असें. ब्राह्मांनीं आपल्या सार्वत्रिक व सनातन धर्माचीं तत्त्वें हिंदुस्थानवासीयांस विशेष लवकर कळवावीं आणि आर्यांनीं ह्याच सनातन धर्माचीं तत्त्वें वेदांतून काढतांना शब्दांची वाजवीपेक्षां जास्त ओढाताण करूं नये इतकेंच नव्हे तर हा सनातन धर्म सर्वत्र आहे, हें सहज कळविण्यासाठीं तीं सर्व धर्मग्रंथांतन शेतां होईल तीतकीं काढावींत. ह्याशिवाय दोघांचें व्हावें तसें ऐक्य होणार नाहीं किंवा धर्माची सुधारणा करणें ह दोघांचा हेतु तोही पूर्ण तडीस जाणार नाहीं.

ब्राह्म आणि आर्य हे दोघेही जर उदार मताचे आणि प्रगतीपर आहेत, तर दोघांचें ऐक्य केव्हां तरी झालेंच पाहिजे. इंग्लंड, अमेरिकेंतील युनिटेरिअन लोक, युरोपांतील उदार प्रॉटेस्टंट लोक आणि हिंदुस्थानांतील ब्राह्म हे भूगोलांत व इतिहासांत एकमेकापासून इतके दूर असनही आणि त्यांच्या आतांच्या चालीरीति व मूळचा धर्मही इतका अत्यंत भिन्न असूनही ह्यांच्यांत अलीकडे किती तरी ऐक्यभाव व प्रेम वाढत आहे आणि परस्परांस मदत करीत आहेत. पण आर्य आणि ब्राह्म हे सख्खे बंधु, एकाच धर्मांतले, एकाच देशाच्या उद्धारासाठीं झटणारे असूनही हे परस्परां पासून नेहमीं इतके स्वतंत्र, कित्येकदां अगदीं उदासीन व क्वचित् प्रसंगीं एकादा दुसऱ्याला टाकूनही बोलतो ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे !

नांवारूपानें दोघे जरी आज एक होणें शक्य नसलें तरी जें पुष्कळ कार्य दोघांस जोडीनें करतां येईल त्यांत कोणीही तटस्थ राहूं नये.

---

# * धर्मजागृति.

धर्मावर भाषण करण्याचे मला जरी वारंवार प्रसंग येतात, तरी बहुतेक ते सावलींत, सुखानें बसून विद्या–व्यासंग करणाऱ्या पांढरपेशांमध्येंच असतात. आज मला देशसंरक्षणाचें पवित्र पण कठीण ब्रीद बाळगणाऱ्या तुम्हां क्षत्रियांपुढें बोलावयाचें आहे म्हणून आनंद होत आहे. धर्माची जागृति म्हणजे काय व ती कशी ठेवावी हें सांगण्यापूर्वी मुळीं धर्म म्हणजेच काय हें सांगणें अवश्य आहे. कित्येकांचें म्हणणें असतें कीं, धर्मतत्त्वें हीं समजण्यास अत्यंत गूढ, वेद वगैरे जुन्या ग्रंथांसही त्यांचा पार लागला नाहीं, व अलीकडच्या शहाण्या लोकांनीं ह्या बाबतींत ज्ञान होणें अशक्य आहे, असा शेरा दिला आहे, म्हणून ह्या भानगडींत मुळीं पडूंच नये हें बरें. उलटपक्षीं यात्रा, पूजा, नवस केले, कित्येक पिढ्या चालत आलेले बरेवाईट कुळाचार निमूटपणें चालविले आणि भटभिक्षुक आणि नातलग व

---

* सातारा येथील मित्रसंमेलनाकरतां रा. रा. वि. रा. शिंदे हे तेथें गेले असतां संमेलनासंबंधीं त्यांचे **'सामाजिक सुधारणा आणि हिंदी राष्ट्रीयत्व'** ह्या विषयावर एक *व्याख्यान* झालें. त्याचा बराचसा सारांश तेथील **प्रकाश**पत्रांत आला आहे रा. शिंदे ह्यांचीं गांवांत आणखीं कांहीं धर्मसंबंधीं व्याख्यानें व्हावयाचीं होतीं. पण नुकतींच व्याख्यानें फार झालीं असल्यामुळें तूर्त तो बेत तहकूब करावा लागला. तथापि तेथील छावणीतील लष्करी लोकांकरितां सदर बाजारांत ता. २५ मे १९०५ रोजीं संध्याकाळीं वरील विषयावर रा. शिंदे ह्यांचें व्याख्यान झालें. विशेष लक्ष्यांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं ह्या व्याख्यानाकरितां मंडळी जमविणें, खुर्च्या, बाकें, दिवा, बत्ती वगैरेची व्यवस्था राखण्याचें सर्व श्रेय एका मुसलमान पेन्शनर सद्गृहस्थानें व त्याच्या कांहीं सजातीय मित्रांनींच संपादिलें दुसरी गोष्ट ही कीं व्याख्यानाला जागा नेमिली होती ती बाजारांतील एका मुख्य चव्हाट्याच्या कोपऱ्यावरील पोलीसचौकींत पोलीसच्या अगदीं खुशीनेंच मिळाली होती व बाहेर रस्त्यापर्यंत बाकें मांडलीं होतीं. चौकीचे खांब वेलीफुलांनीं सुशोभित केले होते. मराठा लाईट इन्फंट्रींतील डॉक्टर, सुभेदार, जमादार वगैरे अंमलदार, शिपाई, मुसलमान, पार्शी व इतर लोक ऐकण्यास आले होते.

शेजारी यांची समजूत केली कीं ह्याला सर्व धर्म. ह्यांत जर कां कोठें कसूर झाली तर इहलोकीं आपण नास्तिक ठरूं, वाळींत पडूं व परलोकीं नरक भोगूं अशी भीति पुष्कळांस पडते. पण थोडा विचार केल्यास वरील दोन्ही प्रकार असमंजसपणाचे आहेत असें दिसून येईल. धर्माचें व्यवहारापुरतें ज्ञान कोणासही होणें केवळ अशक्य आहे असें नाहीं. आणि त्याचें खरें आचरण ठेवणेंही वरप्रमाणें केवळ वरपंगी नाहीं. तर आपण धर्म म्हणजे काय हें अगदीं सोप्या दृष्टीनें पाहूं या. पतिव्रतेचा धर्म काय, पतीची आज्ञा पाळणें व सुख साधणें; विस्तवाचा धर्म काय, जाळणें; कांचेचा धर्म काय, तर पलीकडचें दिसणें. ही मजपुढें दिव्यावर जी कांच बसविली आहे, तिच्यांतून जर दिवा दिसला नाहीं, स्वतः कांचच दिसूं लागली, तर ती कांच नव्हे. आपण त्याला दगड म्हणूं. हात लावल्याबरोबर थंडगार लागूं लागला तर त्यास विस्तव न म्हणतां बर्फ म्हणूं. म्हणजे काय कीं, कांचेनें व विस्तवानें आपापला धर्म म्हणजे आंगचा अवश्य गुण सोडिला असें होय. ह्याप्रमाणें व्यवहारांत ' धर्म ' शब्दाचा आम्ही अर्थ समजतों. हाच अर्थ आम्हीं नेहमीं ध्यानांत धरिला तर धर्माचा व्यर्थ वाढलेला कठिणपणा कमी होईल. इतर पदार्थांत व प्राण्यांत जसे त्यांच्या आंगचे अवश्य गुण आहेत तसेंच मनुष्यप्राण्यांतही जो गुण आहे त्यास आम्ही धर्म म्हणतों, तो गुण हा कीं, मनुष्य आदिकरून निरनिराळ्या ठिकाणीं जे धर्म आढळतात, त्या सर्वांचा उगम जो ईश्वर त्याचें ज्ञान करून घेणें, त्यासच शरण जाणें व त्यानें लावून दिलेली सेवा संभाळणें, हा गुण इतर प्राण्यांत आढळत नाहीं. आणि जर कदाचित् कांहीं माणसांतही हा गुण आढळला नाहीं तर त्याची वाढ अद्यापि मनुष्यदशेपर्यंत झाली नाहीं असें समजून त्यास खुशाल खालील प्राण्यांत गणण्यास कांहीं हरकत नाहीं. म्हटलें आहे:—

आहार-निद्रा-भय-मैथुनानि ।
समानमेतानि पशुभिर्नराणाम् ॥
ज्ञानं ही तेषामधिको विशेषः ।
ज्ञानेनहीनाः पशुभिः समानाः ॥

या ठिकाणीं ज्ञान म्हणजे वर सांगितलेला गुणच होय, केवळ खाण्यापिण्याचें ज्ञान नव्हे. याचेंच नांव धर्म.

हा धर्म म्हणजे अर्थात् एकच असणार. त्याचीं अनेक रूपें जरी जगांत अनेक कारणांनीं आढळत असलीं तरी त्या सर्वांचें मूळस्वरूप वर सांगितलेलें एकच असणार. हीं सर्व रूपें ईश्वरास सारखींच प्रिय असलीं पाहिजेत. आम्हीं मात्र त्याचें मूळस्वरूप विसरूं नये. ईश्वराचे राज्यांत हा हिंदु, हा मुसलमान, हा खिस्ती असा खात्रीनें भेद होणार नाहीं.

हल्लीं इंग्रजांच्या राज्यांत जर हा भेद पाळण्यांत येत नाहीं, तर ईश्वराचें राज्य जें खात्रीनें अधिक पवित्र असणार त्यांत कसा पाळण्यांत येईल! इंग्रजसरकार स्वतः खिस्ती धर्माचें आहे. आपल्या धर्माची किंमत तें जाणत नाहीं असें नाहीं. पण आजपर्यंतच्या अनुभवानें तें जर, केवळ धर्म निराळा म्हणूनच एखाद्यास आपल्या दरबारांत निराळी जागा न देण्याइतकें शहाणें झालें आहे, तर देव काय त्यापेक्षां कमी शहाणा असेल कीं त्याच्या दरबारांत असा भेद होईल! मग स्वतः देवच जर धर्मभेद पाळीत नाहीं तर मनुष्यानें तो पाळणें किती सत्यास धरून होईल बरें! हें सत्य व धर्माचें हें मूळस्वरूप लक्षांत सतत बाळगणें म्हणजे धर्मजागृति, अथवा धर्म जागा राखणें असें होईल.

पण अलीकडे धर्मजागृति करणें ह्याचा भलताच अर्थ होऊन बसला आहे. हिंदूनें म्हणावें कीं, आमचाच धर्म सर्वांत जुना, श्रेष्ठ आणि पवित्र म्हणून त्याचे जे हल्लीं आचार आहेत त्यांचाच वरचष्मा राखूं; मुसलमानांनीं ह्याच्या उलट प्रयत्न करावे, व खिस्त्यांनीं तर ह्या दोघांनाही पुढें नरकवासच आहे असें भाकीत करावें; असा प्रकार चालला आहे. असें होतां होतां परधर्माची खूप निंदा करणें, त्यांतील असतील नसतील ते सर्व दोष बाहेर काढणें व प्रसंगीं दंगा माजविणें हेंच धर्मजागृतीचें लक्षण झालें आहे. अशानें आम्हीं कधीं देवाकडे जाऊं? आम्ही येथें ह्या पोलिसचौकींत जमलों आहों ते जर समजुतीच्या चार गोष्टी बोलून एकमेकांचें हृद्गत जाणूं तर ठीक. पण जर कां दंडेली करून एकमेकांतला नीच भाव वाढवूं लागूं, तर तत्काळ हे पोलीसदादा आम्हां सर्वांस बाहेर घालवितील. असें आहे तर जन्मभर धर्माच्या नांवानें वाद माजवून व तंटे

वाढवून शेवटीं ईश्वराकडे गेलों तर तो कसा आम्हांस आंत घेईल बरें?

ब्राह्मसमाज अगर प्रार्थनासमाज जी धर्मजागृति करीत आहे ती अशाप्रकारची नव्हे; किंवा हल्लीं चालू असलेल्या सर्वच धर्मपंथांत थोडे बहुत दोष आहेत म्हणून तेवढे दोषच दाखविण्याचेंही काम समाज करीत नाहीं. तर सर्व पंथांत भरून असलेलें मूळ स्वरूप उघडकीस आणून हल्लीं सर्वांचा समेट करण्याचा व अखेरीस, कांच, अग्नि इत्यादिकांस वर सांगितल्याप्रमाणें जसा एकच धर्म, तसा मानवी अंतःकरणाचाही ईश्वराकडे ओढ घेणें हा एकच धर्म आहे, असें सिद्ध करण्याचा समाजाचा प्रयत्न आहे. ह्या सातारा गांवीही रा. रा. काळे, जव्हेरे वगैरे मंडळी ह्याच प्रयत्न करीत आहेत. धर्म जागा ठेवणें असल्यास तुम्हीं सर्वांनीही त्यांस मदत करणें जरूर आहे.

---

## निवृत्ति व प्रवृत्ति आणि अवतारवाद व विकासवाद.

( साताऱ्यास झालेलें व्याख्यान. शु० प० ता० २१-५-१९०५. )

त्याग तरी ऐसा करा।
अहंकारा दवडावें ॥ १ ॥
आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां।
तो झाला सोहळा अनुपम्य ॥ १ ॥
सकल चिंतामणी शरीर।

आमच्या मंडळीच्या सुधारणेचीं दोन अंगें आहेत. एक धार्मिक व दुसरें सामाजिक. कोणी आमच्यांतीलच म्हणतो कीं, धार्मिक अंग नुसतें राखावें. आमच्या भजनाला, उपासनेला, कोणी फारसें किंवा मुळींच आड येत नाहींत व यायचेही नाहींत; पण तुम्ही सामाजिक खटाटोपी करूं लागाल, तर मात्र पदोपदीं अडथळे आणून घ्याल. पण माझें म्हणणें असें कीं, धार्मिक सुधारणा करूं कीं, सामाजिक करूं, किंवा कोणती आधीं करूं, हा जो प्रश्न आहे तो आपल्यामधील अहंकार गेला नाहीं म्हणूनच पुढें येतो असें म्हटलें पाहिजे. धर्मविभूति, आध्यात्मिक सुधारक, ज्याला पुढें लोकांत अवतार किंवा मग देवच म्हणतात, अशाचें एक तरी उदाहरण डोळ्यापुढें आणा कीं, हा प्रश्न त्यांच्यापुढें होता—धार्मिक साधनें, सुधारणा करूं व सामाजिक सोडून देऊं कां? त्यांना कधीं याबद्दल संशय नव्हताच; कारण, त्यांची राहटी अगदीं कडेलोटपणाची होती. आजकालच्या लोकांनीं अहंकार समूळ सोडला पाहिजे. इंग्रजींत म्हणतात, If you want to gain, you must lose yourself first; die to live म्हणजे जर मिळवावयाचें आहे तर हरवून घ्या आधीं. खरोखरीच विरोधाभास दिसतो आहे हा. नाहीं तर काय? म्हणे मरा कशासाठीं तर जीवंत राहण्यासाठीं; पण यांतील तत्त्वाकडे दृष्टि दिल्यास या वचनाची सत्यता लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

तुमच्यापुढें हें द्वैत वाऱ्यासही उभें न राहतां तुमचें आचरण सर्वकाळ ईश्वरास स्मरून व अहंता, अहंकार, अहंभाव यांस विसरून होत राहिलें, म्हणजे मग तुम्हांला वाराणसीसारख्या तीर्थस्थानीं जाण्यास नको. ती वाराणसी, आणखी तिच्या पलीकडे कांहीं दुसरी काशी असली तरी ती तुमच्या जवळ येते आहे. कारण हें पहा, तीर्थाला तीर्थपण आलें कोठून? तर साधूंशीं त्याचा पूर्व समागम घडला होता म्हणून. मोठी जाडी विभूति आध्यात्मिक व कर्ती सुधारक अशी मुळाशीं असल्यामुळेंच तर तीर्थाचें माहात्म्य. असा हा तुमचा अधिकार वाढेल. तुकोबांनीं म्हटलें आहे कीं, 'आपलें मरण मीं पाहिलें' ह्य. अहंकारवृत्ति त्यांच्यामधून समूळ निघून गेली; तो सोहळा काय अनुपम! याबरोबर सहज हेंही दिसतें कीं, साधूंचीं वचनें बहुतकरून विरोधाचीं असतात किंवा वाटतात. इतका नेटाचा विचार त्यांच्या अंतःकरणांत येतो कीं, 'वाचमर्थोऽनुधावति' असें मग होतें. पण याहून जास्त विचार करून पाहूं कीं मीपणाचा काय सर्वस्वी नायनाट होतो किंवा करावयाचा कीं काय? तर तसें नसून मीपणाचा विस्तारच करून सर्वात्मकपणें भोग झाला हा अनुभव घ्यावयाचा. आत्मवृत्ति संकोचित न करितां तिचा परिघ एकसारखा पसरतच रहावयाचा. हें जर आपणांस कर्तव्य नसेल, हा प्रवृत्तिमार्ग न आवडून निवृत्तिमार्ग श्रेष्ठ वाटत असेल

तर निवृत्ति, निवृत्ति म्हणजे कोठवर खरोखर गेली पाहिजे हें लक्षांत घ्यावें. म्हणजे हे तुम्ही कबूल कराल कीं, शेवटीं दोरीनें गळयाला फांस लावून घेतला पाहिजे. तव्हां सुटला एकदां मानवप्राणी या सांसारिक आत्मयातनेंतून; मिळाला त्याला मोक्ष ! पण याला मोक्ष म्हणायचें नाहींच. पशूला वाटतें कीं वर शिंगें, खालीं पाय, यामधला जो तो मी. परंतु मनुष्याला स्वाभाविकच स्वतःपुरतें पाहून समाधान नाहीं. त्याचा मी हा मध्यबिंदु सर्व स्थितींत खरा; पण त्याचा जवळचा परिघ घेतला तर त्याचें स्वत.चें कुटुंब होय. बहुतेक सुधारलेल्या मनुष्याची मजल म्हणजे त्याचा परिघ आजकाल पाहिलें असतां स्वतःच्या राष्ट्रपर्यंत जातो. हिंदुस्थानाची सीमा काय बुवा, तर उत्तरेस हिमालयपर्वत वगैरे सुरवात करून इतक्याच प्रदेशांशीं फक्त आपला निकटचा किंवा तात्त्विकचाही संबंध, तितक्या पुरताच काय तो अभिमान. पण मी खरोखरी उत्तम झालों केव्हा समजायाचें किंवा याचा अर्थ काय, तर माझ्या सहानुभूतीचा, नव्हे, आत्मप्रचीतीचा परिघ अनंत वाढलेला आहे, व मध्यबिंदूशीं मी आहें. अहंभावाचा ताठा मिरविणाऱ्यानें डोळे उघडून विचार करून पाहिलें पाहिजे कीं, अरे, मी आपणास म्हणतों, पण मी म्हणजे कोण ! कोठेंसा आहें ! या अफाट विश्वाच्या एका कोपऱ्यांत, कोठला तो कोपरा, कोपऱ्यांतल्या कोपऱ्यांत कोणता अंश म्हणावा, अंशाचा कोणता अंश म्हणावा, कांहींच नाहीं, इतका क्षुल्लक जागा व्यापणारा प्राणी मी, माझी मातब्बरी काय कीं, मीं गर्वानें फुगून नेहमीं कुर्ऱ्यांतच असावें ! याचा त्याग झाला असतां नारायण म्हणजे नराचें अयन ज्याच्यामध्यें त्यानें समर्याद, क्षुद्र, आकुंचित् जगांतून उमटून आपल्याला आपल्या आंगाशीं लावून घेतलें असा अनुभव येतो.

तेव्हां तात्त्विकदृष्ट्या विचार केला असतां मी म्हणतो कीं, निवृत्तीचा मार्ग न पतकरतां जाज्वल्य प्रवृत्ति करावयाची. यानें किती लोकांचा भरिभार आपल्यावर घेतला पाहिजे याचा विचार करा. प्रेसिडेंट रूझव्हेल्टचें उद्दिष्ट असें आहे कीं, नेहमीं सात्त्विक युद्ध करीत राहिलें पाहिजे. आपल्याकडे तुकारामबुवाही म्हणतात कीं रात्रंदिवस आम्हांला युद्धाचा प्रसंग. मी तरी समजतों कीं निवृत्ति म्हणजे नाशच, मेल्यापेक्षां अहंकार तरी असूं द्या; चालतां चालतां कधीं तरी ठेंच लागेल, व मन ताळ्यावर येईल म्हणायाला जागा राहते. कृष्णानें अर्जुनाला अखेरचा निरोप अट्टाहासानें प्रवृत्तिविषयकच सांगितला आहे. तो त्याला म्हणतो, अरे यापेक्षां तुला काय सांगूं, मी जर अव्यक्तांतून व्यक्त होतों आहें, मीं प्रवृत्त आहें, तोंपर्यंत तूं निवृत्तीची कथा सांगूं नकोस.

आतां तुम्ही विचाराल, कायहो, ज्याचा परिघ अनंत त्याचा मध्यबिंदु कोठें आहे ? तर गणितशास्त्राच्या नेहमींच्या रीतीनें पाहिलें, तर तो बिंदु पाहिजे तेथें असूं शकेल. संकुचित अहंकार सोडायला पाहिजे; व जी विश्वाची संपत्ति त्याचा अभिमान, त्याविषयीं आनंद, काळजी, कर्तबगारी दाखविली पाहिजे. मनुष्य एकसारखा प्रवृत्त, कार्यकारी, कर्मी, कर्मप्रचुर आहे, निवृत्त कधीं नाहीं—अशा प्रकारें ज्यांचा दुरभिमान गेला आहे, त्यांच्यानेंच कांहीं काम झालेलें आहे. ज्यांच्या ठिकाणीं एकतानता, प्रामाणिकपणा, निष्कामता, धैर्य, ज त्र्यस्थ, त्यांस अपेक्षा नाहीं, त्यांचेच हातून सुधारणेचीं कामें होतात. जें पाऊल टाकायचें तें निश्चयानें, धैर्यानें टाकावयाचें आहे.

आपण म्हणाल " अहंकाराचा परिघ अमर्याद करा असें सांगतां पण या सांगण्या बोलण्याच्याच गोष्टी आहेत. असें ज्याचे हातून होईल तो पुरुष अवतारच म्हटला पाहिजे; तो हजारों वर्षांनीं येतो कोणी तरी आम्हाला असा चांगला नायक, सेनापति, प्रमुख, म्होरक्या, अशी एक विभूति प्रखर तेजाची पाहिजे. ' पण याला माझें उत्तर असें आहे कीं, खरोखरी प्रत्येक व्यक्तीचा विकास झाला पाहिजे. अवतार मी अनिष्ट म्हणत नाहीं, इष्टच आहे; पण त्यानें होतें काय, तर कांहीं काळपावेतों त्याच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उदाहरणतजस्वितेनें परिणाम होतो, आपण एकदम खालून वर उचलले जातो. पण तो स्वाभाविक क्रमिक विकास म्हणावयाचा नाहीं. तर प्रत्येक आत्म्याचें मरण मरून प्रत्येकास स्वतःच्या श्रमाच्या मोबदला आनंद झाला पाहिजे. 'आत्मैव आत्मनो बंधुः ' या तत्त्वाचा स्वीकार करून आपण आपल्याच पायावर उभें राहण्यास शिकलें पाहिजे व

राहिलें पाहिजे. मला इतकेंही वाटतें कीं आज जी काय आमच्यांत आत्मकला अंशमत आहे, इच्छाशक्ति, बाहुबल, एक, एक पाऊल स्वतः पुढें टाकण्याची शक्ति आहे, ती जाऊन, अवतारी व्यक्तीच्या विद्युदाकर्षणानें एकदम कामें फार होणार असतील, तर तो अवतार नको, व तीं कामेंही पण नकोत ! विकास, विकासच झाला पाहिजे हेंच मी धरून बसेन. अवतारवादानें प्रदर्शित केलेला एक फार उंच व इतर सर्व अत्यंत नीच, खालावलेले असा विषमभाव मला पसंत पडत नाहीं. तर सर्वांची सर्व बाजूंनीं व तीही स्वतःचे प्रयत्नांनीं उन्नति होत जावी, हेंच श्रेयस्कर. अवतारांची गरज भासूं लागल्यास समजावें येथें रोग आहे, स्वाभाविक स्थिति ही नव्हे, स्वतःचा दम संपला, स्वयंशक्ति हरपली, स्वतःचा जोर नाहींसा किंवा कमी तरी झाला. पण चांगल्या सदृढ राष्ट्रांत स्वयंस्फूर्ति हा एक गुण असतो, म्हणजे कोणतेंही कृत्य स्वतः आपल्यास कळलेल्या दिशेनें करण्यास अंगावर घ्यावयाचें. त्या राष्ट्रांच्या विभूतींच्या व सामान्य लोकांच्यामध्येंही मग इतकें अवाढव्य अंतर नसतें, हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे.

तेव्हां मी म्हणतों कीं आमचा परिघ वाढविण्याची आमची योग्यता असतांना, ईश्वराजवळ कां होईना, पण ही काय याचना करावयाची कीं आम्हाला अवतार द्या, आपला अवतार होऊं द्या नाहीतर आम्ही मागें मागें जाऊं. अवतारमत खरें असलें तरी मी तर म्हणेन कीं, परमात्मन्, तुमचे आजपर्यंत पुष्कळ अवतार झाले असतील पण आतां तुमचा तो क्षीरसागर, तें स्वर्गनिवास वगैरे सोडून खालीं मनुष्यलोकांत येण्याची तसदी घेऊं नका. तर आमचा विकास तुम्हीच करा. तरच तुमच्या एकंदर विश्वयोजनेस आमच्याकडून साह्य होईल !

---

## राजा राममोहन राय.

(ता. २७ सप्टेंबर १९०५ रोजीं सकाळीं दिलेलें व्याख्यान.)

हिंदुस्थानचें चरित्र सध्यां पडत्या कलेवर आहे, तरी पण आतां संपत आलेल्या चालू सहस्रकांत इंटरन्याशनल कौन्सिल सारख्या इहलोकींच्या दरबारांत हिंदुस्थानचा प्रतिनिधि म्हणून कोणी पाठविण्याच्या योग्यतेचा मनुष्य असेल तर तो एक राजा राममोहन रायच दिसतो. त्याच्या जवळ जवळचा मान कदाचित् अकबर बादशहास देतां येईल. पण त्यास भरतभूमीचा औरस वारस म्हणतां येणार नाहीं. आम्हां ब्राह्म लोकांस राजा राममोहन राय हा ब्राह्मधर्माचा संस्थापक म्हणूनच मोठा वाटेल, परंतु तो भाग सोडून, आपण ब्राह्म नाहीं समजून, शुद्ध मनानें चिकित्सा केली तरीहि माझें वरील विधान कबूल करावें लागेल यांत शंका नाहीं. पण मौज ही आहे कीं अद्याप आह्मांलाच-ब्राह्मसमाजाच्या सभासद लोकांना—त्याची खरी योग्यता नीटशी कळून आलेली नाहीं; निदान आमच्या कृतीवरून तरी असें दिसतें. आधीं आम्हीं गुरु, ईश्वरांत आह्मांत मध्यस्थ, कोणी मानीत नाहीं. राजा राममोहन रायाला त्या अर्थानें गुरु नका मानूं. पण त्यानें केवढें धर्मकार्य सत्कृत्य केलें, हें मनांत आणून तरी त्याच्याविषयीं किती पूज्यबुद्धि पाहिजे, ती आमच्यांत आहे काय ? ज्यानें आम्हांला नीट मार्गाला, वर्तनाला लाविलें, त्याच्याकरितां आम्ही कांहीं करतों काय ? एका बाजूस जुने लोक तर गुरूची पूजाच करतात, त्याला डोकीवर घेऊन नाचतात, किती अयोग्य असे ढंग माजवितात ! तर उलटपक्षीं आमच्या ब्राह्मसमाजांत दुसऱ्या प्रकारचा अतिरेक दिसून येत आहे ! म्हणजे समाजसंस्थापक कोण, काय, इतकें साधारण जरी अवगत असलें, तरी तें तेवढ्याच पुरतें माहित ! आम्हीं दर वर्षी त्याच्या पुण्यतिथीचा उत्सव करितों; पण त्याचें स्मारक काय करितों ? कलकत्यास तर त्याचें कांहीं अद्याप स्मारक झालेलें नाहीं. आपल्या इकडे हा राममोहन आश्रम आहे, राममोहन सेमिनरी म्हणून बांकीपुरास आहे एवढेंच; पण निरपेक्ष बुद्धीनें मुद्दाम त्याचें स्मारक म्हणून कांहीं आहे काय म्हणून पाहिलें तर काय दिसतें ? एका आश्रमाची आपल्याला इकडे उणीव भासत होती म्हणून एका उदार बंधूनीं आश्रम बांधून दिला व त्याला नांव कांहीं तरी द्यावयाचें तें राममोहनाचें दिलें; तसेंच तिकडे शाळेची गरज

होती, ती शाळा निघाली व नांव दिलें राजा-राममोहन राय सेमिनरी, असेंच नाहीं तर काय! पण खरोखर कांहींच हितसंबंध न ठेवतां केवळ राममोहनास अर्पण म्हणून कोठें कांहीं आहे काय!

पण आज मी तो नुसता मोठा आहे, मोठा आहे म्हणून राहत नाहीं. तर या विभूतीचें चरित्र दोन बाजूंनीं कसें निरखितां येतें तें आपण आतां पाहूं. माझ्या मतें राममोहन-राय सन १७७२ त जन्मला व सन १८८४ त वारला वास्तविक केशवचंद्र सेन त्या वर्षी वारला; पण मी म्हणतों राजा राममोहनरायच तेव्हां वारला. राममोहनरूपी पर्वताची रांग, व त्याची एक शाखा केशवचंद्र आणि एक शाखा देवेंद्रनाथ या तिघांच्या जीवनचरित्रांत एकच दैवी हेतु सिद्ध झालेला आहे. तो हेतु सन १८८४ मध्यें परिपूर्ण झाला. इतका हा राममोहन मोठा आहे! साधु निर्माण होतात त्यांचें चरित्र बहुधा अर्धेच संपलेलें प्रत्ययास येतें. ज्युलियस सीझरकडे पहावें, तर त्याचा दगलबाजीनें पण अकस्मात् मृत्यु होऊन, शेवटीं तो व त्याच्या पाठीमागचा ऑगस्टस यांच्या योगें ती एक विभूति पूर्ण झाली म्हणावयाची. पण जो राममोहन १८३३मध्यें वारला तो सुद्धां किती मोठा होऊन वारला हें आतां आपण पाहूं. येथें दोन दृष्टि ध्यानांत ठेवाव्यात. एक सूक्ष्म दृष्टि व एक स्थूल दृष्टि. वृक्ष सुंदर दिसतो तो स्थूल दृष्टीनें, म्हणजे तो स्थूलसुंदर होय व माझ्या समोरचें हें फर्नचें रोपें सूक्ष्मसुंदर समजावें. पर्वत दोन तीन मैलां-वरून पाहिला, तरच सुंदर दिसेल. त्याच्यावर सूर्याचें किरण पडलेले असून जे रंग दिसायचे ते दुरून पाहिले तरच. पण या फर्नचें किंवा याहू नही लहान कोंवळ्या फर्नचें पाहावें, तो देंठ कोमल, बुंधा लहान, कुंडी चहाच्या पेल्यापेक्षां फार मोठी नाहीं, कोमल कांती, ह्या बारीक बारीक रेषा, असें हें नाजुक झाड, दहापांच पावलें लांब गेलों कीं मग ह्याचें सौंदर्य काय दिसायचें आहे? हें पहायला त्याच्या जवळ जाऊनच निरखलें पाहिजे, न्याहाळलें पाहिजे. कारण हें सौंदर्य लहान प्रमाणावर आहे. तोच पर्वत फार जवळ पायथ्याशीं जाऊन पाहिला तर काय दिसणार? तीं कांटेरी झाडें, दलदलीची जागा वगैरे कष्टमय देखावाच दिसणार. पण त्याची गंभीर शोभा पाहावयाची असल्यास त्याच्यापासून दूर गेलें पाहिजे. राममोहन-रायाचें दोन्ही दृष्टीनें सौंदर्य दिसून येण्यासारखें आहे. तें कसें तें आतां थोडक्यांत पाहूं.

प्रथम तर सूक्ष्म सौंदर्य घेऊं. नुसतें राममोहन-रायाचें शारीरिक स्वरूपच घेतलें तर तें सुद्धां किती मनोहर होतें! राजा राममोहनराय जरी राजकुलांत जन्मला नव्हता तरी तो राजबिंडा असा दिसत होता. ती त्याची सहा फूट उंची, विशाळ भाल, सुंदर केंस वगैरे त्याचें जें शरीरवर्णन दिलेलें आहे, तें एखाद्या कादंबरीमध्यें जसें सुंदर नायकाचें वर्णन करावें तसें आहे. तो विलायतेस गेला तेव्हां एका इंग्लिश बाईनें आपल्या लहानपणीं त्याला पाहिलें होतें. त्या बाईला त्याची चांगली आठवण होती. मला ती भेटली असतांना एकदां सांगत होती कीं राजा राममोहन राया-मध्यें आमच्या राजापेक्षांही एक प्रकारची विशेष गंभीरता वगैरे दिसत होती. तो गंभीर रीतीनें चाले, गंभीर हांसे, त्याचें सर्व करणें गंभीरतेनें परिपूर्ण असे.

त्याचा स्वभाव पाहिला तर तो त्याच्या शरीरा-प्रमाणेंच उमदा होता. तो वादांत कधीं जहाल जात नसे. तो पुष्कळ वादी म्हणजे वाद केलेला मनुष्य. पुष्कळ मोठमोठ्या स्वदेशी, विदेशी शास्त्री, पंडितांशीं त्याला वाद करावे लागले; पण वाद करताना अशा कांहीं मधुर शब्दांनीं तो कराव-याचा कीं दुसऱ्याच पक्षाला, प्रतिवाद्यावर चिडणें वाईट, हें दाखवीत असे व आपण चिडत नसे.

तो ज्ञानी व बुद्धिवान् किती होता! कित्येक भाषांत तो पारंगत—संस्कृत, पर्शियन, आरबी, इंग्रजी, ल्याटीन, ग्रीक, इ० आणखी जगला असतां तर आणखी काय काय शिकणार होता कोणास ठाऊक! बंगाली भाषाही त्यानें उत्पन्न केली, व्याकरण-ग्रंथ लिहून ती नियमबद्ध करून ठेवली, म्हणून बंगाल्यांत त्याला बंगाली भाषेचा जनक मानतात व मान देतात. आधुनिक धर्मशास्त्र जेव्हां बनत होतें तेव्हां त्याचा संस्थापक तो, असें म्याक्स-मूलरनें म्हटलें आहे.

तो मनस्वी कर्मीही होता. प्रजेचें पाठबळ घेऊन राजावर तोंड सोडूं नये, व राजाचें पाठबळ घेऊन प्रजेवर तोंड सोडूं नये ही वृत्ति त्यानें आमरण ठेविली होती. त्यानें राजा व प्रजा यांमध्यें

उत्तम मध्यस्थाचें काम करून परस्परांच्या अड चणी परस्परांस कळवू देऊन दोघांचे मार्ग सुगम करण्याचें श्रेय घेतलें. वर्तमानपत्रांचा कायदा निघाला तेव्हां तो राजाशीं या घडपडीत अन्यायाबद्दल भांडला. पण निळीची लागवड युरोपियनांकडून करण्यासंबंधाचा प्रश्न निघाला तेव्हां प्रजेशीं भांडून युरोपियनांना वसाहत करून राहूं द्या असें स्पष्ट म्हणण्यास तो चुकला नाहीं. मोंगलांकडून राजा हा किताब घेऊन त्यांच्या वतीनें भांडण्यास तो पार्लमेंटापर्यंत गेला. सारांश स्वदेशांतीलच काय, पण परदेशी राजकीय प्रश्नांत तो अग्रेसर होता त्याचप्रमाणें सामाजिक गोष्टींतही त्याचे प्रयत्न मशहूर आहेत. धार्मिक, औद्योगिक आदिकरून सर्वांतच त्याची मति चालत असे.

त्याचप्रमाणें त्याचें अंतःकरण रसिक होतें. कोणी कोणी तर्कवितर्कांत पडून असास पाहिले असूनही न पाहिल्यासारखें होऊन अंतःकरणानें रुक्ष बनून जातात; पण राजा राममोहनराय हा योगी तसा भोगीही होता. कलकत्त्यांत त्याचीं दोन घरें होतीं. एकांत योग्याची संपत्ति तर दुस-ऱ्यांत अगदीं नवीन तऱ्हेच्या इंग्रजी सामानसुमानानें अपूर्व शोभा आणलेली. शोभा व सौंदर्य यांचा तो भोक्ता होता. कवित्वही त्यानें बरेंच केलें आहे. हा म्हणजे विषय, हें म्हणजे कनिष्ठ, त्याज्यच असें त्याला वाटलें नाहीं. सर्व विषय देवानें निर्मिले आहेत, त्यांचा त्यानें चांगल्या रीतीनें स्वाद भरपूर घेतला. असा तो ज्ञानी, कर्मी, रसिक होता. राममोहन म्हणजे जणूं तत्कालीन एक सहस्रदल कमलच फुललें कीं ज्याची प्रत्येक पाकळी उमलून गेली होती. त्यानें दहा वर्षें सरकारी नोकरी करून हजारों रुपये सांठवून इतकें धर्मादि कार्य केलें. त्यासाठीं तो कोणाचा पगारी नोकर नव्हता! हें सगळें त्याचें सूक्ष्म सौंदर्य. कारण हें सर्व करून तो गेला असता, तर आतां मागें तो एवढा राहिला नसता. एकादें फूल कितीही सर्वांगसुंदर व विकसलेलें असलें, तरी तें एकदां कां सुकून गेलें, मग त्याचें कांहीं राहत नाहीं. तेव्हां राममोहन एका दृष्टीनें म्हणजे सूक्ष्म सौंदर्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां सर्वांगसुंदर विकसलेल्या फुलाप्रमाणें होता. पण त्याची दुसरी बाजू पाहिली म्हणजे तो पर्वताप्रमाणें स्थूलसुंदर असें सहजीं दिसून येईल.

या जगांत कोणी एक दिवसाचीं माणसें असतात, तर कोणी एक आठवड्याचीं, कोणी वर्षांचीं तर कोणी एका पिढीचीं अशा प्रकारचीं माणसें असतात. परवां प्रसिद्ध मल्ल सँडो आला, तेव्हां मुंबईत त्या आठवड्यांत सर्वांच्या तोंडीं सँडो होऊन गेला होता त्याचप्रमाणें राममोहनाचे अंगीं नुसतें सूक्ष्मसौंदर्यच असतें, तर तो आपल्या वेळच्या पिढीचा नायक इतकाच होऊन राहिला असता. पण राममोहन ही विभूति इतक्याच पुरती नव्हती हें आपणांस दिसत आहे.

राममोहनाचें मोठेपण आम्ही ब्रह्मसमाजाच्या मंडळींनींही अजून पाहिलें नाहीं. याचें एक कारण उघड आहे. कालतः आम्ही जितके दूर गेलों असतां तें मोठेपण अधिक प्रमाणावर दिसून येईल तितके अद्याप आपण गेलों नाहीं. पण यांत आपला दोष नाहीं. सध्यांच्या कालमानानें त्याचें महत्त्व जितकें आपल्या अंगीं बाणलें पाहिजे तें जर हलगर्जीपणा किंवा अशा कांहीं कारणामुळें बाणलें नसल, तर मात्र आपण दोषी होऊं. हा मुंबईला राजाबाई टॉवर आहे. उंच आहे, दिसायला सुंदर आहे. पण त्याच्या अगदीं जवळ जाऊन उभे रहा, म्हणजे एकावर एक दहा दगड मांडून जेवढी उंची होईल तेवढ्याच उंचीचा भाग आपल्या नजरेंत भरेल; जास्त नाहीं, तेंच दूर जाऊं लागा म्हणजे हळुहळु त्याचें समग्र रूप ध्यानांत येईल. तसेंच आणखी दोनशें वर्षें जातील तेव्हां राममोहनाची कृति अधिक डोळ्यांत भरेल. आपण आज त्याचे अंकीं, मूल मातेच्या अंकावर चढून बसतें त्याप्रमाणें बसलों आहों. पण कालगतीनें त्याच्यापासून लांब गेल्यावर कायकाय दिसेल ह्याचा आपणांस कल्पना करतां येते. कारण त्याचें बीज त्याच्या चरित्रांतच आहे. बाकीच्या त्याच्या सर्व गोष्टी दोनतीन हजार वर्षांनीं विसरून जाण्यासारख्या आहेत. पण मुख्यतः दोन गोष्टी मला चिरस्थायी दिसतात. एक तर राष्ट्रीयता व सार्वत्रिकता यांच्यामध्यें साधारण लोकांच्या व्यवहारांत भेद दिसून येतो, तो राममोहनाचे मतांत व वर्तनांत कोठें नव्हता. त्यानें दोन्ही गोष्टींची संगति कशी

सुरेख लावून दिली होती! राममोहन मोठा राष्ट्रभक्त होता. पण आपल्या मनाचा भाव अमुक एका रीतीनें ठेवला पाहिजे की त्या रीतीनें ठेवला म्हणजे या दोन गोष्टी एक होऊन जातात, हें राममोहनास पक्केपणीं कळलेलें होतें. ज्ञान, भक्ति, कर्म इ. जीवनाचे सर्व भाग व्यापून टाकणारा असा सार्वत्रिक धर्म त्यानें मनांत आणिला. तो ओघम, केवळ कल्पनेच्या लहरींत तरंगणारा नसून सगळ्या विशिष्ट गोष्टींत तो जाऊन भिनणारा आहे. कोणताही भाव जो व्यक्तींत, तोच कुटुंबांत, तोच राष्ट्रांत, तोच साऱ्या जगांत असा खरोखरी प्रकार आहे.

राममोहनाच्या स्थूल सौंदर्याचें दुसरें लक्षण म्हणजे त्यानें पाहिलेला सार्वत्रिक धर्म अनुचरण्याकरितां प्रत्यक्ष समाजाची स्थापना केली हें होय. हीच दुसरी चिरस्थायी गोष्ट आणि आम्ही ज्या ज्या अंशानें ब्राह्म होऊं किंवा होत जाऊं, त्या त्या अंशानें त्याचा मोठेपणा आपणांस दिसत येईल.

अशी ही राममोहन विभूति आहे. ' अणोरणीयान् महतो महीयान् ' हें जसें ईश्वराचें वर्णन आहे, तसेंच जवळ जवळ तें त्याच्या विभूतींचेंही म्हणतां येईल. कोणी विभूति नुसती स्थूलच होऊन जाते; नेपोलियन, शिकंदर, तैमूरलंगादि मूर्ती या प्रकारांतील होत. ह्मणजे त्यांचे ठायीं सूक्ष्म सौंदर्य नव्हतें. हे सर्व दूर गेले आहेत. ह्मणून ठीक आहे. त्यांचें तेवढें तें दुरून सुंदर दिसणारें रूप मात्र पाहून घ्यावें. ज्यु लोकांची संशुद्धि करणारा, नेबुकेनेझार तोही instrument of God ह्मणजे देवानें हातामध्यें घेतलेला कोयताच होय. त्याच्यायोगानें यहुद्यांना शिक्षा देऊन देवानें जागें केलें. प्लेग आपल्याला स्वच्छ राहायाला शिकवितो. गांवाबाहेरची मोकळी शुद्ध हवा घेण्यास लावितो. हें सर्व चांगलें आहे. पण प्लेग काय स्वतः आहे! तोही ईश्वराची अकाळविकाळ विभूतिच! नानाप्रकारच्या विभूति आजवर झाल्या, पुढें होतील; त्यांनीं मोठीं कामें करून टाकलीं, उत्पात करून सोडले. कांहीं विभूति नुसत्या स्थूल व कांहीं भयंकर म्हणून त्यांची अद्याप आठवण आहे. कांहीं नुसत्या सूक्ष्म. त्यांचा आतां कोठें मागमूसहि नाहीं, व कोणी हे दोन्ही गुण अंगीं वागविणाऱ्या त्यांमध्येंच राजा राममोहनराय हे आपल्या सूक्ष्म व स्थूल सौंदर्यानें येतात. त्यांच्या पुण्यतिथीचें व एकंदर चरित्राचें महत्व आपण नेहमी लक्षांत धरावें.

---

## देशभक्ति आणि देवभक्ति.

( सोलापूर येथील रिपन हॉलमध्यें युवराजांच्या सन्मानार्थ ता. ११-११-०५ रोजीं झालेल्या रोषनाईच्या वेळीं दिलेलें व्याख्यान. )

धर्माचें कार्य शिरावर घेऊन आम्ही बाहेर निघतों तेव्हां आम्हांस नानाप्रकारचीं माणसें भेटतात. आणि त्यांच्याकडून आमच्यावर विविध प्रकारचे व केव्हां केव्हां तर अगदीं विलक्षण आक्षेप घेण्यांत येत असतात. त्यांपैकीं असा एक आक्षेप बऱ्याच वेळां अगदीं स्पष्टपणें करण्यांत आला आहे कीं, ' काय हो तुम्हाला ही दुर्बुद्धि सुचली! हल्लींचा काळ कोण चणचणीचा; चहूंकडे क्रांति किती झपाट्यानें चालली आहे. इतर देश मी पुढें कीं, तूं पुढें अशी धूम ठोकीत आहेत; त्यांत आमची कशी पिच्छेहाट होत आहे, अशांत तुम्ही काय ह्या हरिभजनाच्या नेभळ्या गोष्टी सांगावयास निघालां आहां! अहो, हीं शांतीच्या वेळचीं कामें. तळीराम गार असल्यासच हे विचार सुचावेत; पण तुमचा तरी काय इलाज! बुडत्याचा पाय खोलांतच जावयाचा!! ' सभाजनहो! रामाची थोरवी गाण्याकरितां जसें रावणाच्या सामर्थ्याचें बळेंच अवडंबर माजवावें, तद्वत् केवळ ह्मणून पाडण्याच्या हेतूनेंच मीं हा वरील आक्षेप कल्पनेनें आपल्यापुढें मांडिलेला आहे असें आपल्यापैकीं साहजिक धार्मिक वृत्तीच्या बऱ्याच जणांना वाटण्याचा संभव आहे; पण तसा प्रकार नसून, खरोखरच असा आक्षेप अनेक वेळां आम्हांवर आला आहे. इतकेंच नव्हे, तर तो इतक्या जोरानें, उघडपणें व प्रामाणिकपणें आला आहे कीं, त्या वेळीं आम्हांला केवळ नम्र होऊन, ह्या आवेशाच्या लाटेला दूर जाऊं द्यावें लागलें आहे. आतां थोडासा विचार केल्यास दिसून येईल कीं, धर्माविषयीं भलतेच ग्रह करून घेतल्यामुळें हा आक्षेप असा उपस्थित होत आहे. धर्मासंबंधीं पहिली गैरसमजूत ही कीं, धर्म म्हणजे हल्लीं जगांत जे हजारों परस्परविरोधी पंथ

माजले आहेत, त्यांतलाच एक कोणता तरी आपला म्हणून घेतलेला पंथ इतकेंच नव्हे तर त्या पंथांत चालू असलेलीं अनेक बाह्यकर्में आचार इत्यादि. दुसरी गैरसमजूत मोठा तात्त्विक विचार करूनही होण्यासारखी आहे ती ही कीं, धर्म म्हणजे केवळ निवृत्ति; जगत् सर्व मिथ्या आहे; आपलीं इंद्रियें हीं मामस्याप्रमाणें आम्हाला फुसलावून भलत्याच मार्गानें ओढीत असतात. शहाण्यांनीं ह्यांचा नाद सोडून अगदीं स्वस्थ राहण्यास शिकावें, हाच अखेरचा पुरुषार्थ. ह्याप्रकारें व्यवहाराच्या बाजूनें शुष्क कर्मठपणाचा व विचाराच्या बाजूनें उदासीन निष्क्रियतेचा आरोप धर्मावर झाल्यास वरील विलक्षण आक्षेप निघावा ह्यांत नवल तें काय ! कर्मठपणा व निष्क्रियता ह्या दोहोंच्या दरम्यान असणारा आमच्या सर्वमान्य भगवद्गीतेंत ठामपणें प्रतिपादिलेला कर्मयोग म्हणजेच धर्म, असें विरळा समजून येतें. आणि हा कर्मयोग कांहीं केवळ ज्ञानानें साधत नाहीं. आधुनिक शोधाच्याद्वारें विश्वाविषयीं कितीही सम्यक ज्ञान झालें, जडसृष्टींत नियमांचें कसें अबाधित साम्राज्य चालू आहे व तीच नियामक शक्ति जीवनसृष्टीचाही हळू हळू कसा विकास करीत आहे, प्रबुद्ध जीवात्म्यास तीच शक्ति कसें स्वातंत्र्य देते, पुनः त्याच स्वातंत्र्याचा बली ह्या विश्वयज्ञांत अर्पण करण्यास म्हणजे विश्वांतील भौतिक आणि नैतिक नियम हेच विश्वनियंत्याच्या ज्या इच्छा त्यांना केवळ अनुसरूनच जीवांनीं आपल्या सर्व इच्छा दाखवाव्यात असाही शेवटीं उपदेश अंतःकरणांत त्याच आदिशक्ती कडून कसा होतो इत्यादि जरी निर्भ्रांत ज्ञान झालें, तरी वर सांगितलेला कर्मयोग साधत नाहीं. तो साधावयास ह्या आदिशक्तीचें अधिष्ठान जो ईश्वर त्याचे ठायींच केवळ भक्ति बाणली पाहिजे, म्हणून देवभक्ति हा विषय आजच्या व्याख्यानांत येणार आहे.

पण आजचा प्रत्यक्ष प्रसंग कांहीं देवभक्तीचा नव्हे, तर देशभक्तीचा होय. आम्ही जे येथें आज जमलों आहों, ते ईश्वरोपासनेकरतां नव्हे तर आमच्या ऐहिक स्वामीच्या सत्कारार्थ. चोहींकडे प्रकाशाचा लखलखाट करून ही जी आम्ही आरती ओंवाळीत आहों ती देवाजीस नव्हे तर आमच्या भावी देशपतीस; अर्थात् आमच्या देशकल्याणाची ही आरती आहे. युवराज हा आमच्या अदृश्य देशकल्याणाची दृश्यमूर्ति होय. त्याच्या जिवास अपाय किंवा बुद्धीस भंग झाल्यास आमच्या देशकल्याणास धोका आहे. युवराज जर आमचा देशपति नसता तर तो आला काय गेला काय आम्ही आज येथें मुळींच जमलों नसतों. पण तो आमचा स्वामी असल्यानें त्याचा सत्कार करणें ही आमच्या देशाची एक सेवा आहे. तेव्हां अशा शुभप्रसंगीं देशसेवेचा उत्तम मार्ग कोणता व त्याचा देवसेवेशीं काय संबंध आहे हें पाहणें अत्यंत उचित आहे.

प्रथम हल्लीं आपली देशस्थिति कशी आहे ती पहावी. प्लेग, दुष्काळ इत्यादि जी आधिभौतिक व आधिदैविक अनिष्ट परंपरा आम्हांवर ओढवत आहे, तीविषयीं येथें विचार करावयास नको. कारण हीं अनिष्टें कांहीं कायमचीं नाहींत. पण आमच्यांतील आध्यात्मिक उणीव मात्र आम्हीं सतत लक्षांत बाळगली पाहिजे. इंग्लंड, हॉलंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, अमेरिका इ० जे पुढारलेले देश आहेत, त्यांच्यांत राष्ट्रीय ऐक्य कसें अपूर्व दिसून आहे व तेंच त्यांच्या सुसंपन्नतेचा भक्कम पाया आहे. पण आमचा देश अद्यापि राष्ट्र ह्या नांवालाही योग्य झाला नाहीं. जरी हळू हळू राष्ट्रीयत्व येथें बनत चाललें आहे, तरी इतरांच्या मानानें तें फारच अपूर्ण आहे. सुखदुःखाच्या प्रसंगीं युरोपांतील कांहीं राष्ट्रांचें वर्तन जणूं एकाद्या व्यक्तीच्याच वर्तनासारखें एक धोरणानें झालेलें माझ्या स्वतःच्या नजरेस आलें आहे. प्रसंगास सहाध्याय, सहानुभूति व सहकार्य हीं तीन्हीं पूर्णपणें त्यांच्यांत दिसून येतात. पूर्वीं भरतभूमींत नवीन वसाहत करणाऱ्या आर्य राष्ट्राचीही हीच स्थिति असावी असें दिसतें. तैत्तिरीय उपनिषदांतील ब्रह्मानंद वल्लीच्या व भृगुवल्लीच्या प्रारंभीं व समाप्तीस—

'सहनाववतु सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै।
तेजस्विनावधीतमस्तु माविद्विषावहै।'

हें वचन आढळतें; तें त्या काळचें ब्रीदवाक्यच असावें असें दिसतें. 'आम्हीं परस्परांचें संरक्षण करूं, सहभोजन करूं, मिळून वीरश्री संपादूं, तेजस्वी असें अध्ययन करूं आणि कोणाचाही द्वेष करणार नाहीं' असा ह्या उदात्त ब्रीदाचा अर्थ आहे. पण हल्लीं ह्या ब्रीदाच्या व आमच्यामध्यें

जमीन–अस्मानाचें अंतर पडलें आहे. तर अशा स्थितींत आमचें देशसेवेचें आद्य कर्तव्य म्हणजे राष्ट्रीय ऐक्य वाढविणें हें होय. पुढील सर्व कर्तव्यांचा हा पाया आहे. तो नीट न घातल्यास पुढील इमारत उठणारच नाहीं; किंवा कदाचित् उठल्यास फार वेळ टिकणार नाहीं.

आतां ही गोष्ट किती असामान्य आहे बरें! एवढ्या मोठ्या देशाचें किंबहुना खंडाचें एकराष्ट्र बनणें व त्याचा एकजीव होणें म्हणजे सर्व मानवी इतिहासांतील एक अपूर्व प्रसंग होय. ह्याच देशांत नव्हे तर दुसरीकडे कोठेंही व कधींही एवढ्या मोठ्या जनसमहाचा व इतक्या विविध व विचित्र प्रकृतींचा एकजीव झालेला आढळत नाहीं. तर आपण पूर्वी कधीं ह्या राष्ट्रीय दृष्टीनें एका उच्च पदावर होतों व आतां खालीं आलों आहों अशी खोटी समजूत करून घेऊन आहे तोही उत्साह घालविण्याची ही वेळ नव्हे; तर मानव जातीच्या समष्टिजीवनाची एक नवीनच व उच्च पायरी आम्ही भारतीयांनीं चढावी अशी नारायणानें योजना रचली आहे, तिला आम्हीं आनंदानें व धैर्यानें साधनीभूत झालें पाहिजे. ह्या कामीं केवळ मानवी बुद्धीचें बळ अपुरें होत आहे. देवभक्ती ह्याच जोरानें उदय झाला पाहिजे. जणूं काय एका नवीन धर्माचीच स्थापना झाली पाहिजे. एवढें मोठें देशकार्य जर खरोखरीच व्हावयाचें असेल, तर त्यांत जे पुढारी झाले असतील व होणारे असतील त्यांच्यांत कांहीं अपूर्व गोष्टींचा संचार व्हावयास पाहिजे. जे देवऋषि ह्या महायज्ञाचें अध्वर्युस्थान पत्करणार असतील त्यांचा—

उंची देवाचे चरण। तेथें झालें अधिष्ठान॥
येथूनियां ठाव। अवघे लक्षायाचे भाव॥

अशा उदात्त भाव झाला पाहिजे; तरच हा विशाल कर्मयोग सिद्धीस जाणार आहे. एरवीं कोत्या दृष्टीच्या व हलक्या वृत्तीच्या माणसांनीं कितीहि ओरड केली किंवा आपल्याच केवळ बुद्धिसामर्थ्यावर उद्दामपणें अवलंबून राहणाऱ्या शूर पण श्रद्धाशून्य पुरुषांनीं, किंवा ज्यांच्या अंतःकरणांत आशेचा जिवंत झरा वाहत नसून बाहेरून येणाऱ्या असंख्य विघ्नांला एकाद्या पर्वताप्रमाणें जे पाठ देऊन आहेत अशा धीर वीरांनीं किती जरी बाह्य प्रयत्न केले, तरी ह्या महाराष्ट्राची उभारणी होणें दुरापस्त आहे. देशभक्त होणारांनीं देवभक्तच आधीं झालें पाहिजे–नव्हे असलें पाहिजे.

अशा प्रकारची देशसेवा आमच्या देशपतीलाही मान्य आहे व व्हावयाला पाहिजे. ती न करितां आम्ही जर नुसते आमच्या युवराजासमोर तेल वातीचे दिवे ओवाळले, तर ही एक अत्यंत ग्राम्य मूर्तिपूजाच होणार आहे. धार्मिक मूर्तिपूजेनें आमचें झालें आहे तितकें नुकसान पुरें आहे. त्यांत राजकीय मूर्तिपूजेची भर घालावयाला नको. ह्या प्रकारें आम्ही सर्व भारतवासी एक होऊन एकमनानें, एक दिलानें आणि अनन्य भावानें युवराजास सामोरे जाऊन त्याचें स्वागत करूं आणि म्हणूं कीं, हे आर्यपुत्र, तूं ईश्वरानें पाठविलेला आमचा नायक आहेस, आमचा भदेव आहेस, तुझ्या छत्राखालीं आम्ही सर्व एक झालों आहों; हीं आमची एकी तूं राख आणि पुढील दैवि कार्यांत तूंच आमचें नायकत्व पत्कर, चिरायु हो, चिरस्मरणीय हो, तूं ज्या सर्व कर्माध्यक्ष ईश्वराचा ऐहिक प्रतिनिधी आहेस त्याचा जयजयकार असो! तरच ह्या आमच्या स्वामीचें खरें स्वागत. नाहीं तर केवळ अंधपरंपरा अथवा जुलमाचा रामराम!

## स्वराज्य आणि स्वाराज्य.

(इंदुरास दिलेल्या व्याख्यानाचा सारांश.)
सु. प. १२–५–१९०७.

स्वराज्य हा शब्द अलीकडे मशहूर झालेला आहे. स्वाराज्य याचा अर्थ मात्र पुष्कळांस कदाचित् माहित नसेल. स्वाराज्य म्हणजे स्वर्गीय राज्य. स्वर्ग म्हणजे परलोक; पुढील काळाशीं त्याचा संबंध, त्याचा विचार आतां कशाला! असें कदाचित् कोणी म्हणतील तर त्यांना एवढेंच उत्तर कीं, मी स्वर्ग म्हणजे प्रस्तुतचाच काल व प्रस्तुतचेंच ठिकाण समजतों. झेंदावेस्तांत सुमनाला स्वर्ग म्हटलेलें आहे; व कुमन तो नरक होय. सुमन म्हणजे शोभन मन, सुविचारांनीं भरलेलें. कठोपनिषदांत—यदेव इह तदन्यत्र यदन्यत्र तदिह—असें म्हटलें आहे. इथला वाईटपणा, तोच स्वर्गांतील वाईटपणा. इथल्या वाईटपणामध्यें व स्वर्गातील चांगल्या–वाईटपणामध्यें कांहीं भेद नाहीं, पूर्ण ऐक्य आहे. तेव्हां

ह्या केवळ पुढच्या गप्पा आहेत, असें आजच्या विषयासंबंधानें वाटूं देऊं नये. स्वर्गाचा कांहीं अंश येथें आहे तो नसेल, तर स्वर्ग पुढेंही असणें अशक्य आहे असें मी म्हणतों. स्वर्ग म्हणजे चांगल्या कल्पनांचा समुदाय. त्याच्याच आधारें भावि स्वर्गाची कल्पना करितां येते. असो;—

सर्व कांग्रेसमध्यें गेली कांग्रेस श्रेष्ठ, त्यांतील सर्व भाषणांमध्यें अध्यक्षांचें भाषण श्रेष्ठ, त्यांतही पुढील वाक्य श्रेष्ठ.तें आपल्या मुख्य प्रधानांच्या तोंडचें आहे. Good Government is no substitute for self Government म्ह. चांगलें राज्य हें स्वराज्याच्या मोबदला नव्हे; स्वराज्याचा मोबदला सुराज्यानें होणें नाहीं. आजच्या व्याख्यानांत स्वराज्य आणि सुराज्य हीं परस्पर विरुद्ध आहेत, यांच्यांत चिरविरोधच आहे, कीं तीं तशीं नसून परस्परांना दुजोरा देणारीं, एकच आहेत, म्हणजे त्यांचें सहकार्य, ऐक्य आहे, याचा विचार करणें आहे. आणि प्रयत्न असा करावयाचा आहे—व्याख्या त्यांनींच नव्हे, तर देवाच्या घरांत जे बसलेले आपण, त्या श्रोत्यांनींही—कीं तीं एकच आहेत. माझ्याकडे फक्त निकाल उघड करण्याची कामगिरी आली आहे. पण आपण सर्वांनीं मनांत विवेचन करून पडताळून पहायचें आहे. स्वराज्याचा अर्थ वर्तमानपत्रांतून केला जातो कीं आमच्या लोकांचें राज्य. अरे पण आमचे लोक ते कोणते ? कोणाला म्हणायचे आमचे लोक ? आमच्या लोकांची कल्पना कोणती ? हे आमचे लोक, व हे परकीय असें कसें निवडून काढायचें ?

बऱ्याच देशांचे इतिहास बऱ्याच सुव्यस्थित रीतीनें उपलब्ध आहेत. इजिप्शियन, असिरिअन, बॅबिलोनियन, ग्रीक, रोमन या लोकांनीं राज्य केलें, बळ गाजविलें, तें तें स्वराज्य होतें काय ? ग्रीसचें एक उदाहरण घ्या. किती लोकांचें स्थानांतर झालें,नव्या लोकांनीं जुन्या रहिवाशांना जुलमानें आपल्यांत घेतलें. त्यांत पुनः स्पार्टन, अथिनियन, कॉरिंथियन निराळे. आपण ज्या राज्याकडे पाहून स्वराज्याची कल्पना बांधितों, तें ब्रिटिश राज्य तरी स्वराज्य आहे? ब्रिटिश हें नांव तरी संमिश्रणाचें नाहीं असें तरी कोणी ह्मणेल काय ? ॲंग्लो—सॅक्सन्समध्यें ॲंगल्स निराळे व सॅक्सन्स निराळे. यावरून हें दिसून येईल कीं कोणता भाग आमच्या बाहेर टाकायाचा हें ठरविणें कठिण आहे. सर्वत्र लोक एकमेकांत मिसळत चालले आहेत. या वाढत्या विकासांत अशी पायरी सांगतां येते काय कीं तेथें स्वराज्य दृष्टीस पडेल ! आह्मांस स्वराज्य पाहिजे असें ह्मणतांना लोकसत्तात्मक राज्य पाहिजे असें ह्मणण्याचा सध्यां इरादा नसतो. आम्हांला आमचें राज्य पाहिजे असा हेतु. पण असें पहा, असें कधीं झालें आहे काय ? या हिंदुस्थानांतच पुष्कळांनीं पुष्कळ राज्यें केलीं आहेत. पण तीं आपलीं नव्हतीं. कोणी तरी येऊन राज्य केलेलें, पण त्याच्या संबंधानें त्यावेळीं लोकांची आपलेपणाची सीमा वाढलेली असे. हा आपलेपणा असीम, खरोखर निराधार आहे.

स्वराज्याचा दुसरा अर्थ घेऊं. आम्हांला लोकसत्तात्मक राज्य पाहिजे. म्हणजे १० खिस्ती, १५ मुसलमान, २७ हिंदु असे मिश्रित, किंवा अमिश्रित लोकांचें राज्य असावें. या अर्थानें तरी लोकसत्तात्मक राज्य इतिहासांत झालें आहे काय ? कांहीं अंशानें इंग्लिशांचें तसें आहे. पण त्या पूर्वीचें रोमन राज्य घ्या. त्याचीं सूत्रें फक्त रोमच्या रहिवाशांच्या हातीं. ग्रीसचें घ्या. उदाहरणासाठीं एक गोष्ट सांगतों, पोरीक्लिस म्हणून एक पराक्रमी ग्रीक मुत्सदी होऊन गेला. त्याचेवर त्याच्या बायकोचें वजन होतें. बायको अगदीं लहरी असे. तिचें लहरी प्रेम तिच्या कुत्र्यावर होतें. तेव्हां विनोदानें असें म्हटलेलें आहे कीं ग्रीसचें राज्यसूत्र एकेकाळीं कुत्र्यावर अवलंबून होतें. यावरून हा साधारण नियम उघड होतो कीं चार पुढारी एकत्र होतात, ते टेहळतात, आपलीं व्याख्यानें, आपले विचार लोकांस सांगत फिरतात, यामुळें त्यांची लोकांवर छाप बसते व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें राज्याचें सुकाणूं फिरतें. इंग्लंडांत तरी पहा, लोकसत्तात्मक राज्य पुरें आहे काय ? तेथें बायकांची संख्या पुरुषांपेक्षां अधिक; तरी बायकांना तेथें राज्य नाहीं. त्यांनीं पार्लमेंटगृहांत जाऊं म्हटलें, तर पोलिस लोक त्यांस बाहेर ढकलून देतात. बाकीच्या अर्ध्यांतून किंवा अर्ध्याहून कमीच लोकांतून गरीबलोक—कीं, ज्यांच्यापाशीं एक पैसा किंवा एक पैही नाहीं व मिळविण्याचें सामर्थ्य नाहीं—वगळले पाहिजेत. बरें, अमेरिकेचें उदाहरण घ्या, तेथें तरी हीच तऱ्हा ! बायकांस व

निर्दोष राजदरबारी मज्जाव, तेव्हां स्वराज्याच्या आतांपर्यंत घेतलेल्या दोनही अर्थानें स्वराज्य आतांपर्यंत नीट रीतीनें झालेलें नाहीं.

आतां स्वाराज्य घ्या. आपल्याकडे रामराज्याची कल्पना आहे. राजाला कर नको आहे, लोक तो घ्या म्हणताहेत; देशामध्यें चोर नाहीं, म्हणून पोलिसही नाहीं, असें दंतकथेंतील स्वाराज्य. तसेंच पाश्चात्यांची Utopia यूटोपियासारखी कल्पना म्हणजे भावि सुखाशेचें राज्य. शिवाय सोशियालिस्ट, कम्यूनिस्ट, यांनीं सध्यां प्रयोगही करून पाहिले आहेत. तीही अशीच कल्पना कीं, उत्पन्नावर सर्वांचे हक्क सारखे असावेत. आमच्यांमध्यें मताचे पंथ तर पाश्चात्यांत कृतीचे निघाले आहेत. पण याही कल्पनेस, यश यावें अशी माझी, तुमची सर्वांची इच्छा आहे तरी, अद्यापि तें आलें नाहीं, सात्विक कल्पना मात्र ही खरी कीं कधीं कोणी कोणाशीं वैर करीत नाहीं, कोणी कोणाचें मन दुखवीत नाहीं. सगळे बंधु, सगळ्या बहिणी, सगळी संपत्ति सर्वांची; राजा नाहीं, तेव्हां याला राज्य म्हणावें कीं नाहीं याची तरी शंकाच येते. पण असें जें स्वाराज्य, तें मागें कधीं झालें नाहीं, यापुढें तरी होईल कशावरून ? तेव्हां न भूतो न भविष्यति असें कांहीं तरी घेऊन रिकामा कंठशोष कशाला ?

पण आतां विधिवाज घेऊन पाहूं. मी म्हणतों कीं मनुष्याच्या सर्व खटपटीचा ओघ सनातन काळापासून, स्वराज्य आणि स्वाराज्य एक करण्याकडे चालत आला आहे. ब्राह्मसमाजाची मोक्षाची कल्पना काय आहे ? तर अनंत उन्नतीची. ही कधीं झाली आहे काय ? नाहीं. पुढें होईल काय ? नाहीं. पण याबद्दल अंतरींचा अनुभव, साक्षात्कार मात्र आहे कीं, आपली अनंत उन्नति होत रहाणार; तोच प्रकार येथें आहे. प्रत्येक व्यक्तीनें आपलें राज्य आपणांवर केलें पाहिजे, तेंच खरें स्वराज्य–स्वाराज्य किंवा सुराज्यही पण तेंच तथापि सर्वांत श्रेष्ठ जी कांग्रेस, त्यांतील भाषणांत असें असावें कीं स्वराज्य व स्वाराज्य भिन्न नाहीं. जी गोष्ट आपणाला पाहिजे, त्याच्याविषयीं आपली शुद्ध कल्पना नको काय ? नाहीं तर स्वराज्य न देणाऱ्याच्या मनांत यावें कीं यांना वाईट राज्य पाहिजे तें देऊं नये. मागणाऱ्याच्या मनांत आम्हांला आमचें राज्य पाहिजे. अशा गैरसमजुतीनें कार्य कसें होईल ? बरें स्वराज्य एकेक व्यक्तीनेंच करणें किती कठीण आहे ? आपणाशिवाय जगांतील सर्व लोक नष्ट झाले असें समजून, आपण आपल्याच नियमांनीं चालूं असें ठरवून त्याप्रमाणें चालणें जर कठीण, तर आम्ही सर्व लोकांचें नियमन करूं म्हणजे हास्यास्पद नव्हे काय ? तर प्रत्येकानें एवढी दृष्टि ठेवली तरी पुष्कळ काम झालें कीं जे सदाचाराचे नियम ते आपण आपल्यासंबंधांत अमलांत आणण्याचा प्रयत्न करूं. जें श्रेय तेंच प्रिय करून घ्यायला पाहिजे, घेतलें पाहिजे. ज्ञानदृष्टीनें श्रेय, तेंच खरोखर प्रिय व्हावें. गुरुत्वाकर्षण, रेषाकर्षण परमाणु-परमाणूंमधील आकर्षण यांचे नियम जसे युक्तीनें सिद्ध झाले आहेत, तसेच सात्त्विकपणाचे नियम सिद्ध झाले आहेत काय ? होय, झाले आहेत. 'सर्वाणि भूतानि आत्मवत् पश्य'— जें तुला प्रिय आहे, तेंच दुसऱ्याला प्रिय आहे असें समजून त्याप्रमाणें वाग. हा सदाचाराचा एक प्रमुख अढळ नियम. भौतिक नियमांत पालट होत आहेत; पण धर्माचे, नीतीचे, आत्म्याचे जे कांहीं नियम, ते त्रिकालसिद्ध होत. त्यांबरहुकूम ज्यानें त्यानें स्वतःचें वर्तन ठेवणें तें स्वाराज्य होईल. हें नाहीं, तोंपर्यंत एकानें आम्हांला स्वराज्य द्या म्हणावें व दुसऱ्यांनीं म्हणावें तुम्हांला स्वराज्य देतों, यापासून उद्दामपणा, अभिमान, अज्ञान, दोन्ही पक्षांकडे अशुद्ध हेतु मात्र दृष्टीस पडतात. भांडणाचीच स्थिति कायम रहाणार. 'आपल्या मतें पिसें । परि तें आहे जैसें तैसें ॥' तें याची योजना आपल्याकडे सत्य, वास्तविक स्थिति या अर्थी करतात. स्वराज्य व स्वाराज्य ही एक वास्तविक स्थिति आहे. अशा स्वराज्याचा व स्वाराज्याचा अंशतः अनुभव साधु संत सनातन काळापासून घेत आले आहेत. ज्याचा अधिकार असेल त्याला यांतील ऐक्य समजन येणार आहे ! ! ज्याचा नसेल त्याला तें कधींच कळून येणार नाहीं !

# ईश्वर आणि विश्वास.

## ईश्वर.

(१९०८ च्या उत्सवांत दिलेल्या व्याख्यानाचा सारांश.)

मानवोन्नतिशास्त्र (Anthropology) ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना ५००० वर्षांपूर्वीपासून आतां पर्यंत धर्मांची प्रगति कशी होत आली आहे, हें कळून येईल. एवढ्या काळांत जड जगत् जशाचें तसेंच राहिलें आहे. जी माती पूर्वी तांबडी होती ती आतांही तांबडीच आहे, जी काळी होती ती आतां तशीच आहे. जो दगड पूर्वी जितका कठीण होता तो तितकाच आतां आहे. मनुष्येतर प्राणीहि बहुतेक त्याच स्थितींत आहेत. पण मनुष्यप्राणानें इतक्या अवधींत किती आघाडी मारिली आहे! भौतिक कला, मानसिक विद्या आणि आत्मिक उन्नति हीं या एका प्राण्यानें किती तरी संपादिलीं आहेत पहा.

हें जें ऐश्वर्य आणि ही जी संपत्ति मनुष्यानें मिळविली आहे, त्या सर्वांत श्रेष्ठ दर्जाची संपत्ति म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर—ती गूढ शक्ति, कीं जिच्यामुळें अनंतकोटि ब्रह्मांडें निर्माण होऊन चाललीं आहेत—त्याच्यासंबंधीं मनुष्यानें आपल्या ज्या कल्पना, भावना व सिद्धांत केले आहेत, ते होत. ईश्वर म्हटल्याबरोबर काय काय विचार, विकार, ईर्षा, इ. उद्भवतात! ह्या संपत्तीशीं दुसऱ्या कशाचीही नुसती तुलना देखील करणें शोभत नाहीं.

हा जो आपल्याजवळ अपूर्व संपत्तीचा संचय आहे, तो जगाचा तसाच पूर्वीपासून मिळालेला आहे असें नाहीं. स्वतः ईश्वर जरी उत्क्रांतिनियमाच्या बाहेर आहे, तरी त्यानें आपल्यासंबंधीं ज्ञान मनुष्यास एकदम जाहीर केलेलें नसून तें तो उत्क्रांतिनियमांप्रमाणें हळूहळूच देत आहे. पृथ्वीच्या नकाशाकडे पाहिलें असतां दिसून येईल कीं, भूमध्यरेखेपासून उत्तरेकडील ४० अक्षांशांच्या दरम्यान जे इजिप्त, ॲसीरिया, बॅबिलोनिया, इराण, हिंदुस्थान, चीन, जपान, मेक्सिको आणि पेरु इ. प्राचीन देश आणि राष्ट्रें होऊन गेलीं, ह्यांतच मनुष्यजातीच्या हल्लींच्या सर्व सुधारणांची उत्पत्ति झाली आहे, असें उपलब्ध इतिहासावरून दिसून येतें. ह्या चाळीस अक्षांशांच्या समशीतोष्ण कटिबंधांत हे सर्व देश असल्यामुळें, युरोप व आफ्रिकेंत गहूं, आशियांत तांदूळ आणि अमेरिकेंत मका हीं मनुष्याच्या सुस्थितीस आवश्यक धान्यें उत्पन्न होऊन त्यांच्या घरोघरच सुधारणांचीही लागवड होणें शक्य झालें. ह्यावरून इतरांबरोबरच ईश्वरसंबंधीं ज्ञानालाही भौतिक साधनांची कशी आवश्यकता आहे, हें दिसून येईल. फार प्राचीन काळीं अर्धवट रानटी माणसांच्या ज्या साध्याभोळ्या धर्मसमजुती आधुनिक शोधामुळें व शास्त्रीय उपकरणांच्या योगें आम्हाला माहीत होऊं लागल्या आहेत, त्यांच्याशीं आमच्या स्वतःच्या सुसंस्कृत समजुती ताडून पाहतांही ह्या ईश्वरज्ञानाचा विकास होत असलेला दिसून येईल. मनुष्य मेला असतां त्याच्या आत्म्याला बाहेर जाण्याला वाट करून देण्यास प्रेताच्या टाळूस वाटोळें भोंक करण्याची चाल कांहीं रानटी लोकांत असावी अशी कांहीं प्रेतांच्या प्रस्तरभूत सांगाड्यांवरून व इतर खुणांवरून अटकळ होते. मस्तकांत प्राण नेण्याची कल्पना आपल्या योगशास्त्रांतही आहे. ॥ इस बंगलेकूं नऊ दरवाजे दसवी खिडकी खोल ॥ असा जो कबीरजीचा उल्लेख आहे, तोही ह्या मस्तकांतील खिडकीसंबंधीं होय. ह्यांत रहस्य इतकेंच कीं आत्मतत्त्व म्हणून कांहीं आपल्यांत आहे आणि बाहेरही आहे आणि त्याचा मिलाफ व्हावयाचा आहे ही जी धार्मिक कल्पना ती अनेक प्रकारच्या समजुतींच्या द्वारांपूर्वीपासून सारखी परिणत होत आहे. तसेंच आकाश, वायु, पर्जन्य, महासागर, सूर्य इ. सृष्ट महाविभूति निरनिराळीं दैवतें मानून त्यांची पूजा करण्याची प्रवृत्ति जशी ग्रीक लोकांत आणि हिंदुस्थानांत होती तशीच नव्या खंडांतील मेक्सिको आणि पेरू देशांतही असलेली शोधकांस आढळून आली; इतकेंच नव्हे तर मेक्सिकोच्या जुन्या देवळांतील सूर्याच्या मूर्तीचें जें चित्रवर्णन केलेलें आहे, तें तर मराठी जुन्या तिसऱ्या पुस्तकांतील सूर्याच्या चित्राची हुबेहुब आठवण करून देतें. हीं अनेक दैवतें नाहींशीं होऊन त्यांच्या ऐवजीं एक देवाची कल्पना हळू हळू ज्ञानाच्या प्रसाराबरोबर कशी वाढत गेली, तिचाही प्रकार चहूंकडे सारखाच दिसून येतो.

असो. ह्याप्रमाणें मनुष्यप्राणी ईश्वराची कोणत्याना कोणत्या तऱ्हेनें तरी भावना केल्यावांचून राहिला नाहीं. इतकेंच नव्हे, तर ईश्वरासंबंधीं त्याची भावना उत्तरोत्तर शुद्धच होत गेली आहे व पुढें ह्याहूनही शुद्ध होत जाणार आहे. किंबहुना ईश्वराला भावणें हाच मनुष्यपणा आहे.

असन्नेव स भवति । असद्ब्रह्मेति वेद चेत् ।
अस्ति ब्रह्मेति चेद्वेद ।

( तैत्तिरीयोपनिषद् २. ६ )

ब्रह्म नाहीं असें ह्मणणारा स्वतः आपणच नाहीं असा होतो. ब्रह्माला आहे असें जाणण्यानेंच जाणणाऱ्या स्वतःला अस्तित्व येतें. मननशील असणें हाच मनुष्याचा धर्म. तो नाहींसा झाला म्हणजे मनुष्याचा मनुष्यपणा नाहींसा होऊन तो नुसता प्राणीरूपानें मात्र उरतो. असा वरील श्रुति–वाक्याचा भाव आहे. तेव्हां ईश्वरसंबंधीं कांहीं तरी भावना मनुष्यमात्रामध्यें असलीच पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे.

मानवोन्नतिशास्त्र किंवा तुलनात्मक धर्मशास्त्र यांचा उद्देश ईश्वर आहे कीं नाहीं हा प्रश्न ठरविण्याचा नाहीं, तर ईश्वरभावनेची शुद्धि कसकशी होत गेली हें दाखविण्याचा आहे. आणि ह्या शुद्धीची मुख्य दिशा ही आहे कीं, ईश्वर हा कोणी शरीरविशिष्ट व्यक्ति नसून सर्वव्यापि शुद्ध-चैतन्य आहे, अशी मानवजातीची मति होत चालली आहे. म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें तर ईश्वर हा भोगायतन नसून केवळ गुणाश्रय आहे. मनुष्यही स्वतः गुणाश्रय आहे, परंतु त्याच्या गुणाला शरीराची अपेक्षा आहे तेव्हां ह्या त्याच्या दोषामुळें तो कितीही ज्ञानी झाला तरी तो आपल्या स्वतःचा देहभाव सूक्ष्म मानानें नकळत कां होईना, ईश्वरावर आरोपितोच. तो देहभाव ( Anthropomorphism )पूर्ण नाहींसा करून ईश्वर हा केवळ गुणाश्रय आहे,असें जाणणें ही त्याविषयीं सम्यग्भावना होय. म्हणजे ईश्वर आमच्यासारखा सुखी किंवा दुःखी नसून केवळ सुखस्वरूपच आहे; आमच्याप्रमाणें दयाळु किंवा निर्दय नसून दयेचा प्रेरक आहे; आमच्यासारखा प्रेमी किंवा द्वेषी नसून प्रेमाचा प्रवर्तक आहे; हें आम्हीं उत्तरोत्तर अधिक जाणिलें पाहिजे.

ह्या ठिकाणीं असा एक आक्षेप येण्याचा फार संभव आहे कीं ईश्वर जर सर्व गुणांचा प्रवर्तक आहे, तर तो सद्गुणांचा असावा तसाच दुर्गुणांचा असला पाहिजे. चांगल्या गुणाला मात्र ईश्वर कारण आणि वाईटाला मनुष्य कारण असें म्हणणें म्हणजेच ईश्वरावर ही मोठी मेहरबानीच करूं पाहणें होय. ह्यावर थोडा विचार केल्यास कळून चुकेल कीं सद्गुण आणि दुर्गुण ह्या दोन भिन्न परस्पर-विरोधी स्थिति मुळींच नाहींत. जे काय आहेत ते गुणच आहेत आणि ते सर्व मंगलच आहेत. उदाहरणार्थ, मनुष्य प्रेमामुळें दुसऱ्यावर उपकार करितो व लोभामुळें दुसऱ्याला अपकार करितो असें दिसतें. पण प्रेम आणि लोभ हे परस्पर विरोधी पदार्थ नाहींत. तर उत्क्रांतीच्या निरनिराळ्या पायरीवरचे गुण असून दोन्ही सत्कार्याचीं साधनेंच आहेत. प्राणिमात्रांनीं आत्मसंरक्षण करावें, ह्यासाठीं ईश्वर लोभाचा प्रवर्तक होतो आणि आत्मसंरक्षणाचे खालचें कार्य चांगलें स्थापित झाल्यावर त्याहून उच्च दर्जाचें जें परहितपोषणाउत्क्रांतीचें कार्य त्यासाठीं प्रेमाचा प्रवर्तक ईश्वरच होतो. आपण मात्र वरच्या पायरीवर पोंहोंचनही वरच्या प्रेरणांना न जुमानतां खालच्या प्रेरणांना वश झालों, तर आपल्याला दिलेल्या स्वतंत्रतेचा आपण दुरुपयोग केला असें होतें. ईश्वर दुर्गुणांचा प्रवर्तक होत नाहीं. कारण दुर्गुण असा कोणताच नाहीं. ह्याचप्रमाणें शौर्य आणि भीति, सहिष्णुता आणि क्रोध, जितेंद्रियता आणि काम, ह्या सर्व गुणांचें प्रयोजन समजावें. हे भिन्नभिन्न दिसणारे गुण एकाच पायरीवरचे नव्हत. उत्क्रांतिकार्यासाठीं ह्यांची शुभ परंपरा सत्त्वाचा प्रवर्तक जो परमेश्वर त्यानेंच लावून दिली आहे. आणि वाढीच्या मानानें प्राणिमात्रांना ईश्वरानें अधिकार आणि स्वतंत्रता हीं कशीं दिलीं आहेत ह्याचा अनुभवही ज्याचा त्यालाच आहे. ह्यासंबंधी इतरांनीं वाच्यता करण्याची जरूरी नाहीं आणि करून फळही नाहीं. एवंच ईश्वर सत्वाचा प्रवर्तक आहे ह्या श्रुतिवाक्याला बाध येत नाहीं.

## विश्वास.

ईश्वर सत्वाचा प्रेरक आणि प्रवर्तक कसा आहे याचा आपण इतका वेळ विचार केला. आतां

त्याच्या आमच्यामधील संबंध जो विश्वासाचा त्याकडे वळूं.

ईश्वराचा व आपला संबंध बुद्धीच्यापेक्षां विश्वासाच्या द्वारें अधिक जडतो. इतकेंच नव्हे, तर बुद्धीच्यामुळें हा संबंध केव्हां केव्हां शिथिल होतो असें दिसून येते. बुद्धि आणि विश्वास ह्यांतील फरक थोडक्यांत सांगावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, बुद्धि म्हणजे पुष्कळ प्रयत्नानंतर पुष्कळ सामग्रीच्या साहाय्यानें अल्प ज्ञान करून देणारी शक्ति, आणि विश्वास म्हणजे कांहींच प्रयत्न न करतांना अल्पशा सामुग्रीनें पुष्कळसें ज्ञान करून देणारी शक्ति होय. अनेक शास्त्रांच्या पुष्कळ साधनांनीं आणि मोठ्या अविश्रांत श्रमानें मनुष्याला बराच अनुभव आला आहे; तरी विश्वाचें ठोकळ आणि यथार्थ ज्ञान काय झालें तें पाहूं गेलें असतां साधनांच्या मानानें सिद्धि फारच अल्प झालेली दिसून येईल. पण माणसामध्यें विश्वास म्हणून एक अधिक मोलाची आणि नवलाची शक्ति आहे. विश्वामध्यें सत्वाचा, शुभाचा आणि मांगल्याचा प्रसार करणारी ईश्वर ही शक्ति भरली आहे, हें ज्ञान प्राचीनकाळापासून कमी अधिक मानानें कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें अवगत झालें आहेच. थोडा कोठें एक विशेष प्रकारचा अंगस्पर्श होतो न होतो, तोंच नूतन बालकाचा आईवर केवढा दृढ आणि कायमचा विश्वास बसतो ! थोडी खुणेला खण पटली कीं तरुणी आपल्या माहेरचा सर्व वारसा सोडून देऊन परक्या तरुणावर आपल्या सर्व आयुष्याचा भार टाकते ! ही विश्वासाची जादु होय ! 'आकारैरिंगितैर्गत्यागृह्यतेऽन्तर्गतं मनः।' मनुष्याच्या आंतला मतलब समजण्याला, आकार, हावभाव, बसणें, उठणें इ० वरून सहजच उपजणारा विश्वास हा कारण होतो. येथें तर्काचीं प्रमाणें पंगू पडतात आणि मनुष्याच्या प्रमाणेंच अखिल विश्वाचा मतलब समजण्यालाही बुद्धीच्या कृत्रिम खटपटी-पेक्षां उपजत विश्वासच कामाला येतो. कारण, तुका म्हणे माझा स्वामी अबोलणा । पुरवुं खुणे खुणा जाणतसों ॥

बुद्धि आणि विश्वास ह्यांमध्यें दुसरा एक विशेष फरक आहे तो असा. विश्वामध्यें सत्वाचा प्रवर्तक ईश्वर आहे असें केवळ अस्तित्वबोधक ज्ञान बुद्धीच्याही द्वारें मिळूं शकतें. हल्लींच्या काळीं शिक्षण आणि संसाराच्या इतर सोई पुष्कळ संवगल्या असल्यामुळें बऱ्याच सुशिक्षित लोकांना आयत्या बुद्धीची थोडीशी हालचाल करून, थोडेंसें तुलनात्मक धर्मशास्त्राचें अवलोकन करून, ईश्वरसंबंधी वरील अस्तित्वबोधक ज्ञान मिळवितां येत आहे. पण अशा सुशिक्षितांना त्यांचेश सुखवस्तु स्थितींत त्यांच्या या सुलभ ज्ञानामुळें फारसा उपद्रव होत नाहीं, किंवा साहाय्यही पोंहोंचत नाहीं. नित्याच्या कौटुंबिक आणि सामाजिक व्यवहारांत सत्याचा आग्रह धरून रहावयाला त्यांचें हें आयतें ज्ञान त्यांना भाग पाडीत नाहीं. किंवा भाग पडलें असतां त्यांना धीरही देत नाहीं; येथें विश्वासाचें काम आहे. ईश्वर सत्वप्रवर्तक आहे असें नुसतें मत असून चालत नाहीं, तर तो सत्वाचा आणि शुभाचा प्रवर्तक आहे. म्हणूनच मी सत्याचा आग्रह धरून राहिलों तर, माझे कितीही हाल झाले तरी हानि—माझी किंवा कोणाचीही—मुळींच होणार नाहीं; असा विश्वास पाहिजे आहे. अशा विश्वासामुळेंच ईश्वराचा व आपला खरा आणि निकट संबंध जडतो, बुद्धीनें जडत नाहीं.

माझ्या समाजबंधूनो, मला आपल्यापुढें हाच मुद्दा विशेष कळकळीनें सांगावयाचा आहे. ह्यांत नवीन कांहीं नाहीं आणि तें नको आहे. तुम्ही व मी प्रार्थनासमाजांत आलों, येवढ्यावरूनच सर्व ईश्वरावर विश्वास ठेवणारे झालों असें होत नाहीं. ती गोष्ट आम्ही आमच्या नित्याच्या व्यवहारांत कसें वागत असतों ह्यावर अवलंबून आहे. पुष्कळ वेळां तर असें घडतें कीं आम्ही आपल्या व्यक्तीच्या वर्तनावर दुसऱ्यांनीं टीका करण्याची वाट देखील पाहत नाहीं. म्हणजे कोणीतरी समाजावर साधारण टीका केल्याबरोबर आमचा सर्व विश्वास विरघळून जाऊन आम्ही शुष्क होतों. परवांच पुणें येथील मराठा पत्रांत एका सन्मान्य गृहस्थाचा एक सुंदर लेख प्रसिद्ध झाला होता. त्यांत त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, प्रार्थना समाजांत फारच थोडा जीव उरला आहे आणि त्याचें लोकांवर तर मुळींच वजन नाहीं. गोष्ट खरी असेल. पण अशा टीकेचा आमच्या समाजबंधूंवर भलताच परिणाम होण्याचा

संभव आहे म्हणून मला पुढील एक गोष्ट सांगावी असें वाटतें.

एकदां एका मोठ्या आगबोटीवरील एक उतारू फार आजारी पडला. तो जगण्याची आशा बहुतेक नाहींशी झाली. शेवटीं आगबोटी वरील डॉक्टरांनीं रोग्याला नीट तपासून आपली खात्री करून घेतली, आणि स्टयूअर्डस लोकांना एकीकडे बोलावून सांगितलें कीं, रोग्यांत आतां जीव फारच थोडा उरला आहे. तो १० वाजण्याच्या आंत खात्रीनें मरणार. त्यानंतर त्यास समुद्रांत टाकून द्यावें. १० वाजतां सांगितल्याप्रमाणें स्टयूअर्डस येऊन रोग्यास उचलून नेऊं लागले, रोगी त्यास तसें करूं देईना. स्टयुअर्डसनीं डाक्टरचें मत कळविलें तरी रोगी आपण मेलों आहे हें कबूल करीना. स्टयुअर्डसनीं त्याला दरडावून विचारलें, काय डाक्टरापेक्षां तुला अधिक कळतें काय ? एकाद्या विद्वान् टीकाकारानें टीका केली, व आमच्यामध्यें जीव नाहीं असें ठरविलें तरी आमच्यामध्यें जीव आहे कीं नाहीं हें विद्वानांपेक्षां आपणांस जास्त समजतें. अशावेळीं विद्वानांच्या म्हणण्याकडे किंबहुना लोकांच्या दटावणीकडे लक्ष न पोंहोंचवितां आम्ही जिवंत आहों हा विश्वास जतन केला पाहिजे व लोकांनीं ढकलून दिलें तरी आपण आपल्या नांवेंतून समुद्रांत पडूं नये.

हा समाजावरील टीकेची गोष्ट झाली. व्यक्तिविषयक वर्तनावरील टीका झाली तरी आपला विश्वासच जसा कामाला येतो, तसें दुसरें कांहीं येत नाहीं. पण कांहीं झालें तरी असें दुसऱ्याच्या टीकेचे प्रसंग कमीच येतात. पुष्कळ वेळां आम्हांला स्वतःचीच टीका आणि भीति ह्या नडतात आणि नागवितात. समाजांत यावें किंवा न यावें हें ठरविण्याला ईश्वरावरील विश्वासाची इतकी जरुरी भासत नाहीं. पण वरील आत्मटीका व आत्मभीति यांचें निवारण, सत्वप्रवर्तक ईश्वर आपल्या जवळ आहे असा विश्वास आपल्यांत अष्टौप्रहर जागत असल्याशिवाय होणें शक्य नाहीं. एकाद्या कामाचा आरंभ करतेवेळीं हा विश्वास असतो, पण अर्ध्या वाटेवर गेलों असतां धीर सुटतो, दिशा धुंद होतात.

पारीसशहरांत सुमारें २०० फूट व्यासाचें एक विशाल चक्र बारीक तारांच्या उंच खांबांवर उभें केलें आहे. १०।५ माणसें सुखानें बसतील अशा खोल्यांसारख्या १००--१५० पेट्या त्या चक्रांत बसविल्या आहेत. प्रेक्षक लोक ह्या खोल्यांतून बसले असतां हळू हळू तें चक्र फिरत असतें. ह्या ठिकाणीं फ्रेंच कारागिरांच्या यंत्रकुशलतेची व योजनेची कमाल झाली आहे. मी ह्या एका खोलींत बसून जसजसा हळूहळू वर जाऊं लागलों तसतसा माझा धीर सुटूं लागला. किती दिवस तरी ह्या चक्राचा खेळ चालला होता, हें मला माहीत असूनही माझ्याच वेळीं तें मोडणार, अशी पोरकट भीति मला वाटूं लागली. ही भीति केवळ संस्कारजन्य होती. पण तिच्यामुळें त्रास झाला तो कांहीं कमी नव्हता. २०० फूट उंच वर हवेंत जेव्हां आमची खोली गेली तेव्हां तर अवस्था फारच कठीण झाली. ह्या चक्राची एक फेरी कशी तरी झाली. पण एफेला टॉवर नांवाचा जो ८०० फूट (सर्व जगांत उंच) लोखंडी मनोरा आहे, त्याच्या अर्ध्यावर तर चढवेचना. प्रार्थनासमाजाला जो मनोरा चढावयाचा आहे त्याची उंची अनंत आहे, त्यांतिल सभासदांचा धीर पदोपदीं सुटण्याचा संभव आहे. अशा वेळीं विश्वासाचें बळ पाहिजे. संस्कारामुळें जी भीति वाटते ती घालवावयाची असल्यास विश्वासाचीच संवय केली पाहिजे.

आत्मोन्नतीचे आणि देशोन्नतीचे पुष्कळ चढाव समाजाला चढावयाचे आहेत. सभासदाचा व्यक्तिशः विश्वास उत्तरोत्तर वाढत जावो आणि ईशभक्ति व लोकसेवा त्यांच्याकडून अधिकाधिक घडो, ही जगच्चालकाजवळ प्रार्थना आहे.

## बौद्ध धर्माचा जीर्णोद्धार.

(पुणें येथील जॉन स्मॉल हॉलमध्यें ता. १६ एप्रिल १९१० रोजीं झालेल्या व्याख्यानाचा सारांश.)

व्याख्यान जुळवून आणणारे, व्याख्यानाचें स्थळ व प्रसंग, श्रोते आणि वक्ता ह्यांपैकीं कोणीही बौद्धधर्माचे नसतांना ह्या विषयावर व्याख्यान कां

होत आहे, अशी शंका येणें साहजिक आहे. प्रस्तुत विषयाचा समाजशास्त्राच्या दृष्टीनें विचार करावयाचा आहे. कोणत्याही लोकांचीं धर्मसंबंधीं मतें, विश्वास, विधि आणि व्यवहार हीं सर्व त्या लोकांची सामाजिक प्रगति किती झाली आहे हें पाहण्याचीं मुख्य साधनें होत. व समाजशास्त्राच्या अध्ययनाची मुख्य सामग्री म्हणण्यासही हरकत नाहीं. आधुनिक समाजशास्त्राचे प्रधान आचार्य स्पेन्सर साहेब हे होत. इतर भौतिक शास्त्रें ज्या स्वयंभू नैसर्गिक बाह्य नियमांनीं बांधलीं गेलीं आहेत, त्याच नैसर्गिक नियमांचा अंमल मानवी समाजाची उत्पत्ति, वाढ व लय ह्या गोष्टींतही आहे, हें मत स्पेन्सरनें जोरानें प्रतिपादिलें आहे. स्पेन्सरचें मत समाजशास्त्र (Sociology) हा जीवनशास्त्र (Biology) ह्यांचा एक केवळ खांब आहे असें होतें; पण ह्या मतांत अलीकडे बरीच सुधारणा होत चालली आहे. व्याख्यात्यांनीं ह्या ठिकाणीं प्रो. मॅकेंझी ह्यांच्या ऑक्सफर्ड येथील मॅंचेस्टर कॉलेजांतील ह्युमॅनिझम "Humanism" वरील व्याख्यानांतील एक उतारा वाचून दाखविला. त्यांतील आशय असा होता कीं, खालील प्राण्यांतील व्यक्तीच्या व जातीच्या पूर्वेतिहासाचा परिणाम तिच्या वर्तमान व भावी जीवनक्रमावर घडतो, पण तो तिला कळून येत नाहीं. मनुष्याला हा घडून येणारा परिणाम समजतो, इतकेंच नव्हे तर मनुष्य जाणून बुजून आपल्या व्यक्तीच्या तशाच जातीच्या पूर्वेतिहासांतील महत्वाच्या गोष्टींचा फायदा घेऊन त्यांच्या बळावर आपला पुढील आयुष्यक्रम रचीत असतो व ह्यांतच त्याचा मनुष्यपणा खालील प्राण्याहून विशेष आहे. ह्यावरून समाजशास्त्र हा केवळ जीवनशास्त्राचा एक भाग आहे, ही समजत अपुरी ठरते.

बौद्धधर्म हा आमच्या लोकांच्या पूर्वेतिहासांतील एक केवळ महत्वाचा भाग आहे. इतकेंच नव्हे, तर तो आमच्या हल्लींच्या धार्मिक व सामाजिक जीवनाचा एक मोठा घटक आहे. ही जाणीव आम्ही आमच्यामध्यें ठेविली नाहीं म्हणून वस्तुस्थिति तशी नाहीं असें होणार नाहीं. आमचें जीवन मात्र पशूप्रमाणें जाणीवहीन, आणि केवळ बाह्य नियमांच्या बळावर वाहत चाललें आहे, असें होईल. बौद्धधर्म हा आमचा बिनमोल वारसा आहे. त्याची नुसती जाणीव ठेवूनच तृप्त न राहतां मागें काय झालें असेल तें असो. अतःपर त्यावर आपला अभिमानानें हक्क शाबीत करून आम्हीं त्याचा लाभ घ्यावयाला पाहिजे आहे. ह्या दृष्टीनें पाहतां आजचा विषय नुसता समाजशास्त्राच्या अध्ययनाचाच नसून तो समाजसुधारणेचाही आहे असें दिसून येईल. पण खरोखर तो ह्याहीपेक्षां जास्त आहे. व्याख्यात्यांनीं स्वतःला ज्या धर्मसंप्रदायाला वाहून घेतलें आहे, त्याची त्यांना अशी आज्ञा आहे कीं, सर्व धर्मांचें चौकस व निरपेक्ष बुद्धीनें संशोधन व तुलना करून त्यांतून जें सारभूत सत्य निघेल त्याच्या आधारें दुसऱ्याची सेवा व स्वतःची उन्नति करून घ्यावी व हेंच कायतें खरें धर्माचरण समजावें. ह्या दृष्टीनें आजचें व्याख्यान उज्ज्वल धर्माची एक लहानशी कामगिरीच होय.

भगवान् गौतमबुद्धानें शिकविलेले धर्मसिद्धान्त, त्यांनीं घालून दिलेले आचरणाचे नियम व रखाटलेलीं ध्येयें ह्यांचा समग्र विचार करण्याची आज जरूरी नाहीं व तसें करण्यास अवकाशही नाहीं. अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याही पुस्तकांत तीं सांपडतील. त्या सर्वांच्या सामान्य लक्षणांपैकीं कांहीं मुख्य लक्षणांचा ऊहापोह करणें हें आजच्या प्रसंगाला अनुसरून आहे.

लक्षण १ लें. बुद्धाच्या सिद्धान्तांचें पहिलें लक्षण म्हणजे त्यांची अत्यंत सयुक्तिकता हें होय. आधुनिक तत्वज्ञानामध्यें ऑगस्ट कॉम्ट ह्यानें जो निश्चितज्ञानवाद (Positivism) सुरू केला, त्याचा उपक्रम गौतम बुद्धानें जवळ जवळ १५०० वर्षांपूर्वींच ह्या देशांत केला होता. एकापक्षीं अंधविश्वास, अंध कल्पना, पोकळ तर्क, रूढी अथवा आप्तवाक्याचें अवलंबन इ० मनाचे जे हीन दर्जाचे व्यापार व अन्यपक्षीं श्रद्धा, प्रेरणा, प्रतिभा इत्यादि उच्च दर्जाचे जे व्यापार आहेत, त्या दोन्हींपासून सारखेंच अलिप्त राहून तथागतानें आपले सिद्धांत स्थापित करण्याचा शक्य तो प्रयत्न त्यानें केला आहे म्हणून त्याच्या शिक्षेंत चमत्कार, गूढ तत्वें, गुप्तज्ञान वगैरेंना थारा नाहीं. इतकेंच नव्हे तर मानवी बुद्धीशिवाय ज्ञानाचीं इतर द्वारें त्यानें जणूं काय बंदच केल्यामुळें त्यांचे सिद्धांत कांहीं अंशीं नीरस आणि नैराश्यजनक भासण्याचाही

संभव आहे. पण तें कांहीं असो, इतक्या प्राचीन काळीं तथागतानें कडकडीत युक्तिवादाची इतकी शिकस्त केली हें पाहून रीस डेव्हीडसारख्या आधुनिक युक्तिवाद्यासही त्याचें कौतुक केल्यावांचून राहवत नाहीं. पण युक्तिवादाची शिकस्त करणें ह्यांतच बौद्ध सिद्धान्तांच्या पहिल्या लक्षणाची परिसमाप्ति होत नाहीं. युक्तिवाद आणि बुद्धिवाद ह्यांत पुष्कळ फरक आहे. साहजिक विचारानें एखादी गोष्ट युक्त किंवा अयुक्त दिसेल तशी ती बरी किंवा बाईट ठरविणें व त्याप्रमाणें वागणें हा युक्तिवाद होय. आणि मानवी बुद्धीच्याच द्वारें सर्व सत्याचा निर्णय करण्याचा आग्रह धरणें व मानवी बुद्धीनें ठरविलेलें तत्त्व तेंच अखेरचें सत्य मानणें हा बुद्धिवाद होय. मनुष्य स्वाभाविकपणें युक्तिवादाच्या वाह्यानें विचार करूं लागला म्हणजे सहजच त्याच्या युक्तिवादाचा परिणाम वरील बुद्धिवादांत होतो. पण तेथेंच त्याची वाढ थांबत नाहीं, तर लवकरच त्याच्या बुद्धिवादाचा विकास विज्ञानवादांत होतो. म्हणजे आपल्या बुद्धीनेंच अंतिम सत्य ठरविण्याचा आग्रह कमी होऊन अंतिम सत्य म्हणून कांहीं कायमची वस्तु आहे, तिला कशाचीही अपेक्षा किंवा अवलंब नसतां ती केवळ निर्गुण आहे, अशा प्रकारचा आग्रह वाढूं लागतो. शेवटीं निरनिराळ्या दर्शनकारांनीं ह्या 'केवला' ची किंवा 'ब्रह्माची' किंवा 'निर्गुणा' ची निरनिराळ्या रीतीनें उपपत्ति केल्यावर त्यांच्या सामान्य अनुयायी समूहामध्यें वरील युक्तिवाद, बुद्धिवाद, किंवा विज्ञानवाद हे तिन्ही मावळून जाऊन त्यांचें अखेरचें पर्यवसान जो हटवाद तो मात्र कायम राहतो. भगवान् गौतम बुद्धानें आपल्या युक्तिवादामध्यें बुद्धिवादाचाही आग्रह शिरूं दिला नाहीं. मग पुढील आपत्तिपरंपरेचा तर प्रश्नच उरला नाहीं.

युरोपांतील मध्ययुगांतील हटवादाशीं झगडण्यासाठीं प्रथम साहजिक युक्तिवादाचा उदय झाला; त्याचा विकास १८ व्या व १९ व्या शतकांतील आधुनिक बुद्धिवादांत (Rationalism) व केवलवादांत Absolutism झाला. ह्या दोन्ही वादांतील आग्रहाचा भाग तेवढा निरस्त करण्यासाठीं युरोप आणि अमेरिकेंत हल्लीं पुनः युक्तिवाद आणि व्यवहारवाद अधिक व्यवस्थित रीतीनें व नेटानें मांडण्यांत येत आहे. लंडनमध्यें शिलर आणि ड्यूवेप्रभृति, फ्रान्सांत प्रो० बर्गसन्, आणि इतालींत सिनोर पॉपिनी ह्या मंडळीनें Humanism ह्या नांवानें व अमेरिकेंतील प्रसिद्ध तत्त्ववेत्ता प्रो० वुइल्यम जेम्स प्रभृतिमंडळीनें Pragamatism (व्यवहारवाद) ह्या नांवानें वरील बुद्धिवाद आणि केवलवादाच्या उलट चळवळ करण्याचा तर अगदीं विडाच उचलला आहे. ह्या नवीन विचारक्रांतीच्या दृष्टीनें पाहतां खालील उताऱ्यावरून बौद्ध विचाराची पद्धत २० व्या शतकांतल्याप्रमाणें अगदीं ताजी होती असें दिसतें.

बॅक्ट्रिया देशांतील सागलचा राजा मिलिंद (Menander) ह्यानें नागसेन नांवाच्या बुद्ध भिक्षुला प्रश्न केला—'तुमचें नांव काय?' भिक्षूनें उत्तर केलें 'माझे आई बाप, माझे सोबती व इतर मला 'नागसेन' ह्या शब्दानें हाका मारितात; पण तेवढ्यावरून 'नागसेन' म्हणून कांहीं निराळीच वस्तु आहे असें आपण समजूं नये.'

राजा म्हणाला,—'काय! नागसेन म्हणून कांहींच वस्तु नाहीं, तर तुमच्या पापपुण्याचा अधिकारी कोण? तुह्मी मिथ्यावादी आहां' नागसेनानें राजास उलट प्रश्न विचारला,—'राजा, आपण ज्या रथांत बसून आलां तो रथ म्हणजे त्याचीं चाकें काय? जू काय? वरील छत्र काय? सारथी काय? घोडे काय? वरील ध्वज काय?' इ. ह्या सर्व बारीक प्रश्नांस राजानें नकारार्थी उत्तर दिल्यावर नागसेनानें पुनः विचारलें,—'हीं सर्व पृथक् साहित्यें रचून ठेविल्यास जो ढीग होईल तो रथ होईल काय? किंवा हीं एकत्र रचलेलीं साहित्यें काढून घेतलीं असतां मागें रथ म्हणून कांहीं उरेल काय?' ह्याही प्रश्नास राजास नकारार्थीच उत्तर द्यावें लागलें. तेव्हां नागसेनानें राजास म्हटलें 'राजा, आपणहि मजप्रमाणेंच मिथ्यावादी ठरतां.'

ह्याप्रमाणें निरर्थक आणि दुराग्रही केवलवादाच्या उलट भगवान् बुद्धाची शिक्षा होती. तें नास्तिक नव्हते, केवळ (Pragmatist) व्यवहारवादी होते. तथापि तत्कालीन ब्राह्मणांनीं व मध्ययुगांतील शंकराचार्यांनीं त्यांना नास्तिक ठरविलें. इतकेंच नव्हे; तर प० लोकवासी राजाराम शास्त्री भागवतासारख्या विचारी आधुनिकांनीं देखील

' बौद्ध धर्म म्हणजे अंधार ' अशी हूल उठवावी हें किती आश्चर्य !

लक्षण २ रें. बौद्ध सिद्धान्त ज्याप्रमाणें सयुक्तिक असून केवळ पोकळ तार्किक किंवा विज्ञानवायूनें भरलेले नसत, तर उलट निश्चित व्यवहारवादी असत, त्याप्रमाणेंच बौद्धधर्माचरणही पूर्णपणें प्रागतिक असून शिवाय उलट पक्षाशीं अत्यंत सहिष्णुतापर व सहानुभूतिपर असे. सुधारक झाला कीं तो सहिष्णु झालाच असें पुष्कळ वेळां आढळून येत नाहीं. मतानें मात्र कडकडीत प्रागतिकता मिरविणें त्यांतही केव्हां केव्हां कचरणें, पण कृतीचे वेळीं सपशेल अंग चोरणें आणि उलट केवळ आपल्या विचारसुधारणेच्या जोरावरच पुराणपक्षांशीं रणें माजविणें असलीं खोटीं सुधारक लक्षणें दुर्दैवानें इतिहासांत वेळोवेळीं आढळन येतात. बौद्ध धर्मांतील आचार अशा कोटींतला मुळींच नव्हता.

परवां चवथ्या प्रांतिक सामाजिक परिषदेची बैठक काशी येथें झाली त्यावेळीं परिषदेच्या स्वागत कमिटीच्या अध्यक्षांनीं मोठ्या अभिमानानें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील आद्य सुधारक श्री गौतमबुद्ध ह्यानें आपल्या सुधारणेच्या मंगलकार्यास ह्याच पुण्यक्षेत्रीं सुरुवात केली आणि खरोखरीच तेव्हांपासून ह्या मंगलकार्याचा ओघ आमच्या देशांत अप्रतिम वेगानें व सर्व बाजूंनीं चालला होता. स्त्रियांस पुरुषांप्रमाणेंच हक्क होते किंबहुना धर्मप्रसाराचे कामीं देखील स्त्रिया पुढाकार घेत होत्या. सिंहलद्वीपांत धर्माचा प्रसार करण्यासाठीं अशोक राजानें प्रत्यक्ष आपल्या कन्येस दीक्षा देऊन पाठविलें. पशुमेध, नरमेधादिकांचे क्रूर प्रकार, विविवेकल्याचे वेडेवेड चार आणि अशा सर्वच प्रकारच्या धर्मभ्रमाचें पटल ह्या नवीन धर्मानें दूर केलें. हिंदुस्थानांत बद्धमूल झालेल्या ज्या जातीभेदाचें निरसन करण्याचें कामीं ख्रिस्ती धर्माला, किंवा त्याहून करड्या महंमदी धर्मालाही पूर्ण यश आलेलें नाहीं, त्या जातिभेदाला आणि वर्णभेदाला श्री गौतमाच्या धर्मछत्राखालीं थाराच मिळेनासा झाला. कारण विहितधर्माचें आचरण करण्याच्या बाबतींत तथागतानें अर्धवटपणाचें किंवा अतिशहाणपणाचें अवलंबन कधींच केलें नाहीं. पण चमत्कार हा कीं जे कोणी आग्रहानें एकादी सुधारणा घडवून आणतात त्यांच्या त्या आग्रहाची धुमी एकदम पेटली म्हणजे मग तिच्यांत परपक्षविषयक सहिष्णुतेची, सहानुभूतीची किंबहुना सदयतेची देखील आहुति पडते, हें त्यांस कळत नाहीं किंवा कळलें तरी त्याची ते पर्वा करीतनासे होतात. प्रॉटेस्टंट लोकांना रोमन कॅथॉलिकांचा व प्युरिटन पंथाच्या लोकांना पूजाविषयक विधींचा व उपकरणांचा कसा तिरस्कार येतो किंवा मुसलमानांनीं धर्मसुधारणेच्या नांवानें मूर्तिपूजकांचा किती छळ केला ह्या उदाहरणावरून सुधारकांच्या असहिष्णुतेविषयीं कांहीं अंशीं तरी कल्पना करतां येईल.

बौद्धधर्माचा प्रकार असा नाहीं. स्वतः गौतमानेंच काय पण त्याच्या कोणत्याही अनुयायानें सुधारणा घडवन आणण्याच्या आपल्या आवेशाला स्वतःच्या सहिष्णुतेचा बळी दिला असल्याचें उदाहरण कोठेंच आढळत नाहीं. उलट असा प्रकार पुष्कळदां घडल्याचा उल्लेख आहे कीं, परधर्मीयांनीं तथागताकडे वादविवाद करण्यास यावें व तथागताचे विचार विनय व प्रसन्नता पाहून वादांत हार जाऊन शेवटीं त्याच्याच धर्माचा उघड स्वीकार करण्यास तयार व्हावें व अशा समयीं तथागतानेंच उलट त्यांस आपला जुना पंथ अशा उतावीळपणें एकाएकीं सोडण्याचें कारण नाहीं म्हणून त्यांतलीच चांगली बाजू त्यांना दाखविण्याचा प्रयत्न करावा. लालूच दाखवून किंवा जबरी करून केवळ आपल्या अनुयायांची संख्या वाढविण्याची प्रवृत्ति बौद्धधर्मांत कधींच नव्हती. हिंदुस्थानांत किंवा जेथें बौद्धधर्माचा प्रसार झाला आहे अशा चीन, जपान देशांत तेथील पूर्वींच्या धर्मानुयायांशीं मिळून मिसळून राहण्याचा प्रथमपासूनच कल आहे. पण ह्या अपूर्व सौम्यतेचें कारण आपला धर्म वाढला काय किंवा न वाढला काय ह्याविषयीं बेपर्वाई किंवा नेभळेपणा होता असेंही नाहीं. धर्मप्रसारासाठीं गौतमानें स्वतः जसें आपलें राज्य, तरुण भार्या आणि नूतन बालक ह्या सर्वांवर पाणी सोडलें, तसाच स्वार्थत्याग करणारे हजारों भिक्षु त्याला त्याच्या हयातींतच मिळाले आणि मागाहून त्यांची परंपरा कायम राहिली म्हणूनच एके काळीं बौद्धधर्म बहुतेक आशिया खंडभर पसरला व अद्यापि जगांतील एक तृतियांशावर लोकसंख्या

त्या धर्माची आहे, ह्याप्रमाणें मताशारखी कृति करण्याचें शौर्य, आपलें मत व आचार दूरवर पसरण्याचें वीर्य, परमत–सहिष्णुता व सहानुभूति ह्या वृत्तीचें औदार्य, इ. परस्पर भिन्न गुणांचा समावेश एका गौतम बुद्धाच्या धर्माशिवाय इतरत्र सांपडणें दुर्मिळ ह्यांत शंका नाहीं.

लक्षण ३ रें–बौद्धधर्म निश्चितवादी व्यवहारवादी आणि प्रागतिक होता ह्यावरून तो केवळ जडवादी व ऐहिक गोष्टींतच गुरफटलेला असा होता असें नव्हे. बौद्धधर्मांतील विरक्ति आणि निर्वाणविषयक अत्युच्च आध्यात्मिक आदर्श सर्वश्रुतच आहेत. बौद्धधर्मांतील प्रचारक भिक्षूंना कडकडीत वैराग्य पाळावें लागत असे. पण त्यासंबंधींही श्रीगौतमानीं मध्यमा प्रतिपत्तीचा मार्ग घालून देऊन विरक्ति किंवा विषयासक्ति ह्या दोन्हींचाही अतिरेक होऊं न देण्याची खबरदारी घेतली होती. ह्या मध्यमाप्रतिपत्तीच्या योगें बुद्धभिक्षूंना कडकडीत वैराग्य असतांही त्यांचेवर इतरत्र दिसून येणारे दुःष्परिणाम त्यांना भोंवले नाहींत. म्हणजे त्यांच्यांतील सहृदयतेच्या प्रवृत्तीचे झरे आटले नाहींत. सहृदयतेचे दोन प्रकार आहेत एक भूतदया व दुसरी सदभिरुची. भूतदया हा तर बुद्धाच्या शिक्षेचा विशिष्टगुण होय. पण ब्राह्मणाचें रक्त ढेकणांना पाजणें हा अलीकडच्या जैनधर्मांत आढळणारा अहिंसेचा प्रकार बौद्धांमध्यें नाहीं. पशुयज्ञांतील केवळ पशूंची प्राणहानि पाहूनच नव्हे तर पशूंचे जे अत्यंत हाल होत असत त्यामुळें श्रीगौतमाच्या कोमल अंतःकरणास पाझर फुटला आणि त्यांनीं सर्व प्रकारचीं हवनें व क्रूर विधि बंद केले. त्यामुळें सर्वत्र मांसभक्षण बंद झालें असें नाहीं, तरी हल्लीं भरतखंडांत जो निर्मांसाहार प्रचलित झाला आहे त्याचें बरेंच श्रेय बौद्धधर्माकडेच आहे. वैद्यशास्त्राचे शोध लावण्यासाठीं प्राण्याच्या शरीरावर जिवंतपणीं जे कठोर प्रयोग करण्यांत येतात, त्याच्या प्रतिबंधार्थ हल्लीं पाश्चात्य देशांत जोराची चळवळ चालू आहे. पण ही चळवळ करणाऱ्यांत सर्वच निर्मांसाहारी आहेत असें नाहीं. या मंडळीमध्यें जरी केवळ क्रूरता आणि क्लेशनिवारण करण्यापुरतीच अहिंसा असते, तशीच बौद्धधर्मांतही आहे. तिच्यांत हिंदूंचा सोंवळेपणा किंवा जैनांचा वेडगळपणा हीं दोन्ही नाहींत.

सहृदयतेचा दुसरा प्रकार जी सदभिरुचि ह्याविषयीं ' चीन देशांतील बुद्धधर्म ' ह्या ग्रंथाचे कर्ते रेव्ह. बील (हे चीन देशांत पुष्कळ दिवस राहिलेले खिस्ती मिशनरी आहेत, त्यांची बुद्ध धर्माविषयीं पक्षपातबुद्धि असण्याची मुळींच भीति नाहीं.) हे म्हणतात कीं, चीन देशांत बौद्धधर्मी लोकांनीं सुंदर देवळें बांधून चित्रकला आणि शिल्पकला ह्यांची मोठी अभिवृद्धि केली. तसेंच सुंदर बागांतून चित्रविचित्र नवीन फुलांची लागवड करून व त्यांचीं आपल्या उपासनमंदिरांतून नित्य आणि नैमित्तिक प्रसंगीं थाटाची मांडणी करून लोकांच्या सदभिरुचीची पुष्कळ वाढ केली.

ह्यावरून बुद्ध भिक्षु म्हणजे अलीकडच्या बैराग्याप्रमाणें सर्व संसारावर रुसलेले सदा असंतुष्ट व दुसऱ्या स्वभावाचे परावलंबी व परान्नपुष्ट होऊन गांवाबाहेरच्या घाणेरड्या धर्मशाळांतून लोळत पडलेले असे नव्हते हें सिद्ध होतें. आज सर्व हिंदुस्थानभर निर्जन गिरिकंदरांतन लहान मोठ्या गुंफा आणि लेणीं आढळतात. तीं एके काळीं उद्योगी, शांत आणि सहृदय भिक्षूंनीं गजबजलेलीं, आल्हादकारक वस्तीचीं ठिकाणें होतीं. तीं लोकवस्तीच्या अशुद्ध वातावरणापासून जरी अलिप्त असलीं, तरी खालील मैदानांत रहाणाऱ्या जनसमूहाच्या शिक्षणार्थ व कल्याणार्थ ह्या भिक्षूंच्या अविश्रांत प्रयत्नांचे जे प्रवाह वहात असत, त्यांचीं हीं ठिकाणें केवळ उगमस्थानेंच असत.

बौद्ध धर्माचे प्रचारक विरक्त आणि सहृदय असत; इतकेंच नव्हे, तर त्यांचे प्रयत्न प्रवृत्तिपर असत. ह्या प्रचारकांचा शिरोमणि जो अशोक राजा त्यानें तर अगदीं भिक्षुप्रमाणेंच निरंतर जनसेवेंत आपलें सर्व आयुष्य वेंचलें आणि आपल्या स्वतःच्या मुलांमुलींनाहीं भिक्षू केलें, त्यानें धर्ममहामात्रा नांवाचा एक नवीनच अधिकारी नेमन त्याच्याकडून आपल्या विशाल साम्राज्याच्या शिवेवर रहाण्याच्या जंगली लोकांचीही सुस्थिति आणि अभिवृद्धि व्हावी अशी तरतूद केली होती. त्यानें आपल्याच नव्हे, तर आपल्या मांडलिकांच्या व आपल्या शेजारच्या राज्यांतही मनुष्यांकरितां पशूंकरितां दवाखाने स्थापिले व अरण्यांत उपयुक्त औषधी वनस्पतींची व फळझाडं लागवड सुरू केली. जागजागीं तळीं, विहि

इत्यादि ह्मणून व वाटेनें सावलीसाठीं झाडें लावून, माणसांना व गुरांना सारखेंच सुखविलें.

## विस्तार.

ह्या वरील तीन लक्षणांनीं युक्त हा धर्म होता म्हणून जुन्या काळांत जेव्हां प्रवासाचीं साधनें आतांसारखीं नव्हतीं, तरीही त्याचा इतका प्रसार झाला. अशोकाच्या वेळींच हा धर्म सर्व हिंदुस्थानभर पसरला, इतकेंच नव्हे, तर बाहेर बॅक्ट्रिया व पार्थिया व आशियाच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत ह्याचे प्रचारक गेले. पूर्वेस सयाम, ब्रह्मदेश या देशांत, दक्षिणेस सिलोनांतही ह्याची स्थापना झाली. चीन व जपानाकडे ह्याची माहिती झाली ती प्रथम आशियांतील पश्चिम राष्ट्रांत ह्या धर्माचा जो खिस्ती शकाच्या आरंभीं प्रसार झाला होता, त्यावरून झाली. त्यावरून चीन देशाच्या मिंगही (इ० स० ५८–७६) राजानें प्रथम हिंदुस्थानांत १८ चिनी विद्यार्थ्यांना बुद्ध धर्माची माहिती करून घेण्यासाठीं पाठविलें. ते हिमालयाला वळसा घालून वायव्येकडून ह्या देशांत आले व येथील बरेच धर्मग्रंथ व दोघे भिक्षू त्यांनीं आपल्या बरोबर चिनांत नेले. त्या लोकांकडून बौद्धधर्माचा चीन देशांत झपाट्यानें प्रसार झाला व लवकरच जपान, कोरिया, मांगोलिया, सैबिरीया व तिबेट वगैरे बहुतेक आशियाचे भाग ह्यानें व्यापून टाकले.

पुढें हिंदुस्थानांत ह्या धर्माला उतरती कळा लागून तो शेवटीं बहुतेक नामशेष झाला, त्याचीं जीं कारणें आहेत, त्यांपैकीं त्या धर्माची वर सांगितलेली सहिष्णुता व सौम्यता हेंही एक कारण आहे. मुसलमानांच्या स्वाऱ्या व हिंदूंचा छळ हीं कारणें आहेतच. प्रसिद्ध चिनी प्रवासी हिंदुस्थानांत आला त्या वेळीं देखील ज्या ज्या प्रांतीं या धर्माला तेथील प्रबळ राजाचा आश्रय होता, तेथें बौद्ध धर्माइतकाच हिंदुधर्माचा जोर चालू होता, हें बुद्ध धर्माच्या अपूर्व सौम्यपणाचेंच फळ म्हणावयाचें. कान्यकुब्ज देशाचा प्रसिद्ध शिलादित्य राजा ज्यानें इ. स. ६३४ सालीं एक मोठी धर्मपरिषद भरविली, तो बुद्ध धर्माचा अनुयायी व मोठाच पुरस्कर्ता होता, तरी त्याच्या राजधानींत जसे १०० बौद्ध विहार होते, तशींच १०० ब्राह्मणधर्माचीं देवळेंहि होतीं. पुढें लवकरच कुमारिल भट्ट व शंकराचार्य ह्यांच्या चिथावणीनें (?) बौद्धांचा राजाश्रय नाहींसा होऊन घोर जुलूम व छळ सुरू झाला. व शेवटीं ह्या सात्विक व सौम्य धर्मानें आपल्या मायदेशाला कायमचा रामराम ठोकला.

## जीर्णोद्धार.

आधुनिक निरपेक्ष ओघामुळें व विचारपद्धतीमुळें ह्या धर्माचीं खरीं तत्त्वें व मोठी कामगिरी लोकांपुढें येऊन पाश्चात्य देशांत व आमचेकडेहि ह्याविषयीं बरीच सहानुभूति वाढूं लागली आहे. ज्यांच्या पूर्वजांनीं एकाद्या नवीन धर्मस्थापकावर धोंडे मारून त्याचा प्राण घ्यावा, त्यांनींच पुढें त्याचें भलें मोठें सुंदर थडगें बांधण्यास पुढें यावें हा प्रकार सर्वत्रच आहे. परवां पेशावर येथें ज्या बुद्धाच्या अस्थि सांपडल्या त्या ब्रह्मदेशांत न पाठवितां ह्याच देशांत ठेवण्याविषयीं व्हॉइसराय साहेबांना विनंति करण्याकरितां एक डेप्युटेशन गेलें होतें, तोही वरच्याचाच प्रकार. पण ह्यापेक्षां बौद्ध धर्माच्या जीर्णोद्धाराचीं अधिक महत्त्वाचीं चिन्हें अलीकडे दिसूं लागलीं आहेत. मद्रास येथील सरकारी कॉलेजांतलि प्रोफेसर नरसू ह्यांनीं बौद्धधर्मावर एक पुस्तक प्रसिद्ध करून तेथें एक संघ स्थापन केला आहे आणि तो केवळ सुशिक्षित लोकांचाच नव्हे, तर तेथील बरीच पारिया वगैरे अस्पृश्य जातीची मंडळी ह्या समाजांत आहेत. अद्यापि ह्या उद्धाराचें काम वरील सुशिक्षित व समजुतदार वर्गांतच व तेंही वाङ्मयाच्या द्वारें बरेंच व्हावयाला पाहिजे आहे. हल्लीं प्रसिद्ध पाली पंडित व बुद्ध धर्माचे तेजस्वी प्रचारक प्रो० धर्मानंद कोसंबी ह्यांच्या विद्वत्तेमुळें व परिश्रमामुळें कलकत्ता व मुंबई ह्या दोन युनिव्हर्सिटींत तरी पाली भाषेचा शिरकाव झाला आहे. ह्या बाबतींत बहुजनसमाजास सहज समजेल अशा सुलभ वाङ्मयाचा जारीनें प्रसार व्हावयाला पाहिजे. अशावेळीं धर्मानंद हे तूर्त कांहीं वर्षें अमेरिकेंत रहाणार असल्यामुळें, त्यांच्या येथील कामांत व्यत्यय आला आहे, तरी अमेरिकेंतील हॉर्वड युनिव्हर्सिटींत पाली भाषेंतील महत्त्वाच्या व कठिण ग्रंथांचें भाषांतर करण्याच्या कामींच त्यांचा उपयोग होणार असल्यामुळें जीर्णोद्धाराचें काम चालू राहीलच. एकंदरींत आतां जो बौद्धधर्माचा जीर्णोद्धार व्हावा असी आमची इच्छा आहे, तो हल्लीं इतरत्र प्रच-

लित असलेल्या त्या धर्मांच्या विधिवैकल्यांचा, टिळाटोपीचा किंवा निर्जीव आचाराचा नव्हे, तर त्या उदार तत्त्वांच्या योगें मागील काळीं मनुष्य-जातीची उन्नति झाली, त्यांचा अमच्यामध्यें पुनः उद्धार होऊन आमच्या धर्मसमजुतीस सर्व-देशीयता व आचरणाला अधिक उज्ज्वलता येवो इतकीच इच्छा आहे.

## समाजसेवेचीं मूलतत्त्वें.

( सोमवार ता. ५ आगस्ट १९१२ रोजीं मुंबई येथील समाजसेवासंघा (Social Service League) मार्फत प्रार्थनासमाजाच्या दिवाणखान्यांत रे. डॉ. मॅकिकन यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या व्याख्यानाचा सारांश. )

अध्यक्षसाहेब, भगिनींनो व बंधुजनहो, प्रथम मराठींतच बोलण्याचा आग्रह धरल्याबद्दल मला आपली माफी मागितली पाहिजे. माझ्या आईच्या भाषेंत, देशाच्या भाषेंत बोलतांना मला साहजिकच घरांत असल्याप्रमाणें मोकळें वाटतें. परंतु यामुळे आपणांपैकीं ज्यांची मराठी ही मायभाषा नसेल त्यांची गैरसोय होणार आहे. विशेषत: या बाबतींत अध्यक्षांची मला माफी मागितली पाहिजे, तथापि अध्यक्षसाहेबांस मीं मराठींत जोरदार शुद्ध भाषेंत उपदेश करितांना ऐकिलें आहे. असो. इंग्रजीसारख्या जगन्मान्य भाषेचा प्रसार करणें हें जसें समाजसेवेचें अंग आहे, तसेंच किंबहुना अधिकच देशी भाषेला उन्नत स्वरूप देणें हेंही समाजसेवेचें एक अंग आहे. शिवाय तरुणपणीं परकी भाषेंतून व्याख्यान ऐकतांना विचारापेक्षां भाषेकडे अधिक लक्ष जातें. फ्रान्समध्यें असतांना, फ्रेंच भाषेंतील व्याख्यान अर्थ कळल्याशिवाय ऐकणें मला गोड वाटलें. परकी भाषा गोड लागते म्हणून ती ऐकण्याची चटक लागते, ही चटक नको. भाषेपेक्षां विचाराकडे लक्ष पाहिजे.

आजचा विषय आपल्या राष्ट्रांत नवीन आहे. इंग्रजी जाणणारांना तो थोडा फार अवगत आहे. परंतु निव्वळ मराठी जाणणारांना तो केवळ अपरिचित आहे. पाश्चात्य देशांतही हा विषय नवीनच आहे. भूतदया, प्रेम या कल्पना फार जुन्या आहेत. परंतु समाजसेवेची कल्पना नवीन आहे. आधुनिक दिशेनें संघटित पायावर प्रयत्न करण्याची कल्पना नवीन आहे. आपल्याकडील सर्व चळवळी आपण नवीन उमेदवारासारख्या करितों. आपणास त्यांबद्दल उमेद असते. राजकीय चळवळींतसुद्धां नवशिकेपणा दिसतो. फुरसुतीच्या वेळीं कालक्षेपार्थ सार्वजनिक गोष्टींत मन घालणें वगैरे लक्षणें नवशिकेपणाचींच म्हटलीं पाहिजेत. नुकताच मी कर्नाटकांत लोकांची मदत मागावयास गेलों होतों, त्यावेळीं अपेक्षेप्रमाणें मला पैसे मिळूं शकले नाहींत. कारण म्युनिसिपल निवडणुकींत मतें मिळविण्यासाठीं पुष्कळांनीं दोन तीन हजारांपासून दहादहा हजारांपर्यंत रुपये आगाऊ खर्च केले होते. व्यापार केला, उद्योग केला, पैसे मिळविले म्हणजे मग म्युनिसिपालिटींत जाण्याची अहंमहमिका उत्पन्न होणें हें उमेदीचें लक्षण आहे. परंतु मतें मिळविण्याकरितां जो उत्साह व जो पैसा खर्च होतो,त्या मानानें निवडून आल्यावर उत्साहानें काम केल्याचा अनुभव क्वचित्‌च येतो.

राजकीय चळवळींत सुद्धां जर ही उमेदवारी, मग समाजसेवेंत काय ? केवळ अनुकरण निराशेचे उद्गार काढण्याचा माझा हेतु नाहीं. हल्लींच्या लहानसहान प्रयत्नांचेंही कौतुक केलें पाहिजे. मूल प्रथम चालूं लागलें म्हणजे आई त्याला पाय पाय सोन्याचे पाय म्हणून त्याचें कौतुक करीत असते. आपले हल्लींचे पहिले धडेही सोन्याचीं पावलें होत, तथापि हें विसरतां कामा नये कीं ह्या सोन्याच्या पावलांना धडधाकट माणसाच्या चालीची कधींही सर येणार नाहीं.

समाजसेवा ही सामाजिक सुधारणे (Social Reform) हून थोडी भिन्न आहे. समाजसत्तावादा (Socialism) हूनही ती भिन्नच आहे. ही कल्पना, भावना नवीन असल्याचें आपणांस सांगितलेंच आहे. ही भावना असली तरी आमच्या या जरठ देशाला पाश्चात्यांपेक्षांही तिची अधिक जरुरी आहे. कारण आमच्या या म्हाताऱ्या देशाला तरुणांचीं व्यसनें जडत चाललीं आहेत. एकपक्षीं खेड्यापाड्यांतून दोनतीन हजार वर्षांच्या जुन्या, दुष्ट चालींचा रोग जडलाच आहे. व दुसरे पक्षीं मुंबई कलकत्त्यासारख्या शहरांत पाश्चात्य देशांतील संकटें व व्यसनें भरपूर प्रमाणांत दिसं

लागलीं आहेत. मिळून आपल्याकडे दुहेरी संकटें आहेत. मद्यपानाचें संकट नवीन आहे. वेदांत मद्यपान नाहीं असें माझें म्हणणें नाहीं. मी कांहीं वेदाचा आग्रही, अभिमानी नाहीं. आगगाड्या, तारायंत्रांप्रमाणें दारूही वेदांत आहे. आज आगगाडींत, दारूमक्तेदाराकडे नोकर असलेल्या एका माणसाची गांठ पडली, मद्यपाननिषेधाचा उपदेश करणाऱ्यांकडून मिळणें कठीण, अशी माहिती त्याच्याशीं झालेल्या संभाषणांत सहज मिळाली. तो स्वाभाविक अभिमानानें आपल्या व्यापाराचें वर्णन करीत होता. तो म्हणाला,–' आमची मोठी कंपनी आहे. कांहीं नाहीं तरी २० लाख रुपये भांडवल आमचें या धंद्यांत गुंतले आहे. ग्वाल्हेर, भोपाळ हैदराबाद, कोल्हापूर,कुलाबा, रत्नागिरी, ठाणें वगैरे अनेक ठिकाणीं आमचें हें भांडवल गुंतलेलें आहे. आमच्या कंपनींत किती तरी मोठमोठ्या किताबांची मंडळी आहेत. इंग्लंडांतदेखील त्यांचें वजन आहे. ' अशा या किताबांच्या वजनदार, सुशिक्षित सुधारलेल्या, मिळालेल्या पैशाचा अगदीं नवीन पद्धतीनें उपभोग घेण्याचें ज्ञान असलेल्या, अर्थ संपादनेच्छु मंडळीच्या हातांत हा व्यापार आहे तो कायदेशीर रीतीनें होत असतो. या बलाढ्य मंडळीपुढें मद्यपाननिषेधकांचा काय टिकाव लागणार ! अमेरिकेंतील ट्रस्टीप्रमाणें आमच्या इकडील हें मद्यपानाचें संकट अनिवार्य झालें आहे. जुनीं संकटेंही आहेतच. दोन दोन हजार वर्षांचे संकटाचें ढुरे आमच्या ह्या जुन्या देशात साठवून ठेविलेले आहेत. तेव्हां समाजसेवेची भावना नवीन असली तरी तिची जरुरी अत्यंत आहे.

आज व्यावहारिक बाजूपेक्षां उपपत्तीच्या मीमांसेच्या दृष्टीनेंच मी या विषयाचा विचार करणार आहें.

समाजसेवासंघ ( Social Service League ) कांहीं आजच बंद होत नाहीं. तेव्हां व्यावहारिक बाजू सांगण्याचे पुढें प्रसंग येतीलच. प्रथम व्याख्या, नंतर व्याप्ति, नंतर विभाग पाहूं. अगोदर सेवेचा विचार करूं. सेवेमध्यें काय काय अंतर्भूत होतें ? प्रथम प्रेम, पण नुसतें प्रेम म्हणजे सेवा नाहीं. प्रेम हजार मैलांवरूनही करितां येतें. सेवा होण्यास प्रेम असून शिवाय ( २ ) प्रयत्नही पाहिजे. तथापि एवढ्यानेंही बरोबर सेवा होत नाहीं. प्रेम व प्रयत्न असून शिवाय ( ३ ) प्रयत्नांत सातत्यही पाहिजे. ही सेवा झाली. पण आपला आजचा विषय समाजसेवा अथवा सामाजिक सेवा हा आहे. भूतदयेचीं कामें करणें, पाणपोई ठेवणें,झाडें लावणें वगैरे व्यक्तिविषयक सेवेंत येतात.वस्तुतः ती सेवेंत येतच नाहींत.व्यक्तिविषयक सेवेपेक्षां सामाजिक सेवा भिन्न आहे. सामाजिक सेवा म्हणजे संघटनेनें बद्ध झालेल्या समुदायानें समाजाची, प्रेम, प्रयत्न, व सातत्य यांचे योगानें चालविलेली सेवा म्हणजे सामाजिक सेवेला समुदाय पाहिजे, संघटना पाहिजे, आदर्श पाहिजे. एकंदरींत समाजसेवेला पांच अंगांची जरुरी आहे. ( १ ) प्रेम, ( २ ) प्रयत्न, ( ३ ) सातत्य, ( ४ ) समुदाय व ( ५ ) संघटना व शिवाय आदर्शही पाहिजे.

प्रथम प्रेम म्हणजे काय ? प्रेमाच्या कल्पनेचा खिस्ती धर्मांत चांगला विकास पहावयास सांपडतो. आपल्याकडेही प्रेमाची कल्पना आहे, परंतु तिची उत्क्रांति चांगली झालेली नाहीं. निदान त्या उत्क्रांतीचा इतिहास तरी उपलब्ध नाहीं. केव्हां केव्हां आमची प्रेमाची कल्पना ' अवघे देखे जन ब्रह्मरूप ' या उच्च कोटीला पोहोंचते. परंतु या भावनेचा आपलेकडे व्यवस्थित विकास झालेला दिसत नाहीं. तेव्हां आपण खिस्ती धर्मांतील या कल्पनेचा विकास पाहूं. प्रथम पांचव्या शतकांतील सेंट ऑगस्टिन यांच्या प्रेमांत वैराग्य कडकडीत दिसतें. ईश्वरांत पूर्ण लय व्हावा म्हणून बाह्य जगताविषयीं वैराग्य. यानंतरच्या सेंट बर्नार्ड यांच्या प्रेमांत वैराग्य नव्हतें असें नाहीं. परंतु खिस्तावरील प्रेम व पूज्यबुद्धि त्यांत अधिक स्पष्ट दिसून येत होतीं. त्यानंतर प्रेमाची तिसरी अवस्था सेंट फ्रान्सिसमध्यें दिसून येते. सेंट फ्रान्सिस यांनीं दुःखरूपी लोखंडाला सुखरूपी सुवर्ण केलें. गरीबांत जाऊन गरीब व्हावें, दीनांत दीन बनावें; व पाप्यांत जाऊन त्यांनीं पाप कां केलें हें पाहावें अशी त्यांची वृत्ति होती. या तिन्ही पायऱ्यांपेक्षां प्रेमाचा पूर्ण विकास सांप्रतचे मुक्तिफौजेचे उत्पादक जनरल बूथ यांचे ठायीं दिसून येतो. त्यांचे अंगावर तुम्हांस फाटक्या छाट्या दिसावयाच्या नाहींत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वैराग्याचें बाह्य चिन्ह कांहींच दिसावयाचें नाहीं. त्यांच्यामध्यें

तुम्हांला अखंड धडपड, चळवळ, प्रवृत्ति दिसून येईल. सारांश, प्रेम म्हणजे उत्साह, उदासीनता नव्हे, प्रेम म्हणजे प्रवृत्ति, निवृत्ति नव्हे, प्रेम म्हणजे जीवन, जीवनाचा कंटाळा नव्हे; सेंट ऑगस्टिनमध्यें प्रेमाच्या भावनेचा उद्भव दिसतो. जनरल बूथ यांचे ठायीं तिचा पूर्ण विकास दिसतो. वैराग्याऐवजीं म्हणजे जीवनाच्या कंटाळ्याऐवजीं 'तुका म्हणे गर्भवासीं सुखें घालावें आम्हांसी' असें वाटलें पाहिजे. प्रेमाच्या भावनेचा—मैत्रीच्या भावनेचा पूर्ण विकास आपल्याकडे आपणांस बुद्ध भगवानांचे ठायीं झालेला दिसून येतो. त्यांनीं जें मैत्रीचें जीवन स्वीकारिलें, तें असें कीं, तें पाहूनच लोकांनीं बुद्धधर्मी व्हावें. प्रेम ही मनोवृत्ति स्वयंभु अहेतुक आहे. प्रेम ही कामना आहे. आत्म्याचें प्रसरण आहे. निष्काम प्रेम हा शब्दच मला कळत नाहीं, माझे मगजांत शिरत नाहीं. आपण प्रेम करितों तें आपण सुखी व्हावें म्हणून नव्हे, जग सुखी व्हावें म्हणूनही नव्हे, तें स्वयंभू आहे, निर्हेतुक आहे आहे. मातीच्या देहामध्यें प्रेमाची लहर, आत्म्याची स्वतंत्रता किंबहुना त्याचें अस्तित्वही दाखवितें. बर्गसन् आपल्या Matter and memory या ग्रंथांत मेमरी- स्मरण—शक्तीवरून आत्म्याची उपपत्ति लावितात. प्रेमावरूनही आत्म्याची उपपत्ति लावितां येईल. प्रेम हें मातीचें कार्य नव्हे, जड जग-मृण्मय जग—याचें उत्क्रमण किंवा विकसित स्वरूप हें नव्हे. प्रेमाचा तरंग—लाट पाहिल्याबरोबर दुसऱ्याच जगाचा—आत्मिक जगाचा प्रत्यय वाटतो, त्याचेंच हें स्वरूप.

अशा या प्रेमास प्रयत्नाची व सातत्याची जोड मिळाली म्हणजे सेवा झाली व समुदायानें ती संघटनेनें अमलांत आणण्यास सुरुवात केली म्हणजे ती समाजसेवा झाली. आपल्या समाजसेवेंत हीं सर्व मूलतत्त्वें आहेत कीं एकादे कमी अथवा कमजोर आहे याचें नेहमीं निरीक्षण ठेविलें पाहिजे, उणीव दिसली कीं ती लगेच भरून काढिली पाहिजे.

ज्या सुधारलेल्या आहेत, सुशिक्षित आहेत, विशिष्ट उद्देशानें प्रेरित झाल्या आहेत अशा सद्यःकालीन शेकडा विभूति आहेत. त्यांच्या योग्यतेचें परिमाण ( Quantity ) घ्यावयाचें नाहीं. गुणदृष्ट्या विचार करावयाचा.

अशा विभूतींकरितां सुद्धां समाजसेवेची जरूरी आहे. मात्र ती भिन्न प्रकारची पाहिजे. रानटी माणसांस नियमन, नियंत्रणा, प्रेमयुक्त नियंत्रणा पाहिजे व विभूतींस बाह्य स्वातंत्र्य पाहिजे. कारण त्यांचे ठिकाणीं साधनसंपत्ति भरपूर असते. त्यांस फक्त स्वातंत्र्याची हवा पाहिजे. रेशमाच्या किड्यांप्रमाणें त्यांस आपल्याभोंवतीं स्वातंत्र्यरूपी कोश बनवूं दिले पाहिजेत. रानटी लोकांस याविरुद्ध नियंत्रणा पाहिजे. त्यांचें राज्य घ्यावें, त्यांजवर राज्य करावें, त्यांस सुधारणेच्या चक्रांत आणावें, ही युद्धाची चांगली बाजू आहे. त्यांच्यांतही साधनसंपत्ति बीजरूपानें असते. ती मारतां कामा नये. साधक-बाधक विचार करून त्यासही केव्हां केव्हां मोकळें सोडावें लागतें.

हीं दोन्ही टोंकें अपवादक आहेत. बाकी मुख्य मोठे दोन वर्ग राहिले. एक बहुजनसमाज व पांढरपेशे, हे वर्ग या दोन टोंकांच्या अनुक्रमें जवळ जवळ आहेत. तेव्हां बहुजनसमाजास नियंत्रणा अधिक हवी व पांढरपेशांस स्वातंत्र्य अधिक हवें. समाजसेवेची व्याप्ति सर्व मनुष्यजातीएवढी आहे. भूतदयेचा व्याप फारच मोठा आहे. त्यांत पशुपक्ष्यांचाही समावेश होतो आपल्या आजच्या विषयास सर्व मनुष्यजातीइतकें मर्यादित स्वरूप बस्स आहे. ह्यापेक्षां कमी व्याप्ति मात्र चालावयाची नाहीं. राष्ट्र, जात वगैरे कांहीं एक तिच्या आड येतां उपयोगाचें नाहीं. व्यावहारिक सोईसाठीं पाहिजे तर हिंदुस्थान, मुंबई, गिरगांव, असें तिचें क्षेत्र मर्यादित करा. परंतु उपपत्तीच्या दृष्टीनें तें क्षेत्र आकुंचित होतां कामा नये. व्याप्तीस विघातक होत असेल, एका भागाचें हित करितांना दुसऱ्याचें अहित होत असेल, तर ती समाजसेवा नव्हे. इतरांच्या आड न येतां प्रयत्न केला पाहिजे, आतां एकाच संघाला हें सर्व करितां येणार नाहीं हें उघड आहे. आतां या व्याप्तीचे मनुष्य प्राण्याचे विभाग करूं:—

( १ ) जवळ जवळ जनावरांप्रमाणें असलेलीं जंगली व रानटी माणसें. यांस मनोवृत्ति आहे, मेंदु आहे, परंतु त्यांची उत्क्रांति झालेली नाहीं.

( २ ) साधारण सुधारलेल्या देशांतील बहुजनसमाज.

( ३ ) पांढरपेशा वर्ग.

( ४ विभूति—विभूति म्हणजे अकबर, ज्युलियस, प्रसिद्ध कवि गटे अशीं मोठीं माणसेंच व्यावयाचीं नाहींत, तर ज्यांच्यांमध्यें कांहीं विशेष गुण आहे, ज्यांच्याकडून कांहीं तरी असाधारण कार्य घडत आहे त्या विभूतीच समजाव्या. वरिष्ठ जातींस अधिक स्वातंत्र्य हवें आहे. केव्हां केव्हां हें स्वातंत्र्य कायद्यानें मागावें लागतें. बहुजनसमाजास अथवा मागासलेल्या वर्गास नियंत्रणा अधिक पाहिजे आहे. उदाहरणार्थ, अशी नियंत्रणा असल्यामुळेंच खालील जातींत मद्याचा खप बेताल होऊं लागला आहे. मजुरी मिळूं लागून पैशाचा पुरवठाही होत आहे. या वर्गास पैसे जवळ झाल्यास त्याचें काय करावें हें माहीत नसतें. व्याजाचा विचार शिवलेलाच नसतो. खिशास पैशाचें ओझें होऊं लागलें म्हणजे त्यांनीं काय करावें ? अर्थात् जवळच असलेल्या मद्याच्या पुरवठ्याकडे त्यांची नजर वळते. परळपासून माटुंगा रोडकडे जाण्याचा रस्ता आहे, त्यानें मी जात होतों. त्या निर्जन भागाची शोभा पहात जातांना मला मध्यंतरीं एकच घर दिसलें. हें घर कसलें होतें ? दारूचा गुत्ता. गुत्यांत विजेचे पंखे ठेवणें गाणीं म्हणण्याची व्यवस्था ठेवणें वगैरे सर्व चातुर्याच्या युक्ति सुधारलेले सुशिक्षित मक्तेदार विसरत नाहींत ! तेथें किती उपदेश केला, पिकेटिंग केलें, तरी काय होणार ? या कामास नियंत्रणाच पाहिजे. ती ज्यांचे हातीं आहे त्यांनीं तिचा उपयोग करून पहावा. तिच्या अभावीं आज आपण निदान प्राव्हिडेंट सोसायटीज तरी काढल्या पाहिजेत. मुळाशीं उपचार केले पाहिजेत. नुसत्या हस्तपत्रकांचा काय उपयोग होणार? गुत्यांत सुंदर गाणीं ऐकूं येत आहेत, तोंपर्यंत वेदापासून तों केसरीपर्यंतचे, उतारे एकत्र करून नुसतीं हस्तपत्रकें वांटून काय होणार ? करितां ज्यांचे हातीं सत्ता आहे त्यांच्याशीं सहकार्य झालें पाहिजे. राज्यकर्ते व धर्मार्थ समाजसेवा करणारे यांच्यांत सख्य पाहिजे, नाहींतर तंटे होतील. नवीन संकटें उत्पन्न होतील. तथापि हें सर्व करीत बसणें हें त्यांचें काम नाहीं. त्यांनीं काय काय करावें ? त्यांच्या नियंत्रणशक्तीचा फायदा घेतला पाहिजे. त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे. त्यांनींही विश्वास ठेवण्यांत मागेंपुढें पाहूं नये. ते येथीलच मीठ खातात. तेव्हां त्यांजवरही जबाबदारी आहेच. या समाज—सेवेच्या कल्पना ज्या दिशेकडून येत आहेत, तिकडूनच सिव्हिल—सर्व्हंट येतात कीं नाहीं? तेव्हां संगनमत होण्यास अडचण पडणार नाहीं.

पांढरपेशा वर्गास फक्त अधिक स्वातंत्र्य पाहिजे. नवीन विचार पाहिजेत. नवीन आदर्श पाहिजेत. त्यांस सामाजिक सुधारणा पाहिजे. ती आपणांस परिचितच आहे. तेव्हां अधिक सांगावयास नको.

अशा तऱ्हेच्या विषयासंबंधानें आपण नवीन नवीन माहिती जमविली पाहिजे दुसऱ्या देशांतील चळवळींचा व अडचणींचा इतिहास समजून घेतला पाहिजे. पण आधीं मीमांसा व नंतर माहिती.

समाजसेवेचें महत्त्व समजण्यास नुसत्या अशा व्याख्यानांचा फारसा उपयोग नाहीं, व्यक्तींचें दर्शन झालें पाहिजे. संस्थेचें कामच पाहिलें पाहिजे. या विषयावर इंग्रजींत पुष्कळ पुस्तकें आहेत, तीं वाचल्यास पुष्कळ फायदा होईल.

पाश्चात्यांकडेही ही चळवळ नवीन असल्याचें सांगितलेंच. इंग्लंडांतील पहिली ' धर्मादायांची संघटना करणारी संस्था ' सन १८६९त स्थापन झाली. अमेरिकेंत पहिली संस्था १८९८ त निघाली. आतां त्यांचें काम झपाट्यानें चाललें आहे. १९०७ मध्यें प्रथम एका गांवीं एका शाळेंत या विषयाचें खास शिक्षण देण्यास सुरवात झाली. १९१० मध्यें अमेरिकेंतील जवळ जवळ बहुतेक शाळांत या विषयाच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली. आपल्याकडे आज शाळा न निघाल्या, तरी तुम्ही निदान त्यांवरील पुस्तकें वाचा. निदान त्यांचे मथळे वाचा. सामान्य ज्ञानाचा आतां थोडा वीट येऊन विशेष ज्ञानाकडे विशिष्ट विषयांच्या ज्ञानाकडे आपण वळलें पाहिजे.

---

## ब्राह्मधर्म व ब्राह्मसमाज.

( रविवार ता. २१—५—११ रोजीं कोल्हापूरच्या ब्राह्मसमाजाच्या वार्षिकोत्सवामध्यें दिलेलें व्याख्यान.)

एकाद्या वृक्षाची साल आणि त्याचा गाभा यांच्यामध्यें परस्पर जो संबंध आहे, तोच संबंध

ब्राह्मसमाज व ब्राह्मधर्म यांमध्यें आहे. वृक्षाच्या सालीमध्यें कालांतरानें फेरफार होतो; पण गाभा तोच असतो. ह्याप्रमाणें ब्राह्मसमाजाचें जरी रूपांतर होणें शक्य असलें, तरी ब्राह्मधर्म हा सनातनच राहणार. म्हणून त्याचीं तत्त्वें काय आहेत हें आपण प्रथम पाहूं.

प्रथम तत्त्व, मोकळा विश्वास हें आहे. ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यामध्यें बुद्धि अथवा विवेक म्हणून एक शक्ति आहे, त्याचप्रमाणें त्याच्यामध्यें श्रद्धा अथवा विश्वास अशी एक शक्ति आहे. विश्वास असावयास पाहिजे; असें आमचें म्हणणें नाहीं; पण तो प्रत्येक व्यक्तीमध्यें कमी अधिक मानानें असतोच, असें आमचें म्हणणें आहे. आणि ह्यासंबंधाची ब्राह्मधर्माची पहिली आज्ञा अशी आहे कीं, तो विश्वास मोकळा ठेवावा. त्याला कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध अथवा दडपण असूं नये. कांहीं स्वाभाविक कारणांनीं आपला विश्वास कमी होत असेल, किंवा नष्ट होत असेल, तर तसें होऊं द्यावें; पण अन्य कांहीं कारणानें नवीन विश्वास उत्पन्न होत असेल किंवा जुना दृढ होत असेल तर तें मात्र होतां देऊं नये असं म्हणणें कांहीं मोकळ्या विश्वासाचें लक्षण नाहीं. विश्वासास दोन्ही बाजूंनीं मोकळें ठेविलें पाहिजे त्याच्या जाण्याच्या किंवा येण्याच्या मार्गावर कसलेंही कृत्रिम दडपण ठेवणें हा अधर्म होय, कारण ज्या अर्थी विश्वास ही आपली एक नैसर्गिक उपजत देणगी आहे त्या अर्थी तिला इतर कृत्रिम उपायांचा जरूरी नाहीं, इतकेंच नव्हे, तर तिला त्यांची बाधा न होऊं देणें हें आपलें कर्तव्य आहे.

दुसरें तत्त्व, वाढतें ज्ञान हें होय. आम्ही आपलें वाढणारें आहे कीं नाहीं याची नेहमीं खबरदारी घेतली पाहिजे. अद्वैतवाद्यांचा अद्वैत सिद्धांत हें वाढतें ज्ञान नव्हे; जें आहे तें एकच तत्त्व आहे असा एकदां मनाचा ग्रह झाला का मनाची गतीच खुंटली असें होतें. पुढें जाणावयाचें तें काय आणि नेणावयाचें तें काय! या कारणामुळेंच ब्राह्मधर्मानुयायांच्या पसंतीस अद्वैतवाद उतरत नाहीं. एरवीं ब्राह्मसमाज अद्वैतवादी आहे किंवा द्वैतवादी आहे याची चर्चा करण्याच्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. नित्य नवे नवे जे अनुभव येतात आणि शोध लागतात. त्यांची किंमत नाहींशी करून टाकणारा अद्वैतवाद ब्राम्ह्यांस रुचत नाहीं. कारण व्यक्तीस येणाऱ्या ह्या एकाद्या लहानशाहि ताज्या अनुभवाची किंमत शिळ्या अद्वैतवादापेक्षां मोठी आहे. येणेंप्रकारें प्रत्येक व्यक्तीस जे अनुभव येतात आणि तत्कालीन मनूमध्यें जे भोंवतालीं नानाप्रकारचे शोध लागतात, त्या सर्वांचा सुसंस्कार त्या व्यक्तीच्या मनावर होऊन अखेरीस तिला जी पूर्ण प्रज्ञा प्राप्त होईल ती देखील प्रगमनशीलच असणार. याशिवाय ज्ञानाची इतर कोणतीही स्थिति ब्राह्मांस संभवनीय दिसत नाहीं. ज्याप्रमाणें विश्वास मोकळा ठेवण्यांत, त्याचप्रमाणें ज्ञान वाढतें ठेवण्यांतही ब्राह्मांस कोणत्याही प्रकारचा धोका दिसत नाहीं. उलट ही त्याचीं आवश्यक कर्तव्यें आहेत.

तिसरें तत्त्व शुद्ध प्रीति हें होय. "ऐशी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रीति" या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें आपली प्रीति लाभावीण असली पाहिजे. शुद्ध प्रीति नुसती लाभावीण असते, एवढेंच नव्हे, तर ती आणि तिचा विषय यांच्यामध्यें स्थळ आणि वेळ यांचें कोणतेंच अंतर राहूं शकत नाहीं. सर्व विश्वाचे आपण मध्यबिंदु होऊन सर्वांवर आपण प्रीति करूं लागतों. याप्रमाणें निरंतर आणि निर्लोभ प्रेम ब्राह्मधर्माचें तिसरें अवश्यक लक्षण होय.

चवथें लक्षण सात्त्विक सेवा होय. वरील प्रेमाच्या योगें सेवा करीत असतांना मनास कोणत्याही प्रकारें निराशा आणि शीण होण्याचा संभव नसतो. आजपर्यंत केलेले प्रयत्न केले नसते तर बरें झालें असतें, असें म्हणण्याची पाळीच येत नाहीं. कारण ही सात्त्विक सेवा करीत असतांना प्रतिक्षणीं आनंदच होत असतो. तो आनंद पुढें कधीं तरी व्हावयाचा आहे असें नसतें, शिवाय पदोपदी अधिक सेवा करण्याची शक्ति वाढतच जाते. म्हणून ही सात्त्विकसेवा असें म्हटलें आहे.

येणेंप्रमाणें सारांशरूपानें ब्राह्मधर्माचें स्वरूप आहे. या धर्माची संस्थापना राममोहन राय यांनीं केली असें म्हणतां येत नाहीं. यावर वेळोवेळीं जीं कांहीं अनिष्ट वेष्टणें पडत आहेत, त्यांचें निराकरण करून हीं तत्त्वें अधिक उज्ज्वल करण्याचा नवीन प्रारंभ राममोहन राय यांनीं सन १८३१ सालीं केला. पण वर सांगितल्याप्रमाणें झाडांतील गाभ्याच्या

संरक्षणासाठीं ज्याप्रमाणें सालीची जरूरी आहे, त्याचप्रमाणें या सनातन तत्त्वांचा योगक्षेम चालू ण्यासाठीं नवीन रचनेची आणि पद्धतीची जरूर आहे. त्याचें नांव ब्राह्मसमाज आणि त्याची स्थापना राममोहन राय यांनीं केली. मनुष्याच्या अंतःकरणामध्यें स्वाभाविकपणें वागत असलेल्या वरील ब्राह्मतत्त्वांची उघाडणी आणि विकास व्हावा म्हणून अशा समाजाचा देशोदेशीं, प्रांतोप्रांतीं, आणि गांवोगांवीं प्रसार करणें आवश्यक आहे, तसा समाज या कोल्हापूर शहरांत स्थापन होऊन हा वार्षिकोत्सव साजरा करण्यांत येत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. तथापि ब्राह्मधर्माच्या सनातनपणांत बाधा येत नाहीं. यद्यपि सालीमुळें गाभ्याला वेष्टण पडून त्याच्या स्वतंत्रपणास बाधा येते, किंबहुना सालीच्या दोषामुळें गाभ्यावर विकारहि घडतो, तथापि सालीशिवाय गाभ्याची स्थिति आणि वाढ शक्य नाहीं म्हणन सालीचें महत्त्व लक्षांत आणलेंच पाहिजे. पण एकादें जुनाट झाड आंतून पोकळ होऊन नुसती वरील साल मात्र रहाते आणि असें झालें असतां तें केव्हांतरी जसें खालीं गळून पडलेंच तशीच निरनिराळ्या काळीं या धर्मपंथांची वाट लागते हें आपण विसरूं नये. या नियमास ब्राह्मसमाजही अपवाद होणार नाहीं. कालांतरानें ब्राह्मधर्मांचीं जीवनतत्त्वें हल्लींच्या समाजांतून नाहींशीं झालीं तर अन्य रीतीनें त्याच्यावर निराळें नवीन वेष्टण येईल, पण ब्राह्मधर्माचा मनुष्यजातींतून अजीबात नायनाट होणें नाहीं.हा शाश्वतसंबंध ध्यानांत ठेवूनच समाजाचा ठिकठिकाणीं प्रसार करण्याचें काम प्रत्येक ब्राह्मानें करावयास पाहिजे. सर्व हिंदुस्थानभर किंबहुना जगभर ब्राह्मसमाजाचा विस्तार झाला, पण त्यामध्यें प्रत्यक्ष ब्राह्मधर्माचाच जर अवशेष राहिला नाहीं, तर रानांतल्या झाडाच्या जुन्या ढोलक्याप्रमाणें या समाजाची स्थिति होईल व त्याचें महत्त्व सर्पणापेक्षां जास्त उरणार नाहीं हें जरी खरें आहे, तरी सनातन ब्राह्मधर्मतत्त्वांची वाढ या किंवा अशा समाजाशिवाय होणें केवळ अशक्य आहे. समाजदोषानें तत्त्वें थोडींबहुत दूषित होणारच, आणि शेवटीं समाजाचा अजीबात लयही होणार, असें असतांही समाजाशिवाय धर्मतत्त्वांस गत्यंतर नाहीं हें जाणून प्रत्येक ब्राह्मानें आपल्या समाजाचा योग्य अभिमान राखून ह्याचा सतत योगक्षेम चालविणें जरूर आहे. आपलें कलेवर कधींतरी विलयाला जाणार, आत्मा अविनाशी आहे, कलेवराची बाधा आत्म्याला होते, या गोष्टी कितीही खऱ्या असल्या म्हणून आम्हीं आपल्या शरीराची जोपासना करणें सोडून देणें हें जसें मूर्खपणाचें आणि घाताचें होणार आहे तसेंच आपल्या समाजाविषयीं उदासीन रहाणें हेंही आत्मघातकीपणाचें होणार आहे. समाजाची खटाटोप सोडून देऊन सनातन ब्राह्मतत्त्वाचें आचरण करूं पाहणारी एकादी ब्राह्मव्यक्ति अन्नपाणी वर्ज्य करून मोक्षास जाऊं इच्छिणाऱ्या बुद्धिभ्रष्टाप्रमाणेंच आहे असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. त्याचें जीवित ज्याप्रमाणें एक दोन दिवसांतच बंद पडेल, त्याचप्रमाणें या ब्राह्मव्यक्तीचेंही ब्राह्मधर्माचरण अल्पकाळांतच नष्ट होईल.

---

## एकनाथ व अस्पृश्य जाती.

( श्रीमत् चोखामेळा याची पुण्यतिथि साजरी करण्याकरितां माजगांव नेसबिट रोड मुंबई येथील रा. कोंडाजी रामजी मास्तर यांच्या घरासमोर रविवार ता० ५ जून १९१० रोजीं सायंकाळीं पनवेलचे अस्पृश्य जातीचे सुभेदार मेजर बहादूर, *गंगारामभाऊ* ऑनररी मॅजिस्ट्रेट यांच्या अध्यक्षतेखालीं "अस्पृश्य जातींच्या स्त्रीपुरुषांच्या मोठ्या जाहीर सभेपुढें दिलेलें व्याख्यान.)

आज आपण सर्वजण येथें श्रीचोखोबाची पुण्यतिथि साजरी करण्याकरितां जमलों आहोंत. नामदेवांनीं म्हटलें आहे.

॥ शालिवाहन शकें बाराशें साठ ॥
॥ प्रमाथे नाम स्पष्ट संवत्सर ॥
॥ वैशाख वद्य पंचमी सुदिना ॥
॥ गुरुवारीं प्रयाण करी चोखा ॥

चोखोबा हे मंगळवेढ्याला गांवकुसू बांधण्याला गेले असतां अंगावर भिंत पडून चिरडून मेले. श्री विठ्ठलानें नामदेवास त्यांच्या अस्थि आणण्यास सांगितलें तेव्हां त्या इतर अस्थींतून कशा ओळखाव्या असें त्यांनीं विचारलें. ह्याचें उत्तर देवांनीं दिलें.—नामा म्हणे देवा कैशा ओळखाव्या ।

विठ्ठलनाम जयामध्यें निघे । ऐकोनियां कानीं अचळीं मराव्या । आणोनियां द्याव्या आम्हापाशीं । वद्य त्रयोदशी वैशाख शुक्रवार । नामाचा गजर महाद्वारीं । ऐसी आनंदानें नामाच्या गजरीं । दिली महाद्वारीं समाधि त्या ॥ हाडामधून विठ्ठलनामाचा गजर झाला असो किंवा नसो, चोखोबांचें आर्त चरित्र ईश्वरपर होतें, हें ह्यावरून स्पष्ट दिसेल. त्यांच्या पुण्यतिथीचा आज समय आहे. आजच्या सुप्रसंगीं मला एका प्रश्नाचा विशेष विचार करावयाचा आहे.

तो प्रश्न माझे मित्र रा० पांगारकर यांच्या तारीख २८ मेच्या ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानावरून उद्भवला आहे. रा० पांगारकर म्हणतात 'एकनाथांनीं अंत्यजोद्धार केला. पण कधींही १०–२० महार पंक्तीस घेऊन जेवण्याचें सोंग केलें नाहीं. वेदशास्त्रांनीं घातलेले निर्बंध पाळून त्यांनीं अंत्यजोद्धार केला' जेवण्याचें नुसतें सोंग एकनाथांनीं केलें नाहीं हें खरें, पण जेवणाचा राजरोस व्यवहार केल्याचा पुरावा एकनाथाच्या चरित्रांत स्पष्ट आहे. अंत्यजोद्धार करतांना नाथमहाराज वेदशास्त्रांचीं पानें चाळीत बसले असतील असें त्यांच्या चरित्रावरून मुळींच दिसत नाहीं प्रत्यक्ष आपल्या पितरांच्या श्राद्धाच्या वेळीं महारमांगास आधीं जेऊं घातलें आणि पुढें ब्रह्मवृंद रागावला तरी त्याची पर्वा केली नाहीं. आणि देवानेंही साक्षात् त्यांचे पितर खालीं आणून त्यांचाच पक्ष सांभाळिला. ह्या गोष्टींतील तात्पर्य वेदशास्त्रांतील साधक आहे कीं बाधक आहे ह्याचा काथ्याकूट शाब्दिकांनीं करावा, संतांस करावयास नको. पुढें रा. पांगारकर म्हणतात, "भूतदयेनें प्रेरित होऊन नाथांनीं महाराचें पोर सुद्धां उचलून कडेवर घेतलें पण तें तेवढयापुर तेंच." नाथमहाराजाचें करणें तेवढयापुरतें होतें हें त्याचे आधुनिक चारित्रकार होऊं पाहणारे जगाला सांगतात, हें पाहून स्वतः नाथांच्या डोळ्यांतून रक्ताचे अश्रु वाहतील असें वाटतें, संताची कोणतीच कृति एवढयापुरती नसते, ती शाश्वत असते. रा. पांगारकर आणखी म्हणतातः परकीयांना कवटाळण्यासाठीं स्वजनांना खवळून सोडण्यांत अर्थ तो काय ? महारांना आज जवळ केल्यास ब्रह्मवृंद रागावतो त्याची वाट काय ? परकीय कोण आणि स्वकीय कोण हें ठरवितांना नाथ आणि इतर संत रक्तसंबंधाकडे पहात नसत, मनाकडे पहात आणि ब्रह्मवृंद रागावतो त्याची वाट काय ? या प्रश्नाचा विटाळ त्यांना कधींच झाला नाहीं. रा. पांगारकर आणखी पुढें म्हणतातः "भूतदयेनें प्रेरणा झाल्यावेळीं त्यांना शिवा पण नंतर स्नान करून आपला आचार विचार पाळा" रा० पांगारकरांच्या सात्विक वृत्तीची आम्हांला जी कल्पना आहे, तिच्यावरून प्रसिद्ध झालेलें वरील वाक्य खरोखरीच त्यांच्या तोंडांतून आलें असेल कीं काय ह्याविषयीं आम्हांस शंका वाटत आहे, पण त्यांचा खराच तसा भाव असल्यास भूतदयेची प्रेरणा म्हणजे एक प्रकारची भूतबाधाच–जी होऊन गेली असतां आपण स्नान करून शुचिर्भूत व्हावें अशी त्यांची समजूत झाल्यासारखी दिसते. भूतदयेनें प्रेरित होऊन आमचें जें वर्तन होतें तें तर अत्यंत थोर आणि पवित्र, त्या वेळची स्थिति स्वर्गीय स्थिति असें असतही "आचार–विचार" पाळण्यापूर्वीं पुन्हां स्नान करण्याची जरूरी असावी हा भूतदयेचा व आचार–विचारांचा कोण विपरीत संबंध ! कदाचित् हा संबंध आम्हांसारख्या अर्धवट सुधारकांच्या वर्तनांत राहील पण त्याचा दाखला नाथासारख्या संतांच्या माथ्यावर मारण्याचें दुसरें पाप तरी निदान आम्हीं करूं नये. शेवटीं रा. पांगारकर म्हणतात–'एकनाथानें समाजास खरें ज्ञान करून दिलें. पण प्राचीन परंपरा त्यांनीं मोडली नाहीं.' खरें ज्ञान करून देणें पण प्राचीन परंपरा न मोडणें हें हस्तकौशल्य संतांस साधलें होतें कीं नाहीं हें आम्ही सांगूं शकत नाहीं. श्रीचोखोबांचें चरित्र नामदेव, तुकाराम, एकनाथ व इतर संतांनीं अभंगद्वारां लिहिलें आहे. त्या सर्वांत प्राचीन परंपरेच्या उलट एकनाथकृत अभंगांतच कडेलोट आहे. ते अभंग असेः—

अमृताशी रोग स्वर्गीं जाहला पाहीं ॥ अमरनाथा तेंही गोड नसे ॥ नारदातें प्रश्न करी अमरनाथ ॥ शुद्ध हें अमृत कोठें होय ॥ पंढरी वैकुंठ आहे भूमीवरी ॥ पुंडलीकाचे द्वारीं देव उभा ॥ तया ठाईं जातां शुद्ध होय अमृत ॥ नारदें ही मात सांगितली ॥ तेव्हां एकादशी आली सोमवारीं

॥ तेव्हां पंढरी उतरले ॥ नामदेवासहीत अवघे गणगंधर्व ॥ इंद्रादिक देव चालीयले ॥ रुक्मीणी सहित पंढरीनिवास ॥ चोखीयाचे घरास आले वेगीं ॥ चोख्याचे अंगणीं बैसल्या पंगती ॥ स्त्री ते वाढीती चोखीयाची ॥ अमृताचें ताट इंद्रें पुढें केलें ॥ शुद्ध पाहिजे केलें नारायणा ॥ तेव्हां देवराय पाचारी चोखियासी ॥ शुद्ध अमृतासी करी वेगीं ॥ चोखामेळा म्हणे काय हें अमृत ॥ नामापुढें मात काय याची ॥ चोखियाची स्त्री चोखा दोघेजण ॥ शुद्ध अमृत तेणें केलें देखा ॥

'चोखीयाच्या घरीं शुद्ध होय अमृत ॥
एका जनार्दनीं मात काय सांगूं ॥

वरील अभंगांतील तात्पर्य प्राचीन परपरेस धरूनच होतें अशी शंका येत असल्यास तिचें निरसन एकनाथांनीं पुढील चरणांत केलें आहे.

यातिहीन मी अमंगळ महार ॥ कृपा मजवर केली तुम्हीं ॥ पंढरीचे ब्राह्मण देखतील कोण्हीं ॥ बरें मजलागनी न पाहती जन ॥

या प्रकारें परंपरेचें पुरस्कर्ते आणि इतर टवाळ जन यांचा नुसता उल्लेख करूनच नाथ राहिले नाहींत. अशा जनांशीं गांठ पडली असतां भल्यानें कसें वागावें तेंही खालील चरणांत त्यांनीं सांगितलें आहे. ऐसें 'एकोनियां हंसती सकळ॥ आनंदें गोपाळ हास्य करी ॥'

यावरून परंपरा मोडल्याचें दुःख व टवाळांची थट्टा हंसून घालवावी. सभासदहो, आजचा प्रसंग गंभीर आहे. रा. पांगारकर हे सात्विकवृत्तीचे आहेत. त्यांचीं मतें कशींही असोत त्यांवर नुसती लौकिक टीका करून आम्हीं आजची वेळ दवडूं नये. 'अस्पृश्य' जातींच्या तुम्हां सभासदांना त्यांच्या मतांवरील टीका आवडून तुम्ही आनंदानें टाळ्या पिटाल ही मोठी गोष्ट नाहीं. रा. पांगारकर,— म्हणजे लौकिकाला भिणारे प्राचीन परंपरेचे भक्त वरिष्ठ वर्गांतच आहेत असें नाहीं. अशीं माणसें अस्पृश्य वर्गांतही किंबहुना जास्त सांपडतील. न सांपडल्यास नवल! शिवाय राजसी व तामसी हेतूनें प्राचीन परंपरा मोडण्यांतच कोणतीही सुधारणा होणार नाहीं. पांगारकर, तुम्ही, आम्ही सर्वच भित्रीं आणि नीच जातीचीं माणसें आहोंत. श्रीएकनाथ, नामदेव, तुकाराम व चोखोबा हीं शुद्ध सात्विक आणि एकाच उच्च जातीचीं माणसें होत. आम्हां सर्वांचा उद्धार करण्यास तेच एक समर्थ होत. त्यांनीं असें केलें, त्यांनीं तसें केलें याची चर्चा करणारीं आम्हीं कोण माकडें! आमच्या ह्या नीच योनींतून त्यांच्या शुद्ध योनींत उद्धार व्हावयाचा असल्यास त्याला शुद्ध ईश्वरभक्ति हा एकच मार्ग आहे. तो चोखोबानें तुम्हांपुढें रेखाटलेला आहे. सभासदहो, तुम्ही पांगारकर व शिंदे यांच्या परस्परांविरुद्ध भाषणानें आपली दिशाभूल होऊं देऊं नका. चोखोबाचें शुद्ध वर्तन आपल्यापुढें ठेवा व त्याचा कित्ता गिरवा. मग कोण ब्राह्मण व कोण महार, प्राचीन परंपरा मोडते कशी व सुधारणा घडते कशी हें पहाणें हें देवाचें काम. तो तें योग्य वेळीं करीलच करील.

---

## निराश्रित साहाय्यकारी मंडळी व आक्षेपनिरसन.

(बेळगांव येथील म्युनिसिपल हॉलमध्यें ता. २५ मे १९१२ रोजीं मेहरबान आर. सी. ब्राउनसाहेब बेळगांवचे कलेक्टर ह्यांचे अध्यक्षतेखालीं झालेल्या भाषणाचा थोडक्यांत सारांश.)

### मंडळीचें धोरण व जबाबदारी.

ह्याविषयीं मंडळीनें वेळोवेळीं शांतपणानें व स्पष्टपणानें खुलासा करावा तितका थोडाच आहे. कारण ह्या बाबतींत नव्या व जुन्या लोकांमध्यें, योग्यायोग्य कारणावरून मंडळीच्या कामासंबंधीं गैरसमज उत्पन्न होऊन इतर अनेक अपरिहार्य अडचणींमध्यें ह्या परिहार्य अडचणीची भर पडते. हजारों वर्षें अज्ञानाचे काळोखांत पडलेल्या ह्या कोट्यावधि हीन जातींमध्यें आज एकदम आधुनिक शिक्षणपद्धतीच्या उजेडाचा लोट सोडल्यामुळें त्यांचा मोठा समाज विचकून अस्वस्थ होईल व कदाचित् स्थापित राजसत्तेस अपाय पोहोंचेल असा पहिला आक्षेप निघण्याचा संभव आहे; पण ह्या गरीब जातींच्या सुदैवानें व सरकारच्या शहाणपणानें सरकारचें सहानुभूतिपूर्वक लक्ष ह्या प्रश्नाकडे ही मंडळी निघण्यापूर्वींच कित्येक वर्षें लागलें असल्यामुळें वरील वेडगळ आक्षेप बहुतेक मुळींच घेण्यांत आला नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं, उलट इलाख्याच्या अधिपतीपासून तों

जिल्ह्याचे अधिपतीपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं ह्या कार्यास प्रोत्साहन दिलें आहे हेंही मंडळी जाणून आहे व तदनुरूप तिचें वर्तन आहे.

दुसरा महत्त्वाचा पण वरच्या इतकाच भ्रममूलक आक्षेप असा निघण्याचा संभव आहे कीं, आजपर्यंत निर्जीव अवस्थेत पडलेल्या ह्या प्रचंड समूहापुढें आज एकदम आधुनिक शिक्षणपद्धतीच्या द्वारां समता, स्वतंत्रता, बंधुता इत्यादि विक्षोभक तत्त्वांचें आदर्श ठेविल्यामुळें हा समूह जागृत होऊन वरील वर्गांचा द्वेष करूं लागेल व सामाजिक युद्ध जुंपेल, या आक्षेपांत कादंबरी किती आहे व सत्य किती आहे हेंही मंडळी पूर्ण जाणून आपलें काम निमूटपणानें पण नेटानें करीत आहे; इतकेंच नव्हे तर मंडळीच्या बाहेरील उतावळ्या वक्त्यांकडून विशेषतः अस्पृश्य आणि मागसलेल्या वर्गांतील वक्त्यांकडून जेव्हां जेव्हां ह्या बाबतींत हयगय होते तेव्हां तेव्हां मंडळीकडून योग्य ती खबरदारी घेण्यांत येत आहे.

तिसरा एक चमत्कारिक आक्षेप धर्माच्या नांवानें वस्तुतः धर्मपंथाच्या वतीनें दोन परस्परविरुद्ध बाजूनें घेण्यांत येतो. तो असाः—ह्या मंडळीचें कार्य सुरू झाल्यापासून खिस्ती धर्माच्या प्रसाराचे कामीं मोठा अडथळा आला आहे असें कांहीं आमचे खिस्ती मिशनरी बंधु ओरडूं लागले आहेत. उलट बाजूनें कांहीं जुन्या हिंदुधर्माभिमानीं मित्रांकडून असा आक्षेप ऐकण्यांत येतो कीं आमच्या धार्मिक प्रयत्नामुळें ह्या वर्गांतील धार्मिक आचारविचारांत ढवळाढवळ होऊन हें हिंदुत्वाला मुकतील हे दोन्ही आक्षेप परस्परविघातक आहेत हें एक आमचें सुदैव आहे, इतकेंच नव्हे, तर त्या त्या बाजूनेंच ह्या काल्पनिक आक्षेपांचें क्रियात्मक निरसन होईल, अशी सहानुभूति व मदतही आम्हांला मिळत आहे. उदाहरणार्थ नुकतीच एका प्रसिद्ध अमेरिकन खिस्ती मिशनरीनें न मागतांच आम्हाला स्वतःच्या खिशांतून पैशाची मदत पाठविली आहे. उलटपक्षीं ह्या वर्गांतील धार्मिक आचारविचार उज्ज्वल आणि उन्नत हिंदुधर्मास शोभण्यासारखे नाहींत हें जाणून कित्येक वयोवृद्ध आणि खऱ्या हिंदुधर्माच्या अभिमान्यांनीं मंडळीच्या निरनिराळ्या ठिकाणीं तुकाराम, रामदास इत्यादिकांच्या उपदेशांच्या द्वारें धर्म आणि नीतिशिक्षणाचें काम चालविलें आहे.

उद्योगधंद्याच्या बाजूनें, व्यावहारिक शक्यतेच्या दृष्टीनें आणि इतर अनेक तऱ्हेनें मंडळीच्या कार्यासंबंधीं वेळोवेळीं लहानमोठ्या असंख्य शंका व हरकती घेण्यांत येतात; आणि विशेषेंकरून ह्या मंडळीचे प्रयत्न लोकाश्रयावरच केवळ अवलंबून असल्यामुळें मदत मागावयास गेलें असतां पावलोपावलीं अशा हरकतींतून अडखळत मंडळीला मार्ग क्रमावा लागत आहे. म्हणून शेवटीं वरील सर्व आक्षेपकांना एवढीच विनंति आहे कीं, मंडळीच्या कार्यास प्रत्यक्ष थोडासा हातभार लावून पाहावा, म्हणजे आपल्या आक्षेपांस कसा अवकाश मिळत नाहीं हें तेव्हांच दिसून येईल.

## कर्नाटक शाखा.

मंडळीच्या कार्याची आवश्यकता सर्व हिंदुस्थान देशभर आहे. विशेषेंकरून जसजसें खालीं दक्षिणेंत उतरावें, तसतसें तर अशा प्रयत्नाची अत्यंत जरूरी भासते. मंडळीचें ठिकाण मुंबईस आहे व तिच्या शाखा मुंबईइलाखाभर असून बाहेर मध्यप्रांत आणि मद्रास इलाख्यांतही त्या आहेत. तरी बाहेरील ह्या बऱ्याच ठिकाणीं ह्याच कामाकडे वाहिलेला निदान एक तरी प्रतिनिधी असलेल्या अशा सुव्यवस्थित आणि नियमबद्ध शाखा नसून नुसत्या फावलेल्या वेळीं काम करणाऱ्या किंवा मदत पाठविणाऱ्या सद्गृहस्थांच्या स्थानिक कमिट्या आहेत. निरनिराळ्या भाषा चालू असलेल्या निरनिराळ्या प्रांतीं एक मुख्य शाखा आणि मग तिच्या उपशाखा निघाल्याशिवाय मंडळीच्या कामास म्हणण्यासारखा जोर येणार नाहीं. अशा शाखा निदान कर्नाटक आणि गुजराथ ह्या प्रांतीं एक दोन वर्षांतच उघडण्याचा मंडळीचा निश्चय आहे; त्यांपैकीं कर्नाटक शाखा उघडण्याची पूर्व तयारी करण्याकरितां मंडळीचे प्रतिनिधी हल्लीं ह्या प्रांतीं फिरत आहेत. ह्या शाखेच्या दोन वर्षांच्या खर्चाचा अंदाज सुमारें २॥ हजार रुपयांचा असून सुमारें १। हजार कर्नाटकांत ह्या फिरतीवर जमवावयाचा आहे, त्यांपैकीं ५०० रु. मिळवून देण्याचें येथील मंडळीनें मनावर घेतलें आहे. येथील 'चिकित्सक' पत्रानें आमच्या कामासंबंधानें सहानुभूतीपर लेख लिहिला;

व त्यामुळें आमच्या कामास येथें इतकी रक्कम जमा झाली. एतदर्थ आम्ही चिकित्सकाचे आभार मानतों. तसेंच ह्या बाबतींत येथील अत्यंत उत्साही वकील रा० रंगराव नाईक ह्यांच्या निःस्वार्थ खटपटीबद्दल व्याख्यात्यांनीं फार आभार मानिले व अशीच मदत इतर शहरीं मिळून शाखा एक दोन महिन्यांतच स्थापिली जाऊन त्यांचे-बरोबर असलेले त्यांचे सहकारी मि० सय्यद अबदुल कादिर ह्यांच्या हवालीं ती करण्यांत येईल अशी उमेद त्यांनीं प्रदर्शित केली.

### बोर्डिंगची जरूरी.

सरकार, लोकलबोर्ड आणि म्युनिसिपालिट्या ह्यांच्या आश्रयाखालीं ह्या लोकांसाठीं पुरेशा वस्तीच्या ठिकाणीं शाळा आतां बहुतेक इलाखा-भर पसरल्या आहेत; पण त्यांपैकीं पुष्कळ चालाव्या तशा चांगल्या चालत्या नाहींत. ह्याचें मुख्य कारण योग्य शिक्षकांची उणीव हेंच होय. ही उणीव भरून काढण्याकडे मंडळीचें लक्ष लागावें असें मोठ्या अधिकारी लोकांनीं बोलून दाखविलें आहे व या मंडळीलाहि तसेंच वाटत आहे. शिवाय कशा तरी शाळा काढून पांच तास एकत्र बसविल्यानें कार्यभाग न होतां चालू शाळांतून हुषार व होतकरू मुलें निवडून त्यांचा पुढील अभ्यासक्रम मंडळीच्या अधिकाऱ्यांनीं खुद्द आपल्या नजरेखालीं त्या मुलांना रात्रंदिवस आणि बारा महिने ठेवून घेऊन करवावा; म्हणजे त्यांचें शिक्षण चांगलें होईल, इतकेंच नव्हे, तर त्यांची चाल, रीत, भाषा आणि सर्व संबंधीं सुधारतील, ह्याच उपायांनीं त्यांच्यांत चांगले शिक्षक निपजतील व थोडक्याच काळांत ते आपल्या जातीची आपणच सुधारणा करूं पाहतील, म्हणून अशा प्रत्येक प्रांतांतील मुख्य शाखाचें बोर्डिंग अथवा विद्यार्थि-वसतिगृह हें मुख्य व जरूरीचें अंग आहे.

---

## आत्म्याची यात्रा.

( ता० २४-९-११ रोजीं झालेलें व्याख्यान )

हल्लींच्या स्थितींत होत असलेले शोध आणि सुधारणा यांच्या मानानें पहातां आमच्या कायमच्या हितसंबंधाकडे आम्ही आपल्या पूर्वजांपेक्षां कमी लक्ष पुरवित आहों हें दिसून येत आहे. आमच्या सनातन हिताहितसंबंधीं विचार करण्याची जबाब-दारी आम्हांपैकीं सुशिक्षित वर्गावर विशेषतः असूनही त्यांचें बहुतेक सर्व लक्ष चालू गोष्टींतच गुंतून जात आहे. आज ना. बसूचें बिल, उद्यां गुजराथचा दुष्काळ, या आणि अशा तात्पुरतिक चळवळींतच आमच्या शक्तींचा लय होत आहे. शिवाय जगांत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बातमी पोहोंचविण्याचीं साधनें अत्यंत सुलभ झाल्यामुळें तर नित्य नव्या चळवळी आणि नवे प्रश्न यांनीं मन व्यग्र होऊन मनाची वरील काम-चलाऊ स्थितीच दुणावत आहे. परंतु आमच्या या प्रार्थना समाजसंस्थेचा उद्देश मनुष्यानें आपल्या नित्याच्या गरजा संभाळून कायमच्या हिताकडे आपलें लक्ष लावावें हा आहे. म्हणून आपण वरील विषयाविषयीं थोडासा विचार करूं.

आत्मा हल्लींप्रमाणें देहांत राहूं लागल्या काळापासूनही त्याचा इतिहास अत्यंत दीर्घ काळाचा आहे हें ह्या देहाच्या विलक्षण रचनेवरूनच दिसून येणार आहे. मग देहातीत त्याच्या प्राचीन चरित्राची नुसती कल्पनाही आपणांस करवत नाहीं म्हणून त्याचा प्रस्तुत विचार करणें नाहीं. तो अत्यंत प्राचीन यात्रेकरू आहे, एवढेंच लक्षांत नीटपणें आणून या पुढील त्याच्या यात्रेच्या किंचित् भागाचें दिग्दर्शन आज करावयाचें आहे.

आत्मा पुरुषस्थितीला येऊन पोहोंचल्या-पासून त्याला चार प्रकारचे पुरुषार्थ साधावयाचे असतात, असें आपल्या हिंदुधर्मांत सांगितलें आहे. ते—अर्थ, काम, धर्म आणि मोक्ष. यांपैकीं पहिला जो अर्थ हा केवळ साध-नीभूत आहे. काम किंवा धर्म या दोन्ही पुरुषा-र्थाला याची जरूरी असते आणि त्यांच्याशिवाय याचा कांहींच उपयोग नाहीं. यावरून अर्थ हा एक निराळा पुरुषार्थ आहे असें विशेष विभाग-दृष्ट्या म्हणतां येत नाहीं. ना काम ना धर्म, केवळ अर्थच सांठविणारे असे कांहीं अभागी आणि अधन्य पुरुष आढळून येतात, ते केवळ अपवादात्मक होत. १०० साधारण माणसांमध्यें असे अपवाद क्वचित् आढळावयाचे. कंजूष माणसाचें राष्ट्र, कंजूष माणसाचें गांव किंबहुना कंजूष माणसाचें कुटुंबही असणें शक्य नाहीं. तें

शक्य असतें तर हाही एक निराळा पुरुषार्थ संभवला असता. तसेंच शेवटचा अर्थ जो मोक्ष हाही यामधील दोन पुरुषार्थांचा एक अवश्य घडणारा परिणाम आहे. आपल्या प्राचीन वेदांतांचें ( गौडपाद ) असें मत आहे कीं, मोक्ष ही एक पुढें कधींतरी आरंभणारी स्थिति नाहीं. तिचा पुढें कधीं तरी आरंभ व्हावयाचा असेल तर तिला अंतहि होणार असावयाचा. ज्याला आदि आहे त्याला अंत आहेच. मग असा अंत पावणारा मोक्ष मिळाला तरी त्याला दुसऱ्या मोक्षाची आकांक्षा रहाणार. यावरून पहिला पुरुषार्थ केवळ साधन आणि चवथा पुरुषार्थ हा एक केवळ परिणाम हें ध्यानांत आणिलें असतां खरे पुरुषार्थ केवळ दोनच आहेत असें दिसून येतें. ते काम आणि धर्म हे होत.

या दोन्ही शब्दांविषयीं आपल्या प्राकृत भाषेत पराकाष्ठेचा गोंधळ माजलेला आहे. शब्दांचें यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय आणि त्यांची सम्यक् योजना न करतां भाषेचा व्यवहार करणें म्हणजे मोठा धोका आहे. हें थोड्या दिवसांपूर्वींच आमच्या ह्या समाजाचे सन्मान्य अध्यक्ष सर नारायण ह्यांनीं फार उत्तम रीतीनें दुसरीकडे सांगितल्याचें आपल्याला स्मरत असेलच. काम म्हणजे कांहीं विवादित दुष्ट वासना आणि धर्म म्हणजे देवाविषयीं आणि परमार्थाविषयीं कांहीं गोष्ट असा या दोन्ही शब्दांचा आकुंचित् अर्थ हल्लीं अगदीं रूढ झालेला आहे. पण वस्तुतः पाहतांच काम याचा अर्थ इच्छा किंवा मनाची भूक आणि धर्म याचा अर्थ कर्तव्यबुद्धि हा आहे. संस्कृत वाङ्मयामध्यें व इकडील देशांत इंग्रजीचा व्यवहार सुरू होण्यापूर्वी प्राकृत भाषांमधूनही धर्म या शब्दाचा केवळ कर्तव्यकर्म असाच साधा अर्थ होत असे. मग तें कर्तव्यकर्म एकाद्या शास्त्रांत किंवा ग्रंथांत सांगितलेलें असो, किंवा ईश्वरानें मनुष्याच्या मनामध्यें प्रत्यक्ष प्रेरणा केलेलें असो. मनुष्याच्या मनाच्या स्वाभाविक प्रवृत्तींकडे पाहिलें असतांही त्या या दोनच प्रकारच्या आहेत असें दिसून येतें. अमुक एक गोष्ट रुचकर आहे, अमुक एक हितकर आहे, अमुक एक सुंदर आहेत, ती आपणांस पाहिजे अशी इच्छा होणें ही एक प्रवृत्ति. अमुक एक गोष्ट रुचकर असो वा नसो, सुंदर दिसो, वा न दिसो किंबहूना आपल्या स्वतःस हितकर असो वा नसो, ती योग्य आहे म्हणन आचरलीच पाहिजे, किंवा अयोग्य आहे म्हणून टाकलीच पाहिजे, अशी आंतून प्रेरणा होणें ही दुसरी प्रवृत्ति. पहिलीचें नांव कामना व दुसरीचें नांव कर्तव्यबुद्धि. या दोन्ही प्रवृत्तींना अनुसरून आत्म्याला दोन भिन्न पुरुषार्थ साधावयाचे असतात. ते साधित असतांना केवळ उपकरण म्हणून त्याला अर्थसंचयही करावयाचा असतो आणि हे दोन पुरुषार्थ तो ज्या ज्या मानानें अधिकाधिक साधित जाईल त्या त्या मानानें त्याची यात्रा अधिकाधिक सफल होते, व ती झाली म्हणजे तो मुक्त किंवा पूर्ण झाला म्हणावयाचें.

आतां आपण या दोन प्रवृत्तींचाच विशेष विचार करूं. साधारणतः लौकिकांत असा समज आहे कीं, या दोन वरील स्वाभाविक मनःप्रवृत्तींपैकीं कामना ही, हलक्या दर्जाची आणि कर्तव्यबुद्धि ही श्रेष्ठ दर्जाची आणि वस्तुतः जरी लोकांचा खरा ओढा कर्तव्यापेक्षां कामनेकडेच अत्यंत अधिक आहे तथापि त्यांचा समज पाहूं गेलें असतां वरीलप्रमाणें विपरीत दिसून येतो. पण हा केवळ गैरसमज आहे. कामना आणि कर्तव्यबुद्धि ह्या दोन्हीही सारख्याच ईश्वरदत्त आहेत आणि त्या दोहोंचें कार्यही आत्म्याच्या यात्रेंत सारखेंच पवित्र आणि सारख्याच महत्त्वाचें घडून येत आहे. खाणें, पिणें वगैरे शारीरिक वासनांमध्येंच गुरफटून असलेल्या आद्यस्थितींतील पुरुषांची कर्तव्यबुद्धीही बेताचीच असते आणि श्रेष्ठपदाप्रत पोहोंचलेल्या पुरुषांमध्यें विकास पावणाऱ्या कर्तव्यबुद्धीचीं कारणें शोधून पहातां तीं त्यांच्या थोर मनकामनांमध्येंच आढळन येणार आहेत. यावरून पहातां यद्यपि कठोपनिषदामध्यें म्हटल्याप्रमाणें प्रिय वस्तु एक, श्रेयकर वस्तु निराळीच म्हणजे कामना आणि कर्तव्यबुद्धि ह्या दोन अगदीं भिन्न प्रवृत्ति आहेत हें जरी खरें आहे, तथापि या प्रत्येकीचा विकास परस्परावर अवलंबून आहे. जगाचें कल्याण मनुष्याच्या कर्तव्यबुद्धीमुळेंच झालें आहे आणि कामनेमुळें नाहीं असें मुळींच म्हणतां येत नाहीं. प्राचीन काळीं मोठमोठ्या तत्त्वांचा जो शोध लागला, आधुनिक काळीं जे

शास्त्राचे शोध लागत आहेत, ते केवळ कर्तव्य-बुद्धीमुळें नव्हत, तर शोधकाची जिज्ञासास्वरूपी मनकामनेमुळेंच होत. मला जगताचें कल्याण कर्तव्य आहे म्हणून कोणी शोधक होत नाहीं, तर क्षुधितास जशी अन्नाची जरूरी वाटावी तशी विवक्षित पुरुषास ज्ञानाची हांव सुटून ता शोधक बनतो, त्याच्या त्या मनकामनेमुळें आणि ती पूर्ण करून घेण्यामध्यें त्यानें दाखविलेल्या पुरुषार्थामुळें जगताचें कोटकल्याण होतें. कामनेचा हव्यास नसतांना केवळ जगताची कितीहि कींव येऊन मनुष्यास कर्तव्यजागृति झाली असती तरी त्याच्या हातून हें कोटकल्याण झालें नसतें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या ललित-कलांचा, सद्भिरूचींचा, शिष्टाचारांचा आणि सभ्य संप्रदायाचा प्रकार आहे. ललितकलांच्या द्वारां आत्म्याची उन्नति होते ही थोडी बहूत अलीकडचीच भावना आहे. यद्यपि जुन्या धर्मांच्या कित्येक प्रचारांत संगीतादि कलांची योजना रूढ झालेली आहे तथापि या कलांचा आध्यात्मिक प्रभाव आणि त्यांच्या विस्ताराची जरूरी अद्यापि कळून यावी तितकी आलेली नाहीं. संगीत, चित्रलेखन, शिल्प, वाङ्मय, वक्तृत्व आणि विनोद इत्यादि कलांचा विकास होण्याला कारण मनुष्याची कर्तव्यबुद्धि अथवा धर्म हा पुरुषार्थ नव्हे तर काम हा पुरुषार्थ होय. सौंदर्याचें दर्शन होऊन मनुष्य तळमळूं लागला आणि पुढील सौंदर्यास किंवा आपल्या मनाच्या स्थितीला दृश्य स्वरूप देऊं लागला म्हणजे या विविध कलांचा विकास होतो, आणि तद्वारां दुसऱ्याचीही अभिरुचि, सहृदयता, सानुकंपा वाढते. एका आधुनिक बंगाली चित्रकारानें काढलेलें शहाजहानाचें स्वप्न हें चित्र ज्यांनीं पाहिलें असेल त्यांनाच कळून येण्यासारखें आहे कीं हल्लीं यमुनेच्या तीरावर उभारलेला ताजमहाल, तो बांधण्यापूर्वी शहाजहानाच्या मनकामनेमध्यें कित्येक दिवस पोहत होतो. त्याला दृश्यस्वरूप द्यावयाची इच्छा शहाजहानाला अनावर झाली म्हणून पुढें वीस हजार मनुष्यांनीं २२ वर्षें खपून त्याला हल्लीं दिसतो तसा उभा केला आहे. हा शहाजहानाच्या कर्तव्यबुद्धीचा प्रभाव नव्हे तर त्याच्या कल्पनेचा विकास होय. पुष्कळ वेळां खोट्या कर्तव्यबुद्धीमुळें म्हणजे समाजाच्या आणि व्यक्तीच्या सुखाला विघातक अशा वैराग्यवृत्तीमुळें वरच्यासारख्या कित्येक शुद्ध आणि देदीप्यमान कामनांचा नायनाट झालेला आहे. मनुष्यव्यक्तीचें आणि राष्ट्राचें आजवर नुकसान झालें आहे तें त्याच्या केवळ क्षुद्र स्वार्थ-परतेमुळेंच झालें आहे असें नव्हे तर त्यानें खोट्या धर्मबुद्धीला बळी पडून आपल्या उदात्त कामना पूर्ण करून घेण्याचा पुरुषार्थ साधला नाहीं म्हणूनही झालें आहे. मनुष्याच्या मनाचा विकास जसजसा अधीकाधिक होतो तसतशा त्याच्या कामना अधिक पवित्र, अधिक महत्त्वाच्या आणि अधिक लोकहितकारक होतात; इतकेंच नव्हे तर त्यामुळें त्याच्या कर्तव्यबुद्धीचेंही क्षेत्र अधिक शुद्ध आणि अधिक विस्तृत होतें. म्हणून जो धर्म अथवा जी कर्तव्यबुद्धि या कामनेच्या मुळावरींच कुठार घालूं पहाते तो अधर्म समजावा. पुरुषार्थहीन माणसें आपला दुबळेपणा विसरून या अधर्माचा सहज आश्रय करतात आणि आपणास धार्मिक समजतात पण त्यांत त्यांचें आणि सर्वांचेंच अशुभ होतें, तें न व्हावें म्हणून प्रत्येकानें कामना या पहिल्या पुरुषार्थासंबंधानें दक्ष असावें. पण कामनेच्या मानानेंच कर्तव्यबुद्धीचाही विकास झाला पाहिजे, म्हणजे कर्तव्याचा ओघ कामनेच्या उलट न वाहतां जसजसा कामनांचा विकास होईल तसतसा त्यांच्या शुभ परिणामाचा विस्तार सर्व जनसमूहावर करून देण्याची कामगिरी कर्तव्य-बुद्धीनें केली पाहिजे आणि हाच धर्म हा दुसरा पुरुषार्थ होय. जगाच्या इतिहासामध्यें आजवर हा पहिला पुरुषार्थ ज्यांनीं नेटानें साधला आहे असे तत्त्वद्रष्टे, कवी, कलावंत, वक्ते, विनोदी, महात्मे वेळोवेळीं निर्माण झाले आहेत. परंतु त्यांच्या कृतींचा शुभ परिणाम सर्व जगतावर विस्तर-णारे कर्तव्यवान् पुरुषही निपजावयाला पाहिजेत. त्यांनीं आपली स्वार्थपरायणता बाजला ठेवून वरील शुभाचा विस्तार हाच आपला स्वार्थ केला पाहिजे. ह्या विस्ताराच्या मार्गामध्यें जे हीनधर्म, क्षुद्रधर्म, मृतधर्म आड येतील ते कांट्यासारखे निवडून काढून लोकहिताचा मार्ग खुला केला पाहिजे. शुद्धता, स्वतंत्रता, समानता यांची द्वाही फिरविली पाहिजे. व्हावें तितकें आजवर असें न झाल्यामुळें कोठेंतरी क्वचित् एकादी अद्वितीय तेजस्वी विभूती, आणि त्याच्या-

भोंवती गाढ अज्ञानांधकारामध्यें बुडालेले जन समूह, एकादा प्रतापी राजा आणि त्याच्या भोंवतीं पशुतुल्य प्रजासमूह, एकादा श्रीमान् पुरुष आणि त्याच्या सभोंवतीं दैन्य आणि दारिद्य यांत कतलेले त्याचे सजातीय, असे ओंगळ देखावे इतिहासांत असंख्य दिसत आहेत. ते नाहींसे होऊन आत्म्याची यात्रा सुरळित चालावी आणि जनता सुखी व्हावी असें असेल तर आपण दुसऱ्या या पुरुषार्थाविषयीं दक्ष असलें पाहिजे. कामना आणि कर्तव्यबुद्धि या वरील मनःप्रवृत्ति अगदीं भिन्न भिन्न आहेत असें वर सांगितलें, पण त्यांना अनुसरून मनुष्य जसजसा पुरुषार्थ गाजवूं लागल तसतसा या दोहोंमधील अलगपणा नाहींसा होऊन त्यांची सांगड जुळते आणि कर्तव्यबुद्धी हीच एक कामना आणि कामना हेंच एक कर्तव्य असें या दोन पुरुषार्थांचें ऐक्य भासूं लागतें. असें झाल्यावर तेंच एक पूर्णतेचें किंवा मोक्षाचें लक्षण होय. भिन्न पुरुषार्थ संपादन करण्याचे प्रयत्न करीत असतां आत्म्यास क्षीण आणि श्रम हे होणारच. परंतु देहामध्यें जसा आत्मा, तसाच विश्वामध्येंही एक परमात्मा असून, त्याचें दर्शन झाल्यावर आत्म्यास आपले श्रम विसरून जाऊन विसावा खावा लागतो. आपली कामना आणि कर्तव्यबुद्धि हीं दोन्ही या परमात्म्याच्या कामना आहेत, असें ओळखल्यावर आत्म्याला आपल्या यात्रेमध्यें विसावा होतो. इतकेंच नव्हे तर त्याला या दोन भिन्न पुरुषार्थांचें ऐक्यही दिसून येतें. परमात्मरूप दर्शन प्राप्त झाल्याशिवाय आत्म्याला विसाव्याला ठिकाणच नाहीं.

"ज्यातें स्मरतां मीपण जाय ।
आत्मा प्राण विसावा माय ॥"

असा हरी सांपडावयाला देखील अगोदर वरील दोन पुरुषार्थ साधले पाहिजेत. आत्म्यानें आपल्या कामनेचा आणि कर्तव्यबुद्धीची शिकस्त केल्याशिवाय त्याला परमात्मदर्शनाचा मार्ग खुला होणें शक्य नाहीं.

परमात्माही विश्वामध्यें आपल्या कामना पूर्ण करून घेत आहे व अहर्निश आपलें कर्तव्य बजावीत आहे हें निरखण्याला आम्ही तेव्हांच समर्थ होऊं कीं जेव्हां आम्ही हें वरील दोन्ही पुरुषार्थ अंशतः तरी साधूं; आणि यद्यपि आमचे हे दोन्ही पुरुषार्थ पूर्णपणें साधले गेले नाहींत, तथापि या परमार्थ दर्शनामुळेंच आत्म्याच्या यात्रेमध्यें वेळोवेळीं आम्हांला विसावा मिळेल, ती सुरळीत चालेल आणि योग्यकाळीं तीस फलही येईल.

---

## आत्म्याची वसति.

(ता० २३–९–१२ रोजीं मुंबई येथील प्रार्थना समाजाच्या वार्षिकोत्सवामध्यें झालेलें व्याख्यान.)

विश्रांतीची शांति तुझे पायांविण ।
न होयचि जाण नारायणा ॥
कोटी कल्पवरी उपाय साधनें ।
केलियाही तेणें सुख नोहे ॥
सुखाचें जें सुख अखंड अपार ।
जेथें मुनीश्वर रमताती ॥
तुका म्हणे माझ्या जीवांच्या जीवना ।
दावीं हो चिद्घना पाउलें तीं ॥

गेल्या वर्षाच्या उत्सवामध्यें आत्म्याची यात्रा या विषयाचें विवेचन केलें. त्यावेळीं कामना आणि कर्तव्यबुद्धि हे जे आत्म्याचे दोन पुरुषार्थ त्यांचें स्वरूप काय आहे हें सांगितलें, आणि तें साधीत असतांना आत्म्याला श्रम होत असतात, त्या श्रमांतून विश्रांति कोठें मिळेल याचाही शेवटीं उल्लेख केला. आत्मा हा असा कायमचा यात्रेकरू आहे; याला श्रमाशिवाय दुसरी अवस्थाच नाहीं हें खरें असेल तर मोठी कठिण स्थिति होइल. आम्ही ब्राह्म आत्म्याची जी अनंत उन्नति मानतों तिचा अर्थ असा नव्हे कीं आत्म्याची निरंतर परिश्रमाचीच अवस्था आहे. तसें नसतां याला मधून मधून विसाव्याचेंही स्थान आहे. श्रम आणि विश्रांति अथवा यात्रा आणि वसति, किंबहुना बंधन आणि मोक्ष यासंबंधींच्या इतरांहून आमच्या कल्पनेचा निराळेपणा इतकाच कीं, इतर ह्या अवस्था एकामागून एक येतात असें मानतात; म्हणजे आत्मा कांहीं काळ बद्ध राहून पुढें कायमचाच मुक्त होतो, एक जन्म असो किंवा ८४ लक्ष योनि असोत, ती यात्रा संपल्यानंतर तो कायमच्या वसतिस्थानाप्रत जातो, अशी इतरांची समजूत आहे. आम्हांस असें वाटतें कीं पुरुषार्थांचे श्रम आणि 'विश्रांतीची शांति' ह्या

आमच्या अवस्था आलटून पालटून पुनः पुनः होतात, व येणेंप्रमाणें आत्म्याची उन्नति अनंत काळ चालू असते.

आतां आपण आत्म्याच्या वसतीविषयीं विशेष विचार करूं या. व्यवहारांतील आमचा अनुभव असा आहे कीं घराबाहेर पडल्याबरोबर आम्हांला नुसते शारीरिकच नव्हे तर मानसिक श्रम आणि चिंता उत्पन्न होतात. जंगलांत गेलों तर पायांत कांटे बोचतील काय ? वन्य पशू आपणांस खातील काय ? अशी भीति असते. शहरांत फिरावयास गेलों तर आपला पेहराव नीटनेटका आहे कीं नाहीं, चालीरीति आणि सभ्यतेचे नियम आपणांकडून पाळले जातात कीं नाहीं याची चिंता असते. सभेंत बसून बोलत असलों तरी आपली भाषा शुद्ध आहे कीं नाहीं तिचे प्रघात योग्य आहेत कीं नाहींत, हें वेळोवेळीं पहावें लागतें. मनांतील भाव गैरसमज न होतां दुसऱ्यास कळावे म्हणून अनेक वेळां केवळ औपचारिक रीतीनें आम्हांस माफी मागावी लागते, सभेचे आभार मानावे लागतात. एकूण या प्रकारें नेहमीं चिंता आणि श्रम होत असतो. पण तेच आम्ही आपल्या वसतिस्थानीं म्हणजे घरीं बसलों असतांना आह्मांला अगदीं मोकळें वाटतें; घरीं कसेंही असलों, कसेंही बसलों, हसलों कीं रुसलों याची कांहीं काळजी घ्यावी लागत नाहीं. हा ऐहिक जीवनांतल्या वसतिस्थानाचा महिमा.

आतां आमच्या आध्यात्मिक जीवनांतही अशा वसतिस्थानाची गरज भासते. शरीराला जसें आमचें घर, तसेंच आमच्या आत्मारूप पक्ष्याला कोठेंतरी घरटें आहे काय कीं ज्यांत तो मधून मधून विराम पावेल ? आत्म्याच्या अनंत उन्नतीचा असा अर्थ समजावा काय कीं त्यानें नेहमीं अंतराळामध्यें फडफडतच रहावें ? केवळ नीतीच्या जगामध्यें हें घरटें नाहीं. नीति म्हणजे निरनिराळ्या आदर्शांच्या मागें लागून आह्मी करतों ते प्रयत्न. तें श्रमाचेंच जग. नीतीच्या पलीकडे हें घरटें कोठेंतरी असावयास पाहिजे. केवळ नीतीनें म्हणजे शुभ प्रयत्नानें मनाची आणि आत्म्याची भूक भागत नाहीं, निदान 'विश्रांतीची शांति' तरी मिळत नाहीं. ह्या शांतीचें एकच स्थळ आहे. जसें आपल्या शरीरामध्यें जीव चैतन्य, त्याप्रमाणें सर्व विश्वामध्यें विश्वचैतन्य नांदत असून जीवचैतन्य अल्प प्रमाणावर जसें शुभ प्रयत्न करीत आहे त्याप्रमाणेंच तें विश्वचैतन्यही अवीट अमर्याद प्रमाणांनीं शुभ प्रयत्न करीत आहे, ह्या गोष्टीचा अनुभव आणि साक्षात्कार हेंच जीवाच्या विश्रांतीचें व शांतीचें स्थळ होय. हीच आमच्या आत्म्याची वसति. हें स्थान नीतिजगाच्या पलिकडचें आहे. नीतिजगाशिवाय त्याजकडे जाण्याला मार्ग नाहीं हें खरें, परंतु नीतिजगाच्याही पलीकडे तें आहे हें त्याहून खरें. नीती ही या शांतीची शिडी आहे, पण नीति स्वतःच ही शांति नाहीं. नुसतें ज्ञान, नुसता भक्तीचा मनोविकार, तो कितीही शुद्ध आणि उज्ज्वल असो ह्या दोनच पायऱ्या ओलांडून ही वसति प्राप्त होत नाहीं, तर नीतीची कठिण पायरीही ओलांडली पाहिजे. आणि ती नुसती नीतीच आपल्याला पुरे असें म्हणनही चालत नाहीं.

जीव चैतन्याचा दुसरा एक असा अनुभव आहे कीं याच्यावर दोन प्रकारांनीं नेहमीं ताण पडलेला भासतो. एक बाहेरून शासनाचें दडपण आणि दुसरें अंतःकरणांतून प्रेरणेचें प्रोत्साहन. कुटुंबसंस्था, राजसंस्था, समाजसंस्था, धर्मसंस्था या सर्व संस्थांचें आपणांवर नेहमीं दडपण असतें. हें दडपण नेहमींच अहितकारक असतें असें नाहीं. यामुळेंच आपली उन्नति होत असते हें खरें. तथापि त्यांचें दडपण आपल्याला भासत आहे हें खोटें नव्हे. याच्या उलट आपल्या अंतःकरणामध्यें अशी एक प्रवृत्ति आहे कीं आपण या सर्व दडपणांतून आपल्या ध्येयाकडे वाट काढावी. बाहेरचें दडपण आणि आंतील प्रोत्साहन या दोन शक्तींचा अनुभव जसा जीव चैतन्यास येतो तसाच विश्वचैतन्यालाही येतो ही गोष्ट एकदां कां आपल्यास पटली म्हणजे आमच्या विश्रांतीच्या शांतीला दुजोराच येतो आणि जीवचैतन्य आणि विश्वचैतन्य यांमध्यें अनुपम सख्य अनुभविलें जातें. मग गेल्या व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणें—

तो हरि सांपडला सांपडला ।
मोठा लाभ जाहला ॥
ज्यातें स्मरतां मीपण जाय ।
आत्मा प्राण विसावा माय ॥

ह्या वचनांतील आप्तपुरुष आपणांला भेटून आपणांस घरच्यासारखी शांति मिळते.

भोंवती गाढ अज्ञानांधकारामध्यें बुडालेले जन समूह, एकादा प्रतापी राजा आणि त्याच्या भोंवतीं पशुतुल्य प्रजासमूह, एकादा श्रीमान् पुरुष आणि त्याच्या सभोंवतीं दैन्य आणि दारिद्य यांत कुतलेले त्याचे सजातीय, असे ओंगळ देखावे इतिहासांत असंख्य दिसत आहेत. ते नाहींसे होऊन आत्म्याची यात्रा सुरळित चालावी आणि जनता सुखी व्हावी असें असेल तर आपण दुसऱ्या या पुरुषार्थाविषयीं दक्ष असलें पाहिजे. कामना आणि कर्तव्यबुद्धि या वरील मनःप्रवृत्ति अगदीं भिन्न भिन्न आहेत असें वर सांगितलें, पण त्यांना अनुसरून मनुष्य जसजसा पुरुषार्थ गाजवूं लागल तसतसा या दोहोंमधील अलगपणा नाहींसा होऊन त्यांची सांगड जुळते आणि कर्तव्यबुद्धी हीच एक कामना आणि कामना हेंच एक कर्तव्य, असें या दोन पुरुषार्थांचें ऐक्य भासूं लागतें. असें झाल्यावर तेंच एक पूर्णतेचें किंवा मोक्षाचें कक्षण होय. भिन्न पुरुषार्थ संपादन करण्याचे प्रयत्न करीत असतां आत्म्यास शीण आणि श्रम हे होणारच. परंतु देहामध्यें जसा आत्मा, तसाच विश्वामध्येंही एक परमात्मा असून, त्याचें दर्शन झाल्यावर आत्म्यास आपले श्रम विसरून जाऊन विसावा खावा लागतो. आपली कामना आणि कर्तव्यबुद्धि हीं दोन्ही या परमात्म्याच्या कामना आहेत, असें ओळखल्यावर आत्म्याला आपल्या यात्रेमध्यें विसावा होतो. इतकेंच नव्हे तर त्याला या दोन भिन्न पुरुषार्थांचें ऐक्यही दिसून येतें. परमात्मरूप दर्शन प्राप्त झाल्याशिवाय आत्म्याला विसाव्याला ठिकाणच नाहीं.

"ज्यातें स्मरतां मीपण जाय।
आत्मा प्राण विसावा माय ॥"

असा हरी सांपडावयाला देखील अगोदर वरील दोन पुरुषार्थ साधले पाहिजेत. आत्म्यानें आपल्या कामनेचा आणि कर्तव्यबुद्धीची शिकस्त केल्याशिवाय त्याला परमात्मदर्शनाचा मार्ग खुला होणें शक्य नाहीं.

परमात्माही विश्वामध्यें आपल्या कामना पूर्ण करून घेत आहे व अहर्निश आपलें कर्तव्य बजावीत आहे हें निरखण्याला आम्ही तेव्हांच समर्थ होऊं कीं जेव्हां आम्ही हे वरील दोन्ही पुरुषार्थ अंशतः तरी साधूं; आणि यद्यपि आमचे हे दोन्ही पुरुषार्थ पूर्णपणें साधले गेले नाहींत, तथापि या परमार्थ दर्शनामुळेंच आत्म्याच्या यात्रेमध्यें वेळोवेळीं आम्हांला विसावा मिळेल, ती सुरळीत चालेल आणि योग्यकाळीं तीस फलही येईल.

---

## आत्म्याची वसति.

(ता० २३-९-१२ रोजीं मुंबई येथील प्रार्थना समाजाच्या वार्षिकोत्सवामध्यें झालेलें व्याख्यान.)

विश्रांतीची शांति तुझे पायांविण।
न होयचि जाण नारायणा ॥
कोटी कल्पवरी उपाय साधनें।
केलियाही तेणें सुख नोहे ॥
सुखाचें जें सुख अखंड अपार।
जेथें मुनीश्वर रमताती ॥
तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना।
दावीं हो चिद्घना पाउलें तीं ॥

गेल्या वर्षाच्या उत्सवामध्यें आत्म्याची यात्रा या विषयाचें विवेचन केलें. त्यावेळीं कामना आणि कर्तव्यबुद्धि हे जे आत्म्याचे दोन पुरुषार्थ त्यांचें स्वरूप काय आहे हें सांगितलें, आणि तें साधीत असतांना आत्म्याला श्रम होत असतात, त्या श्रमांतून विश्रांति कोठें मिळेल याचाही शेवटीं उल्लेख केला. आत्मा हा असा कायमचा यात्रेकरू आहे; याला श्रमाशिवाय दुसरी अवस्थाच नाहीं हें खरें असेल तर मोठी कठिण स्थिति होइल. आम्हो ब्राह्म आत्म्याची जी अनंत उन्नति मानतों तिचा अर्थ असा नव्हे कीं आत्म्याची निरंतर परिश्रमाचीच अवस्था आहे. तसें नसतां याला मधून मधून विसाव्याचेंही स्थान आहे. श्रम आणि विश्रांति अथवा यात्रा आणि वसति, किंबहुना बंधन आणि मोक्ष यासंबंधींच्या इतरांहून आमच्या कल्पनेचा निराळेपणा इतकाच कीं, इतर ह्या अवस्था एकामागून एक येतात असें मानतात; म्हणजे आत्मा कांहीं काळ बद्ध राहून पुढें कायमचाच मुक्त होतो, एक जन्म असो किंवा ८४ लक्ष योनि असोत, ती यात्रा संपल्यानंतर तो कायमच्या वसतिस्थानाप्रत जातो, अशी इतरांची समजूत आहे. आम्हांस असें वाटतें कीं पुरुषांचे श्रम आणि 'विश्रांतीची शांति' ह्या

आमच्या अवस्था आलटून पालटून पुनः पुनः होतात, व येणेंप्रमाणें आत्म्याची उन्नति अनंत काळ चालू असते.

आतां आपण आत्म्याच्या वसतीविषयीं विशेष विचार करूं या. व्यवहारांतील आमचा अनुभव असा आहे कीं घराबाहेर पडल्याबरोबर आम्हांला नुसते शारीरिकच नव्हे तर मानसिक श्रम आणि चिंता उत्पन्न होतात. जंगलांत गेलों तर पायांत कांटे बोचतील काय ? वन्य पशू आपणांस खातील काय ? अशी भीति असते. शहरांत फिरावयास गेलों तर आपला पेहराव नीटनेटका आहे कीं नाहीं, चालीरीति आणि सभ्यतेचे नियम आपणांकडून पाळले जातात कीं नाहीं याची चिंता असते. सभेंत बसून बोलत असलों तरी आपली भाषा शुद्ध आहे कीं नाहीं तिचे प्रघात योग्य आहेत कीं नाहींत, हें वेळोवेळीं पहावें लागतें. मनांतील भाव गैरसमज न होतां दुसऱ्यास कळावे म्हणून अनेक वेळां केवळ औपचारिक रीतीनें आम्हांस माफी मागावी लागते, सभेचे आभार मानावे लागतात. एकूण या प्रकारें नेहमीं चिंता आणि श्रम होत असतो. पण तेच आम्ही आपल्या वसतिस्थानीं म्हणजे घरीं बसलों असतांना आम्हांला अगदीं मोकळें वाटतें; घरीं कसेंही असलों, कसेंही बसलों, हसलों कीं रुसलों याची कांहीं काळजी घ्यावी लागत नाहीं. हा ऐहिक जीवनांतल्या वसतिस्थानाचा महिमा.

आतां आमच्या आध्यात्मिक जीवनांतही अशा वसतिस्थानाची गरज भासते. शरीराला जसें आमचें घर, तसेंच आमच्या आत्मारूप पक्ष्याला कोठेंतरी घरटें आहे काय कीं ज्यांत तो मधून मधून विराम पावेल ? आत्म्याच्या अनंत उन्नतीचा असा अर्थ समजावा काय कीं त्यानें नेहमीं अंतराळामध्यें फडफडतच रहावें ? केवळ नीतीच्या जगामध्यें हें घरटें नाहीं. नीति म्हणजे निरनिराळ्या आदर्शांच्या मागें लागून आम्ही करतों ते प्रयत्न. तें श्रमाचेंच जग. नीतीच्या पलीकडे हें घरटें कोठेंतरी असावयास पाहिजे. केवळ नीतीनें म्हणजे शुभ प्रयत्नानें मनाची आणि आत्म्याची भूक भागत नाहीं, निदान 'विश्रांतीची शांति' तरी मिळत नाहीं. ह्या शांतीचें एकच स्थळ आहे. जसें आपल्या शरीरामध्यें जीव चैतन्य, त्याप्रमाणें सर्व विश्वामध्यें विश्वचैतन्य नांदत असून जीवचैतन्य अल्प प्रमाणावर जसें शुभ प्रयत्न करीत आहे त्याप्रमाणेंच तें विश्वचैतन्यही अवीट अमर्याद प्रमाणांनीं शुभ प्रयत्न करीत आहे, ह्या गोष्टीचा अनुभव आणि साक्षात्कार हेंच जीवाच्या विश्रांतीचें व शांतीचें स्थळ होय. हीच आमच्या आत्म्याची वसति. हें स्थान नीतिजगाच्या पलिकडचें आहे. नीतिजगाशिवाय त्याजकडे जाण्याला मार्ग नाहीं हें खरें, परंतु नीतिजगाच्याही पलीकडे तें आहे हें त्याहून खरें. नीती ही या शांतीची शिडी आहे, पण नीति स्वतःच ही शांति नाहीं. नुसतें ज्ञान, नुसता भक्तीचा मनोविकार, तो कितीही शुद्ध आणि उज्ज्वल असो ह्या दोनच पायऱ्या ओलांडून ही वसति प्राप्त होत नाहीं, तर नीतीची कठिण पायरीही ओलांडली पाहिजे. आणि ती नुसती नीतीच आपल्याला पुरे असें म्हणनही चालत नाहीं.

जीव चैतन्याचा दुसरा एक असा अनुभव आहे कीं याच्यावर दोन प्रकारांनीं नेहमीं ताण पडलेला भासतो. एक बाहेरून शासनाचें दडपण आणि दुसरें अंतःकरणांतून प्रेरणेचें प्रोत्साहन. कुटुंबसंस्था, राजसंस्था, समाजसंस्था, धर्मसंस्था या सर्व संस्थांचें आपणांवर नेहमीं दडपण असतें. हें दडपण नेहमींच अहितकारक असतें असें नाहीं. यामुळेंच आपली उन्नति होत असते हें खरें. तथापि त्यांचें दडपण आपल्याला भासत आहे हें खोटें नव्हे. याच्या उलट आपल्या अंतःकरणामध्यें अशी एक प्रवृत्ति आहे कीं आपण या सर्व दडपणांतून आपल्या ध्येयाकडे वाट काढावी. बाहेरचें दडपण आणि आंतील प्रोत्साहन या दोन शक्तींचा अनुभव जसा जीव चैतन्यास येतो तसाच विश्वचैतन्यालाही येतो ही गोष्ट एकदां कां आपल्यास पटली म्हणजे आमच्या विश्रांतीच्या शांतीला दुजोराच येतो आणि जीवचैतन्य आणि विश्वचैतन्य यांमध्यें अनुपम सख्य अनुभविलें जातें. मग गेल्या व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणें—

तो हरि सांपडला सांपडला ।
मोठा लाभ जाहला ॥
ज्यातें स्मरतां मीपण जाय ।
आत्मा प्राण विसावा माय ॥

ह्या वचनांतील आप्तपुरुष आपणांला भेटून आपणांस घरच्यासारखी शांति मिळते.

पण आतां असा प्रश्न उद्भवतो कीं वर सांगितलेलें जीवाचें जें लक्षण यत्नशीलता त्या लक्षणानें युक्त अशी विश्वामध्यें एकादी शक्ति आहे किंवा नाहीं? मनुष्यजातीपुढें असलेल्या तत्त्वज्ञानाच्या पुरातन प्रश्नांपैकीं हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे, म्हणून तत्त्वज्ञानाची आज कोठवर मजल येऊन पोहोंचली आहे त्याचें निरीक्षण करूं. हा विचार करीत असतांना पाश्चात्य तत्त्वज्ञान, पौरस्त्य तत्त्वज्ञान, प्राचीन तत्त्वज्ञान, अर्वाचीन तत्त्वज्ञान अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानाच्या भेदाकडे फारसें लक्ष पुरवूं नये. एकंदरींत स्थूलमानानें मनुष्याची विचारसरणी कशी वाहत आली आहे हें ध्यानांत घेऊन आज काय ह्या बाबतींत विशेष शोध झाला आहे हें पहाणें प्रस्तुत प्रसंगीं युक्त होणार आहे.

पौरस्त्य देशांत उपनिषदें, षड्दर्शनें आणि बुद्ध ह्यांच्या काळीं आणि पाश्चात्य देशांत साक्रेटीस व प्लेटो यांच्याकाळीं मानवी तत्त्वज्ञानामध्यें जो नवीनपणा होता तो पुढील मध्ययुगामध्यें राहिला नाहीं. सृष्टीचें प्रत्यक्ष ज्ञान करून घेऊन वर निर्दिष्ट केलेल्या काळांतील ऋषींनीं आपली तत्त्वमीमांसेची इमारत रचली आणि पुढें त्याच पायावर सृष्टीशीं प्रत्यक्ष संबंध न ठेवतां आणि तिच्याशीं नवीन परिचय करून न घेता पुढील तत्त्ववेत्त्यांनीं स्वकपोलकल्पित तर्कवितर्कांच्या जोरावरच मीमांसा केली. त्यामुळें त्यांच्या मीमांसेचा परिणाम म्हणण्यासारखा कांहींच झाला नाहीं. अलीकडे आधुनिक शास्त्रांचा प्रसार होऊन सृष्टीच्या अनेक नवीन चमत्कारांचा परिचय झाल्यावर तत्त्वमीमांसेला एक नवीनच वळण लागूं लागलें. प्रथम प्रथम या नवीन वळणाचा परिणाम मनुष्याच्या उपजत श्रद्धाशक्तीच्या उलट होऊं लागला. पण आधुनिक शास्त्रांचा पाया आतां बळकट बसल्यामुळें हल्लींच्या मीमांसेला अधिक पूर्ण स्वरूप येऊं लागलें आहे. या गोष्टीची साक्ष आज युरोपांत नाणावलेल्या तत्त्ववेत्त्यांचे शिरोमणी फ्रान्स येथील बर्गसन आणि जर्मनींतील ऑयकन ह्यांच्या विचारसरणींत स्पष्ट दिसून येत आहे. कँट, हेगल यांच्यापेक्षांही ह्या तत्त्ववेत्त्यांच्या विचारसरणीचा आधुनिक शास्त्रीय शोधांशीं अधिक निकट संबंध असल्यामुळें ह्यांच्या विचारांत कँट, हेगलपेक्षांही अधिक ताजेपणा दिसून येतो. इतकेंच नव्हे तर कॅम्ट, स्पेन्सर इत्यादिक निश्चित ज्ञानवाद्यांपेक्षां ह्यांच्या विचारसरणींत अधिक खोलपणाही दिसून येत आहे. त्यामुळें यांच्या विचारांचा परिणाम विचारशील समाजांवर जितका आणि जसा होत आहे, तितका आणि तसा आजवर कोणाच्याही विचारसरणींचा झाला नाहीं. आतां स्पेन्सरच्या विचारांचा पगडा सुशिक्षित लोकांवर अद्यापि असलेला क्वचित् दिसून येतो हें खरें, तथापि त्याच्या परिणामाचें निराकरण करून शिवाय नवीन परिणाम ज्या अर्थीं या आधुनिक तत्त्ववेत्त्यांचे घडत आहेत त्या अर्थीं यांचे विचार सर्वांपेक्षां अधिक परिणामकारी आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या दोन तत्त्वज्ञान्यांपैकीं ऑयकनपेक्षांही बर्गसनच्या विचारांचा प्रसार सुशिक्षित लोकांमध्यें अधिकच झपाट्यानें होत आहे. म्हणन त्याच्या विचारसरणींतील मुख्य एक दोन मुद्यांचें आज आपल्या विषयाला अनुसरून अवलोकन करूं.ती विचारसरणी मुख्यत्वेंकरून त्याच्या 'Creative Evolution' या पुस्तकामध्यें निर्दिष्ट केलेली आहे. जडसृष्टि, वनस्पतिसृष्टि, प्राणिसृष्टि, आणि मनुष्यसृष्टि या चार सृष्टींचें खोल आणि मार्मिक निरीक्षण करून बर्गसन यानें असा सिद्धांत काढलेला आहे कीं, विश्वामध्यें पसरलेल्या अनंत प्रकृतीशीं कांहीं एक अज्ञात शक्तीची एकसारखी झटापट सुरू आहे. या मूळ शक्तीला त्यांनीं आपल्या ग्रंथांत 'Vital Impulse' असें म्हटलें आहे. वनस्पति, प्राणी आणि मनुष्यकोटी हे या शक्तीचे तीन निरनिराळे फाटे आहेत. ज्याप्रमाणें एकाद्या बोगद्यांत लावलेला सुरुंग फुटून बाहेर येण्याविषयीं वाट शोधीत असतो, आणि दोन तीन ठिकाणीं प्रयत्न करून शेवटीं एका बाजूनें येतो, त्या रीतीनें मनुष्यकोटीच्या द्वारां या मूळ शक्तीनें प्रकृतीच्या अभेद्य दडपणांतून बाहेर वाट काढिली आहे. प्रकृतीशीं अनंतकाळ झगडत असतांना जरी या मूळशक्तीस मनुष्यकोटीच्या बाबतींत थोडेंबहुत यश आलें आहे, तरी मनुष्यामध्यें दिसून येणारी जी संवेदना किंवा जाणीव ती खालील कोटीमध्येंही अपरिपक्व दशेंत बीजरूपानें आहेच. मनुष्याचा मेंदू हा या जाणीवेचे अवयव किंवा अधिष्ठान आहे. म्हणून तेवढ्यावरून मेंदू हीच जाणीव नव्हे. त्यावरून जेथें मेंदू

नाहीं तेथें जाणीव नाहीं, असें म्हणतां येत नाहीं. पचनक्रियेचे अवयव जें पोट, तें वनस्पतीमध्यें नसतें; तरी झाडांतून पचनक्रिया चालू असतेंच.त्या विशिष्ट अवयवाचें कार्य झाडाच्या सर्व अंगांत चालू असतें. पचनक्रियेप्रमाणेंच अधिक स्थूल दर्शेत झाडामध्यें जाणीवही असतेच. मात्र तिची वाढ वनस्पतींत खुंटलेली असते. पुढील कोटींत त्या जाणीवेचे दोन फांटे फुटलेले दिसतात. खालील प्राण्यांत उपजतबुद्धि ( Instinct ) आणि मनुष्य-मात्रांत विवेकबुद्धि ( Intelligence ) अशीं हिला निरनिराळीं नांवें देतां येतील. पण उपजतबुद्धि ही जाणीवेची प्रथम पायरी असें जें कांहीं तत्त्ववेत्ते म्हणतात तें बरोबर नाहीं. या दोन भिन्न भिन्न शाखा आहेत. एक दुसरीची पूर्व तयारी नव्हे. पाठीचा कणा असलेल्या प्राण्यांपैकीं मनुष्यामध्यें दुसरीला पूर्णता आली आहे तर कणा नसलेल्या मुंग्या आणि माशा म्ह० ( Orthropods ) प्राण्यामध्यें विशेषतः पहिलीचा ( Insinct ) बराच विकास दृष्टीस पडतो. इंग्लंडांत मीं एकदा स्वतः एका बाईनें एका मोठ्या पेटींत मुंग्यांनीं बांधलेल्या शहराचें प्रदर्शन केलेलें पाहिलें. त्या शहरांत घरें, रस्ते, पूल, वगैरे या लहान प्राण्यांनीं उत्तम प्रकारची रचना केलेली दिसून आली. तशी नागरीक रचना आमच्या कित्येक मोठ्या शहरां-तील म्युनसिपालिट्यांचीही दिसून येत नाहीं. उपजत बुद्धि आणि विवेकबुद्धि यांचीं भिन्न स्वरूपें आणि भिन्न विकार बर्गसननें आपल्या वरील ग्रंथांत वर्णिले आहेत. विशेषें करून त्यांनीं १९११ च्या मे महिन्यांत बर्मिंगहॅम युनिव्हर्सिटींत जीव (Life) आणि जाणीव ( consciousness ) या विषयावर जें अत्यंत महत्वाचें पण सुबोध असें व्याख्यान दिलें आहे व जें Hibbert Journal ह्या मासि-काच्या गेल्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे, त्यांत त्यांनीं या विषयाचे फार सुंदर स्पष्टीकरण केलें आहे. त्यांत त्यांनीं जाणीवेच्या विकासाला नदीच्या प्रवाहाची उपमा दिली आहे. एकादी मोठी नदी पर्वतावरून निघून तिचे निरनिराळे फांटे फुटून जंगलातून वाळवंटांतून वगैरे गडप होतात तरी मुख्य प्रवाह जसा पुढें वाहत जातो त्याप्रमाणें ही जाणीव वनस्पती आणि खालील अनेक जीवकोटी यांमधून प्रवास करीत अखेर मनुष्यप्राण्यांमध्येंही बऱ्याच उज्वलरूपानें विकसली आहे. ज्यांना ही विचाराची सरणी पटत असेल त्यांनीं बर्गसनाच्या ग्रंथांचें लक्षपूर्वक अध्ययन केल्यास मोठा लाभ होईल.

वर सांगितल्याप्रमाणें विश्वचैतन्याचें पर्यवसान केवळ विवेकांतच झालेलें नाहीं, तर प्रेम आणि कर्तव्याच्याही रूपानें तिचा या मनुष्यकोटींत विकास झालेला दिसत आहे. हिचें अंतिम पर्यवसान कोठें आणि कसें होणार, हिचा मूळ हेतु काय आहे या गोष्टी जरी आपल्या ज्ञानाच्या पलीकडच्या आहेत तरी आजपर्यंत हिचे झालेले उत्पादक उत्क्रमण ( Creative Evolution ) आ-मच्या डोळ्यांपुढें स्वल्प तरी दिसत आहे. या मूळशक्तीनें केलेल्या सर्वच प्रयत्नांत यश आलें आहे असें नाहीं; उलट हिला बहुतेक प्रयत्नांत बर्गसननें म्हटल्याप्रमाणें अपयश आलेलें दिसत आहे, तरी हिचा प्रयत्न उत्तरोत्तर जोरावतच आहे. त्याला खंड नाहीं किंवा तो कायमचा विराम पावण्याचाही संभव दिसत नाहीं. याप्रकारें आपल्या भोंवतीं विश्वामध्यें आह्मांप्रमाणेंच जी एक विराट शक्ति आपलें सतत कार्य करीत आहे, तिचें दर्शन झाल्याबरोबर तेंच या जीवनचैतन्यास विश्रांतीची शांति देण्याला कारण होतें. तें दर्शन झाल्याबरोबर नुसती विश्रांतिच मिळते असें नव्हे तर नवीन प्रयत्न करण्याला हुरूपही येतो. आपल्या मार्गांत जे अडथळे येतात किंवा आपल्याभोंवतीं जें दडपण पडतें त्यांच्याशीं टक्कर देण्याला वरील दिव्य दर्शनानें मिळालेल्या अंतःशांतीमुळें अधिक जोर येतो. आमच्या प्रार्थनासमाजाला याच वरील विश्वचैतन्याचा भरंवसा आहे. तीच आमच्या आत्म्याची वसति.

## हिंदुस्थानांतील उदार धर्म.

( सपटेंबर १९०३ मध्यें आमस्टरडाम येथें भरलेल्या उदार धर्मांच्या अनुयायांच्या सभेपुढें झालेलें व्याख्यान. )

धर्म ही बाबत प्रत्येक मनुष्याच्या अंतःकर-णाची असल्यामुळें आस्थेवाईक मनुष्याचा खरा धर्म सर्वत्र सारखाच असणार. जसजशी मनुष्याची सुधारणा होत जाते तसतशी धर्मांच्या प्रगतीची

दिशाही सारखीच असते. म्हणून कर्मठपणा आणि इष्टवाद यास न जुमानतां व्यक्तींचा धर्म, त्याचा उगम जें अंतःकरण आणि अंतर्याम यांना अनुसरूनच आहे. या दृष्टीनें पाहतां पाश्चात्य देशांतील प्रसिद्ध विद्वान् मनुष्यांनीं हिंदुधर्माचीं तत्त्वें आणि आदर्श जितक्या मानानें समजून घेतलेले आहेत, तितक्या मानानें पाश्चात्य देशांतील धर्मशास्त्रवेत्त्यांनीं घेतलेले नाहींत. परंतु या सभेचा उद्देश व्यक्तीच्या धर्मापेक्षां सामाजिक धर्माविषयीं विचार करण्याचा असल्यामुळें किंबहुना, धर्माच्या निरनिराळ्या संस्था होतां होईल तों व्यक्तीच्या अनुभवाला आणि अंतःकरण–प्रवृत्तीला अनुसरून रहातील असें करण्याचा आहे असें मला वाटतें. म्हणून हिंदुस्थानांतील नव्या आणि उदार धर्मांच्या चळवळीचें वर्णन करण्यापूर्वी तेथील पुराणधर्माची स्थिति कशी आहे याविषयीं दोन शब्द सांगतों.

हिंदुस्थानांतील जुन्या धर्माचीं व्यंगें आणि त्याचे दुष्परिणाम पाश्चात्य देशांतल्याहून निराळे आहेत. मागें किंवा आतां हिंदुस्थानामध्यें विशिष्ठ आणि ठराविक मतांविषयीं आग्रह फारसा आढळून येत नाहीं. धर्मग्रंथाची प्रमाणता मानण्यांत यत आहे, परंतु ते सर्व धर्मग्रंथ पुष्कळ वर्षांपूर्वी मृत झालेल्या भाषेमध्यें लिहिलें असल्यामुळें आणि त्यांच्या अर्थाची ओढाताण पाहिजे तशी करतां येत असल्यामुळें साधारण माणसाच्या मार्गामध्यें धर्मग्रंथाचा फारसा अडथळा येत नाहीं. उपासनेच्या प्रकारांविषयीं पाहूं गेलें असतां ती एक स्थानिक बाब होऊन बसलेली आहे; म्हणजे विशिष्ट कांहीं स्थळें आणि प्रतिमा यांनाच महत्त्व आलेलें आहे. देशामध्यें प्राचीन काळापासून पवित्र मानलीं गेलेलीं निरनिराळीं क्षेत्रें आहेत, शहरों शहरीं शृंगारलेलीं भव्य देऊळें आहेत, इतकेंच नव्हे तर घरोघरीं देवघर म्हणून एक स्वतंत्र खोली असते, व त्यामध्यें कांहीं निवडक देवांचा देव्हारा असतो. धर्मनियंत्रणाच्या दृष्टीनें धर्मसंघ आणि राजकीय संस्था यांचा पाश्चात्य देशांतल्याप्रमाणें राजकीय दृष्ट्या संबंध जुळलेला नाहीं. किंबहुना, पाश्चात्य देशांतल्याप्रमाणें हिंदुधर्माची संघसंस्था ( Church ) कधींच बनलेलीही नाहीं. हिंदुधर्म म्हणजे प्राचीन काळापासून चालत आलेली एक परंपरा आहे व हल्लीं त्याचें शासन आणि नियमन असंख्य जातींचा जो मोठा एक व्यूह बनलेला आहे त्याचे द्वारां होत आहे आणि त्याचा पाया आध्यात्मिक तत्त्वावर रचलेला नसून सामाजिक आणि कौटुंबिक हितसंबंधावर रचलेला आहे. बुद्धधर्मास हिंदुस्थानांतून काढून लावल्यावर खिस्तीशकाच्या आठव्या शतकाच्या सुमारास धर्माचें पहिलें मोठें आचार्यपद स्थापण्यांत आलें असावें असें दिसतें. परंतु त्याची कामगिरी लोकांच्या आध्यात्मिक गरजा काय आहेत, त्या समजून घेऊन त्या भागविण्याची नसून केवळ जातिबंधनाच्या द्वारां हिंदुधर्माच्या ज्या जुन्या समजुती आणि विधी यांची परंपरा शाबूत ठेवणें एवढीच आहे. फक्त ब्राह्मणांना विशेषेंकरून त्यांतल्या त्यांत भिक्षुक मंडळींनाच धर्माचीं कांहीं विहित कर्में आचरावीं लागतात. इतर बहुसमाज उपवास, व्रतें आणि यात्रा इत्यादि चालू वहिवाटीच्या गोष्टी आपापल्या आवडीप्रमाणें करीत असतो. हिंदुस्थानामध्यें ज्याचें खरें जुलमी साम्राज्य चालू आहे तो आचार्य, उपाध्याय किंवा धर्मग्रंथ यांच्यापैकीं कोणी नसून चालू वहिवाटहीच होय. थोडे पैसे देऊन उपाध्येबोवाचें तोंड बंद करतां येतें, थोड्याशा विचारचापल्यानें धर्मपुस्तकाची आडकाठी नाहींशी होते, परंतु खऱ्या धर्माच्या प्रबळ प्रेरणेचें पाठबळ असल्याशिवाय शेवटची जी राक्षसी चालरीत तिला कोण तोंड देऊं शकेल! हिंदु आचार्यांनीं थोडीशी स्वतंत्रता दिली आणि सुधारणेला अनुकूळ असें एकादें आज्ञापत्रही काढलें तरी बहुजन समाजानें जणूं एकाद्या जादूनें भारल्याप्रमाणें, जुन्या चालीला जी एकदां दृढ मिठी मारली आहे ती कांहीं केल्या सुटत नाहीं.

खिस्ती आणि महमदी हे दोन धर्म बाहेरून हिंदुस्थानांत आले आहेत पण त्यामुळें जुन्या घोंटाळ्यामध्यें नवीन गोंधळाची भर मात्र पडली आहे. जेथें तद्देशीय साधू संतांना व सुधारकांना यावें तसें यश प्राप्त झालें नाहीं तेथें ज्यांचा कल साहाय्य करण्यापेक्षां जय मिळविण्याकडे विशेष आहे त्यांचें आध्यात्मिक बाबतींत काय चालणार? हिंदूंचा देश दोनदां जिंकला गेला आहे. पण हिंदूंचा धर्म आपली शुद्धि आणि उद्धार कधीं

होईल ह्याची अद्यापि वाट पहात आहे. ती व्हावयाची म्हणजे कोणत्याही बाहेरून आलेल्या धर्मामुळें होणार नाहीं, तर आत्म्याच्या खास उत्पत्तिस्थानांत उगम पावून सर्व मनुष्यजातीचा जो एक साधारण धर्म निघणार आहे त्यांतच होईल.

ह्या भावी साधारण धर्मांची वाट खुली करणारी हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाज एक मोठी वैभवशाली शक्ति आहे. ह्या समाजाचा संस्थापक राजा राममोहनराय ( १७७२–१८३३ ) हा आधुनिक हिंदचा ज्येष्ठ पुत्र होय. " तो जेव्हां जेव्हां सनातन धर्माविषयीं बोलत असे तेव्हां तेव्हां गहिंवरून डोळ्यांतून अश्रू गाळीत असे " असें सांगतात. त्याचा धर्म म्हणजे केवळ एकमत किंवा मनोवृत्तिच नसे तर साक्षात् जीवन होता; व तें जीवनही सर्व बाजूचें असे. राजकारण आणि आर्थिक अभ्युदय, धर्मसुधारणा आणि समाजसुधारणा ह्या सर्वांसाठीं त्याचें जिणें, त्याचा प्रयत्न व त्याचें मरण हीं घडलीं. त्याच्या जिवंत धर्माच्या ह्या निरनिराळ्या आशाच जणूं होत्या. त्याचा देशाभिमान हें एक त्याच्या सर्वात्मक वृत्तींचें अंगच होतें. ऑस्ट्रियाच्या सैन्यानें नेपल्स येथील लोकांच्या स्वातंत्र्याची आहुति घेतली तेव्हां १८२१ सालीं त्यांनीं लिहिलें आहे कीं " नेपालिटन लोकांचें हित तें माझें हित व त्यांचे शत्रू तें माझे शत्रू होत " त्यानें ब्रिटिश पार्लमेंटपुढें जो शेवटचा खलीता वाचला त्यांत पूर्व आणि पश्चिम ह्यांचा भरतभूमींत जो संगम झाला आहे त्याचे अगदीं दूरचे परिणाम कायकाय घडतील याचें भविष्य वर्तवून ठेविलें आहे. पूर्व आणि पश्चिम, प्राचीन आणि अर्वाचीन ह्यांचा मिलाफ त्याच्या स्वतःमध्येंच चांगलासा झालेला दिसतो. आधुनिक संस्कृतींत जें काय उत्तम आहे. तें शोषून घेण्याचें भरतभूमींत जें कार्य हल्लीं घडत आहे त्या कार्याची राममोहन रॉय ही एक मंगलमूर्तिच होय. आणि ब्राह्मसमाज हें त्याचें स्मारक आहे.

कलकत्ता येथें जें पहिलें ब्राह्ममंदीर उघडण्यांत आलें त्याच्या ट्रस्टडीडमध्यें पुढील उल्लेख आहे. " सनातन ईश्वराच्या उपासनेकरितां कोणताही भेद न राखतां सर्वांनीं जमण्याची जागा.......अचिंत्य परमेश्वर, विश्वाचा कर्ता आणि भर्ता, कोणा-मनुष्यानें किंवा राष्ट्रानें कोणाही विशिष्ट व्यक्तीस दिलेलें कोणतेंही विशेष नांव असो, त्यानें ओळखला न जाणारा. "

ब्राह्मसमाजांत कडकडीत सत्य आणि न्याय व सहिष्णुता ह्यांची एकवाक्यता कशी आहे हें जगास जाहीर करण्यास जणूं पुढील कलमही त्या डीडमध्यें आढळतें. ' जी एकादी जीवंत अथवा जड वस्तु दुसऱ्या कोणाची तरी उपास्यविषय झालेली असेल तिची, ब्रह्मोपासना चालली असतांना कोणीही आपल्या उपदेशांत, प्रार्थनेंत अथवा पद्यांत, निंदा अथवा थट्टा करूं नये. '

ज्या अर्थी धर्मबाबतींत ठराविक मतें आणि त्यांचा उगम जें उपाध्यायांचें अधिकारी मंडळ ह्या दोन्हींपासून ब्राह्म समाज दूर राहत आहे त्याअर्थी त्यांचीं मतें काय आहेत व काय नाहींत हें सांगण्याची येथें आवश्यकताच उरली नाहीं. पण त्याच्या धर्म जीवनांचीं व प्रगतीचीं जीं ढोबळ तत्त्वें आहेत त्यांचा मात्र मी उल्लेख करीत आहें.

१ सनातनता—"राजाराम मोहनरॉय हा तुलनात्मक धर्मशास्त्राचा जगांतला पहिला शोधक होय. " असें सर मॉनीयर वुईल्यम्सनें म्हटलें आहे. जगांतील बहुतेक सर्व मुख्य धर्मग्रंथांचें त्याच्या मूळ भाषेंतून परिशीलन केल्यानें त्या सर्वांत त्याला आपल्या सनातन धर्माचीं बीजें आढळलीं. त्याचा सनातनवाद त्याच्यामागें त्याच्या अनुयायांनीं अधिकाधिक प्रचितीस आणिला आहे. सन १८५० सालीं महर्षि देवेंद्रनाथाच्या प्रमुखत्वाखालीं वेद अभ्रांत आहेत, हें मत समाजानें निखालसपणें पण आदरपूर्वक सोडून दिलें. आणि त्याचवेळीं जगांतील सर्व पवित्र वाङ्मय ही मनुष्यमात्रांची देवानें दिलेली समाइक देणगी असें समजून तिचा स्वीकारही केला. मागाहून २५ वर्षांनीं ब्रह्मानंद केशवचंद्र ह्यांनीं आपल्या नवविधान शिक्षेंत जगांतील सर्व देवर्षि, धर्मग्रंथ आणि धर्मसंघ ह्यांची एकवाक्यता कशी होण्यासारखी आहे तें दाखविलें. अद्यापिही निरनिराळ्या स्थानिक समाजांच्या वार्षिक उत्सवांतून निरनिराळ्या धर्मसंस्थापकांच्या चरित्रावर सहानुभूतीचीं व्याख्यानें होत असतात. समाजाची ही सर्वात्मकता म्हणजे एका प्रकारची भिक्षुकवृत्ति आहे व समाजाला

स्वतःचें असें कांहींच नाहीं असाही आक्षेप बाहेरच्या मंडळीकडून वेळोवेळीं येतो. पण त्याची पर्वा न करितां ब्राह्म मंडळी, सर्व धर्मविभूतींशीं सहवास आणि त्यांचे शिष्यांशीं सख्य साधण्यास तत्पर असते.

२ सयुक्तिकता—वरील सर्वात्मकता ही केवळ एक मनोवृत्ति किंवा विचार न करतां सांपडेल तें स्वीकारण्याचा प्रयत्न आहे असें नव्हे. आपल्या स्वतःच्या विवेकशक्तीचा उपयोग करण्यास कोणीही ब्राह्म कधीं मागें घेत नाहीं. धर्माध्ययनाच्या सर्व प्रदेशांत आधुनिक शोधाचें किती महत्त्व आहे हें तो जाणून असतो व त्यांचा स्वीकारही करतो. त्याचें शास्त्र व त्याचा धर्म ( विवेक आणि विश्वास ) ह्यांच्यामध्यें कधीं लढा पडत नाहीं किंवा हीं दोन्ही कधीं परस्परापासून अलग राहत नाहींत.

३ आध्यात्मिकता—परंतु ब्राह्माच्या जाणीवेचा मुख्य उगम आणि आधार म्हटला तर चैतन्यच आहे, त्याचें मन नव्हे, पाश्चात्य बुद्धिवादाचा त्याच्यावर कितीही परिणाम झाला असला तरी त्याला धर्मबाबतींत भाव आणि भक्ति हींच तत्त्वें प्रधान वाटतात. ह्या बाबतींत श्रीमान् केशवचंद्र सेन ह्यांच्या चारित्र्याचा परिणाम समाजावर विशेष घडला आहे. ते आपल्या अंतमार्गानेंच धर्मांचा ठाव घेण्याचे कामीं एकाद्या नुसत्या भाष्यकारापेक्षांही खोल बुडी मारू शकले किंवा एकाद्या पंडितापेक्षांही वर मजल मारूं शकले.

४ व्यावहारिकता—पूर्ण ब्राह्म व्हावयाचें तर नुसत्या विचारानें किंवा मनोवृत्तीच्या द्वारेंच होतां येणार नाहीं. प्रथम स्वतःला व नंतर जगाला प्रत्यक्ष सेवा करून आपल्या धर्माची प्रतीति दाखवावयाची असते. ब्राह्मांची वेदी म्हणजे आपल्या मनोवृत्तींचे सोहाळे उपभोगावयाचें क्रीडाभुवन, किंबहुना अचिंत्य वस्तुविषयीं तर्कवितर्कांचें चऱ्हाट वळण्याचें किंवा वादविवादाचें जाळें विणण्याची वखार नव्हे, तर भरतभूमीच्या अभ्युदयाला हल्लीं अत्यंत आवश्यक असलेल्या सामाजिक सुधारणेच्या सर्व प्रकारच्या युद्धाचें उघडें समरांगणच होय.

## कार्यपद्धति.

५ तडजोड नाहीं. कित्येक हितचिंतकांकडून आम्हांला वेळोवेळीं असें भासविण्याचा प्रयत्न होत असतो कीं ब्राह्मांनीं आपलीं मतें हल्लींपेक्षां कमी निस्पृहपणानें प्रतिपादलीं असतां आणि जुन्या लोकांचे जे आचार वरवरचे आहेत त्यांच्याशीं अधिक तडजोडीनें वागलें असतां त्यांच्या कामांत अधिक यश येण्याचा संभव आहे. पण मूर्तिपूजा आणि विधींचें अवडंबर ह्याचें दुर्भेद्य कवच फोडून आंत अडकून राहिलेलें धर्मबीज मोकळें करण्याची आशा ब्राह्मसमाजाला वरून झाली आहे अशी जोंवर त्याची भावना राहील] तोंवर त्याला सर्व प्रकारच्या गुळचट मिथ्यावादाला शांतीनें व धैर्यानें तोंड दिलेंच पाहिजे. आपल्या देशाच्या राष्ट्रियतेचा विध्वंस करणारे असाही आरोप ब्राह्मांवर लादण्यांत येतो. तथापि उज्ज्वल, सत्य आणि उच्चतर हितही साधण्यासाठीं त्यांना सुधारणें आपलें कठीण व्रत निश्चयानें पाळलेंच पाहिजे. जैन, लिंगाईत, शीक इ. पुष्कळ सुधारक पंथांनीं प्रथम प्रथम पुराणधर्मावर आपलें जोराचे हल्ले केले पण अखेरीस तेही आतां त्याच गर्तांमध्यें रुतून एकजीव होऊन गेले आहेत. ह्याचें कारण त्यांचीं मतें पूर्वीं उदार नव्हतीं असें नव्हे तर पुढें आपल्या उदार बहाण्यास कायमचें जीवन प्राप्त होईल असा कडकडीतपणा त्यांनीं अखेरपर्यंत राखला नाहीं हेंच होय. ब्राह्मसमाजानें आपल्या पुढें हा धडा चांगला ठेविला आहे.

६ हटवाद नाहीं. जुन्या मताविषयीं ब्राह्मांची इतकी कडकडीत खबरदारी आहे तरी त्यांच्या स्वतःच्या मताविषयीं त्यांचा दुसऱ्यावर जुलूम किंवा आग्रहही नाहीं. धार्मिक जीवन आणि त्याची प्रगति ह्यासाठीं कोणत्याही हटवादाची विधितः अथवा निषेधतः आवश्यकता नाहीं असा ब्राह्मांचा अनुभव आहे. जडशास्त्रांचा अतिशयित नकार आणि धर्मशास्त्रांचा अतिशयित होकार ह्या दोहोंचा अडथळा धर्ममार्गांत सारखाच कसा येतो हें ते पूर्ण ओळखून आहेत. एकाद्या थोर कड्याच्या काठाशीं एकादें भयचकित अर्भक जसें उभें रहावें तसाच ब्राह्मही वाचातीत आश्चर्य व आनंद ह्यांनीं युक्त असा अदृश्य ईश्वराचे द्वारीं तटस्थ उभा आहे.

७ पंथ नाहीं—मताप्रमाणेंच संघामध्येंही सर्वत्र मोकळेपणा आहे. समाजाचीं द्वारें सर्वांला सर्वदां खुलीं आहेत. आंत येण्याला कोणास संकोच वाटत असल्यास त्याचेंच नशीब !

### कार्य.

सर्व हिंदुस्थान देशभर शंभराहून अधिक समाज आहेत. समाजांताल प्रमुख गृहस्थ सासा हिक उपासना चालवितात. धंदेवाईक पुरोहित नाहींत. प्रचारक तयार करण्यासाठीं साधनाश्रम नांवाची एक मध्य संस्था कलकत्त्यास आहे. तत्त्वांचा प्रसार करण्याचे कामीं गृहस्थ मंडळीही बराच हातभार लावते. जातिभेद नाहींसा करणें, बालविवाह बंद करणें, स्त्रीशिक्षण वाढविणें आणि विधवाविवाहाची आडकाठी काढणें ह्या व इतर गृह्य आणि सामाजिक सुधारणांचा नेटानें ही मंडळी पुरस्कार करिते.

इंग्लंड व अमेरिका येथील युनिटेरिअन लोकांशीं ब्राह्मांची पूर्वींपासूनच फार सहानुभूति आहे. अलीकडे लंडन येथील ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरिअन असोसिएशन् आपल्या खर्चानें हिंदुस्थानांतील ब्राह्म विद्यार्थ्यांची ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांत तुलनात्मक धर्माध्ययनाची सोय करून व आपले प्रतिनिधी हिंदुस्थानांत पाठवून उदारधर्माचें कार्य व राष्ट्राराष्ट्रांतील सख्य बरेंच वाढवीत आहेत.

### आर्यसमाज.

ही एक दुसरी एकेश्वरी धर्मांची मोठी चळवळ आहे. ह्याची संस्थापना स्वामी दयानंद सरस्वती ( १८२४–१८८३ ) ह्यांनीं १८७५ त केली. ह्याला आधुनिक हिंदुस्थानाचा लूथर असें म्हणतां येईल. ह्यांनीं पुराणमतवादी पंडितांशीं कडाक्याचा वाद चालविला, आणि मूळ वेदांच्या चार संहिताशिवाय इतर सर्व हिंदुधर्मग्रंथांचें प्रामाण्य झुगारून दिलें. ह्या चार वेदांवरच त्यांनीं आपल्या एकेश्वरी मताची मदार रचिली. वेदांचा अर्थ लावीयाचा तो यास्काचार्यांच्या अनुसारेंच ( इ. स. पूर्वी ५०० ) लावावा, असा ह्यांचा आग्रह होता. मागाहून ह्या अर्थाचा कसा घोंटाळा करण्यांत आला आहे, हें त्यांनीं निर्भयपणानें प्रतिपादलें. स्वामी दयानंद सरस्वतीचे अनुयायी आपल्याला आर्य म्हणवीत आहेत; ते जरी वेदांच्या प्रामाण्याला अद्यापि चिकटून आहेत तरी त्यांचा ते अशा खुबीनें अर्थ लावितात कीं, आधुनिक विचारांशीं त्यांचा कसा तरी जम बसेलच. मूर्तिपूजेचा निषेध, ईश्वराचें ऐक्य व शुद्ध स्वरूप आणि सामाजिक सुधारणेचीं सर्व अंगें ह्यामध्यें आर्यांचा ब्राह्मांइतकाच जोराचा व निष्कपट पुढाकार आहे. ते जरी वेदप्रामाण्य मानितात, तरी केव्हां केव्हां त्यांची मजल सार्वत्रिक धर्माच्या अगदीं उच्च शिखरापर्यंत जाऊन पोंहोचते, हे लाला रालाराम ह्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येण्यासारखें आहेः—खिस्तानें सांगितलेले धर्माचें उदात्त आदर्श —खिस्त्यांनीं नव्हे, आर्यसमाज स्वीकारीत आहे. तलवारीनें पसरण्यांत आलेला इस्लाम नव्हे तर सर्व विश्वासियांसी शांतीनें व प्रीतीनें राहणारा व ईश्वरास शरण जाण्यास लावणारा इस्लामी धर्म आर्य समाज अगदीं आपला असा म्हणत आहे. बुद्धाची अंतःशुद्धि, वैराग्य, आणि उच्चनीति हीं तर आर्यसमाजाची वारशाची मिळकतच आहेत. एकंदरींत दैवी पितृत्व व मानवी बंधुत्व हाच धर्म आर्यसमाज सांगत आहे."

वेदांसंबंधीं त्यांचा जो विशेष कटाक्ष आहे, त्यामुळें, आर्यांच्या ज्या प्राचीन ग्रंथांची आज कित्येक शतकें हेळसांड होत आहे, त्याकडे राष्ट्राचें आतां नवीन लक्ष लागूं लागलें आहे व त्याचें नीट अध्ययन होऊं लागलें आहे. २५ वर्षांच्या थोड्या अवकाशांत विचारसंघटना, आणि प्रचार इ०. बाबतींत आर्यांनीं अगदीं आश्चर्यकारक मजल मारली आहे. हल्लीं २५० आर्यसमाज आहेत. तरुणांना शिकविण्यासाठीं व प्रचारक तयार करण्यासाठीं त्यांच्या दोन मोठ्या संस्था आहेत. खिस्ती व म[illegible] लोकांतूनही ते आपले सभासद करून घेतात[illegible]

### [illegible]कल सोसाईटी.

ही एक [illegible] मोठी चळवळ आहे. जरी ही चळवळ [illegible]थम अमेरिकेंत निघाली, तरी हिची मूळ प्रेरणा पूर्वेकडूनच आली आहे व आतां तर हिचें मुख्य ठाणें हिंदुस्थानच वसविण्यांत आलें आहे. हिचीं गूढ मतें व हटवाद एका बाजूस ठेवून पाहिलें असतां हिच्याकडूनही प्रगतीचें शुभ कार्य बरेंच होत आहे असें आढळून येईल. १ विश्वबंधुत्व २ वर्तुलात्मक धर्म, तत्त्वज्ञान व शास्त्र ह्यांचें अध्ययन वाढविणें. ह्या दोन हेतूंस अनुसरून ह्या मंडळींत असंख्य हिंदु, पार्शी, मुसलमान, खिस्ती, आणि बौद्ध ह्यांचा शिरकाव झाला आहे; व त्यांची

स्वतःचें असें कांहींच नाहीं असाही आक्षेप बाहेरच्या मंडळीकडून वेळोवेळीं येतो. पण त्याची पर्वा न करितां ब्राह्म मंडळी, सर्व धर्मविभूतींशीं सहवास आणि त्यांचे शिष्यांशी सख्य साधण्यास तत्पर असते.

२ सयुक्तिकता—वरील सर्वात्मकता ही केवळ एक मनोवृत्ति किंवा विचार न करतां सांपडेल तें स्वीकारण्याचा प्रयत्न आहे असें नव्हे. आपल्या स्वतःच्या विवेकशक्तीचा उपयोग करण्यास कोणीही ब्राह्म कधीं मागें घेत नाहीं. धर्माध्ययनाच्या सर्व प्रदेशांत आधुनिक शोधाचें किती महत्त्व आहे हें तो जाणून असतो व त्यांचा स्वीकारही करतो. त्याचें शास्त्र व त्याचा धर्म ( विवेक आणि विश्वास ) ह्यांच्यामध्यें कधीं लढा पडत नाहीं किंवा हीं दोन्ही कधीं परस्परापासून अलग राहत नाहींत.

३ आध्यात्मिकता—परंतु ब्राह्माच्या जाणीवेचा मुख्य उगम आणि आधार म्हटला तर चैतन्यच आहे, त्याचें मन नव्हे, पाश्चात्य बुद्धिवादाचा त्याच्यावर कितीही परिणाम झाला असला तरी त्याला धर्मबाबतींत भाव आणि भक्ति हींच तत्त्वें प्रधान वाटतात. ह्या बाबतींत श्रीमान् केशवचंद्र सेन ह्यांच्या चारित्र्याचा परिणाम समाजावर विशेष घडला आहे. ते आपल्या अंतर्मार्गानेंच धर्माचा ठाव घेण्याचे कामीं एकाद्या नुसत्या भाष्यकारापेक्षांही खोल बुडी मारूं शकले किंवा एकाद्या पंडितापेक्षांही वर मजल मारूं शकले.

४ व्यावहारिकता—पूर्ण ब्राह्म व्हावयाचें तर नुसत्या विचारानें किंवा मनोवृत्तीच्या द्वारेंच होतां येणार नाहीं. प्रथम स्वतःला व नंतर जगाला प्रत्यक्ष सेवा करून आपल्या धर्माची प्रतीति दाखवावयाची असते. ब्राह्मांची वेदी म्हणजे आपल्या मनोवृत्तींचे सोहाळे उपभोगावयाचें क्रीडाभुवन, किंबहुना अचिंत्य वस्तुविषयीं तर्कवितर्कांचें चऱ्हाट वळण्याचें किंवा वादविवादाचें जाळें विणण्याची वखार नव्हे, तर भरतभूमीच्या अभ्युदयाला हल्लीं अत्यंत आवश्यक असलेल्या सामाजिक सुधारणेच्या सर्व प्रकारच्या युद्धाचें उघडें समरांगणच होय.

## कार्यपद्धति.

५ तडजोड नाहीं. कित्येक हितचिंतकांकडून ब्राह्मांना वेळोवेळीं असें भासविण्याचा प्रयत्न होत असतो कीं ब्राह्मांनीं आपलीं मतें हल्लींपेक्षां कमी निस्पृहपणानें प्रतिपादलीं असतां आणि जुन्या लोकांचे जे आचार बरवरचे आहेत त्यांच्याशीं अधिक तडजोडीनें वागलें असतां त्यांच्या कामांत अधिक यश येण्याचा संभव आहे. पण मूर्तिपूजा आणि विधींचें अवडंबर ह्याचें दुर्भेद्य कवच फोडून आंत अडकून राहिलेलें धर्मबीज मोकळें करण्याची आज्ञा ब्राह्मसमाजाला वरून झाली आहे अशी जोंवर त्याची भावना राहील तोंवर त्याला सर्व प्रकारच्या गुळचट मिथ्यावादाला शांतीनें व धैर्यानें तोंड दिलेंच पाहिजे. आपल्या देशाच्या राष्ट्रीयतेचा विध्वंस करणारे असाही आरोप ब्राह्मांवर लादण्यांत येतो. तथापि उज्ज्वल, सत्य आणि उच्चतर हितही साधण्यासाठीं त्यांना सुधारणें आपलें कठीण व्रत निश्चयानें पाळलेंच पाहिजे. जैन, लिंगाईत, शीक इ. पुष्कळ सुधारक पंथांनीं प्रथम प्रथम पुराणधर्मावर आपले जोराचे हल्ले केले पण अखेरीस तेही आतां त्याच गर्तामध्यें रुतून एकजीव होऊन गेले आहेत. ह्याचें कारण त्यांचीं मतें पूर्वीं उदार नव्हतीं असें नव्हे तर पुढें आपल्या उदार बहाण्यास कायमचें जीवन प्राप्त होईल असा कडकडीतपणा त्यांनीं अखेरपर्यंत राखला नाहीं हेंच होय. ब्राह्मसमाजानें आपल्या पुढें हा धडा चांगला ठेविला आहे.

६ हटवाद नाहीं. जुन्या मताविषयीं ब्राह्मांची इतकी कडकडीत खबरदारी आहे तरी त्यांच्या स्वतःच्या मताविषयीं त्यांचा दुसऱ्यावर जुलूम किंवा आग्रहही नाहीं. धार्मिक जीवन आणि त्याची प्रगति ह्यासाठीं कोणत्याही हटवादाची विधितः अथवा निषेधतः आवश्यकता नाहीं असा ब्राह्मांचा अनुभव आहे. जडशास्त्रांचा अतिशयित नकार आणि धर्मशास्त्रांचा अतिशयित होकार ह्या दोहोंचा अडथळा धर्ममार्गांत सारखाच कसा येतो हें ते पूर्ण ओळखून आहेत. एकाद्या थोर कड्याच्या काठाशीं एकादें भयचकित अर्भक जसें उभें रहावें तसाच ब्राह्मही वाचातीत आश्चर्य व आनंद ह्यांनीं युक्त असा अदृश्य ईश्वराचे द्वारीं तटस्थ उभा आहे.

७ पंथ नाहीं—मताप्रमाणेंच संघामध्येंही सर्वत्र मोकळेपणा आहे. समाजाचीं द्वारें सर्वांला सर्वदां खुलीं आहेत. आंत येण्याला कोणास संकोच वाटत असल्यास त्याचेंच नशीब !

### कार्य.

सर्व हिंदुस्थान देशभर शंभराहून अधिक समाज आहेत. समाजांतील प्रमुख गृहस्थ साप्ताहिक उपासना चालवितात. धंदेवाईक पुरोहित नाहींत. प्रचारक तयार करण्यासाठीं साधनाश्रम नांवाची एक मध्य संस्था कलकत्त्यास आहे. तत्त्वांचा प्रसार करण्याचे कामीं गृहस्थ मंडळीही बराच हातभार लावते. जातिभेद नाहींसा करणें, बालविवाह बंद करणें, स्त्रीशिक्षण वाढविणें आणि विधवाविवाहाची आडकाठी काढणें ह्या व इतर गृह्य आणि सामाजिक सुधारणांचा नेटानें ही मंडळी पुरस्कार करिते.

इंग्लंड व अमेरिका येथील युनिटेरिअन लोकांशीं ब्राह्मांची पूर्वीपासूनच फार सहानुभूति आहे. अलीकडे लंडन येथील ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरिअन असोसिएशन् आपल्या खर्चानें हिंदुस्थानांतील ब्राह्म विद्यार्थ्यांची ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांत तुलनात्मक धर्माध्ययनाची सोय करून व आपले प्रतिनिधी हिंदुस्थानांत पाठवून उदारधर्माचें कार्य व राष्ट्राराष्ट्रांतील सख्य बरेंच वाढवीत आहेत.

### आर्यसमाज.

ही एक दुसरी एकेश्वरी धर्माची मोठी चळवळ आहे. ह्याची संस्थापना स्वामी दयानंद सरस्वती (१८२४–१८८३) ह्यांनीं १८७५ त केली. ह्याला आधुनिक हिंदुस्थानाचा लूथर असें म्हणतां येईल. ह्यांनीं पुराणमतवादी पंडितांशीं कडाक्याचा वाद चालविला, आणि मूळ वेदांच्या चार संहिताशिवाय इतर सर्व हिंदुधर्मग्रंथांचें प्रामाण्य झुगारून दिलें. ह्या चार वेदांवरच त्यांनीं आपल्या एकेश्वरी मताची मदार राचिली. वेदांचा अर्थ लावायाचा तो यास्काचार्यांच्या अनुसारेंच (इ. स. पूर्वी ५००) लावावा, असा ह्यांचा आग्रह होता. मागाहून ह्या अर्थाचा कसा घोंटाळा करण्यांत आला आहे, हें त्यांनीं निर्भयपणानें प्रतिपादलें. स्वामी दयानंद सरस्वतीचे अनुयायी आपल्याला आर्य म्हणवीत आहेत; ते जरी वेदांच्या प्रामाण्याला अद्यापि चिकटून आहेत तरी त्यांचा ते अशा खुबीनें अर्थ लावितात कीं, आधुनिक विचारांशीं त्यांचा कसा तरी जम बसेलच. मूर्तिपूजेचा निषेध, ईश्वराचें ऐक्य व शुद्ध स्वरूप आणि सामाजिक सुधारणेचीं सर्व अंगें ह्यामध्यें आर्यांचा ब्राह्मांइतकाच जोराचा व निष्कपट पुढाकार आहे. ते जरी वेदप्रामाण्य मानितात, तरी केव्हां केव्हां त्यांची मजल सार्वत्रिक धर्माच्या अगदीं उच्च शिखरापर्यंत जाऊन पोंहोचते, हे लाला रालाराम ह्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येण्यासारखें आहे:—खिस्तानें सांगितलेले धर्माचें उदात्त आदर्श –खिस्त्यांनीं नव्हे, आर्यसमाज स्वीकारीत आहे. तलवारीनें पसरण्यांत आलेला इस्लाम नव्हे तर सर्व विश्वासियांसी शांतीनें व प्रीतीनें राहणारा व ईश्वरास शरण जाण्यास लावणारा इस्लामी धर्म आर्य समाज अगदीं आपला असा म्हणत आहे. बुद्धाची अंतःशुद्धि, वैराग्य, आणि उच्चनीति हीं तर आर्यसमाजाची वारशाची मिळकतच आहेत. एकंदरींत दैवी पितृत्व व मानवी बंधुत्व हाच धर्म आर्यसमाज सांगत आहे."

वेदांसंबंधीं त्यांचा जो विशेष कटाक्ष आहे, त्यामुळें, आर्यांच्या ज्या प्राचीन ग्रंथांची आज कित्येक शतकें हेळसांड होत आहे, त्याकडे राष्ट्राचें आतां नवीन लक्ष लागूं लागलें आहे व त्याचें नीट अध्ययन होऊं लागलें आहे. २५ वर्षांच्या थोड्या अवकाशांत विचारसंघटना, आणि प्रचार इ०. बाबतींत आर्यांनीं अगदीं आश्चर्यकारक मजल मारली आहे. हल्लीं २५० आर्यसमाज आहेत. तरुणांना शिकविण्यासाठीं व प्रचारक तयार करण्यासाठीं [illegible] दोन मोठ्या संस्था आहेत. खिस्ती व म[illegible] लोकांतूनही ते आपले सभासद करून घेतात[illegible]

### [illegible]कल सोसाईटी.

ही एक[illegible] मोठी चळवळ आहे. जरी ही चळवळ [illegible]थम अमेरिकेंत निघाली, तरी हिची मूळ प्रेरणा पूर्वेकडूनच आली आहे व आतां तर हिचें मुख्य ठाणें हिंदुस्थानच वसविण्यांत आलें आहे. हिचीं गूढ मतें व हटवाद एका बाजूस ठेवून पाहिलें असतां हिच्याकडूनही प्रगतीचें शुभ कार्य बरेंच होत आहे असें आढळून येईल. १ विश्वबंधुत्व २ वर्तुलात्मक धर्म, तत्त्वज्ञान व शास्त्र ह्यांचें अध्ययन वाढविणें. ह्या दोन हेतूंला अनुसरून ह्या मंडळींत असंख्य हिंदु, पार्शी, मुसलमान, खिस्ती, आणि बौद्ध ह्यांचा शिरकाव झाला आहे; व त्यांची

संख्या झपाट्यानें वाढतच आहे. ह्या मंडळींत दाखल झाल्यावरही ह्या निरनिराळ्या शिष्यांना, आपापले पूर्वाश्रम जसेच्या तसेच शाबूद राखतां येत आहेत ही एक ह्या मंडळीची प्रौढी आहे व बाहेरच्यांना कोडें आहे. तथापि ज्याअर्थी ह्या मंडळीच्या प्रयत्नामुळें निरनिराळ्या मनुष्यवर्गांमध्यें आध्यात्मिक जागृति, धर्मसंबंधीं सहिष्णुता आणि परस्पर परिचय वाढत आहे, त्याअर्थीं प्रगतीचा अभिमान बाळगणाऱ्या सर्वांनीं ह्या मंडळीचें स्वागतच करणें योग्य आहे. पुराणमतांचे जे शुष्क सांगाडे पडून राहिले आहेत, त्यांवर ह्यांनीं चालविलेली हातचलाखी व अतींद्रिय प्रदेशांतील त्यांच्या घाडशी भराऱ्या आणि सुलभ संचार हीं सर्व पाहून जरी बरेच वेळां ह्यांच्या कार्यपद्धतीबद्दल मन साशंक होतें, तरी ह्या मंडळीचे हिंदुस्थानांतील पुढारी मिसेस बिझांट आणि कर्नल ऑल्कॉट् ह्यांच्या हेतूंविषयीं शंका घेण्यास जागा दिसत नाहीं. उलट काशी येथील सेंट्रल हिंदू कॉलेज आणि मद्रासेंतील पारिया मुलांकरितां काढिलेल्या शाळा वगैरे ह्यांचे लोकोपकाराचे व्यावहारिक आणि कळकळीचे प्रयत्न पाहून सर्वांनाच आदर वाटण्यासारखा आहे.

गेल्या २० वर्षांत सर्व जगांत ह्या मंडळीच्या ७१४ ठाणीं स्थापण्यांत आलीं आहेत, पैकीं २२२ हिंदुस्थानांत आहेत.

ह्या तीन्ही चळवळींचा उगम आणि ह्यांचें चालू कार्यही एकमेकांपासून मार्गें अलग आहे. ह्यापैकीं ब्राह्मसमाज ब्राह्म. प्रस्तुत (युनिटेरिअन्) महासभेच्या वृत्तीच्या अगदीं अनुकूल आहे असें मला वाटतें. नंतर जरा दोन्ही चळवळी देखील ज्याअर्थीं आमच्या विरुद्ध नाहींत त्याअर्थीं आमच्याच पक्षाच्या आहेत, असें समजण्यास हरकत नाहीं. आमच्या परस्परांतील ऐक्य जें आज आम्हांस दिसत नाहीं, तें पुढें दिसून येईल.

मध्यंतरीं माझा भरंवसा असा आहे कीं, हल्लींपेक्षां ब्राह्म समाजाची संघटना अधिक नेटानें झाल्यास, पौरस्त्य खंडांत अधिक विस्तृत प्रमाणावर शुभ कार्य साधण्यासाठीं ब्राह्मसमाज ही एक उत्तम भूमिका मिळेल. हें शुभ कार्य म्हणजे एका बाजूस ब्रह्मदेश, सयाम, सिलोन आणि जपान येथील उदार बौद्ध व दुसऱ्या बाजूस हिंदुस्थानांतील उदार मुसलमान आणि इराणांतील बाबी पंथानुयायी ह्यांच्यामध्यें घडवितां येणारें सख्य व सहकार्य हें होय. आतां देखील ह्या उदार चळवळी आशिया खंडांत आपापलें कार्य अलग राहून करीत आहेत; न जाणो भावी ऐक्याकडेच त्या मार्ग शोधीत आहेत! आमची तशी इच्छा असल्यास, हें दिव्य स्वप्न सफल करण्याकरितां पूर्व आणि पश्चिम ह्यांचें सहकार्यच झालें पाहिजे. जुन्या ख्रिस्तीधर्मानें दुसऱ्या तितक्याच, किंबहुना जास्त जुन्या व हट्टी धर्मांशीं विनाकारण डोईफोड चालविली आहे. ह्यापुढें उदार ख्रिस्तीधर्मानें निरनिराळ्या तद्देशीय उदार प्रयत्नांमध्यें नवीन हुरूप भरून त्यांच्या खांद्याला खांदा लावावा. पुढें होणारें युद्ध हें अमुक वाद व तमुक धर्म ह्यांमध्यें नसून एकापक्षीं सर्व जुन्या धर्मांचीं शुष्क हाडें व दुसऱ्या पक्षीं धर्माचें रसभरीत व उचंबळणारें जीवन ह्यामध्यें होणार आहे. प्रस्तुत महासभा ही आगामी युगाची मोठी पताका आहे, असा आमचा भरंवसा आहे.

# भाग तिसरा,—उपदेश.

## आवड आणि प्रीति.

( ता० १४–७–१९०८ रोजीं रा. रा. भास्करराव तखेड यांच्या येथें कौटुंबिक उपासनेच्या वेळीं झालेल्या उपदेशाचा सारांश. )

॥ गोड तुझें नाम दयाळा आवडतें मज ॥

आवड आणि प्रीति हे दोन शब्द व्यवहारांत बहुधा आपण समानार्थींच योजीत असतों पण ह्यांचे अर्थ व संकेत परस्परांशीं ताडून पाहून त्यांची किंचित् परीक्षा केली तर लवकरच कळून चुकेल कीं ते परस्परांहून भिन्न आहेत, इतकेंच नव्हे तर अगदीं उलट आहेत. आपण म्हणतों कीं आपल्याला एकादी वस्तु आवडते; जशी एकादे दिवशीं रुचकर झालेली ताटांतली चटणी, अंगावरचा अलंकार किंवा पहाडांतला अगर समुद्रकांठचा देखावा, अथवा कालिदासासारख्याच्या काव्यांतील एकादा उतारा. दुसऱ्या पक्षीं आम्ही म्हणतों कीं एकाद्या प्राण्यावर प्रेम आहे; जसें आपलें लाडकें कुत्रें अथवा सलगीचा मित्र किंवा एकुलता एक पुत्र ह्यावर आम्ही करितों तें. ताटांतल्या चटणीपासून तों कविराजाच्या काव्यापर्यंत परंपरेनें उंच उंच होत जाणारे हे सर्व पदार्थ एक पक्षीं आपल्या आवडीचे विषय होतात तर दुसऱ्या पक्षीं कुत्र्यापासून तों पोटच्या गोळ्यापर्यंत प्राणी आपल्या प्रीतीचे विषय होतात. आतां व्यवहारांत यद्यपि प्रीति आणि आवड ह्या शब्दांची योजना करितांना आपण अगदीं गोंधळ करून टाकतों, तरी वरील उदाहरणावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे कीं आवडीचे सारे विषय आमच्या केवळ थोड्याबहुत उपभोगास कारण होतात, तर प्रीतीचे विषय मात्र आम्हांस कमी अधिक मानानें स्वार्थत्याग करावयास लावतात म्हणजे आवडीचें लक्षण उपभोग आणि प्रीतीचें लक्षण त्याच्या उलट स्वार्थत्याग हें होय. आवडीचा विषय कोणताही अचेतन पदार्थ असूं शकतो, पण प्रीतीचा विषय होण्याला चैतन्याचीच जरूरी असते; मग तें चैतन्य कुत्र्यामांजरांतल्या प्रमाणें झांकलेलें बद्ध चैतन्य असो किंवा साधुसंतांतल्या प्रमाणें प्रकाशणारें मुक्त चैतन्य असो. एका पक्षीं आमच्या आवडीच्या विषयाला आम्ही आपल्या सुखासाठीं त्याचा अंत होईपर्यंतही झिजविण्यास किंवा एकदम गट्ट करण्यासही तयार असतों, तर दुसऱ्या पक्षीं आमच्या प्रीतीच्या विषयासाठीं आम्ही स्वतःचा अगदीं अंत होई तोंपर्यंत तनमन झिजून जातों. आतां असेही कांहीं विक्षिप्तराव आढळतात कीं जे आपल्या फाटक्या जोड्यासाठींही प्राण धोक्यांत घालतील. ह्या उत्पटांग भावनेला आवडही म्हणतां येत नाहीं व प्रीतीही म्हणतां येत नाहीं. ती केवळ कृपणता; व तिचा विचारही येथें करावयास नको. पण वरील उदाहरणावरून आवड व प्रीति हे केवळ पर्यायवाचक शब्द नाहींत हें सिद्ध झालें. आणि म्हणून जरी आम्ही दिवाणखान्यांतल्या आपल्या एका आवडीच्या सुबक आरामखुर्चीवर आपली प्रीति आहे असें केव्हां केव्हां व्यवहारांत सहज म्हणून जातों तरी खरें पाहतां हा अगदीं चुकीचा व्यवहार आहे हें उघड आहे.

पण प्रस्तुत समयीं मला केवळ भाषेची मीमांसा किंवा दुरुस्ती करावयाची नाहीं. आवड आणि प्रीति ह्यांचे खरे अर्थ ह्या प्रसंगीं स्पष्ट करण्याचा उद्देश निराळाच आहे. आवडी आणि प्रीति ह्यांची, भोग आणि त्याग अशीं परस्पर विरुद्ध लक्षणें आहेत असें सांगितलें. असें असूनही संसारांत निरनिराळ्या माणसांशीं आमचे जे स्नेहाचे संबंध जडतात त्यांना सरसकट प्रीति हेंच नांव देण्यांत येतें. पण वस्तुतः बहुतेक प्रकार केवळ आवडीचेच असतात. एका मित्रानें मला स्पष्ट सांगितलें कीं, त्यांना लहान मुलांवर प्रीति करावीशी वाटते पण तीं मुलें मात्र सुंदर असलीं पाहिजे. रस्त्यांत जर एकादें गोजीरवाणें मूल पाहिलें तर तें कोणाचेंही असो उचलून त्याचें चुंबन घ्यावेंसें त्यांना वाटतें. स्पष्ट सांगितल्याबद्दल मित्राची मीं तारीफ केली. पण ज्या गोड बालकाविषयीं ह्या मित्राची अशी स्थिति होते त्याच्या आईची त्या बालकासंबंधीं भावना व ह्या मित्राची भावना

विचारूं, हा भाव जसा त्या तरुणींत आढळून येतो व ती त्या माणसाच्या वाऱ्यास उभी राहत नाहीं, त्यास टाळते, त्याचप्रमाणें आमचे कित्येक तरुण करीत असतात ! देव प्रेमाचें भातुकें हातीं घेऊन प्रेमानें आम्हांला पाचारीत असतां आम्ही त्याला पाठमोरे होतों, त्याच्या अंकीं बसून त्याच्या प्रेमाचा लाभ घेण्यास आम्हीं घजत नाहीं. हा असला संबंध आम्हीं टाळला पाहिजे. देवापाशीं जाण्यास आम्हीं लाजणें म्हणजे आम्ही आमच्या हानीस कारण होणें होय हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

परंतु देवाशीं अतिपरिचय होणें म्हणजे काय तें कदाचित् तत्क्षणीं आपल्या लक्षांत यावयाचें नाहीं. कारण देवाशीं आमचा परिचय घडावयाची जेथें मारामार तेथें अतिपरिचय होऊन पुढें अवज्ञा कशी होणार ? होय; आमचा देवाशीं अतिपरिचय होतो. आणि त्यामुळें त्याची आह्मी अवज्ञाही करितों; त्याचा व आमचा काय संबंध आहे हें अगदीं विसरतों. त्याची योग्यता विसरतों व त्यास आह्मीं केवळ निर्जीवाहून निर्जीव दुर्बळाहून दुर्बळ असा करून टाकतों ! आणि हें केवळ संवयीच्या जोरावर आह्मी करीत असतो. कल्पना करा कीं एकाद्या माणसाला रोज प्रार्थना करण्याची, भजन करण्याची संवय आहे. असा मनुष्य त्याच्या मनाची तयारी नसली, मन अत्यंत मलिन, पापविचारांनीं भरलेलें असें जरी असलें तरी देवापाशीं जाऊन त्याची स्तुति, त्याची प्रार्थना करण्यास, त्याचा म्हणवून घेण्यास मागें पुढें पहात नाहीं आपले कुटिल विचार सर्वज्ञ देव जाणून आहे, आपलें अशुद्ध अंतःकरण त्यास चांगलें दिसत आहे, आपला वरपंगी व बेगडी भक्तिभाव त्यास केव्हांच कळून चुकलेला आहे हें तो विसरतो; व सात्त्विक भक्तिभावाचा आव आणून आपणा स्वतःस फसवून घेतो ! अशा वेळीं सर्वज्ञ, सर्वसमर्थ, जो देव त्यास मूढाहून मूढ, दुबळ्याहून दुबळा तो करून टाकतो नाहीं तर काय? हा मनुष्य आधीं किती तरी दुबळा आणि मलिन, पण ती मलिन स्थिति देवाला न कळण्यासाठीं वर भक्तीचें, पवित्रपणाचें, भजनाचें, तें आवरण असतें ! हें देवाशीं अगदीं उद्दामपणाचें व बेमुर्वतीचें वर्तन असें मीं समजतों. आह्मी जे प्रार्थनासामाजिक, जे आह्मी वारंवार प्रार्थना व भजन करणारे त्यांच्यांत हा दांभिक भाव शिरण्याचा संभव आहे. म्हणून आम्ही त्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देवावर आमचें प्रेम पाहिजे. पण, त्याच्या संबंधानें आमच्या ठिकाणीं आदरभाव पाहिजे, भीतीही पाहिजे. एकादें चांगल्या वळणांतील मूल पहा, त्याचें आपल्या आईवर प्रेम नसतें काय? बापावरही प्रेम असतें. तें मूल आईबापाशीं फार सलोख्यानें वागतें. पण, त्यांच्या संबंधानें त्याचे ठिकाणीं किती आदर, त्यांचा त्यास किती वचक असतो ! तेंच लाडानें बिघडलेलें किंवा इतर वाईट मुलांच्या सहवासानें उद्दाम बनलेलें मूल घ्या. त्यास आपल्या आईबापासंबंधानें कांहीं क्षिति वाटत नाहीं. त्यांच्या समोर तें वाटेल तीं ढोंगें करील, खोटें बोलून वेळा मारून नेईल, सर्व कांहीं करील ! आमचा व देवाचा संबंध असा अवज्ञा करण्यापर्यंत केव्हांही येऊं नये. तो अनंत, आम्हीं सान्ताहून सान्त, तो सर्वज्ञ, आम्ही आपणास अल्पज्ञ म्हणविणें म्हणजे ही आम्ही आमच्या ज्ञानाची घमेंड दाखविणें होय. तो सर्वसमर्थ आणि आम्ही सर्वतोपरि दुर्बळ; तो प्रेम करणारा आणि आम्ही त्याचे प्रेमास अपात्र; तो न्यायी आणि आम्ही अन्यायाकडे सदा धांवणारे असा त्यांच्यामध्यें व आमच्यामध्यें भेदभाव आहे. हा भेदभाव ओळखून, त्यास वचकून असलें पाहिजे. त्याच्यापुढें जावयाचें तर अंतःकरण शुद्ध करून, मलिन भाव शुद्ध करून आम्हीं गेलें पाहिजे. निदान अंतःकरण मलिन आहे हें त्याजपाशीं अनुतापपूर्वक कबूल तरी केलें पाहिजे. त्या मलिन स्थितीवर जाणूनबुजून आवरण घालण्याचा तरी प्रयत्न होतां कामा नये.

## स्तुति, निर्भत्सना व निंदा.

(रा. रा. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांच्या घरीं कौटुंबिक उपासनेच्या वेळीं मंगळवार ता. ७-१२ १९०९ रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

**जाणोनि नेणतें करीं माझें मन ।**
**तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥**
**मग मी व्यवहारीं असेन वर्तत ।**
**जेवीं जळा आंत पद्मपत्र ॥ २ ॥**
**ऐकूनि नाइकें निंदास्तुति कानीं ।**

**जैसा का उन्मनी योगीराज ॥ ३ ॥**
**तुका म्हणे ऐसें झालिया वांचून ।**
**करणें तें तें शीण वाटतसे ॥ ४ ॥**

संसार करीत असतांना आपल्याला अने[क] प्रकारच्या व्यवहारांत निमग्न रहावें लागतें. आ[णि] हे व्यवहार करीत असतांना आपली स्तुति ऐक[ण्या]च्याचे प्रसंग प्रत्येकास येतात. निंदेचेही प्रसं[ग] येतात, त्यांचा विचार पुढें करूं. परंतु आप[ल्या] हातून सद्व्यवहार घडो, किंवा अविचाराचीं कृत्[यें] होवोत, आपली कोणीनाकोणी केव्हां तरी स्तु[ति] करणारें आढळतेंच! बाहेरचें कोणी नसलें त[री] आपलें आप्त, आपली बहीण, पत्नी असें को[णी] तरी आपली स्तुति करतेंच. तूर्त हा स्तुतिनिंदे[चा] विचार मनांत यावयास आमचे तरुण मित्र रा. र[ा.] केशव सदाशिव केळकर ह्यांनीं केकावलीवर [ए]क लहानसा वाचनीय निबंध लिहून प्रसि[द्ध] केला आहे, त्याच्या अखेरीस दिलेल्या केकांती[ल] पुढील केका विशेष रीतीनें कारण झाली आहे:—

**गमो मधुर हें विष स्तवन सेवितां माजवी**
**करी मलिन सद्यशोमुख हलाहला लाजवी**
**हरापरिस तूं बरा प्रभुवरा सदा जो पिशी**
**असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी**

ह्या केकेमध्यें पंतांनीं हरीला हरापेक्षां म्हण[जे] शंकरापेक्षां श्रेष्ठ ठरविलें आहे. शंकरानें हलाह[ल] नामक अत्यंत जहाल विष एकदां प्राशन केलें आणि त्यानें तें पचविलेंही. परंतु त्याचा शे[ष] राहिला म्हणून म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणा[मु]ळें असो त्याला नीलकंठ असें म्हणतात! तथापि परमेश्वराची स्थिति ह्यापेक्षां फार निराळी आहे. अत्यंत जहाल जें हलाहल विष त्याच्या[ही]पेक्षां जहाल विष ह्या जगांत आहे. त्याचें परमेश्वर सेवन करितो; तें घटाघटा पितो एवढेंच न[व्हे] तर 'असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी' इतकें जहालांतलें जहाल विष कोणतें? त[र] तें 'स्तुति' हें होय. हें विष आहे असें आम्हांल[ा] वाटतही नाहीं, म्हणून आम्ही तें पचवितों; घटघटा त्याचें प्राशन करितों; पण त्याचा अत्यं[त] अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहत नाह[ीं]. आम्हांला आमची कोणी स्तुति केली म्हणजे ज[रा] बरें वाटतें. काम करण्यास उत्साह येतो अ[सें] वाटतें व काम करण्यास उत्साह यावा, उत्तेज[न] मिळावें म्हणून स्तुतीची आवश्यकता आहे असें वाटूं लागतें. विडी ओढण्याचें व्यसन ज्यास अद्याप लागलेलें नाहीं अशा मनुष्यानें विडीचा एक झुरका मारला कीं, त्यास मोठी हुषारी आली असें वाटतें; पण, पुढें तें उत्तेजन वगैरे बाजूस राहून धूम्रपान हें त्यास व्यसनच जडतें व त्यावांचून त्याचें चालत नाहींसें होतें. स्तुतिरूपी हे विष त्याहून वाईट आहे. व्यसनाचे अनिष्ट परिणाम आपल्याला दिसतात; व्यसन वाईट म्हणून टाळण्याचा आपल्याला प्रयत्न करितां येतो. पण मनुष्य एकदां स्तुतिप्रिय झाला कीं मग त्याच्या अधोगतीस सीमा नाहींशी होते हें आपण नित्य लक्षांत ठेविलें पाहिजे. आपल्या ठिकाणीं पात्रता नसतां आपली जी स्तुति होते त्याच्यायोगें जडता प्राप्त होतेच; परंतु हा पात्रापात्रतेचा विचार तूर्त दूर ठेविला तरी स्तुति आमच्या अधोगतीसच कारण होते असें दिसून येईल.

मी एकादें उपयुक्त कार्य करीत आहें असें वाटून लोक माझी स्तुति करूं लागतात. लोक बरें म्हणूं लागतांच तें कार्य प्रथम अधिक उत्साहानें करावयास लागतों; पण हा उत्साहच माझ्या घातास कारण होतो. नंतर लोकांनीं माझी स्तुति केलीच पाहिजे अशी भावना माझ्या ठिकाणीं उत्पन्न होते. स्तुतीला मी पात्रच आहें, इतरांपेक्षां मी थोर आहें, माझ्या ठिकाणीं इतरांपेक्षां परोपकारबुद्धि अधिक वास करीत आहे; देशहिताची आस्था मलाच आहे असें वाटून मी अधोगतीस जात असतों आणि ह्या माझ्या अवनतीस, हलाहलापेक्षांही जहाल जें स्तुतिरूपी विष तेंच कारण झालेलें असतें.

आतां आपण निंदेविषयीं थोडा विचार करूं. आणि तो करीत असतां निर्भर्त्सनेसंबंधानें असे दोन शब्द सांगणें जरूर आहे कीं, कोणाच्याही हातून घडलेल्या वाईट कृत्याबद्दल जी निर्भर्त्सना होते ती व निंदा एक नव्हत. निर्भर्त्सना होणें हें ठीक आहे. नीच कृत्य झालें कीं तें करणाराची निर्भर्त्सना झालीच पाहिजे. पण, ती त्याची निंदा नव्हे. हातून वाईट कृत्य होत नसूनही आपणास दोष देण्यांत येत असतो, आपल्याविषयीं भलभलते ग्रह आपल्या सभोंवार होत असतात, चर्चा चालू असते, ती निंदा, निर्भर्त्सना व

विचारूं, हा भाव जसा त्या तरुणींत आढळून येतो व ती त्या माणसाच्या वाऱ्यास उभी राहत नाहीं, त्यास टाळते, त्याचप्रमाणें आमचे कित्येक तरुण करीत असतात! देव प्रेमाचें भातुकें हातीं घेऊन प्रेमानें आम्हांला पाचारीत असतां आम्ही त्याला पाठमोरे होतों, त्याच्या अंकीं बसून त्याच्या प्रेमाचा लाभ घेण्यास आम्हीं धजत नाहीं. हा असला संबंध आम्हीं टाळला पाहिजे. देवापाशीं जाण्यास आम्हीं लाजणें म्हणजे आम्ही आमच्या हानीस कारण होणें होय हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

परंतु देवाशीं अतिपरिचय होणें म्हणजे काय तें कदाचित् तत्क्षणीं आपल्या लक्षांत यावयाचें नाहीं. कारण देवाशीं आमचा परिचय घडावयाची जेथें मारामार तेथें अतिपरिचय होऊन पुढें अवज्ञा कशी होणार? होय; आमचा देवाशीं अतिपरिचय होतो. आणि त्यामुळें त्याची आह्मी अवज्ञाही करितों; त्याचा व आमचा काय संबंध आहे हें अगदीं विसरतों. त्याची योग्यता विसरतों व त्यास आह्मी केवळ निर्जीवाहून निर्जीव दुर्बळाहून दुर्बळ असा करून टाकतों! आणि हें केवळ संवयीच्या जोरावर आह्मी करीत असतो. कल्पना करा कीं एकाद्या माणसाला रोज प्रार्थना करण्याची, भजन करण्याची संवय आहे. असा मनुष्य त्याच्या मनाची तयारी नसली, मन अत्यंत मलिन, पापविचारांनीं भरलेलें असें जरी असलें तरी देवापाशीं जाऊन त्याची स्तुति, त्याची प्रार्थना करण्यास, त्याचा म्हणवून घेण्यास मागें पुढें पहात नाहीं आपले कुटिल विचार सर्वज्ञ देव जाणून आहे, आपलें अशुद्ध अंतःकरण त्यास चांगलें दिसत आहे, आपला वरपंगी व बेगडी भक्तिभाव त्यास केव्हांच कळून चुकलेला आहे हें तो विसरतो; व सात्विक भक्तिभावाचा आव आणून आपणा स्वतःस फसवून घेतो! अशा वेळीं सर्वज्ञ, सर्वसमर्थ, जो देव त्यास मूढाहून मूढ, दुबळ्याहून दुबळा तो करून टाकतो नाहीं तर काय? हा मनुष्य आधीं किती तरी दुबळा आणि मलिन, पण ती मलिन स्थिति देवाला न कळण्यासाठीं वर भक्तीचें, पवित्रपणाचें, भजनाचें, तें आवरण असतें! हें देवाशीं अगदीं उद्दामपणाचें व बेमुर्वतीचें वर्तन असें मीं समजतों. आह्मी जे प्रार्थनासामाजिक, जे आह्मी वारंवार प्रार्थना व भजन करणारे त्यांच्यांत हा दांभिक भाव शिरण्याचा संभव आहे. म्हणून आम्ही त्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देवावर आमचें प्रेम पाहिजे. पण, त्याच्या संबंधानें आमच्या ठिकाणीं आदरभाव पाहिजे, भीतीही पाहिजे. एकादें चांगल्या वळणांतील मूल पहा, त्याचें आपल्या आईवर प्रेम नसतें काय? बापावरही प्रेम असतें. तें मूल आईबापाशीं फार सलोख्यानें वागतें. पण, त्यांच्या संबंधानें त्याचे ठिकाणीं किती आदर, त्यांचा त्यास किती वचक असतो! तेंच लाडानें बिघडलेलें किंवा इतर वाईट मुलांच्या सहवासानें उद्दाम बनलेलें मूल घ्या. त्यास आपल्या आईबापासंबंधानें कांहीं क्षिति वाटत नाहीं. त्यांच्या समोर तें वाटेल तीं ढोंगें करील, खोटें बोलून वेळा मारून नेईल, सर्व कांहीं करील! आमचा व देवाचा संबंध असा अवज्ञा करण्यापर्यंत केव्हांही येऊं नये. तो अनंत, आम्ही सान्ताहून सान्त, तो सर्वज्ञ, आम्ही आपणास अल्पज्ञ म्हणविणें म्हणजे ही आम्ही आमच्या ज्ञानाची घमेंड दाखविणें होय. तो सर्वसमर्थ आणि आम्ही सर्वतोपरि दुर्बळ; तो प्रेम करणारा आणि आम्ही त्याचे प्रेमास अपात्र; तो न्यायी आणि आम्ही अन्यायाकडे सदा धांवणारे असा त्यांच्यामध्यें व आमच्यामध्यें भेदभाव आहे. हा भेदभाव ओळखून, त्यास वचकून असलें पाहिजे. त्याच्यापुढें जावयाचें तर अंतःकरण शुद्ध करून, मलिन भाव शुद्ध करून आम्हीं गेलें पाहिजे. निदान अंतःकरण मलिन आहे हें त्याजपाशीं अनुतापपूर्वक कबूल तरी केलें पाहिजे. त्या मलिन स्थितीवर जाणूनबुजून आवरण घालण्याचा तरी प्रयत्न होतां कामा नये.

---

## स्तुति, निर्भर्त्सना व निंदा.

(रा. रा. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांच्या घरीं कौटुंबिक उपासनेच्या वेळीं मंगळवार ता. ७-१२ १९०९ रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

जाणोनि नेणतें करीं माझें मन।
तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥
मग मी व्यवहारीं असेन वर्तत।
जेवीं जळा आंत पद्मपत्र ॥ २ ॥
ऐकूनि नाइकें निंदास्तुति कानीं।

जैसा का उन्मनी योगीराज ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें झालिया वांचून ।
करणें तें तें शीण वाटतसे ॥ ४ ॥

संसार करीत असतांना आपल्याला अनेक प्रकारच्या व्यवहारांत निमग्न रहावें लागतें. आणि हे व्यवहार करीत असतांना आपली स्तुति ऐकण्याचे प्रसंग प्रत्येकास येतात. निंदेचेही प्रसंग येतात, त्यांचा विचार पुढें करूं. परंतु आपले हातून सद्व्यवहार घडो, किंवा अविचाराचीं कृत्यें होवोत, आपली कोणीनाकोणी केव्हां तरी स्तुति करणारें आढळतेंच! बाहेरचें कोणी नसलें तरी आपलें आप्त, आपली बहीण, पत्नी असें कोणी तरी आपली स्तुति करतेंच. तूर्त हा स्तुतिनिंदेचा विचार मनांत यावयास आमचे तरुण मित्र रा. रा. केशव सदाशिव केळकर ह्यांनीं केकावलीवर जो एक लहानसा वाचनीय निबंध लिहून प्रसिद्ध केला आहे, त्याच्या अखेरीस दिलेल्या केकांतील पुढील केका विशेष रीतीनें कारण झाली आहे:—

गमो मधुर हें विष स्तवन सेवितां माजवी ॥
करी मलिन सद्यशोमुख हलाहला लाजवी ॥
हरापरिस तूं बरा प्रभुवरा सदा जो पिशी ॥
असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी ॥

ह्या केकेमध्यें पंतांनीं हरीला हरापेक्षां म्हणजे शंकरापेक्षां श्रेष्ठ ठरविलें आहे. शंकरानें हलाहल नामक अत्यंत जहाल विष एकदां प्राशन केलें. आणि त्यानें तें पचविलेंही. परंतु त्याचा शेष राहिला म्हणून म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें असो त्याला नीलकंठ असें म्हणतात! तथापि परमेश्वराची स्थिति ह्यापेक्षां फार निराळी आहे. अत्यंत जहाल जें हलाहल विष त्याच्याही पेक्षां जहाल विष ह्या जगांत आहे. त्याचें परमेश्वर सेवन करितो; तें घटाघटा पितो एवढेंच नव्हे तर ' असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी' इतकें जहालांतलें जहाल विष कोणतें ? तर तें ' स्तुति ' हें होय. हें विष आहे असें आम्हांला वाटतही नाहीं, म्हणून आम्ही तें पचवितों; घटाघटा त्याचें प्राशन करितों; पण त्याचा अत्यंत अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं. आम्हांला आमची कोणी स्तुति केली म्हणजे जरा बरें वाटतें. काम करण्यास उत्साह येतो असें वाटतें व काम करण्यास उत्साह यावा, उत्तेजन मिळावें म्हणून स्तुतीची आवश्यकता आहे असें वाटूं लागतें. विडी ओढण्याचें व्यसन ज्यास अद्याप लागलेलें नाहीं अशा मनुष्यानें विडीचा एक झुरका मारला कीं, त्यास मोठी हुषारी आली असें वाटतें; पण, पुढें तें उत्तेजन वगैरे बाजूस राहून धूम्रपान हें त्यास व्यसनच जडतें व त्यावांचून त्याचें चालत नाहींसें होतें. स्तुतिरूपी हे विष त्याहून वाईट आहे. व्यसनाचे अनिष्ट परिणाम आपल्याला दिसतात; व्यसन वाईट म्हणून टाळण्याचा आपल्याला प्रयत्न करितां येतो. पण मनुष्य एकदां स्तुतिप्रिय झाला कीं मग त्याच्या अधोगतीस सीमा नाहींशी होते हें आपण नित्य लक्षांत ठेविलें पाहिजे. आपल्या ठिकाणीं पात्रता नसतां आपली जी स्तुति होते त्याच्यायोगें जडता प्राप्त होतेच; परंतु हा पात्रापात्रतेचा विचार तूर्त दूर ठेविला तरी स्तुति आमच्या अधोगतीसच कारण होते असें दिसून येईल.

मी एकादें उपयुक्त कार्य करीत आहें असें वाटून लोक माझी स्तुति करूं लागतात. लोक बरें म्हणूं लागतांच तें कार्य प्रथम अधिक उत्साहानें करावयास लागतों; पण हा उत्साहच माझ्या घातास कारण होतो. नंतर लोकांनीं माझी स्तुति केलीच पाहिजे अशी भावना माझ्या ठिकाणीं उत्पन्न होते. स्तुतीला मी पात्रच आहें, इतरांपेक्षां मी थोर आहें, माझ्या ठिकाणीं इतरांपेक्षां परोपकारबुद्धि अधिक वास करीत आहे; देशहिताची आस्था मलाच आहे असें वाटून मी अधोगतीस जात असतों आणि ह्या माझ्या अवनतीस, हलाहलापेक्षांही जहाल जें स्तुतिरूपी विष तेंच कारण झालेलें असतें.

आतां आपण निंदेविषयीं थोडा विचार करूं. आणि तो करीत असतां निर्भर्त्सनेसंबंधानें असे दोन शब्द सांगणें जरूर आहे कीं, कोणाच्याही हातून घडलेल्या वाईट कृत्याबद्दल जी निर्भर्त्सना होते ती व निंदा एक नव्हत. निर्भर्त्सना होणें हें ठीक आहे. नीच कृत्य झालें कीं तें करणाराची निर्भर्त्सना झालीच पाहिजे. पण, ती त्याची निंदा नव्हे. हातून वाईट कृत्य होत नसूनही आपणास दोष देण्यांत येत असतो, आपल्याविषयीं भलभलते ग्रह आपल्या सभोंवार होत असतात, चर्चा चालू असते, ती निंदा. निर्भर्त्सना व सत्कृत्य हीं

एके ठिकाणीं असूं शकत नाहींत. घडघडीत सत्कृत्य करणाराची जर कोणी निर्भत्सना करूं लागला तर त्यास आपण वेडापीर म्हणूं !

पण, निंदेचें तसें नाहीं. स्तुति ज्याप्रमाणें आम्हांला जहाल विषाहून विष वाटूं लागली पाहिजे त्याप्रमाणें निंदा हें एक अमृतच आहे असें आम्हांस वाटूं लागलें पाहिजे. कोणी आमची निंदा केली कीं, आम्ही प्रथम अगदीं निरुत्साह होतों; आमची आस्था डळमळूं लागते, आमच्या ठिकाणीं एका प्रकारची उद्विग्नता नांदूं लागते. व निंदा करणारासंबंधानें अनादर, हेवा, इ. आमच्या ठिकाणीं जागृत होतात. पण असें न होतां निंदा ही आम्हांला अमृताप्रमाणें वाटूं लागली पाहिजे ! निंदेच्या द्वारें आपले दोष आपल्याला कळूं लागतात; त्यांच्याविषयीं आपल्या ठिकाणीं जागृति होते; आपले दोष आपणच शोधून काढावे अशी मनाची प्रवृत्ति होऊं लागते. आपण सत्कृत्यांमध्यें निमग्न असूनही निंदा होते असा अनुभव आला म्हणजेही 'जेवीं जळा आंत पद्मपत्र' अशी आपली वृत्ति झाली पाहिजे. 'निंदकाचें घर असावें शेजारीं' असें जें तुकोबांनीं आपल्या एका अभंगामध्यें म्हटलें आहे तें ह्याचसाठीं कीं निंदेच्या द्वारें आपले दोष आपल्याला सहज कळतात. परंतु विनाकारण निंदा होत असली, तरी तिजकडे आपण दुर्लक्ष्य करून, ही अशी निंदाच माझ्या शुद्धीस कारण होईल असें मानून आपण आपल्या कार्यामध्यें रत असलें पाहिजे; निंदा अमृततुल्य मानावयास लागलें पाहिजे.

मार्कस आरेलिअस यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे:--

Do but your duty and do not trouble yourself, whether...you have a good word or bad one... ... ... ... ... ...

श्रीकृष्णाचा कर्तव्यनिष्ठेसंबंधानें आपल्याला असाच उपदेश झालेला आहे. सारांश, व्यवहारामध्यें आपण नांदत असतांना स्तुति निंदा ऐकण्याचे प्रसंग आपल्यावर वारंवार येत असतात. आम्ही निंदेला भीत असतों. पण खरें पाहतां स्तुतीला आम्हीं अधिक भ्यावयास पाहिजे. कारण स्तुति आमच्या घातास कारण होते. स्तुतीचें व्यसन जडलें म्हणजे इतरांनीं आपली स्तुति केलीच पाहिजे असें आपणांस वाटूं लागतें. पण, निंदा ही आमची मैत्रीण होऊं शकते. निंदा आम्हांस कर्तव्यनिष्ठा करणारी, विनम्रवृत्ति अंगामध्यें भिनविणारी, इतरांविषयीं मनामध्यें उदारभाव उदित करणारी, स्वतःच्या दोषांविषयीं चित्तामध्यें जागृत ज्योत पेटविणारी अमृतवल्ली आहे ! अशा प्रकारें आपण आपल्या कर्तव्यांत निमग्न असतांना स्तुति-निंदेचा योग्य उपयोग जर आपण करून घेऊं लागलों तर आम्हांपैकीं प्रत्येकाला, मार्कस आरेलिअस प्रमाणें I do my duty that is enough, मी माझ्या कर्तव्यांत एकनिष्ठेनें निमग्न आहें, तितकेंच मला पुरें आहे, असें म्हणतां येईल.

---

## विनोदाचें महत्त्व.

(ता. १४।२।१९११ रोजीं प. वा. विश्वनाथपंत संत यांच्या आद्यश्राद्धानिमित्त केलेल्या उपदेशाचा सारांश.)

स्थल दृष्टीनें पाहतां जगामध्यें तीन प्रकारचीं माणसें आढळून येतात. अत्यंत मोठमोठे पुष्कळसे सद्गुण अंगीं असलेले कांहीं महापुरुष असतात. त्याचप्रमाणें अत्यंत दुष्ट गुणांनीं सडून गेलेले दुरात्मे असतात. पण या दोन्ही कोटींतील माणसें अपवादात्मकच म्हणावयाचीं. तुम्ही आम्ही तिसऱ्या साधारण कोटींतलीं माणसें, त्या आम्हांला वरील दोन्ही अपवादात्मक कोटींतील माणसांच्या गुणावगुणाविषयीं विचार करून विशेष फायदा नाहीं. कारण, तीं बोलून चालून अपवादात्मक कोटींतली. मनुष्यस्वभावरचनेचा जो साधारण इतिहास आणि नित्याचे नियम असतात त्यांत कांहींतरी ढवळाढवळ होउन हीं अपवादात्मक माणसें उदयाला आलेलीं असतात, म्हणून त्यांच्याविषयीं आज आपल्यास कांहीं कर्तव्य नाहीं.

साधारण कोटींतील माणसांचेही दोन प्रकार दिसतात. पहिल्या प्रकारचीं माणसें अशीं असतात कीं त्यांच्यावर वेळोवेळीं जे प्रसंग येतात त्याविषयीं उगीच गंभीर विचार करीत बसण्याची त्यांना संवय असते. मागें आलेल्या आपत्ति आणि झालेल्या निराशा याविषयीं तीं ध्यास घेऊन बसतात, इतकेंच नव्हे तर पुढें येणाऱ्या अडचणीचीही त्यांना सारखी हुरहुर लागलेली असते. अशा त्यांच्या खोलगट स्वभावामुळें त्यांना रात्रीं

अंथरुणांत पडूनही जागण्याची व दिवसां कामाच्या वेळीं पेंगण्याची पाळी येते. या सर्वांचें कारण त्यांच्यांतील विनोदाचा अभाव हें होय. विनोद याचा अर्थ केवळ खुशमस्करी नव्हे. वेड्यावांकड्या वांकुल्या दाखवून लोकांस हंसविणें, किंवा कुत्र्याचे कान आणि माकडाचें शेपूट अशा कांहीं तरी अकल्पित गोष्टी सांगून दुसऱ्याचें मन रिझविणें हाही विनोद नव्हे, हा केवळ विदूषकपणा होय. विनोद म्हणजे संसारांत येणाऱ्या निरनिराळ्या प्रसंगाचा वाजवीपेक्षां जास्त चटका लावून न घेतां, आपली संतोषित वृत्ति कायम ठेवणें हा होय. कांहीं विशिष्ट प्रकारच्या वाङ्मयांत दाखविलेला हा केवळ ग्रंथकाराचाच गुण नव्हे तर साधारण कोटींतील माणसांच्या नित्याच्या वृत्तींत कायमचा आढळन येणारा हा एक गुण आहे. या गुणानें मंडित झालेलीं माणसें हीं साधारण कोटींतील दुसऱ्या प्रकारचीं होत.

या गुणामुळें हीं दुसऱ्या प्रकारचीं माणसें नेहमीं सुखी आणि आनंदी असतात. त्यांच्या मनोमंदिरामध्यें नेहमीं विनोदाची हवा खेळून उबट ओलसरपणास जागा न राहिल्यामुळें क्लेश, चिंता इत्यादि कृमी त्यांत सांचत नाहींत. वरवर पाहातांना हीं माणसें केव्हां उथळ स्वभावाचीं दिसतात परंतु खरा प्रकार हा असतो कीं त्यांना संसाराचें ओझें इतराप्रमाणें वाटत नाहीं. हीं माणसें स्वतःच सुखी आणि संतुष्ट असतात, इतकेंच नव्हे, तर यांच्याकडे जे जातील, किंवा हीं ज्यांच्याकडे जातील, त्यांच्याही सुखासमाधानास हीं बरींच कारणीभूत होतात. हवेंत उडणाऱ्या आनंदी पांखराकडे पाहून जमिनीवर सरपटणाऱ्या जड माणसाला जसें कौतुक आणि समाधान वाटतें, तसेंच या दुसऱ्या कोटींतील माणसाचें सुख पाहून पहिल्या कोटींतल्या माणसाचें दुःख किंचित् हलकें होतें. असा यांच्या ह्या संतुष्ट वृत्तीच्या संसर्गाचा महिमा आहे.

पण ह्याहूनही थोर कामगिरी ह्या मंडळीकडून सहजच बजावली जाते, ती हीः—कोणतेंही एकादें मोठें सत्कार्य निघालें तर त्याच्या सिद्धीचा पुष्कळसा अंश केवळ स्वयंसेवकांवरच अवलंबून असतो. त्या कार्याचे उत्पादक, नेमिलेले अधिकारी आणि चालक यांच्याकडूनच तें कार्य होण्यासारखें नसतें. त्यांना हातभार लावावयास वेळोवेळीं जी स्वयंसेवक मंडळी जमते ती ह्या वरील दुसऱ्या कोटींतली विनोदी मंडळीच असते. मग हें सत्कार्य मोठें राजकार्य असो, किंवा एकादी सार्वजनिक हिताची गोष्ट असो, किंवा एकादा कौटुंबिक समारंभ असो त्याला मोठी मदत आणि शोभा येते, ती अशा विनोदी मंडळीकडूनच. ही जी मोठी मदत या स्वयंसेवक मंडळीकडून होते ती इतक्या सहज रीतीनें होते कीं, ती त्यांची त्यांस देखील भासत नाहीं. सहज बसल्या बसल्या, बोलतां बोलतां, जातां जातां ही मंडळी जो कार्यभाग उरकते, तो पहिल्या कोटींतल्या खोलगट माणसांच्या हातून पुष्कळ विचार करूनही होत नाहीं. दुसऱ्याच्या कामीं अशा-रीतीनें हात लावण्याच्या मार्गांत ह्या खोलगट माणसांना स्वतःच्या स्वभावाचाच काय तो अडथळा असतो. हा अडथळा विनोदी माणसांच्या मार्गांत नसल्यामुळें त्यांच्या हातून नित्यशः लहान-सहान सेवा भराभर कशी घडून असते हें त्यांचें त्यांना देखील समजून येत नाहीं.

आपण सुखी असणें, दुसऱ्यास सुखी करणें, दुसऱ्यांच्या कामास हात लावणें आणि त्याचे मुळीं श्रमही न वाटणें या चार गुणांहूनही पांचवा मोठा गुण विनोदी माणसांमध्यें आढळतो तो हा कीं, केव्हांही चालत्या गाड्यांत जाणून अथवा नेणून त्यांच्या हातून खोळ पडत नाहीं. हा गुण सर्वांत मोठा आहे. असें जाणण्यापुरतें ज्ञान आणि उघड म्हणण्यापुरतें धैर्यही पुष्कळांस नसतें. जगाचें हित प्रत्यक्ष सत्कार्य करीत राहिल्यापेक्षांही कोणाच्या कसल्याही कामांत अडचण आणि विरोधही न आणण्यांत जास्त आहे हें थोडासा विचार केला असतां कळण्यासारखें आहे; किंबहुना मनुष्य-स्वभावामध्यें हा जो एकमेकांला अडथळा करण्याचा दुर्गुण जन्मतःच असतो, त्याचा प्रतिकार करण्यासाठींच आणि त्याचे दुष्परिणाम निवारण्यासाठींच जगांतल्या मोठमोठ्या सुधारकांचा आणि परोपकारांचा उदय झालेला असतो. ह्या भाग्यवान् विनोदी मंडळीनें अशा प्रकारच्या अडथळ्यांना आपल्या वर्तनांत कधींच वाव न ठेवल्यामुळें त्यांच्याकडून लोकहिताला मोठीच मदत होते असें म्हणावयास हरकत नाहीं. धर्म

आणि कर्तव्य यांविषयीं आपली खोटीच समजूत करून घेऊन मनुष्यें वारंवार आपआपसांत तंटा माजवितात आणि त्यामुळें होणारें व्यक्तीचें आणि समुदायाचें नुकसान भरून काढण्यासाठीं पुनः नवीन यत्न करावा लागतो; या सर्वच खटाटो-पाचें निवारण विनोदी माणसाच्या या निर्विघ्नपणा-मुळें होतें, ही गोष्ट एकदम कोणाच्या लक्षांत भरण्याजोगी नसली, म्हणून तिचें महत्व कमी आहे असें नाहीं. एकाद्या महारोग्याला बरें केल्या-बद्दल एकाद्या राजवैद्याची मोठी प्रसिद्धि होईल, एकादी दुष्ट चाल बंद केल्याबद्दल एकाद्या सुधार-काची कीर्ति पसरेल, परंतु शारीरिक आणि मान-सिक रोगाला मुळीं ठावच न दिल्याचें श्रेय ज्या कित्येक लहान माणसांना असतें त्यांचीं नांवें जगापुढें येण्यासारखीं नसतात, तथापि तीं कमी धन्य असें म्हणण्यास म्हणतां येणार नाहीं. तीं जगापुढें आलीं नाहींत तरी देवापुढें येतातच.

नुकतेच परलोकवासी झालेले आमचे मित्र विश्व-नाथपंत संत हे ह्यांत दर्शविलेल्या दुसऱ्या कोटींतील एक होते. त्यांच्यांत तेथें सांगितलेले पांचही गुण ढळढळीत आणि नित्य आढळून येत असत. समा-जांत येणें जाणें, उपासना आणि अनुष्ठानें इत्यादि सभासदाचीं कर्तव्यें बजावणें, समाजानें प्रस्थापित केलेल्या मतांचा अभिमान बाळगणें आणि त्यांचा लोकांमध्यें प्रसार करणें इत्यादि गोष्टींच्या संबंधानें विश्वनाथपंतांचें वर्तन केवळ औपचारिक दृष्ट्या पाहूं गेलें असतां मनांत विशेष भरण्यासारखें होतें असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

## प्रेमप्रकाश.

(रा. रा. द्वा. गो. वैद्य यांच्या मातोश्रींच्या आद्य-श्राद्धानिमित्त केलेल्या उपदेशाचा सारांश.)

पुत्र वित्त दारा गृहादि सकळ ॥ देऊनि दयाळ वाट पाहे ॥ देवाचे मनांत मज हे ध्यातील ॥ अंतीं पावतील निजपद ॥ सोडूनि देवासि गुंतले दोरासीं॥ झाले अविश्वासी विश्वंभरीं ॥ तुका म्हणे फार भुलू-नियां मेले ॥ विरळा लागले हरिपायीं ॥

या अभंगांतील उक्ति विचार करण्यासारखी आहे. देवानें पुत्र वित्त, दारा देऊन गृह निर्माण केलें व त्या घरामध्यें, अशी एक प्रेमाची ज्योत उत्पन्न केली कीं त्या ज्योतीच्या प्रकाशामुळें कुटुंबांतील माणसें एकमेकांस स्पष्ट दिसतात, आपणांस नेत्र आहेत पण बाहेरच्या व आंतल्या गोष्टींचें संनिकर्ष करणारा प्रकाश नसता तर त्या नेत्राचा कांहींएक उपयोग होणार नाहीं. त्याच-प्रमाणें, धैर्य, सहनशीलता वगैरे प्रेमाची अधिष्ठानें असूनही प्रेमाचा प्रकाश पडला नाहींतर त्याचा कांहींएक उपयोग होणार नाहीं, म्हणजे जड सृष्टीमध्यें प्रकाश जें कार्य करितो तसेंच नैतिक कार्य प्रेमाचा प्रकाश करतो. या प्रेमप्रकाशांतूनच पुत्र, पती, पत्नी, बंधु, भगिनी, माता, पिता हीं सर्व संबंधाच्या योगें एकत्र झालेलीं माणसें परस्प-रास स्पष्ट दिसतात. बाह्य सृष्टींतील प्रकाशामुळें पदार्थ जसा स्पष्ट दिसतो, त्याचप्रमाणें डोळयास अंधारी येऊन सूक्ष्म पदार्थही दिसत नाहीं किंवा तो आहे त्यापेक्षां निराळा दिसतो; त्याच प्रमाणें प्रेम हे डोळयांना डोळेपण देणारें आहे तसेंच आंधळेपणही देणारें आहे. म्हणजे प्रेमाच्या प्रका-शांतून स्वतःच्या संबंधी माणसाचे गुण जेवढे दिसतात, तेवढ अवगुण दिसत नाहींत. माता केवळ बालकाच्या लाघवानें मोहीत होऊन स्वकर्तव्यास कधीं कधीं विसरते. पण साधारणपणें मनुष्याच्या अंगीं जाणीवबुद्धि असेल तर स्वयंस्फूर्तीनें व स्वयंशक्तीनें प्रेमाच्या प्रकाशाच्या सहाय्यानें घरांतील मंडळींचे गुणावगुण दिसतील म्हणजे मग आपण प्रेमाच्या प्रवाहांत सांपडून ईश्वराकडे सहज गत्या चाललों आहों हें आढळन येईल. याकरितां एकमेका-विषयीं यथार्थ ज्ञान होण्यास प्रेमप्रकाश ही ईश्वराची एक योजना आहे. या योजनेमुळें आपणास ईश्वरा-बद्दलचें ज्ञान प्राप्त होतें. पण या प्रकाशाचा योग्य उपयोग केला नाहीं तर देवास विसरून दोरीवर प्रेम बसतें. म्हणजे हा प्रेमकाश ज्यानें उत्पन्न केला त्यासच आपण ओळखीत नाहीं. देव हा गारुड्याप्रमाणें आपल्याकडून खेळ करवून शेवटीं आपल्या सर्वांना स्वतःकडे खेंचतो, यांत त्याचा स्वार्थ नसून आपणास निजपद प्राप्त करून देण्याचा त्याचा हेतू असतो. याकरितां आपणास आपला पुढचा मार्ग सुलभ करणें असेल तर आपण आपल्या गृहांतील माण-सांच्याच गुणावगुणांचें निरीक्षण करावें. मात्र अवगुण पाहून त्यांची निंदा करूं नये. अव-

गुण काढून टाकण्याची जेव्हां त्यांना संधि प्राप्त झाली तेव्हां ती संधि त्यांनीं साधली कीं नाहीं याचें योग्य निरीक्षण करावें व त्यांपासून आपण धडा घ्यावा म्हणजे आपोआप आपण निजपदास जाऊं. तुकारामांनीं अभंगांत सांगितल्याप्रमाणें, पुत्र, वित्त, घर, दार, आपणास देऊन तो दयाळू परमेश्वर आपण निजपद अंतीं पावूं अशी वाट पहात बसला आहे तर याची पूर्ण गांठ बांधून ज्यानें प्रेमप्रकाश निर्माण केला त्या प्रभूला आपण ओळखावें आणि तें घरांतील कुटुंबाच्या गुणावगुणांच्या निरीक्षणानेंच उत्तम साधलें जाईल, शेजाऱ्यावर, देशावर, राष्ट्रावर प्रीति ठेवून ईश्वरास ओळखणें हा निराळा मार्ग; पण सोपा म्हटला म्हणजे वर सांगितलेलाच होय.

---

## संग व विषय.

(कल्याण येथें डॉ. खांडवाला यांचे घरीं केलेल्या उपदेशाचा सारांश इं. प्र. १७-८-१९१०.)

संगें वाढे शीण न घडे भजन। त्रिविध हे जन बहु देवा॥ याचिमुळें आला संगाचा कंटाळा। दिसताती डोळां नाना छंद॥ एकविध भाव राहावया ठाव। नेदी हा संदेह राहो चित्तीं॥ शब्दज्ञानी हित नेणती आपुलें। आणिक देखिलें नांवडे त्यां॥ तुका म्हणे आतां एकलेंचि भलें। बैसोनि उगलें रहावें ते॥

या अभंगांत तुकारामबुवा म्हणतात–संगाचे योगानें शीण येतो, व भजन कांहीं घडत नाहीं, बरें, वाईट व मध्यम असे तीन प्रकारचे लोक या जगामध्यें आहेत. त्यांच्या संगानें मनाची एकाग्रता होत नाहीं. एकाचा कल एकीकडे, दुसऱ्याचा दुसरीकडे, तिसऱ्याचा तिसरीकडे अशी स्थिति सर्वत्र आहे. नानाप्रकारचे छंद दृष्टीस पडतात. एक म्हणतो संसार सांभाळा, दुसरा म्हणतो समाज, राष्ट्र वगैरे सांभाळा अशा प्रकारच्या छंदामध्यें मनास भ्रांति पडते, भजन सुचत नाहीं. नाना प्रकारचे गुरु, नाना प्रकारचे पंथ, नाना प्रकारचीं सोंगें, ढोंगें यामुळें एकविधि भाव रहात नाहीं, व मन छंदाधिस्थ होऊन जातें. नुसत्या शब्दज्ञानानें आपल्या हितास धोका पोहोंचतो. ‘अर्थे लोपलीं पुराणें’ अशी स्थिति होते. असा प्रकार संगाचा होतो म्हणून संगापासून दूर रहाणेंच बरें. अशाच प्रकारच्या संगोविषयींचा कंटाळा त्यांनीं खालील अभंगांत दाखविला आहे.

रुसलों आम्ही आपुलीया संसारा। तेथें जनाचार काय पाड॥ आम्हां इष्टमित्र सज्जन सोयरे। नाहीं या दुसरें देवाविण॥ दुराविले बंधु सखे सहोदर। आणीक विचार काय तेथें॥ उपाधिवचन नाइकती कान। त्रासलें हें मन बहु माझें॥ तुका म्हणे करा होईल तें दया। सुख दुःख वायां न धरावें॥

आम्ही आमच्या संसारावरच रुसलों आहों, तर जनाच्या आचाराला घेऊन आम्हांस काय करावयाचें आहे! एकाच घरांतील कुटुंबांतील माणसांचें जमत नाहीं. बापाचा पंथ वेगळा, मुलाचा वेगळा. नवऱ्याचा हव्यास निराळा, बायकोचा निराळा. बहीण, भाऊ यांचें जर एकमेकांशीं पटत नाहीं तर इतरांची गोष्ट बोलावयासच नको. या त्रासानें माझें मन भांबावलें आहे तर देवा! मला हा संसार नको, ही उपाधी नको, मी रानामध्यें जाऊन या संगापासून दूर राहीन.

संसारांतील उपभोग्य जे विषय त्याविषयीं नामदेव म्हणतातः—

विषयीं आसक्त झालें माझें मन। न करी तुझें ध्यान देवराया॥ नाथिले संकल्प करी नानाविध। तेणें थोर खेद पावतसे॥ ऐसा मी अपराधी दुराचारी देवा। भेटसी केधवां कवणें परी॥ आयुष्य सरे परी न सरे कल्पना। भोगावी यातना नानाविध॥ जरा–व्याधि कष्ट भोगितां संकटीं। होतसे हिंपुटी चित्त माझें॥ आशा मोहोरत भ्रांत माझें चित्त। चुकलों निजहित नारायणा॥ तूं अनाथ कैवारी म्हणुनी धांवा करी। सोडवी श्रीहरी म्हणे नामा॥

माझें मन विषयांमध्यें आसक्त झाल्यामुळें तें ध्यानस्थ होत नाहीं. अनेक प्रकारचे नसतेच संकल्प मनांत उद्भवतात. अमुक मान मिळवावा, अमकें धन मिळवावें म्हणून सारखा विचार चाललेला असतो. आयुष्य संपून जातें, पण कल्पना कांहीं संपत नाहीं. अनंत लोक स्वर्गस्थ झाले पण कल्पना म्हणून जशाच्या तशाच कायम राहिल्या आहेत. विषयांच्या मोहामुळें माझें मन भ्रांत होतें.

तुकाराम म्हणतात संग नको व नामदेव म्हणतात विषय नकोत. अशाच प्रकारचा उपदेश चोहोंकडे बहुतकरून ऐकूं येतो. पण आज आपण तर संघ बनवून या ठिकाणीं जमला आहों. मग परस्पर विरुद्ध या दोन गोष्टींची आतां सांगड ती कशी घालावयाची. तुकाराम ज्याप्रमाणें संग नको म्हणून म्हणतात, त्याचप्रमाणें तो पाहिजे असेंही म्हणतात.

संगतीनें होतो पंगतीचा लाभ । अशोभीं अनु भव असिजेतें ॥ जैसीं तैसीं असा पुढिलांचे सोई । धरिती हातीं पायीं आचारिये ॥ उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलांची सदा दया चित्तीं ॥ तुका म्हणे तरी सज्जनांची कीर्ति । पुरवावी आर्ति निर्बळाची ॥

ज्या पंगतीला आपण जेवावयास बसतों त्या पंगतीचा लाभ आपणास मिळतो. राजाच्या पंगतीमध्यें एकदां का शिरकाव झाला म्हणजे राजाला मिळणारे पदार्थ आपणांस मिळावयाचेच. आम्ही कोण, गरीब कां मोठे असे प्रश्न वाढपी विचारीत नाहींत. त्याचप्रमाणें आचार्योंनीं, सज्जनांनीं, धर्मसंस्थापनेकरितां जे संग स्थापिलेले असतात. त्या संगांमध्यें जाण्याचा अवकाश कीं लागलीच आपणांस त्याचा लाभ मिळतो. दुबळ्याची आपत्ति निवारण करण्याकरितांच संग स्थापलेले असतात. एकट्यानें बसून कांहीं होत नाहीं. दसरे एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, संगत करें सज्जनकी । बढत बढत बढ जाय ॥ संगत करें नीचन–कीं तों फल छोड फत्तरकी ॥ साधूको साधू मिले तो । इशी खुषीसे दो बात ॥ और गद्धेकु गद्धा मिले तो उडउडाके दो लात ॥

संगत करावयाची तर उत्तम संगाबरोबर केली पाहिजे. पंखा मोडलेली नाव पंखा न मोडलेल्या नावेला धरून तरून जाते, त्याप्रमाणें दुर्जन सज्जनाच्या मदतीनें तरून जातो. संग करावयाचा तो सज्जनांबरोबर करावा, नाहींपेक्षां एकांतीं राहणें बरें.

विषयाविषयीं तुकाराम म्हणतात—

वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वर आळविती । येणें सुखें रुचे एकांताचा वास- नाहीं गुण–दोष अंगा येत ॥ आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥ कंथा कमंडलु देह उपचारा । जाणवितो वारा अवसरू ॥ हरिकथा भोजन परवडी बिस्तार । करोनि प्रकार सेवूं रुचि ॥ तुका म्हणे होय मनासीं संवाद । आपुलाचि वाद आपणासीं ॥

जे उपभोग्य पदार्थ ईश्वरानें निर्माण केले आहेत, त्यांवर आसक्ति न ठेवतां त्यांचें सेवन करावें. विषयांचा उपभोग घेत असतांना गर्व, अहंकार, कोतेपणा जर उत्पन्न झाला तर मग ते विषय नसलेले पुरवले. बागेमध्यें फिरावयास गेलों असतां हा बाग माझ्या आजाचा, माझ्या आजानेंच हीं झाडें लावलीं, माझा आजा किती तरी वाकबगार होता, असा अहंकार उत्पन्न होऊन तेथील वृक्ष, वल्ली, फळें–फुलें यांचा उपभोग घेण्यापेक्षां त्यांचा नाश झालेला पुरवला. अहंकार अवनतीला कारण होतो. शुद्ध भावनेनें विषयांचा आदर करावा. निरहंकार भावानें आपण सृष्टीमध्यें वावरूं लागलों, तर संग व विषय आपल्या घातास कारण न होतां उन्नतीसच कारण होतात. तेव्हां संगाचा व विषयांचा आदरही केला पाहिजे व अनादरही केला पाहिजे. कपडे, अलंकार, धन-दौलत, मान-मरातब यांचे योगें जर अहंकार उत्पन्न होत नसेल तर मग अनेकशः आणखी विषय उत्पन्न झाले तरी हरकत नाहीं. पण जर अहंकार उत्पन्न होईल, तर मग धूमकेतु येऊन त्यांचा सत्यानाश झालेला बरा. एकदरीत काय कीं संग पाहिजे, पण तो सज्जनांचा असावा. तसें नसेल तर एकांतवास बरा. विषय पाहिजेत, पण त्यांमुळें गर्व होतां कामा नये. नाहीं तर ते विषय नसलेले बरे.

---

## मरण म्हणजे काय ?

( महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर यांच्या मृत्यूनंतर केलेला उपदेश.—सु. प. १३–८–१९०५ ).

**एक पाहतसां एकांचीं दहनें ।**
**सावध त्या गुणें कां रे न व्हा ॥ १ ॥**
**मारा हांक देवा भय अट्टाहासें ।**
**जंव काळा पेसें जालें नाहीं ॥ २ ॥**

**तुकाराम.**

मनुष्यजात—सर्व प्राणिमात्रही—आज अगणित काल एकएकांचीं दहनें पाहत आली

आहे. पण ती त्या गुणें व्हावी तितकी सावध झालेली दिसत नाहीं. उलट हल्लींचा दुष्काळ, प्लेग आणि बंधुघातकी संग्राम इ० मुळें ह्या जातीकडून मरणाची 'अतिपरिचयादवज्ञा' च होत आहे असें म्हटलें तरी चालेल. तथापि जेव्हां एकाद्या महात्म्याच्या मरणामुळें ह्या मरणगुरूची मुलाखत घडते, तेव्हां पुनः आश्चर्य व प्रेरणा, भय आणि बोध इ० विषयक ह्याचा प्रभाव तीव्र वेगानें भासूं लागतो. ज्या गुणावरून आमचा साधाभोळा तुकोबा आम्हांला सावध करूं पाहत आहे, त्याच गुणाचा उल्लेख आधुनिक पंडितशिरोमणि भट्ट मोक्षमूलर हे धर्माचें मूळ धुंडीत असतांना असा करीत आहेतः—"माणसाला (प्रथम) भयानें अट्टाहासें हाक मारण्याला लावणारी, त्यास जबरीनें विचार करावयाला लावणारी—जर कोणती गोष्ट असेल तर ती निःसंशय मरण ही होय,' आणि जगांतल्या ज्ञानाच्या अतिशय महत्त्वाच्या व अक्षय भागांपैकीं कांहीं भाग मरणाच्या दर्शनामुळेंच प्रथम कसा लाभला, हें आतां आपण पाहूं." *

पण हें मरण म्हणजे केवळ भयावहच आहे असें नव्हे, तर तें आश्चर्यावहही तसेंच आहे; किंबहुना आश्चर्याची परमावधीच ही. पशुपक्षी देखील हें आश्चर्य पाहून थक्क होतात. आपला हालताचालता संवगडी एकाएकींच अगदीं स्तब्ध झाला हें पाहून मुकीं जनावरें, पण तीं देखील कशीं तटस्थ राहतात, आणि त्यांची ती तटस्थवृत्ति पाहूनही किती आश्चर्य वाटण्यासारखें आहे. एक जनन शिवायकरून ह्या जगतांत मरणाइतकें दुसरें गूढ कोडें काय असूं शकेल! ह्या घडीपर्यंत जो प्राणी ह्या शरिरांत ठाणें देऊन भोंवतालच्या अनंत विश्वांत टेहळणी करीत होता, तो आतां कोठें नाहींसा झाला! तो आहे कीं नाहीं, कां असून नसल्यासारखा आहे! सुखदुःखाच्या त्याच्या वेदना कशा, त्याचा अनुभव काय, त्याची स्थिति कशी? हे व असे इतर प्रश्न विचारणें सोपें आहे, पण त्यांस समाधानकारक उत्तर कसें मिळणार? पुनर्जन्म, पुनरुत्थान इ. मधुर मुग्ध कल्पनांनीं कां खरें शांतवन होणार आहे? आत्मा अमर आहे, ह्या उपजत श्रद्धेचें अवलंबन करूं म्हटलें तर तीमुळेंच ना ह्या सर्व आश्चर्याला अवकाश? ती नसती तर पाण्यांत विरघळलेल्या ढेंकळाप्रमाणें हें शरीर पंचत्वाप्रत पावलें आणि बाकी शून्य उरलें म्हणून केव्हांच स्वस्थ बसतां आलें असतें. पण तसें नाहीं. शरीर नाहींसें झालें तरी कांहीं शिल्लक रहात असावी; पण त्या कांहींच्या व आमच्यामध्यें या मरणानें घनघोर अंधकाराचा पडदा सोडिला आहे. इतर पडद्याच्या आड एकादा पदार्थ झाला तर तो पदार्थ नाहीं दिसला तरी त्याला आच्छादणारा पडदा तरी दिसतो. पण येथें पदार्थही दिसत नाहीं व स्वतः पडदाही दिसत नाहीं! ही किती आश्चर्याची गोष्ट.

पण आश्चर्य ही ज्ञानाची पहिली पायरी होय. तीव्र आश्चर्य वाटलें कीं आपण ज्ञानाच्या वाटेनें झपाट्यानें चाललों आहों असें समजावें. म्हणून आश्चर्य ही ज्ञानाची आई. आणि मरण ही त्या आश्चर्याची आई. ह्यावरून मरण म्हणजे केवळ भयावह नाहीं, केवळ आश्चर्यावह नाहीं, तर ज्ञानावहही आहे. तें आमच्याठायीं प्रेरणा करितें आमच्या कानांत महाबोधाची फुंकर मारतें! तो महाबोध कोणता म्हणाल तर मोक्षमुलर सांगतात, 'जेव्हां एकादा आपल्यासारखाच मित्र एकाएकीं गार होतो तेव्हां जवळ उभा असलेल्यास (आमच्या प्राथमिक पूर्वजास) समजून येतें कीं पूर्वीं कांहींशी वस्तु त्याच्या ठायीं असे तीं आतां तेथें नाहीं. कांहींसें निघून गेलें.' (पृ. १९० पुस्तक सदर.) आत्म्यासंबंधीं व तद्द्वारा सर्व धर्मसंबंधीं ही आद्य श्रुति होय. स्पेन्सरसारखे समाजशास्त्री व टायलरसारखे मानवविकासशास्त्री देखील धर्माचें मूळ शोधीत असतां हीच साक्ष देतात कीं धर्म साक्षात्काराचें आदि साधन म्हणजे प्राथमिक पुरुषास झालेलें मरणाचें प्रथम दर्शन हेंच होय. ह्यावरून मृत्यु हा आम्हांला आमच्याविषयीं आत्मबोध व भोंवतालच्या अनंताविषयीं परमात्मबोध करून देणारा आदि धर्मगुरु होय असें होतें. ज्याप्रकारें आरोग्य नाहींसें झाल्याविना आम्हांला आरोग्याची प्रतीति होत नाहीं त्याचप्रकारें कदाचित् ह्या मरणरूपी-

* If any thing could frighten man, could force him to meditate, it was surely death, and we shall see how some of the most important and most permanent ingrediants of the intellectual life of the world were supplied, the first time, by the aspect of death.—Max Muller's Anthropological Religion-Lecture VII Page 190.

आदिगुरूच्या साहाय्यावांचून आम्हांस आत्मप्रतीतिच झाली नसती. असो, जरी मरणाचे योगानें एवढे मोठे मोठे लाभ झाले आहेत तथापि स्वतः मरण म्हणजे काय हा आमचा पूर्वीचा प्रश्न अद्यापि तसाच राहिला आहे !

ह्या गहन प्रश्नाचें उत्तर असें सहज मिळणारें नाहीं. जरी मिळालें तरी तें पटणार नाहीं. मरण ह्याचा खरा अर्थ समजण्यास अगोदर जीवन ह्याचा खरा अर्थ कळला पाहिजे. तो खरोखर कळणें किती कठिण आहे ! हें जीवन म्हणजे काय, उगम कोठून, अंत कोठें, आधार कसा, चालक कोण, त्याचा हेतु काय वगैरे गोष्टी कळण्यास किती कठिण, जवळ जवळ अशक्यच नाहींत काय ? असें असून कांहीं वेदान्ती म्हणतात कीं, हें दृश्य जीवन, हें मायिक जग, हें व्यवहारिक सत्य कळण्यास फार कठिण नाहीं; हें पुष्कळांस समजतें पण तें गूढ ब्राह्मिक जीवन ( Esoteric Advait ) तें तात्विक जग मात्र फार थोड्या अधिकारी पुरुषांसच कळण्यासारखें आहे. पण आम्हाला तर ह्याच्या उलट प्रकार भासत आहे. केवल व अनंत अशी वस्तु ह्या विश्वांत एकच असणार, अनेक केवलांची व अनंतांची बुद्धीस कल्पनाही करवत नाहीं. म्हणून ज्ञानवादानें नुसतें अद्वैत प्रतिपादणें हें आमच्या मताला मोठेसें कठीण दिसत नाहीं. तत्वज्ञानांत साधारण गति झाल्याबरोबर ' एकमेवाद्वितीयम् ' हा महासिद्धान्त उघड दिसूं लागतो. पण खरी अडचण येते ती ह्या दृश्य जगाचीच मीमांसा करतेवेळीं; आणि तिच्यासंबंधी तर कांहीं वेदान्ती ही केवळ माया आहे, पोकळ भास आहे असें सांगन थोडक्यांत आटपूं पाहतात ' ब्रह्म सत्यं ' हें कबूल पण जगत् मिथ्या हें कसें ? खरा अद्वैत सिद्धान्त जो सर्व विचारी मनांस ग्रहण करावाच लागतो, तो कायम ठेवून जगत् जें ब्रह्माचेंच कार्य, त्याची समाधानकारक मीमांसा करणें हें फार कठिण; येथेंच मोठा अधिकार पाहिजे. दृश्य जग म्हणजे आमच्यासारख्या जीवांच्याच जीवनाचें बनलें आहे. ह्या जीवनाची मीमांसा कशी करावी ! ह्याचें लक्षण काय ? याच्यापाशीं प्रस्तुत मरणाचा कसा संबंध आहे ? 'मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः!' म्हणजे देही जो आत्मा त्याच्या आयुष्यांत देहाचें मरण ही साहजिक घडणारी गोष्ट आणि देहाचें जीवित तोच मात्र एक विकार आहे, असें कालिदास सांगतो. आणि मोक्ष मूलर आपल्या पत्नीस लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतो* " आम्ही तर मरणाच्या अटीवरच ह्या पृथ्वीवर जन्मतों, आणि शेवटीं मरणच आम्हांस विधात्याकडे नेतें. " व तो आपल्या एका मित्राच्या पत्रांत म्हणतो† " मरण म्हणजे एका जीवनांतून दुसऱ्या जीवनांत जाण्यासाठीं एक पूल बांधला आहे. " इजिप्शिअन लोकांच्या अति प्राचीन थडग्यांत जी नानाविध सामुग्री आढळते त्यावरूनही असें सिद्ध होतें कीं, ते लोक मरण म्हणजे जीवनक्रमांतलाच एक विशेष प्रसंग मानीत असत. असो, पण अशा ह्या मरणाचा अधिक विचार करण्यापूर्वी विशुद्धि मागग नांवाच्या बौद्ध ग्रंथांत ८ व्या भागांत मरणाचे जे दोन प्रकार सांगितले आहेत त्यांचा उल्लेख करणें बरें. ते प्रकार म्हणजे एक अकालीं मरण, दुसरें साहजिक मरण हे होत. जीवनशक्तीचा पूर्ण विकास होण्यापूर्वीच अगर तो होऊन त्याचा पूर्ण उपयोग होण्यापूर्वी बाळपणीं अगर तरुणपणीं जें मरण घडतें तें अकालीं होय. खऱ्या रीतीनें पाहिलें असतां हें मरणच नव्हे; हा अपघात. येथें कर्माची काय गहन गति असते अगर दुसऱ्या शब्दांनीं म्हणावयाचें झालें, तर ईश्वरी कसली गूढ योजना असते, हें सांगणें आमच्या ज्ञानाबाहेरची गोष्ट आहे. असंख्यात बालमृत्यु झाले, अगणित अर्धवट वाढीचे तरुण गेले आणि जूलिअस सीझरसारखे किंवा जीजस खिस्तासारखे पूर्ण विकासलेले महात्मेही मध्येंच विराम पावले, ही सर्व अपघाताचीच कोटी. विश्वाच्या ह्या अवीट वखारींत ही अशी मोडतोड कां होते, इतका कचाच माल तयार होऊन बाहेर आणखी कोठें व कशासाठीं जातो व शेवटीं बऱ्याचशा पक्क्या मालाची अपघातानें अशी

* Death is a condition of our life on earth, it brings the creature back to its Creator. Life and Letters, Vol I. P. 250.

† It is part and parcel of one great system of which we see but a small portion here and which without death, without that bridge of which we see here but the first arch would seem to me a mockery."

(Ibid P. 257.)

धूळवाण कां उडते ह्या गोष्टीचा खुलासा त्या एका विश्वकर्म्याशिवाय इतरांस होणें इल्लींच्या स्थितींत तरी शक्य नाहीं. नसो, पण ज्या अर्थी हे अपघात म्हणजे मुळीं खऱ्या रीतीनें मरणाच्या कोटींतच येत नाहींत त्याअर्थी मरण म्हणजे काय ह्या विषयीं विचार करीत असतां अशा अपघाताची नीट उपपत्ति झाली नाहीं म्हणून कांहीं हरकत नाहीं. कारण ती होण्यासारखी असली तरी करूं पाहणें अप्रासंगिक होणार आहे. तर आपण दुसऱ्या व खऱ्या प्रकारचें मरण जें साहजिक मरण ज्याच्यासंबंधानेच कालिदासाचे व मोक्षमूलरचे उद्गार वर दिले आहेत, आणि जे म्हणजेच आमच्या मायिक अथवा दृश्य (Phenomenal) जीवनाचा अंत आणि ब्राह्मिक अथवा तात्विक (Nuomenal) जीवनांतला एक अति महत्वाचा प्रसंग होय. जें मरण जुलीअस सीझरला आलें नाहीं तरी आगष्टस सीझरला आलें, जें मरण येशूख्रिस्ताला आलें नाहीं तरी गौतमबुद्धाला आलें आणि जें मरण आतां आमच्या महर्षि देवेंद्रनाथाला आलें आहे, त्याचविषयीं आतां आपण कांहींसा विशेष विचार करूं या.

वर म्हटलें आहे कीं, मरणाचा खरा अर्थ कळण्यास अगोदर आपल्यास जीवनाचा खरा अर्थ कळला पाहिजे. आतां आपण अशी कोणती एक वस्तु आहे ती शोधूं कीं, जी ह्या जीवनांत सारभूत आहे, कीं जिच्यासाठींच आम्ही ह्या जीवनास चिकटून राहतों आहों, इतकेंच नव्हे, तर ह्या जीवनांतून बाहेर गेलेल्यांसही जिच्यामुळें आपण आपल्याकडे ओढीत आहों. एकदम सांगून टाकावयाचें म्हटलें तर ती वस्तु प्रेम ही आहे. ह्या प्रेमावांचून जीवन जीवनत्वास मुकतें आणि मागें नुसतें अस्तित्व मात्र उरतें; तुम्ही म्हणाल प्रेमाशिवाय कर्तव्य हें एक जीवनाचें मुख्य अंग आहे. पण कर्तव्य म्हणजे काय ? केवळ नियम पाळणें. चंद्र, सूर्य, सारी जड सृष्टि सतत नियम पाळीत आहे. आणि ती म्हणजे नुसत्या अस्तित्वापलीकडे काय आहे ? तुम्ही म्हणाल जाणीव हेंही एक दुसरें अंग आहे; पण जाणीव म्हणजे काय ? केवळ बिंबप्रतिबिंबभाव. स्वच्छ आरशांतही हा भाव असतो. म्हणजे आरशांत जशी बाह्य वस्तूचें प्रतिबिंब दाखविण्याची शक्ति आहे तशी मनांत जी शक्ति आहे ती जाणीव आणि हा आरसा, अथवा ही प्रतिहत पारदर्शकता म्हणजे काय, तर केवळ अस्तित्व ! केवळ अस्तित्वमय कर्तव्यांतून जीवनमय कर्तव्यांत आम्हांस कोण आणन सोडतो ? एक प्रेम. केवळ अस्तित्वमय जाणिवेंतून म्हणजे बिंबभावांतून जीवनमय जाणीवेंत अगर ज्ञानांत आम्हांस कोण आणितें ? एक प्रेम ! तर जीवनाचें खरें लक्षण आणि सार, प्रेम हेंच नव्हे काय ?

पण प्रेम ह्या शब्दाची व्यवहारांत केव्हां केव्हां अगदीं भलत्याच अर्थी योजना होत असते. एकाद्याचें एकाद्या वस्तूवर प्रेम जडतें म्हणून तो त्या वस्तूचा अपहार करितो असें आम्ही म्हणतों. पण येथें जी आसक्ति जडते ती प्रेम नव्हे तर निव्वळ क्षुधा म्हणजे प्रेमाची अगदीं उलट बाजू होय. प्रेमी मनुष्यानें आपल्यास एक पदार्थ आवडतो म्हणून तो गिळून बसणें, हें प्रेम नव्हे, तर त्याप्रीत्यर्थ त्यानें स्वतःस अपण करणें हें प्रेम होय. प्रेमाच्या विषयापुढें प्रेमी आपल्या स्वतःस विसरतो किंवा त्याशीं तादात्म्य पावतो म्हणावयाचा. मोक्षमूलरनें आपल्या प्रिय पत्नीस लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रांत म्हटलें आहे:—

* "आम्ही व इतर आत्मे ह्यांमध्यें जे कित्येक उपाधीचे पडदे पडले आहेत ते एकीकडे सारणें म्हणजेच प्रेम करणें होय. ईश्वराचे ठिकाणीं आम्हां सर्वांचा जो ऐक्यसंबंध आहे व जो ह्या संसारांत अनेक अदृष्ट कारणांमुळें तुटलेला असतो तो पुनः जोडणें म्हणजे तेंच प्रेम होय."

हें प्रेमच जीवनाचें लक्षण किंवा मुख्य हेतु होय. ह्या शिवाय जीवन हें जीवनत्वास मुकतें असें वर म्हटलेंच आहे. जीवनाच्या अगदीं प्राथमिक कोटींतही हें काष्ठांतल्या अग्नीप्रमाणें गुप्तरूपानें असतेंच. पशुकोटींत तें प्रथम अगदीं स्थूलमानानें प्रगट होतें. अत्यंत हिंस्र वाघीण, पण तिच्या पिलांस क्षुधा लागल्याबरोबर तिला वेदना होते व आपलें भक्ष्य ती त्यांच्यापुढें ठेवून आपण

* After all Love seems only the taking away those unnatural barriers which divide us from our fellow-creatures ; it is only the restoration of that union which bind us altogether in God, and which has been broken on earth we know not how. Life and Letters of Max Muller Vol. I, page 265.

स्वस्थ बसते. मग मुलास जखम झाली असतां मानवी आईच्या नेत्रांस अश्रु यावेत, मुलास दुखणें आलें असतां आईनें पथ्य सांभाळावें ह्यांत काय नवल! ह्या प्रकारें बालक व जननी ह्या मधलाच द्वैताचा पडदा दूर होऊन जीवनाचें कार्य आटपतें असें नव्हे तर व्यक्तीच्या जीवनाचा विकास जसजसा अधिक होतो तसतसा व्यक्ति आणि कुटुंब, व्यक्ति आणि जात, व्यक्ति आणि राष्ट्र, आणि अखेरीस व्यक्ति आणि विश्व ह्यामधील पडदा क्रमाक्रमानें गळून पडतो. अशा प्रकारें व्यक्तीची मर्यादा अनंतत्वाप्रत पावल्यावर तिच्या आतांपर्यंच्या मर्यादित जीवनाचा शेवट अगर कळस होऊन अतःपर तिच्या अमर्याद जीवनास सुरुवात होते. मग त्या सुखाचे सोहाळे काय वानावेत! त्याला उपमा कसली द्यावयाची आहे.

तुकोबा म्हणतातः—

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां।
तो जाला सोहळा अनुपम्य ॥ धृ० ॥
आनंदें दाटली तिन्हीं त्रिभुवनें।
सर्वात्मकपणें भोग झाला ॥ १ ॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला।
त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा ॥ २ ॥
फिटलें सुतक जन्ममरणाचें।
मी माझ्या संकोचें दूरी जालों ॥ ३ ॥
नारायणें दिला वसतीस ठाव।
ठेवुनियां भाव ठेलों पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे दिलें उमटुनी जगीं।
घेतलें तें अंगीं लावुनियां ॥ ५ ॥

ह्या प्रमाणें मरण म्हणजे मुक्तीचें द्वार. आणि तें वर म्हटल्याप्रमाणें आम्ही आपल्या डोळ्यानेंही पाहूं शकतों. मरण म्हणजे देहाचें विसर्जन अवश्य झालेंच पाहिजे असें नाहीं. किंवा विसर्जन झालें म्हणूनही कांहीं वाईट झालें असें नाहीं. देहींच विदेही दशा भोगीत असतां देह गेला काय राहिला काय सारखेंच. मरण म्हणजे मर्यादित अथवा एकदेशीय जीवनाचा अंत किंवा केवळ कळस, अथवा आत्म्याचें पूर्णपणें जागें होणें. देह व इंद्रियगण हीं सर्व त्या आत्म्यास जागें करण्याचे उपाय होत. एकाद्या सार्वभौम राजेंद्रास जागें करावयाचें झाल्यास प्रातःकाळीं त्याची पट्टराणी येऊन प्रथम पाय चेपूं लागते; कंचुकी मंदमंद वारा घालितो व बंदीजन त्याच्या पूर्वजांचें यश मंजल स्वरांत गाऊं लागतात. पण राजेश्वर एकदांचे खडखडीत जागे झाले कीं, बंदीजनाचें गायन व सर्व उपचार बंद होतात, मग त्याला त्या गायनाचा गोंगाट नकोसा होतो. त्याच प्रकारें आत्म्याला एकदाचा पूर्ण प्रेमबोध मिळाला कीं, मग त्याला ह्या मर्यादित जीवनाच्या हांथरुणांत पडून रहावयास नकोसें वाटतें. ही हाडाकातड्याची खोळ झुगारून द्यावीसें वाटतें. इंद्रियगण व त्यांचे विषय जीं जागृतीचीं साधनें त्यांचीही त्याला जरूरी राहत नाहीं. एकनाथांनीं मार्मिकपणें म्हटलें आहेः—

नवा ठांई फाटला झगा* ।
तो नये तुझे उपयोगा ॥
विषय भोगीत अंगा।
तो मज दान पिंगळिया ॥
तेणें टळेल तुझी पीडा।
चुकेल मीतूंपणाचा झगडा ॥
स्वरूपीं होईल आनंद गाढा।
श्री जनार्दन प्रसादें ॥
एका जनार्दनीं प्रेम बोध।
प्रगट होय संवाद ॥
पिंगळा भाकितसे प्रबोध।
परोपकार जाणे गा राया ॥

डुगडुग्या. भजनी भारूड संग्रह.

असो. एकुण मरण म्हणजे कांहीं अशुभ व दुःखाचा प्रसंग नव्हे तर स्वरूपीं होणारा 'गाढा आनंद, असें एकनाथ स्वामी सांगतात. नारायणानें अंगीं लावून घेतलें म्हणून अनुपम सोहळा असें तुकाराम साधु म्हणतात. तोच अर्थ इंग्रजींत Restoration of union असें भट्ट मोक्षमूलर सांगतात! पण असें मरण यावयाला आधीं आपलें जीवन कसें घालविलें पाहिजे हें आतां निराळें सांगावयास नकोच. गौतमबुद्धाला असेंच मरण अथवा निर्वाण प्राप्त झालें. आमच्या महर्षि देवेंद्रनाथालाही हेंच मरण आलें. प्रयत्न केल्यास आम्हां सर्वांनांही हाच निर्वाणाचा सोहळा प्राप्त होण्याचा संभव आहे. सर्वत्र हाच सोहळा गाजावा असा ईश्वरी संकेत आहे. जयजयकार असो त्यांच्या मंगल योजनेचा!

* नऊ छिद्रें असलेलें हें शरीररूपी वेष्टण.

## स्त्रीदैवत.

( ता० २०-२-१९१० रोजीं सायंकाळीं मुंबई प्रार्थनामंदिरांत आपल्या साध्वी मातुःश्रीच्या आद्यश्राद्धानिमित्त केलेल्या उपदेशाचा सारांश ).

ईश्वराचा साक्षात्कार वनामध्यें, मनामध्यें व जनांमध्यें अशा तीन ठिकाणीं होत असतो. सृष्टीमध्यें सौंदर्य आपल्या नजरेस पडतें. नद्या, पर्वत, डोंगर, सागर, महासागर, सकाळ संध्याकाळ इत्यादिकांमध्यें देव आहे अशी साहजिक समजूत आपली होते, त्याचप्रमाणें आपल्या अंतःकरणांतही त्याचा मंगल हस्त स्पष्ट दिसतो. सदसद्विवेक बुद्धि तोच देतो म्हणजे ईश्वर सृष्टींत म्हणजे वनांत व मनांत आहे ही गोष्ट समजणें फार कठिण नाहीं; पण इश्वर जनांत आहे हें अझून जसें समजावें तसें समजलें नाहीं. जोंपर्यंत जनामध्यें ईश्वराचा साक्षात्कार आपणांस पटत नाहीं तोंपर्यंत वरील दोन पटलेले साक्षात्कार अपूर्ण होत. याकरितां जनामधील साक्षात्कार प्राप्त करून घेण्याकरतां आपण नहमीं झटलें पाहिजे व मनांत अशी इच्छा धरिली पाहिजे कीं,—" पाहिन जनीं जगदीश कधीं मी, आस मनाही लागली."

पूर्ण दयाघन, शाश्वत, पापाचा नाश करणारा, मंगल, भक्तांचें मनोरंजन करणारा असा परमेश्वर जनामध्यें पहावयास पाहिजे. आज मी स्त्रियांमध्यें ईश्वर कसा दिसतो हें सांगणार आहें. स्त्रीस्वभावामध्यें ईश्वरी अंश आहे हें अझुन फारस समजलसें दिसत नाहीं.

" जसें खारें पाणी पिउन
घन तें गोड करिती ।
स्त्रिया दुःखा तवी
गिळुनि सुखराशीस वमती ॥ "

जर कां आकाशांत मेघावली नसत्या तर आमची कोण दुर्दशा झाली असती! पृथ्वीवर एक भाग जमीन व तीन भाग पाणी असुन काय फळ? त्या चट सान्या पाण्याच्या बिंदु बिंदूतून क्षार भरला असल्यामुळें महासागराचे कांठीं बसून देखील आमच्या व तशाच सकल जीववनस्पतींच्या कंठाला कायमची कोरड पडली असती, नव्हे!

जशी गत ढगाविना सृष्टीची, तशीच स्त्रियाविना ह्या संसाराची आहे, हें जाणत्यांनीं थोडा विचार करून पाहिल्यास दिसेल. सृष्टींत जसें खारें पाणी ठाईंचेंच विपुल आहे, तसें संसारांत सुखाच्या साधनांची ही समृद्धि आहे तरी पण सुखाच्या ह्या कच्च्या मालाचे पक्के उपभोग्य नग कोण बनवितें बरें ?

अविचारी पुरुषांनो! सुखाचे पक्के नग बनविण्याची कामगिरी पुरुष करितो असें कृतघ्न आणि धाडसी उत्तर तुम्ही उतावीळपणें द्याल. पण किंचित् विचार करा! कृषि, उद्योग, व्यापार, राजकारण, समाजबंधन, धर्मानुशासन आणि तत्वज्ञान अशा ह्या सात पर्यायांनीं पुरुष ह्या जगांतील सृष्ट संपत्तीवर आपली कुशलता व परिश्रम लढवितो, पण तेवढ्यानेंच सुखाचा पक्का नग तयार होतो अशी तुमची समजूत होईल तर ती चुकीची समजा. सुखोत्पादनाचे कामीं पुरुषांचें बाहुबळ किंवा बुद्धिबळ ह्या दोहोंची किंमत प्राकृत जड संपत्तीहून कांहीं विशेष निराळी आहे असें नाहीं. हे सर्व कच्च्या मालाचेच प्रकार समजावेत.

जेव्हां अखेरीस संसार रंगभूमीवर स्त्री येते व तिच्या अंतःकरणांतील प्रेमलहरीचा ह्या संपत्तीला स्पर्श घडतो तेव्हांच ह्या सर्व संपत्तिपरंपरेचें पर्यवसान पक्क्या सुखांत होतें; एरव्हीं सर्व गाबाळच, ह्यांत संशय नको. पुरुषांचें लक्षण वीर्य, तर स्त्रीचें लक्षण सहनशीलता होय. सुखाच्या कच्च्या मालांत जो सर्वत्र क्षार भरला आहे तो गाळून गोड करावयाचें झाल्यास तेथें वाचांचें कांहींच चालावयाचें नाहीं. त्यासाठीं सहनशीलतेची बळकट चाळण पाहिजे, आणि ती चाळण स्त्रीलाच लाधली आहे! ह्या सहनशीलतेच्या द्वारें स्त्री ही पति, पुत्र आणि पिता ह्या तिघांची आज्ञा पाळते इतकेंच नव्हे तर त्यांचे लळेही पाळिते. वरवर पाहणारास ती पति आणि पिता ह्यांची आज्ञा पाळते असें दिसेल, पण खोल पाहिल्यास ती त्यांचे लळे पाळते असें दिसेल. सहज पाहतांना ती आपल्या कोमळ अर्भकाचे किंवा जवान पुत्राचे लळे पाळित असें दिसेल, पण विचारदृष्टीनें पाहिल्यास ती त्यांच्या आज्ञाही पाळीत आहे असें दिसेल. लळे होवोत कीं आज्ञा होवोत ज्या दैवी गुणाच्या द्वारें स्त्री त्यांचें पालन करिते तो

गुण सहनशीलता होय. तो गुण पुरुषामध्यें नाहीं. पुरुष नादानें किंवा भीतीनें किंवा वैतागानें केव्हां केव्हां सहनशील होतो, पण तें सहन करणें नव्हे, तें त्याचें दौर्बल्य होय. तो दैवी गुण नव्हे. कृति करण्याचें जसें एक सामर्थ्य आहे तसेंच सहन करण्याचें दुसरें किंबहुना श्रेष्ठ सामर्थ्यच आहे. पहिलें पुरुषाला व दुसरें स्त्रीलाच प्राप्त झालेलीं विशेष धनें होत, ह्या दोन जाती ह्या दोन भिन्न दैवी गुणांनीं मंडित झाल्या आहेत. पहिल्याच्या योगें सुखाचा कच्चा माल व दुसऱ्याच्या योगें त्याचा पक्का नग तयार होतो.

बाळपणीं, तरुणपणीं आणि वृद्धपणीं स्त्रीचा अत्यंत पवित्र सेवाधर्म—किंवा शुश्रुषाधर्म—चुकत नाहीं. ती माहेरीं असो कीं सासरीं असो तिचें हें असिधाराव्रत चालूच असतें. घरीं पाळण्यांत मूल रडूं लागलें आणि आईनें त्याच्या भावाला हालवायास सांगितलें तर तो फार तर एक दोन झोंके देऊन चटकन् आईचा डोळा चुकवून आपल्या चेंडूला टोलवीत निसटून जाईल. पण तीच बहीण असेल तर ती आपला खेळ सोडून पाळणा हालवीत राहील. सासरीं जशी ती सासऱ्याची व दिराची कटकट सोशील तशी आपल्या माहेरीं ती बापाची व भावाची कटकटी सोशीत राहील.

भाच्या मामी पतिला
पत्नी पुत्रा होई माता।
भावा बहिणी दिरास
वहिनी कन्या होई ताता॥
—बाबा गर्दे.

ह्या प्रमाणें तिला जरी वरवर निराळीं दिसणारीं पात्रें घ्यावीं लागलीं तरी काम एकच; तें सहन करण्याचें. आमरण व बिनबोभाट ही सहनशीलता तिनें पतकरली नसती, पदोपदीं तिनें आपल्या स्वाभाविक हक्कांचें हवन करून आपल्या पुरुष साथीदाराच्या माथ्यावर कर्तव्याचें ऋण सांचविलें नसतें, तर आमचा हा संसारशकट वंगण नसलेल्या चाकाप्रमाणें कर्कश झाला असता व लवकर झिजला असता. फार तर काय इतकें सर्व करून, आपण करितों असा तिनें नुसता बोभाटा केला असता तरी आमच्या सुखाची घडी बिघडली असती. ही तिची सहनशीलता केवळ दैवी सामर्थ्यच म्हणावयाचें, दुसरें काय!

भगवान् श्रीकृष्ण विभूतिविस्तार सांगून शेवटीं एक साधारण सिद्धान्त सांगतात.—

माझ्या दिव्य विभूतीला
अंत नाहीं परंतपा।
हा तो विभूति विस्तार
म्यां संक्षेपेंचि वर्णिला॥
आतां जो का भाग्यवंत
प्राणी श्रीमंत ऊर्जित।
तो तो तूं जाण कीं
माझ्या तेजांशाचाचि संभव॥
अध्याय १०, वामनपंडित.

गीताकार प्रत्यक्ष श्रीकृष्णाइतके रसिक आणि सत्यग्राही असते तर त्यांनीं वर दिलेल्या विभूतिविस्तारांत स्त्रीचें उदाहरण खचित दिलें असतें. स्त्रीमधीलही श्रीमंत आणि ऊर्जित सहनशीलता दैवी तेजाचा अंश कोण नाहीं म्हणेल? साधेभोळे तुकोबा तर आपला निष्कपट अनुभव निवेदन करितात कीं,

स्त्री पुत्र बंदीजन। नारायण स्मरवीति॥

भक्त केशवचंद्र सन ह्यांनीं खालीं वर्णिल्याप्रमाणें चहूंदिशीं ईश्वरीरूप पाहून नमस्कार केला आहे.

हा विशाल संसार। तव प्रिय परिवार।
नरनारी त्वत् प्रकाश महिमा अपार।
स्त्रीलोक—बालक—शत्रु—मित्र पदीं वारंवार नमस्कार। तुम्ही सर्व—मूलाधार॥—
नमो देव। नमो देव। नमो निरंजन हरी॥ धृ०॥

ह्यावरून आपण स्त्रीच्या ठिकाणचें दैवत ओळखलें पाहिजे इतकेंच नव्हे, तर त्याला अत्यंत आदरपूर्वक अनेकवार नमन केलें पाहिजे. असें असून रामकृष्णादिकांचे ठायीं पराक्रम पाहून किंवा बुद्धाखिस्तादिकांचें प्रेम पाहून केवळ पुरुषांच्या ठायींच आम्ही ईश्वर पाहतों हें कसें? भारत, रामायण आणि इलियड हीं सारीं पुरुषांचींच गोडवीं आहेत तर काय? पण पुरातन काळापासून आमची सहचारिणी आम्हांबरोबर चालत आलेली अबला स्त्री तिच्यामध्यें कांहीं दैवी अवतार नाहीं काय? ईश्वराचा कर्तृवशक्तिरूपी जो प्रखर अंश त्याचें द्योतक म्हणून चंडी, मुंडी, महाकाली इत्यादि देवींचीं रूपें आम्ही हिंदूंनीं कल्पिलीं

आहेत. पण तो प्रकारही पौरुष गुणांचा सत्कार झाला. सहनशक्तिरूपी ईश्वराचा जो सौम्य अंश आहे त्याची कल्पना आम्हा अवतारप्रिय हिंदूंना अद्यापि नाहीं हें किती नवल आहे.

" मातृदेवो भव " मातेच्या ठायीं देवाला पहा असें मनूजी सांगतात. पण स्त्री सर्व अवस्थेत सर्व प्रसंगींही माताच असते. पति, पिता, पुत्रादिकांचे ती सर्वच काळीं अपराध सहन करिते, शुश्रूषा करिते आणि लाड पुरविते म्हणून ती सर्वांची सारखीच माता म्हणावयाची. तर आपण केवळ मातृदेवो भव असें न म्हणतां स्त्रीदेवो भव असें म्हटलें पाहिजे. ज्यानें आपल्या पत्नीला तुच्छ मानिलें, कन्येला हेळसांडलें, सुनेला लाथाडलें, त्यानें नुसत्या आपल्या मातेपुढें मात्र मान लवविली तर तो त्याचा मिथ्याचार समजावा. आपली बायको, बहीण, मुलगी, सून ह्या सर्वजणी कोणाच्या तरी आया असणार किंवा होणार व आपली आईही तशीच कोणाची तरी बायको आणि कोणाची तरी सून असणार. तर मग दुसऱ्या कोणाचा तरी देव तो आपला पायपोस आणि आपण धिःकारलेली वस्तु दुसऱ्या कोणाचें तरी पूजास्थान हा कोण प्रकार ? पूज्यतेच्या बाबतींत हा उलटासुलटा न्याय अत्यंत दुःसह आहे.

दुसऱ्या एका प्रकारच्या लोकांचा धर्म 'स्त्रीदेवोभव' असा असतो तसा मात्र येथें अर्थ समजूं नये. नामदेवांनीं म्हटलें आहे कीं:—

ऐका कलियुगाचा आचार। अधर्मपर झाले नर १
मंचकावरी बैसे राणी । माता वाहातसे पाणी २
स्त्रियेसी अलंकार भूषण । माता वळीतसे शेण ३
स्त्रियेसी पाटावाची साडी।माता नेसे चिंध्या लुगडीं ४
सासु सासऱ्या योग्य मान। मायबापा न मिळे अन्न ५
साली सासवा आवडती । बहीणभावा तोंडीं माती ६
स्त्रियेसी एकांत गोडी । मातेसी म्हणे + + वेडी ७
म्हणे विष्णुदास नामा । ऐसा कलियुगींचा महिमा ८

वर वर्णिलेल्या मिथ्याचाराचा निषेध कोणीही करील. कारण ह्या ठिकाणीं पुरुष स्त्रीचे ठायीं देव पाहत नसून एक उपभोग्य वस्तु पाहून तिच्या ठिकाणीं लाचावलेला असतो, इतकेंच. हा प्रकार केवळ तामसी झाला. ज्या स्त्रीच्या पोटीं आपण झालों तिनें आपल्याला प्रेमानें, सहिष्णुतेनें आणि कौतुकानें वागविलें म्हणून तिलाच तेवढें देव मानणें हा प्रकार राजसी झाला. पण स्त्रीजातीच्या ठायीं हे दैवी गुण स्वाभाविकच आहेत हें जाणून सर्व स्त्रीजातीला पूज्य मानून तिचा सत्कार करणें हा सात्त्विक प्रकार होय, हेंच सुधारकाचें लक्षण, हीच सभ्य गृहस्थाची चालरीत समजावी.

सहनशीलता हा गुण पुरुषामध्यें मुळींच नसतो असें नाहीं. कित्येक पुरुषांमध्यें स्त्रीस्वभावाचें प्राबल्य असतें. तसेंच उलट पक्षीं कित्येक स्त्रियांमध्येंही शौर्यधैर्यवीर्यादि पुरुषस्वभावाचें प्राबल्य दिसून येईल. तात्त्विकदृष्ट्या पाहतां स्त्रीपुरुष हा भेद केवळ शारीरिक नाहीं तर मानसिक आहे हें उमगेल. शौर्य आणि सहिष्णुता हे दोन्ही दैवि गुण होत.एक सामर्थ्यदर्शक,दुसरा दौर्बल्यदर्शक अशांतला प्रकार नसून दोहोंमध्यें भिन्न प्रकारचें ईश्वरी सामर्थ्यच आहे असें जाणलें पाहिजे. आणि ह्या दोहों प्रकारच्या सामर्थ्याची सुसंगत घडल्यामुळेंच संसार चालला आहे. एरवीं तो चालणें शक्य नाहीं हें जाणून हे दोन गुण ज्या दोन भिन्न जातींमध्यें विशेषपणें वसत आहेत त्यांनीं परस्परांशीं योग्य आदर राखावा स्वतःचीच वडेजावी मिरवूं नये; म्हणजे संसार सुरळीत चालेल इतकेंच नव्हे तर नर आणि नारी ह्यांचें ऐक्य होऊन एक पूर्ण पुरुष उदय पावेल आणि तेथेंच ईश्वरदर्शन किंवा ब्रह्मसाक्षात्कार घडेल. ॐ शांतिः शांतिः शांतिः

## दान आणि ऋण.

( रविवार ता० २१ ऑगस्ट १९१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश. )

आज आमच्या ब्राह्मसमाजाचे एक प्रचारक भाई बलदेव नारायण हे परलोकवासी होऊन सहा वर्षें झालीं. हे इराणांत प्रचारासाठीं गेले असतां बगदाद येथें अकस्मात् पटकीचा उपद्रव होऊन तेथील तुर्की इस्लाम हॉस्पिटलमध्यें ता० २१ ऑगस्ट सन १९०४ रोजीं मरण पावले. यांच्या विषयींचा एक लहानसा सुंदर चरित्रात्मक ग्रंथ कुचबिहार येथील बाबू गौरीप्रसाद मुजुमदार यांनीं नुकताच प्रसिद्ध केला आहे. भाई बलदेव हे आमच्या समाजाच्या नामांकित आणि पुढारी

प्रचारकांपैकीं एक होते असें नाहीं, किंबहुना हिंदुस्थानांतील कित्येक ब्राह्मांना यांचें नांवही माहीत नसेल, तथापि ब्राह्मसमाजामध्यें प्रचारकपणाला जे दोन अत्यावश्यक गुण, ह्मणजे स्वतः-विषयींच्या वासनांचा पूर्ण संन्यास आणि समाजसेवेविषयीं आतुरता हे त्यांच्या अंगीं पूर्णपणें वसत होते. भाई बळदेव बहारप्रांतीं जन्मले. लौकिकांत कुलिन शब्दाचा जो अर्थ होतो त्या अर्थानें यांचा जन्म मुळींच कुलीन नव्हता. पण ऋषींचें कुळ कधींच पहात बसूं नये. धर्म आणि नीति यांची लागवड कडधान्याप्रमाणें केवळ वंशपरंपरेनें होत नसते. यांच्या बीजांची वाढ होण्याला भूमीचें सर्वतोपरी अवलंबन नको आहे. केवळ नैसर्गिक नियमानुसार जन्मास आलेल्या विभूतींमध्यें सात्त्विक गुणांचा आणि तेजाचा कळस झाल्याचीं उदाहरणें उपनिषद्‌–काळापासून मबलक मिळत आहेत. पुराणांतही पूज्यपादारविंद विदुर आणि तत्प्रणित नीति पुष्कळ सांपडते. केवळ जातिकुलाभिमानाच्या बाह्य अवडंबरानें मनुष्य जेव्हां डोईजड होतो, तेव्हां निसर्ग देव जणूं काय आपला सात्त्विक सड उगविण्यासाठीं आणि धर्मनीतीची स्वतंत्रता स्थापण्यासाठीं आपलीं विशेष अपत्यें निर्माण करून जगास देतो. बळदेव भाईही याच कोटींतले होते. ते स्वतः जरी बहारप्रांतांत जन्मले तरी त्यांना दक्षिणेंतील मंगळूर येथील समाज इतका आवडला कीं, त्यांच्यामागें त्यांच्या झोळींत जी कांहीं भिक्षा उरली ती सर्व मंगळूर ब्राह्मसमाजास त्यांनीं अर्पण केली आणि तिचा व्यय कानडी भाषेंतून ब्राह्मधर्मविषयक पुस्तकांचा प्रसार करण्याकडे व्हावा असें मृत्युपत्रांत नमूद करून ठेविलें. स्वतः संन्यासी होते तरी पंक्तिप्रपंच न करतां सामाजिक मेळे आणि संमेलनेंही ह्या भिक्षेतून व्हावींत असें बजावून ते इराणांत प्रचारास गेले. आणि तेथेंच त्यांनीं आपली ऐहिक यात्रा संपविली. याप्रमाणें वर्ण, आश्रम, प्रांत, देश, भाषा, याति, कुल आणि धर्म या कशाचीच बाधा ब्रह्मतत्त्वास होत नाहीं, हें त्यांनीं आपला जन्म, जिणें, आणि मृत्यु या तिहींच्या द्वारें दाखविलें.

भाई बळदेव ह्यांनीं समाजकार्यास आपल्या आयुष्याचें जें दान केलें त्यांत त्यांच्या मनाची एका विशिष्टच प्रकारची वृत्ति होती. तिच्यामुळें त्यांच्या कार्यांत यश आलें. तिचाच आपण विचार करूं. आम्हीं पुष्कळ वेळां आपापल्या परी लहानमोठीं दानें करीत असतों. पण त्यांची सफलता दानाच्या विषयावर नसून दात्याच्या वृत्तीवर अवलंबून असते. दान करतांना आपण मोठा उपकार करतों, स्वतःचा त्याग करतों, इत्यादि भ्रामक कल्पनांस आपण बळी पडूं नये; तें दान कितीही लहान असो, किंवा मोठें असो, खिशांतून काढून टाकलेलें एखादें नाणें असो, किंवा आपल्या एकंदर आयुष्याचें समर्पण असो, तें करीत असतांना आपल्याला असें वाटत असावें कीं केवळ आपल्यावर झालेल्या उपकाराची फेड आपण करीत आहों. आपलीं सर्व दानें ही मागील ऋणाची फेड असते अशी आपली नित्य समजत ठेवावी.

आमच्या हिंदुधर्मांत या ऋणानुबंधाविषयीं चांगली मार्मिक आणि तात्त्विक फोड केलेली आहे.

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः । तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः । परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ॥ तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः । भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥

( भ. गी. अध्याय ३ श्लोक ९ ते १३. )

वरील श्लोकांचा अर्थ पुराणवादी कांहींही करोत आणि प्रस्तुत रूढीमध्यें यांचा प्रचार कसाही असो, आम्हांला वरील वचनांचा इत्यर्थ एवढाच दिसून येतो कीं, समाजाची वाढ आणि विकास म्हणजे त्यांतील व्यक्तींनीं परस्पर ऋणामध्यें गुरफटून जाणें हें होय. वरील श्लोकांत सांगितलेले देव दूरस्थ आकाशांत नसून ते समाजाचेच लहान मोठे घटकावयव असतात. त्यांचें स्वरूप आणि व्याप्ति सुस्पष्ट जरी दिसत नाहीं तरी त्यांच्यामधील परस्पर देवघेवीवर समाजाची सरणी अवलंबून असते. या निराकार

समाजदेवतांची संभावना करून आपली शक्य-नुसार ऋणमुक्तता करून घेणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे; आणि त्या कर्तव्यास जो चुकतो तो 'स्तेन एव सः' या वचनाप्रमाणें चोर ठरतो. यद्यपि पिनलकोडाप्रमाणें चोरीची त्याजवर शाबिती झाली नाहीं तरी त्याहून वरिष्ठ कोडाबरहुकूम त्यावर शाबिती होतेच. हें जें परस्पर ऋणानुबंधनाचें चक्र प्रवर्तित झालें आहे, त्याचें अनुवर्तन जो कोणी करीत नाहीं, त्याचें आयुष्य व्यर्थ असें सोळाव्या श्लोकांत सांगितलें आहे. म्हणून आम्हीं दान करावें इतकेंच नव्हे तर तें करीत असतांना आम्ही जगावर मोठा उपकार करितों अशी आढयतेची भावना न ठेवतां मागील ज्ञात किंवा अज्ञात ऋणाची केवळ फेड करतों अशी नम्र भाविक बुद्धि राखली पाहिजे. म्हणूनच उपनिषदें म्हणतातः–

"श्रद्धया देयं ॥ अश्रद्धयाऽदेयं ॥ श्रिया देयं ॥ ह्रिया देयं ॥ भिया देयं ॥ संविदा देयं ॥"

(तैत्तिरीयोपनिषद् ११–३)

दान करीत असतांना आपल्या मनामध्यें अशी श्रद्धा असावी कीं, याचा परिणाम चांगला होईलच होईल. आपण देतों याची आपणांस पावती मिळेल कीं नाहीं, पुकारा होईल कीं नाहीं, परिणाम घडेल कीं नाहीं, अशा प्रकारच्या अश्रद्धेनें दान करूं नये. इतकेंच नव्हे तर देत असतांना आपणास लज्जा वाटावी. हें ऋण आपल्या हातून आतांपर्यंत फिटलें नाहीं, तेव्हां आतां याचा स्वीकार होईल कीं नाहीं म्हणून उलट आपला हात भीतीनें कापावा. तसेंच आपल्या अंतःकरणांत कधींहि तळमळ असूं नये कीं, हें आपण देतों तें न देतां आपल्याजवळ राहिले तर आपल्या बायकामुलांना संतोष होईल. उलट आपल्या बायकामुलांप्रमाणेंच दुसऱ्यांस जो संतोष होईल, त्याच्या सहानुभूतीच्या आनंदानें द्यावें, हें स्पष्ट करण्यासाठीं, 'संविदा देयं' असें म्हटलें आहे. असें न करतां आपण महेरबानी करणाऱ्या बुद्धीनें देऊं लागलों तर आपली निराशा होते. केव्हां केव्हां तर याहून दानाचा अधम प्रकार असा घडतो कीं दान देत असतांना आपण दुसऱ्यांस ऋणच देतों असें समजून त्याची फेड आपल्यास कधींतरी होईल अशी दुराशा आपल्याला लागलेली असते. अशा रीतीनें ऋण देणें म्हणजे आपला सत्यानाश करून घेणें होय. पश्चिम आफ्रिकेंतील निग्रो लोकांत प्रचलित असलेल्या भाकडकथांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झालेला आहे, त्यांत यासंबंधाची एक मार्मिक गोष्ट आहे ती अशीः–

एकदां एका लबाड मनुष्यानें आपल्या मित्राजवळ २०० काठ्या उसन्या मागितल्या आणि पुढच्या बाजारीं परत करीन असें सांगितलें. मात्र त्या दिवशीं सकाळीं येतांना बरोबर भरलेली बंदूक आणावी आणि आपली वाट पाहत घरीं येऊन बसावें असें बजाविलें. लगेच त्या लबाड मनुष्यानें आपल्या मित्रमंडळींपैकीं एक चित्ता, एक बोकड, एक रानमांजर आणि एक कोंबडा यांच्यापासूनही वरील प्रकारचा करार करून दोन दोनशें काठ्या उसन्या आणल्या. (काठी हें एक प्रकारचें जंगली नाणें दिसतें.) बाजारच्या दिवशीं हा लबाड मनुष्य आपल्या बसावयाच्या खोलींत मूठभर दाणे पसरून आपण आंतल्या खोलींत दार लावून दडून बसला. ठरल्याप्रमाणें प्रथम कोंबडा जो अर्थात् लवकर उठणारा प्राणी तो आला आणि भूक लागल्यामुळें जमिनीवर पडलेले दाणे सहजच वेंचून खाऊं लागला. मागून रानमांजर आलें. त्यानें कोंबड्यास खाल्लें. इतक्यांत बोकड आला, त्यानें रानमांजरास हुसकावून लावलें, इतक्यांत चित्ता आला त्यानें बोकडाची न्याहारी केली. मागाहून भरलेली बंदूक घेऊन माणूस आला, आणि स्वसंरक्षणार्थ त्यानें चित्त्यावर बंदूक झाडली. आवाज ऐकल्याबरोबर दडून बसलेला तो लबाड मनुष्य बाहेर येऊन आपला मित्र चित्ता याचा खून करणाऱ्याला तो धमकी देऊं लागला. शेवटीं आणली दोनशें काठ्या जास्ती देऊन त्या लबाड मनुष्यापासून त्यानें आपली कशीबशी सुटका करून घेतली. तात्पर्य हें कीं अशा रीतीनें ऋण न देतां शक्त्यनुसार प्रत्येकानें दानच केलें असतें तर आपत्ति टळली असती. याप्रमाणें आम्हींही दान करते वेळीं मनांत नीच हेतु धारण केल्यास आमचाही यद्यपि शारीरिक नसल्यास आध्यात्मिक नाश होतोच.

केव्हां केव्हां गोष्टींप्रमाणें म्हणींमध्येंही मर्म असतें. कानडी भाषेंत एक म्हण आहे कीं, "प्रेतावर केलेला शृंगार नव्हे आणि गांवावर केलेला उपकार नव्हे." सार्वजनिक कल्याणाची चर्चा चालू असलेल्या आधुनिक काळांत पुष्कळदां आमची अशी समजूत होऊन चुकते कीं, गांवावरील उपकार, हा सर्वांत मोठा उपकार पण वस्तुत. आध्यात्मिक दृष्टीनें पाहूं गेल्यास कोणतेंही दान लहान असो किंवा मोठें असो, एका व्यक्तीस असो किंवा सर्व जगतास असो, तें नुसती मागील ऋणाची फेड या बुद्धीनें करणें उचित आहे. आमचे परलोकवासी भाई बळदेव यांनीं नवविधा भक्तींतील शेवटची भक्ति जी आत्मसमर्पण ती आचरीत असतांना आमरण मनाची अशी उन्नत भावना ठेविली कीं, आपण जें जें करतों तें तें मागील उपकाराची फेड करण्यासाठींच करतों.

माझा सर्व भाव तुमचिया पायीं ।
झालों उतराई देवराया ॥

( तुकाराम.

---

## राज्यारोहण.

( गुरुवार ता. २२-६-११ रोजीं झालेला उपदेश. )

लंडन शहर हें ब्रिटिशसाम्राज्याची राजधानी होय, किंबहुना तें कांहीं दृष्टीनें सर्व जगाची राजधानी असें म्हटल्यासही विशेष अतिशयोक्तीचें होईल असें नाहीं. त्या ठिकाणीं आज किंबहुना आतांच आमचे प्रिय व पूज्य बादशहा पांचवे जॉर्ज यांच्या राज्याभिषेकाचा महोत्सव चालू आहे, त्यांतच आम्ही सामील होण्यासाठीं येथें जमलों आहों. पण अशा वेळीं साधारण माणसाची वृत्ति कोणत्या तऱ्हेची होण्याचा संभव आहे, हें लंडन येथीलच एका विनोदी पत्रानें एका चित्राच्या द्वारें दाखविलें आहे. हें चित्र असें आहे कीं, राज्याभिषेकाचा छबिना पहावयास प्रेक्षकांसाठीं रस्त्यावर ठिकठिकाणीं जागा तयार करीत असलेल्या सुतारांपैकीं एका ओबडधोबड सुतारास एक पार्लमेंटचा सभासद भेटून म्हणतो कीं, अशावेळीं मला बऱ्याच गोष्टींविषयीं बोलावयाचें आहे. सुतार त्यास निक्षून सांगतो कीं, तशा कांहीं तूं भानगडींत पडूं नको; तुझें आज कोणीच ऐकणार नाहीं; यावेळीं ऐकण्यांत येणारा शब्द काय तो हाच माझ्या हातोड्याचा, असें म्हणून तो आपले खिळे ठोकीत आहे. यावरून कोणत्याही महोत्सवाचा वेळ प्रत्यक्ष आला म्हणजे सामान्य लोकांचें लक्ष अगदींच वरवरच्या गोष्टींकडे जातें, हें दाखविलें आहे. तुकारामबोवांनीं तर याहीपेक्षां निर्भीडपणानें म्हटलें आहे कीं "आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटां झाली घणी" पर्वकाळ प्रत्यक्ष आला असतां कोणासही तत्वविवेचन, किंवा धर्मानुभवकथन अशा गंभीर गोष्टींमध्यें मन घालण्यास फुरसत मिळत नाहीं. लंडन शहरांतील सुतारांच्या ठोक्यांनीं लंडन शहर आतां जसें दणाणून गेलें आहे, तसाच सगळा गंगाकिनारा न्हाव्यांच्या आरोळ्यांनीं आणि भटांच्या संकल्पांनीं गजबजून जातो; परंतु आम्ही येथें जरी या महोत्सवानिमित्तच जमलों आहों, तरी सुतारांच्या ठोक्यांनीं आमचे कानठाळे बसण्याची भीति नाहीं, म्हणून या प्रसंगाविषयीं एक दोन तात्त्विक विचार आमच्या मनांत येण्यास अवसर आहे, आणि त्यासंबंधीं सावधान असणें आमचें कर्तव्य आहे.

थोडासा संसारामध्यें दुःखाचा चटका बसल्याबरोबर आमच्यापैकीं कित्येकजण मुळीं ईश्वरच नाहीं, या विश्वाला कोणी नियंताच नाहीं असा सिद्धांत ठोकून देतात; ही गोष्ट लक्षांत घेतली असतांना एकाद्या राज्यसंस्थेमध्यें थोडासा दोष आढळल्याबरोबर किंवा तिच्यामुळें एकाद्या व्यक्तीस किंवा व्यक्तिसमूहास नुकसान पोहोंचल्याबरोबर तो राजाच नको किंवा अजिबात राजकीय संस्थाच नको असे म्हणणारे कांहीं संतापी लोक आढळतात, याविषयीं विशेष नवल मानण्यासारखें कांहीं नाहीं. उलट अशा लोकांचो शांतपणें, शक्य असल्यास समजूत घालून त्यांना आळा घालणें हेंच थो[illegible] पदावर चढलेल्या पुरुषास भूषणावह आहे. मनुष्य प्राण्याची हल्लीं जी उन्नति झाली आहे, तिच्या इतिहासाकडे मागें दूरवर दृष्टि देऊन पाहिल्यास राजकीय संस्था ही या उन्नतीचें एक मोठें साधन आहे असें कळून येण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. केवळ तात्त्विकदृष्टीनें पहातां राजकीय संस्

जरी मनुष्यप्राण्याच्या उन्नतीचा एक शाश्वतचा भाग नसला तथापि तो बराच चिरकाल टिकणारा एक भाग आहे हें कोणासही नाकबूल करितां येत नाहीं. मनुष्यप्राणी समाज करून राहूं लागल्या दिवसापासून तों आजपर्यंत ही संस्था अबाधित राहिली आहे, इतकेंच नव्हे तर ती पुढेंही ज्याची नुसती अटकळही करतां येत नाहीं इतका वेळ टिकणार आहे; यावरून तिची चिरकालिक आवश्यकता आहे, हें उघड आहे; आणि पूर्णतेच्या काळाबद्दल हल्लीं आह्मांला जीं स्वप्नें पडत आहेत, कीं त्या काळीं मनुष्यव्यक्ति पूर्ण स्वतंत्र, नीतिमान् आणि कर्तृत्ववान् होऊन हल्लीच्या सारख्या कृत्रिम राजबंधनाची अवश्यकता राहणार नाहीं, सगळे सारखेच ज्ञानवान् आणि हिंमतवान् पवित्र झाल्यानें कोणाचे ठायीं दुसऱ्याला अपाय करण्याची मुळीं इच्छाच संभवणार नाहीं–मग एकापासून दुसऱ्याचें संरक्षण करण्याची किंवा दोघांमध्यें मध्यस्थी करण्याची गोष्टच राहिली–तीं स्वप्नें पडण्याइतकी आमची उन्नति होण्यास देखील ही मध्यंतरीची चिरायुषी राज्यसंस्थाच कारण होय. म्हणून आमची तिच्या विषयींची पूज्यबुद्धि आणि कृतज्ञताबुद्धि असली पाहिजे, आणि अशा महोत्सवाचे वेळीं ती भावना उचंबळून आली पाहिजे.

राज्यसंस्थेविषयीं हा सामान्य विचार झाला, परंतु ज्या विशिष्ट राज्यसंस्थेशीं आमचा संबंध जडला आहे तिच्यासंबंधींही आमची पूज्यबुद्धिच असली पाहिजे. हा जो आमचा पाश्चात्यांशीं योगायोग घडला आहे तो दोन तीन पिढ्यामागें आमच्या पूर्वजांना अगदीं एक मंगल दैविकृत्यच वाटत होता. ह्या दोन तीन पिढ्यांमध्यें आमच्या पूर्वजांपेक्षां आम्हांला बरेच निराळे अनुभव आले आहेत. त्यांना जें केवळ मनोवृत्तीच्या झटक्यासरशी आणि कल्पनेच्या तरंगामुळें वाटलें तें आम्हांला तशाच्या तसेंच वाटणें सहाजिक नाहीं. तथापि सूक्ष्म विचार करून पहातांनाही या घडून आलेल्या योगायोगाची शुभता आणि महत्त्व हीं आमच्या वडिलांपेक्षां आम्हांला मुळींच कमी दिसून येत नाहीं. आमच्या वडिलांमध्यें व आम्हांमध्यें जर कोणता फरक असेल तर तो हाच कीं आमचे व्यक्तिविषयक आणि राष्ट्रीय गुण आणि दोष कसाला लागण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला नाहीं म्हणून त्यांना या योजनेची शुभता फार मोहक वाटली आणि आम्हांला तर असे प्रसंग आज पावलोपावलीं येत असल्यामुळें साहजिकपणें ही शुभता तितकी मोहक वाटत नाहीं. पण यावरून प्रकृत योगायोग मुळीं शुभच नाहीं, असें म्हणणें हें केवळ अधार्मिक वृत्तीचें द्योतक होय. ज्याची धर्मबुद्धि जागी आणि उजळ आहे त्याला ही योजना त्याच्या आजापणजाइतकी मोहक जरी वाटली नाहीं तरी त्यांच्याइतकी शुभ खात्रीनें वाटेल आणि या योजनेची शोभनता उजागरीला येण्याला त्याला स्वतःचीच नैतिक तयारी अधिक नेटानें करण्याचा उत्साह येईल.

इंग्लंडच्या इतिहासाकडे पाहिलें तर तो एक मानवी इतिहासाचा सुंदर भाग आहे आणि त्यांत जरी कांहीं कांहीं दोष आढळून आले तरी त्या दोषांतही कांहीं महत्त्वाचीं रहस्यें आहेत असें आढळून येईल. अशा इतिहासाच्या ओघाशीं आपल्या भावी राष्ट्रीय चरित्राचा मिलाफ झाला ही गोष्ट कोणाही विचारी पुरुषास अभिमान बाळगण्यासारखीच आहे. तसें न करितां जो कोणी रुसून फुगून बसेल किंवा वितुष्ट वाढवील तर तो चालून आलेल्या संधीचा फायदा घेण्याला स्वतः अपात्र आहे असें होईल.

राज्यासनावर आज जे विराजमान होणार आहेत त्या भाग्यवान् पांचव्या जॉर्ज बादशहाशीं आम्ही व्यक्तिशः स्नेहसंबंध आणि आदरबुद्धि राखली पाहिजे. त्याच्या अवाढव्य राज्यछत्राखालीं जी असंख्य प्रजा आहे त्यांतील प्रत्येक व्यक्तीशीं प्रेमाची फेड करणें त्याला जरी शक्य नाहीं, तथापि या प्रत्येक व्यक्तीनें त्याजवर आपल्या अंतःकरणाचे द्वारा प्रेमाचा आणि आशीर्वादाचा वर्षाव करणें शक्य आहे. त्याच्या शिरावर आज जो मुकुट ठेवण्यांत येत आहे, त्याच्या जबाबदारीचें ओझें त्याच्या एकट्यावरच नसून त्याच्या असंख्य प्रजाजनांवर आहे; ही जी सुधारलेल्या प्रजेला शोभणारी भावना तिचा पाया वरील व्यक्तिगत प्रेमामध्यें बळकट रोंवलेला आहे. म्हणून विश्वनियंत्या परमेश्वराजवळ आम्हीं सर्वांनीं या चक्रवर्तीचें आयुष्य, बळ आणि संपत्ति वृद्धिंगत होवो अशी मनोभावें प्रार्थना केली पाहिजे.

## नाममंत्राचें सामर्थ्य.

(रविवार ता. १७–३–११ रोजीं डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या तिसऱ्या जयंती निमित्त केलेल्या उपदेशाचा सारांश.)

**नाममंत्र आहे सोपा । अविश्राम चाळी पापा ॥**
**जो कां निश्चय धरील । नाम तया उद्धरील ॥**
**नर नारी कोणी याती । नाम ठेवे एके पंक्ती ॥**
**तुका म्हणे ह्या नामानें । कृपा केली भगवंतानें ॥**

आतां ज्या साधूचा अभंग गाईला त्या तुकाराम महाराजांच्या चरित्राची काल्च (ता. १६ रोजीं) आपण ओळख करून घेतली. ते कसे वाढले, संसारांत असतांना त्यांनीं कसे दिवस काढले, ईश्वराच्या सेवेंत ते कसे राहिले, लोकांस त्यांनीं सन्मार्ग कसा दाखविला, संकटांस त्यांनीं कशी पाठ दिली, शत्रूंशींही ते कसे वागले वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टींचें ज्ञान आपण करून घेतलें आहे. असे जे साधूंत श्रेष्ठ साधू तुकाराम महाराज त्यांनीं सर्वकाल भजनांत, देवाच्या सेवेंत घालविला हें खरें. पण, त्यांनीं आमच्यासाठीं मागें कांहीं निरोप ठेविला आहे काय, कांहीं आनंदाची बातमी, कांहीं विश्रामाचें स्थान, संसारांत असतांना कांहीं समाधानाची जागा असें कांहीं ठेविलें आहे, किंवा कांहीं शुभवर्तमान गाजविलें आहे काय, असें वारंवार मनांत येतें. त्यास ह्या अभंगांत संपूर्ण उत्तर मिळणार आहे. होय. तुकाराम महाराजांनीं आपल्यामागें मोठा निरोप ठेविला आहे; आनंदाची बातमी आम्हां सर्वांच्यासाठीं ठेविली आहे. थकलेल्या भागलेल्यांस विश्रांतीचें स्थान ठेविलें आहे. आम्हीं मात्र आपली तयारी केली पाहिजे. आणि हा निरोप, ही बातमी, हें शुभवर्तमान सर्व कांहीं, ह्या एका अभंगामध्यें भरून आहे. या अभंगाच्या प्रत्येक ओळीमध्यें हें आनंदाचें वर्तमान ओतप्रोत भरलेलें आहे. त्याचा स्वीकार करण्याची मात्र आमची तयारी पाहिजे. पहा ह्या अभंगाच्या द्वारें तुकोबा काय संदेश पोंहोचवीत आहेत तो !

मनुष्यजन्माचा किती थोर अधिकार आहे ! मनुष्य जन्म प्राप्त होणें म्हणजेच आमची जणूं काय पापापासून मुक्तता होणें आहे. परंतु असें असून ह्या मुक्तीच्या, ह्या पापविमोचनाच्या गोष्टी सांगावयाच्या सोडून आम्ही अधिकाधिक पापांत पडतो आणि रात्रंदिवस पापाच्याच गोष्टी सांगतों ! इतर प्राणी पुष्कळ आहेत. सर्प आहेत, वाघ आहेत, सिंह आहेत, दुसरे अनेक हिंस्र पशू आहेत; पक्षी आहेत, त्या सर्वांना आत्मे आहेत. पण त्यांना मन नाहीं. त्यांच्या ठिकाणीं स्वतःच्या संबंधानें कांहीं जागृति नाहीं. कांहीं जाणीव नाहीं. यातना होत असल्या तरी काल्च्या यातनांची आज आठवण नाहीं, उद्यांविषयीची कल्पना नाहीं. आम्हांला मन मिळालें आहे, आम्हांला बुद्धि आहे. पाप दग्ध करून टाकणारा हा अमोलिक मनुष्यजन्म सांपडला आहे. आणि आम्ही त्याचें सार्थक करून घेत नाहीं. देवाच्या नामाचा हा सोपा मंत्र जणं काय सांपडला असून त्याची आम्ही हेळसांड करतो; पापकर्मांचा इतका ढीग करितों, परस्पराच्या हेव्यामध्यें इतकें गुंततों, संशयानें आपलीं मनें इतकीं दूषित करून घेतों, मत्सरानें इतके वेडावून जातों, ज्ञानी असून अज्ञानाचा इतका पसारा मांडतों, प्रेम–निष्काम प्रेम–करण्याचें सामर्थ्य आमच्यांमध्यें ठेविलें असून सूड घेण्याच्या बेतामध्यें इतके गुंग होतों कीं त्यामुळें अगदीं हिंस्र, अगदीं क्रूर, जीं श्वापदें तीं पुरविलीं, त्यांच्यापेक्षांही आम्ही क्रूर, अधिक कृतघ्न, अधिक दुष्ट होतों व आपल्या थोर अधिकारास मुकतों ! हें पाहून तुकोबा सांगताहेत असे भांबावूं नका. असे सैरावैरा पळूं नका. हा नाममंत्र अगदीं सोपा आहे. दुसरे लोक जादू टोण्याचे मंत्र पुष्कळ सांगत असतात. परंतु त्या सर्वांहून हा मंत्र सोपा आहे, ह्याचें सामर्थ्य अपार आहे. तुम्ही कितीही अपार पापें केलींत, पापांचे ढीग रचिलेत तरी एका क्षणामध्यें त्यांची राख करून टाकणारा हा मंत्र आहे ! एके बाजूला तुमचीं अपार पापें आणि दुसऱ्या बाजला प्रेमाची मूर्ति पण परमसामर्थ्यवान् परमेश्वर असा हा संबंध आहे. त्यामुळें त्या देवापुढें तुमच्या पापांचा तो काय टिकाव लागणार आहे ? मात्र तुम्हीं ह्या सोप्या नाममंत्राचा निश्चयानें आश्रय केला पाहिजे. हा धर्म नवीन आहे म्हणून बुझून जाऊं नका. कोणतींही संकटें आलीं, कसेही प्रसंग आले तरी देवाचें नांव सोडावयाचें नाहीं, देवाच्या सेवेला मुकावयाचें नाहीं

त्याचा जो हा मार्ग त्याच्यापासून एक रतिभरही मार्गे सरावयाचें नाहीं अशा निर्धारानें, अशा दृढनिश्चयानें ह्या संसारांत फिरा, कर्मे करा, वावरा, आनंदानें रहा, सेवेंत रत राहा म्हणजे पहा तुमच्या हातून कितीही पापें झालीं असलीं तरी एका क्षणामध्यें तीं दग्ध होतील. मात्र तुमच्या ठिकाणीं निश्चयाचें बळ असलें पाहिजे.

अशा ज्यांचा जागता निश्चय आहे, असें ज्यांचे बळ आहे, ते पुरुष आहेत कीं त्या स्त्रिया आहेत, ते उच्च जातीचे आहेत कीं ते खालच्या वर्गांतील आहेत, ते भाग्यवान् कीं भाग्यहीन आहेत, ते श्रीमंत आहेत कीं गरीब आहेत, ते अधिकारी आहेत कीं नाहींत, याचा मग विचार नाहीं. हें देवाचें नांव सर्वांना एका पंक्तीला नेऊन बसविते. हे उचनीचपणाचे भेद आम्हीं क्षुद्र मनुष्यांनीं केलेले. धन द्रव्याचे भेद हे निरनिराळ्या कारणाचे, निरनिराळ्या परिस्थितीचे परिणाम होत. नाममंत्राच्या आवारांत त्यांचा प्रवेश नाहीं. तेथें सर्वांची पंगत एक, सर्वांची जात एक, सर्वांचा धर्म एक, मात्र आमचा निर्धार पाहिजे. आमचा निश्चय जितका बलवान् तितका ह्या मंत्राचा परिणाम अधिक सुस्पष्ट आमच्या अनुभवास येतो. ह्या निश्चयाची, ह्या निर्धाराची, मनाच्या तयारीची आपणाला दोन उदाहरणें सांगतों. गौतम बुद्धांनीं लोकांस नवीन वाटणाऱ्या धर्माची स्थापना केली. लोकांना ज्या गोष्टी नवीन वाटत होत्या त्या त्यांनीं मोठ्या निर्धारानें प्रचारांत आणिल्या. पुरातन मार्गाचा त्याग केला. तो मार्ग खरा नव्हे असें सांगत सांगत ते संचार करूं लागले. त्यामुळें त्यांस ज्याप्रमाणें अनुयायी मिळाले त्याचप्रमाणें अनेक शत्रूंचीही जोड त्यांना लाभली! त्यांच्या शुभवर्तमानाच्यायोगें ज्यांची चित्तवृत्ति अगदीं क्षुब्ध झाली होती, त्यांना हा नवा धर्म अधर्म आहे असें वाटत होतें असे एक गृहस्थ एकदां गौतम बुद्धापाशीं गेले आणि त्यांनीं त्यांस मनसोक्त शिव्या देण्यास प्रारंभ केला! त्यांची त्यांनीं वाटेल तशी निर्भर्त्सना केली! परंतु त्याचा त्यांच्या मनावर कांहींही परिणाम झाला नाहीं! आम्हांला कोणी एक शिवी देणार असें वाटलें कीं, ती त्याच्याकडून स्पष्टपणें बाहेर येईल अशी आमची वृत्ति होते. मग त्यानें एक दिली तर आमच्या दोन होतात, त्याच्या सहा तर आमच्या बारा असें होऊन आम्ही दोघेही जीवंत नरकवासामध्यें लोळूं लागतों! परंतु बुद्धाची ही अशी वृत्ति पाहून त्या ब्राह्मणास मोठा अचंबा वाटला. इतक्या शेलक्या शिव्या दिल्या, इतकी निर्भर्त्सना केली, तरी हा बुवा कांहीं खवळत नाहीं, ह्याची चित्तवृत्ति क्षुब्ध होत नाहीं, ह्याची शांति आहे ती आहेच. हें पाहून तोच उलट अधिक क्षुब्ध झाला व म्हणाला, मीं इतक्या शिव्यांची लाखोली वाहिली, इतकी निर्भर्त्सना केली, तरी त्याचा आपल्यावर कांहीं परिणाम नाहीं. आपली पूर्वीची शांति आहे ती आहेच, हें कसें? बुद्धदेव म्हणाले: आपल्या होत्या नव्हत्या त्या सर्व शिव्या, सर्व शाप संपले ना! नसल्यास आणखी चालूं द्या. माझें उत्तर अगदीं साधें आहे. पहा, कोणी मोठ्या प्रेमानें जर आपल्याला कांहीं भेट आणली. पण त्या भेटाचा जर आपल्याला स्वीकार करावयाचा नसला, तर तें भेटाचें ताट आपण परत करितों; त्याचप्रमाणे मीहि करीत आहें. आपली ही मला भेट आहे, हें ताट माझ्यापुढें ठेविलें आहे पण तें मला नको आहे, मी त्याचा स्वीकार करीत नाहीं. आपण तें आणलें आहे तसें आपलें परत न्या. तें आपलें आपल्याजवळच ठेवा! कोण हा निश्चय, कोण ही शांति! एकार्थी अशा प्रकाऱ्या साधु पुरुषाची निर्भर्त्सना करणें हें देखील मोठें पुण्य आहे! कारण अशा साधूचा प्रत्यक्ष सहवास झाला म्हणजे मग आपलीं आंतील पापें सगळीं धुवून निघून आम्हीं शुद्ध होतों!

हा असा निश्चय किंवा ही अशी निर्धाराची वृत्ति एकट्या गौतमबुद्धाचीच होती असें नव्हे. त्यांच्या शिष्यांनींही असेंच साधन केलें होतें. एकदां एक शिष्य धर्मप्रचारास जाण्याची परवानगी मागूं लागला. त्याची गौतमांनीं अनेक प्रकारें समजूत केली, त्याचा निश्चय पाहिला. हा मार्ग नवीन आहे, लोक निर्भर्त्सना करितील, शिव्या देतील असें समजून मी समाधान मानून कामास लागेन असें बुद्धांनीं सांगतांच मला त्यांनीं मारलें नाहीं असें शिष्याचें उत्तर आलें! 'पण तुला मारही बसण्याचा संभव आहे' असें गुरूंनी म्हणतांच, त्यांनीं मला जिवें मारिलें नाहीं असें पाहून मी

पुन्हां प्रचाराच्या कार्याला लागेन, असें शिष्यानें सांगितलें. ' अरे बाबा, हा मार्ग इतका बिकट आहे, लोकांना इतका नावडता आहे कीं, ते खवळून जाऊन तुझा प्राणही घेतील ' असें बुद्ध देव म्हणाले. 'तर मग ह्यापेक्षां आणखी काय पाहिजे लोकांना सन्मार्गाचा उपदेश करीत असतां, लोकांच्या सेवेमध्यें असतांना मला मरण आलें तर ती माझी थोर पुण्याई, तर आतां मला आपण मागें ठेवूं नका, मला जाऊं द्याच. आपल्या कार्याला लागूं द्या. ' अशा शिष्याला मागें कोण ठेवणार, त्याला नको जाऊं म्हटल्यानें तो काय मागें रहाणार !

सारांश, अशा प्रकारच्या निश्चयानें ह्या महा मंत्राचा आम्हीं स्वीकार केला, तर आमच्या अखिल पापांचा तत्काळ नाश होईल. आमच्या सहवासानें इतरांच्या ठिकाणीं जागृति होईल. तर त्याचा स्वीकार करितांना आपण गरीब आहों, आपण स्त्री आहों, आपण हीन जात म्हणून गणलेल्यापैकीं आहों, आपण अज्ञान आहों, आपण आधींच पापराशी आहों, असले विचारच मनांत आणावयास नको. एकदां ह्या मंत्राचा स्वीकार करून निश्चयानें आम्ही वावरूं लागलों कीं त्याचें कार्य दिसलें, सर्व भेद नष्ट होतात, सर्व दोष नष्ट होतात, आपण शुद्ध होतों, आपण इतरांस शुद्ध करतों, आपण तरतों, इतरांस तारतों, असा हा नाममंत्र आहे, असा त्याचा महिमा तुकोबांनीं आपल्याला सांगितला आहे तो आपण लक्षांत ठेऊन त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय करूं या.

---

## *डिप्रेस्ड क्लासेस मिशनची चवथी जयंति.

ध्यारे भाई ध्यारे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥

तुकाराम—

संतांचीं मनें हे मानवी मनाचे खरे मासले होत. त्यांच्यामध्यें मनुष्य जातींचा बरेवाईटपणा, प्रगति आणि आकांक्षा यांचें पूर्ण प्रतिबिंब दिसून येतें. आतां म्हटलेल्या अभंगामध्यें ' सेवा भक्ति भाव नेणें मी पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ' हा मासलेवाईक उद्गार जणं काय सर्व मनुष्य जातीनें तुकारामाच्या तोंडावाटे काढला आहे. परमेश्वरानें ह्या विश्वचक्राची योजना केली आहे. आणि त्यांत मनुष्यप्राणी हाही अनेक साधनांपैकीं एक साधन आहे. पण इतर जड साधनांहून विशेष अशी एक जाणीव त्याच्यामध्यें असल्यामुळें त्याला वेळोवेळीं आपल्या अपात्रतेचा अनुभव येत आहे. पण मनुष्यप्राण्यांमध्यें ज्या थोर विभूति असतात, त्यांच्यावर या अपात्रतेच्या अनुभवाचा ठसा इतरांपेक्षां जास्त जोरानें उमटून ते ईश्वराजवळ ' अभय दान मज देईं गा उदारा ' अशी इतरांहून ज्यास्त कटकट करितात. आणि त्याचें फळ अभयदान हेंही त्यांना मिळतें. तें मिळाल्यावर ईश्वराकडे पाठ करून मनुष्याभिमुख होऊन ईश्वराच्या नांवावर "ध्यारे भाई ध्यारे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥ येच हाटीं येच हाटीं । बांधा गाठीं पारखून ॥ वेच आहे वेच आहे । सरलें पाहें मग खोटें ॥ उघडें दुकान उघडें दुकान । रात्र झाली कोण सोडी मग ॥ तुका म्हणे अंतकाळीं । जाती टाळी बैसोनी ॥ " असा साद घालीत जातात. सर्व मनुष्य जातीच्या अपात्रतेची जाणीव आणि अभयाची त्यांना मिळालेली खात्री या दोन गोष्टींमुळें त्यांनाच असें सादविण्याचा अधिकार आलेला असतो.

---

*डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था मुंबई येथें स्थापन होऊन चार वर्षें झालीं व बलिप्रदेच्या दिवशीं तिला पांचवें वर्ष लागलें, म्हणून मिशनच्या परळ येथील इंग्रजी शाळेंत ता. २ नोव्हेंबर सन १९१० रोजीं पाडव्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां ईश्वरोपासना झाली. ती रा. विठ्ठलराव शिंदे यांनीं चालविली त्या वेळीं प्रार्थनासमाजांतील आणि बाहेरील मिशनचे हितचिंतक मंडळींनीं आणि अस्पृश्य वर्गांतील स्त्रीपुरुष मंडळींनीं शाळेचा हॉल भरला होता. शाळेंतील पुष्कळशीं मुलें स्वच्छ स्नान करून आणि नीटनेटका पोशाख करून बसलीं होतीं. त्यांना दिवाळीचा खाऊ वाटल्यानंतर थोडीशी प्रार्थना करून त्यांना पाठविण्यांत आलें. नंतर उपासनेस आरंभ झाला उपदेशाच्या वेळीं रा. शिंदे यांनीं ' अभय दान मज देईं गा उदारा ' आणि ' ध्यारे भाई ध्यारे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥ ' हे दोन अभंग घेतले होते.

डिप्रेस्ड क्लासेस मिशन काढून काल चार वर्षे संपलीं. आज नूतन वर्षारंभीं डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी या नांवाचा खोल अर्थ काय आहे आणि त्या अर्थाची खरी सिद्धि कशी होणार या दोन गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे. मिशन हा शब्द आमच्याकडे अद्यापि नवीन आहे. तो आमच्या अंगवळणीं न पडल्यामुळें त्यामध्यें कांहीं न रुचणारी अशी परकीयता भासते. पौरस्त्य धर्मांतील मोक्षाचा मार्ग हा व्यक्तिविषयक आहे. प्रथम प्रथम तर ज्ञान आणि समाधि यामध्यें त्याचा नीरस लय होऊन पुढें त्यांत भक्तीची जोड मिळाली तरी प्रत्येकानें एकाकी ईश्वराकडे जावें हेंच धोरण बराच काळ होतें. पुढें भक्तिमार्गाचा विकास होत जाऊन रामानुजादि यांनीं त्याला सामाजिक स्वरूप दिलें. तथापि या भागवत धर्मास साधेभोळें प्राकृत रूप देऊन अभयाची सुवार्ता सर्व मनुष्यप्राण्यांस पोहोंचविण्याचें श्रेय तुकारामासारख्यांनीं "यारे यारे लहान थोर। नारि भलते नारी नर" "आम्ही वैकुंठ वासी" "पिटूं भक्तीचा डांगोरा" इत्यादि प्रकारें दवंडी पिटून संपादन केलें. तथापि मिशन, गास्पेल, इव्हांजेल इत्यादि शब्दांस अन्वर्थक आमच्या भाषेंत शब्द न मिळण्याइतका त्यांतील अर्थांचा आमच्यांतील सामाजिक आणि धार्मिक चळवळीमध्यें कमी प्रचार झाला आहे. इतकेंच नव्हे तर अझूनही हे शब्द आमच्या कानाला कडू लागतात. मिशन स्थापन झाल्यावर दोनतीन वर्षें वरील नांवांतील 'मिशन' हा शब्द काढून टाकण्याविषयीं कित्येक हितचिंतकांकडून कळकळीच्या सूचना वेळोवेळीं आल्या. याचें कारण या संस्थेचें खरें स्वरूप कळलें नाहीं एवढेंच. मनुष्याचा कोणताही वर्ग किंबहुना कोणीहि व्यक्ति कायमची पतित नाहीं, अस्पृश्य नाहीं, निराश्रित नाहीं, स्वर्गीय आशेचा तंतु कोणीही तोडण्यास समर्थ नाहीं. तात्पुरतिक निराशेनें खिन्न झालेल्यांना, दुःख, दैन्य आणि दारिद्र्य यांच्या संवयीनें जड झालेल्यांना अभयाची सुवार्ता पोहोंचविणें हें मिशनचें काम आहे. मिशन म्हणजे प्रेषित संस्था; केवळ ऐहिक कल्याणासाठीं झटणारी मंडळी नव्हे; यशापयशाकडे न पाहतां प्रेरणेच्या प्रवाहावर यत्न करणारी मंडळी होय. पण ही सर्व भाषा आमच्या देशबंधूंस परकीय वाटते. इच्या योजनेंत नुसतें पोकळ अनुकरण दिसतें. खाणें, पिणें, पेहराव, आणि बोलणें चालणें या वरवरच्या क्षुल्लक गोष्टींमध्यें पाश्चात्यांचें अनुकरण राजरोस सर्वच करीत आहेत. परंतु आध्यात्मिक अनुभवाच्या भरींवपणानें समाजसेवा घडत असतांनाही तद्दर्शक शब्द ऐकल्यावर मात्र कित्येक लोक कानावर हात ठेवतात. असो. मिशनचा खरा अर्थ हा आहे. एवढा थोर अर्थ आमच्या नांवामध्यें आहे म्हणून तशी लायकी आम्हांमध्यें आहे असें आम्हां कोणासही वाटत नाहीं. या कामास स्वतःस कायमचीं वाहून घेतलेलीं जीं चार दोन माणसें असतील तीं जवळ जवळ पूर्णपणें कामास नालायक आहेत, हें उघड करून दाखविण्याची आवश्यकता नाहीं. कांहींना तर आपल्या नालायकीचीही जाणीव नाहीं इतकी तीं साधीं भोळीं आहेत. मिशन सुरू झाल्यानंतर एकदोन वर्षांनीच मिशनची कान्स्टिटयूशन् (सनद) तयार झाली. त्यावेळीं डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया असा नांवाचा विस्तार होऊन उद्देशामध्यें असें म्हटलें आहे कीं शिक्षण, कामधंदा, समतेची आणि ममतेची वागवणूक, धर्मनीति आणि नागरिकता इत्यादि संबंधीं उपदेश ह्यांच्या द्वारां हिंदुस्थानांतील अस्पृश्य वर्गांना साह्य करण्याचा हें मिशन यत्न करील आणि ह्या मिशनचा योगक्षेम ही सोसायटी चालवील. ह्यावरून प्रत्यक्ष यत्न करण्याचें काम मिशनचें आहे. आणि द्रव्यबळ, व्यावहारिक अनुभव, नियंत्रण, सल्लामसलत, शिफारस इत्यादि ऐहिक सर्व अनुसंधानांच्या योगें हें मिशन जिवंत राखणें हें सोसायटीचें काम. मिशनरी आपल्या कामाला जसे नालायक आहेत तशीच सोसायटीही नालायकच आहे. कारण जबाबदारीच इतकी कठिण आणि जड आहे. तुकारामासारख्यांनाही सेवाभक्ति भावाच्या आदर्शाकडे नजर गेल्याबरोबर आपण पतित आहों असें वाटतें तर तेथें आमच्या मिशनचा आणि सोसायटीचा पाड काय? आम्ही वरपासून खालपर्यंत नालायक आहों हें उघड दिसतें. पण नांवाचा अर्थ आणि पुढील आदर्श हीं फार खोल असल्यामुळें आपल्या स्वतःची व सर्वांची नालायकी उघड आणि स्पष्ट केल्याशिवाय

राहिल्यास पदरीं अहंपणाचा आरोप येणार म्हणूनच केवळ स्वतःची नालायकी आम्हीं सर्वांनीं स्वतः सांगण्याची जरूरी आहे.

मिशन आणि सोसायटी याशिवाय एकत्र समाईक काम करण्याची तिसरी एक योजना आहे. अशा मंडळीस कम्पनी असें नांव असतें. तिचा उद्देश परार्थास बाधक न होईल अशा सर्व कायदेशीर बाजूंनीं आपला समाईक स्वार्थ साधावा असा असतो. या तिसऱ्या अर्थाचा नुसता स्पर्शही आमच्या मिशनसोसायटीस आज चार वर्षे झालेला नाहीं आणि पुढें होणार नाहीं असा विश्वास आहे. कोणत्याही एका मताचा स्वीकार करून त्या मताचा प्रसार करण्यासाठीं म्हणजे त्या मतानुयायांची संख्या वाढविण्यासाठीं मिशनाची स्थापना होत असते. अशा निरनिराळ्या मिशनांना कम्पनी हें नांव दिल्यास वावगें होणार नाहीं. मुंबईच्या किंवा कोणत्याही प्रार्थना अथवा ब्राह्मसमाजाच्या कमिटीनें केवळ आपल्या अनुयायांची संख्या वाढविण्याच्या हेतूनें ही मिशनसोसायटी आपल्या हस्तगत करून घेतलेली नाहीं. यद्यपि ह्या मिशनची प्रेरणा वरील समाजाच्या उदार तत्त्वामुळें झाली आहे इतकेंच नव्हे तर मिशनच्या कार्यांतही समाजाच्या सभासदांचाच पुढाकार आहे, तथापि हें मिशन आपल्या हस्तगत करून घेऊन आपली संख्या वाढविण्याचा स्वार्थ—मग तो कितीही उदात्त असो—या सभासदांच्या मनांत वागत नाहीं. समाजाच्या बाहेरील मंडळीकडून मात्र वेळोवेळीं अनेक प्रकारच्या सूचना येतात. मिशनच्या कार्यांतून धर्मतत्त्वांला अजिबात फाटा द्यावा किंवा त्यांस एकदेशीयत्वाचें वळण द्यावें असा या सूचनांचा भिन्नभिन्न दिशांनीं रोंख असतो. व दोन्हीही या परस्पर भिन्न सूचनांचा शांतपणें विचार करून मिशनच्या चालकांवर सर्वदेशीय सनातन धर्मतत्त्वाची स्वतःस झालेली प्रेरणा संभाळून आपलें तारूं सुरक्षितपणें हाकारावयाची जबाबदारी आहे आणि ती त्यांनीं आजपर्यंत राखिली आहे.

याप्रमाणें डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी या नांवाचा अर्थ आहे. त्याची सिद्धि होण्यासाठीं त्याला चिकटून रहाणें आवश्यक आहे. प्रत्यक्ष सेवा करणारी मिशनरी मंडळी आणि त्यांचा योगक्षेम चालविणारे सोसायटीचे सभासद यांनीं या नांवाचा खरा अर्थ आपल्या डोळ्यांपुढें ठेवून परस्परांतील संबंध शुद्ध आणि प्रेमाचा राखून नंतर आपल्यापुढें असलेल्या असंख्य निराश्रित वर्गांना ' घ्यारे भाई घ्यारे भाई ' अशी हाक मारावयास पाहिजे. हाकेचा स्वीकार होण्यापूर्वी तिला जोम येण्यास मिशनरींचें स्वतःचें धर्मसाधन आणि सभासदांचें परस्परांतील आणि सर्वांचें इतर देशबंधूशीं जें वर्तन व्हावयास पाहिजे त्यावर अवलंबून आहे. ईश्वरापासून प्रथम अभयदान मिळवून त्याच्या जोरावरच ही हाक मारावयाची आहे. ज्या मानानें तो जोर कमी होईल त्या मानानें ऐहिक अडचणींचा जोर वाढणार आहे. म्हणून सेवकांनीं आपलें ईश्वराशीं अनुसंधान कायम राखलें पाहिजे; आणि मग आपल्या निराश्रित बंधूंस " भरणी आली मुक्त पेठा। करा लाठा व्यापार ॥ उधार घ्यारे उधार घ्यारे। अवघे थोर जातीचे ॥ येथें पंक्तिभेद नाहीं। मोठें मोठें कांहीं लहान ॥ तुका म्हणे लाभ घ्यावा। मुद्दल भावा जतन ॥ " असें सांगितल्यास त्यांस त्याचा अर्थ आणि जोर कळून ईश्वरी नांवाचा जयजयकार होईल.

---

## कर्मयोग.

(ता० ८–११–१९०३ रोजीं मुंबई येथें झालेल्या उपदेशाचा सारांश.)

**यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।**
**कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥**

भग. गीता अ. ३ श्लोक ७.

**प्रेमसूत्र दोरी। नतो तिकडे जातो हरी ॥**

तुकाराम.

कर्माचें साम्राज्य सर्वत्र आहे, जेथें जेथें म्हणून जीवन आहे तेथें तेथें कर्म आढळतेंच. सर्व जीवनमात्राचें तें लक्षण आहे; इतकेंच नव्हे तर त्यावांचून जीवनाची कल्पनाही होऊं शकत नाहीं. फार काय तर जड पदार्थांत दृढता, स्थिरता इ. जे गुण दिसतात आणि बाहेरच्या शक्तीशीं त्या पदार्थांकडून जो विरोध घडतो त्यांवरून निर्जीव वस्तूंतही उघड नसलें तरी, अंतस्थ कर्म चाललेलेंच दिसेल. पण, इतक्या खोल न जातां आपण जर नुसतें सजीव सृष्टीपासून पुढें निरख

लागलों, तर सर्वत्र कर्माचा अबाधित विस्तार दिसतो.

वनस्पतिसृष्टींत अगदीं प्राथमिक कोटीच्या ळव्हाळ्यापासून, तों सुंदर विस्तारलेल्या मोठ्या वटवृक्षापर्यंत ज्या असंख्य घटना आहेत, त्या सर्वांचा आपल्या अल्पजीवन कालांत आत्मभरणाचा व्यापार सतत चालू असतो. तसेंच केवळ सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानेंच दिसणाऱ्या जीवाणूपासून तों वनांत उद्दामपणें हिंडणाऱ्या पशुपतिसिंहापर्यंत प्राणिगणांचाही तोच उद्योग अहर्निश चालू असतो. स्वतःचा घट कायम राखणें, तो वाढविणें आणि पुढें पुढें त्याचा वंशविस्तार करणें हा निसर्गदत्त व्यवहार सर्वांत बहुतेक सारखाच. तहानभुकेच्या रूपानें प्रकृतीचा बडगा पाठीवर बसला कीं पुढें हालावें, नाहीं तर तेथेंच स्वस्थ असावें, एवढाच त्यांचा अधिकार. माणसांपैकींही पुष्कळांची ह्यावर मजल गेलेली नाहीं. हें कर्म प्राकृत अथवा तामसिक समजावें. कारण, ज्यांच्याकडून तें होत असतें तें त्यांच्या इच्छेवर थोडेंच अवलंबून असतें. प्रकृतिच आपला कडक अंमल चालविण्यासाठीं आपल्या योजनेस त्या बिचाऱ्यांच्या इच्छेचें स्वरूप देऊन तितकें कर्म बिन–तक्रार करून घेत असते.

असें हें गाडें चाललें असतां उत्क्रांतीची दुसरी मजल येते. प्रकृतीनें आजवर अत्यंत कष्टानें घडवून ठेविलेल्या कांहीं उत्कृष्ट घटांत ( आतांपर्यंत गूढ असलेल्या ) आत्मतत्त्वास यानंतर जागृति येते. पण जरी ही जागृति आली, तरी प्राकृत कर्मास कांहीं विराम पडत नाहीं. अनादि कालापासून घटाला जें कर्माचें चळण लागलें असतें त्यांतच आत्माही भ्रमण पावूं लागतो. कुंभारानें आपल्या अठीनें कांहीं वेळ चाक फिरवून काठी काढून घेतल्यावरही तें चाक जसें पुष्कळ वेळ फिरून कुंभाराचें इष्ट कार्य करितें, किंवा एखाद्या गिरणींतल्या एंजिनाची शक्ति, जवळच्या जड फ्लाय व्हीलमध्यें जाऊन एंजिनच्या शक्तीस जशी फ्लाय व्हीलच्या गतीची भर पडते, त्याप्रमाणेंच हा नुकाच जागा झालेला आत्मा प्राकृत कर्मांतच आपल्या भ्रांतकर्मांची भर टाकीत असतो, ह्यामुळें 'मीं हें आज मिळविलें, हेंही पुढें मिळवीन-हें तर माझें आहेच, उद्यां तेंही दुसरें धन माझेंच होईल, हा पहा वैरी मीं मारिला, इतरांनाही चित् करीन, मी राजा आहें, मी भोगी, मी सिद्ध, बलवान्, सुखी, मी मोठा कुलीन, कोण मजसारखा आहे,– मी स्वतः भोगतों, दुसऱ्यालाही पण देतों,–ह्या प्रकारचा गीतेंत ( अ० १६ श्लोक. १३–१५ ) सांगितलेला ' अज्ञानविमोहित प्रकार होतो. फ्लाय व्हीलनें गिरणींत जसें अधिक कार्य होतें तसें भ्रांत आत्म्याच्या कर्मानें प्रकृतींतही अधिकच घडामोड होते. हें राजसी कर्म होय. आत्म्याच्या विकासांत ह्याची जरूरीच आहे. म्हणून शहाण्यांनीं ह्याची विनाकारण अवहेलना करूं नये. सात्त्विक कर्माकडची वाट आत्म्याला ह्यांतूनच आहे. ' कर्मांचा आरंभ केल्याविना नैष्कर्म्य प्राप्त होणें नाहीं ' ( गीता अ. ३ श्लोक ४ ) म्हणन ह्यांत गुंतलेला ' पुरुष ' आपल्या इष्ट वाटेवरच आहे असें समजावें.

पण, ह्या राजसी कर्माचें सर्व चळण प्रकृतीकडून मिळालें असल्यामुळें ह्याचें पर्यवसान दोन रीतींनें होण्याचा संभव आहे. स्वतःची शक्ति नसल्यामुळें कुंभाराचें चाक जसें कांहीं वेळानें बंद पडतें तसेंच राजसी पुरुषाला प्रकृतीकडन जें चळण मिळालें असतें तें बंद पडतें आणि वृद्धावस्थेंत त्याला शीण व औदासिन्य हीं शिल्लक उरतात. आणि त्याच्या शरीराचें अवसान होण्यापूर्वी त्यास शोचनीय नैष्कर्म्य प्राप्त होतें. हा एक प्रकार. दुसरा प्रकार असा कीं, राजसी मनुष्यांस कांहीं अंशीं स्वप्रयत्नानें व कांहींअंशीं ईशप्रसादानें वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान झालें म्हणजे, आपण करितों तीं सर्व कृत्यें किती बालिश आहेत व आपल्या प्रवृत्ती वस्तुतः किती व्यर्थ आणि विवश आहेत, ह्याची खात्री होऊन तो तटस्थ आणि निष्कर्म होतो. गीतेंतील दुसऱ्या अध्यायांतला ईश्वरी उपदेश ऐकून अर्जुनाची हीच स्थिति झाली. किंवा आपल्या विवेकसामर्थ्यानें विश्वव्यापाराचें विज्ञान झाल्यावर वेदांत्यास अगर ब्रह्मज्ञान्यांस जी विरक्ति आणि निवृत्त दशा येते तीही ह्याच प्रकारची.

ही वर सांगितलेली दुसऱ्या प्रकारची निष्कर्म दशा प्राप्त झाली म्हणजे आपल्या वरचा प्रकृतीचा जुलूम अगदीं नाहींसा होतो. आत्मा पूर्ण जागृत व स्वतंत्र होतो. ह्या उज्ज्वल जागृतीस कोणी

आत्म्याचें पुनर्जन्म म्हणतात. म्हणून आम्हांस द्विज ही संज्ञा येते.

पण अशा रीतीनें आत्म्यास पूर्ण ज्ञान व स्वातंत्र्य प्राप्त झालें म्हणजे तो कृतकृत्य झाला असें नव्हे तर उलट आतांपासूनच त्याच्या कर्तव्यास आरंभ होतो. आतांपर्यंत जीं त्यानें कर्में केलीं तीं यंत्राप्रमाणें केलीं. ह्यावर त्याला एकाद्या हुशार आणि विश्वासु नोकराप्रमाणें कामगिरी बजावयाची असते. पण तो पूर्ण स्वतंत्र असल्यामुळें ही नोकरी पत्करणें न पत्करणें त्याच्या इच्छेवर अवलंबून असतें. वेदांती असतो तो अवश्य तितकीं प्राकृत कर्में केवळ निरुपायानें व उदासीनपणें करितो. पण जो भक्त असतो तो—

मनें सहित वाचा काया।
अवघीं दिलीं देवराया॥

हा तुकारामाचा मार्ग पत्करितो; केवळ ज्ञानपलीकडे वेदांत्यापासून इतरांस कांहींच फायदा होत नाहीं. पण भक्त आहे तो ईश्वरी नोकरी म्हणून परार्थास आपल्यास वाहून घेतो. ही नोकरी म्हणजे अगदीं खुशीचा सवदा आहे. येथें कसली जबरदस्ती नाहीं. वाटल्यास करावी; वाटेल तितकी करावी! पण ब्रह्मज्ञान्यांनींही हें लक्ष्यांत ठेवावें कीं स्वातंत्र्याचे जोरावर जरी त्यांनीं देवाची कामगिरी सोडली तरी प्रकृतीची गुलामगिरी त्यांस करावी लागणारच. एकपक्षीं खुशीची नोकरी, उलट घनघोर गुलामगिरी ह्यांत शहाण्यांनींच निवडावें. बरें, नोकरी जी आहे तीही नुसती खुशीची आहे इतकेंच नव्हे तर तिचें पर्यवसान अखेर मैत्रींत होणारें आहे. नोकर आणि प्रभु ह्यांमध्यें जें सूत्र आहे तें प्रेमसूत्र आहे. नोकरी करतां करतां आपल्यास इतकी बढती मिळणार आहे कीं आपण ईश्वराचे अगदीं सखे बनूं. ज्ञानयोग साधून संसारांतून उठावें आणि प्रकृतीचें दास्य करावें कीं कर्मयोग साधून ईश्वराचे मित्र होऊन पृथ्वीवर स्वर्ग आणावा ह्याचा निकाल स्वतंत्र माणसांनीं करावा.

हा कर्मयोग साधणें आमच्या समाजाचा धर्म आहे. संसारांत आनंदानें राहणें आणि तदंगभूत कौटुंबिक, सामाजिक, राजकीय इ. जीं अनेक कर्में असतील तीं केवळ जडहित साधण्याच्या हेतूनेंच नव्हे, तर ईश्वरीयोजना असें समजून त्याची सेवा जाणून बुजन करण्याचे हेतूनें करणें म्हणजे वरील कर्मयोग होय. विश्वांत ही जी अवाढव्य योजना आहे, ती आपल्या इच्छेवर अवलंबून नाहीं किंवा ती पार पाडण्याची आपल्यांत शक्ति नाहीं, तरी त्या योजनेस अंशत: साधनीभूत होणें किंवा तटस्थ राहणें हें आपल्या इच्छेवर आहे.

सत्कर्म कोणतें व दुष्कर्म कोणतें ह्या विषयींची प्रेरणा आणि तें करण्याची स्फूर्ति ह्या प्रत्येक मानवी अंतःकरणांत होण्यासारख्या आहेत व त्या तशा नित्य होतातहि. धर्माधिकारी व उपदेश ह्यांचें जर कांहीं काम असेल तर तें इतकेंच कीं मानवी अंतःकरण व ह्या प्रेरणांचा उगम जो ईश्वर ह्यांमध्यें ज्या कांहीं उपाधी असतील त्या दूर करून आत्म्याचा ईश्वराकडचा मार्ग सुगम व जवळचा करावा. ह्या उपाधींपैकीं स्वत: आपणच एक उपाधी होऊन राहूं नये.

ज्ञानाचें भक्तींत आणि भक्तीचें ह्या कर्मयोगांत नेहमीं पर्यवसान होत आलें आहे हें धर्मांच्या एकंदर इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें.

---

# संतांचा धर्म आणि राष्ट्राचा उत्कर्ष.

## संतांचा धर्म.*

ब्रह्म सर्वगत सदा सम। जेथें आन नाहीं विषम। तया जाणती ते अति दुर्गम। तयांची भेटी झालिया भाग्य परम॥ १॥ ऐसे ऐसियानें भेटती ते साधु। ज्यांच्या दर्शनें तुटे भवबंधु। जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदु। जे कां मोक्षसिद्धि तीर्थांबंधु॥ २॥ भाव सर्व कारण मूळबंदु। सदा समबुद्धि नास्तिक्य भेदु। भूत कृपा मोडी द्वेषकंदु। शत्रुमित्र पुत्र सम करी बंधु॥ ३॥ मन बुद्धि काया वाचा शुद्ध करी। रूप सर्वत्र देखोनि नमस्कारी। लघुत्व सर्वभावें अंगिकारी। सांडी मांडी मीं तूं पण ऐसी थोरी॥ ४॥ अर्थ काम चाड

*(ता० ९-८-१९०८ रोजीं झालेल्या उपदेशाचा सारांश. राष्ट्राचा उत्कर्ष हें व्याख्यान कोठें मिळत नाहीं.)

नाहीं चित्ता । मानामानहि मोहमाया मिथ्या । वर्ते समाधानीं जाणोनि नेणतां । साधु भेटी देती तया अवचिता ॥ ५ ॥ मनीं दृढ धरी विश्वास । न करी सांडी मांडीचा सायास । साधुदर्शन नित्यकाळ त्यास । तुका म्हणे जो विरला जाणिवेस ॥ ६ ॥

There is a certain composite photograph of universal saintliness, the same in all religions, of which the features can easily be traced.

1. A feeling of being in a wider life than that of this world's selfish little interests; and a conviction of the existence of an Ideal Power.

2. A sense of friendly continuity of the ideal power with our own life and a willing self-surrender to its control.

3. An immense elation and freedom as the outlines of the confining self-hood melt down.

4. A shifting of the emotional centre towards loving and harmonious affections, towards 'yes, yes' and away from 'no' where the claims of the non-ego are concerned.

These fundamental inner conditions have characteristic practical consequences as follows:—

(*a*) Asceticism—The self-surrender may become so passionate as to turn into self-immmolation. It may then so over-rule the ordinary inhibitions of the flesh that the saint finds positve pleasure in sacrifice and asceticism measuring and expressing as they do the degree of his loyalty to the higher power.

(*b*) Strength of Soul—The sense of enlargement of life may be so uplifting that personal motives and inhibitions commonly omnipotent, become too insignificant for notice, and new reaches of patience and fortitude open out. Fears and anxieties go, and blissful equanimity takes their place. Come heaven, come hell, it makes no difference now!

(*c*) Purity—The sensitiveness to spiritual discord is enhanced and the cleansing of existence from brutal and sensual elements becomes imparative. Occasions of contact with such elements are avoided the saintly life must deepen its spiritual consistency and keep unspotted from the world.

(*d*) Charity—The ordinary motives to antipathy which usually set such close bounds to tenderness among beings are inhibited, The saint loves his enemies and treats loathsome beggars as his brothers, (Varieties of Religious Experience, by Prof, W, James, pp, 271—4,)

वर जे दोन उतारे दिले आहेत, यांपैकीं पहिला आपल्या एका जुन्या संताचा आहे व दुसरा एका प्रमुख आधुनिक तत्त्ववेत्त्याचा आहे. देश, काळ आणि दृष्टि ह्या तीन्ही बाबतींत संत तुकाराम आणि पंडित जेम्स हे परस्परांहून अगदीं भिन्न आहेत, तरी पण संतपणाचीं लक्षणें काय आहेत, हें ठरविण्याचे कामीं दोघांचें कसें अपूर्व मतैक्य झालें आहे तें दाखविण्यासाठीं वरील लांब उतारे घेतले आहेत. आणि ह्यावरून दोघांमध्येंच एकमत आहे असें नव्हे, तर संत कशा प्रकारचीं माणसें असतात ह्याविषयीं सर्वदेशीं, सर्वकाळीं सर्व दर्जाच्या लोकांत बहुतकरून फारशी गैरमाहिती किंवा मतभेद नसतो हें उघड होतें. असें असून जर संतांसंबंधीं अपवाद ऐकूं आले किंवा त्यांचेवर आक्षेप घेण्यांत आले, तर ते सहज चुकून किंवा त्यांच्या विषयींच्या गैरमाहितीमुळें नव्हेत तर जाणूनबुजून घेतले असले पाहिजेत.

सुमारें दहा वर्षांपूर्वी 'संत आणि संताळयांचा धर्म' अशा मथळयाखालीं सुधारक पत्रांतून अपवादक लेख येत होते. शेवटीं 'तुकाराम श्रेष्ठ कीं वाग्भट श्रेष्ठ, ह्या प्रश्नाचा निकाल बिचाऱ्या संतांच्या बहुतेक उलटच झाला होता. त्यानंतर मधून मधून हा विषय चर्चेसाठीं पुढें येत आहे. आज पुनः त्याच 'तुकारामविरुद्ध वाग्भट' दाव्याची एका दृष्टीनें फेरतपासणी चालली आहे. परवां पुण्यास ग्रंथकारांचें संमेलन भरलें असतां एका निबंधकारांचा रोख असा होता कीं, फार तर रामदासाला तेवढें वगळकें असतां इतर कोणत्याही महाराष्ट्रीय संतांमध्यें राष्ट्रीयत्वाची जाणीव नव्हती आणि म्हणून अर्थातच त्यांच्या हातून राष्ट्राच्या उत्कर्षासाठीं कांहीं झालें नाहीं. ह्या आक्षेपानंतर तेथल्या

तेथेंच तुकारामाबद्दल थोडीशी तरफदारी करण्यांत आली होती; आणि मागाहून येथील एका दैनिक पत्रांत एक अनुकूळ लेख आला होता. पण एकंदरींत संतांविषयीं जें दुर्लक्ष अलीकडे वाढत्या प्रमाणांवर आहे, त्याचा ओघ कांहीं अद्यापि फिरला नाहीं. आणि ह्या धामधुमींत पुनः नवीन संतच उत्पन्न झाल्याशिवाय तो ओघ लवकर फिरण्याचीं चिन्हेंही दिसत नाहींत. तथापि दहा वर्षांपूर्वी हा प्रश्न प्रथम निघाला होता, तेव्हां ह्या पीठावरून ह्याचा विचार झाला होता, तसा आतांही धर्मदृष्टीनें विचार होणें जरूर आहे.

प्रथम आपण संतांवर कोणते कोणते आक्षेप घेण्यांत येतात ते पाहूं, पहिला आक्षेप हा येतो कीं संत हे नेहमीं ईश्वरद्रष्टे असतात, ज्या वास्तविक जगांत ते राहतात तेथील अपूर्णता आणि विषमता त्यांचे नजरेंत भरत नाहीं. त्यांचा सर्व काळ आदर्शमयपर्ण जगाकडेच लय लागला असल्यानें ह्या प्रासंगिक जगांतील निरनिराळ्या जबाबदाऱ्या सांभाळण्याची पात्रता त्यांचे अंगीं नसते. येथील कडीअडचणींत इतरांप्रमाणें त्यांचेही पाय अडखळत असतां पारलौकिक सुखांतच ते निमग्न असतात. त्यामुळें त्यांचे वृत्तींत वाजवीपेक्षां जास्त तृप्तता येऊन त्यांचें स्वतःचें आणि भोंवतालचें सामाजिक जीवन हळूहळू शिथिल होऊं लागतें. येथील वेळोवेळीं बदलणारी स्थिति व त्यांतून सतत चालू असलेला विकास वगैरे इहलोकचा सोहळा, त्यांना न कळल्यामुळें त्यांची स्वतःची वाढ खुंटलेली असते. एकंदरींत एकदेशीयता, अरसिकता व म्हणून अपूर्णता त्यांचे ठायीं असते.

दुसरा आक्षेप.—संतांचे मनांत नेहमीं पूर्ण जगाचेंच वारें खेळत असल्यामुळें ते केवळ निंदा–स्तुतीचाच नव्हे तर प्रत्यक्ष सुख–दुःखाचा आनंद, उद्वेगाचा किंबहुना बऱ्यावाईटाचाही सबगोलंकार करून सोडतात. इकडे व्यवहारांत सुधारक जातिभेद मोडण्याचा नुसता प्रयत्नच करीत आहेत, तर इकडे हे संत सुधारकांनीं विचारसृष्टींतील सर्वच द्वंद्वांचा फन्ना उडवून दिला आहे. न्याय, अन्याय, धन आणि ऋण हीं सारीं टका शेर मापानें मोजणें, पुत्र आणि शत्रु रंक आणि राव ह्यांवर प्रेमाचा सारखाच पाऊस पाडणें हा शुद्ध अविवेक नव्हे, तर काय ?

आक्षेप तिसरा.—बऱ्यावाईटाला सारखेंच आलिंगन दिल्यानें बऱ्याची वाढ आणि वाईटाचा प्रतिकार करण्याची बुद्धि नाहींशी होऊन संत स्वतः दुबळे होतात व दुसऱ्याला दुबळेपणाचा कित्ता घालून देतात. अशक्तांना आपला कमकुवतपणा एक गुणच वाटतो; सशक्तांच्या शक्तीचा उपयोग न झाल्यामुळें ती जागच्या जागींच लयाला जाते. कोणी एका गालावर मारील तर त्याच्या दोन्ही गालावर रोकडा न्याय ठेवून दिला तरच आततायीपणावर नीट वचक बसेल. नाहीं तर एका संतामागें दहा गुंड आणि शंभर दुबळे जन्मास येणार आणि आपली आज्ञा मोडल्याबद्दल सृष्टिदेवीही, संत असंत कांहींच न पाहतां सरसकट आपला सूड उगविणार खास !

येणेंप्रमाणें एकदेशीयता, अविवेक आणि दुर्बलता ह्यांची वाढ केल्याचे तीन आरोप संतमंडळीवर ठेवण्यांत आले आहेत. फिर्यादीतर्फे बळकट पुरावा सादर करण्यांत आला आहे. आणि इकडे आरोपींना तर आपली नुसती तरफदारी देखील करण्याची इच्छा नाहीं. शिवाय ह्या खटल्याचा फैसला करण्याकरितां तुम्हां आम्हां जनसमूहाची जी प्रचंड ज्युरी बसली आहे, तिच्यांत आरोपीच्या जातीचे कोणी दिसत नाहीं; तो प्रकार असाः—

माणूसपणाचे दोन प्रकार आहेत. एक संतांचा आणि दुसरा वीरांचा; मग तें वीर्य लेखणीचें असो किंवा तलवारीचें असो किंवा तराजूचें असो; वीर्य तें एकच. जे स्वतः संतही नाहींत आणि वीरही नाहींत अशा नामधारी माणसांचाच भरणा, पुष्कळ आणि ही खोगीरभरतीच प्रस्तुत खटल्यांत ज्यूरीच्या उच्च पदावर विराजमान झाली आहे; ह्या भरण्यांतलीं तुम्ही आम्ही साधीं माणसें बहुतकरून वीरपक्षाचीं म्हणजे वीरांचेच चाहाते आणि अनुयायी असतों. कारण संताचे चाहते होण्याला अंगीं तेवढ्यापुरता तरी संतपणाच यावा लागतो; आणि तो आला कीं आमची गणना ज्यूरींतून आरोपींत होऊं लागते. पण उलटपक्षीं वीरांचे चाहाते होण्याला अंगीं वीर्य पाहिजे असें नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्या प्रमाणानें अंगीं वीर्याचा अभाव जास्त, त्या प्रमाणानें वीरांची चहाडी

जास्त असण्याचा संभव आहे. एक वीर दुसऱ्याशीं फटकून असतो. पण संत संताला भेटला, तर परस्पर लोटांगणच व्हावयाचें. पंढरपुरासारख्या ठिकाणीं ह्या गोष्टीचा निदान प्रभात तरी पहाण्यांत येतो. एकंदरींत तुम्ही आम्ही वीरपंथी माणसें. ह्या संतांच्या अपूर्व खटल्याची चवकशी करण्यास्तव ज्यूरीच्या ठिकाणीं बसलों आहों !

संतांच्यासंबंधानें वर जे मुख्य तीन आक्षेप घेण्यांत आले आहेत, त्यांचा थोडा विचार केला असतां कळून येईल कीं ते सर्व आक्षेप वीरांच्या दृष्टीनें वीरपंथीयांनीं घेतले आहेत. संतांना आणि वीरांना समोरासमोर उभें केलें तरी जे आक्षेप वीर-दृष्टया संतांवर लागू झाले आहेत, त्यांचीच दुसरी बाजू बरोबर वीरांना लागू होते आणि ह्याच तुलनेचा विचार करितां करितां शेवटीं श्रेष्ठ कोण ह्या संबंधाचा अगदीं निर्णय जरी झाला नाहीं तरी बरीच सूचना तरी मिळते. पहिला आक्षेप एकदेशीयत्वाचा, संतांप्रमाणेंच वीरांनाही लागू आहे. संत जर केवळ ईश्वरद्रष्टे किंवा आदर्शाकडेच पहाणारे असले, तर वीरही नुसते जगद्रष्टे अथवा वस्तुस्थितीकडेच पहाणारे आहेत. इहलोकींच्या व्यवहारधुरानें वीरांचे डोळे नेहमीं इतके भरलेले असतात कीं त्यांना संतांच्या अंतरींच्या दृढ शांतीची ओळख देखील नसते. तसेंच इहलोकांतील व्यवहारसुख संतांना समजत नाहीं म्हणून त्यांना अरसिक असें म्हणतां येत नाहीं. आपलीं नातवंडें काठीचा घोडा आणि मेणाची बाहुली घेऊन खेळतांना आजोबांना जसें कौतुक वाटतें तसेंच संतांनाही वीरांचें शौर्य-धैर्य-चातुर्याचे व्यवहार पाहून कौतुकच वाटत असतें; पण विशेष थोरवी वाटणार नाहीं. ज्या डोळ्यांनीं ईश्वरी लीला पाहिली त्यांना मानवी कृत्यांची थोरवी वाटणें म्हणजे घोडेस्वाराला चिरगुटाच्या घोड्याबद्दल अभिमान वाटण्याइतकेंच संभवनीय आहे. ह्या वरून ह्या बाबतींत संतांवर अरसिकपणाचा आक्षेप येत नाहीं. तर उलट वीरांवरच अप्रबुद्धपणाचा आक्षेप येऊं पहातो. तसेंच संतांमध्यें फाजील समाधान अस त्यामुळें जीवनकलहाला आवश्यक असा त्यांच्या मध्यें मनगटाचा जोर ( Strenuous life ) नसतो, हाही आक्षेप बरोबर नाहीं. सर्वव्यापी ईश्वराची पूर्णता ज्यानीं केवळ विचारानेंच नव्हे तर स्वानुभवानें निरखली त्यांचा जीवनकलहच बंद होतो आणि जीवनानंदाचा शाश्वत झरा वाहूं लागतो तेथें मनगटाच्या जोराची भान कोणाला राहणार आहे ! अशावेळीं त्याची आठवण देखील ठेवणें म्हणजे पालखींत बसूनही कुबड्यांसाठीं हळहळण्याप्रमाणें ग्राम्यपणाचें होणार आहे. ह्याच प्रमाणें संतांवर अविवेकाचा जो आरोप आला आहे त्याची दुसरी बाजू म्हणजे अविश्वासाचा आरोप बरोबर वीरांच्या माथीं येत आहे. आम्ही जर एकाद्या आप्त पुरुषाच्या घरीं गेलों तर त्या आप्तावर आमचा जो अभेद विश्वास असतो त्यामुळें त्याच्या घरची गोष्ट अमुक आपल्याला हितकर असेल तमुक हितकर असेल अशी वेडगळ शंका घेणें मुळींच संभवत नाहीं. आप्ताचे घरीं शिरल्याबरोबर जाणीव आणि संकोच सर्व सहजच गुंडाळून ठेवली जाते. ईश्वर आप्त झाल्यानें संतांना सर्व विश्व आपलें घर वाटतें. विश्वास आणि विश्रम ही मनाची स्वाभाविक स्थिति होते. विवेकाला अवकाशच उरत नाहीं. हें शब्दानीं सांगून कोठवर भागेल ! हा प्रत्यक्ष प्रमाणांचाच विषय होय. तिसरा आक्षेप दुबळेपणाचा तर सर्वांत अज्ञान मूलक आहे. संत वाईटाचा प्रतिकार करीत नाहींत ह्याचें कारण त्यांचा दुबळेपणा नव्हे तर विश्वामध्यें जें सर्वगामी सामर्थ्य नांदत आहे त्याचें त्यांना जें प्रत्यक्ष दर्शन होत असतें तें होय. ज्यांला साम्राज्य दिसत नाहीं तोच मनुष्य आपल्या संरक्षणाची तयारी करील. ऐहिक साम्राज्यापेक्षां ईश्वरी साम्राज्य कमी दर्जाचें असेल काय ? ऐहिक राजनिष्ठेपेक्षां ईश्वरासंबंधी राजनिष्ठेची किंमत कमी ठरेल काय ? तर मग ऐहिक राज्यामध्यें आम्ही जर पदोपदीं शस्त्रधारण करून वर्दळीला येत नाहीं तर ईश्वरी साम्राज्यांत शस्त्रांचा म्हणजे प्रतिकाराचा प्रयोग ह्याहूनही कमी व्हावयाला नको काय ? आणि ईश्वरीसाम्राज्य जर पूर्ण प्रकारचें आहे तर प्रतिकाराचा तेथें अत्यंताभावच राखला पाहिजे ! नको काय ? ह्या दृष्टीनें पहातां वीरांचीं कृत्यें म्हणजे एक तर त्यांच्या आंधळेपणामुळें घडत असावीं, नाहीं तर त्यांच्या आततायीपणामुळेंच घडत असतात असें दिसतें.

असो. संतांच्या दृष्टीनें वीरांना दोषी ठरवावें का वीरांच्या दृष्टीनें संतांना दोषी ठरवावें हें ठरविण्याचें काम माझें नाहीं, फक्त वर सांगितलेला दृष्टिभेद किती महत्त्वाचा आहे हें दाखविण्याचा माझा उद्देश होता. संतमंडळीवर एकदांच निवाडा करण्यासाठीं तीन आरोप ठेवण्यांत आले. बळकट पुरावा मांडण्यांत आला, संत स्वत: तर स्तब्धच बसले आणि निकाल देणारी ज्यूरी पहावी तर अन्यजातीय. हा सर्व करुणास्पद प्रकार पाहून वरील दृष्टिभेद स्पष्ट दाखविला नाहीं तर एकतर्फी निकाल होऊन घोर अन्याय होणार अशी भीति पडली! म्हणून वरील भेद दाखविला तो पाहून काय ठरवावयाचें तें ज्यानें त्यानें ठरवावें.

जगामध्यें संत आणि वीर अशीं दोन प्रकारचीं माणसें असतात असें वर सांगितलें. पण जे संत असतात त्यांमध्यें वीर्य मुळींच नसतें किंवा जे वीर असतात त्यांमध्यें संतपणाचा अत्यंताभाव असतो असेंही नाहीं. तथापि दोघांचे विशेष गुण भिन्न असतात. वर जी दोघांची तुलना केली तिज वरून एक गोष्ट दिसते ती ही कीं वीरामध्यें नाहीं असा संतामध्यें एक विशेष गुण आहे. आदर्शमय अथवा आगामि जगाचा प्रकाश संतांना जसा व जितका मिळालेला असतो तितका व तसा वीरांना मिळाला नसतो. अर्थात् वीरांना हा वरील प्रकाश थोड्या अंशानें कां होईना, मिळाल्याशिवाय त्याला वीर्याची स्फूर्तिच येणार नाहीं. पण ज्या प्रकाशाचे थोडेच किरण वीराच्या स्फूर्तीला कारण होतात त्या प्रकाशाचा सतत वाहणारा स्रोत संतावर पडत राहिल्यामुळें त्याची सारी वृत्ति बदलून जाते. त्यांचे इहलोकींचे व्यवहार लटपटतात. पण वीरांची अशी विव्हल दशा झाली नसल्यामुळें व स्फूर्तीपुरताच किरणांचा लाभ झाल्यामुळें ते आपल्या अंगच्या शक्तीचा संचय करूं शकतात, व्यय करूं शकतात आणि विकासही करूं शकतात, प्रस्तुत जग त्यांच्या कर्तृत्वाला योग्य क्षेत्र होतें. आणि त्यांच्या चरित्राचा परिणाम राष्ट्राच्या उत्कर्षांत झालेला उघड उघड दिसतो. पण संतांचा असा उघड प्रकार होत नाहीं. म्हणून तेवढ्यावरून संतकोटी वीरकोटीहून कनिष्ठ दर्जाची म्हणतां येत नाहीं; इतकेंच नव्हे तर प्रकाशाचा वांटा त्यांना अधिक मिळाल्यामुळें अंतरींचें सुख आणि शांति, समाधान आणि शक्ति इ. गुण वीरापेक्षांही त्यांच्यांत फार उच्च-दर्जाचे आणि बळकट जोमाचे असतात म्हणून राष्ट्रांच्या इतिहासांत नाहीं तरी मनुष्यजातीच्या इतिहासांत त्यांचें तेज अधिक फांकतें. असो.

संताची ही थोरवी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें राष्ट्राच्या उत्कर्षाला कशी कारणीभूत होते हें पुढें केव्हां तरी ईशकृपेनें पाहूं.

---

## *धर्म, समाज आणि परिषद्.

कांहीं काळापूर्वीं धर्म आणि शास्त्र ह्यांमध्यें लढा पडला होता व आतां ह्या दोहोंमध्यें समेट झाला आहे असें हल्लीं मानण्यांत येत आहे. पण ह्या समजुतींत एक प्रकारचा धोका आहे. कारण एक तर हा वरील लढा पडण्याचे पूर्वीं धर्माचेंच एकछत्री राज्य होतें, त्याला आतां शास्त्ररूपी जबरदस्त प्रतिस्पर्धी भेटल्यामुळें त्याच्याशीं तडजोड करावी लागली आहे, ह्यामुळें धर्माचा एक प्रकारचा पराजयच झाल्याचा भास होत आहे. शिवाय शास्त्र अद्यापि होतकरू आहे व धर्माचे तर दिवस होऊन चुकले आहेत म्हणून पूर्वींचें पारडें अगदीं बदलून पुढें शास्त्राचेंच एकछत्री राज्य होईल असा ध्वनि ह्या तडजोडीच्या वादांतून निघत आहे. म्हणून समेटाच्या ह्या वरच्यावर गोष्टी सोडून देऊन आपल्याला धर्म आणि शास्त्र ह्यांचे प्रांत कसे भिन्न आहेत तें पाहिलें पाहिजे. शास्त्राचा कोणताही प्रांत घ्या तो देश काळाच्या मर्यादांनीं आखून टाकिला आहे. प्रकाश घ्या, त्याच्या भोंवतीं अनंत अंधःकाराचें अवगुंठन आहे. प्राण घ्या, तो अनंत मृत्यूच्या कोंदण्यांत बसविलेला आहे. यावद्भवमात्र अनंत अभावानें व्याप्त दिसत. आहेत. अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ह्या पदांत वर्णिलेलें आकुंचित ज्ञानच शास्त्राचें

---

* लाहोर येथील ब्राह्मपरिषदेंतील मुख्य उपासना ता. २६ डिसेंबर १९०९ रविवारीं सायंकाळीं ब्राह्म मंदिरांत झाली ती कलकत्त्याचे भाई व्रजगोपाळ नियोगी ह्यांनीं हिंदींत चालविली व त्यानंतर रा. वि. रा. शिंदे ह्यांनीं इंग्रजींत उपदेश केला त्याचा सारांश.

साधन जी बुद्धि तिचा विषय आहे. तिची शक्ति कितीही ताणली तरी अनंत अमर्याद वस्तूपर्यंत तिची मजल कदापि पोहोंचणें शक्य नाहीं; तेथून तिला अप्राप्य मनसासह परत यावें लागणार. पण मनाची दुसरी जी अपूर्व शक्ति श्रद्धा तिचा मात्र ही अनंत अमर्याद वस्तु होऊं शकते. ह्या दृष्टीनें पाहतां धर्माचा प्रांत शास्त्राच्या हल्ल्यापासून त्रिकाळ सुरक्षित आहे हें कळून येईल. धर्माचा हेतु आणि कामगिरी म्हणजे ह्या श्रद्धाशक्तीची नेहमीं जोपासना करून तिचा उत्तरोत्तर शुद्ध विकास करणें हा होय. अर्थात् ब्राह्मधर्माची तर ह्याहून दुसरी कांहीं कामगिरी नाहीं.

आतां धर्मसंघाची अथवा समाजाची कामगिरी काय ती पाहूं. श्रद्धेचा विकास करणें हा जो धर्म ह्या पुरुषार्थाचा हेतु त्याला अनुसरून आजपर्यंत होऊन गेलेल्या किती धर्मसंघांनीं किंवा समाजांनीं आपली कामगिरी बजाविली आहे बरें ? शिंप्याच्या दुकानांत ज्याप्रमाणें आयते तयार केलेले कपडे विक्रीला ठेवतात त्याप्रमाणें ह्या समाजांत आयतीं मतें व आयते आचार ह्यांचा माफक दरानें सारखा क्रयविक्रय चाललेला असतो ! ब्राह्मधर्माची ज्योत जागती ठेवावयाची असेल तर ब्राह्मसमाजाला हा नुसता दलालीचा धंदा करून चालावयाचें नाहीं. धर्मसमाजाचें काम आपल्या सभासदांपैकीं प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वतंत्र आणि स्वाधीन बनविणें हें आहे. त्याला कसल्याही धर्ममताखालीं चिरडून टाकणें किंवा कर्मांत कोंडून ठेवणें हें नव्हे. मतें आणि आचार हीं खऱ्या श्रद्धेला बहुधा मारक होतात, विरळाच प्रेरक होतात. ह्यावरून समाजानें व्यक्तीसाठीं कांहींच न करितां त्यांना नुसते वाऱ्यावर मोकळें सोडलें म्हणजे त्या स्वतंत्र व स्वाधीन होतात असा अर्थ नव्हे. उलट समाजाची सभासदासंबंधीं मोठी जबाबदारी आहे. सभासदाची समाजासंबंधीं जबाबदारी म्हणजे वर्गणी, आंगमेहनत आणि आगमन ह्यांत बहुतेक येते. पण समाजांत जो अधिकृतवर्ग असतो त्यानें सभासदापुढें नित्य निरनिराळीं मतें प्रतिपादलीं पाहिजेत, नवे नवे सिद्धान्त शोधले पाहिजेत, सुंदर विधि आणि संस्कारांची शोभा दाखविली पाहिजे. पण ह्यांतील एकाचाही तिळमात्र आग्रह न केला पाहिजे. ठराविक मतांचा आणि विधींचा एकच साचा—मग तीं कसलींही असोत, सभासदांच्या गळ्यांत अडकविल्यानें समाजाची इतिकर्तव्यता झाली असें निदान ब्राह्मसमाजानें तरी समजून चालावयाचें नाहीं. भिन्न भिन्न मतें आणि प्रचार सभासदांपुढें अशा कुशल रीतीनें ठेविले पाहिजेत कीं, त्यांची योग्य निवड करण्यास त्यांना मदत मिळेल. डा. किंग नांवाचे अमेरिकन उपदेशक हिंदुस्थानांत नुकतेच असें सांगून गेले कीं, मुलांना वर्तनाची योग्य निवड करतां येईल अशी पूर्ण मदत करणें एवढेंच काय तें पालकांचे कर्तव्य होय. इतर व्यवहारांत अज्ञान मुलांशीं पालकांचा जो संबंध आहे. तोच धर्मबाबतींत संघांचा साधारण सभासदांशीं आहे. ह्यावरून श्रद्धेचा विकास करणें हा धर्माचा उद्देश आहे व व्यक्तिस्वातंत्र्याची वाढ करणें हा धर्मसंघांचा उद्देश आहे असें समजावें. म्हणजे ब्राह्मसमाजाचें मुख्य लक्षण स्वातंत्र्य किंवा व्यक्तित्व हेंच होय; त्याशिवाय श्रद्धेची वाढ होत नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट लयच होतो असें इतिहास पुकारीत आहे.

आतां परिषदेची कामगिरी काय आहे ती पाहूं या. व्यक्तीला आपलें व्यक्तित्व राखितां येत नाहीं. तें वाढविण्याची तर गोष्ट राहो; यासाठीं संघाची जरूरी आहे, ही गोष्ट सकृद्दर्शनीं चमत्कारिक दिसते; पण खरा प्रकार असाच आहे. संघ जर आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावील तरच व्यक्तीचा विकास सुरळीतपणें होईल. पण जशी व्यक्तीला संघाची जरूरी तशीच संघाला परिषदेची आहे. एकाद्या ठिकाणचा समाज कितीही मोठा व चांगला असला तरी त्यालाही व्यक्तीप्रमाणें मर्यादा व उपाधी आहेतच व त्यामुळें त्याच्या कर्तव्यशक्तीला आळा पडतो व धर्माच्या अनंत उन्नतीला बाधा येते. म्हणून ठिकठिकाणचे समाज निदान आपल्या प्रतिनिधींच्या द्वारां नियमित काळीं एकत्र व्हावेत हें जरूर आहे व स्वाभाविकही आहे. म्हणूनच प्रत्येक धर्माच्या इतिहासांत वेळोवेळीं परिषदा भरल्या आहेत. पण आमच्या ठिक-

ठिकाणच्या ब्राह्म व प्रार्थनासमाजामध्यें ही भावना अद्यापि व्हावी तशी मुळींच रूढ झाली नाहीं.*

असो. धर्म, समाज आणि परिषद् ह्यांचे उद्देश अनुक्रमें श्रद्धा, स्वातंत्र्य आणि सहकार्य वाढविणें हे होत.

---

## धर्मसंघाची आवश्यकता.

( जून ता. २३ सन १९०७ रोजीं प्रार्थनामंदिरांत झालेला उपदेश.)

**एक एका सहाय करूं अवघे धरूं सुपंथ ।**
तुकाराम.

चालू सालीं आमच्या समाजांतून दोन मोहरे गेले. ते प. लो. वा. सदाशिवराव केळकर आणि नुकतेच गेलेले वासुदेवराव नवरंगे हे होत. सत्यवक्तेपणा, स्पष्टवक्तेपणा, स्वार्थत्याग, उद्योग, साधेपणा, धार्मिक वृत्ति इ. अनेक गुण ह्या दोघांच्याही अंगीं होते; पण ते त्यांचे विशेष गुण नव्हत. पासरीभर मतांची आणि प्रतिज्ञांची किंमत ज्या कृतीच्या एका तोळ्याइतकीही भरत नाहीं अशी भरीव कृति आमच्यापैकीं ज्या थोड्या पुरुषांनीं अगदीं मरेपर्यंत अनेक अडचणी आणि संकटें सोसून साधली आणि आपल्या करारीपणामुळें प्रार्थनासमाजाला हल्लींचें जें संघस्वरूप दिलें त्यांच्यापैकीं हे दोघे होते. तो कृतीचा करारीपणाच ह्यांचा विशेष गुण होय. म्हणून अशा प्रसंगीं

१ मनुष्य जातीचें जें विस्तृत जीवन आहे त्यांत अशा धर्मसंघाचें कोणतें महत्त्व व कशी आवश्यकता आहे ?

२ अशा संघाचा पाया कोणत्या तत्वांवर घालावा ?

३ त्या पायावर संघाची वरील उभारणी कशी करावी. ह्या तीन महत्त्वांच्या मुद्यांवर ह्या पवित्र पीठावरून निरनिराळ्या वेळीं सविस्तर प्रवचन व्हावयाला पाहिजे आहे. तें हल्लींच्या काळाला व प्रस्तुत देशस्थितीला अनुसरूनच असलें पाहिजे. केवळ तात्त्विकदृष्ट्या पाहतां सामान्यतः अशा संघाची आवश्यकता नाहीं. कारण पुरातन काळापासून निरनिराळ्या वेळीं सर्वत्र धर्मसंघ स्थापन होत आलेले आहेत व त्यांचे अवशेष अद्यापि मागें उरले आहेत.

तथापि हल्लीं आमच्या देशांत कसा विपरीत प्रकार चालला आहे पहा. चांगले शिकलेले, कांहीं पुढारी देखील खासगी संभाषणांत उघडपणें म्हणतात कीं हल्लीं चहूंकडे राष्ट्राराष्ट्रामध्यें किती झटापट चालली आहे; बलवान् दुर्बळींला कसा खालीं रगडीत आहे, अशावेळीं धर्मांच्या आणि सामान्य बंधुत्वाच्या गोष्टी सांगत बसणें योग्य नव्हे. निदान आमच्या सारख्या मागसलेल्या देशानें तरी केवळ सात्विकपणा स्वीकारणें शहाणपणाचें होणार नाहीं. आम्ही आधीं राजसी गुणच वाढवून इतरांची बरोबरी केली पाहिजे. म्हणजे नंतर समानतेच्या गोष्टी सांगितल्यास कांहीं तरी शोभेलच. असें प्रतिपादणारे धर्मांचा आणि सात्विकपणाचा कांहीं भलताच अर्थ समजत असतात. त्यांच्यामतें शौर्य, धैर्य वीर्य, इ. गुण म्हणजे जणूं सात्त्विक नव्हतच. सात्विकपणा म्हणजे नुसते नेहमीं सहन करून असणें असा केवळ निषेधार्थी अर्थ समजला जातो. पण वस्तुतः पाहतां सत्त्व म्हणजे तर शुद्ध शक्ति असा आहे. विशेषेंकरून वरील विचार करणारे जेव्हां जपानचें सुप्रसिद्ध व सर्वमान्य उदाहरण पुढें आणून आपलें राजसी मत जोरानें प्रतिपादतात तेव्हां तर धार्मिक प्रयत्न करणाऱ्याचें तोंड अगदीं बंदच होतें कीं काय अशी भीति पडते. जपानचे लोकांनीं जी ही अकल्पित सरशी केली त्याचे पूर्वी त्यानें कधीं व कोणता धर्मसंघ स्थापला होता ? उलट हिंदुस्थानानें आज गेलीं पाऊणशें वर्षें ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज इ० कित्येक संघ रचून काय दिवे लावले आहेत ? जपानच काय पण हल्लींचे बहुतेक सर्वच पुढें आलेले देश धर्मबाबतींत अगदीं उदासीन आणि जडवादी होत चालले नाहींत काय ? मग आम्हींच हा कोरडा काथ्याकूट कां करावा इ. अनेक आक्षेप वरील मंडळीचे निघतात. धर्मसंघ म्हणजे मतांची कोरडी काथ्याकूट करणारी मंडळीच एवढाच अर्थ असेल तर वरील युक्तिवादांशीं निदान ब्राह्म

---

* ह्या ठिकाणीं वक्त्यानें आपल्या निरनिराळ्या प्रांतांतील प्रवासाच्या अनुभवाला अनुलक्षून मोठे खेदजनक उद्गार काढले आणि त्याचा कांहीं उपयोग होण्याचा संभव नाहीं ह्या गोष्टीवरून देखील त्यांच्या उद्गाराची सत्यता दिसून येते.

आणि प्रार्थनासमाजिकांची बरीच सहानुभूति जमेल. पण संघाचा अर्थ अगदीं उलट आहे, म्हणून वरील प्रश्नास उत्तरादाखल उलट थोडक्यांत एवढाच प्रश्न केल्यास पुरे आहे. तो हा कीं, जपानांत आणि इतर पुढें सरसावलेल्या देशांत धर्मबाबतींत लोकांना जें झपाट्यानें स्वातंत्र्य मिळत चाललें आहे आणि त्यामुळें व्यक्तींचें व राष्ट्राचें शील वाढत चाललें आहे, त्याचें खरें कारण तेथील धर्मविषयक औदासिन्य कीं धर्मविषयक विचार, आणि उलटपक्षीं आमच्या देशांत धर्माच्या नांवाचें आचारविचारांचें जें पुरातन पारतंत्र्यसाम्राज्य चालू आहे आणि त्यामुळें शीलाची हानि होते तिचें खरें कारण आमची धर्मप्रवृत्ति कीं धर्मविषयक औदासिन्य बरें! ह्या दृष्टीनें पहातां, जपानांत जरी ब्राह्म प्रार्थनासमाजाप्रमाणें धर्मसंघ स्थापण्यांत आले नसतील तरी ब्राह्मप्रार्थनासमाजाचें कार्य जें उदार आत्मिक प्रवृत्तींचा देशांत प्रसार करण्याचें, तें जपानांत खास होत असलें पाहिजे. त्याशिवाय सर्व जगांत थक्क करून सोडणारें इतकें राष्ट्रीय तेज व नैतिक बळ एकाएकीं उत्पन्न होणें शक्य नाहीं, हें निःसंशय आहे. तसेंच पण हेंही निःसंशय आहे कीं हा जो जपानांतील आत्मिक व नैतिक बळाचा झरा आपल्या भोंवती सांचलेलें जड आच्छादन फोडून वर वर पाहणारास जणू अकस्मात् आणि यदृच्छेनेंच बाहेर आला आहे असें वाटतें त्या झऱ्यावर जर वेळींच चोहोंकडून योग्य बांध पडले नाहींत आणि त्याचे प्रगतीवर धर्मसंघ बनले नाहींत, तर हा वर आलेला पूर केव्हांच वसरून जाईल आणि पुनः जपान जें आज जगाच्या आनंदाला व आश्चर्याला पात्र झालें आहे तें पुढें अनुकंपेला पात्र होईल. इतकेंच नव्हे तर हल्लीं कित्येक खोल दृष्टीचे प्रवाशी जपानाच्या उथळपणाविषयीं प्रसंगवशात् इषारा देत आहेतच. एकंदरींत पुढारलेलें चिमुकलें जपान काय किंवा मागासलेलें अवाढव्य हिंदुस्थान काय दोहोंपक्षीं धर्मसंघाची सारखीच आवश्यकता आहे. अवर्षण पडलें असतां खोल विहिरी खणून पाणी काढणें किंवा अतिवृष्टीमुळें पूर आला असतां जागजागीं बांध घालून पाणी साठवणें ह्या दोन्ही गोष्टी जशा शहाण्या बागवानाच्या दृष्टीनें सारख्याच महत्त्वाच्या व जरूरीच्या आहेत तद्वत्च जपानांतल्यासारखा साहजिक उद्रेक झाला काय किंवा हिंदुस्थानांतल्या प्रमाणें कितीही खडक फोडला तरी ठणठणीतपणाचा देखावा दिसला काय, सूज्ञ, दूरदर्शी, व लोकहितकारी जे ऋषि आहेत त्यांना धर्मसंघाची आवश्यकता दोन्ही प्रसंगीं सारखीच भासेल. जगाच्या एका कोपऱ्यांत एकदा असा स्फोट झाला म्हणून सात्विक प्रयत्नाची कधींही व कोठेंही जरूरी नव्हती, किंवा निदान हल्लीं आमच्या देशांत तर हमरीतुमरी आणि मारामारीसंबंधीं नुसता बोलण्याचा सुकाळ केला कीं सर्व इतिकर्तव्यता झाली असें समजणें म्हणजे ह्या विपरीतपणाला सीमाच नाहीं म्हणावयाची.

ह्या जगांत मनुष्य मनुष्यावर आजपर्यंत अनेक कारणांवरून अथवा सबबीवरून जी सत्ता चालवीत आला आहे ती चार प्रकारची आहे. १ राजकीय २ धार्मिक ३ सामाजिक ४ औद्योगिक. ह्या चार सत्तांना अनुक्रमें १ सरकार २ संघ (अथवा अलीकडे समाज हें नांव अधिक प्रचारांत येऊं लागलें आहे) ३ रूढि आणि ४ पत किंवा व्यवहार अशीं नांवें आहेत. ह्या पैकीं पहिल्या दोन म्हणजे राजकीय आणि धार्मिक सत्तांची पुरातन काळापासून सर्व देशांत सुव्यवस्थित रीतीनें घटना होऊन चुकल्यामुळें ह्या दोन्हीं चांगल्या नांवारूपास आल्या आहेत. म्हणजे अधिकाराचें मूळ, अधिकारी पुरुष, अधिकारसंबंधीं नियम व त्याची अंमलबजावणी हीं सर्व ठरलेलीं आहेत. अधिकाराचीं स्थानें व पद्धति कदाचित् देशकालाच्या मानाप्रमाणें बदलली तरी सर्व अधिकार नष्ट होऊन अजिबात सत्ताच बंद पडली असें होणें शक्य नाहीं. शेवटच्या दोन सत्ता, रूढि आणि व्यवहार ह्यांचें मात्र कार्य वरील दोन सत्तांच्याप्रमाणें व्यवस्थेनें चालत नाहीं. कारण नियम, अधिकार आणि त्यांचीं स्थानें हीं ठरणें शक्य नसल्यामुळें ह्या दोन सत्तांचें असें दृश्यरूप दिसून येत नाहीं. तथापि त्या निराकारपणें अस्तित्वांत आहेतच.

वर सांगितल्याप्रमाणें मानवी समाजांत १ सरकार २ संघ ३ रूढि ४ पत अशा चार प्रकारच्या सत्ता चालू आहेत. ह्यांपैकीं पहिल्या दोन साकार रूपानें व दुसऱ्या दोन निराकार रूपानें चालू आहेत. म्हणून पहिल्या दोन्हींसंबंधीं ज्या जुन्या संस्था बनून चुकल्या आहेत त्यांच्यांत

कालमानाप्रमाणें दागदुजी किंवा तोडजोड करणें अथवा नवीन संस्थांची भर घालणें हें त्यांच्या चालकांना शक्य आहे. असें करणें त्या त्या नेमलेल्या अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे. आणि तें कर्तव्य त्यांनीं बजावलें नाहीं किंवा बजावण्यांत कसूर केली तर त्यांच्याकडून तें कर्तव्य करविण्याचा उपजत हक्क सर्व जनतेस आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, हल्लीं आमच्या देशांत जो तो राजकीय सत्तेसंबंधीं आपला हक्क शाबीत करीत सुटला आहे, पण धर्मसत्तेच्या बाबतींतही प्रत्येक व्यक्तीस तितकाच उपजत हक्क आहे आणि धर्माचे अधिकारीही कालमानाकडे दृष्टि देऊन आपली जबाबदारी पाळतात कीं नाहींत हें पाहण्याचें काम धर्मसंघाचा घटक या नात्यानें प्रत्येक व्यक्तीचें असून तिकडे कोणी ढुंकूनही पाहत नाहीं. मिळण्यासारखें असो किंवा नसो आम्ही राजकीय स्वराज्य मागूं लागलों आहों. पण धार्मिक स्वराज्य आमचें आम्हांला आहेच, तिकडे लक्ष देतो कोण? आमचे धर्मगुरु मोठ्या मोठ्या संस्थानांचे मालक बनून बसले आहेत. वर्षांत दोन चारदां हत्ती, घोडे, उंट इ. बड्या लव्याजमानिशीं ते भिक्षेला निघतात त्यावेळीं आम्ही त्यांजपाशीं स्वराज्य मागतों काय? मागें दिलेल्या कराचा हिशोब मागतों काय? सालोसाल राष्ट्रीय सभेमध्यें जशी आम्हांला पाहिजे त्या सुधारणांची एक यादी करून राजाकडे पाठवितों तशी धर्मबाबतींतही ठराव पास करून धर्मगुरूकडे पाठवितों काय? राजकीय बाबतींत अंतिम सत्ता लोकांची आहे, राजा केवळ त्यांनीं नेमलेला अधिकारी आहे हें तत्त्व आम्ही राजाला शिकवूं लागलों आहों तसें धर्मगुरूलाही तेंच तत्त्व लागूं करितों काय? आमच्या देशांत किती तरी देवळांना सोन्याचे दरवाजे व रुप्याचे खांब आहेत आणि मूर्तीवर किती जडजवाहीर आहे, किती मौल्यवान् देणग्या, व मातबर वतनें चालू आहेत आणि एकंदरींत धर्माच्या नांवानें किती अवाढव्य खर्च बेदाद चालला आहे, आमच्या तत्त्वज्ञानावर किती शतकांचा गंज चढलेला आहे, आमच्या धार्मिक वाङ्मयावर किती भलत्याच आगंतुक विचारांचीं कोळिष्टकें आणि जळमटें वाढलीं आहेत, धर्माच्या नांवानें शेवटीं मिरविणारे आम्ही सर्व जगाचे धर्मबाबतींत स्वतःस गुरु समजणारे स्वतः आमच्याच देशांत धर्मशिक्षण करणें अगदीं बंद पडत चाललें आहे, ह्या आणि अशा अनेक धर्मसंघाच्या बाबतींतील आमच्या हलगर्जीपणाकडे आमचें लक्ष जातें काय? पाश्चात्यांचे इतिहास व पाश्चात्यांच्या चळवळी पाहून राजकीय हक्क मागण्याचे कामीं मात्र आम्ही त्यांचें अनुकरण करितों; पण धर्मसंघाचे बाबतींत पाश्चात्यांनीं आपल्या देशांत व जगभर जे भगीरथ प्रयत्न चालविले आहेत त्यांचें अनुकरण तर राहोच, पण नुसतें अवलोकन तरी करितों काय? पाश्चात्य लोक राजकीय कर देतांना आपल्या राजाशीं प्रत्येक पेनीबद्दलही भांडण्यास मागें घेत नाहींत तेच आपल्या डोईजड धर्मगुरूंच्या जुलमी सत्तेस आळा घालून, आधुनिक समजुतीस शोभेल असे नवीन धर्मपंथ कसे काढीत आहेत व आपल्या ह्या नवीन धर्माचा, आपल्या जीवंत नीतीचा, आपल्या शीलाचा प्रसार आफ्रिका आणि आस्ट्रेलियासारख्या ओसाड आणि जंगली देशांतही करण्याकडे कसा लक्षावधि रुपयांचा दरसाल खर्च करीत आहेत; लहान मुलांकरितां आदित्यवारच्या धर्मशिक्षणाच्या शाळा, गरीब बायका आणि विधवांकरितां उपयुक्त घरगुती कला शिकविण्याच्या संस्था, काम न मिळाल्यामुळें लफंगे आणि बदमाश बनलेल्या तरुणांना ताळ्यावर आणण्याकरितां सायंकाळचीं क्रीडाभुवनें, अनाथ व उनाड मुलांना एकत्र करून त्यांना शेतकी, सुतारी व विणण्याचे वगैरे धंदे शिकवून व उत्तर अमेरिकेसारख्या देशांत पाठवून तेथें वसविलेल्या वसाहती, नवीन शिक्षणामुळें तरुणांनीं भकून जाऊं नये म्हणून अगदीं आधुनिक वाङ्मयांतूनच उदार आणि आध्यात्मिक विचार त्यांचे मनांत बिंबविण्याकरितां व्याख्यानमाला आणि सर्वसाधारण लोकांकरितां सर्व ललितकलांचा विकास ज्या ठिकाणीं पहावयास मिळेल अशीं भव्य व मोहक उपासनामंदिरें, अशा किती तरी गोष्टींत पाश्चात्य धर्मसंघांचें लक्ष गुतलेलें आहे, तें आमच्या तिकडे गेलेल्या प्रवाशाच्या नजरेंत भरतें तरी काय? हें होत नसून जर आम्ही नुसतें राजकीय स्वराज्यच मागत असलों तर मिळत नसलेल्या वस्तूबद्दल हट्ट व मिळालेल्या वस्तूबद्दल हेळसांड करणें हा केवळ

आम्ही पोरकटपणा करितों असें वाटून कोणीही आमच्या मागण्यांचा आदर करणार नाहीं.

आपल्यांतील कित्येक जुन्याचे अभिमानी विद्वान् आपल्यास नेहमीं असें भासवीत आहेत कीं, सुधारलेल्या देशांत ख्रिस्ती धर्माचीं मतें अगदीं ढासळत आहेत आणि तेणेंकरून तिकडील धर्मसंघाचें वजन बहुजनसमाजावरून पार उडत चाललें आहे. आधुनिक ज्ञानाचा प्रकाश चोहीकडे फैलावत असल्यामुळें ख्रिस्तीधर्माचीच काय पण जेथें जेथें हा प्रकाश पोंहोंचला आहे तेथील सर्वांचीं बनावट मतें आणि भाकडकथा लयास जाऊं लागल्या आहेत. पण पाश्चात्य देशांतील आणि त्यांतल्या त्यांत आंग्लो–सॅक्सन लोकांचा विशेष हा कीं, त्यांच्यामध्यें संघशक्ति, प्रसंगावधान, व्यवहारचातुर्य आणि संसाराविषयीं आदर इ० गुण उत्कृष्ट रीतीनें वसत असल्यामुळें, त्यांनीं सोंकावलेल्या धर्माधिकाऱ्यांचे उद्दाम चोंचले चालूं न देतां व ख्रिस्तानंतर ३–४ शतकांनीं बनविलेल्या ३९ मतांची पर्वा फारशी न बाळगतां, खुद्द ख्रिस्ताच्या सांगण्यांत जो कांहीं शाश्वत नीतीचा आणि आध्यात्मिक हिताचा मुख्य भाग होता, त्यावरच आपली सर्व मदार ठेवून आणि ख्रिस्तीधर्माचें मुख्य आणि विशेष असें जें तत्त्व स्वर्गीय राज्य पृथ्वीवर आणण्याचें तें बळकट ध्यानांत ठेवून सर्व देशोदेशीं, शहरोशहरीं, गल्लोगल्लींतून, स्वतंत्रपणें, धर्माधिकाऱ्यांच्या शिव्याशापांस न जुमानतां आणि प्रत्यक्ष राजाचाही प्राणांत छळ सोसून, नवीन नवीन धर्मसंघाची संस्थापना केली. आधीं रोमच्या शिरजोर मठाधिकाऱ्यांस रजा दिली. पुढें जेव्हां चर्च ऑफ इंग्लंड ह्मणजे इंग्रजांचा राष्ट्रीय अथवा सरकारी धर्मसंघ इंग्लंडच्या राजानें बळकावला व नुसत्या विधिसंस्काराचेंच अवडंबर माजून खऱ्या व स्वतंत्र धर्मसाधनांत व्यत्यय येऊं लागला, तेव्हां ह्या मजबूत हाडांच्या लोकांनीं आपल्या आवडत्या राष्ट्रीय संघालाही राम राम ठोकला आणि नॉनकनफॉर्मिस्ट ह्मणजे विभक्त समाज स्थापिले; तेथेंही जेव्हां प्रेसबिटर्स ह्मणजे अधिकाररूढ वडील माणसांनीं धुमाकूळ माजविला, तेव्हां ह्यांनीं कॉंग्रिगेशनेलिस्ट लोकसत्तात्मक समाज स्थापिले. त्यांतही मताचें पूर्ण स्वातंत्र्य मिळेना ह्मणून युनिटेरिअन अथवा एकेश्वरी समाज निघाला. त्यांतही जेव्हां मताविषयीं किंचित् दुराग्रह दिसतो तेव्हां प्रसिद्ध माहितीप्रमाणें फ्री ख्रिश्चन्स म्हणजे केवळ स्वतंत्र ख्रिस्तानुयायी म्हणविणारे निघतात आणि शेवटीं रेव्ह. चार्लस व्हायसे हे तर आपल्यास नुसते ईश्वराचा अनुयायी म्हणवून एक निराळा केवळ थिईस्टिक चर्च म्हणजे ब्राह्मसमाज चालवीत आहेत. असो. ह्याप्रमाणें कॅथोलिकपासून ब्राह्मसमाजापर्यंत परंपरा येऊन पोंहोंचली तरी नव्या जुन्या संघांतून जें कार्य होत आहे तें वर सांगितल्याप्रमाणें लोकशिक्षणाचें, लोकसंग्रहाचें, संसारिक फायद्याचें आणि तद्द्वारा आत्मिक संतोषाचेंच होत आहे. केवळ तर्कवितर्क, कर्मठपणा किंवा जातीजातींनीं परस्परांवर आपली श्रेष्ठता शाबीत करण्याचे ओंगळ प्रकार फार कमी होतात. प्रख्यात मुक्तिफौजेच्या संघाचीं नुसतीं मतें जर पाहूं गेलें तर तीं जुनी आणि टाकाऊ दिसतील. त्यांतील कांहीं भाविक सेवेकऱ्यांच्या विश्वासाची मजल केव्हां इतकी पोंहोंचते कीं उद्यां सकाळीं खात्रीनें योहानाच्या शुभवर्तमानांत सांगितल्याप्रमाणें येशू आपले स्वर्गीय राजदंड घेऊन खालीं उतरणार असें मानून बिचारीं झोंपी जातात. ह्या विश्वासाची किंमत कांहीं असो, मुक्तिफौजेचा संघ जें लोकसेवेचें कार्य दरोबस्त पृथ्वीवर रात्रंदिवस करीत आहे, त्याचा मासला आम्हाला तुकारामाच्या नुसत्या शब्दांत मात्र आढळतो.

> जे कां रंजले गांजले ॥
> त्यांसि म्हणे जो आपुले ॥
> ज्यांसि आपंगिता नाहीं ।
> त्यांसि धरी जो हृदयीं ॥

असो. ह्याप्रमाणें पाश्चात्य देशांतील जुने नवे धर्मसंघ कार्य करीत आहेत म्हणून त्यांचें लोकांवरचें वजन मुळींच कमी न होतां उलट वाढत आहे आणि ह्याचा पुरावा इतकाच बस्स आहे कीं ह्या संघांना लोकांकडून पैशाची व अंगमेहनतीची जितकी विपुल व जशी खुशीनें मदत मिळत आहे, तशी बोअर युद्धांत ब्रिटिश सरकारला पैसे देऊं करूनही मिळाली नाहीं ? तात्पर्य इतकेंच कीं, धर्मसंघच इतर सर्व संघांना पोसणारा आहे. राष्ट्राचे भावी मुत्सद्दी, भावी वीर, भावी कवी, आणि इतर महात्मे ह्यांच्या शीलांचा विकास बाळपणीं धर्मसंघांतच होतो. ज्या देशांत धर्मसंघ

मृतप्राय झालेले आहेत किंवा जे शिल्लक उरलेले आहेत, त्याची सर्व करामत भोळ्या भाबड्यांची माथा परोपरी जळवाप्रमाणें शोषून घेण्यांतच खर्चत आहे, त्या देशांत वीर पुरुष निर्माण होत नाहींत आणि झाले तरी राष्ट्रामध्यें मुळीं शीलाचीच वाण असल्यामुळें, त्यांना जोमाचा अनुयायीगण मिळत नाहीं. त्यांच्या ईर्षा आणि मनोरथ जागच्याजागीं निवतात व त्यांची वाढ खुंटते. शेवटीं ते उरीं फुटून अकालीं लय पावतात आणि त्यांच्या हातून जें मोडकेंतोडकें कार्य झालें असेल, त्याचें योग्य स्मारक करण्याचाही जोम पुढच्या पिढींत राहत नाहीं ! बंधूनो, ह्यासाठीं धर्मसंघाची अगदीं आवश्यकता आहे.

## विनययोग.

( रविवार ता. १९ व ता. २६ जून १९१० रोजीं मुंबईच्या प्रार्थनामंदिरांत केलेला उपदेश. )

अलीकडे नीति आणि धर्मशिक्षण यांची चोहों-कडे मोठी हूल उठली आहे. या महत्त्वाच्या विषयासंबंधीं आमच्या राष्ट्रामध्यें जागृति होत आहे, ही बरी गोष्ट आहे. पण अशा सनातन विषयाचा ऊहापोह केवळ प्रासंगिक कारणावरून आणि आनुषंगिक हेतूनें हल्लींच्याप्रमाणें होत आहे ही मात्र त्यांतल्या त्यांत गौण गोष्ट आहे. म्हणून आपण हें लक्षांत आणून आपल्या मनावर जे कांहीं प्रासंगिक आणि तात्पुरते संस्कार झाले असतील ते दूर सारून अगदीं निर्लेप अंतःकरणानें या विषयाकडे वळूं या.

मनुष्याचा स्वभाव आणि त्याचें शील ह्या दोन गोष्टी भिन्न आहेत. खाणींतून जसा दगड काढावा तसा हा मनुष्य या सृष्टींत निर्माण होत नाहीं. अनेक अज्ञात आनुवंशिक कारणांनीं मनुष्याच्या मनामध्यें संचिताचे ठसे जन्मतःच उमटलेले असतात. या ठशांमुळें मनुष्याचा व्यक्ति-स्वभाव बनलेला असतो. या स्वभावाचा विकास आणि रूपांतरें व्यक्तीला स्वप्रयत्नांनीं तिच्या भावी शीलामध्यें करावयाचीं असतात. यावरून स्वभाव हा ईश्वरदत्त वारसा आणि शील ही स्वकष्टार्जित मिळकत असें म्हणावयास हरकत नाहीं. कारा-गिरानें तयार केलेला विणा आणि गायनाच्या-पूर्वीं गवयानें लावलेला विणा यांमध्यें जो फरक आहे, तोच स्वभाव आणि शील यांमध्यें आहे. गायन व्हावयाचें असल्यास गवयास बराच वेळ आपल्या वाद्यांची जुळवाजुळव करावयाची असते. लाकडाचा गुण, भोंपळ्याचा गुण, तारांचा गुण इत्यादिकांची जोड कारागिरानें केलेली असते. ती त्या विण्याचा एक स्वभावच म्हणावयाचा; पण गवयाचें एवढ्यानें भागत नाहीं. त्याला प्रसंगानुसार व आपल्या आवाजाच्या आटोक्या-प्रमाणें तारा कमीअधिक खेंचाव्या लागतात. मृदंगाचे तंग ताणावे लागतात. यास त्या विण्याचें शील म्हणतां येईल. तद्वत्च व्यक्तीलाही आपल्या उपजत मानसिक गुणांची ओढाताण या जगिक व्यवहारांत करावी लागते. गवयाचाही गाण्यापेक्षां केव्हां केव्हां विणा लावण्यांतच जास्त वेळ जातो, तर संसारांतील साधकांस आपलें व्यवहारोपयोगी शील पूर्ण बनविण्यास पुष्कळ दिवस आणि पुष्कळ अनुभव सोसावे लागतात यांत नवल तें काय ? शिवाय, संसारांत व्यवहार करणें म्हणजे नुसतें वीणा लावून ठेवण्याप्रमाणें नाहीं, तर त्या विण्याच्या साहाय्यानें आपल्या स्वरांचे आलाप काढून गवई ज्याप्रमाणें श्रोत्यांच्या मनामध्यें निरनिराळे इष्ट भाव उत्पन्न करतो त्याप्रमाणें सांसारिक जनांसही इतरांस निरनिराळ्या प्रकारचें शासन अथवा वळण द्यावयाचें असतें.

यावरून आपल्या शीलाचे अथवा चारित्र्याचे दोन मुख्य भाग होतात हें उघड आहे. एक आपण दुसऱ्याशीं कसें वागावें हा आणि दुसरा दुसऱ्यास कसें वागवावें हा होय. आपल्या विषय-विवेचनाच्या सोईसाठीं पहिल्या भागास आपण विनययोग म्हणूं आणि दुसऱ्यास शासनयोग हें नांव देऊं. शासनयोगाचा विचार पुढें केव्हां तरी करतां येईल. आज विनययोगाचें विवेचन करूं. गवई आपलें गाणें सुरू करण्यापूर्वी प्रसंगाला अनुलक्षून विवक्षित रागदारीची योजना करून प्रसंगांतील रसानुरूप आपल्या मनाची भावना करून गाणें गाऊं लागतो, त्याप्रमाणेंच या जगा-मध्यें मार्गक्रमण करूं इच्छिणाऱ्यांनीं आपली मनोभावना ठरवून तदनुरूप विनययोग साधावा. ही भावना कशी असावी याविषयीं भगवान् श्रीगौतमबुद्धांनीं आपल्या विनयपिठकांमध्यें स्पष्ट सांगितलें आहेः—

**अतूपमाय सब्बेस सत्तानं सुखकामतम्।**
**परिसत्वा कमतो मेत्तं सब्बसत्तेसु भावये॥**

(आपल्याप्रमाणेंच सर्व प्राणिमात्र सुखाची इच्छा करितात, असें जाणून क्रमाक्रमानें त्या सर्वांविषयीं प्रेमभाव उत्पन्न करावा.)

**सुखी भवेय्यं निदुःक्खो अहं निच्चं अहं विय।**
**हिताच मे सुखी होन्तु मज्झता चथ वेरिनो॥**

(सदासर्वदा मीं सुखी असावें, मीं निर्दुःखी असावें, माझ्याप्रमाणें माझे मित्रही सुखी होवोत, मध्यस्थही सुखी होवोत आणि माझे वैरीही सुखी होवोत.)

**इमम्हि गामक्खेत्ताम्हि सत्ता होन्तु सुखी सदा।**
**ततो परं च रज्जेसु चक्कवाळेसु जंतुनो॥**

(ह्या आसपासच्या देशांतील आणि ह्या गांवांतील सर्व प्राणी सर्वकाळ सुखी होवोत. ह्या राज्यांतील प्राणी सुखी होवोत. ह्या विश्वांतील (सर्व) प्राणी सुखी होवोत.)

**तथा इत्थी पुमा चेव अरिया अनरियापि च।**
**देवा नरा अपायट्ठा तथा दसविदासु च॥**

(त्याचप्रमाणें स्त्रिया आणि पुरुष, आर्य आणि अनार्य, देव आणि मनुष्य हे सर्व सुखी होवोत. दुर्गतीप्रत गेलेले प्राणीही सुखी होवोत. दाही दिशांला सर्व प्राणी सुखी होवोत.)

बुद्ध देवांनीं वर सांगितल्याप्रमाणें मनुष्यमात्रांनीं या जगामध्यें आपली सुखाची आणि मैत्रीची भावना सदोदित ठेवावी. ही भावना पुढील सर्व विनययोगाचा पाया होय. वरील श्लोकांत गौतमानें तीन गोष्टी सांगितल्या आहेत.

(१) आपण नेहमीं सुखी असण्याचा प्रयत्न करावा. दुःखी राहण्यांत कोणताही धार्मिकपणा किंवा मोठेपणा नाहीं. (२) दुसऱ्यामध्येंही हीच सुखवृत्ति वाढवावी. (३) सर्वांमध्यें सर्वकाळ आणि दशदिशा हें सुखाचें वर्तुळ पसरावें.

हें करण्यास खालील मार्ग साधावा:-- (१) आपल्यामध्यें कांहीं उपजतच दुर्गुण असतात आणि आपण जन्मल्यावर आपल्या अज्ञानामुळें किंवा दुर्बलतेमुळें कांहीं दुष्कृत्यें आपल्या हातून होतात. ह्या संचित दुर्गुणापासून आणि क्रियमाण दुष्कृत्यापासून जर आपली खरी खरी सुटका व्हावयाची असेल तर हे दुर्गुण आणि तीं दुष्कृत्यें आपण होऊनच उघडकीस आणिली पाहिजेत. यासाठींच कित्येक धर्मांमध्यें स्वकृत पापनिवेदनाची (confession) आणि प्रायश्चित्ताची योजना असते आणि ही अवश्य आहे. अशा रीतीनें आपणच आपल्या दुर्गुणांचा आणि दुष्कृत्यांचा पुकारा केल्यास दुसऱ्यास तीं उघडकीस आणण्यास वावच उरणार नाहीं आणि उभयपक्षीं बरीच तळमळ निवारली जाईल. (२) पण सर्वच काळ आपण आपल्या पापाचा पुकारा करीत राहणें हें व्यवहारांत शक्य नसतें. अशा वेळीं निदान आपण आपलीं दुरितें अन्य कोणत्या रीतीनें उघडकीस येत असलीं तर लपविण्याचा तरी निदान प्रयत्न करूं नये. जों जों छपविण्याचा जास्त प्रयत्न होतो तों तों तीं उघडकीस आल्यावर जास्त क्लेशकारक होतात. (३) तसेंच आपले कांहीं संचित सद्गुण आणि क्रियमाण सत्कृत्येंही असतात. तीं आपण नेहमीं छपविण्याचा प्रयत्न करावा. आपल्यास ज्ञान अथवा कला प्राप्त झाली तर किंवा एखादा नवा शोध लागला असला तर तो छपविण्याचा प्रयत्न करूं नये. पण सत्कृत्याची गोष्ट निराळी. (४) हे सद्गुण आणि हीं सत्कृत्यें सर्वकाळ लपवून ठेवणें शक्य नसलें तरी तीं निदान आपण होऊन उघडकीस आणण्याचा प्रयत्न करूं नये. अशा प्रयत्नानें तीं कमी परिणामकारी होतात. (५) आपले दुर्गुण आणि दुष्कृत्यें हीं ज्याप्रमाणें उघडकीस आणावीं त्याचप्रमाणें उलटपक्षीं दुसऱ्याचे दुर्गुण आणि दुष्कृत्यें नेहमीं छपविण्याचा प्रयत्न करावा. जेव्हां कारणच पडेल, किंवा अशा रीतीनें दुसऱ्याचीं दुष्कृत्यें उघडकीस आणणें ही आपली सार्वजनिक नेमलेली कामगिरी किंवा नैतिक कर्तव्य असेल तेव्हांच आणि तेव्हांही तीं मोठ्या नाइलाजानें आणि अनुकंपेनें उघड केलीं तरच आपल्यास कर्तव्य बजाविल्याचें श्रेय मिळून दुसऱ्याचें हित होतें. (६) एरवीं दुसऱ्याचीं दुरितें सर्वकाळ छापविणें शक्य नसलें तरी तीं आपण होऊन उघडकीस आणण्याची वरील कारणाशिवाय कधींहीं उठाठेव करूं नये. (७) तसेंच दुसऱ्याचे सद्गुण आणि सत्कृत्यें हीं होतां होईल तों उघड करण्याचा प्रयत्न करावा. (८) तीं निदान छपविण्याचा प्रयत्न करूं नये.

विनययोगाचा असा अष्टांगमार्ग आहे. त्या मार्गानें वर गौतमबुद्धांनीं उपदिष्ट केलेल्या मैत्री-भावनेची चिरकाल वृद्धि होवो.

विनययोगाची मीमांसा करतांना आपल्या आणि दुसऱ्याच्या चांगल्या आणि वाईट गुणां-संबंधीं आणि कृत्यांसंबंधी आपली वृत्ति कशी राखावी या विषयींच्या अष्टांगमार्गाचें दिग्दर्शन वर केलें. आज आपल्यावर आणि दुसऱ्यावर सुखाचे आणि दुःखाचे जेव्हां प्रसंग येतात त्या त्या वेळीं आपली वृत्ति कशी राखावी या विषयीं विचार करूं.

सुखाचा आपल्यावर एकादा व्यक्तिविषयक प्रसंग आला तर त्याविषयी सुज्ञ माणसानें आपल्या मित्राजवळ देखील वाच्यता करीत बसूं नये; तें सुख कोणत्याही दर्जाचें असो, तें जर केवळ आपल्या व्यक्तीपुरतें असेल तर दुसऱ्यांनीं वाटल्यास आपलें अभिनंदन करावें आणि तेव्हांही आपण होतां होईल तों थोडक्यांत त्यांचे आभार मानून मोकळें व्हावें, हाच सुविनीतपणा श्रेय. पण कित्येक अभिनंदनाची वाटही न पाहतां आपल्या व्यक्तिसुखाचा पाल्हाळ लावितात आणि यांत अविनय आहे हें त्यांस कळत नाहीं ! समुद्रकिनाऱ्यावर हिंडत असतां आपल्या चिमुकल्याला एकादें फुटकें शिंपलें सांपडलें आणि त्याबद्दल मोठा उल्हास दाखवीत तो आपल्याकडे आला तर आपण त्याच्या उल्हासाचें कौतुक करणें साहजिक आहे. परंतु जगामध्यें सर्वच ठिकाणीं माणसाचा संबंध पितापुत्राचा नसतो आणि एकाच्या व्यक्तिसुखाचें कौतुक दुसरा करीलच याचा नियम नाहीं.

आपल्यावर दुःखाचा प्रसंग येतो, तेव्हांही मनुष्यानें आपल्या तोंडाला ' दृढतर मौनकुलूपच ' लाविलें पाहिजे. त्यासंबंधानें हळहळ किंवा हायहाय दुसऱ्यापुढें करणें हें दुर्बलपणाचें लक्षण आहे. पुरुष अथवा स्त्री ज्या मनानें दुबळी असते त्या मानानें ही हळहळ आणि हायहाय अधिक दिसून येते. आपलीं खासगी दुःखें दुसऱ्यांस सांगून तादृश फायदाही होत नाहीं, असा पुष्कळ वेळां आपणास अनुभव येतो. आपली दुःखाची कहाणी संपण्याची तर गोष्ट दूरच राहो, पण ती सुरू होते न होते. तोंच ऐकणारा आपल्या स्वतःचीं दुःखें सांगूं लागतो आणि तीं इतका वेळ सांगत बसतो की त्यामुळें आपण आपलें दुःख सांगितलें याबद्दल आपणास पश्चात्तापच व्हावा असा कित्येकांना तरी अनुभव आला असेल. यद्यपि दुसऱ्यानें स्वतःचीं दुःखें न सांगतां आपलीं सर्व दुःखें ऐकून घेतलीं तरी त्यास तीं ऐकून बरें वाटतें असेंच नेहमी होतें असें नाहीं. शिवाय जरी आपल्या मित्रामध्यें आपणाविषयीं अनुकंपा उत्पन्न होण्याचा संभव असला तरी हलक्यासलक्या प्रसंगीं आणि वेळो-वेळीं हा संभव कसास लावून पाहणें हे योग्य नाहीं.

आपण आपलीं दुःखें दुसऱ्यास सांगूं नये इतकेंच नव्हे, तर आपल्या व्यक्तिविषयक व घर-गुती गरजा यांचीही चर्चा विनाकारण कधींही न करण्याची जितकी खबरदारी घेववेल तितकी हितकारक आणि भूषणास्पद आहे. या बाबतींत गंभीर मौन धारण केल्यानें आपल्या गरजा जितक्या लवकर भरून येतील तितक्या वाच्यतेनें भरून येणार नाहींत आणि त्या गरजा आपल्या प्रयत्नाच्या जोरावर भरून काढण्यांत स्वतःस भूषण आणि इतरांस शिक्षण जितकें मिळेल तितकें आपल्या खऱ्या मित्रांच्या अनुकंपेनेंही मिळणार नाहीं. यावरून मित्रांच्या सहानुभूतीची किंमत कमी होते असें नाहीं. उलट तिचे प्रसंग अधिकाधिक कमी झाल्यानें तिचें मोल अधिक वाढेल यांत संशय नाहीं. सहानुभूति मुळींच अन-वश्यक किंवा अनिष्ट आहे असें नाहीं, ती अति स्वस्त होऊं नये एवढाच विनयाचा उद्देश आहे.

पण अलीकडे आपल्या राष्ट्रांत कांहीं बाबतींत उलटाच प्रकार चाललेला दिसतो. आपल्याला विवाह करावयाचा असल्यास ' वधू पाहिजे ' अशी जाहिरात वर्तमानपत्रांत देणारी मंडळी जेथें आढ-ळते तेथें विनयाची भवति न भवति करीत बसणें हें कदाचित् अरण्यरुदनासारखें होणार आहे. स्वयंवराची चाल आपल्या राष्ट्रांत पूर्वी असो किंवा नसो, ती कांहीं पाश्चात्य देशांमध्यें पूर्वापार चालत आलेली आहे; पण तेथेंही वर्तमानपत्राच्या द्वारें स्वयंवर करण्याची पद्धति अद्याप चालू झाली नसतां आमच्यासारख्या पुराणप्रिय लोकांनीं ती इतक्या लवकर उचलली यांस काय म्हणावें ! मर्यादा राखण्याविषयीं आमची प्रसिद्धि असून असें कां व्हावें ? ज्याप्रमाणें आम्हीं आपलीं अंगें वस्त्रांनीं

झांकावीं त्याचप्रमाणें आम्हीं आपल्या खासगी गरजाही झांकाव्या. निदान विनाकारण चव्हाट्यावर पाठवूं नये ही खरी मर्यादा आहे.

याप्रमाणें आम्हीं आपल्या खासगी सुखदुःखाची चर्चा दुसऱ्यापुढें वेळीं अवेळीं करूं नये असें म्हटलें, यावरून आम्ही दुसऱ्यांचीं सुखदुःखें ऐकूं नयेत असें होत नाहीं. यावर कदाचित् असा आक्षेप येईल कीं जर आम्ही दुसऱ्यांस सांगूं नयेत तर दुसऱ्यांनींही आम्हास सांगूं नये हें योग्य, आणि जर आम्ही ऐकूं तर दुसऱ्यांस सांगावयास उत्तेजन दिल्याप्रमाणें होणार; म्हणून आपण ऐकण्याचेंही वर्ज्य करावें हा उत्तम मार्ग; पण हा आक्षेप योग्य नाहीं. दुसऱ्यास विनय शिकवायाचा तो आपल्या विनयानेंच चांगला शिकविला जाईल. आम्ही स्वतःच्या दुःखाची चर्चा कधींच न करून उलट दुसऱ्यांचीं सुखदुःखें ऐकावयास तयार आहों हें ध्यानांत येऊन दुसरे जितके लवकर विनयवान् होतील तितक्या लवकर आम्ही त्यांच्या कहाणीचा अनादर केल्यानें होणार नाहीं. उलट आम्ही कठोर अंतःकरणाचे आहों असा मात्र दुसऱ्यांचा गैरसमज होइल. शिवाय प्रसंगविशेषीं परस्पर सहानुभूति अवश्य–निदान इष्ट आहे असें पूर्वी सांगितलेंच आहे.

आतांपर्यंत आमच्या साधारण लौकिक सुखदुःखांचा विचार झाला; पण याशिवाय आपल्यास आध्यात्मिक सुखदुःखांचा अनुभव येतो. त्या विषयीं आपली वागणूक वरच्याहून अगदीं वेगळी असली पाहिजे. ती कधींच आम्हीं आपल्याशीं झांकून ठेवूं नये. योग्य अवसर पाहून त्याचा फायदा दुसऱ्यांस द्यावा. आध्यात्मिक दुःखें तीन प्रकारचीं असण्याचा संभव आहे. पहिला प्रकार कृतकर्माबद्दल केव्हां केव्हां आपणास होणारा पश्चात्ताप होय. केव्हां केव्हां आपल्या आध्यात्मिक जीवनक्रमांत निराशा वाटूं लागते, हा दुसरा प्रकार व केव्हां केव्हां आपल्या अत्यंत प्रिय आदर्शासंबंधींदेखील संशय उत्पन्न होतो. या तीनही अनिष्ट प्रकारांमुळें आपल्यास घोर वेदना आणि यातना होतात. त्यावेळीं आपल्या वडील माणसांजवळ किंवा सुहृज्जनांजवळ विसावा, शांति आणि नवीन मार्ग शोधण्यास आपण अवश्य जावें. श्रद्धादृष्टीनें पहातां वरील तीनही अनिष्ट प्रकार अंतीं आपल्यास हितावहच होतात. मात्र एवढी सावधगिरी घेतली पाहिजे कीं, अशा प्रसंगीं आम्हीं लपवालपव किंवा उडवाउडव न करतां मन अगदीं आरशाप्रमाणें मोकळें ठेवावें आणि आपल्या शत्रूसही आंत येण्यास द्वार खुलें करावें. पण जनरूढि पाहतां लोक साधारणतः अशा प्रसंगीं अनुभव नसतांना उगीच पोकळ सुखवादाच्या आणि आशावादाच्या गोष्टी सांगत असतात. आध्यात्मिक बाबतींत असा औपचारिकपणा करूं नये. आपल्या मनास संशयाचा स्पर्श झाला किंवा त्यावर निराशेची छाया पडली कीं आम्हीं खात्रीनें अपवित्रच झालों असें समजूं नये. केव्हां केव्हां प्रामाणिक संशयाची योग्यता आणि पवित्रता प्रामाणिक श्रद्धेइतकीच असते, मग ती अंधपरंपरागत श्रद्धेहून अधिक आहे हें सांगावयास नकोच. संशय ही मनोविकाराची एक पायरीच आहे, इतकेंच या पायरीवर पोहोंचलों असतां तेथेंच थबकण्याची किंवा खालीं पाहण्याची चुकी करूं नये. कोणी आसपासचा सांगाती किंवा कोणी वरच्या पायरीवरचा गुरु यांची कास धरण्यास धांवावें. अशा संशयस्थितीचा संसर्ग आपल्याहून कमी अधिकाराच्या माणसास न लागेल अशी खबरदारी घ्यावी.

---

## शासनयोग.

(रविवार ता. ७ ऑगस्ट सन १९१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश).

ता. १९ आणि ता. २६ जून १९१० रोजीं विनययोगावर विचार करितेवेळीं आपण दुसऱ्याशीं कसें वागावें आणि आपण दुसऱ्यांस कसें वागवावें असे वागणुकीचे दोन भाग करण्यांत आले होते. पहिल्यास विनययोग व दुसऱ्यास शासनयोग असें नांव देण्यांत आलें होतें. आज दुसऱ्या भागाविषयीं थोडासा विचार करूं.

मनुष्यानें मनुष्यास कसें वागवावें हें पहाण्याच्या पूर्वी मनुष्यास वागविण्याचा अधिकार मनुष्यास आहे कीं नाहीं, या गोष्टीचा विचार करावयास पाहिजे आहे. पण त्याच्याही पूर्वी म्हणजे मनुष्यास शासनाचा अधिकार आहे कीं नाहीं हें ठरविण्याच्या पूर्वी, जगतांत मुळीं शासन

आहे कीं नाहीं, हें पाहिलें पाहिजे. संसारांतील व्यवहाराचा पायाच जर कोणत्याही शासनावर अथवा नियमावर अवलंबून नसला, तर मनुष्याच्या व्यवहारापुरताच शासनाचा विचार करण्याची जरूरीच रहाणार नाहीं. या बाह्य विश्वामध्यें सर्वत्र अबाधित आढळून येणाऱ्या शासनाविषयीं जरी निरनिराळीं दर्शनें आहेत, तरी थोडा विचार करून पहातां त्यांमध्यें वस्तुतः परस्परविरोध नाहीं असें दिसून येईल. केवळ नीतिनियमांचें अस्तित्व मानणारा कर्मवादी बुद्धादिकांचा एक पक्ष आहे. या नियमांच्या मागें कोणी नियंता आहे, त्याची इच्छा म्हणजेच नियम असें मानणारे ईश्वरवादी आहेत. पण हे दोन्ही पक्ष सारखेच आस्तिक समजावयास पाहिजेत. व्यवहारांत एकास नास्तिक व दुसऱ्यास आस्तिक समजण्यांत येतें हें चुकीचें आहे. केवळ नियमांसच मानून नियंत्याविषयीं उदासीन रहाणाऱ्या कर्मवाद्यास जर अंशतः नास्तिक म्हणावयाचें तर उलटपक्षीं केवळ नियंत्यासच मानून नियमांविषयीं उदासीन रहाणाऱ्या ईश्वरवाद्यासही वरीलप्रमाणें अंशतः नास्तिक म्हणावयास पाहिजे. कारण, ईश्वरवादाचा मुख्य सिद्धांत सांगत आहे कीं, 'अपिचेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः ॥ यामध्यें धडधडित नियमांचें उल्लंघन करणाऱ्या दुराचार मनुष्यासही साधु समजण्याविषयीं आज्ञा आहे. यावरून नियमबंधनाविषयीं हा पक्ष किती उदासीन आहे हें दिसतें. उलटपक्षीं, नियमवाद्यांचा असा आग्रह असतो कीं, आज आम्ही जे विचार मनांत आणूं त्यांचें पर्यवसान उद्यां कृतींत होणार, इतकेंच नव्हे, तर आजचा विचार ती उद्यांची कृति, उद्यांची कृति ती परवांची संवय, परवांची संवय तें तेरवांचें शील, तेरवांचें शील ती शाश्वतची समाधि, येणेंप्रमाणें पर्यवसानाची अबाधित परंपरा हा पक्ष मानतो. आणि ही परंपरा कोणा नियंत्याची इच्छा आहे कीं नाहीं, याविषयींच्या विचारांत तो पडत नाहीं. याप्रकारें बोधिसत्व आणि भगवद्भक्त हे सारखेच आस्तिक किंवा नास्तिक ठरतात. परंतु ज्या अर्थी दोघांचाही कांहीं विधानांवर आधार आहे, त्या अर्थी दोघांनाही आस्तिक म्हणावयास पाहिजे.

लौकिक व्यवहारामध्यें कांहीं सनद मानणारे व कांहीं स्वामी मानणारे असे दोन पक्ष दिसून येतात. सनदपक्ष म्हणतो कीं, स्वामी असला तरी तो सनदी नियमांनीं बांधलेलाच असणार व तो असावयास पाहिजे. म्हणून सनद हेंच मुख्य ध्येय. स्वामीपक्ष म्हणतो कीं, सनद हें केवळ स्वामीचें दान म्हणून तेंच मुख्य ध्येय. आध्यात्मांत ब्रह्म हें ज्याप्रमाणें 'शुद्धमपापविद्धं' त्याचप्रमाणें व्यवहारांतील स्वामी हाही A king can do no wrong या म्हणण्याप्रमाणें गुन्हा करूं शकत नाहीं. येणेंप्रमाणें प्रपंचांत आणि परमार्थांत जरी वरवर पहातां दोन भिन्न पक्ष दिसतात, तरी त्या दोघांमध्यें खरा विरोध नाहीं. दोन्ही पक्ष सारखेच निष्ठावान् आहेत. विचार करितां दोघांच्याही ध्येयांचा अंतिम लय एकाच वस्तूंत होतो.

पण तिसरा एक पक्ष असा आहे कीं, तो मनुष्याच्या मनाबाहेर नियमांचें अस्तित्व मानीत नाहीं. नियमांचें अधिष्ठान मनुष्याच्या अंतःकरणांत आहे असें त्याचें म्हणणें असतें. तत्ववेत्ता Kant यांचे Categorical Imperative आणि कविकुलगुरु कालिदास यांचे 'सतांहि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः' हीं दोन्ही सूत्रें वरील स्वेष्टवादाचेंच समर्थन करितात. पण हा स्वेष्टवादही शासन मानीतच आहे. तें शासन आंतून असो किंवा बाहेरून असो तें आहे आणि मानलें जात आहे हें खास.

चवथा पक्ष मात्र आंत बाहेर कोठेंच नियम मानीत नाहीं. खा, पी, चैन कर, कारण उद्यां मरण येणार आहे, असें सांगणारा हा मात्र खरा आणि शुद्ध नास्तिक पक्ष होय. अशा वाममार्गी शाक्तांचा नाश झाल्यास कोणासही वाईट वाटणार नाहीं. नाश होतेवेळीं स्वतः त्यांनासुद्धां वाईट वाटण्याचें कारण नाहीं. स्वतःच्या शक्तीशिवाय त्यांना बाहेर कांहींच दिसत नसतें म्हणून त्या शक्तीचा लय झाला असतां मरण्यास त्यांनीं खुषीनें तयार असलें पाहिजे, तरच ते शाक्त; नाहींतर त्या वेळेला जर बाहेरील शासनासंबंधीं त्यांच्यांत श्रद्धा किंवा भीति उत्पन्न होईल, तर ते शाक्त कसले ? लोकायतिक, चार्वाक इत्यादि मतवाद्यांचें कांहीं युक्तिवादपूर्वक वाङ्मय होतें पण तें द्वेषानें नाहींसें केलें असें सांगतात. पण

तें उघडकीला येईतोंपर्यंत तरी त्यांच्या नास्तिकपणाला बाध येत नाहीं.

असो. हा चवथा पक्ष शिवाय करून वरील तिन्ही पक्षांस, सृष्टीमध्यें शासन आहे, हें मान्य आहे. आतां मनुष्यास शासन करण्याचा अधिकार आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं आजपर्यंत त्याच्याकडून हा अधिकार कसा बजावला गेला आहे याचा इतिहास पाहूं. मनुष्यच काय पण इतर प्राण्यांमध्येंही शासनाचे दाखले दिसत आहेत. शासनाचा पहिला उद्भव मातेमध्यें दिसून येतो. अपत्य जन्मल्याबरोबर माता त्यावर प्रेम करूं लागते, इतकेंच नव्हे तर त्यावर राज्यही करूं लागते; प्रेमामुळें तिजवर शासनाची एक जबाबदारी येते. मुलाचे लाड करणें व कौतुक करणें एवढींच प्रेमाचीं लक्षणें नसून, अपत्याची जी इच्छा असेल त्या इच्छेला आपल्या शहाणपणाचा आळा ती सतत घालीत असते. मग ती माता मानवी असो किंवा खालील प्राण्यांतील असो.

समाजाचा अधिकाधिक विकास होऊन अनेक कारणांमुळें इतरांपेक्षां एका व्यक्तीमध्यें जेव्हां धन, बल, बुद्धि इत्यादि एक किंवा सर्व गुणांचा जास्त संचय होतो, तेव्हां त्यांच्यामध्यें साहजिक आढ्यता उत्पन्न होऊन तिच्या जोरावर तो इतरांचा पुढारी होऊन त्यांवर शासन करूं लागतो. हें बळ मजमध्येंच आहे, इतरांमध्यें नाहीं, हें कार्य मजसारखे आजपर्यंत करीत आलेले आहेत, मी आतां न करणें म्हणजे मानहानि होणार आहे अशा प्रकारच्या राजसी विचारांमुळें क्षत्रियांची उत्पत्ति आणि वाढ होऊं लागते, म्हणून आढ्यता हें शासनाचें दुसरें कारण होय. वत्सलतेमुळें होणाऱ्या शासनाचा परिघ साहजीकच अल्प असणार. अपत्यसंबंधापलीकडे त्याचा वाव नसतो. केवळ वत्सलतेमुळेंच ज्या स्थितींत शासन चालू असतें ती समाजाची आद्य स्थिति. पुढें आढ्यतेमुळें व्यक्तीचें आणि व्यक्तिसमूहाचें इतर व्यक्तींवर किंवा इतर व्यक्तिसमूहावर जें राज्य चालू होतें ती समाजाची दुसरी स्थिति. या आढ्यतेच्या जोरावर अद्यापिही शासन चाललें आहे आणि पुढेंही या शासनाचा विस्तार अधिकाधिकच चालू रहाणार.

शासनाचें तिसरें कारण कर्तव्य हें होय. समाजाचा विकास अधिकाधिक झाल्यानंतर सात्त्विक माणसांनीं इतरांवर शासन करणें हा एक त्यांच्या सात्त्विकपणाचा भाग आहे अशी कर्तव्यबुद्धि जागृत होते. कमी सुसंस्कृत माणसांवर किंवा जातीवर अधिक सुसंस्कृत माणसांनीं किंवा जातींनीं शासन चालविणें ही हक्काची गोष्ट नसून उलट कर्तव्याची गोष्ट आहे. अडाणी माणसांवर बुद्धिवानानें, अडाणी माणसांच्या हितासाठीं राज्य करणें हा बुद्धिवानाचा हक्क नसून अडाणी माणसाचा बुद्धिवानावर हक्क आहे आणि बुद्धिवानाचें हें कर्तव्य आहे. ज्याप्रमाणें मातापित्यांनीं अपत्यांचा सांभाळ करणें हें मातापित्यांचें कर्तव्य आणि अपत्यांचा हक्क आहे त्याप्रमाणें सुसंस्कृतांनीं असंस्कृतांचें नियमन करावें हें सुसंस्कृतांचें कर्तव्य योग्य होय. हें कर्तव्य बजाविलें जात असतांना शास्त्यांचा सात्त्विकपणा तीव्र कसाला लागतो आणि ज्या ज्या मानानें तो या कसोटीला उतरतो त्या त्या मानानें त्याचें तें शासन, कर्तव्याचें म्हणजे तिसऱ्या कोटींतलें आणि ज्या ज्या मानानें तें उतरत नाहीं त्या त्या मानानें तें आढ्यतेचें म्हणजे दुसऱ्या कोटींतील समजावें एकंदरींत वत्सलता, आढ्यता आणि कर्तव्यता हीं शासनाचीं तीन निरनिराळीं कारणें आहेत.

मनुष्याच्या विकासाचा इतिहास पाहिला असतां वरील कारणांच्या द्वारें मनुष्याकडून जें शासन घडत आहे, त्याचें श्रेय मनुष्यशक्तीकडे आहे, किंवा मनुष्येतर कोणा श्रेष्ठ शक्तीकडे आहे याच्याविषयीं वाद पडतो. वत्सलता आणि कर्तव्यता या सात्त्विक कारणांमुळें हें श्रेय श्रेष्ठ शक्तीकडे देऊं गेल्यास, त्याबरोबर आढ्यता या राजसी गुणाचेंही संशयित श्रेय त्याच शक्तीकडे जाईल. हा संभव टाळावा म्हटल्यास उलटपक्षीं सर्वच श्रेय मनुष्यशक्तीकडे येतें.

मनुष्य शक्तीचा सर्व चांगला भाग श्रेष्ठ शक्तीकडे अपूर्व वाईटाला मात्र मनुष्यास जबाबदार करणें ही मनुष्याविषयीं सम्यक् दृष्टि होत नाहीं. आणि श्रेष्ठ शक्तीलाही अशा प्रकारच्या पक्षपाताची जरूरी नाहीं. कांहींही असो, मनुष्याच्या द्वारां हें शासन घडत आहे. या शासनाची त्याजवर जबाबदारी आहे. तिच्यापासून त्याची सुटका नाहीं. या शासनाच्या जबाबदारीपासून आपली सोडवणूक करून घेणें यांत कोण-

त्याही सात्त्विकपणा नाहीं. ईश्वराला शरण जाणें हें भगवद्भक्तीचें थोर लक्षण आहे. पण शरणतेमुळें ही शासनाची जबाबदारी चुकतें असें होत नाहीं. शासनाविषयीं ईश्वरी आज्ञा झाली असतां तिच्यांत कसुरी करून पुनः आम्ही शरण आहों असें म्हणत राहणें हें शरणतेचें खरें लक्षण नव्हे ते कोडगेपणाचें लक्षण होय. कोणालाही शरण गेल्यास तो सांगेल तें काम करावयास तयार राहणें आणि तें करण्यांतच आनंद आणि थोरवी मानणें हेंच त्या शरण गेल्याचें खरें खरें लक्षण

आतां शासनाचे किती प्रकार आहेत ते पाहूं. (१) आईबापांकडून मुलांवर घडणारें शासन, (२) गुरुकडून शिष्यावर घडणारें, (३) राजाकडून प्रजेवर घडणारें अशीं तीनच मानवी शासनें संभवतात. व्यवहारांत ह्याहीपेक्षां आणखी दोन शासनें आढळतात. (१) धनी आणि नोकर यांमधील आणि (२) पति आणि पत्नी यांमधील. पण न्यायदृष्टीनें पाहूं गेल्यास, धनी आणि नोकर यांचा संबंध शास्ते आणि शास्य असा मुळींच नाहीं. कचेरींतला चपराशी असो, घरांतील बाल्या असो, गिरणींतील कामगार असो, किंवा नोकर कोणीही असो, त्याच्यावर राज्य करावें असा धन्याचा अधिकार नाहीं. धनी आणि नोकर एकाच करारनाम्याचे दोन सारखे उमदे पक्ष आहेत. दोघेही परस्परांचे सारखे ऋणको आणि धनको आहेत. असें असून घरोंघरीं आणि शहरोंशहरीं चाकर लोकांवर जीं साम्राज्यें चालू आहेत तीं केवळ 'बळी तो कान पिळी' या न्यायाचीं आहेत. अर्थात् बळाचें हें तत्त्व जेव्हां धन्याकडून चाकराकडे कलतें तेव्हां शासनाचे पारडें डळमळूं लागतें आणि जो घोंटाळा उडतो त्यावरून वरील साम्राज्याचा पाया न्यायावर रचला नसून अन्यायावर रचला आहे हें उघडकीला येतें. एकंदरींत हा संबंध शासनाचा नव्हे हें सिद्ध होतें. ह्याहूनही विलक्षण प्रकार पतिपत्नी किंवा साधारण स्त्रीपुरुषांच्या संबंधांत दिसून येतो. प्रत्येक कुटुंबांत हें बायकांवरचें राज्य चालू असतें. अर्धी मनुष्यजात या प्रकारें मनुष्यजातीच्या दुसऱ्या अर्धावर सत्ता गाजवीत आहे. विवाहामध्यें यद्यपि एक पक्ष दुसऱ्यास म्हणतो कीं, 'माझें हृदय तें तुझें हृदय आणि तुझें हृदय तें माझें हृदय,' तथापि व्यवहारांत 'माझें तें माझें आणि तुझें तें माझें,' असा शुद्ध अद्वैत वाद माजलेला दिसतो. म्हणजे एका पक्षीं दोन हृदयें आणि दुसऱ्या पक्षीं कांहींच नाहीं असा प्रकार होतो, हा न्याय नव्हे. कोणी म्हणतात, पति आणि पत्नी यांमध्यें परस्परशासन असावयास पाहिजे; म्हणजे, पति पत्नीचा राजा आणि पत्नी पतीची राणी (राज्य करणारी) असें असावें. पण हाही भ्रम आहे. शासनाचा संबंध कधींच परस्पर असूं शकत नाहीं. एक पक्षीं शासन तर प्रतिपक्षीं निष्ठाच असावयास पाहिजे. शासन आणि निष्ठा हीं एकाच व्यवहाराचीं समकालीन आवश्यक अंगें होत. निष्ठेशिवाय शासन संभवत नाहीं आणि शासनावीण निष्ठा निराधार होते. शासन चालू असतांना निष्ठा ही उलट दिशेनें चालू असते. यावरून दोन पक्षांमध्यें परस्पर शासनाचा संबंध मानणें ही विचाराची भ्रांति होय. एवंच खरीं शासनें तीनच आहेत. ती—(१) पितृशासन, (२) गुरुशासन आणि (३) राजशासन; आणि तदनुरूप (१) अपत्यनिष्ठा (२) शिष्यनिष्ठा आणि (३) प्रजानिष्ठा या तीन निष्ठा होत.

मनुष्यानें शासनाचा अधिकार आपणाकडे घेण्यापूर्वीं स्वतः विनयसंपन्न झालें पाहिजे. या विनयाचा अष्टांग मार्ग पूर्वीं सांगितलाच आहे. आळ्यतेमुळें जो मनुष्य शासन चालवीत असतो, तोच मनुष्य कर्तव्यतेमुळें शासनास उद्युक्त होतो, हा त्याच्या विनयसंपन्नतेचा प्रभाव होय; म्हणजे राजसी शासनांतून सात्त्विक शासनांचा जो विकास होतो, तो शास्त्याच्या विनयामुळेंच होतो, शास्ता—मग तो राजा असो किंवा गुरु असो किंवा पिता असो—या सर्वांनीं आधीं विनययोगांत सिद्धि मिळविलीच पाहिजे. ऐहिक राजशासनांत देखील राजाच्या लहान मोठ्या अधिकारी मंडळींनीं प्रजेशीं विनयानें वागलें पाहिजे असे राजकीय हुकूम सुटतात, तेही याच शास्त्राधारें. राजाचे अधिकारी हे सभ्य गृहस्थ असतात म्हणून विनयानें वागणें हा त्यांच्या सभ्यपणाचाच एक भाग आहे, एवढ्यावरच अवलंबून राजा स्वस्थ बसत नाहीं, तर शासनाचा अधिकार विनयाशिवाय मिळत नाहीं व कायम रहात नाहीं म्हणून विनय हा

व्यक्तिविषयक सभ्यतेचा भाग असो किंवा नसो, तो शासनाची आद्य तयारी आहे म्हणून आचरलाच पाहिजे अशी राजाज्ञा असते. मग तशी धर्माज्ञा असेल त्यांत नवल काय ?

येणेंप्रमाणें पितृशासन, गुरुशासन आणि राज शासन याबद्दल पृथक् पृथक विचार निरानिराळ्या प्रसंगीं पुढें केला जाईल आणि त्यावेळीं 'सत्य असत्याशीं मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमता' असाच मनाचा भाव ठेवला जाईल. बहुमताचा एवढा मोठा प्रचंड प्रभाव आहे कीं, तें ज्यास सुदैवानें अनुकूल होतें त्याच्या मूर्ति मंदिरोमंदिरीं स्थापल्या जातात आणि त्याचे शहरांतील चौकांत पुतळे उभारले जातात. पण दुर्दैवानें तेंच बहुमत ज्यांस प्रतिकूल होईल त्यांस चव्हाट्यावर सुळावर चढावें लागतें. एवढा मोठा प्रभाव असूनही त्या बहुमतास न मानतां सत्य आणि असत्याचा शोध करावयाचा असल्यास शोधकांनीं आपलें मनच ग्वाही ठेवावें असें तुकाराम सांगतात तें आम्हांस मान्य केलें पाहिजे.

---

## पितृशासन.

(रविवार ता. ४।९।१० रोजीं मुंबईच्या प्रार्थनामंदिरांत झालेल्या उपदेशाचा सारांश.)

ता. ७ आगष्ट रोजीं शासनयोगाविषयीं विचार करीत असतांना पितृशासन, गुरुशासन आणि राजशासन असे शासनाचे तीन भाग आपण केले होते; त्यांपैकीं आज पितृशासनाविषयीं थोडासा विचार करूं. प्राचीन काळीं मनुष्यसमाजाच्या प्राथमिक अवस्थेमध्यें पितृशासनाचेंच प्राबल्य सर्वत्रीं आढळून येत असे. आर्यांची वेदकालीन सुधारणा होईपर्यंतही त्यांच्यांत पिता म्हणजे कुटुंबाचा पति, गुरु, उपाध्याय आणि राजा हे सर्वच अधिकार चालविणारी व्यक्ति असे. रोमन लोकांच्याही जुन्या कायद्यांत पित्याला कुलपतीची सर्व अनियंत्रित सत्ता गाजवावयास मिळत असे. मुलाच्या मालमत्तेवरच नव्हे तर त्याच्या प्राणावरही त्याची सत्ता चालत असे. पुढें समाज जसजसा विकसित होत गेला तसतसा ज्ञानदानाचा अधिकार गुरुकडे आणि नागरिकशासनाचा अधिकार राजाकडे अशी विभागणी होत गेली. पण शासनाचें मूळ म्हणजे पितृत्व हेंच होय आणि गुरु अथवा राजा हा परंपरेनें एक प्रकारें पिताच होय.

मनुष्य मनुष्यावर जें शासन चालवीत असतो त्याचा विचार करीत असतां सकृद्दर्शनीं मनुष्यांतील हें शासन आणि मनुष्याचें स्वत्व (अथवा व्यक्तित्व) यामध्यें विरोध असावा असा भास होतो. मनुष्यसमाजांत आढळून येणारें रूढीचें अनिवार्य प्राबल्य, अल्पसंख्येचा बहुसंख्येवर किंवा बहुसंख्येचा अल्पसंख्येवर चालणारा जुलूम, परंपरागत चालत आलेल्या तत्त्वज्ञानाचें, हटवादाचें, सांकेतिक आणि प्रासंगिक नीतीचें, शिष्टसंप्रदायांचें इत्यादि अनेक प्रकारचीं दडपणें, हीं सर्व लक्षांत आणितां मनुष्य हा एक पारतंत्र्याखालीं स्वतःस सतत चिरडून घेणारा, स्वत्वशून्य प्राणी असावा असें वाटतें. या दृष्टीनें पाहतां इतर सर्व खालील प्राणी पुष्कळ स्वतंत्र आणि स्वावलंबी आहेत हें पाहून त्यांची धन्यता वाटूं लागते. पण हा अगदीं वरवरचा विचार होय. किंचित् खोल विचार केल्यास याच्या अगदीं उलट प्रकार दिसून येऊन, 'धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पहा हो । जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो दावे सिद्धीतें ॥' हा रामदासांनीं काढलेला उद्गार अगदीं यथार्थ आहे अशी खात्री पटते. सुज्ञ, समर्थ आणि आत्मनिष्ठ माणसाची स्वतंत्रता कोणीकडे ? पशु शरीरानें कितीही बळकट असला तरी निसर्गाचा केवळ दास आहे. पण ज्या मनुष्याची ब्राह्मी स्थिति--

> आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
> समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ।
> तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे
> स शांतिमाप्नोति न कामकामी ॥

या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें भगवद्गीताकारांनीं वर्णिली आहे, त्याचा निसर्गच उलट दास आहे.

पण एवढें मोठें स्वत्व आणि व्यक्तित्व अंगीं येण्याच्या पूर्वीं मनुष्यास अगोदर शासनाच्या तीव्र मुशींतून बाहेर निघावें लागतें. शासन व स्वत्व यांच्यामध्यें विरोध नसून शासन हें स्वत्वाची अपरिहार्य पूर्व तयारीच आहे असें समजावें. पशु आणि मनुष्य यांची तुलना करून पाहतां इतर सर्व प्राण्यापेक्षां मनुष्याची बाल्यावस्था

इतकी दीर्घकालीन कां असावी याचें इंगितही वरील शासनाच्या अवश्यकतेमध्येंच आढळून येतें. जनावरांचीं पिलें थोड्या आठवड्यांनीं किंवा महिन्यांनीं आपल्या पायांवर उभीं राहून आपल्या आईबापांपासून सडसडीत मोकळीं होतात. पण सबंध बारा वर्षांचें एक तपही मनुष्याच्या बाल्यावस्थेस पुरेसें होत नाहीं. याचें कारण त्याला पुढें जें तेजस्वी पौरुष्य मिळावयाचें असतें ते होय. तें पौरुष्य प्राप्त होण्याच्यापूर्वीं त्याला खालीं सांगितल्याप्रमाणें बाळपणाच्या पायऱ्या पितरांच्या शासनछत्राखालीं चढाव्या लागतात.

**कौमारं पंचमाब्दांतं पौगंडं दशमावधि।**
**कैशोरमा पंचदशाद्यौवनं हि ततः परम्॥**

पांच वर्षांचा होईपर्यंत कुमार, दहापर्यंत पौगंड पंधरापर्यंत किशोर आणि त्यानंतर पंधरा वर्षें तारुण्याचीं गेल्यानंतर पुरुषास पोक्तपणा येतो या पंधरा वर्षांच्या बाल्यावस्थेंत त्याला ज्याप्रकारचें शासन मिळेल त्यावर त्याचें भावी स्वत्व अवलंबून राहणार हें उघड आहे. म्हणूनच मनुष्यास पशूपेक्षां दीर्घ काल पितृशासनाखालीं रहावें लागतें. पशूची पालक केवळ त्याची माता असते म्हणजे आपल्या अपत्याच्या शारीरिक दुबळेपणाच्या अवस्थेंत त्याचें कसेंबसें पोषण करून थोड्याच काळानंतर पशूची माता त्याला अफाट जीवन कलहाच्या लाटांवर लोटून देते. पण मनुष्याचें याप्रमाणें एकाच पालकाच्या मदतीनें भागत नाहीं. कुमारदशेचीं पांच वर्षें आईच्या संगोपनाखालीं काढल्यावर पुढें पौगंड आणि किशोरदशेचीं दहा वर्षें मुलाला आपल्या बापाच्या पालकत्वाखालीं घालवावीं लागतात. म्हणून पशूला नुसती आई तर मनुष्याला आई आणि बाप अशा दोन पितरांची नैसर्गिक योजना झाली आहे.

याप्रमाणें आपल्या अपत्यास स्वत्वाचें अथवा मनुष्यत्वाचें प्रदान करण्यासाठींच जर पितृशासन हृ आहे तर स्वत्वाची पूर्ण तयारी होण्यापूर्वीं कोणाही व्यक्तीस पितृत्वाची अवस्था प्राप्त होणें हें अत्यंत अनिष्ट आहे हें निराळें सांगावयास नकोच. स्वतःचीच किशोरदशेंतून सुटका होते न होते तोंच ज्यांच्यावर पितृत्वाची पाळी येते, त्यांच्याकडून होणाऱ्या पितृशासनाची महती गाथी तितकी थोडीच. या न्यायानें पाहूं गेलें असतां जें राष्ट्र विद्वान् पिढ्या आज कित्येक सहस्र वर्षें हें भ्रूणहत्येचें पातक करीत आलें, इतकेंच नव्हे तर त्यानें त्या पातकांस आपल्या शास्त्रांतही भरपूर आधार करून ठेविला आहे, तें राष्ट्र कायमचें स्वत्वहीन बनलें तर त्यांत नवल तें काय ?

पितरांनीं आपल्या अंगीं पूर्ण व्यक्तित्व संपादन केल्यानंतर पुढें आपल्यास जें शासन द्यावयाचें तेंही त्याचे ठिकाणीं जें कांहीं बीजभूत व्यक्तित्व असेल त्याचाच पूर्ण परिपाक व्हावा एवढ्याकरितांच. केवळ आढ्यता मिळविण्याकरितां नव्हे. शासनांच्या अतिरेकामुळें किंवा दुरुपयोगामुळें अपत्यांतलि व्यक्तित्वाचीं बीजें करपून जाणार नाहींत किंवा चिरडून जाणार नाहींत अशी सतत खबरदारी पितरांनीं घ्यावी. इतकेंच नव्हे तर त्या बीजांची वाढ झपाट्यानें व्हावी म्हणून सर्व वाटा पदोपदीं कुशलतेनें मोकळ्या ठेवणें याकडेही नजर दिली पाहिजे. अपत्याच्या इच्छेवर शासनाचें जें काय दडपण टाकावयाचें असेल तें त्यास पुढें प्रौढपणीं आत्मसंयमन करण्याची संवय व्हावी एवढ्याचसाठीं. यापरतें अधिक दडपण शासनक्रियेंत मुळींच असतां कामा नये. शासन म्हणजे दडपण अशी शिशूची भावना सहसा होऊं न देतां उलट शासन म्हणजे एक प्रकारचें उत्तेजन आहे अशी भावना जो शास्ता शिशूंच्या ठायीं करीत राहील तोच खरा कुशल, आणि पूज्यपादारविंद पिता होय.

यावरून पितृत्वाची जबाबदारी किती थोर, किती कठिण आणि किती पवित्र आहे, हें दिसून येईल. अपत्यें म्हणजे देवानें आपणांस दिलेलीं खेळणीं नव्हत, किंवा आपल्या निपुत्रिक मित्रापुढें दिमाखानें दाखविण्याचे दागिने नव्हत किंवा ( आपण मरून गेल्यावर ) मागें तिळांजळीच्या द्वारें स्वर्गांत आपणास जीवन पोंहोंचविणारे गुमास्ते नव्हत, किंवा आपल्यामागें कांहीं तरी लागलेलीं लिगाडें नव्हत, तर अत्यंत मंगल ईश्वरी नियमाप्रमाणें तीं आपल्यामागें उरणारी आपली कीर्ति होत; आपलें खरें अमृतत्व होत, ' स्त्रिया पोरें वंचक चोरें ' ह्या रानटी वचनांत काव्य नाहीं तें नाहींच, उलट अडाणीपणा मात्र भरलेला आहे. कारण पोरें बापडीं कधींच चोरें असूं शकणार

नाहींत. तीं, आम्हीं चोर आहों कीं साव आहों, हें कसोटीस लावून दाखविणारे देवदूत आहेत.

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा ।
पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ।
तूं माझी माउली मी तुझें वासरू ।
नको पान्हा चोरू पांडुरंगे ॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस ।
तोडीं भवपाश पांडुरंगे ॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज ।
चारा घालीं मज पांडुरंगे ॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ ।
मागें पुढें उभा सांभाळिसी ॥

ही नामदेवाची प्रेमळ प्रार्थना आम्ही ईश्वराजवळ किती सहज रीतीनें करूं बरें ! पण ईश्वरास प्रेमाचा पान्हा मागण्यापूर्वी आम्ही आपल्या तान्हुल्यांना स्वत्वाचा पान्हा दिला आहे कीं नाहीं, हें पहावयाला नको कां ? नुसते लाड, कोड, कौतुक आणि फुकट मिळालेल्या धनाचा वारसा दिल्यानें आम्हीं अपत्यांना स्वत्वाचा पान्हा दिला असें होत नाहीं. तो देण्यास चुकून, पुनः ईश्वरास प्रेमपान्हा आम्हीं कोणत्या तोंडानें मागावा ? ईश्वरापुढें आम्हीं प्रेमपान्हा मागत असूं, वा नसूं आमच्या पुढें आमचीं अपत्यें तो नित्य मागत असतात यांत संशय नाहीं. किशोरदशा संपेतोंपर्यंत अपत्यांना स्वत्वाचा पान्हा मातापित्यांनीं स्वतः देऊन पुढें त्यांना तरुण दशा प्राप्त झाल्यावर गुरुगृहीं गुरुशासनासाठीं धाडावयाचें असतें. त्यापूर्वी उपनयन होऊं शकत नाहीं. यानंतर गुरूनें आपली जबाबदारी कशी पाळावी आणि पुढें पोक्त आणि पौरुषशाली व्यक्तीस राजदरबारी पाठविल्यावर तेथें त्यांस तिसरें शासन कसें मिळावें याचा विचार पुढें क्रमाक्रमानें करूं.

## गुरुशासन.

( रविवार ता. २३-१०-१० रोजीं मुंबई प्रार्थनामंदिरामध्यें केलेल्या उपदेशाचा सारांश. )

मागें पितृशासनासंबंधीं विचार करीत असतांना असें सांगण्यांत आलें होतें कीं, प्राचीन काळीं शासनसंबंधीं सर्व अधिकार पित्याकडेच होते. पित्याची सत्ता पुत्राच्या मालमत्तेवरच होती, इतकेंच नव्हे तर प्राणावरही चालत असे. समाज अधिकाधिक उन्नत दशेप्रत जसजसा जाऊं लागला, तसतशी मनुष्याच्या कर्तव्याची व्याप्ति आणि गरजा अधिकाधिक वाढून व साहजिकच वरील शासनाची विभागणी होत जाऊन, एका पित्याच्या ठिकाणीं पिता, गुरु आणि राजा असे तीन शासनाचे अधिकारी झाले. तथापि सर्व शासन पितृमूलक आणि पुत्रवात्सल्याच्या उदार हेतूनेंच प्रेरित असतें आणि असावयास पाहिजे असेंही सांगितलें. तसेंच मनुष्येतर खालील प्राण्यांमध्यें बाल्यावस्थेचा काळ फार अल्प असून, मनुष्याचें बाळपण मात्र दीर्घकालचें असतें; याचें कारण पशूपेक्षां मनुष्यामध्यें अधिक उन्नत स्वत्वाचा अथवा पौरुषाचा विकास व्हावयाचा असतो; म्हणून त्याला आपल्या पितरांच्या शासनाखालीं अधिक काळ रहावें लागतें, असें सांगितलें. बाल्यावस्थेची शेवटची पायरी किशोरदशा पंधरा वर्षांपर्यंत असतें, असें शास्त्र सांगतें. पण इतक्या अवधींत मनुष्याची शासनाची आवश्यकता संपत नाहीं. यापुढील दहा पंधरा वर्षांचा यौवनावस्थेचा काळही त्याला शिष्यदशेंत घालावयाचा असतो. हें पुढील शासन अधिक विशिष्ट अधिकाराचें आणि जबाबदारीचें असल्यामुळें, *शिष्यास पितृकुलांतून गुरुकुलांत जावें लागतें.* आणि तेथें गुरूच्या आश्रेत राहून त्यांच्यावर निश्चल श्रद्धा आणि आदरभाव ठेवून भावी स्वत्वसंपत्तीकडे मजल मारावयाची असते.

निरनिराळ्या देशांतील प्राचीन धार्मिक वाङ्मयामध्यें मुक्ति अथवा मोक्ष ( Salvation ) असा शब्दप्रयोग आढळतो. पण आधुनिक वाङ्मयामध्यें या शब्दयोजनेचें महत्त्व कमी कमी होत जाऊन स्वातंत्र्य आणि स्वत्वाची अभिवृद्धि अशी योजना अधिकाधिक आढळण्यांत येते. यद्यपि हे दोन्ही प्रयोग शब्दतः भिन्न आहेत तथापि सूक्ष्म विचार केला असतां अर्थतः यांच्यामध्यें ऐक्य आहे, असें दिसून येईल. एकूण मनुष्यप्राणी उत्तरोत्तर परिस्थितीच्या गुलामागिरींतून सुटका पावून त्याच्या आत्म्याच्या ठायीं ज्या गूढ आणि थोर शक्ति आहेत, त्यांचें संपादन करून तो पूर्ण स्वतंत्र व्हावा

हाच हेतु मनुष्यजीवनाच्या विकासाचा आहे आणि म्हणून गुरुशासनाची आवश्यकता आहे मातेच्या अंकावर केवळ शरीराचें पोषण होतें, पितृगृहीं मनाची पूर्व तयारी होते आणि गुरुगृहीं बुद्धीचा विकास होतो; असें होईपर्यंत मनुष्यप्राणी नागरिकत्वाचे हक्क संपादन करून राजाची प्रजा ह्मणविण्यास पात्र होत नाहीं.

अशा प्रकारें बुद्धीचा विकास करण्याचे कामीं गुरु कसा असावा व त्याचें लक्षण काय? हें वामनपंडितांनीं प्रल्हादाचे तोंडीं घालून मार्मिक रीतीनें वदविलें आहे. हिरण्यकश्यपूनें प्रल्हादास पुष्कळ दिवसांनीं गुरुगृहांतून बोलावून तेथें जें शिकलास त्याचें सार काय, असें विचारितां प्रल्हादानें 'हरिभक्ति' असें चमत्कारिक उत्तर दिलें. हें शिक्षण कोणत्या गुरूनें दिलें असें हिरण्यकश्यपूनें विचारितां प्रल्हादानें उत्तर केलें:—'ज्या गुरूकडे मला ठेवण्यांत आलें होतें त्यांच्यामध्यें गुरुपणाच नव्हता.'

सार मानित असे विषयातें।
विष्णुभक्ति गमते विष यातें॥
न स्वयें हरि तया प्रिय वाटे।
बोधिला तरि न येचि सु-वाटे॥
सर्व प्रयत्नें भवती गृहातें।
न सेविती भागवतां महा ते॥
गृहव्रती ते, मति त्या जनांची।
न गोष्टिही घे भव-भंजनाची॥
हे तों गुरू पापतरू म्हणावे।
अंधासवें अंध तसे गणावे॥
दे प्रीति कृष्णीं गुरु तोच साच।
श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच॥
पशू जसे चाविति चाविल्यातें।
पुनःपुन्हा सेविति सेविल्यातें॥
कृष्णीं नव्हे प्रीति कदापि त्याला।
प्रल्हाद इत्यादि वदे पित्याला॥

एकूण ज्या गुरुमुळें ईश्वराचे ठायीं प्रीति उत्पन्न होते तेच गुरु साच. बाकी सर्व अंध किंवा पापतरु असा स्पष्ट निवाडा केलेला आहे. गुरूचें काम म्हणजे शिष्यास ध्येयदर्शन करून द्यावयाचें; पण गुरु जर स्वतः केवळ 'गृहव्रती' म्हणजे आपलेंच पोट भरणारा असेल, तर ध्येयाची गोष्टही काढावयाला नको. वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान करून देणारे कांहीं कुशल गुरु असतात. पण ते त्यांच्या कुशलतेमुळें केवळ कुशल कारागीर होत. केवळ त्यांच्या कौशल्यामुळें त्यांना गुरुत्व येतें असें नव्हे. वस्तुस्थितींतून (Realism) वर उंच ध्येयाकडे (Ideal) शिष्याचा लय जो लावील,—साध्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे ईश्वरपदीं जो प्रीति उत्पन्न करून देईल—सांत जीवनांतून अनंत जीवनाकडे, तात्पुर्तिक कर्तव्यांतून चिरकालच्या कर्तव्याकडे, नैमित्तिक धर्मांतून सनातन धर्माकडे जो नेईल, तोच गुरु. पण 'न गोष्टिही घे भवभंजनाची' असे जे पोटार्थी पंतोजी त्यांच्याकडून हें महत्कार्य कसें होणार? हल्लींच्या काळीं धर्म आणि नीतिशिक्षणाविषयीं जगभर शाब्दिक चळवळ चालली आहे. कित्येक लोक कित्येक उपाय सुचवीत आहेत. पण हा प्रश्न कोणत्याही बाह्य उपायांनीं सुटण्यासारखा नाहीं. गुरु हे उपजत गुरु असावयास पाहिजेत. त्यांना ध्येयदर्शन झाल्याबरोबर त्याचें प्रतिबिंब शिष्यांतःकरणामध्यें पडल्याशिवाय राहणार नाहीं. एरवीं लिहिणें, वाचणें, आणि बोलणें याची कला शिकविणारे आणि तसेच इतर संसारोपयोगी हुन्नर शिकविणारे कारागीर मिळतील. पुष्कळ वेळां हेही मिळत नाहींत.

पिता, गुरु आणि राजा ही जी शासनाधिकाराची परंपरा आहे तिच्यामधील साम्यभेद लक्षांत घेण्यासारखे आहेत. पिता हा केवळ त्या त्या व्यक्तीपुरताच असतो. उलट पक्षीं राजा हा कधींही एकाच व्यक्तीपुरता नसतो. तो नेहमींच सार्वजनिक असतो. मध्यंतरीं गुरु हा व्यक्तीपुरता किंवा अनेक व्यक्तिसमूहाचा एक, असा असतो. त्याच्याशीं शिष्याचा व्यक्तिशः संबंध असतो किंवा केव्हां केव्हां नसतोही. किंबहुना गुरूच्या ठिकाणीं कोणती एखादी विशिष्ट व्यक्ति मुळींच नसून तेथें एखादें विद्यापीठ किंवा कोणती तरी एखादी संस्था असते. पिता आणि गुरु यांमध्यें जरी हा भेद आहे तथापि त्यांच्यामध्यें हें साम्य आहे कीं, ज्याप्रमाणें पितापुत्राच्या मनांचा प्रत्यक्ष संबंध जडतो त्याचप्रमाणें गुरुशिष्याचाही प्रत्यक्ष संबंध (Personal touch) जडला पाहिजे. तरच गुरु-

शिष्याचें नातें सार्थ होतें. यावरून आपल्याला झालेलें ध्येयदर्शन शिष्यास करून देण्याचे कामीं प्रत्यक्ष संबंधाशिवाय अन्य उपाय नाहीं हें दिसून येईल; आणि आपल्यांत ध्येयदर्शन नसेल तर शिष्याशीं कितीही निकट संबंध जडला तरी त्याला प्रत्यक्षता येत नाहीं.

या प्रत्यक्ष संबंधाच्या दोन बा आहेत. जसा गुरूकडून तसाच शिष्याकडूनही प्रत्यक्ष संबंध जोडण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. 'हे आमचे गुरूच नव्हत' असे म्हणणारे सारे प्रल्हादच असतात असेंही नव्हे. भल्या गुरूची कदर न ओळखणारे फटकळ उनाड विद्यार्थी पुष्कळ आढळतील. उलट पक्षीं प्राचीन काळीं होऊन गेलेले सॉक्रेटीस, प्लेटो, शंकराचार्य आणि बुद्ध यांच्यांशीं तन्मयता पावून त्यांचा आदर्श तो आपलासा करून घेऊन स्वतंत्र अथवा मुक्त होणारेही कांहीं भले शिष्य आढळतील. ह्यावरून प्रत्यक्ष संबंध जोडून ध्येयदर्शन करून देणें आणि घेणें हा परस्परावलंबी व्यवहार आहे. गुरूचें शासन आणि शिष्याची निष्ठा हीं एकमेकांचीं कार्यकारणें आहेत.

या ठिकाणीं ब्राह्मसमाजाची एक सूचना ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. योग्य गुरूशीं गांठ पडून शिष्याचें कल्याण झाल्याबरोबर त्या शिष्याकडून किंवा त्याच्या अनुयायाकडून या गुरूच्या स्वरूपाविषयीं गैरसमज होण्याचा पुष्कळ वेळां संभव आहे. आणि ज्या ज्या मानानें हा गुरु जास्त अलौकिक असतो त्या त्या मानानें हा वरील गैरसमजाचा संभव जास्त वाढतो. हा गुरु म्हणजे ईश्वर आणि मनुष्य यांमधील कोणी अद्वितीय आणि अपरिहार्य मध्यस्थ किंवा ईश्वराचा कोणी अवतार किंवा प्रतिनिधि किंबहुना त्यास प्रति ईश्वरच समजून ईश्वर आणि तो हे दोन असून एक आणि एक असून, दोन अशा प्रकारच्या अनेक गूढ तत्त्वज्ञानाचा सुकाळ होऊं लागतो. ब्राह्मसमाजाचें सांगणें एवढेंच आहे कीं, ईश्वरास योग्य असलेली पूजा ईश्वरास द्यावी आणि गुरूस द्यावयाचा मान तोच गुरूस द्यावा. गुरु कितीही अलौकिक असला तरी त्याचें मनुष्यत्व हिरावून घेऊन त्याला उंच ईश्वरपदाची दक्षणा दिल्यानें, ना कधीं शिष्याचें, ना गुरूचें, ना जगताचें कल्याण होईल.

---

## राजशासन.

( रविवार ता.४–१२–१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश. )

प्रार्थनासमाजासंबंधीं कित्येक समंजस लोकांचा असा एक आक्षेप येतो कीं, प्रार्थनासमाज हा ईश्वराचा अवतार मानीत नाहीं. जुन्या धर्मांच्या कित्येक समजुती प्रार्थनासमाजानें सोडलेल्या आहत, त्या असोत. पण ईश्वराचा अवतार मुळीं न मानण्यामध्यें प्रार्थना समाज सर्व साधारण धार्मिक भावनेचें एक मुख्य अंगच मानीत नाहीं आणि त्यामुळें समाजांत प्रवेश करण्यास मोठी खरोखर अडचण येते अशी या आक्षेपकाची तक्रार असते. विचार करून पाहिलें असतां या तक्रारीस जागा नाहीं. अवतारवादास प्रार्थनासमाजानेंच काय, किंबहुना आधुनिक उदार धर्माभिमान्यांपैकीं कोणीही आजिबात फाटा दिला आहे असें मुळींच आढळून येणार नाहीं. परमेश्वर सावयवरूपानें अवतार घेत नाहीं, एवढेंच प्रार्थनासमाजाचें म्हणणें आहे. येशूख्रिस्त किंवा राम, कृष्ण इत्यादि ऐतिहासिक किंवा पौराणिक व्यक्ति तेवढयाच ईश्वराचे अवतार अशी आकुंचित कल्पना उदारधर्मवाद्यांस पटत नाहीं; परंतु अदृश्यरूपानें सर्व विश्व व्यापून रहाणारा परमात्मा हळू हळू विश्वामध्यें आपलें सात्त्विक, मंगलमय आणि शक्तिशाली स्वरूप उघड करीत आहे, असा अनुभव उदारधर्मवाद्यांसही येत आहे. आणि या दृष्टीनें अवतारवादाचें अधिक विस्तृत, पूर्ण आणि सार्थ स्वरूप त्यांना मान्य आहे असें समंजस लोकांस सहज दिसून येईल.

धर्म आणि नीतिशिक्षणाच्या संबंधानें हल्लीं जी विशेष चर्चा चोहींकडे चालू आहे तिला अनुलक्षून मागें पांच सात खेपेला विनययोग आणि शासनयोग या मथळ्याखालीं आम्ही या पीठावरून जी विवेचनमालिका गुंफिली तिचाही रोख या वरील विस्तृत अवतारवादाचें पर्यायानें उद्घाटन करण्याचाच होता. पितृशासनाविषयीं

विचार करीत असताना आपण पाहिलें कीं, आपल्या पोटीं उत्पन्न झालेल्या मांसाच्या गोळ्याचें माता चारपांच वर्षांची त्याची कुमार-दशा संपेतोंपर्यंत शारिरिक संरक्षण करते आणि पिता दहा पंधरा वर्षांची त्याची किशोरदशा संपेपर्यंत त्याची मानासिक जोपासना करून त्याची पुढील वाढ त्याच्या गुरुकडे सोंपवितो. गुरुगृहीं त्याच्या बुद्धीची वाढ होऊन पंचवीस तीस वर्षांचा प्रौढ पुरुष होऊन ससार भूमिकेवर प्रवेश करतो. अशारीतीनें क्रमाक्रमानें व्यक्तीच्या स्वत्वाची वाढ होते. जड सृष्टींतून सजीवसृष्टि, सजीव सृष्टींतून ज्ञानवान् मनुष्ययोनि, आणि त्या योनींतील वरील क्रमानें प्रौढ दशेप्रत प्राप्त झालेल्या व्यक्ति अशी ही सृष्टीची हळूहळू सततची उत्क्रांति चाललेली आहे. ज्यास प्राचीन धर्मतत्त्वज्ञानामध्यें अवतारवाद असें नांव होतें त्यासच आधुनिक वाङ्मयामध्यें विकासवाद हें नांव हळूहळू येत चाललें आहे. विकास म्हणजे पूर्वी जी वस्तूंची साधी घटना असते, ती उत्तरोत्तर अधिकाधिक संकलित होत जाणें एवढाच अर्थ नव्हे तर, त्या घटनेमध्यें पूर्वी अदृश्य असलेलें सूक्ष्म पण कार्यकारी असें कांहीं एक नवीन तत्त्व उघडकीस येत असतें, अशी आधुनिक विकासवाद्यांची समज पडत चाललेली आहे आणि तेणेंकरून प्राचीन अवतारवादाला जशी अधिकाधिक विशदता येत आहे, तशीच आधुनिक विकासवादाला अधिकाधिक भरींवता येत चाललेली आहे. किंबहुना अवतारवाद आणि विकासवाद यांची तोंडमेळणीच होत चाललेली आहे. ' यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ ' हें श्रीकृष्णाचें म्हणणें जितकें अवतारवादाचें द्योतक आहे, तितकेंच विकासवादाचें ही आहे.

अशा, यामप्रमाणें विश्वविकासाची मजल मनुष्ययोनींतील प्रौढव्यक्तीपर्यंत आल्यावर यापुढें दुसरीच महत्त्वाची एक मजल सुरू होते. व्यक्तीच्या स्वत्वाची पूर्ण वाढ झाल्यावर या प्रौढव्यक्तीच्या लेहानें मोठ्या घटना बनून यापुढें समाजाच्या अथवा राष्ट्राच्या स्वत्वाची वाढ सुरू होते. म्हणजे जीवनशास्त्र आणि मानसशास्त्र या नंतर समाजशास्त्राच्या विषयास आरंभ होतो. नुकतेच हिंदुस्थानांतून प्रवास करून गेलेले मि. रामसे मॅकडोनल्ड यांनीं राजसंस्थेची व्याख्या खालील दोन साध्या वाक्यांनीं केलेली आहे. " The state is the organised political personality of a sovereign people—the organisation of a community for making its common will efficient by political methods " राजसंस्था म्हणजे स्वतंत्र राष्ट्राचें संघटित स्वत्व—अथवा जिच्याद्वारें राजकीय पद्धतीनें एखाद्या राष्ट्राची सामान्य इच्छा अथवा हेतु परिपूर्ण करितां येईल अशी त्या राष्ट्राची घटना हीं होय. यावरून व्यक्तीची वाढ होण्याला ज्याप्रकारें पितृशासनाची आणि गुरुशासनाची जरूरी आहे, त्याचप्रकारें राष्ट्राचें स्वत्व संपादण्याला राजशासनाची जरूरी आहे, मग तो राजा एकमुखी असो, बहुमुखी असो किंवा सर्वांचें हितसंबंध राखणारी प्रतिनिधींची सभा असो, त्याचें शासन हें एकच. आणि त्याची जरूरी ही सारखीच आहे.

आतां ह्या ठिकाणीं हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे, कीं व्यक्तीच्या स्वत्वाची वाढ पूर्ण झाल्यावर मग राष्ट्राच्या स्वत्वाच्या वाढीला सुरुवात होते, अशांतला मुळींच प्रकार नाहीं. म्हणजे पितृशासन आणि राजशासन ह्या गोष्टी एका व्यक्तीच्या बाबतींत जरी एका मागून एक अशा येतात, तरी सर्व राष्ट्राच्या दृष्टीनें पाहतां त्या तिन्ही एकाच काळीं चालल्या असतात. इतर पशुजातींहून मनुष्यजातीचा अधिक विकास होऊन तिची राहणी अधिक उन्नत पायावर सुरु झाल्या काळापासून ह्या तिन्ही शासनांची अंमलबजावणी समकालीनच होत आली आहे. किंबहुना व्यक्तीचें स्वत्व (Personality) आणि राष्ट्राचें स्वत्व ह्या दोहोंची वाढ अगदीं एकमेकांपासून अलग राहून होणेंच मुळीं अशक्य आहे. प्रस्तुत पुढारी व्यक्तींच्या प्रौढपणावर जसा राष्ट्राचा प्रौढपणा अवलंबून आहे तसाच राष्ट्राच्या प्रस्तुत प्रौढपणावर भावी व्यक्तींचा प्रौढपणाही अवलंबून आहे. गुरुकुलांतून किंवा युनिव्हर्सिटींतून तरुण शिष्य पदव्या मिळवून बाहेर पडतात, आणि मग ते राष्ट्रीय भूमिकेवर देशकार्यासाठीं सज्ज होऊन उभे राहिल्यावर त्यांच्या निरनिराळ्या कमी अधिक तेजस्वी स्वत्वांच्या अंशांचें संकलन

होऊन त्यांतून राष्ट्राचें स्वत्व किंवा राष्ट्रभूति निर्माण होते. म्हणजे थोर थोर राजे सम्राट्, मुत्सद्दी, योद्धे आणि वकील ह्यांच्या व्यक्तिविषयक स्वत्वाचा सुसंस्कार सर्व जनतेच्या शीलावर व आचारविचारांवर घडून त्यांचें स्वत्व बनूं लागतें. ह्या थोर पुरुषांच्या शासनछत्राखालीं पितृशासन आणि गुरुशासनाच्या संस्था सुयंत्रितपणानें चालू राहून त्या हळूहळू सुविकासित होत जातात. परंतु उलट पक्षीं हेंही खरें आहे कीं शासित जनतेच्या गुणदोषाचा संस्कार शास्त्यांच्या मनावरही घडतो. शासन शकट चालवीत असतां मार्गांत त्यांना यशापयश, आशानिराशा, उल्हास आणि उद्वेग इ. भिन्नभिन्न जे अनुभव येतात, त्यामुळें त्यांच्या स्वतःच्या स्वत्वाला अधिक भरींवपणा येत जातो. पितृगृहीं आणि गुरुगृहीं शिकत असतांना जे अनुभव केवळ पर्यायानें आणि आदर्शरूपानें घडत होते, ते आतां प्रत्यक्षपणें आणि वस्तुरूपानें घडूं लागल्यामुळें ह्या थोर शास्त्यांच्या स्वत्वाला केवळ अधिक भरींवपणा येतो इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष जगताशीं झगडत असतां जे अश्रुतपूर्व व अकल्पित अनुभव येतात त्यामळें त्यांच्या स्वत्वास नवीनपणाही येतो आणि पुनरपि शास्त्यांच्या ह्या नवीन आणि भरींव स्वत्वाचा सुसंस्कार शासित जनतेवर घडून त्यांच्याही मनाची वाढ होऊं लागते. असा हा परस्पर गुंतागुंतीचा सुंदर संबंध आहे. आणि ह्या मानानें शासनक्रियेची जबाबदारी प्रत्यक्ष किंवा प्रतिनिधीरूपानें जनतेतील अधिकाधिक व्यक्तींवर पडत जाते. त्या मानानें वरील गुंतागुंतीचा व्याप आणि सौंदर्य ही अधिकाधिक वाढत जातात.

असो. 'शासनाचे' हे सर्वही प्रकार केवळ प्रगतीच्या साधनीभूत पायऱ्या आहेत; ह्या सर्वांचें अन्तिम साध्य व्यक्तीचें स्वत्व आणि तद्द्वारा राष्ट्राचें व मनुष्यजातीचें स्वत्व आणि पुन: त्याच्या द्वारा व्यक्तीचें स्वत्व ह्यांची परंपरित वाढ होणें हेंच आहे. अशी एक म्हण आहे कीं मुलगा १६ वर्षांचा झाला कीं, त्याच्या बापाचा जोडा याच्या पायाला येतो. हिचा अर्थ इतकाच कीं १६ वर्षांनीं बापाचें मुलावरचें राज्य संपून त्याच्या तो बरोबरीचा होतो. दुसरें असेंही एक वचन आहे कीं 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' म्हणजे गुरुपासून विद्या शिकून चेला गुरूहूनही सवाई शहाणा झाला आणि त्याकडून गुरूचा पराजय झाला, तर उलट गुरूच्या शासनाचें सार्थक झालें, किंबहुना त्याचा दिग्विजयच झाला म्हणावयाचा. हाच न्याय राजशासनाचाही आहे. प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य मिळावें व ती पूर्ण स्वत्ववान् बनावी हाच हेतु राजशासनाचा आहे व त्याचा परिणामही असाच होत आला आहे, हें इतिहास सांगेल. राजशासनाच्या तालमींतून गेल्याशिवाय व्यक्तीची पूर्ण वाढ होणें शक्य नाहीं. ज्या व्यक्ती किंवा जाती जंगलांतून स्वैर भटकत असतात त्यांच्या अंगीं परिस्थितीशीं झुंजण्याचें सामर्थ्य आलेलें नसतें. पण त्याच व्यक्ती आणि जाती युगानुयुगें समाजाची उत्तम घटना करून शासनछत्राखालीं आपलें योग्य स्वत्व संपादन करितात त्यांना अखेरीस परिस्थितीवर जय मिळतो, इतकेंच नव्हे तर पुढें शासनाचीही जरूरी राहत नाहीं. पोलीस आणि लष्कर हीं राजसंस्थांचीं कायतीं दोनच खातीं राहावींत, बाकीचीं सर्व खातीं लोकांनीं आपलीं आपणच स्थानिक पद्धतीनें संभाळावींत असें प्रसिद्ध समाजशास्त्रवादी स्पेन्सर ह्यांनीं प्रतिपादिलें आहे. तुलनात्मक समाजशास्त्राचें नीट परिशीलन केल्यास दिसून येईल कीं, एकच्छत्री राजसंस्थाची घटना कांहीं मोठमोठ्या प्रमाणावर होत जाऊन अवाढव्य बादशाह्या अस्तित्वांत आल्या. त्यांच्या योगानें व्यक्तीच्या स्वत्वाला त्या त्या काळीं मदत झाली. पण ही वाढ पुढें खुंटून राजसंस्थेचीं लहान लहान मंडळें आणि त्यांची संयुक्त मंडळें बनणें अधिक इष्ट झालें हें हल्लींच्या अमेरिकेंतील संयुक्तसंस्थानांच्या इतिहासावरून उघड होईल. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड इ. स्थानिक स्वराज्याच्या विस्ताराच्या बाबतींत मोठमोठ्या अजस्र शहरावर व प्रांतावर एकाच मंडळीचें अवजड छत्र चालू ठेवून पुष्कळ प्रतिनिधींना निवडण्याच्या धांदलींत काळाचा व शक्तीचा उगीच व्यय करण्यापेक्षां आळी आळीनें स्वतंत्र म्युनिसिपालिट्यांची स्थापना करणें हेंच पुढें बहुत करून अधिक सोईचें आणि प्रगतीला शोभणारें होणार आहे. एकंदरींत या दृष्टीनें विचार करितां दिसून येतें कीं व्यक्ती आणि सर्व मनुष्यजात राजशासनाच्याही पायरीवर चढत जाऊन पूर्णत्व पावणार आहे. ज्या पूर्णावस्थेच्या काळाची

प्रतीक्षा आधुनिक द्रष्टे करीत आहेत आणि ज्या मोक्षपदाची, निर्वाणाची अथवा स्वराज्याची (Kingdom of God) प्राचीनद्रष्ट्यांनीं आकांक्षा केली त्या सर्वांचा अर्थ हेंच स्वत्व होय. आणि ह्या स्वत्वाचें सर्वत्र प्रगट होणें म्हणजेच परमेश्वराचा पूर्णावतार होणें हें होय. बाकी सर्व– " विभूतिमत्सत्त्वम् "–अंशावतारच समजावेत ते नुसते " मम तेजोंशसंभवम् " असतात.

येणें प्रकारें जो विराट् पुरुष अनादिकालापूर्वी अदृश्य होता तो अनंतकालापुढें दिसूं लागणार आहे. अदृश्यांतून जड, त्यांतून चेतनामय व्यक्ती, त्याचे प्रौढ समाज, ह्याप्रकारें सर्व सत्त्वांची उन्नति–असें होत होत हल्लीं घोरत पडलेला सर्व मृत्युलोक पुढें जीवंत आणि जागा होणार ! त्या विश्व–जागृतीची कल्पना कोण करूं शकेल ! तिला काळाचें माप लागू पडत नाहीं म्हणूनच ब्राह्मधर्मानें अनंतकाळची उन्नति मानली आहे. ॐ शांतिः शांतिः शांतिः.

---

## धर्म आणि व्यवहार.

(ता. ६–११–१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

**केसीं दिसों वरीं। आम्हीं आळवितां हरि॥१॥**
**तुका म्हणे देवा–ऐसीं झालों करितां सेवा॥२॥**

सर्व विश्वांतील व्यवहारांची मूलशक्ति जो परमेश्वर त्याला आळविल्यानें म्हणजे त्याच्या धोरणाकडे लय लावल्यानें आम्ही कशीं उत्तम दिसूं ? फार काय पण, त्या शक्तीची सेवा करूं तर–म्हणजे तिला अनुसरून आपलें सर्व लहानसान व्यवहार करूं तर आमच्यांतील जी लहानशी प्राणशक्ति आहे ती 'देवा ऐशी' म्हणजे त्या विश्वशक्तीप्रमाणेंच मंगलकारक आणि समर्थ होईल ? हा तुकारामाचा उद्गार आहे. तो आम्हांला किती पटतो तें पाहूं.

वेळोवेळीं आमच्या मनामध्यें उचंबळणाऱ्या धार्मिक प्रवृत्ति आणि संसारामध्यें आमच्या हातून निरंतर घडणारे व्यवहार ह्या दोन गोष्टी परस्परांपासून अगदीं स्वतंत्र राखाव्या किंवा त्यांची भेसळ होऊं द्यावी ह्याविषयीं पुष्कळांचा बराच मतभेद होतो. एक पक्ष म्हणतो आम्हीं आपल्या धार्मिक प्रवृत्तींचा विकास स्वतंत्रपणें करून घ्यावा हें बरें. आपल्या धर्मसमजुती आम्हीं आपल्याशींच ठेवाव्या; फार तर आपल्या खासगी वर्तनाशीं त्यांचा संबंध आणावा. पण आपल्या सार्वजनिक वर्तनाशीं व कर्तव्याशीं त्यांचा संबंध आणणें हें फार धोक्याचें व चुकीचें आहे. राजकारण, समाजबंधन, उद्योग, व्यापार, लोकशिक्षण इत्यादि मनुष्यांच्या सार्वजनिक व्यवहारांचें सुधारलेल्या देशांतून ज्यापाट्यानें बदलत चाललेलें धोरण पाहिलें असतां सहज एक गोष्ट बिनचूक लक्षांत येते, ती ही कीं, ह्या सर्व व्यवहारांतून धर्मसंस्थाचा संबंध आणि धर्म समजुतीचा पगडा एकसारखा कमी कमी होत आहे. हा घटस्फोट कोठें कोठें जुलूमजबरीनें, कोठें कोठें हाशीखुशीनें तर कोठें कोठें अगदीं नकळत आपोआप स्वाभाविक कारणांनींच होत चालला आहे. यावरून हा पक्ष म्हणतो कीं, धर्मसंस्थांची आणि इतर संस्थांची फारकत होणें हेंच इष्ट आणि अवश्य आहे. दुसरा पक्ष म्हणतो कीं, या दोहोंमध्यें सांगड असावी.

या दोन्ही मतांचा इतिहास थोडक्यांत असा आहे. धर्माच्या बाह्य मतांचें आणि बाह्य आचारांचें प्राबल्य संसारांतील सर्व व्यवहारावर वाजवीपेक्षा जास्त वाढून संसारांत वेळोवेळीं हरकती येऊं लागल्या आणि त्याची प्रगति खुंटली, ह्यामुळें वरील पहिला पक्ष अस्तित्वांत आला. पण त्याचाही अतिरेक दिसूं लागल्यामुळें तडजोड करण्यासाठीं हा दुसरा पक्ष उत्पन्न झाला. परंतु वस्तुतः पाहतां धर्म आणि व्यवहार हीं स्वतंत्र ठेवावीत किंवा त्यांची सांगड घालावी असें म्हणणाऱ्या दोहों पक्षांसही ह्या दोहींचा अर्थ नीट कळला नाहीं असें दिसतें. ह्या दोहींची सांगड घालावयाची असें म्हणण्यामध्येंही, हीं दोन्हीं स्वतंत्र ठेवावीं असें म्हणण्याप्रमाणेंच, हीं दोन्ही परस्पर भिन्न आहेत, असा ध्वनि निघतो. हीं दोन्ही तर मुळींच भिन्न नाहींत. जसें, निरनिराळ्या भोपळ्यांची त्यांना दोरीनें एकत्र करून सांगड न घालतां पोहणारा त्यांना घेऊन पोहूं लागला तर ओघाबरोबर ते चोहींकडे वाहूं लागून पोह-

धारा मध्येंच बुडण्याचा संभव आहे, तसे धर्म आणि व्यवहार हे दोन भोपळे निराळे आहेत. आणि त्यांना सांगड घालून एकत्र केल्यानें आपल्याला सुरळीत पोहतां येईल. अशांतला प्रकार नाहीं. असें समजलें म्हणजे आपल्या जीवनाचीं—राजकारण, समाजबंधन, उद्योग, व्यापार आणि लोकशिक्षण हीं जशीं निरनिराळी खातीं आहेत, त्यांतच धर्म हें एक वेगळें खातें आहे. आणि त्यांमध्यें कांहीं विशेष जादू आहे, ती जादू त्या खात्याचा निरनिराळ्या खात्यांशीं संबंध लावून दिल्यानें त्या सर्वांमध्यें शिरून सर्व संसारयंत्र सुरळीत चालेल असें समजणें होय. पण हा भ्रम आहे. धर्म हें निराळें एक खातें मुळींच नसून व्यवहाराच्या निरनिराळ्या सर्व खात्यांच्या तळाशीं, मध्यें आणि शेवटीं व्यापून राहणारी आपल्यामधील ही वृत्ति आहे. शरीरांत सर्व अवयवांमध्यें प्राण जसा शिखाग्रापासून नखाग्रापर्यंत व्यापून राहतो—तो जसा एक निराळाच अवयव नाहीं किंवा त्याचें एक शरीरामध्यें विशिष्ट स्थान नाहीं—तद्वत् धर्मही आमच्या व्यवहारांत सर्वत्र निरंतर व्यापून राहणारी एक वृत्ति आहे. हिचा जसजसा दर्जा आणि जितका जितका जोर असतो तसतसें आमच्या सर्व व्यवहारांचें रंगरूप बदलत जातें.

ही वृत्ति मनुष्याचेच तेवढे सर्व व्यापार व्यापून आहे असें नाहीं. तर सर्व प्राणिमात्रांचे व्यवहार व्यापून आहे. मी परवां आमच्या निराश्रित साहाय्यकारी मंडळीची मनमाड येथील शाळा पहावयास गेलों होतों. तेथें प्रातःकाळीं ईश्वरोपासनेचा प्रसंग आला. मुलांनीं शाळेची झोपडी झाडून नीटनेटकी केली होती. मध्यभागीं एक लहानशी वेदी ठेवून तिच्यावर शुभ्र वस्त्र टाकलें होतें. झोंपडीभोंतालच्या बागेंतून रंगीबेरंगी ताजीं फुलें आणून वेदीवर पसरलीं होतीं. आमच्या उपासनेस सुरवात झाली. माझें लक्ष वेदीवरील फुलाकडे गेलें तों तेथें एक कोळी आपलें जाळें झपाट्यानें विणीत होता असें दिसलें. आमचें उद्बोधन स्तवन आणि प्रार्थना संपून उपदेशाची वेळ येई तोंपर्यंत कोळ्यानें वेदीचा पृष्ठभाग उतरण आणि आसमंतांतील भाग यांवर पसरलेल्या सर्व फुलांवरून आपलें विस्तीर्ण जाळें पसरून फुलांच्या वासानें येणाऱ्या लहान माश्या आणि चिलटें यांची मार्गप्रतीक्षा करीत तो स्वस्थ बसला होता आणि मुलें उपदेशाची वाट पहात बसलीं होतीं. आतां याहून उपदेशाला अधिक योग्य विषय तो कोणता असणार! आम्ही उपासना करीत असतांना आमच्या समोर प्रत्यक्ष आमच्या वेदीवर जाळें पसरणाऱ्या कोळ्याच्या व्यवहाराला जी वृत्ति कारणीभूत झाली होती ती, त्याचा धर्म आणि उद्बोधन, स्तवन आणि प्रार्थना करून ईश्वराकडे लय लावणाऱ्या आमच्या व्यवहाराला कारणीभूत झालेली उच्च वृत्ति ती आमचा धर्म यांप्रमाणें सत्त्वानुसार अधिकाधिक भिन्नभिन्न उन्नत व्यवहाराला कारणीभूत होणारी अधिकाधिक निरनिराळी खोल आणि विकसित वृत्ति असते. हाच धर्माचा आणि व्यवहाराचा अर्थ व त्याचा परस्पर अभेद्य संबंध आहे, हा त्या कोळ्याच्या उदाहरणावरून वस्तुपाठ माझ्या भोंवतीं आतुर होऊन बसलेल्या अर्थिकांना मीं दिला.

यावरून मनुष्यप्राण्यामध्यें इतर खालील सर्व प्राण्यांचें प्रतिबिंब प्रसंगवशात् दिसून येत आहे. खालपासून वरपर्यंत सर्व प्रकारचे व्यवहार तो निरनिराळ्या प्रसंगीं करीत असतो. आणि त्या निरनिराळ्या व्यवहारांत त्याची निरनिराळी वृत्ति व्यापून असते. म्हणजे तितके उच्च–नीच धर्म प्रसंगवशात् त्याच्यामध्यें वावरत असतात.

पण त्या उच्च–नीच धर्मांचें तारतम्य जाणण्याचीही आमच्यामध्यें शक्ति असते. तिच्या द्वारें आमच्यामध्यें आणि इतर प्राण्यांमध्यें फरक पडत जाऊन हेंच उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारें अनुसंधान आम्हीं कायम राखिल्यास शेवटीं तुकारामानें म्हटल्याप्रमाणें "देवा–ऐसी झालों" असें आमच्या अनुभवास येईल.

---

## प्रेरणा आणि प्रयत्न.

(रविवार ता० १८।९।१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

मनुष्य कसाही असो, ज्ञानी असो वा अज्ञानी असो, संपत्तिसुखसागरांत पोहणारा असो किंवा पापानें गांजलेला असो, त्याला कोणत्या ना कोणत्या प्रसंगीं तरी कमी अधिक प्रमाणानें ईश्वरी

प्रेरणा ही होणारच. मानवी मन आणि ईश्वरी प्रेरणा यांचा अपरिहार्य संबंध आहे. किंबहुना ईश्वरी प्रेरणेला पात्र असणें हेंच मानवी मनाचें लक्षण असेंही म्हणतां येईल. ज्यास कधींही दैवी प्रेरणेचा स्पर्श होण्याचा संभव नाहीं, तें मन पशूचें समजावें. अपवादादाखलही तें मनुष्यामध्यें आढळणार नाहीं. प्रेरणा या शब्दाचा आजच्या प्रसंगीं एवढाच अर्थ घ्यावयाचा आहे कीं, एकाएकीं अकल्पितपणें मनाची सुखमय स्थिति होऊन त्यांत आदर्शाचें दर्शन होणें. या दर्शनामुळें नेहमींच एखादा मोठा युगांतर करणारा ( Epoch making ) शोध किंवा विचार लाभतो असें नव्हे, किंवा 'न भूतो न भविष्यति' असा कांहीं अजब चमत्कार घडतो असेंही नव्हे, तर केवळ मनाची अनिर्वचनीय सुखमय स्थिति होऊन त्या वेळीं त्यास एखाद्या थोर ध्येयाचा साक्षात्कार होतो. या साक्षात्काराचें एक लक्षण असें आहे कीं, तो आपल्या कसल्याही प्रयत्नांनीं होत नाहीं व होण्यासारखा नसतो. कठोपनिषदामध्यें म्हटलें आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो
न मेधया न बहुना श्रुतेन ॥
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा
विवृणुते तनूँस्वाम् ॥

( हा आत्मा–आदर्श केवळ प्रवचनाच्यायोगें म्हणजे पुष्कळ सांगितल्यानें, किंवा बुद्धीच्यायोगें किंवा ऐकण्यानें मिळत नाहीं. ज्यावर त्याची कृपा होईल त्यालाच तो मिळतो. त्यालाच तो आपलें स्वरूप उघड करून दाखवितो. )

कठोपनिषद्, ३–२–२२.

या ठिकाणीं आधुनिक थिऑसॉफिस्ट किंवा सूक्ष्मवादी म्हणतील की, या प्रेरणेला यद्यपि आपला या जन्मांतील प्रयत्न कारणीभूत झालेला नसला, तथापि पूर्वजन्मांतील प्रयत्न कारणीभूत होत असावा. आणि आधुनिक मानसशास्त्रवेत्ते ( Psychologists ) सांगतात की, मनाच्या बाह्य आणि ज्ञात व्यापारांमुळें या प्रेरणेचा अनुभव घडलेला नाहीं, असें जरी भासलें तथापि कांहीं गूढ अंतर्व्यापारामुळें तरी तो घडत असला पाहिजे. ते व्यापार आपणास कळत नसले, तरी मुळींच घडत नाहींत असें म्हणतां येत नाहीं. पण या दोहों पक्षांचें म्हणणें कांहींही असो; उपनिषदांतील वरील उद्गाराची यथार्थता कमी होत नाहीं. कारण, या प्रेरणेच्या सुखमय स्थितीस आपला कोणताही तिच्यापूर्वी आपल्याकडून नुकताच झालेला प्रयत्न कारणीभूत होत नाहीं हें खरेंच आहे. पूर्वसंचितामुळें ती होवो, किंवा अंतर्व्यापारामुळें होवो, ती प्रेरणा इल्लीं आपल्यास आपोआपच प्राप्त झालेली आहे, अशी साक्ष आपलें मन आपल्यास देतें. जसें काय आपल्यासाठीं एखाद्या पिढींत अनामत ठेवलेल्या शिलकेचा वारसा असून, त्यावरील व्याज आपल्यास एकाएकीं मिळावें आणि आपली संकटांतून मुक्तता व्हावी, किंवा एखादा कार्यारंभ करण्यास मदत व्हावी असाच ह्या प्रेरणेचा प्रकार अनुभवाला येतो. तात्पर्य इतकेंच कीं, आदर्शदर्शन होण्याला आपले प्रयत्न कारण नसून, तें आपल्यास अकस्मात् घडतें.

पण ही प्रेरणा अथवा आदर्शदर्शन झालें म्हणजे सर्व कांहीं मिळविलें असें होत नाहीं. उलट यानंतर आपल्या खऱ्या आणि घनघोर प्रयत्नास सुरुवात व्हावयाची असते. कवीला एखाद्या कल्पनेची प्रेरणा झाल्यावर तिचा त्यास सारखा ध्यास लागतो, आणि त्या कल्पनेला शब्दसृष्टींतलें मूर्तस्वरूप देण्यास त्याला अविश्रांत श्रम करावे लागतात. केवळ प्रेरणा झाली एवढ्यावरूनच कोणी कवि बनतो असें नाहीं. प्रतिभा हें काव्याचें सर्वस्व असें जरी आहे, तरी ही प्रतिभा कमीअधिक मानानें सर्वांमध्येंच असते. कवीच्या अंतःकरणाची सहृदयता आणि त्याला अकस्मात् होणारी प्रेरणा हे दोन्हीही गुण मानवी मनास सामान्य आहेत. पण ज्या व्यक्तीमध्यें या गुणांशिवाय झालेल्या प्रेरणेस शब्दाचें सुंदर आणि कायमचें स्वरूप देण्याची अलौकिक शक्ति असते, तीच व्यक्ति प्रचारांत आह्मी ज्याला कवि म्हणतों त्याच्या पदाला पोहोंचते. हें मूर्तस्वरूप देण्याचें काम तडीस नेण्यासाठीं कवीला भाषा, व्याकरण, लोकरीति, मनुष्यस्वभाव, आणि अभिरुचि इत्यादि अनेक गोष्टींशीं सतत झगडावें लागतें. मूर्तिकाराचेंही असेंच आहे. प्रख्यात इतालियन मूर्ति करणारा मायकेल आंजेलो ह्यानें मनुष्याच्या आकृतीएवढी मोझेसची जी हुबेहुब मूर्ति केलेली रोम शहरामध्यें ठेविलेली

आहे, ती घडविण्याचे कामीं त्याला चाळीस वर्षे लागलीं असें सांगतात. इतक्या काळानंतर ज्या घाटाची अलौकिक मूर्ति घडविण्याचें श्रेय त्याला शेवटीं मिळालें, तिची हुबेहुब छाया प्रेरणेच्या रूपानें त्याला चाळीस वर्षांच्या आरंभींच दिसली असावी. ज्याप्रमाणें एकाद्या आधींच घडलेल्या मूर्तीवर चिखलाचा जाड आणि कठिण थर सांचलेला असावा आणि तो खरडून काढून आंतील मूर्ति उघडकीस आणावी; तशाच प्रकारचा अनुभव उत्तमोत्तम चित्रकारांना त्यांच्या सतत प्रयत्नांमध्यें येतो असेंही सांगतात. एखादी कल्पनेची छाया त्यांच्या मनावर ठसली म्हणजे मग ते जणूं काय आपल्यापुढें ठेविलेल्या संगमरवरी शिळेंतूनच तिला उकरून उघाडीस आणीत असतात. हाच प्रकार चितान्याचा, आणि हाच प्रकार संसारांत पुरुषार्थ साधणान्या प्रत्येक पुरुषाचा. ज्याप्रमाणें कवि धिमेपणानें हळूहळू पदरचना करतो, मूर्तिकार टाकीचे घाव मारतो, चित्रकार कलमाचे फटकारे ओढतो, त्याचप्रमाणें संसारपटावर पुरुषार्थसाधकही हळूहळू आपल्या ध्येयाकडे मार्ग क्रमीत असतांना प्रयत्नशः पावलें टाकितो.

प्रेरणा होत असतांना मोठें सुख होतें, पण प्रयत्न करीत असतांना घोर यातना होत असतात. प्रेरणेचा काळ मध्यरात्रीसारखा मनास मोहून टाकणारा; तेव्हां कोणत्याही रंगास जिल्हई येते; न्यूनें दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. प्रेरणेस कालावधि न लागल्यामुळें श्रमाची तर गोष्टच काढावयास नको. पण प्रयत्नाचें तसें नाहीं. यावेळीं मध्यान्हाचा प्रखर उजेड पडून सर्व रंग निस्तेज झालेले असतात, न्यूनें उघडीं होतात, पावलोपावलीं विलंब लागून मार्गप्रतीक्षा करावी लागते; अनिश्चय, निराशा प्रलोभन, प्रमाद यांच्या प्रखर तापांतून अडखळत जावें लागतें. पुष्कळदां साधक रंजीस येऊन हात टेकितो, माघारही घेतो. अशा वेळीं त्याला पूर्वी झालेल्या आदर्शदर्शनाची पुनः पुनः आठवण करावी लागते.

यावरून उपनिषदांत सांगितलेला आत्मा आपल्या इच्छेनें ज्याच्याकडे येतो, त्याचें तेवढ्यावरूनच चांगलें होतें असें नाहीं. तुकाराम म्हणतातः—

देवाची ते खूण, आला ज्याच्या घरा
त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ॥
देवाची ते खूण, करावें वाटोळें ।
आपणा वेगळें कोणी नाहीं ॥
देवाची ते खूण, तोडी मायाजाळ
आणि हें सकळ जग हरी ॥
पहा देवें तेंचि वळकाविलें स्थळ ॥
तुक्यापें सकळ चिन्हें त्याचीं ॥

अशाच उद्गार येशू ख्रिस्तानेंही काढला आहे. "मी पृथ्वीवर आग पाखडण्यासाठीं आलों आहें. मी शांति देण्यास आलों आहें असें तुम्हांस वाटतें काय ? मी सांगतों 'नाहीं.' पण दुही माजविण्यास आलों आहें. कारण आतांपासून पुढे ज्या घरांत पांच असतील त्यांपैकीं दोन तिहींच्या विरुद्ध होतील; आणि तीन दोहींच्या विरुद्ध होतील; मुलगा बापाच्या आणि बाप मुलाच्या उलट होईल. मायलेकींचें पटणार नाहीं, सासूसुनेचें भांडण लागेल," (लूकसनें केलेलें शुभवर्तमान भाग १२ श्लोक ४९-५३). आदर्शाचें एकदां दर्शन झालें म्हणजे तें पिशाच्चाप्रमाणें कसें माणसाच्या मार्गे लागून त्यास भ्रमवितें, याचें उत्तम वर्णन श्रीएकनाथांनीं पुढील अभंगांत केलें आहेः—

भूत जबर मोठें ग बाई ।
झाली झडपण करूं गत कांई ॥
सूप चाटूचे केले देवऋषी ।
या भूतानें धरिली केशीं ॥
लिंब नारळ कोंबडा उतारा ।
त्या भूतानें धरिला थारा ॥
भूत लागलें त्या नारदाला ।
साठ पोरें झालीं त्याला ॥
भूत लागलें ध्रुव बाळाला ।
उभा अरण्यांत ठेला ॥
एकाजनार्दनीं भूत ।
सर्वठायीं सदोदित ॥

यावरून आदर्शदर्शन झाल्यावर जे सतत प्रयत्न करावयास लागतात त्यांसच तें दर्शन किंवा प्रेरणा झाली ह्मणावयाची, इतरांस नाहीं. एरवीं कांहीं लोक म्हणत असतात कीं आम्ही प्रेरणावादी आहों, आम्हांला प्रयत्न करण्याचें

कांहीं जरूरी नाहीं. जसें काय प्रयत्नाचा आणि प्रेरणेचा कांहीं संबंध नाहीं. पण वरील उदाहरणांवरून प्रेरणा ही खऱ्या प्रयत्नास कारण आणि आरंभ आहे असें दिसून येतें. आपलें हें १०० किंवा ६० वर्षांचें आयुष्य ह्मणजे आपल्यास मिळालेली एक संधिच होय. आयुष्याची बाळपणरूपी प्रस्तावना संपल्यावर केव्हांना केव्हांतरी तरुणास आदर्शाचें दर्शन होतेंच. हें झाल्यावर त्याच्यापुढें जें त्याचें भावी आयुष्य असतें तें एखाद्या मूर्तिकारापुढें ठेविलेल्या संगमरवरी शिळेप्रमाणेंच आहे. मायकेल आंजेलोनें ४० वर्षांत ज्याप्रमाणें मोझेसचा पुतळा कोरिला, त्याप्रमाणें संसारांतील प्रत्येक साधकास आपल्यापुढील कमी अधिक ४० वर्षांच्या आयुष्यांतन आपल्या आदर्शानुरूप स्वचरित्राचा पुतळा कोरावयाचा असतो. कारखान्यामध्यें मुलें शिकत असतां कारखानदार त्यांना ज्याप्रमाणें लांकूड, धोंडा धातु इत्यादि सामुग्री पुरवितात आणि पुष्कळ वेळां विद्यार्थी ज्याप्रमाणें या सामग्रीचें कांहींच न बनवितां तिची केवळ नासधूस करितात, त्याप्रमाणें आयुष्यरूपी बहुमोल धातूची नासधूस सर्वत्र चाललेली दिसते. तथापि याच संसारशाळेंतून बऱ्याच विद्यार्थ्यांनीं बाहेर पडण्यापूर्वी आपणांस दिलेल्या सामुग्रीच्या आपल्या दर्शनानुरूप कांहीं तरी मूर्ति मागें करून ठेविलेल्या आढळतातच.

---

## परमार्थाचीं प्रापंचिक साधनें.

(१)

### + मानवी आदर आणि दैवि श्रद्धा.

**सेवा-भक्ति-भाव, नेणें मी पतित ॥**

तुकाराम.

परमेश्वरावर प्रथम भाव ठेवणें, त्यासच आपल्या प्रेमाचा विषय करणें, त्याची इच्छा तीच आपली इच्छा अशा भावनेनें त्याची सेवा करणें आणि या तीन साधनांच्या द्वारें प्रारब्ध, क्रियमाण आणि संचित ह्या कर्मबंधनांतून मुक्त होणें. या परमार्थाच्या चार पायऱ्या आहेत. परंतु परमेश्वराचें स्वरूप म्हणजे अगदीं अतर्क्य आणि अज्ञेय हा अनुभव लहान मोठ्या सर्वांसच येतो. " न कळे महिमा वेद मौनावले । जेथें पांगुळलें मन पवन । " असें संत सांगतात. तर मुळीं समजण्यासच कठीण, अशा परमेश्वरावर भाव कसा ठेवावयाचा, भक्ति आणि सेवा कशी करावयाची आणि मुक्त कसें व्हावयाचें ? आम्ही प्रापंचिक माणसें; आमच्या अल्पशक्तीचा आणि वेळेचा बराच भाग आमच्या प्रापंचिक गोष्टींतच खर्च होणार. बाल्य, जरा, व्याधि इत्यादिकांमध्यें आमच्या आयुष्याचा बराच भाग निकामी होणार. अशा स्थितींत परमेश्वरासंबंधीं भाव, भक्ति, सेवा ही प्रत्यक्षपणें आमच्या हातून कशीं घडावीं ? तशी आमची इच्छा असनही, घडणें जवळ जवळ अशक्य आहे. म्हणून आमच्या प्रापंचिक व्यवहारांतच जर कोणी असा मार्ग दाखवून दिला; आणि आमच्यांतील परस्पर व्यवहारांना कोणीं असें वळण लावून दिलें कीं, त्याचें पर्यवसान वरील भाव, भक्ति, सेवा यांमध्यें साहजिकपणें होईल, तर मोठी चांगली गोष्ट होईल. एरवीं परमेश्वराविषयीं कितीही दर्शनें स्थापिलीं, कितीही कंठरवानें उपदेश केला, तरी त्याचा तादृश फायदा होणार नाहीं. प्रापंचिक व्यवहार आणि त्यांतील अपूर्णता समूळ नाहींशी होऊन, केवळ वरील पारमार्थिक भावनांचें साम्राज्य चालेल हें संभवत नाहीं. व्यक्तिविषयक अपवाद सोडून दिले, आणि सर्व मनुष्यजातीचा समवायानें परमार्थ साधावयाचा असला तर तो या आमच्या रोजच्या प्रापंचिक व्यवहारालाच हळू हळू योग्य वळण देऊन साधणार आहे. म्हणून आम्हांस परमार्थाचीं कांहीं प्रापंचिक साधनें कोणी सांगेल तर तोच खरा उपदेशक.

परमार्थाच्या उपदेशकास प्रापंचिकांनीं जर वर सांगितल्याप्रमाणें आपली अडचण कळविली तर ती अगदीं योग्य होईल. आणि ती ध्यानांत ठेवून उपदेशकानें आपला सर्व रोंख अवश्य वळवावयास पाहिजे यांत संशय नाहीं. म्हणून आम्ही प्रथम ईश्वरावर आमची श्रद्धा प्रत्यक्ष एकदम जरी जडली नाहीं, तरी पर्यायानें कशी जडेल हें पाहूं. संसारांत इष्टमित्र, सखेसोयरे, आश्रितजन आणि परकीय यांच्यामध्यें परस्परांचा नित्य संबंध येतो. त्यांत असें एक वर्तनाचें कोणतें तत्त्व आहे

+ प्रार्थनामंदिर ता. २७-२-१९१०.

कीं, जें पूर्णपणें आणि निश्चयानें सांभाळिलें असतां त्याचें पर्यवसान ईश्वरी श्रद्धेमध्यें होईल ! एकदम सांगावयाचें म्हणजे आम्ही जर परस्परांशीं आदरबुद्धीनें वागूं आणि त्यामध्यें कधींही चूक होऊं देणार नाहीं, तर शेवटीं आमची ईश्वरावर आपोआपच श्रद्धा जडलेली आहे असें आपणांस आढळून येईल. रोजच्या व्यवहारांत मनुष्य-प्राण्यांशीं किंबहुना भूतमात्रांशीं आदरानें वागल्यानें अपरिमित, अप्रमेय ईश्वरावर श्रद्धा ती कशी बसेल ह्याविषयीं शंका उत्पन्न होईल. पण आदराचें हें व्रत अखंड चालविल्यानेंच वरील शंकेचें निरसन होणार आहे. एरवीं शाब्दिक युक्तिवादानें तें होणार नाहीं.

मनुष्यमात्रांशीं आदरबुद्धीनें वागावें ही त्यांतल्यात्यांत सुलभ गोष्ट आहे. दुसऱ्यानें आपला अपराध केला तर त्याला क्षमा करावी, दुसऱ्यावर आपल्या स्वतःप्रमाणेंच प्रेम करावें, या गोष्टी कठीण भासतात; इतकेंच नव्हे, तर त्या अधिक महत्त्वाच्या वाटतात. पण पुष्कळ प्रसंगीं क्षमेचा आणि प्रेमाचा प्रसंगच येत नसूनही आपण क्षमा आणि प्रेम करीत आहों असें आपल्यास मात्र वाटत असतें. क्षमा करावयाच्या पूर्वी दुसऱ्यानें खरोखरच आपला अपराध करावयास पाहिजे. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, दुसऱ्याकडून अपराध झालेला नसतां तो आम्ही उगाच मानून घेऊन क्षमा करीत असतों. आणि यद्यपि खरोखर अपराध झाला असला, तरी क्षमा करण्याचा अधिकार आपल्याकडे न घेतां तो ईश्वराकडे सोंपविणें अधिक श्रेयस्कर असतें. कांहीं झालें तरी क्षमेची भावना आपल्या मनांत येत असतां दुसऱ्यांच्या दोषांच्या जाणिवेचा थोडाबहुत विटाळ आपल्या मनाला होतोच. आदर बुद्धीचा तसा प्रकार नाहीं. सर्व मनुष्यांस आपल्यासमान लेखणें हा आदरबुद्धीचा अर्थ आहे. दुसऱ्यांचे दोष दिसल्याबरोबर आपल्या दोषांचें स्मरण होणें, दुसऱ्याचीं पापें पाहिल्याबरोबर जणूं काय तीं आपल्या हातून घडलीं, असें वाटून त्यांविषयीं अनुकंपा बाळगणें हें आदरबुद्धीचें लक्षण. दुसऱ्याच्या शरीराला क्षत पडल्याबरोबर आपल्या मनाला दुःख होतें, तर दुसऱ्याच्या मनाला क्षत पडल्याबरोबर आपल्या मनास जास्त दुःख व्हावयास पाहिजे. पण असें न होतां, दुसऱ्याच्या मनाचा उणेपणा अथवा अपराध नजरेस आल्याबरोबर आपण आपल्यामध्यें क्रोध आणि तिरस्कार यांस जागा देतों. याचें कारण मनुष्यमात्रासंबंधीं आपल्यामधील आदरबुद्धीचा अभाव हेंच होय. ‘आत्मवत् सर्वभूतानि यः पश्यति स पश्यति’ हें आदरबुद्धीचें योग्य प्रवचन आहे. आदरबुद्धि म्हणजे केवळ औपचारिक ओढून ताणून आणलेला दरबारी संभावितपणा नव्हे. मनुष्याचें मन—मग तो मनुष्य कसाही असो—ही एक आदरणीय वस्तु आहे, सुख दुःख, पाप आणि पुण्य ह्या सर्व स्थितींत या मानवी मनाशीं अन्यायानें, बेपर्वाईनें निष्काळजीनें कधींही वागतां कामा नये, अशी आपल्या मनाला संवय लावावी. सर्व प्राणिमात्रांच्या जीवास धक्का न लागावा, म्हणून अहिंसेचें जें तत्त्व आम्ही आचरितों, त्याच तत्त्वाचा अधिक परिणत विकास म्हणजे मानवी मनाशीं आपल्यामध्यें आदराची उपजतबुद्धि राखणें हें होय.

एकाच कुटुंबामधील माणसें पुष्कळ मागें परस्परांशीं भांडून रुसतात आणि अलग होतात. पण कौटुंबिक रक्तसंबंधामध्यें असें कांहीं अपूर्ण रसायन आहे कीं, त्यायोगें हा रुसवा—फुगवा लवकरच नाहींसा होऊन तीं एकत्र होतात परंतु परकीयांशीं बेबनाव झाला तर आपल्यामध्यें वरील उपजत आदरबुद्धीचें रसायन नसल्यास हा तुटलेला संबंध पुनः जुळून येत नाहीं. पण ह्या आदराच्या भावनेंत आम्ही नित्य वागूं लागलों, तर संसारातील बऱ्याच कटकटीच्या प्रसंगीं आपल्या मनाला जखमा होणार नाहींत; झाल्या तरी त्या लवकर भरून येतील आणि मनाची पुष्कळ मोडतोड आणि झीजही होणार नाहीं.

ही आदरबुद्धि खालील तीन प्रकारांनीं पाळण्याचें व्रत धरिलें पाहिजे; जसे आपले विचार आपल्यास प्यारे असतात तसेच आणि तितकेच दुसऱ्यांचेही विचार त्यांना प्यारे असतात ही गोष्ट अगदीं उघड आहे. तथापि एखाद्या विषयावर आपण चर्चा करूं लागलों, तर ही गोष्ट आपण पार विसरून जातों, आणि चर्चा करणारे दोन्ही पक्ष आपले विचार आपल्यास प्रिय आहेत एवढ्याच समजुतीनें बोलूं लागतात. आपल्याला दुसऱ्यास जें सांगावयाचें तें त्याला त्याचे विचार

प्रिय आहेत हें आपण जाणतों असें दाखवून नंतर सांगावें. प्रतिपक्षाला एकदां हा आमच्यांतील आदरभाव समजला म्हणजे वादाची तीव्रता बरीच कमी होऊन जाते; नाहीं तर तो आमचा एक शब्दही ऐकणार नाहीं व जर ऐकूं लागलाच तर त्याचा आमच्याविषयीं गैरसमज होईल. प्रथमारंभींच आदराच्या या नियमाची हेळसांड करून आपण वादविवाद करूं लागल्यास वाद एका बाजूस राहून द्रू मांजतें व प्रकरण हात-घाईवर येतें. ज्याचीं त्याचीं मतें ज्याला त्याला प्रिय असतात, म्हणून कोणास कोणी कांहीं सांगूं नये असा याचा अर्थ नव्हे. परंतु त्याला मान्य नसलेलें असें कांहीं आपण त्याला सांगावयाचें असतें, म्हणून आपण त्याची तयारी करण्यासाठीं त्याच्या मताविषयींचा आपला पूज्यभाव त्याच्या मनावर चांगला ठसविण्याची जरूरी आहे.

दुसरा प्रकार, दुसऱ्याच्या मनोवृत्ति संभाळणें हा होय. आपल्या प्रमाणेंच दुसऱ्यालाही वृत्ती आहेत, आणि दुसऱ्याप्रमाणेंच आपल्यामध्येंही व्यंगें आहेत. दुसऱ्यानें जर आपल्याशीं संभाळून वागावें असें आपणांस वाटतें तर आपणही दुस-ऱ्याशीं तसेंच वागलें पाहिजे. नाहीं तर बेपर्वाईनें, बेगुमानपणानें, व्याख्यानाच्या द्वारें, वर्तमानपत्राच्या द्वारें किंवा अन्य तऱ्हेनें आम्हीं आपला हलगर्जी-पणा दाखविला, तर त्याचा दुष्परिणाम दोघांलाही भोंवतो. तिसरा प्रकार हा कीं, केवळ दुसऱ्यांचे दोषच संभाळून न राहतां दुसऱ्याच्या गुणांचें आणि कृतीचें योग्य मंडन केलें पाहिजे. एखा-द्याच्या हातून कांहीं कृत्य घडलें व तें लोकांच्या कानीं घातल्यापासून फायदा आहे अशी आपली खात्री झाली तर, त्याची प्रसिद्धि करणें आपलें कर्तव्य आहे आणि तसेंच दुसऱ्याच्या आनंदानें आपण आनंदी होणें हें मोठेंपणाचें लक्षण आहे.

याप्रमाणें आम्ही जर मनुष्यमात्राशीं आदरानें वागूं तर ह्याच प्रापंचिक आदरबुद्धीचा विकास ईश्वराच्या ठायीं आमची श्रद्धा जडण्यामध्यें होईल. तुम्ही प्रेम करा, न करा, क्षमा बाळगा न बाळगा, पण हा आदरभाव कायम ठेविल्यास प्रेम आणि क्षमेचें श्रेय येईल. घडोघडीं संबंध जडणाऱ्या मनुष्याशीं अनादरानें वागून अदृश्य ईश्वरावर श्रद्धा ठेवणें कधीं तरी आम्हांला संभवनीय होईल काय? पाया आणि तळमजला असल्याशिवाय वर भर-भक्कम किल्ला आहे हें मानणें जसें वेडगळपणाचें होईल, तसें आदर नसतांना मी श्रद्धावान् होईन हें म्हणणेंही वेडगळपणाचें आहे. ईश्वर मला तारो वा मारो, मी त्याचे पाय दृढ धरीन, त्याचें रूप कसेंही असो त्याची वसति मजमध्यें आहे असें मी मानीन, पण शेजारच्या मनुष्याशीं माझा आदरभाव आहे कीं नाहीं इकडे लक्ष देणार नाहीं हें म्हणणें चमत्कारिक दिसतें. उलटपक्षीं आपण ह्या प्रपंचामध्यें ह्या आदराचा सुलभ मार्ग चालून जाऊं, तर कांहीं काळानें आपल्यामध्यें आपोआप ईश्वरी श्रद्धेचा साक्षात्कार होईल, म्हणूनच तुकाराम म्हणतातः—

नको मज ताठा नको अभिमान ।
तुजवांचुनि क्षीण होतो जीव ॥ १ ॥

## ( २ )

## * मानवी स्नेह आणि ईश्वरभक्ति.

काय ते विरक्ति न कळे आम्हां । जाणे एका नामा देवाजीच्या ॥ नाचेन मी सुखें संतांचिये मेळीं । दिंडी टाळ घोळी आंनदीया ॥ कासया उदास होऊं देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ॥ कासया एकांत सेवूं तया वना । आनंद या जना-मार्जी असे ॥ तुका म्हणे मज आहे हा भरंवसा विश्वेश सरसा चालतसे ॥

सभोंवतालच्या मनुष्यांविषयीं आदरबुद्धि राखिली, म्हणजे ईश्वरावरील श्रद्धा आपण कशी संपादन करतों हें मार्ग सांगितलें. आतां मनुष्यावर प्रीति केली म्हणजे ईश्वरविषयक भक्ति कशी वाढते हें आपण पाहूं.

एकाचा दुसऱ्याशीं जो स्नेहसंबंध जुळतो ता केवळ कर्तव्यबुद्धीचा किंवा शासनाच्या किंवा कसल्याही दावामुळें ओढून ताणून आणलेला नसतो, तर तो एक मनाचा स्वाभाविक ओढा असतो. स्वार्थत्याग करून जगाच्या कल्याणाकारितां स्वतःची आहुति देणें यापेक्षां खासगी स्नेहसंबंध वाढविणें हा ईश्वरभक्तीचा सुलभ उपाय आहे.

* प्रार्थनामंदिर तारीख ६-३-१९१०.

या स्नेहसंबंधामुळेंच एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीशीं गुंतलेली दिसते. यामुळें जगामध्यें आनंद दृष्टीस पडतो. यांच्या अभावीं सर्वत्र अंधकार दिसेल. याकरितां हा संबंध वाढविण्याची योग्य खबरदारी घेणें हें एक आपलें परमार्थाचें दुसरें प्रापंचिक साधन आहे.

ज्या दोन व्यक्तींमध्यें निष्काम स्नेहाचा पवित्र संबंध जडतो, त्या दोघांमध्यें सारखेच गुण असतात असें नाहीं. दोघांमध्यें भिन्न भिन्न सुंदर गुण असून एकाचे गुण आकर्षण करण्याची चुंबकशक्ति दुसऱ्यामध्यें असते. किंबहुना एकमेकांच्या कांहीं क्षम्य उणेपणामुळेंही ही परस्पर चुंबकता जोरावते, 'व्यतिषजति पदार्थानांतरः कोऽपि हेतुः' या न्यायानें केव्हां केव्हां ह्या आकर्षणास विषय झालेला असा जो कांहीं गुण असतो, तो दोघांसही न कळतां, आकर्षण मात्र दोघांस भासत असतें. ह्या भिन्न गुणांची छाया–प्रतिछाया, तन्मूलक भावनांचा आघात–प्रत्याघात परस्परांमध्यें होऊन त्या दोघांचेही दोष कमी कमी होत जाऊन गुण वाढत जातात, आणि भिन्न स्वभावाला हळूहळू एकात्मकता येऊं लागते. दोघांच्या भिन्न आदर्शांचें प्रतिबिंब परस्परांच्या मनामध्यें पडून दोन निरनिराळे स्वभाव नसून ते जणूं काय एकच आहे असें होतें. योद्धा आणि कवि, मुत्सद्दी आणि तत्ववेत्ता, कर्ता पुरुष आणि लेखक, अशा भिन्न गुणांच्या मनुष्यांमध्यें स्नेह जुळून दोघांनाही स्वतःच्या आदर्शांची परिपूर्ति करावयास वाव मिळतो. याप्रमाणें स्नेहाच्या या दोन क्रिया आहेत. एक उणीव भरून काढणें आणि दुसरी आदर्श पूर्ण करणें.

रस्त्यांत खेळत असतांना लंगोटीयार एक, शाळेंतला सोबती दुसरा, तरुणपणीं तिसरा आणि वृद्धापकाळीं निराळा असे स्नेहसंबंध केव्हां केव्हां बदलत जातात; यावरून त्याचें वर दर्शविलेलें मूळ स्वरूप अस्थिर आणि खोटें आहे असें होत नाहीं. रस्त्यांतल्यापेक्षां शाळेंतला सोबती आपल्या मनाशीं अधिक तादात्म्य पावतो. शाळेंत स्वतः आपल्या मनाची वाढ आणि भूक वाढल्यामुळें संसारांत शिरल्यावर आपल्यास शाळेंतल्याहून थोर सोबत्याची जरूरी भासते. आणि वृद्धपणीं याहूनही निराळ्या सोबत्याची उणीव भासते. यावरून स्नेहतत्त्वाचा अस्थिरपणा सिद्ध होत नसून तें विकासमान तत्त्व आहे हें दिसून येतें. आपल्या स्वभावाची जसजशी वाढ होते तसतसे आपण निरनिराळे मित्र करीत असतों आणि उलटपक्षीं जसजसे आम्ही निरनिराळे मित्र करूं तसतशी आपली वाढ होत जाते. म्हणजे एका पायरीवरून दुसरीवर, दुसरीवरून तिसरीवर अशी आपण आत्मिक चढण चढत असतों. म्हणून ह्या अपूर्व संसारामध्यें स्नेहसंबंध ही पवित्र बाब आहे. आणि तिचें अन्तिम पर्यवसान ईश्वरभक्तीमध्यें होणार असल्यामुळें ती एक आध्यात्मिक शिडीच होय.

प्रसिद्ध इंग्लिश राजकवि टेनिसन यानें In Memoriam ह्या आपल्या काव्यांत मित्रवियोगाच्या आपल्या दुःसह वेदनाचें जें काळीज करपून सोडणारें आणि डोळ्याला अंधेरी आणणारें वर्णन केलें आहे तें वाचून वाचकांच्या मनांत प्रथम त्याच्या सत्यत्वाबद्दल किंचित् शंका येऊं लागते. मरण हें सर्वांनाच येणार म्हणून मातेला कितीही सांगितलें तरी ती आपल्या मुलाच्या मरणामुळें आक्रोश करणारच, पत्नी पतीकरितां, बंधु बंधूकरितां शोक करील, पण मित्र मित्राकरितां इतका शोक करील हें खरें वाटत नाहीं. हें कवीचें लाघव असेल असें वाटतें. जात्या भ्याड कवि वीररसात्मक काव्य लिहितांना कल्पनेनें ज्याप्रमाणें शौर्याची भावना आपणामध्यें आणतो, त्याप्रमाणें टेनिसननें आपल्या कवित्वाच्या जोरावर हें काल्पनिक वर्णन केलें असावें असें प्रथम वाटतें पण अधिक विचार केल्यावर आणि त्या काव्याचें पुनःपुनः परिशीलन केल्यावर, त्या कवीच्याच नव्हे, तर साधारण मानवी कल्पनाशक्तीच्या संबंधानेंही आपण फार कोती समजत करून घेतली असें दिसून येईल. टेनिसनला खरोखरच दुःसह वेदना झाल्या, याचें कारण त्याचें आपल्या मित्राशीं तसेंच अभेद्य तादात्म्य झालें होतें आणि त्याचा भंग झाल्यामुळें त्याला वेदना होत होत्या. अशा तादात्म्याचा ज्यांना अनुभव नाहीं आणि कल्पनाही नाहीं त्यांना तें वर्णन नुसतें कवीचें लाघव वाटणें साहजिक आहे. मित्राच्या जिवास त्याचा जीव लागून गेल्यामुळें व त्याशीं एकाकार झाल्यामुळें त्याच्या वियोगामुळें आपलें

अर्धे अंग कापून गेल्याप्रमाणें त्यास वेदना होऊं लागल्या. परंतु ह्या वेदनांमुळें त्याला नसता प्राकृत माणसाप्रमाणें शोकच होऊन राहिला असें नाहीं. शोक तर झालाच; पण क्रमाक्रमानें त्यामध्यें अति गंभीर विचारजागृति होऊन हळूहळू थोर तत्त्वांचें दर्शन होऊं लागलें. विरह, उद्वेग, निराशा, विचार, शंका, आशा, श्रद्धा आणि शेवटीं आनंद अशी त्याच्यामध्यें आध्यात्मिक अनुभवाची परंपरा उत्पन्न झाली. ज्या मित्रावर आपण जीव कीं प्राण असें प्रेम केलें तोच जणूं आपल्या आकुंचित कुडींतून उडून जाऊन दश दिशां फाकला, जो आपल्या प्रेमाचा सांठा आणि विनाशी विषय होता तो आतां सर्वत्र पसरलेला आणि अनंत काळ टिकणारा असा झाला. अज्ञेयवादी टेनिसन स्नेहसंबंधाच्या प्रभावामळें किंबहुना त्याच्या विरहामुळें श्रद्धाळु आणि आनंदवादी भक्त बनला.

असा आमच्या या प्रापंचिक स्नेहाचा महिमा आहे. तो संबंध आम्ही निष्ठेनें जर चालवूं तर तो फलदायी होईल. कोणी म्हणेल स्नेह-संबंध ही स्वाभाविक बाब आहे तर तेथें निष्ठेची काय जरूर आहे ? तो आपोआप वाढत जाईल. पण मनुष्यस्वभावामध्यें जशी संघातक तशीच विघातकही बीजें आहेत. आणि कित्येक वेळां जसें आंतरिक दोषामुळें तसेंच बाह्य उपाधींमुळेंही आपल्या स्नेहाच्या प्रवाहांत विक्षेप घडतो अशावेळीं आपल्या अंगीं निष्ठेचें बळ असल्यास या विघ्नांतून आपण पार पडूं. प्रवाहांतून पोहत जाणारा मनुष्य भोंवऱ्यांत सांपडला असतां त्याच्या अंगीं कस असल्यास तो त्या भोंवऱ्यास फोडून बाहेर पडतो. एरवीं त्यांतच बुडून जातो. त्याप्रमाणें आपण स्नेहसंबंध निष्ठेनें चालविण्याचें बळ अंगीं संपादिलें तर अंतर्बाह्य कारणामुळें वेळोवेळीं घडणाऱ्या ह्या आमच्या स्नेहसंबंधाच्या प्रवाहांतील विक्षेपाच्या भोंवऱ्यामधून आम्ही पार पडूं. एरवीं तो संबंध मध्येंच तुटून गेल्याचीं अनेक उदाहरणें आढळ-तात. अशा रीतीनें आमरण स्नेहसुख भोगून जर मित्रवियोग घडला तर तो वियोगच, टेनिसनला अनुभव] आल्याप्रमाणें, ईश्वरी दर्शनास कारण होईल. याप्रमाणें परलोकाप्रत गेलेल्या आपल्या मित्रावर निष्कामवृत्तीनें केलेल्या प्रेमामध्यें अवि-नाशी अनंत भक्तीचीं बीजें कशी रुजलेलीं असतात हें कळेल. सुरवंटाचा जसा पतंग बनून तो सर्वस्थळीं आनंदानें वावरूं लागतो, तसा आमचा विदेही मित्र सर्वव्यापी झाला असतां आमचें मनही त्याच्या मागोमाग भ्रमण करीत सर्वव्यापी होतें. यापरती ईश्वरभक्ती वेगळी कोठें राहिली ? अशा मित्राचा वियोग झाला तर कांहीं वेळ आपण गडबडून जाऊं. पण पुढें विवे-कासहित आपल्यामध्यें वैराग्याचें बळ उत्पन्न होऊन, सर्व जग माझा मित्र आहे असें आपणास वाटेल. आपली आकुंचित वृत्ति नष्ट होईल; आपणास आनंदीआनंद होईल. असे सुखवादी झालों म्हणजे आपण ईश्वरभक्त झालों असें म्हणावयाचें. मग तुकारामानें सांगिल्याप्रमाणें—

ऐसें भाग्य कई लाहातां होईन, । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥ मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥

हा अनु-भव आपल्यास येईल. पण त्यासाठीं अगो-दर आपण आपल्या भोंवतालच्या मनुष्यामध्यें स्नेहसंबंधाचें वलय वाढवावें. मनुष्यावर प्रेम न करितां मी ईश्वराचा भक्त आहें असें कोणालाही म्हणवितां येणार नाहीं. याकरितां राजानें प्रजेवर, पतीनें पत्नीवर, धन्यानें चाकरावर हाच स्नेहसंबंध प्रेम किंवा निष्ठा ठेवून वाढवावा, म्हणजे त्याचा लय ईश्वरभक्तीमध्यें होईल.

---

## ( ३ )

## * मनुष्यसेवा आण ईश्वरोपासना.

देवाची पूजा हें भूतांचें पाळण ।
मत्सर तो शीण बहुतांचा ॥ १ ॥

तुकाराम.

ईश्वरावर श्रद्धा बसण्यास आणि भूतमात्राचे ठिकाणीं आदरबुद्धि ठेविली पाहिजे व त्यावरील भक्ति दृढ करण्यास मनुष्याशीं स्नेहभाव अखंड वाढविला पाहिजे, या दोन गोष्टींविषयीं मागें विचार केला आहे. ईश्वराबद्दल आपल्या मनांत श्रद्धा उत्पन्न होऊन त्याची भक्ति बाणल्यानंतरची

* प्रार्थनामंदिर ता. २०-३

तिसरी गोष्ट म्हटली म्हणजे त्याची पूजा, उपासना, आराधना करणें ही होय. म्हणजे सदैव त्याच्या इच्छेला आपली इच्छा अनुसरून राखणें हें होय. श्रद्धेचें पर्यवसान भक्तींत आणि भक्तीचें सेवेंत झालें तरच ती ती स्थिति खरी म्हणतां येईल. आतां ही पूजा करण्यास गंध, पुष्प, धूप, दीप इत्यादि पूजेच्या उपकरणांची, किंवा भव्य मंदिर, सुस्वर गायन, नामांकित वक्तृत्ववान् उपासक ह्या बाह्य साधनांची, किंबहुना गहन विचार, गूढ ज्ञान, सूक्ष्म कल्पना आणि साक्षात्कार इत्यादि अंतःसाधनांचीही आवश्यकता आहे असें मुळींच नाहीं. प्रपंचांत राहून आपले नित्याचे व्यवहार करीत करीतच ईश्वरोपासना साधणें हें अगदीं शक्य आहे. 'देवाची पूजा हें भूताचें पाळण' असें तुकारामबुवा म्हणतात. "ईश्वरावर प्रीति, पूज्यबुद्धि व अनन्यभाव हीं ठेवून त्याप्रमाणें त्याचें मनानें भजन-पूजन करणें व त्यास प्रिय अशीं कृत्यें करणें हीच त्याची खरी उपासना होय" असें प्रार्थनासमाज सांगत आहे. म्हणून आपण आज परमार्थाचें तिसरें प्रापंचिक साधन (मनुष्य-सेवेच्या द्वारें ईश्वरोपासना) कसें घडतें याचा विचार करूं.

ईश्वरविषयक पद्यें गाऊन, ब्रह्मांडीं आत्मा नेऊन, मुक्तदशेप्रत जाऊन, सर्वसंगपरित्याग करून, मन निश्चल करून, ईश्वराची पूजा होईल. ईश्वर-पूजेचा हा मार्ग आम्हांला नापसंत आहे किंवा कमी महत्त्वाचा वाटतो असें मुळींच नाहीं. पण मनुष्यांची सेवा केल्यानेंही (निष्कामपणें लोक-कल्याणासाठीं झटल्यानेंही) ईश्वरोपासना उत्तम रीतीनें घडते हेंच आज सांगावयाचें आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

वगैरे नवविधा भक्तीचे सर्व प्रकार या सेवा-धर्मानेंही घडतात. पण मनुष्याची सेवा करीत असतांना त्याचा पायपोस डोक्यावर घ्यावा लागल्यामुळें अंगामध्यें जशी आणि जितकी कसलेली विनम्रता बाणते, तशी आणि तितकी मंदिरामध्यें कितीही प्रेमळ प्रार्थना ऐकल्यानें बाणणार नाहीं. आपल्या धनदौलतीचें व इतर हुंडेजावीचें विस्मरण झाल्याशिवाय, मनांतील ताठा व अहंभाव पूर्ण नाहींसा झाल्याशिवाय ह्या सेवा-सदनामध्यें मुळीं शिरकावच होणें कठीण पडतें मग एकदां शिरकाव होऊन सेवा करीत राहिल्या-वर मन नम्र झाल्याशिवाय राहील असें होणार नाहीं. नम्रतेशिवाय आणखी दुसरें सेवाधर्मानें मिळणारें फळ म्हणजे मनाची अखंड शांति हें होय. केवळ ज्ञानानें, अनुभवानें, तर्कानें किंवा श्रवणानें मिळणारी शांति केव्हांना केव्हां भंग पावणारी असते; पण सेवाधर्मानें प्राप्त झालेली शांति अखंड आणि अभंग अशी असते. कारण, शांतीचा भंग करणाऱ्या सर्व कांहीं कारणांना न जुमानण्याची संवय या सेवाधर्मांतच लागण्याचा संभव आहे. सेवाधर्मानेंच मनाला एकाग्रता येते. ध्यान करीत असतांना अंतःकरण शुद्ध होतें खरें; पण केवळ ध्यानानें त्यास तशी संवय लागत नाहीं. आत्मपरीक्षणाच्या तीव्र कसोटीस उतरण्याला सेवाधर्म हाच एक मार्ग आहे. आपण बरें करीत असतांना लोक मत्सरानें किंवा अज्ञानानें वाईट कां म्हणतात ! किंवा आपण धडधडीत वाईट करीत असतांना लोक बळेंच मतलबानें किंवा भोळेपणानें आपलें विनाकारण देव्हारे कां माजवितात ! ह्या दोन्ही परस्पर भिन्न अनुभवांचा विचार करून, अशा ह्या व्यर्थ निंदास्तुतीपासून आपल्याला दूर कसें ठेवावें हें सेवेशिवाय साधणार नाहीं. यावरून सेवेमध्यें भक्तीचे नऊच नव्हे तर अनेकविध सारेच प्रकार आणि त्यांचीं फळेंही लाभतात हें दिसून येईल.

स्वतःच्या आप्तांच्या, जातीच्या, किंवा देशाच्या उत्कर्षाकरितां झटणें हाही सेवाधर्मच होय. पण त्यामधील स्वतःचा मध्यबिंदू पुसून टाकून केवळ निःस्वार्थपणानें जर आम्ही सेवा करूं तर ती अधिक श्रेष्ठ होईल. या सेवेची किंमत आणि तिचें महत्त्व तिच्या प्रमाणावर नसून तिच्या प्रकारा-वर आहे. म्हणजे पुष्कळ लोकांचें आपण कल्याण करीत असूं, पण ते "आपले" लोक आहेत अशा भावनेनें जर करीत असूं तर त्याची किंमत एकाच मनुष्यावर पण निःस्वार्थ-पणानें केलेल्या उपकारापेक्षां कमी मानता येईल. स्वार्थानें आणि अहंभावानें एखाद्या संग्रामांत मिळविलेल्या दिग्विजयाची किंमतही एका अनाथ विधवेस दुःखांतून मुक्त करणें, निराश्रित वृद्धाची आजारांत शुश्रूषा करणें, अनीतीच्या आडवाटेनें

अडखळणाऱ्यास सरळ वाट दाखविणें, किंबहुना तान्हेलेल्यास पेलाभर पाणी देणें, ह्या साध्या दिसणाऱ्या गोष्टींहूनही कमी आहे.

ईश्वराची आराधना करणें म्हणजे तो मनुष्यासारखा स्तुतिप्रिय आहे, किंवा मनुष्याप्रमाणेंच कांहीं तरी इकडचें तिकडे करून त्याला खुष ठेवण्याची जरूरी आहे, अशांतला मुळींच प्रकार नाहीं; किंवा वरील जे उपकाराचे प्रकार सांगितले ते वेळप्रसंग पडल्यास त्यांची फेड इतराकडून आपणास व्हावी अशा बुद्धीनें करावेत असेंही नाहीं तर दुसऱ्याचीं दुःखें आणि गरजा पाहून आपल्यामध्यें अनुकंपेची जी प्रेरणा होते, ती ईश्वरानेंच केलेली एक सूचना असें समजून ती मानली पाहिजे; एरवीं ईश्वराच्या स्तुतीचें उगीच अवडंबर माजवून त्याची आज्ञा न पाळल्यास त्याची उपासना केली असें कधींच होणार नाहीं. अशी फाजील स्तुति, व ताडपुजेपणा साधारण मनुष्यालाही आवडत नाहीं, मग सर्वज्ञ परमेश्वरास तो कसा गोड लागेल ?

या वरील विवेचनावरून प्रपंच आणि परमार्थ यामध्यें एकवाक्यता कशी आहे हें दिसून येईल. स्वर्ग, पृथ्वी, आणि पाताळ हीं निरनिराळ्या स्थळीं आहेत ही जशी अडाणी समजूत आहे, तशीच प्रपंच आणि परमार्थ हे दोन भिन्न मार्ग आहेत, ही अडाणी समजूत आहे. हे दोन भिन्न नसून एकच आहेत.

---

## ( ४ )

## *मनाची प्रसन्नता आणि मोक्षप्राप्ति.

मन मनासि होय प्रसन्न ।
तेव्हां वृत्ति होय निराभिमान ॥ १ ॥
पावोनि गुरुकृपेची गोडी ।
मना मन उभवी गुढी ॥ २ ॥
साधके संपूर्ण । मन आवरावें जाण ।३॥
एका जनार्दनें शरण ।
मनें होय समाधान ॥ ४ ॥

गेल्या तीन खेपेस ईश्वरावरील श्रद्धा, ईश्वराविषयीं भक्ति, व ईश्वराची उपासना हे तीन परमार्थ प्रपंचांत राहूनच अनुक्रमें मनुष्यमात्राविषयीं आदर, प्रेम आणि मनुष्यांची सेवा ही करून साधतां येतात हें सांगितलें. आतां चौथा आणि शेवटचा जो परमार्थ ( मोक्ष ) तोही प्रापंचिक साधनानेंच कसा साध्य करून घेतां येईल, हें पाहूं.

वरील अभंगांत एकनाथांनीं म्हटल्याप्रमाणें आपलें मन आपणाला प्रसन्न करून घेतलें म्हणजे मोक्षप्राप्ति झाली असा खरा अर्थ आहे. तुकारामही म्हणतातः—

मन करारे प्रसन्न ।
सर्व सिद्धीचें कारण ॥
मोक्ष अथवा बंधन ।
सुख समाधान इच्छा ते ॥
मनें प्रतिमा स्थापिली ।
मनें मना पूजा केली ॥
मनें इच्छा पुरविली ।
मन माउली सकळांची ॥
मन गुरु आणि शिष्य ।
करी आपलेंचि दास्य ॥
प्रसन्न आपआपणांस ।
गति अथवा अधोगति ॥
साधक वाचक पंडित ।
श्रोते वक्ते ऐका मात ।
नाहीं नाहीं आन दैवत ।
तुका म्हणे दुसरें ॥

मन प्रसन्न करा, तेंच सिद्धीचें कारण आहे. मन हें प्रत्यक्ष दैवत आहे. त्याच्याशिवाय इतर दैवतांना मनामध्यें थारा देऊं नका. इतर देवतांस मनामध्यें थारा दिल्यानें मनोदेवता प्रसन्न होणार आणि त्यामुळें प्रपंच आणि परमार्थ हीं घडणार नाहींत, इत्यादि तुकारामाचें एकनाथाप्रमाणेंच म्हणणें आहे.

एखादें आपण सत्कृत्य केलें, एवढ्यावरूनच भागत नाहीं. त्या सत्कृत्यानें आपलें मन आपणास राजी झालें पाहिजे. अखेरची गुढी उभी रहावयाची ती मनानेंच उभारिली पाहिजे, म्हणजे आज्ञा करावयाची ती मनानें आणि ती पार पाड-

---

* प्रार्थनामंदिर ता. २७–३–१९१०.

त्यानंतर पसंतीही मनाकडून मिळावयास पाहिजे. मनानें सांगितलें कीं, ठीक केलें, म्हणजे झालें; इतरांना बरें वाटलें नाहीं तरी हरकत नाहीं. उलट-पक्षीं सर्वांकडून स्तुतीचा वर्षाव चाललेला आहे, पण आपलें मन प्रसन्न नाहीं तर प्रपंचांत सुद्धां सुख होत नाहीं, मग ज्याला स्वर्ग म्हणतात तेथें तें कसचें होईल ?

मोक्षप्राप्ति म्हणजे तो कांही दूरचा प्रसंग नाहीं. तो पदोपदीं येणारा अनुभव आहे. मागें गेलेला किंवा नंतर येणारा काळ अथवा स्थिति नव्हे; तर सर्व काळीं, सर्व ठिकाणीं मनाची प्रसन्नता असणें शक्य झाल्यावर प्राप्त होणारी ती दशा आहे, अनंत युगांनीं मोक्षाचा काळ येणार असें जर धरलें तर ही शंका उद्भवेल कीं, पुरातन काळीं होऊन गेलेल्या साधु-संतांस मोक्षप्राप्ति झाली नाहीं काय ?

मन प्रसन्न झालें असतां जें सुख मिळतें, त्या सुखामध्यें आणि पारमार्थिक सुखामध्यें बिलकुल फरक नाहीं. आपलें मन नेहमीं प्रसन्न ठेवावें, याबद्दल तुकारामबावांचा असा सणसणीत उपदेश आहे:—

> जेणें घडे नारायणीं अंतराय ।
> होत बाप माय वर्जावीं तीं ॥
> तुका ह्मणे सर्व धर्म हरीचे पाय
> आणिक उपाय दुःखमूळ ॥
> न मानावें तैसें गुरूचें वचन ।
> जेणें नारायण अंतरे तें ।
> देव जोडे तरी करावा अधर्म ।
> अंतरे तें कर्म नाचरावें ।

आणि भगवद्गीतेतही असें ह्मटलें आहे:—

'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।'

नेमून दिलेलीं कर्तव्यें करीत असतां त्यायोगें जर देव अंतरेल तर तीं कर्मे सोडून द्या. तुह्मांमध्यें आणि ईश्वरामध्यें तुमचे आईबाप किंवा गुरु आड येऊं लागले तर त्यांनाही सोडा. या ठिकाणीं मन म्हणून जो आपला अंश आहे तो साक्षात् ईश्वराचा अंश आहे असा अर्थ आहे. म्हणजे मन हा एक जीव आणि ईश्वर ह्या दोघांस जोडणारा दुवा आहे. म्हणून मन प्रसन्न होण्याच्या मार्गांत जो जो अडथळा येईल तो तो काढून टाका, म्हणजे मोक्षप्राप्ति होईल. असा द्वैतवादी व अद्वैतवादी सर्व संतांनीं एकमतानें सिद्धांत केला आहे. साधूंची गोष्ट बाजूस ठेवून आम्ही आपापल्या मनाची जरी साक्ष विचारली तरी तेंही असेंच सांगेल. मनाला सैरावैरा धावं न देतां आवरावें हें खरें, पण आवरतां आवरतां त्यांस प्रसन्न करावें हें त्याहून खरें. ईश्वरावरील श्रद्धा, ईश्वराची भक्ति, त्याची उपासना, या तीन परमार्थानें अखेरीस आपल्या मनाची तळमळ मिटून त्याला शाश्वतीची शांति मिळते. तिचेंच नांव निर्वाण अथवा मोक्षप्राप्ति हें होय.

---

## *परमार्थाचीं प्रापंचिक साधनें.

### ( ५ )

> येउनि नरदेहा झांकितील डोळे ।
> बळेंचि अंधळे होती लोक ॥
> उजेडा सरसी न चलती वाट ।
> पुढील बोभाट जाणोनियां ॥
> तुका म्हणे जाऊं सांगावीत वाट ।
> भेटे तरी भेटो कोणी तरी ॥

मागें चार वेळां ईश्वरावरील श्रद्धा भक्ति, त्याची उपासना आणि तद्द्वारा आपली मुक्ति या चार परमार्थाचीं, अनुक्रमें मनुष्यमात्रासंबंधीं आदरभाव, स्नेह, सेवा आणि मनाची प्रसन्नता हीं चार प्रापंचिक साधनें कशीं आहेत, याचा विचार केला. याचा उद्देश प्रपंच आणि परमार्थ यांची एकवाक्यता करणें हा होता. आतां त्याच गोष्टींचा सामान्य विचार करूं.

पुष्कळांना परमार्थाचा विचार प्रापंचिक दृष्टीनें करणें आवडत नाहीं. जुन्या लोकांना तर तो नास्तिकपणा वाटतो. आणि कांहीं अहंमन्य लोकांना त्यांत जडवाद दिसतो. तुकारामाच्या समकालीन साधूंचाही कल परमार्थाचा विचार प्रापंचिक दृष्टीनें करण्याच्या विरुद्ध असे. तुकारामानें मात्र कांहीं अभंगांत परमार्थाचा विचार प्रापंचिक दृष्टीनें केला आहे. त्यापैकीं वर लिहिलेला अभंग होय. त्याचा अर्थ या जन्मामध्यें

---

* प्रार्थनामंदीर ता. ३-४-१९१०.

सर्व गोष्टी साधतां येतात. प्रत्यक्ष प्रकाश या नरदेहांतच दिसतो. असा लाभ पुनरपि मिळणें शक्य नाहीं. पुष्कळ वळसे घेतल्यानंतर आपल्याला हा देह प्राप्त झालेला आहे. आपण या मार्गानें जात आहों हें लोकांना कळविण्याकरितां सादावीत म्हणजे आरोळ्या मारीत जाऊं. कोणी येवोत वा न येवोत. 'संवसारातें तुम्ही आले हो आइका। तुटीचें तें नका केणें भरूं ॥' याही अभंगांत तुकाराम म्हणतात, या संसाररूपी बाजारांत खोटा जिन्नस भरूं नका. खरें खोटें सांगणाऱ्यांची मदत घ्या. वर वर चांगला दिसणारा माल साठवूं नका. विसार देऊन उधार घेऊं नका. या जन्माचा विचार पुढल्या जन्मी करूं, असें म्हणूं नका. रोख ठोक व्यापार करा. हे दोन आणि असे इतर कांहीं थोडेसे तुकारामाचे अभंग अपवादादाखलच असल्यासारखे आहेत. एरवीं त्यांनींही तत्कालीन ओघाला अनुसरून वेळोवेळीं उद्गार काढले आहेत; ते एका अभंगांत म्हणतात—

प्रपंच परमार्थ संपादिन दोन्ही।
एकही निदानीं न घडे त्यासी ॥
दोन्ही पेंवांवरी ठेवूं जातां हात।
शेवटीं अपघात शरीराचा ॥
तुका म्हणे तया दोन्हींकडे धका।
शेवटीं तो नरकामाजीं पडे ॥
"संसारसंगें परमार्थ जोडे।
ऐसें काय घडे जाणते नो" ॥

याही अभंगांत तुकाराम म्हणतात:—गुरांनीं खाऊन टाकलेल्या चिपाडामध्यें गोडी नसते किंवा ढेंकणांनीं भरलेल्या बाजेवर झोंप येत नाहीं, त्याप्रमाणें ह्या संसारांत राहून परमार्थ साधतां येत नाहीं. संसारांतून काखा वर करा, म्हणजे परमार्थाच्या गोष्टी समजतील. तुकारामाचाच काय, तर सर्व देशांतील सर्वकालीन धार्मिक लोकांचाही साधारण समज असाच असतो. पण साधु, भोंदु, साव, चोर या सर्वांमागें संसार हा लागलेलाच आहे. माशाला पाण्याबाहेर रहाणें कदाचित् शक्य होईल, पण मनुष्याला संसाराबाहेर राहतां येणार नाहीं. म्हणून परमार्थाचा विचार प्रापंचिक दृष्टीनेंच करणें हें अत्यंत जरूर आहे. ह्या प्रापंचिक दृष्टीच्या उलट असणाऱ्या लोकांचे तीन प्रकार आहेत.

पहिला प्रकार विज्ञानावादी लोकांचा. या लोकांना कोणत्याही गोष्टीचा विचार साध्या व्यावहारिक दृष्टीनें करण्यांत मोठा हलकेपणा वाटतो. एकदां एका मनुष्यानें झाडाच्या एका बुंध्यावर बसलेली खार पाहिली. ती लगेच बुंध्याआड झाली म्हणून तिला पुनः पाहण्यासाठीं तो बुंध्याभोंवतीं वळसे घेऊं लागला. भीतीमुळें ती खारही बुंध्याला वळसे घालूं लागली, ह्याप्रमाणें दोघांनींही झाडाभोंवतीं कितीही फेरे केले, तरी त्या मनुष्याला ती खार कांहीं दिसेना. हा प्रकार चालला असतां त्या ठिकाणीं चार विज्ञानवादी शहाणे जमले, आणि त्या मनुष्याची त्या खारेभोंवतीं प्रदक्षिणा झाली किंवा नाहीं, याविषयीं त्यांच्यामध्यें मोठ्या कडाक्यानें वाद सुरू झाला. एक पक्ष म्हणे ज्या अर्थी एकदां दिसलेली खार पुनः त्यास दिसली नाहीं त्या अर्थी त्याची तिच्याभोंवतीं एकही प्रदक्षिणा झाली नाहीं. दुसऱ्या पक्षानें आपलें प्रमेय असें सिद्ध केलें कीं, ज्या अर्थी खार त्या बुंध्यावर फिरत होती आणि मनुष्य हा बुंध्याभोंवतीं घिरट्या घालीत होता, त्या अर्थी एकदांच काय पण पुष्कळ वेळां त्याच्या तिच्याभोंवतीं प्रदक्षिणा झाल्या. अशा रीतीनें वाद मिटणें अशक्य झालें. कारण दोघांचीही दृष्टि व्यावहारिक नव्हती हें होय. प्रदक्षिणा या शब्दाचा अर्थ खार स्थिर असतांना तिच्या पूर्व, उत्तर, पश्चिम, दक्षिण बाजूनें जाणें असा घेतला तर त्या माणसाची प्रदक्षिणा झालीच नाहीं. पण तिनें व्यापलेल्या प्रदेशाच्या भोंवतीं जाणें या अर्थानें पहातां प्रदक्षिणा पुष्कळ झाल्या. या प्रमाणें कोणत्याही गोष्टीचा निर्णय करण्याला तिच्यापासून आपल्यास व्यावहारिक कोणता फायदा, गैरफायदा व्हावयाचा आहे यांकडे लक्ष पुरवावयास पाहिजे. जेथें हें धोरण नसतें आणि केवळ मोघम सत्य स्थापित करण्याची संवय लागलेली असते, तेथें निर्णय होत नाहीं, किंबहुना निर्णयाची खरोखर जरूरीच नसते, अशा प्रकारच्या अव्यवहार्य विज्ञानवादानें फुरसुतीच्या वेळीं मानवी मनाचा केव्हां केव्हां व्यायाम आणि एक प्रकारचें सुखही होतें. पण व्यावहारिक रीतीनें आणि व्यावहारिक सत्य शोधून काढण्याच्या कामीं या व्यायामाचा आणि सुखाचा कांहींच उपयोग होत नाहीं. यूरोप, अमेरिका इत्यादि सुधारलेल्या पाश्चात्य

देशांमध्यें प्रो० जेम्स आणि शिलरप्रभृति तत्त्वज्ञ लोकांनीं ह्या अव्यवहारी विज्ञानवादावर अलीकडे मोठा जोराचा हल्ला चालविलेला आहे. हा मोघम विज्ञानवाद खोटा आणि निरुपयोगी आहे; संसारांतील सर्व गोष्टींचा साधकबाधक दृष्टीनेंच विचार करावा आणि सत्याचाही शोध याच मार्गानें लागेल, अशा अर्थाचे निरनिराळ्या भाषेमध्यें त्यांचे मोठमोठाले सुंदर ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत. या नवीन दर्शनाचीं Pragmatism, Humanism इ० नांवें आहेत. ईश्वरावर विश्वास ठेविल्यानें मनाला तत्काल शांति मिळते. व्यावहारिक फायद्याकडे दृष्टि पोहोंचविण्यांत कोणत्याही प्रकारचा हलकेपणा नाहीं. उलट, 'ब्रह्मज्ञान्याघरीं भक्तीचा दुष्काळ। शब्दांचा सुकाळ खटाटोप॥' या वचनामध्यें तुकारामानेंही आपला कल व्यावहारिक दृष्टीकडेस दाखविला आहे. मोठमोठे शब्द आणि कल्पना हीं शून्याहीपेक्षां कमी आहेत. विज्ञानाच्या भपक्यानें आमचे व्यावहारिक हितसंबंध निस्तेज झाले आहेत, ते पुनः सतेज केले पाहिजेत. दूरच्या गोष्टींचा मोघम विचार करणाऱ्यांच्या हातून हिसकावून घेऊन, ते आमचे हितसंबंध व्यावहारिक दृष्टीनें विचार करणाऱ्याच्या हातीं दिले पाहिजेत. धर्मगुरु आणि मठाधिपति हे आपल्या मतलबासाठीं ह्याच्या आड येतील पण त्यांना जुमानूं नये. आम्ही प्रापंचिकांनीं विज्ञानाला कायमचा नमस्कार ठोकला तरी बरेंच.

दुसरा प्रकार दैववादी लोकांचा. यांना स्वत्वाची किंवा व्यक्तिस्वातंत्र्याची चाड नसते. पराधीनपणांत त्यांना सुख आणि समाधान वाटतें, आणि आपल्यावरील कर्तव्य—जबाबदारीचा बोजा उतरला असें वाटतें. हरि असेल तर देईल म्हणून ते खाटल्यावर स्वस्थ बसलेले असतात. जणूं काय आपलें अस्तित्व स्थापन करण्याची जबाबदारी राखण्यासाठीं या परपुष्ट लोकांना खुष ठेवणें हरीलाच जरूर आहे. दैववादी नुसते आळशीच असतात असें नाहीं, तर कांहीं अगदीं भोळे असतात. त्यांना आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर विश्वास ठेवणें म्हणजे ईश्वराचें अपार सामर्थ्य न ओळखून त्याचा एक अपराध करणेंच आहे असें वाटतें, पण ही मोठी चूक आहे.

कसरतीच्या खेळामध्यें एकादा डोंबारी आपण उताणा पडून आपल्या हातांपायांवर दोघांचौघांना सावरून धरून त्यांच्या खांद्यावर दोन चार मुलें देऊन एक मनुष्यप्राण्याची अजब इमारत आपल्या अंगावर तोलून धरलेली अशी दाखवितो. पण तीं माणसें सर्वस्वीं खालीं पडलेल्या डोंबाऱ्याच्या आधीन असतात. एकादा इंजिनियर दगडाची एक मोठी इमारत रचून आपण वेगळा झालेला असतो. एकदा कळाशी साधल्यावर ते दगड इंजिनियरवर अवलंबून नसतात. यावरून त्यांच्यामध्यें डोंबाऱ्याच्या हातांपायांवर उभे राहिलेल्या माणसांहून अधिक स्वाधीनता असते. एकादा माळी लहानमोठ्या झाडांचो एकादी सुंदर बाग निर्माण करितो. पाणी घालून एकदां वाढवून दिल्यावर तीं झाडें पुढें आपल्याच वाढीनें वाढूं लागतात, म्हणून त्यांच्यामध्यें वरील इमारतीच्या दगडांहूनही अधिक स्वाधीनता असते. एकाद्या गुरुकुलामध्यें अनेक शिष्य कांहीं काळपर्यंत गुरूच्या हाताखालीं शिकून तयार होऊन पुढें ते पूर्ण स्वाधीन सद्गृहस्थ बनतात. या चार उदाहरणांवरून आपल्या आश्रितांना स्वाधीनता देण्यामध्यें डोंबाऱ्याहून इंजिनियर श्रेष्ठ, त्याहून माळी श्रेष्ठ आणि सर्वांहून गुरु श्रेष्ठ हें उघड होतें. आतां सर्व गुरूंचा जो आदि गुरु अखिल विश्व चालविणारा विश्वेश्वर तो ह्या डोंबाऱ्याहून कनिष्ठ किंवा ह्या गुरूहून श्रेष्ठ म्हणावयाचा? आम्ही सर्वस्वीं पराधीन व्हावें अशी त्याची इच्छा असल्यास तो डोंबाऱ्याहून कनिष्ठ आणि अंतीं आम्ही स्वतंत्र अथवा मुक्त व्हावें अशी त्याची इच्छा आणि धोरण असल्यास—आणि तें तसेंच खास आहे—तर तो सर्वांहून अनंतपटीनें श्रेष्ठ असा आहे.

तिसऱ्या प्रकारचे लोक वैतागी असतात. गृहकलह, देशकलह, राष्ट्रकलह, यशापयश अनेक खासगी आणि सार्वजनिक निराशा आणि अपमान इत्यादिकांमुळें त्यांचीं मनें भंडावून गेलेलीं असतात, आणि त्यांची आयुष्यांत अरुचि झालेली असते. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे शीणाला कारण. तें नसेल तितकें बरें, असें केवळ वैतागानें त्यांस वाटत असतें. अशांची अनुकंपा करणें हेंच योग्य आहे. यांच्याशीं वादविवाद करून त्यांच्यापुढें

आपल्यों व्यक्तिस्वातंत्र्याचा बडिवार मिरविणें म्हणजे त्यांच्या दुःखावर डाग देण्यासारखें त्यांना होतें. तथापि ही त्यांची वृत्ति सत्याची खूण नव्हे. ती आमच्या स्वाभाविक स्थितीचें द्योतक नव्हे. संसारांत कितीही हालअपेष्टा आल्या तरी आपल्यामध्यें जी एक सहाजिक विनोदवृत्ति असते, तिला बाधा येऊं देऊं नये. लहान मुलांमध्यें उचंबळणारा आनंद, त्यांचा कौतुकी स्वभाव आणि सहाजिक सहनशक्ति आपण होतां होईतों कायम टेवीत गेलें पाहिजे. निदान आपल्या व्यक्तिविषयक वैतागाच्या पायावर आपलें तत्त्वज्ञान रचूं नये; आणि कोणीं तसें तें रचल्यास इतरांनीं त्यास कां उगाच बळी पडावें?

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून आम्ही ज्या प्रपंचामध्यें वावरत आहों, त्याची थोरवी आणि पवित्रता ध्यानांत येईल. प्रपंच म्हणजे बेडी किंवा बंदिवास नव्हे. प्रथमपासून शेवटपर्यंत गर्भवासाच्या पूर्वींपासून स्मशानयात्रेच्या पलीकडे ह्या अनंतमार्गाचा प्रपंच म्हणजे आमच्यापुढें ईश्वरानेंच आमच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं उभारलेली एक शिडी आहे. तिच्यांतील कोणत्याही पायरीची अवहेलना करणें म्हणजे ईश्वरी योजनेसंबंधानें आक्षेप घेणें होय, मग सर्वच शिडीविषयीं तिरस्कार दाखविणें म्हणजे धर्माच्या नांवावर धर्मलंडपणा माजविणें होय. प्रपंच आणि परमार्थ हें द्वंद्व नाहीं. तीं शब्दांनीं मात्र भिन्न, पण वस्तुतः एकच व अभेद्य आहेत. ही द्वंद्वाची भाषाच आमच्या तोंडांतून निघून गेली पाहिजे. धार्मिकांनीं आपला सोंवळेपणा टाकला पाहिजे. बाह्य सृष्टीभोंवतालचा संसार, आणि आपलें मन हीं सर्व ईश्वरमय आहेत. ईश्वराच्या वसतीनें तीं क्षणोक्षणीं पवित्र होत आहेत असें जाणन आम्हीं सदा नम्र आणि सुखी असलें पाहिजे.

## आधुनिक युग आणि ब्राह्मसमाज.

(रविवार ता० २२-१-११ रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

एकादा घाडशी पुरुष फार दूरच्या प्रवासास निघाला असतां त्याच्या मनाची दोन प्रकारची स्थिति होते. एका बाजूनें घरदार, बायकामुलें, शेतीभाती यांकडे ओढा लागतो. आजपर्यंत मिळविलेला लौकिक आणि केलेली लोकसेवा यांत त्याचें मन गुंततें. दुसऱ्या बाजूस ज्या दूरच्या प्रदेशीं त्याला जावयाचें असतें तेथील अनुभव, सुखें आणि कर्तव्यें, तेथील नवीन संपादणी यांच्याकडे त्याचें मन ओढ घेतें. ज्या ज्या मानानें त्याचा प्रवास अधिक लांबीचा आणि मार्गांत अधिक विघ्नें असतील त्या त्या मानानें त्याच्या मनाची ही द्विधा वृत्ति अधिकाधिक जोरावते. व्यक्तीची ही जशी स्थिति होते, तशीच नवीन सुधारणेच्या मार्गानें जाण्यास निघालेल्या एकाद्या जुन्या जागृत राष्ट्राची स्थिति होते. आपलें भूतकालचें वैभव, पुराण ग्रंथ, प्राचीन पुरुष, धर्मशास्त्रें आणि वाङ्मय इत्यादिकांकडे त्या राष्ट्राचें लक्ष लागतें. सुधारणेच्या मार्गे लागून स्थित्यंतर करण्यापूर्वी आपल्या प्राचीन संपादणींतून कांहीं तरी निष्पन्न होणार नाहीं काय? याचे आशेनें तें एका बाजूनें त्यांतच घोटाळत रहातें. दुसऱ्यापक्षीं ह्या सर्व जाळ्यांतून आपला पाय काढून घेऊन त्याच्या भोंवती नवीन विचार, नवीन विश्वास, ताजी आशा आणि ताजा दम यांचें जें वातावरण पसरलेलें असतें, त्यांतून दूरवर दिसणाऱ्या नवीन ध्येयाकडे तें धांव घेतें. व्यक्तीच्या बाबतींत एकाच मनाची द्विधा वृत्ति होते, पण राष्ट्रांत निरनिराळे पुढारी आणि त्यांचे अनुयायी या दोन भिन्न वृत्तींचें द्योतक असतात, इतकेंच नव्हे तर पुष्कळवेळां प्रगतीच्या मार्गानें धांवणाऱ्यांचाही पाय वेळोवेळीं मागें घेतो आणि पुराणप्रिय लोकही वेळोवेळीं पुढें सरसावतात. याप्रमाणें पुढें सरण्याची आणि थांबून रहाण्याची अशा दोन भिन्न भावना एकाच राष्ट्राच्या एकाच वेळीं होतात. ब्राह्मसमाज ही आमच्या राष्ट्राची वर सांगितल्यापैकीं पहिली भावना होय. त्या समाजाची स्थापना अथवा या भावनेचा उदय प्रथम बंगाल्यांत होऊन आतां ८१ वर्षें पूर्ण झालीं म्हणून ह्या समाजाचा ८१ वा महोत्सव ठिकठिकाणच्या ब्राह्म अथवा प्रार्थनासमाजांमध्यें साजरा होत आहे.

ह्या प्रसंगीं आमचें राज्य आधुनिक युगाच्या वातावरणांत हालत आहे आणि ज्याचें नवीन नवीन संस्कार त्याच्यावर घडत आहेत,

त्या आधुनिक युगाचीं एक दोन लक्षणें काय आहेत तें आपण पाहूं, म्हणजे तीं लक्षणेंच आमच्या ब्राह्मसमाजाचीं आद्यतत्त्वें होत हें पुनः निराळें सांगण्याची गरज रहाणार नाहीं. ज्यांना ज्यांना या लक्षणांचा परिचय घडलेला आहे व ज्यांच्यावर त्यांचा संस्कार घडून ते जाणून बुजून पुढें पाऊल टाकीत आहेत ते सर्व ब्राह्मधर्मानुयायीच म्हणावयाचे. मग त्यांचा संबंध ब्राह्मसमाजाशीं जडलेला असो वा नसो. उलटपक्षीं जे केवळ सृष्टिक्रमानुसार ब्राह्मसमाजामध्यें जन्मले आहेत आणि केवळ चालीच्या ओघानें त्यांच्यावर यद्यपि समाजाचे सोळाही संस्कार घडले आहेत पण ज्यांना वरील लक्षणांचा परिचय आणि प्रत्यय प्रत्यक्ष घडलेला नाहीं ते ब्राह्म नव्हत.

मानवी इतिहासांत जीं निरनिराळीं युगें झालीं आहेत तीं कांहीं तरी काळाचे भाग आहेत असें नव्हे. तीं प्रत्येक कांहीं विशिष्ट लक्षणान्वित असतात. आधुनिक युगाचें पहिलें लक्षण विश्वरूपदर्शन होय. तें अर्जुनाला कृष्णानें कसें दाखविलें याचा सुंदर उल्लेख गीतेमध्यें आहे.

> अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ।
> नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपम्

यावर ज्ञानेश्वरांनीं सुंदर मराठी भाष्य केलें आहे तें असें:—

हू असो स्वर्गपाताळ । कीं भूमि दिशा अंतराळ । हे विवक्षा* ठेली सकळ । मूर्तिमय देखतसे ॥ तुजवीण एकादियाकडे । परमाणूहि एवुला कोंडे । अवकाश पाहतसें परि न सांपडे । ऐसें व्यापिलें त्वां ॥ इथें नानापरी अपरिमितें । जेतुलीं सांठविलीं होतीं महाभूतें । तेतुलाही पवाड तुवां अनंतें । कोंदला देखतसें ॥ ऐसा कवणे ठायाहूनि तूं आलासि । एथ बैसलासी कीं उभा आहेसी । आणि कवणीये मायेचीये पोटीं होतासी । तुझें ठाण केवढें ॥ तुझें रूप वय कैसें । तुज पैलीकडे काय असे । तूं कायिसयावरी आहासि ऐसें । पाहिलें मियां ॥ तव देखिलें जीं अवघेंचीं तरी आतां तुझा ठाव तूंचि । तूं कवणाचा नव्हेचा ऐसाची । अनादि आयता ॥ तूं उभा ना बैठा । दिघडा ना खुजटा । तुज तळीं वरी वैकुंठा । तूंच आहासी ॥ तूं रूपें आपणयांचि ऐसा । देवा तुझी तूंचि वयसा । पाठी पोट परेशा । तुझें तूं गा ॥ तुज महामूर्तिचिया आंगीं । उमटलिया पृथक् मूर्ति अनेगी । लेइलासि वाने परीची आंगी । ऐसा आवडतु आहासी ॥ नाना पृथक् मूर्ति तिया द्रुमवल्ली । तुझिया स्वरूपमहाचळीं । दिव्यालंकार फुलीं फळीं । सासिन्नलिया ॥ ऐसा पवाड मांडूनि विश्वाचा । तूं कवण पां एथ कोणाचा । हें पाहिलें तव आमुचा । सारथि तोचि तूं ॥ तरि आतां दिठीचा विटाळ गेला । तुवां सहजें दिव्यचक्षू केला । म्हणोनि यथारूपें देखवला । माहिमा तुझा ॥

हें विश्वरूपदर्शन हल्लींच्या काळीं आम्हां आधुनिकांना मिळालेलें आहे. आधुनिक शास्त्रें हीं श्रीकृष्णानें सांगितल्याप्रमाणें आम्हांस दिलेले दिव्य चक्षु होत.

> न तुमां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा । दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥

ह्या दिव्य चक्षूनें आम्ही ईश्वरास यथारूप पहातों; तथापि आमच्या दृष्टीचा विटाळ त्या निराकार तेजाला होत नाहीं. त्यामुळें आमची त्याच्यावर विशुद्ध श्रद्धा बसते. आमचा बिनमताचा विश्वास Creedless faith आहे. म्हणजे मतमतांतराच्या भानगडींत न पडतां आम्ही त्याच्या प्रत्यक्ष दर्शनानेंच तृप्त होतों. सर्व विश्वाचा विस्तार पाहून तो विश्वेश्वर आमचा सारथी आहे, आमचा मार्गदर्शक आहे, आमचा संसारशकट त्याचे हातीं आहे, असा आमचा विश्वास होतो. कोणत्याही अनुदार आणि एकदेशीय मतामुळें आमचा हा विश्वेश्वरावरील विश्वास आकुंचित होत नाहीं. या दर्शनामुळें या युगामध्यें ज्ञानाचीं सर्व द्वारें खुलीं झालीं आहेत, त्यावरील प्राचीन मतांचें दडपण उडून गेलें आहे. चहूंदिशीं वहाणारे ज्ञानाचे प्रवाह आम्हांस त्याचेंच स्वरूप दाखवितात, "किंबहुना आतां । तुझें तूंचि आघवें अनंतां । हें पुढत पुढत पाहतां । देखिलें मियां ॥"

आधुनिक युगाचें दुसरें लक्षण अखंड उल्हास हें होय. बरेच दिवस गोठ्यांत बांधलेल्या वांसराला बाहेर एकदम उघड्या मैदानांत आणलें असतां त्यास जसा अपूर्व उल्हास होतो आणि तें

* In that high hour of visitation thought was not—*Wordsworth.*

दशदिशा आनंदानें वागवूं लागतें, तसें आधुनिक मनुष्यांस झालें आहे. आम्ही हवेंतून उडूं पहातों, लोहमार्ग आणि जलमार्ग यांचीही बंधनें आम्हांस नकोशीं वाटतात, सर्वांहून प्रिय प्राण याचीही पर्वा न करतांना आम्ही अंतराळांत हजारों कोस उंच जाऊन प्रवास करूं पहातों, पृथ्वीचे काने कोपरे, अत्यंत शीतल प्रदेशांतील तिचे टोंक, अत्यंत उष्ण आणि रूक्ष प्रदेशांतील तिचा कटिप्रदेश आम्ही शोधून काढीत आहों. तिच्या गर्भांत काय आहे, तिच्या भोंवतालीं काय आहे, तिचें घटकावयव काय आहेत, तिचें वय काय, वजन काय, दूरदूरच्या खगोलांचीही वस्तुस्थिति काय, या सर्वांचा आम्ही शोध उल्हासानें करीत आहों. आणि त्यांत आमचा नवीन विश्वास, नवीन आशा, आकांक्षा उत्तरोत्तर बळावतच आहेत. नुसत्या अध्ययनांतच नव्हे तर खेळ आणि विनोद यांमध्येंही आम्हां आधुनिकांचा धाडसी उल्हास दिसून येत आहे. केप कॉलनीपासून केरो शहरापर्यंत आफ्रिकेच्या निर्जन प्रदेशांतून मोटर गाड्यांची लौकरच एक शर्यत होणार आहे असें ऐकतों. सहारासारखीं अरण्यें, दाट जंगलें, मोठ्या नद्या आणि सरोवरें, हीं सर्व उल्लंघून ही शर्यत मारली जाणार आहे! असा हा आधुनिक उल्हास विश्वरूपदर्शनाचें हें आवश्यक पर्यवसान यास कोणी आधुनिकांचा जडवाद असें म्हणतात. पण खरें पहातां असें म्हणणाऱ्यांचाच हा जडवाद आहे.

तिसरें लक्षण सार्वत्रिक परस्पर सख्य हें होय. अनेक राष्ट्रें, अनेक भाषा, अनेक चाली आणि धर्म यांचा प्रत्यक्ष एकमेकांशीं संबंध जडूं लागल्यामुळें हल्लींच्या काळीं पृथ्वीवर अपूर्व स्नेहसंबंध अनुभवास येऊं लागला आहे. सत्याची सार्वत्रिकता आतां जशी सिद्ध होत आहे, तशी पूर्वीं कधीं झाली नाहीं. त्यामुळें जातीजातींतील तिरस्काराची भावना आतां अगदीं संपुष्टांत येऊं लागली आहे कोणी म्हणतील कीं अद्यापि जातिमत्सर आणि जातिद्वेष पृथ्वीवर वाढत आहे, आणि यांस प्रत्यंतर पहावयाचें असल्यास इंग्लंडांत होऊं घातलेली सर्व-जातिपरिषद ( Race Congress ) ही होय. जातिमत्सर नसता तर ही परिषदच करण्याचें कारण नसतें. पण आमचें तर यांचे उलट असें म्हणणें आहे कीं, ही परिषद जातिमत्सराचा वेग आतां वसरूं लागला आहे हें दाखवीत आहे. मनुष्यांमनुष्यांमधील दुजाभावाचा पूर जो आजपर्यंत भरून वाहत होता, त्याला आतां ओहोटी लागली, आणि तो लवकर नाहीं, तरी कांहीं काळानें आटून जाणार. भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न लोकांमध्यें सत्याचा, शीलाचा आणि स्नेहाचा आविर्भाव होत आला आहे, ही भावना आतां बळावून सर्व धर्मांमध्यें परस्पर सख्य जडत चाललें आहे. यूरोप, अमेरिका या ठिकाणीं आजपर्यंत उदार धर्मांचीं माणसें आणि संस्था जें परधर्मांतील सत्यशोधनाचें काम करीत होत्या तें आतां गेल्या वर्षीं एडिंबरो आणि या वर्षीं अलाहाबाद येथें भरलेल्या जुन्या ख्रिस्ती आणि हिंदुधर्मांच्या परिषदेनें चालविलेलें आहे. हें आधुनिक युगाचें विशिष्ट लक्षण आणि अपूर्व महिमा होय.

याप्रमाणें विश्वरूपदर्शन आणि तज्जन्य अकलुषित विश्वास, अखंडित उल्हास आणि सार्वत्रिक स्नेह हीं आधुनिक युगाचीं तीन लक्षणें हींच आमच्या ब्राह्मसमाजाचीं तीन आद्यतत्त्वें होत. आमच्या राष्ट्रांत ब्राह्मसमाजाशिवाय इतरही समाज, राष्ट्रहिताचीं कामें करीत आहेत. आर्यसमाजाचा देशाभिमान, थिऑसफीची सूक्ष्म विद्या, आणि रामकृष्ण मिशनचें वैराग्य या निरनिराळ्या तत्त्वांच्या द्वारें आमचें हित होणार नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं; पण हीं तीन लक्षणें मागील निरनिराळ्या युगांचीं आहेत. सर्वात्मक भाव, सुस्पष्ट दर्शन आणि वृत्तीचा उल्हास हीं आधुनिकयुगाचीं लक्षणें आमच्या राष्ट्रास प्रगतीच्या मार्गानें पुढें ओढीत आहेत, आणि ही प्रगतीची भावना म्हणजे ब्राह्मधर्म होय.

---

## धर्मसाधन.

( रविवार ता. ५-३-११ रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश. )

ब्राह्म अथवा प्रार्थनासमाजाच्या सभासदांच्या मनामध्यें वेळोवेळीं असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे कीं आपण समाजाचे सभासद होऊन इतके दिवस झाले त्यांत आपलें धर्मसाधन किती झालें? समाजांत येण्यापूर्वींच्या आणि आल्यानंतरच्या स्थितींत फरक काय पडला आहे? प्रार्थना आणि उपदेश यांच्या द्वारें आपणांपुढें जें उच्च ध्येय

ठेवलें जातें त्यांपैकीं कोणता भाग आपल्या चारित्रामध्यें संपादित झाला आहे ? परंतु होत असलेल्या प्रयत्नाचे मानानें पहातां वरील प्रश्नास नेहमींच आशाजनक उत्तर मिळत असेल असें वाटत नाहीं. जगाच्या इतिहासांत आजवर निरनिराळे जे धर्मसंप्रदाय होऊन गेले त्या सर्वांचा उद्देश व्यक्तीचें आणि समुदायाचें धर्मसाधन व्हावें हाच होता. प्रार्थनासमाजादि जे संप्रदाय आधुनिक काळांत मोठ्या कसोशीनें प्रस्थापित करण्यांत आले आहेत त्यांचाही उद्देश हाच आहे. एकामागून एक इतके सांप्रदाय काढण्यांत येऊन आणि त्या त्या काळांत त्यांची इतक्या आस्थेनें जोपासना करूनही ज्या अर्थी धर्मसाधनाविषयीं वरील धरसोडीचें उत्तर मिळतें त्या अर्थी धर्मसंप्रदाय आणि धर्मसाधन या दोन परस्परसंबंध विषयांवर पृथक् पृथक् थोडासा विचार करणें आवश्यक आहे.

नित्याच्या आपल्या बोलण्याच्या व्यवहारामध्यें धर्म, अर्थ काम आणि मोक्ष असे पुरुषार्थांचे चार प्रकार येतात. पैकीं विचार करितां मोक्ष, निर्वाण, पूर्णावस्था किंवा Salvation ही गोष्ट अनंतकाळची आहे, ही कांहीं केव्हांतरी एकदां मिळून जाण्यासारखी नाहीं म्हणून तिचा पुरुषार्थांत समावेश करतां येत नाहीं. दुसरे जे अर्थ आणि काम हे पुरुषार्थ आहेत ते इतके समर्याद आहेत कीं तुह्मी आह्मी साधारण माणसें देखील प्रसंगवशात् त्यांची क्षुल्लकता जाणूं शकतों. येणेंप्रमाणें दोन अगदीं समर्याद आणि एक अगदींच अमर्याद अशा प्रकारें तिन्हींची विल्हेवाट लागून चवथा राहणारा जो धर्म त्याजविषयीं आज विचार कर्तव्य आहे. कित्येकांचें मतें धर्म म्हणजे नुसती नीति असा अर्थ होतो, परंतु नीति म्हणजे हा एक आमचा दुसऱ्याशीं संबंध आहे. आपण जगांत एकटेच असतां किंवा आपल्यास दुसऱ्या एका दूर निर्जन प्रदेशीं सोडून दिलें असतां नीतीचा बहुतेक भाग संपुष्टांत येऊन नीति अशी कांहीं राहतच नाहीं. आत्मनीतीचीं तत्वें म्हणून जीं कांहीं आहेत तीं तर खाण्यापिण्याच्या नेमस्तपणाप्रमाणें वरवरचेच नियम असतात. एकूण आपण एकटेच असतांना नीतीचा विशेष प्रश्न रहात नाहीं. कारागृहांत पडलेल्या दुर्दैवी माणसांची अशीच स्थिति होते. परंतु आपल्या मनांत उद्भवणारीं सुखदुःखें, यत्न विश्रांति, विवेक आणि समाधि, श्रद्धा आणि आशा, इत्यादि थोर, गंभीर आणि पवित्र भावनांचें जें साम्राज्य चालू असतें त्याला अशा एकांतवासाची आणि कारागृहाची कांहीं बाधा होत नाहीं. त्याचें कार्य जसेंच्या तसेंच चालतें किंबहुना अधिक बळावतेंही. त्या भावना म्हणजे धर्म होय. त्यांचें पोषण करणें, उत्तरोत्तर संशोधन आणि वृद्धि करणें हें धर्मसाधन होय.

व्यक्तीचे अर्थ आणि काम हे दुसरे पुरुषार्थ साधण्यामध्यें आणि समाजांत राहून नीतीचीं निरनिराळीं कर्तव्यें करण्यामुळें ह्या धर्मसाधनाचें काम कोणत्याही प्रकारें खोळंबतां कामा नये. नाहींतर असा प्रकार व्हावयाचाः—

देवधर्म सांडी पडिला सकळ ।
विषयीं गोंधळ गाजतसे ॥

धर्म म्हणजे नीति, असें ज्याप्रमाणें कांहींकांचें मत पडतें त्याचप्रमाणें वरील धर्मसाधनही अर्थ आणि काम हीं साधित असतांना आणि समाजाचे निरनिराळे व्यवहार करीत असतांनाच घडतें, त्याला धर्माच्या नांवानें निराळेंच असें कांहीं करावयास नको असें कित्येक सुज्ञ माणसांचें म्हणणें पडतें आणि त्यांचा तसा अनुभवही असतो. ह्या म्हणण्यांत जरी पुष्कळ तथ्यांश आहे तरी तें सर्वांशीं खरें नाहीं. मनुष्यजातीचा किंबहुना सर्व जड सृष्टीचा जो सतत विकास होत चालला आहे त्याचाच एक भाग आमचें हें धर्मसाधन आहे. तें आम्हीं बुद्ध्या केलें नाहीं तरी तो स्वभावतःच घडणारा एक परिणाम आहे. असा केव्हां केव्हां शहाण्या माणसाचा समज होतो; परंतु वर सांगितलेल्या पवित्र भावना अशा रीतीनें केवळ अंधपरंपरेनें किंवा आपोआप आम्हांस मिळालेल्या नसतात. त्यांचा पूर्वापर संबंध यद्यपि याच क्षणीं आपणांस आठवत नसला तरी केवळ इतर पुरुषार्थांमध्यें त्याची कशी तरी भेसळ करून देऊन तो निराळा असा मुळीं नाहींच असें म्हणण्याचें धाडस आम्हांस तरी होत नाहीं.

उलटपक्षीं आमचे जे निरनिराळे जुने, नवे धर्मसंप्रदाय चालू आहेत त्यांच्या योगें आमचें धर्मसाधन घडतें असें समजून कित्येक लोक स्वस्थ राहतात. धर्मसंप्रदाय काढणें हा एक धर्मसाधन करण्याचा मुख्य मार्ग आहे. यांत शंका नाहीं आणि

याचा विचार आपण पुढील खेपेस करूं. परंतु आज आपल्यास जी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं केव्हां केव्हां या धर्मसंप्रदायामुळेंच धर्मसाधनास अडथळा येतो. मागें एका उपासकांनीं वाचून दाखविलेल्या उताऱ्यांत सांगितल्याप्रमाणें धर्माचे प्रचारक आणि पुरोहित हे ज्या प्रम, पश्चात्ताप, आत्मपरीक्षण इत्यादि धर्मभावनांचें नित्य प्रवचन करीत असतात त्यासंबंधीं संवयीमुळें त्यांच्यामध्यें एक प्रकारची जडता येते, कोरडेपणा येतो; आणि ते त्यांपासून इतरांहूनही जास्त पराङ्मुख होण्याचा संभव आहे. आजपर्यंत एकामागून एक असे नवीन संप्रदाय काढण्याची जरूरी लागली आणि अझूनही पुढें लागेल. यावरूनही संप्रदायावरच सर्वस्वी अवलंबून राहून चालणार नाहीं हें उघड दिसतें. आम्ही ज्या कांहीं सांप्रदायिक प्रार्थना आणि उपदेश करितों त्यांच्यायोगें इतरांस जागृति होऊनही स्वतः ती न होण्याचा संभव असतो. शुद्ध कांचेंतून ज्या प्रमाणें प्रकाशाचीं किरणें पार जातात त्याचप्रमाणें ईश्वरी प्रकाशाचीं किरणें आमच्यांतून पार निघून गेलेलीं स्वतः आम्हांसच कळत नाहींत असें होतें !

ह्यावरून वर म्हटल्याप्रमाणें, जरी संसारांतील अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थ साधीत असतांना कांहीं अंशानें धर्मसाधन होतें तरी तेवढ्यावरून जसें भागत नाहीं तसेंच जरी एकाद्या संप्रदायांत शिरून पूर्णपणें तन्मय होऊन बऱ्याच अंशानें धर्मसाधन होण्यासारखें आहे तरी तेवढ्यानेंही भागत नाहीं हें उघड होतें. धर्मसाधन हे प्रत्येक व्यक्तीनें चिंतन, मनन, आत्मसंयमन, आत्मपरीक्षण, परसेवा व सहनशीलता इत्यादिद्वारां स्वतःच्या अनुभवानें व प्रयत्नानेंच केलें पाहिजे. ह्याहून अन्य उपाय आहेत पण त्यांची खात्री सांगवत नाहीं.

---

## नैराश्यवाद.

(ता. २५-४-१०रोजीं प्रार्थनासमाजांत केलेल्या उपदेशाचा सारांश.)

**भक्त देवाजीचे भोळे । त्यांचे पायीं ज्ञान लोळे ॥ भक्तीवीण शब्दज्ञान । व्यर्थ अवघें तें जाण ॥ नाहीं ज्याचें चित्तीं भक्ति । जळो तयाची व्युत्पत्ति ॥ नामा ह्मणे ऐसें जाण । नाहीं भक्तांसी बंधन ॥**

जे भोळे लोक असतात त्यांच्या पायीं ज्ञान लोळत असतें. जे भक्त नाहींत त्यांचें शब्दज्ञान व्यर्थ होय. जे भक्त ते मुक्त होत. त्यांना कोणत्याही प्रकारचें बंधन नाहीं. प्रेमाच्या महत्त्वाबद्दल अशाच प्रकारचा दुसरा एक उल्लेख आहे ( सेन्टपालचें कारेंथकरास पहिलें पत्र ) तो असाः—१ मनुष्याचें व देवदूतांचें वक्तृत्व माझ्याठायीं असलें परंतु मजमध्यें प्रेम नाहीं तर नाद करणाऱ्या पितळेच्या भांड्याची किंवा वाजवावयाच्या झांजेची व माझी योग्यता सारखीच. २ मला धर्मज्ञानाची प्रेरणा होत असली, सर्व गूढ गोष्टी व विद्या अवगत असल्या आणि श्रद्धेच्या जोरावर डोंगर हालविण्याची शक्ति मजमध्यें असली; परंतु मजमध्यें प्रेम नाहीं तर मी कांहींच नाहीं. ३ आणि मीं आपली सर्व संपत्ति गरिबांना अन्नदान करण्यांत खर्च केली, किंबहुना आपलें शरीर जिवंत जाळण्यासाठीं देऊन टाकिलें, परंतु मजमध्यें प्रेम नाहीं तर मला कांहीं लाभ नाहीं. ४ प्रीति आहे तेथें सहनशीलता नांदते, दया नांदते, तेथें हेवा रहात नाहीं; तेथें अहंकार नाहीं, डौल नाहीं, स्वार्थ रहात नाहीं, चीड येत नाहीं, अपकार ध्यानांत येत नाहीं. ५ असदाचरणाचा कंटाळा येतो, सत्यांत आनंद वाटतो. ६ सर्व कांहीं चालतें, सर्वांचा विश्वास वाटतो, सर्वांची आशा वाटते, सर्व सहन करितां येतें. ७ प्रीति कधीं हताश होत नाहीं.

मानवी संसाराकडे पाहिलें तर हा संसार सुखमय आहे कां दुःखमय आहे याबद्दल मनुष्याची त्रेधा उडते. निराशावादी लोक संसाराचें अंधकारामय चित्र रेखाटतात. विनोदी लोकांच्या लेखामध्यें देखील निराशेचें विष कालविलेलें असतें. मार्क ट्वेनसारख्या विनोदी माणसांनीं देखील एके ठिकाणीं निराशा उत्पन्न करणारे उद्गार काढिले आहेत ते असेः-" ज्यानें संसारामध्यें अनुभव येण्याइतके बरेचसे दिवस काढिले आहेत त्याला मूळ पुरुष जो आदम त्याचे आपण किती ऋणी आहों हें समजतें. त्यानें मनुष्यजातीवर कोणता उपकार केला म्हणाल तर त्याच्यामुळें जगांत प्रथम मरण आलें हा होय. " 'जन्म झाला असतां

आनंद व मृत्यूमुळें मनुष्य दुःखी होतो तो कां? कारण तो प्रसंग आपणावर नसतो म्हणून.' येणेंप्रमाणें संसारांत दुःख आहे, एवढेंच नव्हे तर सर्वांत श्रेष्ठ प्राणी जो मनष्य तो सर्वांत नीच कसा आहे याविषयीं खालील वचनें दिलीं आहेतः— (पर्शियन कवि सादी म्हणतो.) "मनुष्य हा कुत्र्यापेक्षांही कृतघ्न आहे. कुत्र्याला शंभर खडे मारून एक भाकरीचा तुकडा त्याच्या पुढें टाकिला तर तो त्या खड्यांचें दुःख विसरून जाऊन भाकरी देणाराचें आभार मानितो. पण मनुष्यावर शंभर उपकार केले व एक अपशब्द बोलल्यास तो ते शंभर उपकार विसरून तेवढा अपशब्दच ध्यानांत ठेवील.' अशा प्रकारचें मनुष्यस्वभावाविषयीं सादीचें मत आहे. विकास पावलेल्या अमेरिका देशांतील मार्क ट्वेननें सुद्धां सादीवर या बाबतींत वरचढ केली आहे. तो म्हणतो—" भुकेनें मरत पडलेल्या कुत्र्याला तुम्ही उचलून जर त्याला उत्तम प्रकारें पुष्ट केलें तर तो तुम्हाला चावणार नाहीं. असा हा मनुष्य व कुत्रा यांत फरक आहे." अगदीं रानटी देशापासून तों अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांतील विनोदी मनुष्यांकडूनही असें प्रतिपादिलें आहे. असा हा संदेश जर निराशावादी आहे तर उल्हासप्राप्तीकरितां आम्हीं कोणाच्या तोंडाकडे पाहावें? तत्त्वज्ञान्यांकडे जावें तर ते गंभीर, दुःखी व उदासी असतात, कवींकडे जावें तर त्यांचीं काव्यें इतकीं काळ्या रंगाचीं दिसतात कीं तीं आपणास नकोशीं वाटतात. मार्क ट्वेनसारख्या विनोदीवाद्याकडे गेलों तरी सुद्धां आमची निराशाच होते. तर संसार खरोखरच दुःखमय आहे कीं काय याचा विचार केल्यास दुःखापेक्षां सुखच जास्त आहे हें आपणांस कळून येईल. सुखापेक्षां दुःख जास्त वाटतें याचें कारण आपल्या अंतःकरणांत प्रीति किंवा भक्ति नसते व त्यामुळें आपणास सर्वत्र निराशा वाटते. भक्ति हेंच एक सत्त्व आहे. संसाराशिवाय जर आपली सुटका नाहीं तर आपली दुःखावस्था कां होते? हें आपण पाहूं. संसार दुःखमय वाटण्यास पहिलें कारण हें कीं, आपल्या भोंवतालची परिस्थिति सदोष असते. परिस्थितीच्या दोषामुळेंच जें शहर खेड्यापेक्षां सुखमय व्हावें, त्या शहरामध्यें मनुष्यास अनेक व्याधि जडतात. अशाच प्रकारची सदोष परिस्थिति मार्क ट्वेनची झाली. लहानपणीं खोड्या व उनाडक्या करीत त्याचे दिवस सुखाचे गेले. पण पुढें त्याची परिस्थिति बदलली म्हणजे यथापयशामध्यें तो पडला. त्याची बायको मेली. दोन तरुण मुली मेल्या. व त्यामुळें त्यास संसार दुःखमय वाटूं लागला. त्याच्या परिस्थितीमुळें त्याला संसार दुःखमय वाटला म्हणून आपणांसही तो तसा कां वाटावा? नदीचें पाणी अस्वच्छ नसतें. पण ज्या पात्रांतून तें येतें त्या पाण्याच्या परिस्थितीमुळें आलेला गढूळपणा, तें पाणी शुद्ध करून काढून टाकिला पाहिजे. संसार दुःखमय वाटण्यास दुसरें कारण म्हटलें म्हणजे स्वदोष हें होय. परिस्थिति चांगली आहे, पण सुसंधि दवडल्यामुळें जाणनबुजून किंवा आळसानें त्याच्या हातून अन्याय होतात. अशा मनुष्याच्या दोषामुळेंच त्याला जी हळहळ वाटते व संसार दुःखमय वाटतो त्याच्या बोलण्याकडे आपण लक्ष देऊन निराशावादी काय म्हणून व्हावें? तिसरें कारण मनुष्याचा मूळचाच दूषित स्वभाव हें होय. परिस्थिति चांगली असते, हातून कांहीं दोष घडलेले नसतात, पण स्वभावच दूषित असतो. एकाद्या बाजाचीं सर्वांग योग्य प्रमाणांत असतात, पण त्याचें (Timber) लांकूड चांगलें नसलें तर जसा त्या बाज्यांतून चांगला आवाज निघत नाहीं, त्याप्रमाणें जन्मतःच दुःखी स्वभाव असल्यामुळें त्याला सर्व संसारच दुःखमय वाटूं लागतो. (१) परिस्थिति, (२) स्वदोष, (३) स्वभाव अशा तीन प्रकारच्या कारणांमुळें विशिष्ट व्यक्तींना संसार दुःखमय वाटत असतो. पण त्यांच्या सांगण्यावरून आपणही संसार दुःखमय आहे असें म्हणूं नये. बंधुभगिनींनो, आपली तशी परिस्थिति आहे कां? स्वदोष आहेत कां? व आपला स्वभाव तसा आहे कां? याचा पूर्ण विचार करून दोष असतील ते काढून टाकण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. म्हणजे आपली मूळ स्थिति सुखरूपच आहे हें कळन येईल. जे दुःखी लोक दुसऱ्याचें दुःख ऐकतात त्यांची तर संसार दुःखमय आहे अशी बालंबाल खात्री झालेली असते. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' त्यांना त्याच्या विरुद्ध कितीही सांगितलें तरी त्यावर त्यांचा विश्वास बसत नाहीं. मग संसारच जर

दुःखमय तर देव कोठला असें त्यांना वाटूं लागतें. पण ज्यांच्यावर असा प्रसंग आला नाहीं त्यांनीं खरें कारण शोधून काढून त्याचें निराकरण करण्याचा प्रयत्न करावा. लहान मुलाला स्वभावाची जाणीव नसते म्हणून तें उल्हासी असतें.

सुदैवानें तशीच स्थिति राहिली तर बरें, पण दुर्दैवानें परिस्थितीमुळें एकादा दोष जडला तर तो आपण काढून टाकिला पाहिजे. जगत् जर दुःखी तर त्यांत आम्ही रहाणारे दुःखीच होणार, सुखी कोठून होणार अशी भ्रामक समजूत कोणी करून घेऊं नये. बुद्धाचें सुद्धां हेंच सांगणें आहे. ते म्हणतात ' दुःख दुःख म्हणून जें आहे तें काल्पनिक नव्हे, खरोखरीचें आहे, पण त्यास कारण आहे. तें निवार्य आहे, अनिवार्य नाहीं; तुम्ही स्वयंभु आहां दुःख स्वयंभु नाहीं. तुमच्या ठिकाणचे दोष काढून टाका. सुखदुःखाची वजा बाकी केली तर सुखच जास्त आहे हें तुम्हास कळेल. ' निराशेचें जेव्हां वारें सुटतें तेव्हां आपणांस सुखाची विस्मृति होते. याकरितां हा संसार सुखमय वाटण्यास शिरोभागीं दिलेल्या नामदेवाच्या अभंगांत सांगितल्याप्रमाणें आपण जर भोळी भक्ति कायम ठेविली तर आपल्या ठिकाणीं सर्व ज्ञान येईल.

## आनंदवाद.

( ता. १–५–१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश. )

**ब्रह्मज्ञान नव्हे लेकराच्या गोष्टी। तेथें व्हावा पोटीं अनुताप । दगडाहूनि जीव करावा कठीण। अंतरींचा शीण तेव्हां जाय ॥ मेल्या मनुष्याची न धरिती आस। तैसा हो उदास संसारासी ॥ तुका म्हण येथें कराराचें काम । मग सुखधाम जवळींच ॥**

मागील खेपेस आपण नैराश्यवादाचें विवेचन करून तो कसा व्यर्थ आहे आणि आपणांस कसा पटत नाहीं हें पाहिलें. या खेपेस आनंदवादाचें विवेचन करून त्याचें साधन काय आहे तें पाहूं. सुदैवानें जे स्वभावतःच सुखी, जन्मतःच आनंदी, आणि उल्हासी असे असतात, संसारांतल्या कोणत्याही प्रसंगानें ज्याच्या उपजत सुखमय स्थितीला बाधा येत नाहीं, अशांना आनंदवादावर निराळा उपदेश करण्याची गरज नाहीं. लहान मुलास मद्यपाननिषेधसंबंधीं व्याख्याना ची जरूरी नाहीं, किंबहुना त्यामुळें धोकाच आहे. कारण त्याच्या कोवळ्या मनाला मद्य म्हणजे काय याची कल्पनाही नसते. ती कल्पना कदाचित् अशा प्रकारच्या व्याख्यानामुळें येऊन त्याच्या उच्छृंखळ बाळस्वभावानुसार मद्याविषयीं अनिष्ट जिज्ञासाही उत्पन्न होण्याचा संभव आहे. तद्वत्, वरील स्वाभाविक उल्हासवृत्तीच्या लोकांची स्थिति होण्याचा संभव आहे. उलटपक्षीं, जे लोक स्वभावतः दुःखी आणि उदास असतात, ज्यांच्या मनाची मूस जणं काय उद्वेगाच्या धातूनेंच ओतलली असते, अशांनाही केवळ असल्या उपदेशापासून विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं. त्यांच्याशीं उल्हासी माणसाचा निरंतर समागम घडावयाला पाहिजे आणि त्यांच्या आनंदी मित्रांनीं मनाचें आकर्षण करून त्यांच्या मनाची मूळरचना बदलण्याचा सतत प्रयत्नच केला पाहिजे. पण तुम्ही आम्ही साधारण माणसें अशा वरील दोन अपवादक आणि अतिरेकाच्या स्थितींतील नसतो. उल्हास आणि उदासीनता या दोन्ही भिन्न भिन्न स्थितींची परिवर्तनें प्रसंग, समागम आणि अभ्यास यांच्या योगें आमच्या मनांत चालली असतात. तेव्हां अशा साधारण बहुसमुदायासाठींच आजचा उपदेश आहे. अशा साधारण माणसाच्या विचारामध्यें जो निराशावाद आलेला असतो तो त्यांना दुसऱ्याच्या विचारामुळें, अनुभवामुळें, दूषित वाङ्मयामुळें, अपुरत्या किंवा खोट्या तत्त्वज्ञानामुळें आलेला असतो. तो घालवावयाचा झाल्यास ज्या कारणांनीं तो आलेला असतो त्याच कारणांनीं, तो काढला पाहिजे. एकदां एका वेड्याचे मनानें असें घेतलें कीं, आपण मेलों आहों. या भ्रमामुळें त्यानें जेवण मुळींच सोडून दिलें. त्याचा हा भ्रम एका कुशल डॉक्टरानें जाणून तो काढून टाकावयास त्यानें पुढील उपाय केला. सुमारें दहा जणांस आपण मेल्याचा पूर्ण भास त्या वेड्यास करून देण्यास त्या डॉक्टरानें सांगितलें. त्याप्रमाणें बराच वेळ अगदीं मेल्यासारखें पडल्यावर व आपण मेलों आहों अशी त्या वेड्याची खात्री पटविल्यावर हे दहा जण आपआपसांत बोलूं लागले, खेळूं

लागले व कांहीं वेळानें त्यांच्यासाठीं भोजनगृहांत उत्तम तयारी करून ठेविली होती तिकडे निघाले. हे सर्व त्या वेड्याच्या देखतच चाललें असल्यामुळें मृत मनुष्येंही आपल्या परीनें चालतात, बोलतात व जेवतात असा त्याचा दुसरा भ्रम होऊन त्यामुळें त्याच्या पहिल्या भ्रमाचें निरसन झालें, आणि तोही त्या दहा जणाबरोबर यथेच्छ जेवला. असाच उपाय आम्हांला या वरील दुःखवाद्यासंबंधीं करावयास पाहिजे आम्हांला आमच्याच स्वदेशी वाङ्मयांतून व विचारांतून आनंदाचीं बीजें शोधिलीं पाहिजेत. पण आमचें वाङ्मय एककली असल्यामुळें तसें करणें थोडें कठीण जाईल तथापि एकच पागोटें असलें तरी तें मोठें असल्यास आलटूनपालटून बांधल्यास साजेसें करतां येतें तसाच प्रकार आमच्या वाङ्मयाचा करतां येईल. आपण आज नुसत्या तुकारामाच्याच अभंगांतन आनंदवाद कसा निघतो तें पाहूं.

"हरीचिया भक्ता नाहीं भय आणि चिंता। दुःख निवारितां नारायण।" असें तुकारामानें म्हटलें आहे. पण भक्तीच्या ह्या लक्षणामुळें आळस वाढण्याचा संभव आहे असें कोणास वाटेल पण—

'पोशा आळशी पातकी। एक आहें मी त्रीलोकीं।' व 'झालों कासावीस वेढिलों आळसें। शरीराचा त्रास आला मज॥ तुका म्हणे घाडी पाडिलें आळसें। तुझें नाम कैसें राहे आतां॥'

यावरून तुकारामाला आळसाची किती चीड होती तें दिसून येतें. दुसरे ठिकाणीं तर त्यांनीं म्हटलें आहे कीं,

'नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोडें। आणूनि निराळें द्यावें हातीं॥ इंद्रियांचा जय साधूनियां मन। निर्विषय कारण असे तेथें॥ उपास पारणीं अक्षरांची आटी। सत्कर्मा शेवटीं असे फळ॥ आदरें संकल्प वारीं अतिशय। सहज तें काय दुःख जाण॥ स्वप्नींच्या घायें विवळसी वायां। रडें रडतियासवें मिथ्या॥ तुका म्हणे फळ आहे मुळापाशीं। शरण देवाशीं जाय वेगीं॥'

यांत तुकारामानें म्हटलें आहे कीं, 'रडें रडति यासवें मिथ्या' म्हणजे रडणाऱ्याबरोबर आपण रडणें हें वेडेपणाचें आहे. दुसऱ्याला दुःख झालें आणि तो आपल्या दुःखाचा अनुभव सांगतो तेवढ्यानेंच आपण दुःखी होण्याचें कारण नाहीं. आपल्या मनामध्यें धीर आणि समाधान ठेविल्यास ईश्वर जवळच आहे. पण तोही मोक्षाचें आयतेंच गांठोडें देतो असें नाहीं.त्याला घोर यत्न केला पाहिजे प्रथम मन निर्विषय आणि निर्वासन करण्याचा निषेधात्मक यत्न करून नंतर सत्कर्मांचा विध्यात्मक यत्न करावयास पाहिजे, म्हणजे दुःख हें पोकळ आहे असें कळून येईल. अशा प्रयत्नान्तीं परमेश्वर आहे आणि तो सुखस्वरूप आहे हें कळून येईल.

"झाला प्रेतरूप शरीराचा भाव। लक्षियेला ठाव श्मशानींचा॥ रडती रात्रंदिवस कामक्रोधमाया। म्हणती हायहाय यमधर्म॥ तुका म्हणे रक्षा झाली आपोआप। उजळीला दीप गुरुकृपा॥"

यामध्यें बौद्धांचें निर्वाण,

"आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो झाला सोहळा अनुपम्य। एकदेशीं होतों अहंकारें आथिला। त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा।" यामधील ब्रह्मवाद्यांचा अभेद साक्षात्कार; "सरलें आतां नाहीं। न म्हणे वेळ काळ कांहीं। विठ्ठल कृपाळु माउली। सदां प्रेम पान्हायेली॥ क्षीण न विचारी भाग। नव्हे निष्ठुर नाहीं राग॥"

यामध्यें ईश्वरवादाचें रहस्य सांगितलें आहे. पण हें तिन्हीही प्रकारचें ब्रह्मज्ञान झालें तरी शेवटीं तुकाराम म्हणतात कीं त्याच्या साक्षात्काराला प्रयत्न हें मुख्य कारण आहे. त्या केवळ लेंकराच्या गोष्टी नव्हत. तें करारांचें काम आहे आणि अशा करारानेंच सुखाचें माहेरघर आपल्या जवळ आहे, ती आपली सहज स्थिति आहे असें कळून येणार आहे; तर आपल्या दुःखाचीं कारणें एक तर दुसऱ्यांनीं सांगितलेलें दुःख किंवा आपला आळस हींच होत. या दोहोंचा त्याग करून आपण सुखी आहों हें समजून घेतलें पाहिजे.

---

## संसारसुखाचीं साधनें.

(ता. ९-५-१० रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

**"हिरा ठेवितां ऐरणीं। वाचे मारितां जो घणीं॥ तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात॥"**

गेल्या दोन खेपांस आपण नैराश्यवादाचें निरसन आणि आपल्या वाङ्मयामध्येंही आनंदवादाचीं जीं वचनें आहेत त्यांचें अवलोकन केलें. या खेपेस संसारसुखाचीं साधनें काय आहेत तें आपण पाहूं. पहिलें साधन विषयांची संपादणी होय, हें येथें स्पष्ट रीतीनें सांगितलें पाहिजे. आज पर्यंत धर्ममार्गांतल्या माणसांनीं संसारिक विषयांची अवहेलना वाजवीपेक्षां अधिक केलेली आहे. विषय म्हणजे सर्वस्वीं त्याज्य, केवळ दुःखावह असा साधारण समज करून दिला आहे. पण हा केवळ प्रत्याघाताचा प्रकार आहे. विषयांतच सर्व पौरुषाचें पर्यवसान झाल्यामुळें तदितर जीं सुखें आहेत त्यांच्यापासून मनुष्य दुरावतो, म्हणून नुसती विषयातिरेकाचीच अवहेलना व्हावयास पाहिजे, समूळ विषय तितके वाईट हा समज चुकीचा आहे. ईश्वरानें बाह्य सृष्टीमध्यें रूपरसगंधादि अनेक सुंदर आणि सुखावह विषय उत्पन्न केले आहेत आणि त्यांच्या उपभोगासाठीं आपल्यामध्यें चक्षुश्रोत्रादि पंचेंद्रियांची साधनें दिलीं आहेत. ह्या ईश्वरी संकेतान्वयें संसारांत जेव्हां जेव्हां आमच्या इंद्रियांचा आणि बाहेरील अर्थांचा संनिकर्ष होतो तेव्हां तेव्हां आपल्याला जी अनुकूळ संवेदना किंवा सुख होतें तें खोटें किंवा वाईट असें म्हणणें हा नुसता भ्रम आहे, इतकेंच नव्हे तर ही ईश्वराची बदनामी आहे. विषय सुखावह आहेत याविषयीं विशेष निरूपण करावयाला नको. हा अज्ञानमाणसांस आणि सर्वप्राण्यांसही नित्य घडून येणारा अनुभव आहे. पण या संबंधीं वरील जी प्रत्याघाताची भावना होते आणि मनाची याच्या उलट अतिरेकाची वृत्ति होते त्यामुळेंच विषयांविषयीं सम्यक् ज्ञान करून देण्याची जरूरी वाटली. विषय हा आमच्या जीविताचा पाया म्हणून त्याची संपादणी यथाशक्ति सर्व प्रयत्न करून केलीच पाहिजे. यांतून कोणींही आपल्याला सोडून घेऊं नये. "गृह त्यजे तो मठी बनावे उदिम त्यजे तो फेरी" या दोहऱ्यामध्यें कबीरानें म्हटल्याप्रमाणें वैराग्यांनीं जरी घराचा त्याग केला तरी त्यांना मठ बांधावा लागतो, आपला धंदा सोडला तरी भिक्षेसाठीं फेरी करावी लागते. विषय कांहीं कायमचे सुटत नाहींत. विषयाची संपादणी श्रमविभागामुळें व्यक्तिपरत्वें कमी अधिक होईल. परंतु त्याचा समूळ सर्वांनींच त्याग करून व्यवहार जसा चालणार नाहीं तसा धर्मही चालणार नाहीं. याविषयीं मनांत कोणताही आडपडदा आणि भाषणांत अर्धवटपणा न ठेवतां सर्व धर्मोपदेशकांनीं असें मोकळया अंतःकरणानें प्रतिपादन केलें पाहिजे कीं, शक्य ते प्रयत्न करून विषयसंपादन करणें हा एक मनुष्याचा पवित्र पुरुषार्थ आहे व अशी धर्माची आज्ञाही आहे.

पण एवढ्यानें आपल्या सुखाची पूर्तता होत नाहीं. याहून सुखाचीं निराळीं द्वारें आहेत. या संसारांत वारंवार आपणावर दुःखाची आपत्ति येते क्रूर आणि अन्यायी पिता, कृतघ्न आणि कर्तव्यहीन पुत्र, जाच करणारी सासू, अपमान करणारी सून, जुलमी धनी, चुकार चाकर इत्यादि एकेक किंवा सर्व मिळून आपत्ति एकाद्या व्यक्तीवर एकदम येण्याचा संभव आहे. या ठिकाणीं प्रयत्नाचें कांहीं चालत नाहीं. यत्नाचा हा प्रदेशच नव्हे. अशा प्रसंगीं सहनच करणें जरूर असतें. शांत आणि तेजस्वी वृत्ति ठेवून या आपत्ति जर आपण आदरानें स्वीकारूं तर संसारांतील सुखाचें द्वार जणू उघडलेलें दिसेल. या आपत्तिच उलट आपल्या सुखाची सामुग्री होते. सहन करण्याचे हे प्रसंग संसारांतून अजीबात काढून टाकले तर आपल्या सुखाचा एक महत्वाचा भाग गळाला असें होईल, तेणेंकरून आपल्या मानसिक शक्तीला व्यायाम नाहींसा होऊन तें दुबळें आणि नरम होऊन जाईल, इतकेंच नव्हे तर आपल्या अनुभवालाही एकदेशीयपणा येईल. वरील विषयसंपादणीच्या बाबतींतही हा व्यायामाचाच भाग प्रधान असतो. अमुक विषयांची जोड मिळाली यांतच सुख नसतें तर ते ते विषय मिळवितांना आपण जे प्रयत्न करतों ते प्रयत्नही सुखावह असतात. प्रयत्नानें मिळविलेली संपत्ति वारसानें मिळविलेल्या संपत्तीपेक्षां अधिक प्रिय वाटते. तर ज्या अर्थीं सुख व्यायामावर अवलंबून आहे त्या अर्थीं शारीरिक व्यायामापेक्षांही मानसिक व्यायामाची सुखावहता अधिक आहे, व ज्या ज्या मानानें आपत्ति अधिक येऊन ती सहन करण्यामध्यें आम्हांला यश येईल त्या त्या मानानें आम्ही सुखाचे अधिक वाटेकरी होऊं.

पण यावरून आम्ही मुद्दाम आपत्ति हुडकीत जावें असें समजूं नये. क्रूर पित्यापेक्षां मायाळू पिता आणि कृतघ्न पुत्रापेक्षां निष्ठावंत पुत्र अधिक चांगले यांतला अर्थ नाहीं. वरील आपत्ति सहज आलेल्या बऱ्या; आपल्याला सहन करण्याचें सुख मिळावें म्हणून त्या ओढून ताणून आणणें बरें नाहीं.

वरील आपत्ति आल्यास त्या सोसाव्या. एवढ्या वरून त्या टाळण्याचा प्रयत्न करूं नये असें नव्हे. त्या जर आपल्या दोषांनीं येत असल्या तर सहन करण्याचा मुळींच प्रश्नच उरत नाहीं. परंतु त्या जर दुसऱ्याच्या दोषानें येत असल्या तर ते दोष निवारण्याचे प्रयत्न करीत असणें हें सुखाचें तिसरें साधन होय. आपले आप्त, इष्टमित्र किंबहुना शत्रूदेखील यांच्या दोषांचें सात्त्विकपणें निवारण करण्यांतही एक प्रकारचें श्रेष्ठ सुख आहे. श्रीकृष्णानें सांगितलेल्या वृत्र–इंद्राच्या गोष्टींत वरील दोनच सुखें सांगितलीं आहेत. वृत्राला विषयांतून हुसकावून लावून तीं सुखाचीं शुद्ध साधनें होतील असें करणें आणि त्यानें आपल्या आत्म्यांत आश्रय घेतला असतां तेथूनही हुसकून लावून आत्म्यासही सुखाचें शुद्ध साधन करणें या दोन गोष्टी झाल्यावर तिसरें मोठें साधन म्हणजे आपल्या शत्रु–मित्रांच्या आत्म्यांतूनही वृत्राला म्हणजे सुखाच्या अडथळ्याला हुसकून लावणें हें होय. वेदकाळीं नुसतें पहिलेंच साधन साधलें गेलें. श्रीकृष्णाच्या काळीं दुसऱ्या साधनाची जोड मिळाली. आधुनिक काळीं विचाराची आणि अनुभवाची पायरी याहूनही पुढें गेली असल्यामुळें या तिसऱ्या साधनाची जोड मिळालेली आहे. आतां मनुष्य केवळ व्यक्तिशः मुक्तीनें किंवा पूर्णावस्थेनें तृप्त होऊं शकत नाहीं. व्यक्तीचे विचार आणि अनुभव सर्व समाजाच्या किंबहुना मनुष्यजातीच्या विचारांत व अनुभवांत मुरून गेलेले आहेत. पूर्णावस्था व्हावयाची ती सर्व जातीची आणि तद्द्वाराच व्यक्तीची होत असते अशी ही आधुनिक विकसित भावना आहे.

---

## वृत्ति, विश्वास आणि मतें.

(ता. १५–७–१९१२ रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

> बहुतां छंदांचे बहु वस जन ।
> नये बाटूं मन त्यांच्या संगें ॥
> करावा जतन आपुला विश्वास ।
> अंगा आला रस आवडीचा ॥
> सुखाची समाधि हरिकथा माउली ।
> विश्रांती साउली सिणलियांची ॥
> तुका म्हणे बुडे बांधोनी दगड ।
> तेथें काय कोड धांवायाचें ॥

धार्मिक जीवनामध्यें मुख्य साधावयाची गोष्ट कोणती आणि ती साधावयासाठीं साधनें कोणतीं आणि त्या साधनांचीं उपसाधनें कोणतीं याचा पृथक विचार करून तीं स्पष्टपणें धर्मसाधकांपुढें ठेवण्याची मुख्य जबाबदारी सर्व धर्मसमाजांवर आहे. म्हणून आपण याविषयीं थोडासा विचार करूं.

धर्मजीवनामध्यें मुख्य साध्य गोष्ट साधकांची वृत्ति ही होय. कोणाचें लक्ष परंपरागत चालत आलेल्या विधीकडे असतें, कोणाचें गुरूकडे, कोणाचें ग्रंथाकडे, कोणाचें धार्मिकमनोविकारांकडे, कोणाचें परोपकारांकडे, कोणाचें तत्त्वज्ञानाकडे दिसतें. पण मुख्य गोष्ट साधकानें आपली स्वतःची वृत्ति उत्तरोत्तर शुद्ध आणि उदात्त होत आहे कीं नाहीं, हें पाहणें ही होय. कामक्रोधादि दुष्ट मळापासून आपलें मन दूर आहे कीं नाहीं, सात्त्विक प्रेमाचा उद्भव जास्त होत आहे कीं नाहीं, सत्प्रयत्नांचा जोर बळावत आहे कीं नाहीं आणि एकंदरींत अशा रीतीनें आपला आंतील भाव शुद्ध आणि भरींव होत आहे कीं नाहीं इकडे साधकाचें अगोदर लक्ष असलें पाहिजे. सर्व धर्मांचें ध्येय वस्तुतः हेंच असतें. याला साधनें निरनिराळीं असतात. त्यांतील पहिलें साधन व्यक्तीचा विश्वास हें होय. विश्वास याचा अर्थ माझ्या अल्प मतीनें हा आहे कीं, एखाद्या व्यक्तीनें कोणतेंही कृत्य करण्यापूर्वीं त्या कृत्याला कारणीभूत अशी जी त्या व्यक्तीच्या मनाची स्थिति ती. तहान लागली असतां आपण पाणी

पितों, कारण पाण्यानें तहान जाईल अशी आमची श्रद्धा आहे; अग्नींत हात घालीत नाहीं, कारण हात जळेलच असा आमचा विश्वास आहे; यावरून विश्वास ही एक मनाची जिवंत आणि कार्यकारी अवस्था होय. एरवीं पुष्कळ गोष्टींवर आमचा विश्वास आहे असें आम्ही तोंडानें म्हणूं. पण त्या विश्वासाचें पर्यवसान कृतींत आणि वृत्तींत होत नसेल तर तो विश्वास नव्हेच. अशा विश्वासाचें आमच्या समाजांत कितीही महत्त्व असलें, तरी ईश्वर त्यास ओळखणार नाहीं.

वर सांगितलेल्या प्रकारचा जिवंत विश्वास ही प्रत्येक व्यक्तीची बाब आहे. तो त्या व्यक्तीच्या वृत्तीचें साधन आहे. त्या विश्वासाचें उपसाधन म्हणून धर्मसमाजांतील वडील मंडळींनीं आपले विश्वास आणि अनुभव यांवरून धर्मसमाजांतील सर्व साधकांसाठीं कांहीं विशिष्ट मतें प्रणीत करावयाचीं असतात. त्या मतांच्या साह्यानें साधारण सभासदांच्या विश्वासाला व तद्द्वारा त्यांच्या वृत्तीला साहाय्य व्हावयाचें असतें. याप्रमाणें आम्हीं धर्मजीवनांतील तीन गोष्टी पाहिल्या. मुख्य वृत्ति, तिला साधनीभूत व्यक्तीचा जिवंत विश्वास, त्याची उत्पत्ति आणि वाढ होण्याकरितां धर्मसमाजाचीं विशिष्ट मतें; अशी ही साधन–परंपरा आहे आणि परस्पर यांचा दर्जा आणि महत्त्व कमी कमी असतें.

हें समजण्याला आपण अर्थशास्त्रांतील दृष्टांत घेऊं या. अर्थशास्त्रांत अर्थ म्हणजे संपत्ति अथवा ज्यांच्यामुळें प्रत्यक्ष सुख होतें आणि उपजीविका चालते, अशा वस्त्र–धान्यादि उपभोग्य वस्तु. या वस्तूंची देवघेव सुरळित आणि सुलभ रीतीनें व्हावी म्हणून निरनिराळ्या देशीं आणि निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या नाण्यांची योजना होत आली आहे. ज्या ज्या मानानें समाज अधिकाधिक सुसंस्कृत होत जातो, त्या त्या मानानें त्या समाजांतील नाण्यांचें रूपांतरही अधिकाधिक सुधारणेकडे होत जातें. प्राचीन युगांत आणि हल्लींही कांहीं ठिकाणीं न सुधारलेल्या समाजामध्यें पासोळ्या, कांबळीं, काठ्यांची जुडगीं, कवड्या, धिपली, हाडें इत्यादिकांचा नाण्यांदाखल उपयोग होतो. सुधारणेमुळें हीं नाणीं उत्तरोत्तर अधिकाधिक व्यवहारोपयोगी होत जातात. पण पूर्वीपासून त्यांचा हेतु एकच आहे. तो हा कीं अर्थांची अदलाबदली व्हावी. पण नाणीं हीं स्वतःच अर्थ नव्हत. कारण तीं प्रत्यक्ष उपभोग्य नसतात. म्हणून तीं अर्थांहून कमी दर्जाचीं; अर्थशास्त्रांत अर्थांचा आणि नाण्यांचा जो संबंध आहे तसाच संबंध धर्मशास्त्रांत वृत्तीचा आणि विश्वासाचा आहे. म्हणजे एक दुसऱ्याचें साधन आहे; म्हणून एक दुसऱ्याहून कमी महत्त्वाचें आहे.

तसेंच धर्मशास्त्रांत एकाद्या विशिष्ट समाजानें प्रणीत केलेलीं जशीं मतें असतात, तशींच अर्थशास्त्रांतही निरनिराळ्या समाजांपुरती तिसरी एक योजना करण्यांत येत असते. ती नोटांची किंवा हुंड्यांची होय. या नोटा किंवा हुंड्या विशिष्ट समाजांतील संकेतावर आणि पतीवर अवलंबून असतात. त्या समाजाच्या बाहेर त्या चालत नाहींत. नाण्यांच्या हेतूला मदत मिळावी म्हणून नोटांची संकेतानें योजना केलेली असते म्हणून नोटांचें वस्तुतः महत्त्व नाण्याहून कमी आणि अर्थांहून तर फारच कमी. तसाच प्रकार मतांचा विश्वासाचा आणि वृत्तीचा धर्मजीवनांत आहे.

हें लक्षांत घेऊन कोणत्याही धर्मसमाजाच्या पुढाऱ्यानें अशी खबरदारी राखली पाहिजे कीं, आपण प्रणित केलेलीं मतें, साधकांच्या विश्वासास आणि वृत्तीला नेहमीं साहाय्यकच व्हावींत, त्यांचा त्यांच्यावर कधींही दाब बसूं नये. समाजमतांच्या योगें व्यक्तीच्या विश्वासास आणि वृत्तीस उज्वलपणा येत नाहीं, असें दृष्टोत्पत्तीस आल्याबरोबर पुढाऱ्यांनीं आपल्या मतांची फेरतपासणी आणि मांडणी केली पाहिजे. एकदां केलेल्या जुन्या उल्लेखावरच हवाला ठेवून चालणार नाहीं, समाजमतें हीं व्यक्तीच्या वृत्तीसाठीं होत. व्यक्तीची वृत्ति आणि विश्वास समाजाच्या मतासाठीं नव्हत, हें समाजचालकांनीं नेहमीं ध्यानांत वागविलें पाहिजे.

तुकारामानें वर म्हटल्याप्रमाणें प्रत्येकानें आपला विश्वास जतन करावा एवढेंच नव्हे, तर आपली वृत्ति जतन करावी, आणि वाढवावी, व अशा प्रकारें व्यक्तीची वृत्ति आणि विश्वास यांची वाढ होते कीं नाहीं हें समाजचालकांनीं पहावें. पण या बाबतींत प्रत्येकानें आपआपल्या वृत्तीकडे आपणच बारकाईनें लक्ष देणें बरें. एकानें दुसऱ्याच्या वृत्ती-

विषयीं आक्षेप घेण्यानें कांहीं फायदा होत नाहीं. तसानें आपला धडा टाकून दुसऱ्याच्या दुर्लक्षाकडे लक्ष देणाऱ्या शाळेंतील विद्यार्थ्यासारखा प्रकार होणार आहे. प्रत्येकानें आपल्या धड्याकडे पहावें, असें पंतोजीनें सांगितलें असतां एका मुलानें शाबासकी मिळविण्यासाठीं दुसऱ्या एका मुलाविषयीं पंतोजीकडे कागाळी केली, तेव्हां गुरुजीला कागाळी करणाऱ्या मुलाचेंच दुर्लक्ष अगोदर दिसून आलें. आम्ही आपल्या वृत्तीकडे नजर न देतां दुसऱ्याच्या वृत्तीची आणि विश्वासाची पंचाईत करूं लागलों आणि त्यास शासन देऊं लागलों, तर गुरूंचा गुरू जो परमेश्वर त्याच्या लक्षांत आमचा हा उनाडपणा अगोदर येणार नाहीं काय? म्हणून व्यक्तीच्या वृत्तीच्या बाबतींत प्रत्येकानें आपल्यापुरतें खबरदार असलें पाहिजे; दुसऱ्याविषयीं क्षमा आणि औदासीन्य धारण केलें पाहिजे; आणि समाजचालकांनीं समाजाच्या मतांची मांडणी जेणेंकरून निरनिराळ्या प्रकारें परिणामकारी होईल अशा प्रकारें व्यक्तीच्या विश्वासाची आणि वृत्तीची वाढ बाळगली पाहिजे. व्यक्तिविषयक वृत्तीसंबंधानें प्रत्यक्षपणें खल करून अथवा अप्रत्यक्षपणें उल्लेख करून तिला शासन देण्याच्या भानगडींत पडूं नये.

अर्थशास्त्रांत खोटीं नाणीं आणि रद्द केलेल्या नोटा जशा आढळतात, तसा धर्मशास्त्रांतही एक प्रकार आढळतो. तो बुद्धिवादास आणि व्यक्तीच्या अनुभवास न पटणारीं अशीं जुन्या धर्मांतील केवळ परंपरेच्या जोरावर चालत आलेलीं मतें हीं होत. अशा मतांच्या जोरावर जेव्हां एखाद्या धर्मसमाजामध्यें व्यक्तीचा छळ होऊं लागतो तेव्हां त्या समाजाचे दिवस भरले असें समजावें. अशा वेळीं नवीन समाजांचा उद्भव होतो; आणि जोंपर्यंत जुन्या समाजांतल्या चुका नवीन समाजाकडून होत नाहींत तोपर्यंतच तो चालू राहतो. पुढें तोही अस्तास जातो. अशा वेळेस अनुलक्षूनच "तुका म्हणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ॥" ही वाणी निघाली आहे.

## व्यक्तित्वविकास.

(रविवार ता. १०-१२-११ रोजीं केलेल्या उपदेशाचा सारांश.)

जगांतील कोणत्याही प्रमुख धर्मामध्यें आत्मा, जग आणि ईश्वर या तीन तत्त्वांविषयीं विचार केलेला आढळतो. पैकीं आत्मा हें तत्त्व इतरांपेक्षां अधिक महत्त्वाचें असतें. परंतु त्याविषयींचा विचार फार सामान्य आणि तात्विक पद्धतीनें झालेला असल्यामुळें, व्यक्तीच्या जीवनावर आणि लोकव्यवहारावर अशा मोघम विचारांचा व्हावा तसा परिणाम झालेला आढळून येत नाहीं. 'नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः। .... ....' 'य एनं वेत्ति हंतारं। यो वा मन्यते हतं' अशा प्रकारचीं आत्मविषयक वर्णनें गीतेंत सांगितलेलीं आहेत. तरी व्हावा तितका व्यावहारिक बोध यावरून होत नाहीं. आज आत्मा म्हणजे व्यक्तित्व या अर्थानें व केवळ व्यावहारिक दृष्टीनेंच या विषयाचा विचार कर्तव्य आहे.

प्रत्येक प्राणी म्हणजे एक व्यक्ति, हें जरी एका दृष्टीनें खरें आहे, तरी प्रत्येक प्राण्यामध्यें व्यक्तित्व असतेंच असें नाहीं. किंबहुना मनुष्यप्राण्यातील बहुसंख्येमध्यें देखील हें व्यक्तित्व फारच अल्प प्रमाणानें विकसित झालेलें असतें, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मी म्हणून कोणी आहे, माझे विचार, माझीं सुखदुःखें आणि कृत्यें यांचें, इतर कोणाचीही अपेक्षा न ठेवतां, मला अत्यंत थोर महत्त्व आहे, अशी जाणीव राखून तदनुरूप वर्तन ठेवणें, यांतच व्यक्तित्व आहे; आणि दुसऱ्याच्या कोणत्याही हितसंबंधास बाधा न आणितां ह्या व्यक्तित्वाचा शक्य तितका विकास करण्याचा मला पूर्ण हक्क आहे असें प्रत्येक व्यक्तीस वाटलें पाहिजे. एका थोर ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, या जगांत मनुष्य जी जी कामगिरी करीत आहे, त्या सर्वांत मोठी म्हणजे तो आपल्या स्वतःला बनवीत आहे हीच होय. (Among the works of man which human life is rightly employed in perfecting and beautifying the first in importance surely is man himself—J. S. Mill.) तथापि अगदीं सुधारलेल्या आणि पुढारलेल्या राष्ट्रांतही या व्यक्तित्वाचें महत्त्व कळावें तितकें अद्यापि मुळींच कळ-

लेलें नाहीं. याला एक दोन उदाहरणेंच पुरीं आहेत. कोणी कोणाची हत्या केली असतांना त्यास देहांत शिक्षा द्यावी असें जें मनुष्यांनीं ठरविलें आहे, त्यावरून मनुष्यजीवीताचें महत्त्व मनुष्यास कळलेलें आहे, असा क्षणमात्र भास होतो; परंतु देहांताची शिक्षा दिल्यामुळें हत्येच्या गुन्ह्यास पुनः हत्येचीच शिक्षा आहे, यावरून हा भास खोटा आहे असें लागलेंच कळून येतें. शिक्षेचा उद्देश सूड हा नसून गुन्ह्याचा प्रतिबंध, गुन्हेगाराची सुधारणा, समाजाची सुरक्षितता आणि शक्य असल्यास ज्याचें अहित झालें असतें, त्याची भरपाई इतकेंच असतांना त्यांपैकीं एकही या देहांत शिक्षेनें साधत नाहीं. तथापि सुधारलेल्या देशांतून ह्या शिक्षेच्या रानटी पद्धतीविषयीं ओरड चालली असूनही ती अझून बंद होत नाहीं. याहून दुसरा चमत्कार असा आहे कीं, व्यक्तीस आपल्या जीविताची कशीही विल्हेवाट लावण्याचा पूर्ण हक्क असतांहीं आत्महत्या हा एक बहुतेक सुधारलेल्या समाजांमध्यें गुन्हा मानिला जात आहे, जणूं काय व्यक्तीचें जीवित हीच एक समाजाची मालमत्ताच आहे. कोणा एकानें आत्महत्या खरीच केली तर मग त्याला शिक्षा देण्याचा प्रश्नच उरत नाहीं, परंतु त्याचा तो प्रयत्न सिद्धीस न जातां उघडकीस आला म्हणजे सामाजिक गुन्ह्याबद्दल त्याला जी शिक्षा भोगावी लागते, ती म्हणजे समाजाच्या अडाणीपणाचा एक मासलाच आहे. कित्येक अडाणी आईबाप आपलें मूल जिन्यावरून खालीं पडलें किंवा त्यास ठेंच लागली म्हणजे त्याला मायेनें उचलून त्याची शुश्रूषा न करतां किंवा त्यास कांहीं दुखापत झालेली नसल्यास त्याच्याकडे केवळ दुर्लक्ष करून न राहतां, त्याच्या निष्काळजीपणाबद्दल त्यांना चीड येऊन त्यास दोन चार थापडा मारतात; ही जी या आईबापांची अडाणीपणाची माया आहे, तशांतलाच समाजाचा वरील प्रकार आहे.

हीं दोन विक्षिप्त उदाहरणें बाजूस ठेविलीं, तरी अर्धी मनुष्यजाति ज्या स्त्रिया, यांच्यामध्यें व्यक्तित्वाचा आजवर जो पूर्ण अभाव आहे, तिकडे अद्यापिही मनुष्यजातीचें लक्ष गेलेलें नाहीं. काव्य आणि कादंबऱ्या यांमधून मुख्य नायकाचें जसें व्यक्तित्वपूर्ण चित्र रेखाटलेलें असतें तसें नायिकेचें नसतें. सिता, तारा, दमयंती, मंदोदरी इत्यादि आमच्या पुराणांतल्या ज्या पुण्यकन्यका प्रसिद्ध आहेत, त्यांचा जो आजवर गौरव होत आहे तो त्यांच्या सौम्य आणि निष्क्रीय गुणांबद्दलच होय. मराठी भाषेंतले उत्तमोत्तम काव्य रघुनाथपंडिताचें नलदमयंती आख्यान, त्यांत कवीनें पुण्यश्लोक नळाचें चित्र किती सर्वांगसुंदर रेखाटलें आहे आणि दमयंतीविषयीं पहावें तर तिच्या केवळ शारिरिक सौंदर्याचीच बहार उडविली आहे. ज्याची शब्दांवर एवढी मोठी सत्ता, ज्याच्यामध्यें एवढी मोठी प्रतिभा आणि प्रेरणा, त्याला दमयंतीच्या नैतिक आणि आध्यात्मिक भावनांचा किंचित् तरी उल्लेख करतां आला नसता काय ! पण क्रियात्मक व्यक्तित्वाची स्त्रियांमध्यें मुळीं जरूरीच वाटत नाहीं, मग तशा प्रकारचें चित्र वठविणें म्हणजे त्यांची एक अमर्यादाच करणें असें पुरुष-चित्रकारास वाटणें साहजिक झालें आहे. आपल्या स्त्रीजातीविषयीं अत्यंत अभिमान बाळगणाऱ्या एका तेजस्वी पाश्चात्य ग्रंथकर्तीनें असें म्हटलें आहे कीं स्त्रियांमध्य अद्यापि व्यक्तित्वविकास न पावल्यामुळें त्यांच्यामध्यें मोठें कर्तृत्व आणि हिंमत दिसून येत नाहीं, एवढेंच नाहीं तर, काव्य, चित्र, लेखन इत्यादि ललितकलांचीही जोराची प्रतिभा त्यांच्यांत दिसून येत नाहीं; पण साधारणतः पुरुषांनाच व्यक्तित्वाचें महत्त्व अद्यापि कळून आलें नाहीं तर स्त्रियांमध्यें त्याचा अभाव असल्याचें दिसून आल्यास त्यांत नवल तें काय !

हल्लींच्या काळीं निरनिराळ्या जातींच्या सुधारणेविषयीं प्रयत्न होत आहेत. राष्ट्राच्या उत्कर्षासंबंधीं, व सर्व मनुष्यजातीच्या प्रगतीविषयीं चळवळी चालत आहेत, परंतु प्रत्येक माणसांतील व्यक्तित्वाची थोरवी किती आहे, तिचा विकास होण्याच्या मार्गामध्यें किती घनघोर अडचणी आहेत, सामाजिकहिताच्या दाबाखालीं हें व्यक्तित्व कसें विरडून जात आहे, इकडे विचारी माणसांचें जावें तितकें लक्ष जात नाहीं; म्हणून आपण व्यक्तित्वाचा विकास करण्याचीं कोणकोणतीं साधनें आहेत हें पाहूं.

हा विकास होण्याला प्रथम तीन प्रकारचें स्वातंत्र्य पूर्णपणें प्रस्थापित व्हावयास पाहिजे. दुसऱ्याला कोणत्याही प्रकारचें नुकसान न पोहोंच-

वितां व्यक्तीला स्वतंत्रपणें ( १ ) विचार करण्याचा, ( २ ) प्रेम करण्याचा आणि ( ३ ) यत्न करण्याचा पूर्णपणें अधिकार आहे. आपल्या शक्तीप्रमाणें सत्याचा शोध लावणें, विचार करणें आणि मनांत आलेले विचार लेखानें आणि भाषणानें प्रदर्शित करणें, हा विचारस्वातंत्र्याचा मनुष्याचा पहिला उपजत हक्क होय. अंतःकरणाच्या प्रवृत्तीप्रमाणें आपली आवड, नावड ठरविणें अभिरुचींचा उपभोग घेणें, आणि प्रेमाचा विषय संपादणें हा प्रेमस्वातंत्र्याचा दुसरा उपजत हक्क होय. आपल्या कर्तबगारीच्या जोरावर इष्ट पुरुषार्थासंबंधानें प्रामाणिकपणें यत्न करणें, किंवा यत्नापासून विराम पावणें हा यत्नस्वातंत्र्याचा तिसरा उपजत हक्क होय. या तिन्ही हक्कांच्या आड सारें जग जरी आलें तरी तेवढ्यावरून हे आपले हक्कच नव्हत असा कधीं कोणी गैरसमज करून घेऊं नये.

आज आपण प्रथम स्वातंत्र्याविषयीं विचार करूं. स्वातंत्र्याचा अगदीं प्रमुख प्रवक्ता जॉन स्टुअर्ट मिल्ल यानें आपल्या स्वातंत्र्यनामक वेदप्राय ग्रंथामध्यें असें निक्षून सांगितलें आहे कीं विचाराच्या बाबतींत एकच व्यक्ति एकीकडे आणि सर्व मनुष्यजात दुसरीकडे असा जर विरोध आला तर तद्विरहित सर्व मनुष्यजातीच्या एकवटलेल्या विचाराला दाबून टाकण्याला ह्या एका व्यक्तीला जसा मुळींच अधिकार नाहीं तसाच सर्व मनुष्यजातीलाही त्या एका व्यक्तीच्या विचारांलाही दडपून टाकण्याचा अधिकार नाहीं. सत्याचा स्वतंत्रपणें शोध करण्याचा आणि तदनुसार आपले विचार लोकांत प्रदर्शित करण्याचा व्यक्तीला पूर्ण अधिकार आहे, यासंबंधीं मिल्लसाहेबांनीं आपल्या विचारांचा निष्कर्ष शेवटीं सिद्धांतरूपानें असा दिला आहे कीं समाजानें व्यक्तीला या बाबतींत अडथळा आणणें म्हणजे समाजाचें जें मत असेल तें सर्वांशीं प्रमाणभूत आहे असें समजणें होय. सर्व मनुष्यजातीचें निश्चयात्मक जरी एकमत ठरलें तरी तेंही जर सर्वांशीं प्रमाणभूत असूं शकत नाहीं तर एक व्यक्तीशिवाय करून बाकीच्या सर्वांच्या मतांचें प्रामाण्य कमीच ठरणार. मग त्यास त्या व्यक्तीचें मत दाबून टाकण्याचा अधिकार कसा येईल ! एका व्यक्तीचें मत जरी सर्वांशीं सत्य नसेल तरी सत्याचा कांहीं तरी अंश त्यामध्यें असण्याचा संभव आहेच आणि समाजाच्या मतांत चुकीचा कांहीं अंश असणें तितकेंच संभवनीय आहे. अशा स्थितींत एका व्यक्तीचें मत मुळींच पुढें आणू न देणें योग्य होणार नाहीं. दुसऱ्या पक्षीं त्या एका व्यक्तीचे विचार सपशेल चुकीचे असले तरी ते दाबून टाकण्यानें कोणाचें हित होणार नाहीं; कारण, असत्याचा सत्याशीं झगडा होण्यानेंच सत्य पक्षाचें हित आहे. तिसरे पक्षीं, समाजाचें मत सर्वांशीं प्रमाणभूत असलें तरी व्यक्तीनें स्वतः कांहीं विचार न करितां तें जशाचें तसेंच स्वीकारण्यानें त्याचें हित होणार नाहीं.

आमच्या ब्राह्मसमाजांत सर्व प्रकारें व्यक्तीला स्वातंत्र्य असणें हें एक पायाभूत मूलतत्त्व मानलें आहे. वेदादि धर्मग्रंथांचें, गुरूंचें, परंपरांचें, इत्यादि कोणत्याही प्रकाराचें बाह्य प्रामाण्य ब्राह्मधर्मानें मुळींच झुगारून दिलें आहे. तथापि हीं बाह्य प्रामाण्यें निराधार आहेत हें सत्य आमच्या समाजांत जन्मास आलेल्या मुलांना आम्ही जर आयतेंच देऊं तर तें त्यांना हितकारक नाहीं. स्टोअर्समध्यें मिळणाऱ्या तयार केलेल्या कपड्याप्रमाणें सत्याचीं हीं आंगडीं पांघरून समाजांतील सभासदांच्याही मनाची खरी वाढ होणें शक्य नाहीं. कैद्यास तुरुंगांत ठेविलें काय किंवा राजवाड्यांत ठेविलें काय तो जसा कैदीच, त्याप्रमाणें मनावर असत्याचा बोजा असला काय किंवा सत्याचा बोजा असला काय, जोपर्यंत तें स्वतंत्र नाहीं तोंपर्यंत तें कैदीच समजावयाचें. भूमितीसारख्या गणितशास्त्रासंबंधीं विचार करितांना प्रमाणांची बहुतेक एकदेशीयताच असते. कांहीं स्वयंसिद्ध गोष्टींचा स्वीकार केल्याबरोबर तर्कशास्त्राच्या नियमांप्रमाणें ह्या सामान्य शास्त्राचे ठराविक सिद्धांतांकडेच आपलें मन जाऊन पोहोंचतें. तेथें दुसरी तिसरी बाजू संभवत नाहीं. परंतु धर्म, नीति, राजकारण इत्यादि व्यावहारिक शास्त्रांची गोष्ट तशी नाहीं. ह्या बाबतींत जितकीं विविध आणि विपुल मतें आपल्यापुढें येतील आणि त्यांचें जितकें घनघोर घर्षण होईल, तितके आपण सत्याच्या जवळजवळच जाण्याचा संभव आहे.

ग्रंथप्रकाशनाचे बाबतींत ज्या ग्रंथांत नवीन विचार असतात, त्याला बाजारांत अधिक किंमत

येते, आणि पुरवीं नुसतें भाषांतर किंवा इतर असेंच संपादित ग्रंथ, त्यांची किंमत एकदम अर्ध्यांहून कमी होते; आणि केव्हां केव्हां तर त्यांची कागद आणि शाईच्या किंमतीनेंच विक्री होण्याची मारामार पडते. याप्रमाणें जो प्रकार वाङ्मयामध्यें आढळतो, तो जीवनव्यवहारामध्यें असूं नये काय? विद्यार्थ्यानें एकाद्या शास्त्राचें अध्ययन आपल्या गुरूजवळ कांहीं वर्षें केल्यावर त्याचे अंगीं व्युत्पत्ति येते आणि तशी व्युत्पत्ति आल्याशिवाय त्याचें अध्ययन संपलें, असें समजण्यांत येत नाहीं. जशी विद्यार्थ्यास व्युत्पत्ति तसेंच संसारांत वावरणाऱ्या माणसाचें व्यक्तित्व हें होय. मनुष्य बालवयांत असतो तोंपर्यंत आईबाप त्याला जें सांगतील तें ऐकून व त्यांचें अनुकरण करून त्याचें चालतें. परंतु मोठा झाल्यावर त्याला केव्हांना केव्हां तरी त्याच्यामध्यें व्युत्पत्ति आल्यावांचून त्याचें चालणार नाहीं. बाळपणीं स्वाभाविक उत्साह आणि जीवनाचा ताजा जोम असतो म्हणून मुलाला अनुकरणाची बाधा होत नाहीं; पण मोठेपणीं हा उत्साह संपून गेल्यावर व्यक्तित्वाचा आंतून जोम आल्याशिवाय मनुष्य राहूं लागल्यास जें अनुकरण आजपर्यंत त्याला तारक झालें, तें यापुढें मारक होतें. विद्याखात्याच्या आधुनिक शिक्षणक्रमाकडे पाहिलें असतांनाही हीच गोष्ट निदर्शनास येते. प्राथमिक शिक्षणांत लहान मुलाला केवळ श्रवण आणि दर्शन यांच्या द्वारा कांहीं ज्ञानाच्या साधनांची वरवर प्राप्ति करून घ्यावयाची असते. दुय्यम प्रतीच्या शिक्षणांत इतिहास, भूगोल इत्यादि विषयांची स्मृतिद्वारां माहिती संपादन करावयाची असते. परंतु विद्यार्थी याप्रकारें एकदां विश्वविद्यालयामध्यें प्रविष्ट झाला म्हणजे हें पारडें उलटतें. तेथें त्याचें नियमित विषयांचें आवश्यक अध्ययन कमी होऊन निरनिराळ्या विषयांची आपल्या आवडीप्रमाणें निवड करावी लागते, आणि याप्रकारें विषयाची पसंती करूनच चालत नाहीं, तर पसंत केलेल्या विषयांमध्यें त्याच्यापुढें मोठमोठे ग्रंथकार, कवि आणि शोधक यांच्या कृति मांडण्यांत येतात आणि त्यांवर त्याला स्वतःची मखलाशी करावयाची असते. या पायरीवर आल्यावर त्यानें कोणतेंही सत्य जसाचें तसेंच स्वीकारावें अशी विद्यालयाची योजना नसते, तर त्याच्यापुढें ज्या गोष्टी मांडण्यांत येतात त्यांची तुलना करून, स्वतःच्या मनाची शक्ति त्यानें वाढवावी हा विद्यालयाच्या योजनेचा हेतु असतो. विद्यालयांत प्रविष्ट झालेल्या उमेदवारावर जर ही जबाबदारी आहे, तर त्यांतून पार उतरून संसार–समरांगणावर आरूढ झालेल्याची व्यक्तित्वासंबंधीं जबाबदारी कमी असणें इष्ट आहे काय? तथापि असें असतांही वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. जड सृष्टीमध्यें ज्याप्रमाणें झाडांना कोट्यावधि पानें दरवर्षी लागून त्यांना थोडींच फुलें येतात, कोट्यावधि फुलांतून थोडींच फळें येतात आणि बाकी सर्व वृथा गळून जातात, त्याचप्रमाणें चैतन्यसृष्टीमध्येंही अत्यंत खेदजनक आणि वृथा व्यय चाललेला आहे. असंख्यकोटि प्राणी जन्मास येऊन व्यक्तित्वशून्य आणि व्यक्तित्वहीन असे मृत्युमुखीं पडतात, त्यांची उत्पत्ति, स्थिति, लय हीं जणूं काय अहेतुक भासतात, आणि व्यक्तित्वपूर्ण प्राणी हे अपवादादाखल कोठें तरी चमकतात. असा प्रकार न व्हावा, प्रत्येक प्राण्यामध्यें व्यक्तित्व पूर्णत्वास यावें, अशी दैवि योजना असून तिला अनुकूल वर्तन ठेवणें हा प्रत्येक प्राण्याचा आद्य आणि अंतिम धर्म होय आणि या मंगल हेतूस अडथळा आणणें ह्यापरता दुसरा कोणताही अधर्म नाहीं.

---

## मनुष्यजन्माची सार्थकता.

(ता. ११–२–११ रोजीं केलेल्या कीर्तनाचा सारांश.)

**अब तुम कब सिमरोगे राम। जिवडा दो दिनका मेजवान ॥ ध्रु० ॥ गरभपनोमें हाथ जुडाया। निकल हुवा वेमान ॥ १ ॥ बालपनोमें खेल गमाया। तारुनपनमें काम ॥ २ ॥ हात पांव जब कापन लागे। निकल गया अवसान ॥ ३ ॥ झुठी काया झुठी माया। आखर मौत निदान ॥ ४ ॥ कहत कबीर सुनभाई साधो। यहि घोडा मैदान ॥ ५ ॥**

मनुष्यदेहामध्यें जी ह्या प्राणाची योजना आहे, ती फार थोडा वेळ टिकणारी आहे. म्हणजे

जीव हा दोन दिवसांचा मेजवान् म्हणजे पाहुणा आहे. पण ह्या थोड्याच अवकाशांत जीवदशेच्या द्वारा चैतन्यरूपी आत्म्याचा उद्धार करावयाचा असतो. म्हणून ज्याला जाणल्याशिवाय मनाचें खरोखर समाधान होणार नाहीं त्या ईश्वरास होतां होईल तों ओळखण्याविषयीं कबीरजी आग्रह करीत आहेत. जड स्थितींत असलेली सर्व सृष्टि ईश्वराच्या कायद्याचें पालन बिन तक्रार करीत आहे. चंद्र, सूर्य, पृथ्वी आणि तारागण, वायु आणि वनस्पति हीं सर्व ईश्वरास नमून आहेत. गर्भावस्थेमध्यें असतांना मनुष्यप्राणीही इतर जड सृष्टीप्रमाणें जणूं काय ईश्वराची आज्ञा ऐकण्यास तयारच असा हात जोडून असतो; पण तो बाहेर पडून स्वतंत्र झाल्याबरोबर बेइमान होतो. अखिल जडसृष्टि ईश्वराला न जाणतांच जे त्याचें नियम पाळीत असते, तेच नियम समजून उमजून पाळणें ही मनुष्यपणाची थोरवी आहे. आणि एवढ्याच-साठीं त्याला जीव हा पाहुणा दोन दिवस भेटा-वयास आलेला असतो. परंतु विपरित प्रकार असा होतो कीं आयुष्याचे हे दोन दिवस लहानसान गोष्टींत निघून जातात. बाळपण खेळांत जातें आणि तरुणपण ख्यालीखुशालींत जातें, काम म्हणजे सर्वथैव तिरस्करणीय आहे असें नाहीं. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें " बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । मनासारखें असावें । सकळ कांहीं । " ही बरेपणाची इच्छा ( Decency ) अथवा बरें असण्याची आणि दिसण्याची प्रवृत्ति कांहीं वावगी नाहीं. लहान मुलाला जसा खेळ, तसा तरुण माणसांच्या ह्या कामना साहजिकच आहेत, पण एवढ्यांतच त्याच्या सर्व शक्तीचा ऱ्हास व्हावा अशी योजना दिसत नाहीं. खेळ आणि कामना यांच्याद्वारा स्वतःची ओळख करून घेऊन तिच्यायोगें सर्व विश्वाचा जो प्राण त्याची ओळख करून घ्यावयाचा मनुष्याचा थोर अधिकार आहे; आणि तो प्राप्त झाल्याशिवाय मनुष्याला स्वतःची सुद्धां पूर्ण ओळख पटत नाहीं. तोंपर्यंत त्याच्यामध्यें केवळ अंध अहंकार कसा असतो हें खालील पद्यांत बुलाशहा यानें दाखविलें आहे.

**माटी खुदी करें दी यार ॥ ध्रु० ॥ माटी [illegible] माटीदा असवार ॥ १ ॥ माटि माटिनु मारन लागी । माटी दे हतिहार ॥ २ ॥ जिस माटीपर वहुती माटी । तिस माटी अहंकार ॥ ३ ॥ माटी बागबगीचा माटी । माटी दी गुलजार ॥ ४ ॥ माटि माटिनु देखन आई । माटी दी बहार ॥ ५ ॥ हंस खेल फिर माटी होई । पौंदी पाव पसार ॥ ६ ॥ बुलाशहा बुझारत बुझा । लाह शिरो भवसार ॥ ७ ॥**

गाडी, घोडा बागबगीचा आणि इतर सर्व संपत्ति हे मातीचेच निरनिराळे प्रकार, त्यांचें सेवन करण्यासाठीं जे आपल्यामध्यें इंद्रियगण आहेत तेही पण मातीचेच प्रकार, म्हणून मातीच्या ढिगावर मातीचा ढीग रचण्यामध्यें ज्याप्रमाणें कांहीं विशेष होत नाहीं, त्याप्रमाणें केवळ इंद्रिय-सुखासाठीं विषयांची रचना करण्यामध्येंही अभि-मान बाळगण्यासारखें कांहींच नाहीं. केवळ डोईवर भार मात्र आहे. इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां अशाही प्रकारचा अभिमान उत्पन्न होतो कीं आपणांस देव मिळाला. नुसत्या खाण्यापिण्या-मध्येंच गर्क होऊन आम्ही आपणास फसवीत नाहीं तर केव्हां केव्हां एकादी धार्मिक पोकळ समजूत घेऊन आपण स्वतःस धन्य मानीत असतों; आणि केव्हां केव्हां परोपकाराचें कृत्य करीत असतांही अशी फसवणूक होते. हा अनुभव बाबू रविंद्रनाथ ठाकूर यांच्या खालील पदांत सुंदर रीतीनें निवेदित झालेला आहे.

**गर्व माझा हरुनि प्रभु आणिली बहु लाज । कवण मुखें संमुख तव राहुं हा मी आज ॥ध्रु०॥ गवसलासि तूं म्हणूनी मज मी फसवीं मानिच्या मनीं । फजित होत संसारिं या करितां तुझें काज ॥ १ ॥ कळेनाचि आमुच्या वरीं वससि कुठें प्रभु तूं तरी । कधिं न तुझ्या चरणीं मला लाविलें राजराज ॥ २ ॥ त्यजूनि तिला दिनरजनीं माझेचि ठायीं गेलों रमुनी । तव न वैभवीं देखिलें तुला विफल चक्षु काज ॥ ३ ॥**

काव्याचें बाहिक आणि अंतरिक असे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत बाहेरील सर्व पदा-र्थांचें हुबेहूब वर्णन असतें; परंतु त्यांत कवीचें हृद्गत दिसून येत नाहीं. दुसऱ्या प्रकारांत कवीनें

येते, आणि पूर्वी नुसतें भाषांतर किंवा इतर असेंच संपादित ग्रंथ, त्यांची किंमत एकदम अर्ध्याहून कमी होते; आणि केव्हां केव्हां तर त्यांची कागद आणि शाईच्या किंमतीनेंच विक्री होण्याची मारामार पडते. याप्रमाणें जो प्रकार वाङ्मयामध्यें आढळतो, तो जीवनव्यवहारामध्यें असूं नये काय? विद्यार्थ्यानें एकाद्या शास्त्राचें अध्ययन आपल्या गुरूजवळ कांहीं वर्षें केल्यावर त्याचे अंगीं व्युत्पत्ति येते आणि तशी व्युत्पत्ति आल्याशिवाय त्याचें अध्ययन संपलें, असें समजण्यांत येत नाहीं. जशी विद्यार्थ्यास व्युत्पत्ति तसेंच संसारांत वावरणाऱ्या माणसाचें व्यक्तित्व हें होय. मनुष्य बालवयांत असतो तोंपर्यंत आईबाप त्याला जें सांगतील तें ऐकून व त्याचें अनुकरण करून त्याचें चालतें. परंतु मोठा झाल्यावर त्याला केव्हांना केव्हां तरी त्याच्यामध्यें व्युत्पत्ति आल्यावांचून त्याचें चालणार नाहीं. बाळपणीं स्वाभाविक उत्साह आणि जीवनाचा ताजा जोम असतो म्हणून मुलाला अनुकरणाची बाधा होत नाहीं; पण मोठेपणीं हा उत्साह संपून गेल्यावर व्यक्तित्वाचा आंतून जोम आल्याशिवाय मनुष्य राहूं लागल्यास जें अनुकरण आजपर्यंत त्याला तारक झालें, तें यापुढें मारक होतें. विद्याखात्याच्या आधुनिक शिक्षणक्रमाकडे पाहिलें असतांनाही हीच गोष्ट निदर्शनास येते. प्राथमिक शिक्षणांत लहान मुलाला केवळ श्रवण आणि दर्शन यांच्या द्वारा कांहीं ज्ञानाच्या साधनांची वरवर प्राप्ति करून घ्यावयाची असते. दुय्यम प्रतीच्या शिक्षणांत इतिहास, भूगोल इत्यादि विषयांची स्मृतिद्वारां माहिती संपादन करावयाची असते. परंतु विद्यार्थी याप्रकारें एकदां विश्वविद्यालयामध्यें प्रविष्ट झाला म्हणजे हें पारडें उलटतें. तेथें त्याचें नियमित विषयांचें आवश्यक अध्ययन कमी होऊन निरनिराळ्या विषयांची आपल्या आवडीप्रमाणें निवड करावी लागते, आणि याप्रकारें विषयाची पसंती करूनच चालत नाहीं, तर पसंत केलेल्या विषयांमध्यें त्याच्यापुढें मोठमोठे ग्रंथकार, कवि आणि शोधक यांच्या कृति मांडण्यांत येतात आणि त्यांवर त्याला स्वतःची मखलाशी करावयाची असते. या पायरीवर आल्यावर त्यानें कोणतेंही सत्य जसाचें तसेंच स्वीकारावें अशी विद्यालयाची योजना नसते, तर त्याच्यापुढें ज्या गोष्टी मांडण्यांत येतात त्यांची तुलना करून, स्वतःच्या मनाची शक्ति त्यानें वाढवावी हा विद्यालयाच्या योजनेचा हेतु असतो. विद्यालयांत प्रविष्ट झालेल्या उमेदवारावर जर ही जबाबदारी आहे, तर त्यांतून पार उतरून संसार—समरांगणावर आरूढ झालेल्याची व्यक्तित्वासंबंधीं जबाबदारी कमी असणें इष्ट आहे काय? तथापि असें असतांही वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. जड सृष्टीमध्यें ज्याप्रमाणें झाडांना कोट्यावधि पानें दरवर्षी लागून त्यांना थोडींच फुलें येतात, कोट्यावधि फुलांतून थोडींच फळें येतात आणि बाकी सर्व वृथा गळून जातात, त्याचप्रमाणें चैतन्यसृष्टीमध्येंही अत्यंत खेदजनक आणि वृथा व्यय चाललेला आहे. असंख्यकोटि प्राणी जन्मास येऊन व्यक्तित्वशून्य आणि व्यक्तित्वहीन असे मृत्युमुखीं पडतात, त्यांची उत्पत्ति, स्थिति, लय हीं जणूं काय अहेतुक भासतात, आणि व्यक्तित्वपूर्ण प्राणी हे अपवादादाखल कोठें तरी चमकतात. असा प्रकार न व्हावा, प्रत्येक प्राण्यामध्यें व्यक्तित्व पूर्णत्वास यावें, अशी दैवि योजना असून तिला अनुकूल वर्तन ठेवणें हा प्रत्येक प्राण्याचा आद्य आणि अंतिम धर्म होय आणि या मंगल हेतूस अडथळा आणणें ह्यापरता दुसरा कोणताही अधर्म नाहीं.

---

## मनुष्यजन्माची सार्थकता.

(ता. ११–२–११ रोजीं केलेल्या कीर्तनाचा सारांश.)

**अब तुम कब सिमरोगे राम। जिवडा दो दिनका मेजवान ॥ ध्रु० ॥ गरभपनोमें हाथ जुडाया। निकल हुवा बेमान ॥ १ ॥ बालपनोमें खेल गमाया। तारुनपनमें काम ॥ २ ॥ हात पांय जब कापन लागे। निकल गया अवसान ॥ ३ ॥ झुठी काया झुठी माया। आखर मौत निदान ॥ ४ ॥ कहत कबीर सुनभाई साधो। यहि घोडा मैदान ॥ ५ ॥**

मनुष्यदेहामध्यें जी ह्या प्राणाची योजना आहे, ती फार थोडा वेळ टिकणारी आहे. म्हणजे

जीव हा दोन दिवसांचा मेजवान् म्हणजे पाहुणा आहे. पण ह्या थोड्याच अवकाशांत जीवदशेच्या द्वारा चैतन्यरूपी आत्म्याचा उद्धार करावयाचा असतो. म्हणून ज्याला जाणल्याशिवाय मनाचें खरोखर समाधान होणार नाहीं त्या ईश्वरास होतां होईल तों ओळखण्याविषयीं कबीरजी आग्रह करीत आहेत. जड स्थितींत असलेली सर्व सृष्टि ईश्वराच्या कायद्याचें पालन बिन तक्रार करीत आहे. चंद्र, सूर्य, पृथ्वी आणि तारागण, वायु आणि वनस्पति हीं सर्व ईश्वरास नमून आहेत. गर्भावस्थेमध्यें असतांना मनुष्यप्राणीही इतर जड सृष्टीप्रमाणें जणूं काय ईश्वराची आज्ञा ऐकण्यास तयारच असा हात जोडून असतो; पण तो बाहेर पडून स्वतंत्र झाल्याबरोबर बेइमान होतो. अखिल जडसृष्टि ईश्वराला न जाणतांच जे त्याचें नियम पाळीत असते, तेच नियम समजून उमजून पाळणें ही मनुष्यपणाची थोरवी आहे. आणि एवढ्याचसाठीं त्याला जीव हा पाहुणा दोन दिवस भेटावयास आलेला असतो. परंतु विपरित प्रकार असा होतो कीं आयुष्याचे हे दोन दिवस लहानसान गोष्टींत निघून जातात. बाळपण खेळांत जातें आणि तरुणपण ख्यालीखुशालींत जातें, काम म्हणजे सर्वथैव तिरस्करणीय आहे असें नाहीं. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें "बरें खावें बरें जेवावें। बरें ल्यावें बरें नेसावें। मनासारखें असावें। सकळ कांहीं।" ही बरेपणाची इच्छा (Decency) अथवा बरें असण्याची आणि दिसण्याची प्रवृत्ति कांहीं वावगी नाहीं. लहान मुलाला जसा खेळ, तसा तरुण माणसांच्या ह्या कामना साहजिकच आहेत, पण एवढ्यांतच त्याच्या सर्व शक्तीचा ऱ्हास व्हावा अशी योजना दिसत नाहीं. खेळ आणि कामना यांच्याद्वारा स्वतःची ओळख करून घेऊन तिच्यायोगें सर्व विश्वाचा जो प्राण त्याची ओळख करून घ्यावयाचा मनुष्याचा थोर अधिकार आहे; आणि तो प्राप्त झाल्याशिवाय मनुष्याला स्वतःची सुद्धां पूर्ण ओळख पटत नाहीं. तोंपर्यंत त्याच्यामध्यें केवळ अंध अहंकार कसा असतो हें खालील पद्यांत बुलाशहा यानें दाखविलें आहे.

**माटी खुद्दी करें दी यार ॥ ध्रु० ॥ माटी जोडा माटी घोडा। माटीदा असवार ॥ १ ॥ माटि माटिनु मारन लागी। माटी दे हतिहार ॥ २ ॥ जिस माटीपर वहुती माटी। तिस माटी अहंकार ॥ ३ ॥ माटी बागबगीचा माटी। माटी दी गुलजार ॥ ४ ॥ माटि माटिनु देखन आई। माटी दी वहार ॥ ५ ॥ हंस खेल फिर माटी होई। पौंदी पाव पसार ॥ ६ ॥ बुलाशहा बुझारत बुझा। लाह शिरो भवसार ॥ ७ ॥**

गाडी, घोडा बागबगीचा आणि इतर सर्व संपत्ति हे मातीचेच निरनिराळे प्रकार, त्यांचें सेवन करण्यासाठीं जे आपल्यामध्यें इंद्रियगण आहेत तेही पण मातीचेच प्रकार, म्हणून मातीच्या ढिगावर मातीचा ढीग रचण्यामध्यें ज्याप्रमाणें कांहीं विशेष होत नाहीं, त्याप्रमाणें केवळ इंद्रियसुखासाठीं विषयांची रचना करण्यामध्येंही अभिमान बाळगण्यासारखें कांहींच नाहीं. केवळ डोईवर भार मात्र आहे. इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां अशाही प्रकारचा अभिमान उत्पन्न होतो कीं आपणांस देव मिळाला. नुसत्या खाण्यापिण्यामध्येंच गर्क होऊन आम्ही आपणास फसवीत नाहीं तर केव्हां केव्हां एकादी धार्मिक पोकळ समजूत घेऊन आपण स्वतःस धन्य मानीत असतों; आणि केव्हां केव्हां परोपकाराचें कृत्य करीत असतांही अशी फसवणूक होते. हा अनुभव बाबू रविंद्रनाथ ठाकूर यांच्या खालील पदांत सुंदर रीतीनें निवेदित झालेला आहे.

**गर्व माझा हरुनि प्रभु आणिली बहु लाज। कवण मुखें संमुख तव राहुं हा मी आज ॥ध्रु०॥ गवसलासि तूं म्हणूनी मज मी फसवी मानिंच्या मनीं। फजित होत संसारिं या करितां तुझें काज ॥ १ ॥ कळेनाचि आमुच्या वरीं वससि कुठें प्रभु तूं तरी। कधिं न तुझ्या चरणीं मला लाविलें राजराज ॥ २ ॥ त्यजूनि तिला दिनरजनीं माझेचि ठायीं गेलों रमुनी। तव न वैभवीं देखिलें तुला विफल चक्षु काज ॥ ३ ॥**

काव्याचें बाहिक आणि अंतरिक असे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत बाहेरील सर्व पदार्थांचें हुबेहूब वर्णन असतें; परंतु त्यांत कवीचें हृद्गत दिसून येत नाहीं. दुसऱ्या प्रकारांत कवीनें

आपले अंतस्थ अनुभव निवेदिलेले असतात. चित्राचाही हाच प्रकार आहे. छायाचित्रांमधून ( Photographs ) चित्रकाराचा मागमूसही लागत नाहीं. परंतु चित्रकार, प्रेम, करुणा, वैराग्य, वीर्य, इत्यादि आपल्या अनुभवाचें जेव्हां बाहेरील एकाद्या देखाव्याच्या द्वारा चित्र काढतो तेव्हां तें वरिष्ठ दर्जाचें ठरतें. चित्र आणि काव्य यांचे हे दोन प्रकार ज्याप्रमाणें एकाहून एक श्रेष्ठ आहेत त्याचप्रमाणें जीवित्वाचे प्रकार आहेत. केवळ बाहेरचे भोग भोगून अथवा केवळ आपल्याच कल्पनेंत दंग होऊन आपण राहिलों तर 'तव न वैभवीं देखिलें तुला विफल चक्षुकाज' असा पश्चात्ताप होणार आहे. पण जर आम्ही प्रत्येक वेळीं आमच्या शुद्ध आणि पवित्र विचारामध्यें आणि आचारामध्यें ईश्वरी इच्छेचा विलास पाहूं लागलों आणि संसारांतील निरनिराळ्या प्रसंगीं त्याचा समागम अनुभवूं लागलों, तर आमचें जीवित दुसऱ्या प्रकारच्या चित्राप्रमाणें आणि काव्याप्रमाणें गंभीर आणि पूर्ण होईल. रविंद्रनाथांचें वरील पद हें दुसऱ्या कोटींतलें आहे आणि तें त्यांच्या आध्यात्मिक जीविताचें द्योतक आहे.

असो. याप्रमाणें ईश्वराचें वैभव पाहून तें ईश्वराचें आहे अशी मनाची भावना न होतां आपण तिच्यांत दंग झालेले असतों आणि डोळे असून आंधळे होतो. अशा रीतीनें बाळपण आणि तरुणपण निघून गेल्यावर म्हातारपणीं आपण निःसत्व होऊन पडतों. ईश्वरभजन करणें म्हणजे केवळ तोंडानें किंबहुना मनानेंही तें स्मरण करणें एवढेंच असतें तर तें म्हातारपणीं घडलें असतें. पण ज्याअर्थी कबीरजींनीं 'निकल गया अवसान' असें म्हटलें आहे त्या अर्थी भक्तिमार्गाचा अवसानाशीं म्हणजे शक्तीशीं निकट संबंध आहे असें होतें. भक्ति म्हणजे प्रेममय शक्ति होय. ती नसेल तर आपली काया आणि माया म्हणजे शरीर आणि धन हीं विफल होतात आणि आपलें मरण मात्र खरें होतें. प्रेममय शक्तीशिवाय जिवंत रहाणें म्हणजे निष्फळ आहे. केवळ शारीरिक अस्तित्व म्हणजे जीव नव्हे.

**जिन प्रेम रस चाखा नहीं, अमृत पिया तो क्या हुवा। जिस इश्कते सिरना दिया, जुग जुग जिया तो क्या हुवा ॥ १ ॥ औरो नसी हत तूं करे खुद अमल करता नहीं। दिलका कुफर टूटा नहीं, हाजी हुवा तो क्या हुवा ॥ २ ॥ जब इश्कके दरयामें, गरकाब धह होता नहीं। गंगा जमना द्वारका नहाता फिरा तो क्या हुवा ॥ ३ ॥ वहीं पुकारे ही पिया पिया, पियाई पुकारते जिया दिया। मतलब हासल न हुवा रो रो मुवा तो क्या हुवा ॥ ४ ॥**

याप्रमाणें प्रेमरस जीविताचें मुख्य तत्त्व आहे. या प्रेमानें ईश्वरही बद्ध आहे, तो म्हणतोः—

**सुनो सकळ नारीनर, प्रेमधारी नयनसे। जानो मर्म मेरा सभी भक्तशुद्ध नयनसे ॥ १ ॥ जैसे वत्स गायपास, रहे सदा आसपास। वैसेही मैं भक्तसंग, रहता चिर दिन लिये ॥२॥ प्रेमका भिकारी मैं, खडा हूं तुमरे द्वार पर। नहीं मिलति प्रेम भिक्षा, मुझको तुमसे प्रियतर ॥ ३ ॥**

या प्रकारें ईश्वर स्वतःस प्रेमाचा भुकेलेला भिकारी म्हणवितो आणि भक्त ईश्वराचा दास म्हणवितो.

**मैं गुलाम मैं गुलाम मैं गुलाम तेरा। तूं दिवान तूं दिवान तूं दिवान मेरा ॥ १ ॥ एक रोटी और लंगोटी द्वार तेरे पावा। भक्ति भावदेह आरोग्य नाम तेरा गावां ॥ २ ॥ तूं दिवान मेहरबान नाम तेरा वारया। दास कबीर शरण आयो चरणलाग तारया ॥ ३ ॥**

अशा रीतीची ईश्वराशीं तद्रूप होणारी प्रेममय शक्ति आपल्या जीवितामध्यें उदयास आली पाहिजे आणि तिला कालावधि मुळींच लागूं नये. कबीरजींनीं म्हटल्याप्रमाणें हा घोडा हें मैदान अशी आपली तत्पर स्थिति जीवीतामध्यें असली पाहिजे.

## *'आपुलिया बळें घालावी हे कास.'

विषयोपक्रमः—या मानवी संसारामध्यें मनुष्याची बुद्धि उत्तरोत्तर जसजशी जास्त विकसित होत जाते, तसतसा त्याच्या कर्तव्याचा प्रदेश विस्तृत होऊन त्याची बुद्धि संकीर्ण होते व अशा वेळेस काय करावें असा त्याला भ्रम होत असतो. त्याची चित्तशुद्धि आणि समाजहित या दोन कर्तव्यांचा कलह लागून बुद्धि व्यामिश्रित होते. प्राचीन काळीं वेदांतांत समष्टि, व्यष्टि या दोन भावना जरी अवगत होत्या तरी अर्वाचीन काळाप्रमाणें तेव्हां त्याचा प्रत्यक्ष अनुभव येत नव्हता. आतां प्रत्येकाची जात, समाज, राष्ट्र, जग अशा उत्तरोत्तर समष्टि सुधारणेकडे ध्यास लागतो आणि अंतःकरणशुद्धि या व्यष्टि सुधारणेची हयगय होते आणि त्यामुळें समष्टि सुधारणेलाही बाध येतो. तुकाराम म्हणतात, अशा वेळेस एक गोष्ट करा ती ही कीं,—

आपुलें स्वहित करावें पैं आधीं।
विचारूनी बुद्धि समाधान॥
नये मार्गे पाहों वाट फिरोनियां।
दुसरा संगिया साहाकारी॥
आपुलिया बळें घालावी हे कास।
न येणेंचि आस आणिकाची॥
तुका म्हणे ब्रह्मरसीं द्यावी बुडी।
वासना हे कुडी सांडूनियां॥

आपल्या स्वतःच्या बुद्धीला ज्यायोगें समाधान वाटेल अशी गोष्ट करा. स्वतःच्या बुद्धीला सोडून दुसऱ्याच्या बुद्धीचें समाधान पाहूं नका. जितकी त्वरा करवेल तितकी करून आपलें हित साधून घ्या. कारण—

जरा टुक सोच ये गाफील,
के दमका क्या ठिकाना है।
निकल जब ये गया तनसे।
तो सब आपना बेगाना है॥ १॥

मुशाफिर तूं है, यह दुनिया।
सराहे भूल मत गाफील।
सफर परलोकका आखिर।
तुझे दरवेश आना है॥ २॥

तुमचें जीवित फार थोडें आहे, त्याचा प्रदेश फार आकुंचित आहे, तुमचें ठिकाण कोठें आहे? पर्यवसान कशांत आहे याचा विचार करा. या तनूंतून दम निघून गेला म्हणजे जें आपलें म्हणून समजतों तें परकीय बनेल. आपण या जगामध्यें मुशाफर असून आपली वसति तात्पुरती आहे. ही सराई—धर्मशाळा—आहे, कायमची वसति नाहीं. सध्यां आपण ज्या पायरीवर आहों त्याच्यां वरच्या पायरीवर जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. बुद्धीचें बदलत जाणारें आपलें कर्तव्य करीत असतां, आपल्या बुद्धीचें समाधान केलें पाहिजे, कारण;

न जाने कौनसी बीरया।
बजेगा कूच नक्कारा॥
विषयसुख देख मत भूलो।
वृथा जंजालमें फूलो॥
जगत है रैनका सुपना।
समज मन कोई नहीं आपना॥
तजो मन लोभ चतुराई।
भजो हरिचरण सुखदाई॥

कोणत्या वेळेस या पायऱ्या आटपतील याचा नियम नाहीं, या प्रवासाचा आदि व अंत अनिश्चित आहे; हें सर्व जगत् क्षणभंगुर आहे व नेहमीं बदलत जाणारें असून रात्रीच्या वेळीं पडलेल्या स्वप्नाप्रमाणें आहे. आपलें मत स्थापित करण्याकरितां प्रयत्नानें बहुमत आपणाकडे मिळविण्याची चतुराई आपण करूं नये. त्यायोगें आपणाला खरें सुख प्राप्त होणार नाहीं. तें मिळविण्यास हरीचे चरण घट्ट धरले पाहिजेत. नाहीं तर—

चामडेकी पूतली तूं करले भजन॥ ध्रु०॥
चामडेकी पूतली चांबलेवे पान।
आछे आछे कपडे पहिरे करत गुमान।
चामडेका वछा चामडेकी गाय।
चामडेका दूध दही चामडेमें जाय॥
चामडेका हाथीघोडा चामडेका उंठ।
चामडेका बाजा बाजे बाजे चारो खूंट॥

* ता. १४–६–१० रोजीं रा. रा. सत्यवंत वासुदेव नवरंगे यांच्या घरीं त्यांचे वडील प. वा. वासुदेव बाबाजी नवरंगे यांच्या तिसऱ्या पुण्यतिथिनिमित्त केलेल्या हरिकीर्तनाचा सारांश.

**चामडेका बादशहा चामडेका वजीर।**
**चामडेकी सारी दुनिया बोले दास कबीर ॥**

मनुष्यें कातड्याच्या बाहुल्या आहेत, त्या बाहुल्या तरी सुंदर असाव्या तशा नसून बहुतेक कुरूप आहेत. शंभरामध्यें एखादी दुसरी सुंदर असते. अशी स्थिती असूनही मनुष्य कितीतरी गर्व वहातो! पानसुपारी खाऊन कृत्रिम सौंदर्यानें कुरूपतेचें तो प्रदर्शन करीत असतो.

एका राष्ट्राचें सौंदर्य दुसऱ्या राष्ट्रास हंसावयास लावतें, एखाद्याची टोपी, जोडा किंवा अंगरखा दुसऱ्यास हास्यास्पद वाटतो. दुसऱ्याला बरें वाटावें म्हणून आपण चांगला पेहराव करतों. याप्रमाणें आपण या कातड्याच्या देहाचा विनाकारण गर्व वाहातों. जिचें आपण दहींदूध खातों ती गाय चामड्याचीच आहे; तिचें वासरूं, दहीं, दूध देखील कातड्याचेंच आहे; आणि तें दूधही कातड्याच्याच पोटांत जातें. हत्ती, घोडे, उंट, वजीर व बादशहा देखील कातड्याचाच आहे. अशी ही सर्व दुनियाच कातड्याची बनलेली आहे. तथापि आपल्या आदर्शाच्या मागें लागून आपण जर उच्चपद संपादन करून आपलें हित साधून घेतलें तर या चामड्याच्या देहाचें सार्थक होतें. जेथें जेथें भजन होत असतें तेथें तेथें आत्माराम येत असतो, नाहीं तर नुसतें चामडें राहतें. आपण जर स्वहित लवकर साधून घेतलें नाहीं तर आपण काळाच्या जबड्यांत जाऊं. काळ कसा आहे तर

**पुरंदरसहस्त्राणि चक्रवर्तिशतानि च। निर्वापितानि कालेन प्रदीपा इव वायुना ॥ अद्यैव हसितं गीतं पठितं यैः शरीरिभिः। अद्यैव ते न दृश्यन्ते कष्टं कालस्य चेष्टितम् ॥ म्रियमाणं मृतं बंधुं शोचन्ते परिदेविनः। आत्मानं नानुशोचन्ति कालेन कवलीकृतम् ॥**

मोठमोठीं शहरें काबीज करणारा सेनापति, एवढेंच नव्हे तर सार्वभौम राजासुद्धां काळाच्या एका फुंकारानें नाहींसा होतो. थोड्या वेळेपूर्वी वाचीत असलेला किंवा सुस्वर गायन गात असलेला मनुष्य एकदम काळाच्या तावडींत सांपडतो. या काळानें सर्वांना आपल्या मुठींत धरलेलें आहे. परंतु हा कालवाद सुद्धां खरा नाहीं. कर्म हेंच सर्वांपेक्षां बलवत्तर आहे. महाभारतांतील अनुशासनपर्वामध्यें अशी गोष्ट आहे कीं, गौतमी नांवाच्या एका वृद्ध बाईचा एकुलता एक मुलगा साप चावून मेला, तेव्हां अर्जुनका नांवाच्या व्याधानें त्या सापास जिवंत धरून आणून, यास कोणती शिक्षा करूं म्हणून गौतमीस विचारलें. त्यावर तिनें सापासच ती गोष्ट विचारण्यास सांगितलें. सापास विचारल्यावरून त्यानें उत्तर दिलें कीं, यांत माझा कांहीं एक अपराध नाहीं, मी मरणाचा दास आहें, मरणानें सांगितलेलें काम मी बजावतों एवढेंच. त्यावरून व्याधानें मरणास जिवंत पकडून आणून हें दुष्कृत्य तूं कां केलेंस म्हणून त्याला विचारलें. मरणानें उत्तर दिलें, बाबा, मी सापासारखाच काळाचा नोकर आहें. त्याच्याच आज्ञेवरून मी पडशाकडे, खोकल्याकडे, तापाकडे वगैरे अनेक रोगांकडे जाऊन मनुष्यांना घेऊन येतों. पुढें व्याधानें त्या काळासही पकडून आणिलें; तेव्हां काळानें पुढीलप्रमाणें उत्तर दिलें:—

**कर्मदायादवाँल्लोकः कर्मसंबंधलक्षणः। कर्माणि चोदयन्तीह यथान्योन्यं तथा वयम् ॥ यथा मृत्पिंडतः कर्ता कुरुते यद्यदिच्छति। एवमात्मकृतं कर्म मानवः प्रतिपद्यते ॥ यथाच्छायातपौ नित्यं सुसंबद्धौ निरंतरम्। तथा कर्मच कर्ता च संबद्धावात्मकर्मभिः ॥ एवं नाहं नवैमृत्युर्नसर्पो न यथा भवान्। न चेयं ब्राह्मणी वृद्धा शिशुरेवात्र कारणम् ॥**

मी कांहीं एक करीत नसतों. जें कांहीं घडतें तें ज्याच्या त्याच्या कर्मामुळें घडत असतें. कर्मसंबंधहीन अशी कोणतीच वस्तु नाहीं. सर्व भाव मात्र कर्मसंबंधलक्षण आहे. एका कर्मामुळें दुसरें कर्म उद्भवतें. अशी ही मालिका सारखी चालू आहे. आम्ही सर्वजण छकड्याला जुंपलेले बैल आहों. कर्म व कर्ता यांचा अन्योन्य संबंध आहे. आज असें कर्म नाहीं कीं जें स्वयंभू आहे. कर्ता अगोदर कीं कर्म अगोदर हें एक मोठें कोडें आहे. बीजांकुरन्यायाप्रमाणें कर्ता, कर्माचा बाप, किंवा कर्म कर्त्याचा बाप हें कांहीं सांगतां येत

नाहीं. कर्त्याच्या इच्छेच्या बीजाभोंवतीं कर्माची जमीन, कर्माचें खत, कर्माचें पाणी व कर्माची हवा असते; त्यांतून जो अंकुर येतो त्याचा भाग कर्माकडे किती व कर्त्याकडे किती हें कोणी सांगावें? कुंभार ज्याप्रमाणें आपल्या इच्छेनुरूप मडकें बनवितो, त्याप्रमाणें मनुष्य स्वेच्छेनें कर्म करीत असतो व कर्मही मनुष्येच्छेला आपल्यापरी वळवीत असतें. ज्याप्रमाणें ऊन व सावली एकमेकांवर अवलंबून असतात त्याप्रमाणें कर्म व कर्ता एकमेकांवर अवलंबून आहेत. परस्परांचा परस्परांवर सूक्ष्म क्रिया, प्रतिक्रिया ( Interaction ) होत असते. व्याघ साप, मरण, काळ किंवा गौतमी यांपैकीं कोणीही जबाबदार नाहीं तर त्या मुलाचेंच जें कर्म त्यानें त्यास नेलें आहे. कर्मच सर्वांत श्रेष्ठ आहे. असें आदर्शमय कर्म आपल्या बुद्धीचें समाधान साधून आपण करावें, व आपली बुद्धि स्थिर करावी. भलताच वाद माजवूं नये, नाहीं तर तुकारामांनीं म्हटल्याप्रमाणें 'वादें ब्रह्मवृंदें गेलीं वायां' असें होईल. आपल्या जीवनपथापासून आपण एक अंगुळीभरही दूर जाऊं नये. नाना प्रकारच्या मतांचा व जीवनपथाचा कांहीं एक संबंध नाहीं. आपल्या समाधानाचें जितक्या प्रमाणानें हित असेल तितक्या प्रमाणानें आपलें शरीर, शील, समाधानरूपी संपत्ति खर्च करावी. जीवनपथास धरून आपण जर कर्म केलें नाहीं तर आपली स्थिति वेड्यापेक्षांही कठिण होईल.

स्थाल्यां वैडूर्यमय्यां पचति तिलखलीमिन्धनैश्चन्दनाद्यैः । सौवर्णै लांगलाग्रैर्विलिखति वसुधामर्कमूलस्य हेतोः ॥ छित्वा कर्पूरखण्डान्वृतिमिह कुरुते कोद्रवाणां समन्तात् । प्राप्येमां कर्मभूमिं न चरति मनुजो यस्तपो मन्दभाग्यः ॥

जो मनुष्य कर्मभूमीला प्राप्त होऊन व्रत आचरीत नाहीं तो रत्नजडित भांड्यामध्यें तिळाची पेंड घालून खालीं मलयपर्वतावरील चंदन हें सर्पण लावून ती पेंड शिजविणाऱ्या मनुष्याप्रमाणें, किंवा रुईची मुळी काढण्याकरितां सोन्याच्या नांगराचा उपयोग करणाऱ्या मुलाप्रमाणें, किंवा कोद्रवाच्या भोंवतीं कापराचें आळें करणाऱ्या मनुष्याप्रमाणें मूर्ख आहे. जो मंदभागी आहे तो कर्म कोणतें, कर्माचें काय महत्त्व आहे हें समजल्यावरही त्या संधीचा दुरुपयोग करतो. याकरितां आपण नेहमीं भजन केलें पाहिजे. भजन म्हणजे नुसतें टाळ कुटीत बसणें नव्हे तर भजन म्हणजे आपल्या मनाला जें उच्च वाटलें त्या आदर्शाचा पाठलाग करणें होय. असें भजन करून आपलें हित साधून घेतलें पाहिजे. आपलें उद्दिष्ट मनाला कळलें अशी जरी खात्री झाली तथापि आदर्शाच्या बाजूनें एक अडचण आहे ती कोणती म्हणाल तर–

आवडतो प्रिय परी गवसेना ॥ ध्रु० ॥
स्वजनाहुनि प्रिय देह आपला ।
तोहि विटे परि आपण विटेना ॥
ज्यावरी धांवति इंद्रिय मन हीं ।
सर्वांही पाहुनि आपण दिसेना ॥
श्रीगुरुदासा अनन्य घडे जरी ।
अनुभवतंतू कधींही तुटेना ॥

आपण आदर्शप्रिय वाटतों पण तो गवसत नाहीं. आपल्या स्वजनांहून प्रिय असा देह विटतो पण आदर्श विटत नाहीं. आपल्या सर्व गात्रांचे भाव ईश्वर पाहातो पण तो स्वतः कांहीं दिसत नाहीं. असें जरी आहे तरी आपण निराश होतां काम नये. एका आदर्शानें दुसरा आदर्श मिळतो. हिमालय पर्वतावरचीं सर्व शिखरें एकदम दिसत नाहींत. एक चढून गेल्यावर दुसरें, दुसरें चढल्यावर तिसरें दिसतें. याचप्रमाणें आदर्शाचीही गोष्ट आहे. डावपेंच नसेल तर आपला अनुभवतंतु कधीं तुटत नाहीं.

प्रेम पियाला जो पिये शीस दक्षिणा देय ।
लोभी शीस न देसके नाम प्रेमका लेय ॥
जा घट प्रेम न संचरे, सो घट जान मसान ।
जैसी खाल लुहारकी, श्वास लेत बिन प्राण ।

ज्याला प्रेमाची गोडी लागली आहे तो प्रेमाकरितां आपलें डोकेंही कापून देण्यास तयार असतो; पण ज्याला ती गोडी नसते तो नुसतें प्रेमाचें नांव घेत बसतो. अनुभव यावयास प्रेमाचा प्याला प्यावयास पाहिजे. नाहीं तर लोहाराच्या भात्याप्रमाणें प्राणाशिवाय नुसता श्वास घेणारीं आम्ही यंत्रें होऊं. केशवस्वामी सांगतात—

ऐसी फकिरी नहीं रे भाई । येतो सालिम पेशरमांई ॥ ध्रु० ॥ चेलेके घर हात पसारे । दुनियादारकु मानत प्यारे ॥ मै घर लडके मनमें धरना । बाहेर निमाज रोजे करना ॥ कान खोलकर केशव बोले । गाफिल अलबत खावे झोले ॥

चेल्यानें फकिराजवळ भिक्षा मागावयाची, ती हल्लीं संध्याकाळीं फकिरांचीच गर्दी चेल्यांचे घरीं दृष्टीस पडते. बाहेरून परमार्थ पण आंतून स्वार्थ बरा नव्हे; याकरितां तूं आपल्या बुद्धीला संतुष्ट करून आपलें हित साधून घे व खालीलप्रमाणें ईश्वराची प्रार्थना कर:—

प्रभू मज देई तुझी खरी शांति ॥ ध्रु० ॥
जगशांतीनें मन मळमळलें ।
होत असे मज वांति ॥
तव शांतीनें बहु सुख वाटे ।
नेई वरी ती अंतीं ॥
शांति दे स्थिर करि मन माझें ॥
काढ मनाची भ्रांति ॥
शांति आपुली दिली त्वां ज्यांना ।
काय तयांची कांति ॥

---

## कालियामर्दन.

पुराणांतील ही कथा शुकानें परिक्षिति राजाला सांगितलेली आहे. पुराणें चांगलीं कां वाईट हाच वाद सध्यां माजून राहिलेला आहे. एक पक्ष म्हणतो, पुराणांमध्यें पावणे सोळा आणे गवाळ आहे व पाव आणा ग्राह्यांश आहे. दुसरा पक्ष म्हणतो, पुराणें सोळा आणे बरोबर आहेत. पण कोणी असें सांगत नाहीं कीं पुराणांमध्यें वाईट गोष्टी आहेत, चांगल्याही आहेत, चांगलें असेल तें घ्या, वाईट असेल तें टाकून द्या. यःकश्चित् क्षुद्र पदार्थ देखील तिखट मीठ लावून रसभरित करतां येतो मग पुराणांमध्यें गोडी नाहीं असें कसें म्हणावें? पुराणांनीं सुधारणा सोपी केलेली आहे, मात्र त्यांमधील चोथा टाकून देऊन रस घेतला पाहिजे, 'कालियामर्दन' ही पुराणांतीलच गोष्ट आहे.

श्रीकृष्ण हा आपल्या सोबत्यांबरोबर यमुनातीरीं खेळत असतां त्यानें बळेंच तो चेंडू यमुनेच्या तिरावरील कळंबाचे झाडावर उडविला. त्या झाडावरून तो काढण्याकरितां त्यानें आपल्या सोबत्यांना बोलाविलें त्यांपैकीं कांहीं त्याच्याबरोबर गेले व कांहीं मागच्या मागें पळाले, पण कोणाच्यानें त्या झाडावर चढण्यास धीर होईना, एवढेंच नव्हे तर श्रीकृष्ण जेव्हां झाडावर चढूं लागला तेव्हां त्यांनीं त्याला निराश करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणूं लागले—

नेणों म्हणती हें करितोसि काई ।
आम्हां तुझी आई देईल शिव्या ॥
आपुलिया काना ठेवूनियां हात ।
सकळीं निमित्त टाळियेलें ॥
निमित्ता कारणें रचिलें कारण ।
गेला नारायण खांदीवरी ॥
खांदीवरी पाव ठेवियला देवें ।
पाडावा त्या भावें चेंडु तळीं ॥
तळील नेणती तुको म्हणे भाव ।
अंतरींचा देव जाणों नेदी ॥

आपल्या बुद्धीला जें योग्य वाटलें तें श्रीकृष्णाला करावयाचें होतें, म्हणून कोणाची पर्वा न करितां तो झाडावर चढला व मुद्दामच त्यानें तो चेंडू यमुनेच्या डोहांत पाडिला व तो काढण्याकरितां त्यानें आंत उडी घेतली. तेव्हां सर्वत्र फार हाहाःकार झाला. गोपांनीं ही बातमी नगरांत जाऊन सांगितली, तेव्हां सर्व गोप, गौळणी वगैरे नदीकिनारीं येऊन, अहाहाः, उहूंहूं, अगाई, अगाई करून रडूं लागले. श्रीकृष्ण कधीं मरणार नाहीं म्हणून बळरामानें त्यांचें खालीं लिहिल्याप्रमाणें समाधान केलें.

बळ तयासि म्हणे तुम्ही आयका ।
सकळ गोवळ गौळणि बायका ॥
भय कदापि न या व्रजनायका ।
असुख कोण करी सुखदायका ॥
अशा रामशब्दांसि घेऊन कानीं ।
यशोदादि संपूर्ण त्या गोपिकांनीं ॥
दिले प्राण नाहीं तया वायकांहीं ।
गमें धैर्य त्या रामवाक्येंचि कांहीं ॥

हा बळरामाचा उपदेश ऐकून रडें बंद करून सर्वजण घरीं गेले. श्रीकृष्णाला त्यांची ही भावना कळून चुकली. तो पाण्याच्या आंतही गेला नव्हता व बाहेरही नव्हता, पण आडून कोण कसा रडतो हें पहात होता. आईबाप, भाऊबंद तटाजवळच येऊन तटस्थ होत असतात, त्याच्या पलीकडे जाण्याचें कोणाला सामर्थ्य होत नाहीं. स्वबचावा-करितां जो तो सावध असतो. कृष्णाचा जीव धोक्यांत आहे असें त्यांना वाटत असूनही त्याला सोडविण्यास कोणी तयार झाला नाहीं.

दूर देखोनिया यमुनेचें जळ ।
कांठींच कल्होळ करितातीं ॥
मागें सरे माय पाऊला पाउलीं ।
आपलेंच घाली घाकें अंग ॥
अंग राखोनियां माय खेद करी ।
अंतरींचे हरी जाणवलें ॥
जाणवलें मग देवें दिली बुडी ।
तुका म्हणे कुडी भावना हे ॥

जो मनुष्य काळाची पर्वा न करतां सुधारणा करूं इच्छितो, त्यानें कृष्णाप्रमाणेंच कोणाची वाट न पहातां आपल्याच बळावर सुधारणा केली पाहिजे म्हणजे त्याला काळ म्हणजे कः पदार्थ आहे असें कळून येईल. त्या कामीं मदत करण्यास तर कोणी तयार नसतात, पण उलट त्याच्या मार्गामध्यें विघ्नें उत्पन्न करणारे बरेच असतात; पण खरे सुधारक आपल्या मताप्रमाणेंच वागून आपल्या बुद्धीचें समाधान करीत असतात. काळावर नजर देऊन स्वस्थ न बसतां काळ म्हणजे कः पदार्थ आहे हें श्रीकृष्णांनीं कालीयाचें म्हणजे काळाचें मर्दन करून स्पष्टपणें लोकांचे दृष्टोत्पत्तीस आणून दिलें. अशा रीतीनें खऱ्या सुधारकाचें लक्षण श्रीकृष्णामध्यें किती पूर्णपणें दिसून येत होतें आणि त्यानें आपल्या बालक्रीडेमध्यें तें वेळोवेळीं कसें दाखविलें हें वरील कथेंत स्पष्ट दिसून येतें. डोहां-तून वर आल्यावरही कोणावर न रागावतां कृष्णानें सर्वांना आलिंगन दिलें.

4089
REFBK-0000741

समाप्त.